सत्यमेव जयते

लोकलेखा समिती

(२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१६-२०१७ च्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालामधील सार्वजनिक आरोग्य विभागाशी संबंधित (परिच्छेद क्रमांक ३.१) आणि पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाशी संबंधित (परिच्छेद क्रमांक ३.४ व ३.१३) यावरील

सदुसष्टावा अहवाल

[सदर अहवाल, मा. अध्यक्षांचे निदेश क्र. ९ (सातवी आवृत्ती २०१४) आणि मा. सभापती यांचे निदेश क्र. ९ (पाचवी आवृत्ती २०११) अनुसार मा. अध्यक्ष आणि मा. सभापती यांना दिनांक ६ सप्टेंबर, २०१९ रोजी सादर करण्यात आला.]

(दिनांक नोव्हेंबर, २०१९ रोजी विधानसभेच्या/विधानपरिषदेच्या सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

विधान भवन, मुंबई.

२०१९

लोकलेखा समिती

(२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१६-२०१७ च्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालामधील सार्वजनिक आरोग्य विभागाशी संबंधित (परिच्छेद क्रमांक ३.१) आणि पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाशी संबंधित (परिच्छेद क्रमांक ३.४ व ३.१३) यावरील

सदुसष्टावा अहवाल

एचबी १५०७–१

लोकलेखा समिति

२०१७-२०१८

समिति प्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि. स. स.

सदस्य

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि. स. स.

(३) श्री. नानाजी शामकुळे, वि. स. स.

(४) श्री. संजय सावकारे, वि. स. स.

(५) श्री. सुधाकर देशमुख, वि. स. स.

(६) श्री. राजेंद्र पाटणी, वि. स. स.

(७) श्री. अतुल भातखळकर, वि. स. स.

* (८) श्री. योगेश सागर, वि. स. स.

(९) डॉ. सुनिल देशमुख, वि. स. स.

* * (१०) श्री. प्रशांत ठाकूर, वि. स. स.

(१०अ) ॲड. पराग अळवणी, वि. स. स.

(११) श्री. संजय केळकर, वि. स. स.

* * * (१२) श्री. सुरेश ऊर्फ बाळुभाऊ धानोरकर, वि. स. स.

(१३) श्री. अजय चौधरी, वि. स. स.

(१४) श्री. शंभुराज देसाई, वि. स. स.

(१५) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि. स. स.

(१६) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि. स. स.

(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि. स. स.

(१८) श्री. दिलीप वळसे-पाटील, वि. स. स.

(१९) श्री. जयंत पाटील, वि. स. स.

(२०) श्री. राजेश टोपे, वि. स. स.

**** (२१) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि. प. स.

(२२) श्री. रविंद्र फाटक, वि. प. स.

***** (२३) श्री. हेमंत टकले, वि. प. स.

(२३अ) श्री. विक्रम काळे, वि. प. स.

****** (२४) श्री. अमरसिंह पंडित, वि. प. स.

(२५) श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि. प. स.

******* (२६) श्री. जयंत पाटील, वि. प. स.

निमंत्रित

******** (२७) श्री. प्रसाद लाड, वि. प. स.

*********(२८) श्री. रामदास आंबटकर, वि. प. स.

सदरहू समिति दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ रोजी विधानसभा व दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठीत करण्यात आली.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. यु. के. चव्हाण, सचिव (EM).

(२) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.

(३) श्री. अ. चां. कोल्हे, उप सचिव तथा नि. अ.

(४) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.

(५) श्री. विनोद राठोड, कक्ष अधिकारी.

(६) श्री. रवींद्र म. मेस्त्री, कक्ष अधिकारी.

* श्री. योगेश सागर, वि. स. स. यांचा दिनांक १६ जून, २०१९ रोजी राज्यमंत्री म्हणून मंत्री मंडळात समावेश झाल्याने सदर जागा रिक्त आहे.

** श्री. प्रशांत ठाकूर, वि. स. स. यांनी आपल्या समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर ॲड. पराग अळवणी, वि. स. स. यांची मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १४ फेब्रुवारी, २०१९ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.

*** श्री. सुरेश उर्फ बाळू धानोरकर, वि. स. स. यांनी दिनांक २२ मार्च, २०१९ रोजी आपल्या सदस्य पदाचा राजीनामा दिल्यामुळे सदर जागा रिक्त आहे.

**** श्री. विजय उर्फ भाई गिरकर, वि. प. स यांची दिनांक २७ जुलै, २०१८ रोजी विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर मा. सभापती, विधानपरिषद यांनी श्री. विजय उर्फ भाई गिरकर, वि. प. स यांची पुन्हा दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.

***** श्री. हेमंत टकले, वि. प. स. यांनी आपल्या समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर श्री. विक्रम काळे, वि. प. स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.

****** श्री. अमरसिंह पंडित, वि. प. स. यांची दिनांक २७ जुलै, २०१८ रोजी विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे सदर जागा रिक्त झाली.

******* श्री. जयंत पाटील, वि. प. स. यांची मा. सभापती, विधानपरिषद यांनी निमंत्रित समिती सदस्य म्हणून दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ रोजी नामनियुक्ती केली होती. दिनांक २७ जुलै, २०१८ रोजी विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे त्यांची निमंत्रित समिती सदस्यत्वाची नियुक्ती संपुष्टात आली होती. ते विधानपरिषद सदस्य म्हणून पुन्हा निवडून आल्यामुळे मा. सभापती, विधानपरिषद यांनी श्री. जयंत पाटील, वि. प. स. यांची दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ रोजी समिती सदस्य म्हणून रिक्त जागेवर नामनियुक्ती केली.

******** श्री. प्रसाद लाड, वि. प. स. यांची मा. सभापती, विधानपरिषद यांनी दिनांक १ मार्च, २०१९ रोजी "विशेष निमंत्रित" समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.

********* श्री. रामदास आंबटकर, वि. प. स. यांची मा. सभापती, विधानपरिषद यांनी दिनांक २ मे, २०१९ रोजी "विशेष निमंत्रित" समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.

प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरून भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१६-२०१७ च्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवाल यावर विचार करून लोकलेखा समितीचा सदुसष्टावा अहवाल सादर करीत आहे.

समितीने दिनांक २४ व २९ जानेवारी, २०१९ आणि दिनांक ५, १२ व १४ फेब्रुवारी, २०१९ रोजी प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग आणि अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग आणि इतर विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष विधानभवन, मुंबई येथे घेण्यात आली.

प्रधान महालेखाकार, लेखापरीक्षा-एक महाराष्ट्र, मुंबई व महालेखाकार, लेखापरीक्षा-दोन, नागपूर हे समितीच्या निमंत्रणावरून बैठकींना उपस्थित होते. त्यांनी समितीला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे.

तसेच प्रधान सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागारे) यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि संबंधित विभागाच्या सचिवांनी समितीसमोर साक्ष देऊन समितीला सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांचे देखील आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त स्वतंत्ररीत्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. समितीच्या झालेल्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट 'अ' मध्ये देण्यात आलेले आहे.

समितीने दिनांक २३ जुलै, २०१९ आणि दिनांक ६ व १३ ऑगस्ट, २०१९ रोजीच्या बैठकीत सन २०१६-१७ वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील सार्वजनिक आरोग्य आणि पाणीपुरवठा व स्वच्छता विभागासंदर्भात तयार केलेला प्रारुप अहवाल विचारात घेतला व त्यातील शिफारशीवर सुधारणा सूचवून प्रारुप अहवालाला मान्यता दिली.

विधान भवन :
मुंबई/नागपूर.
दिनांक १३ ऑगस्ट, २०१९.

गोपालदास अग्रवाल,
समिती प्रमुख,
लोकलेखा समिती.

अनुक्रमणिका

अ. क्र.	विभाग व तपशील	पृष्ठ क्रमांक
(१)	(२)	(३)
	प्रस्तावना	(पाच)
(१)	सार्वजनिक आरोग्य विभाग	१
	(परिच्छेद क्रमांक ३.१)	१
(२)	पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग	७४
	(परिच्छेद क्रमांक ३.४)	७४
	(परिच्छेद क्रमांक ३.१३)	१७०

सार्वजनिक आरोग्य विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१६-१७ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.१ "राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना" यासंदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय व्यक्त केले :-

३.१. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना (आताची महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना)

परिच्छेद क्र	परिच्छेद	अभिप्राय
३.१.१	**प्रस्तावना** महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने, दारिद्रय रेषेखालील कुटूंब तसेच ज्या दारिद्रय रेषेवरील कुटूंबियांचे (शासकीय /निम शासकीय कर्मचारी आणि आयकर भरणाऱ्या व्यक्ती वगळून) उत्पन्न रु.एक लाख आणि कमी आहे तसेच अंत्योदय आणि अन्नपूर्णा शिधापत्रिकाधारक कुटूंबातील व्यक्तींना त्यांच्या ज्याविशिष्ट आजारांवर रुग्णालयात शल्कचिकित्सा आणि उपचार किंवा सल्ल्याव्दारे उपचारांची आवश्यकता असते त्यासाठी आरोग्य सेवा पुरविणाऱ्या पूर्व निश्चित संस्थांव्दारे विशिष्ट सेवा देण्यासाठी राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेला मान्यता (मे २०११) दिली. आरोग्य विमा क्षेत्रातील सेवादायी सार्वजनिक -खाजगी भागिदारीतील ही एक एकमेव योजना असून, गरीब रुग्णांच्या आरोग्य विषयक गरजा पुर्ण करण्यासाठी आणि शासकीय आणि खाजगी क्षेत्रातील सेवादायी संस्थांव्दारे विशिष्ट आजारांसाठी सुरुवातीपासून शेवटपर्यंत रोख	अभिप्राय नाहीत

	रक्कमरहित सेवा देण्याच्या उद्देशाने ती सुरु करण्यात आली आहे. या योजनेची परिणामकारक अंमलबाजावणी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने, माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना संस्था (संस्था) प्रस्तापित केली (मे २०११). या संस्थेचे मुख्य उद्दिष्ट महाराष्ट्र शासनाने निश्चित केलेल्या लाभार्थ्यांना आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी तयार केलेल्या राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना (किंवा इतर कुठल्याही नावाने ओळखली जाणारी इतर योजना) या योजनेबाबत संकल्पना, अंमलबजावणी, स्थापना, तरतूद, प्रशासन, सुधारणा आणि थेट पर्यवेक्षण करणे हे होते.	
३.१.२	**लाभार्थ्यांची व्याप्ती** या योजनेची राज्यभराते टप्प्याटटप्याने अंमलबजावणी केली गेली. या योजनेची अंमलबजावणी सुरुवातीला २ जुलै २०१२ पासून आठ जिल्हयांमध्ये आणि २१ नोव्हेंबर २०१३ पासून पुढे संपूर्ण राज्यात करण्यात आली. या योजने अंतर्गत निश्चित केलेल्या ३० वैशिष्टपुर्ण प्रवर्गाखालील १२१ उपचारोतर सल्ल्यांसह ९७१ उपचारांचा (टप्पा I अंतर्गत ९७२) समावेश होता ज्यापैकी १३१ उपचार हे आवश्यक सुविधा आणि नियोजित उपचार पध्दतीच्या उपलब्धतेनुसार फक्त योजने अंतर्गत निर्धारीत सार्वजनिक रुग्णालये / शासकीय वैद्यकिय महाविद्यालय रुग्णालये यामधून करावयाचे होते. लाभार्थी कुटूंबियांची ओळख ही महाराष्ट्र शासनाच्या अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाने जारी केलेल्या पिवळया आणि नारंगी शिधापत्रिका सोबतच फोटो ओळखपत्राच्या आधारावर करावयाची होती. या योजनेचा लाभ सामुहीक तत्वावर कुटूंबातील प्रत्येक व्यक्तिला प्राप्त होणार होता. सदर योजने अंतर्गत लाभार्थ्यांला, कुठल्याही योजने अंतर्गत निर्धारीत रुग्णालयातील उपचारासंबंधीच्या प्रती वर्ष प्रती कुटूंब रु.१.५ लाखापर्यंतच्या सर्व खर्चाच्या समावेशाची तरतूद होती.	**अभिप्राय नाहीत**

	मुत्रपिंड प्रत्यारोपणाच्या प्रकरणांत विम्याची रक्कम प्रति वर्षी प्रति कुटूंब रु.२.५ लाख होती. २८ एप्रिल २०१६ पासून राज्यातील आत्महत्याप्रवण १४ जिल्हयातील श्वेत शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांनाही या योजने अंतर्गत लाभार्थी म्हणून समाविष्ट केले गेले. ज्या आरोग्य सेवा संस्थांनी पायाभूत सुविधा, मनुष्यबळ, यंत्रसामुग्री, यासंबंधी विहित निकषांची पूर्ति केली असेल आणि सेवा गुणवत्ता मानकांचे पालन केले असेल अशा संस्था या योजनेत सुचीबध्द होण्यास पात्र होत्या. मार्च २०१७ पर्यंत ४८७ आरोग्य सेवा संस्था (ज्यांना अंगीकृत रुग्णालये असे संबोधले जाते) योजने अंतर्गत समाविष्ट झाल्या.	
३.१.३	संस्थेची संघटनात्मक संरचना संस्थेमध्ये मंत्री, सार्वजनिक आरोग्य, सार्वजनिक आरोग्य विभाग, वित्त विभाग आणि वैद्यकिय शिक्षण आणि औषधी द्रव्ये विभाग यांचे सचिव, आयुक्त, कुटूंब कल्याण, महाराष्ट्र शासन, वैद्यकिय शिक्षण आणि संशोधन संचालनालय, महाराष्ट्र शासन, आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन यांचे संचालक आणि संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा समावेश आहे.संस्था आणि नॅशनल इन्शुरन्स कंपनी मर्यादित (एनआयसी) यांच्यामधील सामंजस्य करार व राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना नियम व नियमावली २०१०, यांच्या अंमलबजावणीसाठी संस्था जबाबदार आहे. उप मुख्य कार्यकारी अधिकारी,वित्तीय सल्लागार, उपसंचालक (प्रशासन/आस्थापना), सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा, प्रशासकीय अधिकारी (आयईसी/आरोग्य कार्ड) आणि माहिती तंत्रज्ञान विशेषज्ञ, योजनेच्या अंमलबजावणीमध्ये, संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना मदत करतात. जिल्हा पातळीवर, ३६ समन्वयक असतात ज्यांच्यावर सहा प्रादेशिक अधिकाऱ्यांकडून पर्यवेक्षण केले जाते.	अभिप्राय नाहीत

३.१.४	**लेखापरीक्षेची उद्दीष्टे** खालील बाबींची पडताळणी करणे हे व राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेच्या लेखापरीक्षेचे उद्दीष्ट होते : • योजनेची अंमलबजावणी उद्देशानुरुप झाली आणि ती किती प्रमाणात साध्य झाली • योजनेचे वित्तीय व्यवस्थापन करारानुसार आणि शासनाच्या वित्तीय नियमांप्रमाणे होते : आणि • संनियंत्रण यंत्रणा आणि अंतर्गत नियंत्रणे प्रभावी होती.	**अभिप्राय नाहीत**
३.१.५	**लेखापरीक्षेचे निकष** • राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना संस्था आणि नॅशनल इन्शुरन्स कंपनी मधील टप्पा। आणि टप्पा॥ चा सामंजस्य करार: • राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेचे नियम आणि नियमावली, २०१० : • राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेच्या कामकाजाबद्दल महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी जारी केलेली परिपत्रके / सुचना / आदेश / अधिसूचना / निर्णय : आणि • मुंबई वित्तीय नियम, १९५९ आणि महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८	**अभिप्राय नाहीत**
३.१.६	**लेखापरीक्षेची व्याप्ती** एप्रिल २०१७ ते जून २०१७ दरम्यान वर्ष २०१२-१३ ते २०१६-१७ या पाच वर्षासाठीच्या कालावधीची लेखापरिक्षा केली गेली. यासाठी अतिरिक्त मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई मुख्य कार्यकारी अधिकारी, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना यांचे कार्यालयातील दस्तावेज तपासले. याशिवाय, रुग्णालयातील अधिकतम लाभार्थी संख्या आणि उपलब्ध वैविध्यपूर्ण उपचार पध्दती यांच्या आधारावर टप्पा। अंतर्गत आठ जिल्हयामधील निवड केलेल्या १९ शासकीय (ज्यामध्ये चार	**अभिप्राय नाहीत**

	महानगरपालिका / परिषदांची रुग्णालये समाविष्ट आहेत) योजने अंतर्गत निर्धारित २२ खाजगी रुग्णालये आणि टप्पा ॥ अंतर्गत दोन जिल्हयांमधील निवड केलेल्या चार शासकीय आणि योजने अंतर्गत निर्धारित १३ खाजगी रुग्णालयांच्या दस्तऐवजांची तपासणी केली गेली. ३१ जुलै २०१७ रोजी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सह सचिव आणि संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांबरोबर निर्गमन बैठक झाली. ज्यात लेखापरीक्षेचे आक्षेप आणि शिफारशींवर चर्चा करण्यात आली. ही बाब राज्य शासनाकडे जुलै २०१७ ला संदर्भित करण्यात आली: राज्य शासनाने नोव्हेंबर २०१७ मध्ये सादर केलेल्या उतरांचा योग्य ठिकाणी यथायोग्य समावेश करण्यात आला आहे.	

	लेखापरीक्षणाची निष्पत्ती	
३.१.७	**योजनेचे व्यवस्थापन** वर्ष २०११-१७ दरम्यान महाराष्ट्र शासनाने योजनेच्या अंमलबजावणीसाठी संस्थेला रु.३,४१६.३६ कोटीचा / निधी मुक्त केला.ज्यापैकी नोव्हेंबर २०१६ पर्यंत संस्थेने विमा कंपनीला ९.३५ कोटी लाभार्थ्यांच्या विमा हप्त्यापोटी रु.३,००९.३१ कोटी प्रदान केले. तपासणीत असे आढळून आले की, योजनेखालील ९.३५ कोटी लाभार्थ्यांच्या विमा हप्त्यापोटी विमा कंपनीला नोव्हेंबर २०१६ पर्यंत प्रदान केलेल्या रु.३,००९.३१ कोटीच्या बदल्यात फक्त ११.८९ लाख लाभार्थ्यांचे दावे प्रतिपूर्तीसाठी प्राप्त झाले होते. जे, आरोग्य कार्डाचे वाटप न झाल्यामुळे, प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्यमित्रांची नियुक्ती न केल्यामुळे, आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यातील तुटवडा आणि योजनेला पर्याप्त प्रसिध्दी न दिल्यामुळे घडले होते, ज्याविषयी यापुढील परिच्छेदात चर्चा केली आहे.	**या संबंधाने पुढील परिच्छेदामध्ये शासनाचे अभिप्राय** नमुद करण्यात आलेले आहेत.

३.१.७.१	**लाभार्थ्यांना आरोग्य कार्डाचे वितरण** महाराष्ट्र शासनाने योजनेच्या पहिल्या टप्प्यातील आठ जिल्हयांतील दारिद्रय रेषेखालील आणि दारिद्रय रेषेवरील शिधापत्रिकाधारक लाभार्थ्यांना आरोग्य कार्ड जारी करण्याचे ठरविले (मे २०११) योजनेचा टप्पा । मधील संस्था आणि नॅशनल इन्शुरन्स कंपनी मधील सामंजस्य करारातील कलम ८ नुसार, ही आरोग्य कार्ड महाराष्ट्र शासनाच्या अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाकडे उपलब्ध असलेल्या पिवळया आणि नारंगी शिधापत्रिकाधारकांच्या माहितीचा उपयोग करुन तयार करावयाची आहे. सामंजस्य करारानुसार, योजने अंतर्गत लाभार्थी कुटूंबाची निवड करण्यासाठी शिधापत्रिका भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण,	**सार्वजनिक आरोग्य विभाग** शासन **निर्णय दि .३ मार्च** ,२०१२ नुसार राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना आरोग्य ओळखपत्र वितरणाबाबत आदेश देण्यात आले होते. त्यानुसार आरोग्य ओळखपत्र वितरणाची कार्यवाही अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या सहमतीने करण्यात आली .त्या अनुषंगाने विहित पद्धतीचा अवलंब करून अन्न नागरी पुरवठा विभागाकडून प्राप्त बि१ नमुना फॉर्म स्कॅनिंग ,इंडेक्सिंग करून आरोग्य ओळखपत्र छपाई करण्यात आली. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेचा MOU परीच्छेद३.१ मध्ये नमूद केल्यानुसार ,पहिल्या टप्प्यात महाराष्ट्र राज्यातील अमरावती ,गडचिरोली ,नांदेड ,सोलापूर , धुळे ,रायगड ,मुंबई शहर व मुंबई उपनगर या ८ जिल्ह्यांमधील पिवळे ,अंत्योदय,अन्नपूर्णा अन्नयोजना व केशरी शिधापत्रिकाधारक कुटुंबांसाठी अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षक विभागाकडून दि.३१-०५-२०१० अखेर ४९,०३,१४० इतकी लाभार्थी कुटुंब संख्या निश्चित करण्यात आली होती. त्यानुसार, प्राप्त बि१ नमुना फॉर्मच्या आधारे छपाई केलेली आरोग्य

यांनी जारी केलेल्या आधारकार्ड क्रमांकाशी जोडावयाची होती. जर आरोग्य कार्डावर लाभार्थ्यांचा आधार क्रमांक नोंदविला नसेल तर, त्यांने रुग्णालय सोडण्यापूर्वी, रुग्णालयात असलेल्या यूआयडीएआय नोंदणी विभागात नोंदणी करावयाची होती. भविष्यात नागरिकांना विशिष्ट ओळख आणि अधिप्रमाणनासाठी आधार क्रमांक उपलब्ध होणार असल्याने योजनेच्या संगणक प्रणालित आधार क्रमांक नोंदविण्याची सुविधा असणे आवश्यक होते.

लेखापरीक्षेला असे आढळून आले की, मुंबईतील एका कंपनीबरोबर करार करुन योजनेच्या टप्पा I अंतर्गत लाभार्थ्यांसाठी आरोग्य कार्डाची छपाई, आवेष्टीत आणि वितरण करण्याचे काम प्रती कार्ड रु.३.६५ दरावर सोपविण्यात आले होते. योजनेच्या पहिल्या टप्प्याच्या आठ जिल्हयांमधील ४९.०३ लाख लाभार्थ्यांपैकी, ४२.१५ लाख (८६ टक्के) लाभार्थ्यांची आरोग्य कार्ड छापली होती. ज्यापैकी २३.६४ लाख (५६ टक्के) आरोग्य काडे योजनेच्या लाभार्थ्यांना वितरीत करण्यात आली होती आणि १८.५१ लाख (४४ टक्के) एप्रिल २०१५ पर्यंत वितरीत केली नव्हती. अशाप्रकारे, १८.५१ लाख कार्डांच्या छपाईवरील रु.६८ लाख खर्च वाया गेला.

त्यानंतर, सार्वजनिक आरोग्य विभागाने संस्थेला अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाकडून लाभार्थ्यांची वैधता प्राप्त डीजीटाईज माहिती घेण्याच्या सूचना दिल्या (मे २०१५) आणि तो पर्यंत आरोग्य कार्डाची छपाई आणि वितरण तात्पुरते तहकुब करण्याचे सांगितले. तदनुसार संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी शिधापत्रिकाधारकांच्या डिजीटाईज्ड माहितीसाठी अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाकडे संपर्क साधला. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने शिधापत्रिकेच्या डीजीटाईज्ड माहितीच्या वैधतेचे काम प्रगतीपथावर असल्याचे कळविले (जुलै २०१६) संस्थेने लाभार्थ्यांना आरोग्य कार्ड वितरण **ओळखपत्र वितरणासाठी जिल्हास्तरावर अतिरिक्त जिल्हाधिकारी** तथा जिल्हा नोडल अधिकारी व मुंबई शहर ,मुंबई उपनगरासाठी नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा , मुंबई यांना आरोग्य ओळखपत्र वाटपाचे काम देण्यात आले .सदरचा तपशिल खालीलप्रमाणे.

अ. क्र	जिल्ह्याचे नाव	एकुण लाभार्थी	एकुण आरोग्यपत्र छपाई	एकुण आरोग्यपत्र वाटप	एकुण अवितरीत आरोग्यपत्र	आरोग्यपत्र वाटपाची टक्केवारी
१	धुळे	३९७६७४	३१५६८१	२५०७४२	६४९३९	७९.४३
२	रायगड	५६६२३१	४०७६९९	२६७२३६	१४०४६३	६५.५५
३	सोलापूर	८३००११	६७०८५९	४६१०८२	२०९७७७	६८.७३
४	नांदेड	५४३९६१	४६२९५२	३०७८६४	१५५०८८	६६.५०
५	अमरावती	५५९४७३	४७६६९७	३६२५७५	११४१२२	७६.०६
६	गडचिरोली	१८२८८९	१४४८९२	१३१७५८	१३१३४	९०.९४
७	मुंबई शहर					
८	मुंबई उपनगर	१८२२९०१	१७३६४१३	५८२६२३	११५३७९०	३३.५५
	एकुण	४९०३१४०	४२१५१९३ (९७.८५)	२३६३८८०	१८५१३१३ (९[illegible].८३)	.५६.०८

पहिल्या टप्प्यात ४९,०३,१४० लाभार्थी कुटुंबांपैकी ४२.१५,१९३ इतक्या लाभार्थी कुटुंबांकरिता ४२,१५,१९३ इतके आरोग्य ओळखपत्र छपाई झाली व त्यापैकी २३.६३,८८० आरोग्य ओळखपत्र वाटप झाली असून १८,५१,३१३ इतकी आरोग्य ओळखपत्र अवितरीत राहिली. अशा वितरीत आरोग्य ओळखपत्रांचे वाटप त्वरित करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या .मुंबई व मुंबई उपनगरसाठी नियंत्रक शिधावाटप यांचे अंतर्गत शिधावाटप दुकानात अंगणवाडीत पडून असलेली अवितरीत आरोग्यपत्रांचा अहवाल मागविण्यात आला असता, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा यांच्या दि .२१-०८-२०१२ च्या पत्रान्वये शिधापत्रिका वाटपाचे काम मोठे असल्याने व त्यात आरोग्य पत्राचे वितरण एकत्रित केल्यास मोठ्या प्रमाणावर गर्दी होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण

	करणे जून २०१७ पासून पुर्णपणे थांबविले. लेखापरीक्षेत पुढे असेही निदर्शनास आले की, शिधापत्रिका क्रमांक, ज्या व्यक्तींच्या नावे शिधापत्रिका जारी केली आहे त्याचे नाव व शिधापत्रिकाधारकाच्या कुटूंबातील एकूण व्यक्ती व व्यक्तीची नावे इत्यादी तपशील न देता, फक्त एकूण शिधापत्रिकाधारकाच्या सख्येनुसार विम्याचा हप्ता विमा कंपनीला अदा करण्यात आला, या तपशीलाच्या अभावामुळे विमा कंपनीला अदा केलेल्या विम्याच्या हप्त्याचा अचूकपणा निश्चित करता आला नाही. अशाप्रकारे, शिधापत्रिका/ आधार कार्डाच्या आधारावर लाभार्थी निश्चित न केल्यामुळे आणि आरोग्य कार्डाचे वाटप न झाल्यामुळे, लाभार्थ्यांमध्ये योजनेच्या लाभांची अंमलबजावणी परिणामकारकरित्या झाली नाही. शासनाने सांगितले (नोव्हेंबर २०१७), की आरोग्य कार्डाचे वितरण करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाकडून संस्थेने मार्गदर्शक सूचना मागविल्या आहेत. (ऑगस्ट २०१७) आणि योजनेचे लाभ लाभार्थ्यांना शिधापत्रिकेच्या आधारावरच दिले जात आहेत.	**होईल असे सांगून हे वितरण अंगणवाडीमधूनच करणे योग्य होईल अशी सूचना केली गेल्यामुळे हे वितरण थांबवावे लागले.** सोसायटीचे पत्र दि.१३-०४-२०१२ ,अन्वये प्रकल्प अधिकारी ,एकात्मिक बाल विकास प्रकल्प यांना राजीव गांधी जीवनदायी योजनेचे आरोग्यपत्र १६ ते २६ एप्रिल २०१२ या कालावधीसाठी दि.१२-०६-२०१२ च्या पत्रान्वये नियंत्रक शिधावाटप यांना ज्या कार्यक्षेत्रात अंगणवाडी कार्यरत नाही तेथील आरोग्यपत्र वाटपाची जबाबदारी शिधापत्रिका अधिकाऱ्यांकडे कळविण्यात यावी असे कळविले होते .त्या अनुषंगाने निविदा तसेच Expression of Interest नुसार वेगवेगळ्या स्वयंसेवी संस्थाना आरोग्य ओळखपत्र वाटपाचे काम देण्यात आले .आरोग्य ओळखपत्र वाटप करण्यात स्वयंसेवी संस्थाना आलेल्या अडचणी पत्रान्वये सोसायटीस विविध कारणे नमूद करून कळविल्या आहेत. ➢ यामध्ये लाभार्थी कुटुंबातील सर्व सदस्यांचे एकत्रित फोटो मिळण्यामध्ये येणाऱ्या अडचणी ,नोकरी व अन्य कामानिमित्त तसेच शिफ्टमध्ये नोकरवर्ग काम करत असल्यामुळे कुटुंबातील सर्व सदस्यांच्या एकत्र फोटो काढणे शक्य होत नाही . ➢ बि-१ नमुना फॉर्ममधील शिधापत्रिका धारकांची माहिती अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून प्राप्त सन २००९-१० च्या आधारे असल्यामुळे त्यानंतर लाभार्थीचे उत्पन्न १ लाखाच्या मर्यादेच्या वर गेल्यामुळे आरोग्य ओळखपत्र घेण्यासाठी लाभार्थी आलेले नाहीत. ➢ मुंबईमध्ये संस्थेच्या स्वयंसेवकांनी आरोग्य पत्रातील नाव व त्याच्या अनुषंगाने संबंधित पात्र शिधापत्रिका धारकांना शोधून काढण्याचा प्रयत्न केला असता संबंधित पत्त्यावर त्या व्यक्ती आढळल्या नाहीत. ➢ काही ठिकाणी नावे बरोबर होती पण पत्ता बरोबर नव्हता तर काही ठिकाणी पत्ता बरोबर होता पण शिधापत्रिकाधारक त्या ठिकाणी राहत नव्हते. ➢ मुंबई शहरात झोपडपट्टी पुनर्विकास व इमारत पुनर्विकास यामुळे हजारो शिधापत्रिकाधारकांचे अन्यत्र स्थलांतरण झाल्यामुळे आरोग्यपत्र वितरण करता आले नाही. ➢ शिधापत्रिकेवर उपचार मिळणे चालू झाल्यामुळे आरोग्यपत्र घेण्यासाठी लाभार्थी आले नाहीत.

		वरील वस्तुस्थितीचा विचार करिता सोसायटीमार्फत आरोग्यपत्र वाटपाचे अथक प्रयत्न करण्यात आले परंतु वरील अडचणीमुळे वाटप १०० टक्के होऊ शकले नाही. सार्वजनिक आरोग्य विभाग पत्र क्र .रागांयो-२०१३/प्र.क्र.५०१/आरोग्य-६ दि. ४ मार्च २०१४ तसेच संदर्भ क्र .२ च्या शासन निर्णयान्वये दुसऱ्या टप्प्यात उर्वरित २७ जिल्ह्यांत संग्राम केंद्र ,महा ई सेवा केंद्र व टपाल कार्यालयाकडून आरोग्य ओळखपत्र छपाई व वितरणाचे काम देण्यात आले .तसेच सार्वजनिक आरोग्य विभाग पत्र दि .३० मे २०१५ नुसार अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून शिधापत्रिकांचा डिजीटाईज्ड डाटा उपलब्ध होईपर्यंत आरोग्य ओळखपत्र वितरणाचे काम स्थगित ठेवण्याबाबत निर्णय घेण्यात आला. त्यानुसार अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेच्या लाभार्थ्यांचा डिजीटल डाटा उपलब्ध करून घेण्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे. सदर योजनेचा विमाहप्ता विमा कंपनीस प्रतिव्यक्ती अदा करण्यात येत नसुन प्रतिकुटुंब अदा करण्यात येतो. त्यास अनुसरुन प्रतिकुटुंब/प्रतिवर्ष १.५० लाख या मर्यादेत लाभार्थी विमा संरक्षण देण्यात येते. सदर योजनेंतर्गत आधार कार्ड हे ओळखपत्र म्हणुन ग्राहय धरण्यात येते. परंतु शिधापत्रिकेबरोबरच ओळख पाटविण्यासाठी ओळखपत्र घेतले जाते. लाभार्थ्यांना योजनेचा लाभा शिधापत्रिकेच्या आधारावर देण्यात येत असल्याने योजनेवर काही परिणाम संभवत नाही.

३.१.७.२	**आत्महत्या प्रवण जिल्हयांच्या लाभार्थी शेतकऱ्यांची नेमकी संख्या ठरविण्यासाठीचे सर्वेक्षण** महाराष्ट्र शासनाने राज्यातील १४ आत्महत्या प्रवण जिल्हयातील श्वेत शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांना देखिल या योजनेचा लाभ देण्याचे ठरविल (एप्रिल २०१६). या जिल्हयातील लाभार्थी या योजनेचा लाभ अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाकडून जारी केलेली श्वेत शिधापत्रिका किंवा महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाकडून जारी केलेला सातबाराचा उतारा	दिनांक २८ एप्रिल ,२०१६ रोजीच्या शासन निर्णय क्र.रागायो-२०१५/प्र.क्र.२८०/आरोग्य-६ मध्ये नमूद केल्यानुसार १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांतील शुभ्र शिधापत्रिकाधारक शेतकरी कुटुंबाना त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या शिधापत्रिका तसेच ७/१२ च्या उताऱ्यावर काही अटींच्या अधीन राहून लाभ अनुज्ञेय राहील असे नमूद करण्यात आले होते. त्यापैकी पहिल्या अटींमध्ये असे स्पष्ट नमूद केले आहे कि, **औरंगाबाद व अमरावती विभागातील सर्व जिल्हे तसेच नागपूर विभागातील वर्धा अशा एकूण १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील "सर्वच"** शुभ्र शिधापत्रिकाधारकांचा **"अतिरिक्त**

	यांच्या आधारावर प्राप्त करु शकत होते आणि जर हे दोन्ही दस्तावेज उपलब्ध नसल्यास सदर लाभासाठी संबंधित जिल्हयाच्या महसूल अधिकाऱ्यांचे पत्र पुरेसे होते. त्यानुसार, या १४ आत्महत्या प्रवण जिल्हयांच्या लाभार्थ्यांचा या योजनेत समावेश करण्यासाठी संस्था आणि नॅशनल इन्शुरन्स कंपनी यामध्ये एक सुधारित करार करण्यात आला (जून २०१६) लेखापरीक्षेत असे आढळून आले की, महाराष्ट्र शासनाने अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारावर या १४ जिल्हयातील एकूण १,६५,९१२ श्वेत शिधापत्रिकाधारकांसाठी विमा कंपनीला रु.६.३५ कोटीचे प्रदान केले (मे २०१६) या योजनेचा लाभ आत्महत्या प्रवण जिल्हयांतील फक्त श्वेत शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांनाच देय असतांना, या जिल्हयातील सर्व श्वेत शिधापत्रिकाधारकांसाठी विम्याच्या हप्त्याचा भरणा केल्यामुळे विमा हप्त्याचे अतिरिक्त प्रदान झाले ज्याचे निश्चित प्रमाण लाभार्थ्यांच्या अधिकृत माहितीच्या अभावी मोजता आले नाही. तसेच,योजनेच्या दुसऱ्या टप्प्याच्या सामंजस्य कराराच्या कलम १४ नुसार, सेवाकर आणि प्रशासकीय शुल्क यांचा परतावा ग्राहय नसल्याने विमा कंपनीला विमा हप्त्याचा भाग म्हणून प्रदान केलेला सेवाकर आणि २० टक्के प्रशासकीय शुल्क निष्फळ ठरणार होते. शासनाने सांगितले (नोव्हेंबर २०१७) की दर महिन्याला जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांकडून वैधता प्राप्त शिधापत्रिकांची आकडेवारी प्राप्त केली जाते आणि शासकीय आणि निमशासकीय कर्मचारी वगळल्यानंतर एप्रिल २०१७ पर्यंत या १४ आत्महत्या प्रवण जिल्हयातील श्वेत शिधापत्रिकाधारक लाभार्थी शेतकऱ्यांची संख्या १,६५,९१२ वरुन ९१,२८५ पर्यंत कमी झाली होती. या उत्तरावरुन असे पुर्णपणे सिध्द होते की, अन्न, नागरी	**विमा हप्ता" विमा कंपनीस अदा करण्यात येईल.** शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या अट क्र.१ मध्ये स्पष्ट केल्यानुसारच १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांतील सर्वच शुभ्र शिधापत्रिकाधारक कुटुंबांची जिल्हानिहाय आकडेवारी गृहीत धरून सोसायटीचे पत्र दि.३१ मे, २०१६ अन्वये एकूण १,६५,९१२ शुभ्र शिधापत्रिकाधारक कुटुंबांकरिता रुपये ६,३२,५९,७५७/-इतक्या विमा हप्ता रकमेचा धनादेश नॅशनल इन्शुरन्स कंपनीला अदा करण्यात आला. तसेच सदर शासन निर्णयात नमुद केल्यानुसार, शासकीय व निमशासकीय शुभ्र शिधापत्रिकाधारक कर्मचाऱ्यांना ही योजना लागू नसल्याचे देखील नमूद केले होते. परंतु शेतकरी आत्महत्याग्रस्त १४ जिल्हयांतील शासकीय व निमशासकीय शुभ्र शिधापत्रिकाधारक कुटुंबांच्या लाभार्थ्यांची निश्चित आकडेवारी उपलब्ध नसल्यामुळे शिधापत्रिकांची पडताळणी जिल्हा पुरवठा अधिकारी यांचेकडून करण्यात आली. त्याव्दारे शासकीय व निमशासकीय कर्मचारी वगळून माहे एप्रिल,२०१७ पर्यंत १० जिल्हयांकडील प्राप्त आकडेवारीनुसार ९१,२८५ शुभ्र शिधापत्रिकाधारक लाभार्थी कुटुंबांच्या विमा संरक्षणाकरिता माहे जून,२०१७ मध्ये विमा पॉलिसीचे नुतनीकरण करण्यात आले. तसेच माहे नोव्हेंबर,२०१७ पर्यंत (१३ जिल्हे) प्राप्त आकडेवारीनुसार, शेतकरी आत्महत्याग्रस्त १४ जिल्हयांमधील ७६,९४८ इतक्या शुभ्र शिधापत्रिकाधारक कुटुंबांच्या विमा संरक्षणाकरिता माहे जानेवारी.२०१८ पासून एक वर्षाच्या विमा पॉलिसीचे नुतनीकरण करण्यात आले. राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या दिनांक १९.०३.२०१६ रोजीच्या पत्रान्वये अन्न व नागरी पुरवठा विभागाकडे शुभ्र शिधापत्रिका असणाऱ्या शेतकरी कुटुंबांची आकडेवारी यादीसह सादर करण्याबाबत विनंती केली होती. तसेच दि. ११.०४.२०१६ रोजीच्या राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या पत्रान्वये सर्व जिल्हाधिकाऱ्यांना शुभ्र शिधापत्रिका असणाऱ्या शेतकरी कुटुंबांची आकडेवारी यादीसह सादर करण्याबाबत विनंती केली होती. परंतु सर्वच जिल्ह्यांचा एकत्रित डाटा वेळेत उपलब्ध न झाल्यामुळे सरकारी आणि निम सरकारी कर्मचारी व अधिकारी वगळता उर्वरित सर्व शुभ्र शिधापत्रिका धारक कुटुंबांचा प्रीमियम भरण्याबाबतचा निर्णय घेतला गेला.

	पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाकडून श्वेत शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांची अधिकृत यादी प्राप्त न करता किंवा कोणतेही सर्वेक्षण न करता सर्व श्वेत शिधापत्रिकाधारकांसाठी विमा हप्त्याचे प्रदान केले गेले होते. परिणामी, राजकोषावर अतिरिक्त आर्थिक भार तर पडलाच शिवाय विमा कंपनीला अदेय लाभ मिळाला.	

३.१.७.३	**योजनांतर्गत विहित केलेल्या सुविधांचा अभाव** **i) आरोग्यमित्र** **टप्पा । च्या सामंजस्य कराराच्या कलम २३ मध्ये अशी तरतूद आहे** की, विमा कंपनीने प्रत्येक निर्धारीत रुग्णालयात किमान तीन **आरोग्यमित्रांची नियुक्ती करावी. तसेच, दुसऱ्या टप्प्याच्या सामंजस्य कराराच्या कलम २३ नुसार,** रुग्णालयात दाखल, उपचार आणि रोख रक्कम रहित व्यवहारांसंबधी प्रक्रीया सुलभ करण्यासाठी एकूण ७०० आरोग्यमित्रांची नियुक्ती करावी. निर्धारित लाभार्थ्यांमध्ये योजनेच्या लाभविषयी सजगता निर्माण करण्यास देखिल आरोग्यमित्र सहाय्य करतात. अशाप्रकारे टप्पा । आणि टप्पा ॥ अंतर्गत अनुक्रमे ६९ आणि ३७१ योजने अंतर्गत निर्धारित रुग्णालयांमध्ये, २०७ आणि ७०० आरोग्यमित्रांची नेमणूक करावयाची होती. लेखापरीक्षेत आढळून आले की, तृतीय पक्ष प्रशासकीय कंपन्यांनी १०९ आणि ६६० आरोग्यमित्र नियुक्त केले होते, ज्यामुळे अनुक्रमे ९८ आणि ४० आरोग्यमित्रांची कमतरता होती. तसेच, विमा कंपनीने संस्थेच्या सल्ल्याने सगळया ग्रामीण / प्राथमिक आरोग्य केंद्र / उप- जिल्हा / शासकीय महिला रुग्णालयात योजनेच्या प्रचारासाठी, आरोग्य शिबीरांसाठी लोकांना प्रोत्साहित करण्यासाठी, लाभार्थी कुटूबियांचे समुपदेशन करण्यासाठी, या रुग्णांना संदर्भित केलेल्या रुग्णालयात जाण्यासाठी / उपचारांना मदत करण्यासाठी आणि उपचारोत्तर प्रक्रियेसाठी आरोग्यमित्रांची नियुक्ती करावयाची होती. **तथापि असे आढळून आले की, विमा कंपनीने ग्रामीण / प्राथमिक आरोग्य केंद्र, उपजिल्हा/शासकीय महिला रुग्णालयात आरोग्यमित्रांची नियुक्ती केली नव्हती.**	आरोग्यमित्र: पहिल्या टप्प्यामधील जिल्ह्यातील अंगीकृत रुग्णालयात विमा कंपनीद्वारे ३ आरोग्यमित्रांची नेमणूक round the clock service स्वरुपात करण्यात आली होती. दुसऱ्या टप्प्यात ३७० रुग्णालयांसाठी एकून ७०० आरोग्यमित्र नियुक्त करण्यात आले. पहिल्या टप्प्यात प्राथमिक उपचार केंद्रात ४०६ आरोग्यमित्रांची **नियुक्ती** विमा कंपनीने केली होती. योजनेअंतर्गत सर्व उपजिल्हा रुग्णालये व महिला रुग्णालयांमध्ये आरोग्यमित्र नेमलेले आहेत. योजनेंतर्गत अंगीकृत रुग्णालयात २४ तास आरोग्यमित्र उपलब्ध असून आरोग्यमित्रामार्फत लाभार्थ्यांना योजनेविषयी मार्गदर्शन केले जाते. यामुळे योजनेचा अंमलबजावणीवर विपरीत परिणाम झालेला नाही.

	योजने अंतर्गत निर्धारीत १२ उप जिल्हा आणि महिला रुग्णालयांमध्ये आरोग्यमित्रांची नियुक्ती करण्यात आली असल्याचे शासनाने सांगितले (नोव्हेंबर २०१७) तसेच, आरोग्यमित्रांच्या अनुपलब्धतेमुळे रु.३१ कोटीची पिरसमापक नुकसान भरपाई आकारण्यात आली आहे आणि सदर बाब जुलै २०१७ मध्ये नॅशनल इन्शुरन्श कंपनीला अवगत करण्यात आली आहे. **ii) वैद्यकीय समन्वयक** तृतीय पक्ष प्रशासकीय कंपन्या आणि योजने अंतर्गत निधारीत रुग्णालये यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य करारातील कलम ११ नुसार योजना अंतर्गत रुग्णालयांनी योजनेमधील रुग्णांची पूर्व-अर्हता संबंधित समन्वयासाठी वैद्यकीय अधिकाऱ्यांची वैद्यकीय समन्वयक म्हणून नियुक्ती करण्याची आवश्यकता होती. तपासणी दरम्यान असे आढळून आले की, अमरावती आणि गडचिरोली येथील ज्या जिल्हा रुग्णांलयामध्ये , अनुक्रमे ६०१ आणि १,३४१ रुग्णांची अधिकृत नोंदणी केली होती,तिथे वैद्यकीय समन्वयक नियुक्त केला नव्हता. तसेच, अमरावतीमधील अंदाजे १३,००६ आणि गडचिरोली मधील ३,५७० रुग्णांनी या योजनेचा लाभ दुसऱ्या जिल्हयातील रुग्णालयातून घेतला होता, जे वैद्यकीय समन्वयकाची गरज असल्याचे स्पष्टपणे दर्शविते. अमरावती व गडचिरोली जिल्हयातील योजने अंतर्गत निर्धारीत रुग्णालयांनी वैद्यकीस समन्वयकाची नियुक्ती न केल्यामुळे लाभार्थ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. शासनाने सांगितले (नोव्हेंबर २०१७) की, अमरावती आणि गडचिरोली येथील जिल्हा रुग्णालयांत आता वैद्यकीय समन्वयकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.	**वैद्यकीय समन्वयक नेमणूक:** जिल्हा रुग्णालय, अमरावती आणि जिल्हा रुग्णालय, गडचिरोली यांनी नोव्हेंबर २०१७ महिन्यात वैद्यकीय समन्वयक नेमले होते. तेव्हापासून गडचिरोली जिल्हा रुग्णालयात १७७ व अमरावती जिल्हा रुग्णालयात ४९१ प्री-ऑथ मंजूर करण्यात आले, गडचिरोलीमध्ये फक्त एक रुग्णालय आहे आणि काही विशेष सेवांकरिता अमरावती जिल्ह्यात रुग्णालय उपलब्ध नाहीत. महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत बहुतेक उपचार हे तृतीय सेवेतील असून जिल्हा रुग्णालयांतील समन्वयकांनी तपासणीअंती निदान केलेले उपचार हे जवळपासच्या ज्या अंगीकृत रुग्णालयांत उपलब्ध आहेत अशा रुग्णालयांमध्ये त्या रुग्णांवरील उपचारांकरिता आरोग्यमित्रांकडून संदर्भित केले जाते.

	iii) **वैद्यकीय शिबीर समन्वयकाची नियुक्ती न करणे** तृतीय पक्ष प्रशासकीय कंपन्या आणि योजने अंतर्गत निर्धारीत रुग्णालयात झालेल्या सामजंस्य कराराच्या कलम १७.११ नुसार, योजने अंतर्गत निर्धारीत रुग्णालयांनी, आरोग्य शिबीरे आयोजित करण्यासाठी आरोग्यमित्रांव्दारे संस्था /विमा कंपनी / तृतीय पक्ष प्रशासकीय कंपन्यांशी समन्वय साधण्यासाठी वैद्यकीय शिबीर समन्वयकाची नियुक्ती करणे गरजेचे होते. दहा शासकीय आणि तीन महानगरपालिका रुग्णालयांच्या दस्तऐवजांची तपासणी केली असता असे आढळून आले की वैद्यकीय शिबीर समन्वयकांच्या नियुक्त्या झाल्या नव्हत्या. शासनाने सांगितले (नोव्हेंबर २०१७) की, तीन बृहन्मुंबई महानगरपालिका रुग्णालयांनी तृतीय पक्ष प्रशासकीय कंपन्यांबरोबर स्वतंत्र सामंजस्य करार केला आहे. ज्यामधे वैद्यकीय समन्वयकाच्या नियुक्ती विषयीचे कलम १०.१ वगळण्यात आले आहे. शासकीय रुग्णालयांमध्ये वैद्यकीय समन्वयकाची नियुक्ती न झाल्याबद्दल मात्र शासनाने मौन बाळगले. हे उत्तर स्विकारणीय नाही. वैद्यकीय शिबिर समन्वयकांची नियुक्ती केली नव्हती म्हणून संस्था / विमा कंपनी / तृतीय पक्ष प्रशासकीय कंपनी यांच्यामधील समन्वयात अपयश आले आणि आरोग्य शिबिरांचे आयोजन केले जाऊ शकले नाही, जे खाली चर्चिले आहे.	**वैद्यकीय शिबीर समन्वयकाची नेमणूक :** बृहन्मुंबई महानगरपालिका रुग्णालयांनी आरोग्य शिबिरे न चालविण्याच्या अटीवर. करारनाम्यावर स्वाक्षरी केली आहे. वैद्यकीय समन्वयकाची नियुक्ती करण्यासंबंधी करारनाम्यातील तरतुद क्रमांक १०.१ बृहन्मुंबई महानगरपालिका रुग्णालये व विमा कंपनी/टीपीएने यांनी स्वाक्षरी केलेल्या करारातून वगळण्यात आली आहे. इन्शुरन्स कंपनीबरोबर झालेल्या करारनाम्यातील कलम १९(I) नुसार अंगीकृत रुग्णालयाने शिबीर समन्वयक नेमण्याबाबत उल्लेख आहे. त्यानुसार दिनांक २१.०२.२०१२ ते दिनांक ३१.०३.२०१७ या कालावधीमध्ये एकुण आरोग्य शिबीरांपैकी ७५६ शिबीरे शासकीय रुग्णालयात झाली आहेत. तसेच दिनांक ०१.०४.२०१७ ते दिनांक ०२.०१.२०१९ या कालावधीमध्ये ५११ शिबीरे शासकीय रुग्णालयात झाली आहेत. शासकीय रुग्णालयांना शिबीर समन्वयक नेमण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळे यांच्याकडून यावर्षी महाशिबीर घेण्यात आले असून त्यात ८००० रुग्णालयांची तपासणी केली आहे. यातील रुग्णांचे उपचार ९७१ उपचारात असतील तर ते उपचार व शस्त्रक्रिया अंगीकृत रुग्णालयात करण्यात येत आहेत. तसेच दिनांक १४.०३.२०१८ रोजीच्या बैठकीमध्ये मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या निदेशानुसार ०२ महिन्यांसाठी खाजगी रुग्णालयांना अंगीकृत करुन शस्त्रक्रिया करण्याची परवानगी देण्यात आली. अशा प्रकारची शिबीरे जळगांव, नांदेड, औरंगाबाद, अहमदनगर व नागपुर जिल्हयात वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयात घेण्यात येणार असून दोन महिन्यांसाठी खाजगी रुग्णालयांना अंगीकृत करुन शस्त्रक्रिया करण्यास परवानगी देण्यात आली आहे.

३.१.७.४	**आरोग्य शिबिरे घेण्यात कमतरता** टप्पा I आणि II च्या सामंजस्य करारानुसार (कलम १९) योजने अंतर्गत निर्धारित रुग्णालयांनी गावांमध्ये, मोठ्या ग्रांमपंचायतीत, तालुका मुख्यालयात आणि महापालिकेमध्ये आरोग्य शिबिरे घेणे आवश्यक आहे. टप्पा I अंतर्गत समाविष्ट आठ जिल्हयांमध्ये, एका पॉलिसी वर्षामध्ये प्रत्येक योजने अंतर्गत निर्धारीत रुग्णालयांनी एका आठवड्यात किमान एक आरोग्य शिबिर आणि टप्पा II मध्ये अंमलबजावणी करावयाच्या २७ जिल्हयांमध्ये प्रत्येक योजने अंतर्गत निर्धारीत रुग्णालयांने प्रत्येक पंधरवड्यात किमान एक आरोग्य शिबिर घ्यावयाचे होते. संस्थेच्या डिसेंबर २०१३ च्या परिपत्रकानुसार, प्रत्येक शासकीय रुग्णालयाने, एका महिन्यात दोन आरोग्य शिबिरे घेण्याऐवजी एक महाआरोग्य शिबिर घेणे गरजेचे होते. परंतु तपासणी दरम्यान असे आढळून आले की जुलै २०१२ ते मार्च २०१७ या कालावधी दरम्यान विहीत ४९,८८१ आरोग्य शिबिरांच्या तुलनेत, योजने अंतर्गत निर्धारीत रुग्णालयांनी फक्त १०,४६६ (२१ टक्के) आरोग्य शिबिरे घेतली होती, म्हणजेच ३९,४१५ (७९ टक्के) आरोग्य शिबिरे कमी आयोजित केली केली. शासनाने सांगितले (नोव्हेंबर २०१७) की संस्थेच्या क्षेत्रिय कर्मचाऱ्यांना आणि तृतीय पक्ष प्रशासकीय कंपन्यांना सर्व आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. संस्थेच्या क्षेत्रिय कर्मचाऱ्यांनी आणि तृतीय पक्ष प्रशासकीय कंपन्यांनी प्रत्येक जिल्हयात अंगीकृत रुग्णालयांच्या सजगता बैठकी आयोजित केल्या होत्या. तसेच असे सांगण्यात आले की, अंगीकृत रुग्णालयांनी मे २०१७ ते जुलै २०१७	**आरोग्य शिबिरे आयोजन:** १६ मे २०१७ च्या बैठकीत मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत. आरोग्य शिबिराचे आयोजनाबाबत संपूर्ण आढावा घेतला. आरोग्य शिबीर उपक्रमावर लक्ष केंद्रित करण्याचा आणि आरोग्य शिबीरे वाढविण्यासाठी सर्व प्रयत्न करण्याचा निर्णय घेतला गेला. याचा परिणाम म्हणून आरोग्याच्या शिबिरासाठी सोसायटी पातळीवर आरोग्य शिबीर संनियंत्रण कक्षाची (HCMU) स्थापना करून, क्षेत्रीय कर्मचाऱ्यांच्या सोबत नियंत्रण. देखरेख आणि समन्वयन साधण्यात येत आहे. HCMU शिबिराची कार्यक्षमता सुधारण्यासाठी सक्रियपणे कार्यरत आहे. सोसायटी क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना आणि टीपीएला सर्व आवश्यक सूचना करण्यात आल्या आहेत. आरोग्य शिबीर आयोजनाची संवेदनशीलता लक्षात घेऊन प्रत्येक जिल्ह्यात सोसायटीच्या क्षेत्रिय कर्मचारी आणि टीपीएने अंगीकृत रुग्णालयांची बैठक आयोजित केली. आरोग्य शिबीरांच्या आयोजनाचे रक्कम रु.७०,८५,९९८ /- चे २.२३१ दावे रुग्णालयांना प्रदान करण्यात आले आहेत आणि १९८३ दावे देयकांचे प्रदान करण्याची कार्यवाही चालू आहे. **योजना सुरु झाल्यापासून ते दि.१७.१२.२०१८ पर्यंत आयोजित आरोग्य शिबीरांची संख्या**

अ. क्र	जिल्हा	आरोग्य शिबीरांची संख्या
१	अहमदनगर	५४३
२	अकोला	३८९
३	अमरावती	५५६
४	औरंगाबाद	७२२
५	बीड	२२२
६	भंडारा	१८८
७	बुलढाणा	५५९
८	चंद्रपूर	१४२

दरम्यान जवळ जवळ १,५८३ **आरोग्य शिबिरे आयोजित केली होती.**

परंतु, ज्या कालावधीची लेखापरीक्षा केली गेली त्या कालावधीत आरोग्य शिबिरे कमी प्रमाणात आयोजित केल्यामुळे जिल्हा तसेच ग्रामीण भागात योजनेला मोठया प्रमाणात प्रसिध्दी मिळाली नाही आणि त्या विषयी जागरुकता निर्माण झाली नाही ही वस्तुस्थिती कायम राहते.

९	**धुळे**	६४४
१०	**गडचिरोली**	१०८
११	**गोंदिया**	१८३
१२	**हिंगोली**	१४५
१३	जळगांव	१८६५
१४	जालना	३०९
१५	**कोल्हापूर**	१०५२
१६	लातूर	८४५
१७	**मुंबई आणि मुंबई** उपनगर	८९३
१८	नागपूर	५१२
१९	**नांदेड**	१०८४
२०	नंदुरबार	९३
२१	**नाशिक**	१४६४
२२	उस्मानाबाद	३९७
२३	परभणी	१८६
२४	**पुणे**	११३३
२५	रायगड	८३६
२६	**रत्नागिरी**	२५०
२७	**सांगली**	१०९५
२८	सातारा	४६२
२९	**सिंधुदुर्ग**	११५
३०	**सोलापूर**	१०४१
३१	**ठाणे**	११२१
३२	**वर्धा**	८५
३३	**वाशिम**	१२४
३४	यवतमाळ	२०१
	एकूण	१९५७३

१ एप्रिल २०१७ ते १३ डिसेंबर २०१८ पर्यंतचा आरोग्य शिबीर अहवाल

अ. क्र	जिल्हा	आरोग्य शिबीरे	अदा दावे	दाव्यांची रक्कम
१	अहमदनगर	१६२	३०	१०१३०१
२	अकोला	२२१	२३	६४३६९
३	अमरावती	२०१	१०२	३०८७५६
४	औरंगाबाद	४३०	१९५	२४७५६०
५	बीड	१३९	४७	१४०५८५
६	भंडारा	८८	११	६२१३०
७	बुलढाणा	२३७	७२	३२७४८७
८	चंद्रपूर	१०४	१२	३८३३८
९	धुळे	२०९	८७	३०१२५५
१०	गडचिरोली	१९	७	४०००
११	गोंदिया	९५	६४	१९०२२९
१२	हिंगोली	४०	१६	४८२०५
१३	जळगांव	५०९	२४९	८७०५१२
१४	जालना	१८८	३	५५००
१५	कोल्हापूर	७४७	५७	१४१०२१
१६	लातूर	४०३	२५८	८०७७६४
१७	मुंबई आणि मुंबई उपनगर	२१८	८०	२८५७१४
१८	नागपूर	२९५	३६	२७७०२
१९	नांदेड	३४१	१४३	४११९६०
२०	नंदुरबार	७०	०	०

२१	नाशिक	५४६	२०७	६६२५६१
२२	उस्मानाबाद	११७	३३	९५५१७
२३	परभणी	९५	८	२७४००
२४	पुणे	७०३	७९	५७१६८०
२५	रायगड	२६८	७२	२१२८०४
२६	रत्नागिरी	१६६	२३	७४० ४
२७	सांगली	५९२	१२७	२९६६७६
२८	सातारा	२७३	११	२८३२८
२९	सिंधुदुर्ग	४६	३४	११३७६३
३०	सोलापूर	३९२	१५२	३४८७६५
३१	ठाणे	४९९	८७	२५५१७९
३२	वर्धा	३९	५०	३२२७५
३३	वाशिम	८९	६०	२१२६५२
३४	यवतमाळ	११९	०	०
	एकूण	८७५०	२२३५	७०८५९९८

असे दिसून येते की, आरोग्य शिबीरांच्या संख्येमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे.

३.१.७.५ गडचिरोली जिल्हयात एकच योजने अंतर्गत निर्धारीत रुग्णालय

या योजने अंतर्गत लाभार्थ्यांना आरोग्य सेवा पुरविण्यासाठी गडचिरोलीमधील सामान्य रुग्णालयास, योजने अंतर्गत समाविष्ट केले होते.

लेखापरीक्षा तपासणीत असे आढळून आले की, पुरेसा सुविधा उपलब्ध असलेली योजने अंतर्गत निर्धारीत रुग्णालये गडचिरोली जिल्हयात कमी संख्येने उपलब्ध असल्याने गडचिरोली जिल्हयातील

गडचिरोली जिल्हयातुन एकच रुग्णालय अंगीकृत असणे.

१) **२२ टक्के लाभार्थ्यांनी महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत जिल्हा रुग्णालय, गडचिरोली येथे उपचार घेतले असून ४५ टक्के लाभार्थ्यांनी नागपूर येथे तर २२ टक्के लाभार्थ्यांनी वर्धा येथे उपचार घेतले आहेत. यावरुन असे दिसुन येते कि, जवळपास ९० टक्के लाभार्थी रुग्णांनी नागपूर विभागामध्येच उपचार घेतले आहेत.**

२) **गडचिरोली जिल्हयातुन सुरुवातीला ०२ रुग्णालये अंगीकृत करण्यात आली होती परंतु योजनेंतर्गत अकार्यरत असल्यामुळे एका रुग्णालयाचे अंगीकरण रद्द करण्यात आले**

	एकूण ४,५६६ रुग्णांपैकी, ३,५७० रुग्णांवर इतर जिल्हयात उपचार केले होते. शासनाने मान्य केले (नोव्हेंबर २०१७) की सध्याच्या सगळया खाजगी आणि शासकीय रुग्णालयांमध्ये अतिदक्षता विभागाची सुविधा नसल्याने या योजने अंतर्गत अधिक संख्येत रुग्णालयांना योजने अंतर्गत समाविष्ट केले नव्हते. तसेच डोंगराळ आणि आदिवासी भागातील रुग्णालयांना योजने अंतर्गत समाविष्ट करण्यासाठी योजनेच्या (महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना) प्रस्तावासाठीच्या विनंती (रिक्वेस्ट फॉर प्रपोजल) मध्ये काही निकषांमध्ये सवलत दिली जाईल जेणे करुन जास्तीत जास्त लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळेल.	आहे. आज रोजी ०३ रुग्णालयांचे ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी ०२ रुग्णालयांमध्ये आयसीयु (अतिदक्षता विभाग) कार्यरत नाही त्यामुळे अंगीकरणाची करण्याची प्रक्रिया करण्यात आली नाही. ३) महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंच्या प्रस्तावित आरएफपीमध्ये डोंगराळ व आदीवासी जिल्हयांकरीता योजनेंतर्गत रुग्णालय अंगीकृत करण्याचा निकष शिथिलता करण्यात येणार आहे.
३.१.७.६	**योजने अंतर्गत निर्धारीत खाजगी अंगीकृत रुग्णालये** खाजगी अंगीकृत रुग्णालयांकडून निकषाचे केले जाणारे अनुपालन आणि या रुग्णालयांना योजने अंतर्गत समाविष्ट करण्यासाठी संस्थेने अनुसरलेल्या कार्यपध्दतीची पडताळणी करण्यासाठी नऊ जिल्हयांतील ३५ खाजगी अंगीकृत रुग्णालयांची लेखापरीक्षा चाचणी केली असता असे आढळून आहे की - i) योजनेच्या टप्पा । आणि ॥ अंतर्गत आणि तृतीय पक्ष प्रशासकीय कंपन्या आणि योजने अंतर्गत निर्धारीत रुग्णालयांमध्ये केलेल्या सामंजस्य कराराच्या कलम १०.५ आणि ९.५ मध्ये अशी तरतूद आहे की, योजने अंतर्गत निर्धारीत खाजगी रुग्णालयांनी कोणात्याही विमा कंपनीकडून योजने अंतर्गत निर्धारीत कालावधीपर्यंत क्षतिपूर्ती विमा पॉलीसी (इन्डेमनिटी पॉलीसी) प्राप्त करणे गरजेचे होते, जेणेकरुन, कुठल्याही अपघात दुर्घटना	खाजगी रुग्णालये अंगीकृत करणे. सोसायटीने दिलेले स्पष्टीकरण एजी ऑफीसने मान्य केले आहे. योजनेंतर्गत करारानुसार Indemnity policy राबविण्याबाबत दिनांक १८/०८/२०१७ रोजी सोसायटीने विमा कंपनीस (नॅशनल इंशुरन्स कंपनी प्रा. लि) पत्र सादर केले.

	इत्यादी प्रसंगी योजनांतर्गत रुग्णालय तसेच लाभार्थ्यांना नुकसान भरपाई मिळेल. लेखापरीक्षेत असे दिसून आले की, अदयाप नऊ अंगीकृत रुग्णालयांनी क्षतिपूर्ती विमा पॉलिसी घेतली नव्हती (नोव्हेंबर,२०१७), परिणामी, क्षतिपूर्ती विमा पॉलिसीमध्ये योजनेमधील लाभार्थ्यांचा व रुग्णालयांचा समावेश झाला नाही. ii) योजनेच्या टप्पा । आणि ॥ मधील प्रत्येक अंगीकृत रुग्णालयाने एका महिन्यात अनुक्रमे चार आणि दोन आरोग्य शिबिरे घ्यावयाची होती. असे आढळून आले की, ३१ अंगीकृत रुग्णालयांमध्ये आरोग्य शिबिरे दोन टक्के ते १०० टक्के इतकी कमी घेतली होती, ज्याचा परिणाम लाभार्थ्यांना योजनेविषयी जागरुक करण्यावर झाला होता.	बृहन्मुंबई महानगरपालिका रुग्णालये, एकच विशेष सेवा देणारी रुग्णालये आणि डायलेसीस सेंटर, रुग्णांच्या वाढत्या संख्येमुळे आरोग्य शिबीरे घेत नाहीत.
	iii) श्री संत अच्युत महाराज हृदय रुग्णालय आणि संशोधन संस्था, अमरावती, या योजनेंतर्गत निर्धारित रुग्णालयात, स्त्री आणि पुरुष रुग्णांसाठी वेगळे सामान्य कक्ष नव्हते, जे सामंजस्य करारानुसार आवश्यक होते.	श्री संत अच्युत महाराज हृदय रुग्णालय आणि संशोधन संस्था, अमरावती या रुग्णालयात स्त्री व पुरुष रुग्णांसाठी वेगवेगळे कक्ष नसल्याबाबत सोसायटीकडून दि.२९.०७.२०१७ रोजी पाठविण्यात आलेल्या नोटीशीनुसार सदर रुग्णालयांने स्त्री व पुरुष रुग्णांसाठी स्वतंत्र कक्षाची निर्मिती केली आहे.
	iv) योजनेंतर्गत नंदीग्राम अंगीकृत रुग्णालय, नांदेडच्या प्रकरणांत, विहीत ५० खाटांच्या रुग्णालयाऐवजी, रुग्णालयात फक्त ३८ खाटा उपलब्ध होत्या. शासनाने सांगितले (नोव्हेंबर, २०१७) की, मे २०१७ ते जुलै २०१७ या कालावधीत मोठया प्रमाणात आरोग्य शिबिरे घेतली गेली आणि ३१ अंगीकृत रुग्णालयांपैकी २६ अंगीकृत रुग्णालयांनी ११४ आरोग्य शिबिरांचे यशस्वीरित्या आयोजन केले.	योजनेच्या निकषानुसार योजनेमध्ये रुग्णालय अंगीकृत करण्यासाठी रुग्णालयामध्ये ५० खाटा असणे आवश्यक नसुन रुग्णालयामध्ये ३० खाटा + ICU+ OT असणे आवश्यक आहे. त्यानुसार नंदीग्राम रुग्णालय, नांदेड या रुग्णालयामध्ये रुग्णालय अंगीकरणाचे निकषानुसार आवश्यक खाटा उपलब्ध आहेत.

३.१.८	माहिती विश्लेषणाचे निष्कर्ष	

३.१.८ माहिती विश्लेषणाचे निष्कर्ष

वेगवेगळया प्रकारच्या जिल्हा-निहाय शिधापत्रिकाधारक म्हणजेच लाभार्थ्यांच्या संस्थेने सादर केलेल्या, माहिती संचाचे आणि २०१२-१३ ते २०१६-१७ या कालवधीत ज्या १२,४९,४८० लाभार्थ्यांचे दावे प्राप्त झाले होते. त्यांच्या माहितीचे विश्लेषण "केएनआयएमइ" आणि "आयडीइए" या माहिती विश्लेषणात्मक संगणकीय तंत्राचा वापर करुन केले गेले. त्याच्या परिणामांचे विवेचन खालीलप्रमाणे:-

निवड केलेल्या जिल्हयातील ज्या पिवळया शिधापत्रिकाधारक (दारिद्रय रेषेखालील) आणि नारंगी शिधापत्रिकाधारक (दारिद्रय रेषेवरील) लाभार्थ्यांनी राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेचा लाभ घेतला होता त्यांची तुलना आलेख १ मध्ये दर्शविली आहे.

आलेख १ मध्ये दर्शविल्याप्रमाणे निवड केलेल्या जिल्हयात दारिद्रय रेषेखालील एक ते चार टक्के शिधापत्रिकाधारकांनी योजनेचा लाभ घेतला होता त्याचवेळी दारिद्रय रेषेवरील चार ते १३ टक्के शिधापत्रिकाधारकांनी योजनेचा लाभ घेतला होता. अशाप्रकारे, दारिद्रय रेषेवरील शिधापत्रिकाधारकांच्या तुलनेत दारिद्रय रेषेखालील शिधापत्रिकाधारकांनी कमी संख्येत योजनेचा लाभ घेतला होता. यावरुन असे दिसून येते की, दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांमध्ये प्रसिध्दी झाली नव्हती.

- ठाणे, जळगाव, अहमदनगर, बीड, बुलढाणा आणि नांदेड जिल्हयातील मोठया संख्येतील रुग्णांनी या जिल्हयांमध्ये मुलभूत आणि योग्य वैद्यकीय सुविधेच्या अभावांमुळे मुंबई, नाशिक आणि औरंगाबाद जिल्हयातील योजनेंतर्गत निर्धारीत रुग्णालयातून उपचार घेतले होते.

शासनाने सांगितले (नोव्हेंबर, २०१७) की, अधिक चांगले उपचार

दि.१७.१२.२०१८ रोजीपर्यंत शिधापत्रिकानिहाय लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांचा तक्ता

शिधापत्रिकांचा प्रकार	शिधापत्रिकांची संख्या	टक्केवारी	लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांची संख्या	टक्केवारी
केशरी	१३५८०६०४	६५%	[illegible]	[illegible]
पिवळी	५०६१९५४	२२.७०%	३२४६७१	[illegible]
अन्नपुर्णा	५६१५८	०.२५%	[illegible]	[illegible]
अंत्योदय	२४९७९५५	११.२० %	[illegible]	[illegible]
शुभ्र शिधापत्रिकाधारक शेतकरी	७६९४८	०.३०%	[illegible]	[illegible]
एकूण	२२२९०६०९		[illegible]	

उपरोक्त तक्त्यानुसार असे दिसून येते की, साधारणत: योजनेचा लाभ घेतलेल्या शिधापत्रिकाधारक लाभार्थ्यांची संख्या ही शिधापत्रिकाधारक लाभार्थ्यांच्या संख्येच्या प्रमाणात आहे. त्यामुळे सर्वस्तरावर योजनेची प्रसिध्दी झाली असल्याचे म्हणता येईल.

	मिळण्यासाठी रुग्ण महानगरांमध्ये स्थलांतरीत होतात. तसेच, उपचार करावयाचे ठिकाण हे वैयक्तिकरीत्या ठरवले जाते तसेच ते लाभार्थ्यांच्या वर्तमान अधिवासावर देखील अवलंबून असते. शासनाने, लाभ घेतलेल्या उपचार सुविधेचा विचार करुन त्यानुसार आवश्यक मुलभूत वैदयकीय सुविधा पुरवाव्या जेणेकरुन लाभार्थ्यांना त्यांच्या स्वतःच्या जिल्हयातच या सुविधांचा लाभ घेता येईल ज्यामुळे लाभार्थ्यांचे स्थलांतर कमी होण्यास मदत होईल.	

३.१.९	**योजनेचे वित्तीय व्यवस्थापन** पॉलिसी वर्ष-निहाय समाविष्ट लाभार्थी, प्राप्त दावे, प्रदाने, अस्वीकृत आणि प्रलंबित दावे यांचा तपशिल परिशिष्ट ३.१.१ मध्ये दर्शविला आहे.	
३.१.९.१	**विमा कंपनीचे दावे फेटाळणे/बंद करणे** i) **दावे फेटाळणे** विमा कंपनीने रु.८१.२९ कोटीचे (जून, २०१७) दावे फेटाळले होते. ज्यामध्ये शासकीय रुग्णालयांशी संबंधित रु.३९.०७ कोटींचे (४८ टक्के) आणि योजने अंतर्गत निर्धारीत खाजगी रुग्णालयांचे रु. ४२.२१ कोटींचे (५२ टक्के) दावे सम्मिलित होते. लेखा परिक्षेत आढळून आले की, • योजने अंतर्गत निर्धारीत खाजगी रुग्णालय आणि शासकीय रुग्णालयांमध्ये केलेल्या शस्त्रक्रियेच्या एकूण खर्चाची तुलना करता, असे आढळून आले की, योजने अंतर्गत निर्धारीत खाजगी रुग्णालयांच्या दाव्यांपेक्षा शासकीय रुग्णालयातील दावे जास्त संख्येत फेटाळण्यात आले होते, जे तक्ता ३.१.१ मध्ये दर्शविले आहे. • तक्ता ३.१.१ शासकीय आणि योजने अंतर्गत निर्धरीत खाजगी रुग्णालयात केलेल्या एकूण शस्त्रक्रीयांच्या संदर्भात फेटाळलेल्या दाव्यांची तुलना	**अ) क्लेम अपील मॉड्यूल नॅशनल इन्श्युरन्स** कंपनी आणि राज्य आरोग्य हमी सोसायटी (आधीची राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सोसायटी) **यांच्याद्वारे** परस्परांच्या मंजूर करण्यात आले आणि १८/०३/२०१५ रोजी सर्व संबंधित खाजगी आणि सरकारी रुग्णालयांसाठी **सॉफ्टवेअरमध्ये यशस्वीपणे** बदल करण्यात आले. हा बदल सर्व रुग्णालयांना **कळविण्यात आले. मॉडयुलनुसार**, नाकारलेले दाव्यांना नाकारण्यात आलेल्या तारखेपासून अपील दाखल करण्यासाठी २० दिवसांचा अवधी दिला जातो. **अपीलच्या पहिल्या पातळीवर नाकारल्या गेलेल्या दाव्यांना** नियमितपणे आयोजित करण्यात **येणाऱ्या सेंट्रल क्लेम कमिटीकडे पुन्हा अपील करण्यासाठी** ३० दिवसांचा कालावधी दिला **जातो.** **ब) दावे नाकारण्याचे** सामान्य कारण खालील प्रमाणे आहेत: **१. पॉलिसी कालावधी बंद.** २. **अंटी नोट्सनुसार, पूर्व प्राधिकरण (प्रिऑथरायझेशन)** मंजूर करण्यापूर्वी शस्त्रक्रिया/उपचार करणे **३. हिस्टोपाथोलॉजीच्या तपासणीच्या अहवालानुसार कर्करोग** दिसून येत नाही आणि पॅकेज सर्जिकल ओन्कोलॉजीच्या अंतर्गत आहे. **४. ऑपरेशननंतर एक्स-रे फिल्मवर दिनांक दिसत नाही** **५. ॲडज्युडीशिएल मार्गदर्शक** तत्त्वानुसार, खडया आकार कमीतकमी ८०% कमी झाला असल्यास दावे मिळविण्यासाठी पात्र ठरतो तथापि USG पुर्वी २३ मिमिचा व USG अहयालानंतर २.० सेमीचा खडा उजव्या मुत्रपिंडात दिसून येतो, त्यामुळे ८० % खडा दिसत

रु.कोटीत

रुग्णालयाचे प्रकार	एकुण शस्त्रक्रिया	फेटाळलेले दावे	फेटाळलेल्या दाव्यांची टक्केवारी		
शासकीय	२,३०,२२९	५८३.९१	१२,९७०	३९.०७	७
योजने अंतर्गत निर्धारीत खाजगी	१०,२२.१६५	२,४८४.२७	१७,१९०	४२.२१	२

स्रोत: संस्थेने सादर केलेली माहिती

- जर मुख्य वैदयकीय अधिकारी यांनी रुग्णालयाचे दावे फेटाळले तर एक शेवटची संधी देण्याच्या उद्देशाने संस्थेने "क्लेम अपील मोडयुल" सुद्धा तयार केले होते. तथापि, हे अपील मुख्य वैद्यकीय अधिका-यांनी दावा फेटाळल्याच्या तारखेपासून २० दिवसांच्या आत करावयाचे होते. शासकीय/महानगरपालिकांच्या/नगरपरिषदांच्या १९ रुग्णालयांची चाचणी तपासणी केली असता असे आढळून आले की, अनिवार्य दस्तावेज, उपचारांचे व्हिडीओ, जखमेचे छायाचित्र इत्यादींच्या अनुपलब्धतेमुळे, रुग्णालयांनी विहीत २० दिवसांत अपील सादर केले नव्हते, परिणामी, ऑगस्ट २०१३ ते मार्च २०१७ या कालावधीतील सदर दाव्यांशी संबंधित रु. २५.९० कोटींचे नुकसान झाले होते.

नाही.

६. डायलिसिस फोटोवर कोणतीही तारीख नाही

७. बेड फोटो आणि डिस्चार्ज फोटो वेगवेगळा दिसून येतो.

८. डायलिसिसचा दाखविण्यात आलेले फोटो संपादित केले जातात.

९. कमोथेरपीच्या बाबतीत- पॅकेज मंजूर नसलेल्या पॅकेजनुसार औषध दिली जातात.

१०. उपचार/ शस्त्रक्रिया पासून विचलन

११. उपचार/शस्त्रक्रियेचे व्हिडीओ संलग्न करत नाही.

१२. अनिवार्य दस्तऐवज सादर केले जात नाहीत.

१३. ऑथ्रोस्कोपी व्हिडीओ/चित्रे पुरविली जात नाहीत.

सध्या सरकारी रुग्णालयांना सवलत दिल्या जातात:

सरकारी रुग्णालयांमध्ये योजनेकरिता स्वतंत्र मनुष्यबळ नसल्याने आणि विद्यमान मर्यादीत कर्मचा-यांवर अतिरिक्त कार्यभार दिला जात असल्याने, ॲडज्युडीकेशन मार्गदर्शक तत्त्वामध्ये खालीलप्रमाणे शासकीय रुग्णालयांना सवलती/मुभा देण्यात आल्या आहेत.

अ) १३१ उपचार/ शस्त्रक्रिया सरकारी रुग्णालयांसाठी राखीव आहेत

ब) प्रिऑथरायझेशन तारखेपासून उपचार/ शस्त्रक्रिया पूर्ण करण्याची तारीख ६० दिवस आहे आणि खाजगी हॉस्पिटलमध्ये ३० दिवस आहेत.

सी) इंट्रा-ऑप फोटो सबमिट करण्यासाठी सरकारी रुग्णालयांना सवलत देण्यात आली आहे.

ड) दाव्याच्या पुर्ततेसाठी लॅपरोस्कोपिक आणि एंजियोग्राफी प्रक्रियेसाठी व्हिडिओ अनिवार्य आहेत परंतु सरकारी रुग्णालयांच्या बाबतीत सीडी स्वीकारली जाऊ शकते.

टीपीएने दिलेल्या इतर सवलती व्यतिरिक्त अतिरिक्त मार्गदर्शक तत्त्वांमध्ये समाविष्ट नाहीत:

ए) हॉस्पिटल स्टॅम्प आणि स्वाक्षरीसह हस्तलिखित अहवाल स्वीकारले जातात.

बी) लीड इम्प्रिंटेड एक्स-रे फिल्म क्लेम दस्तऐवज म्हणून स्वीकारले जातात.

सी) दाव्याच्या पुर्ततेसाठी रुग्णाच्या मुद्रित नावाशिवाय ईसीजी आणि एबीजी स्लिप्स स्वीकारल्या जातात.

ड) योग्यरित्या स्वाक्षरी केलेल्या अहवाल सबमिट केल्यावर यूएसजी / एमआरआय / सीटी

	• शासनाने सांगितले (नोव्हेंबर,२०१७) की, अनिवार्य दस्तावेज जसे, ओ.टी. टिप्पणी, प्रयोगशाळेतील तपासण्या किंवा पूर्व-अर्हता प्रक्रिया यांचे दस्तावेज सादर न केल्यामुळे विमा कंपनीने दावे फेटाळले होते. शासकीय रुग्णालयांना इतकी सूट देऊनही दाव्यांना मंजूरी मिळण्यासाठी किमान आवश्यक दस्तावेज सादर करण्यात शासकीय रुग्णालये अपयशी ठरल्यामुळे, शासकीय रुग्णालयांच्या फेटाळलेल्या दाव्यांची टक्केवारी खाजगी रुग्णालयांपेक्षा जास्त होती. तसेच २१ ऑगस्ट, २०१७ रोजी संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, संचालक, आरोग्य सेवा संचालनालय आणि बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याबरोबर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केलेल्या बैठकीमध्ये वरील समस्येवर चर्चा केली गेली आणि रुग्णालयांना विहित केलेल्या नियमांचे अनुपालन करण्याच्या सुचना देण्यात आल्या. • योजने अंतर्गत निर्धारीत रुग्णालये/महानगरपालिका/ नगरपरिषद रुग्णालये यांच्याकडून झालेल्या चुकांमुळे विमा कंपनीकडून दावे स्विकारले गेले नाहीत आणि त्यापोटी नुकसान झाले ही वस्तुस्थिती कायम राहते. **I) दावे बंद करणे** लेखापरिक्षेला पुढे असे निदर्शनास आले की, चाचणी तपासणी केलेल्या १९ शासकीय/ महानगरपालिका/परिषद रुग्णालयांचे रु.३.५८ कोटींचे दावे उशीरा सादर केल्यामुळे विमा कंपनीने शेवटी बंद केले.	**फिल्मसवर जोर देत** नाही. ई) discharge **फोटो** किऑस्क किंवा एमसीओशिवाय बॅनर उपस्थित असताना काढले तरी स्वीकारले जातात. एफ) लिखित रकमेशिवाय वाहतूक पत्र स्वीकारले जातात. g) जेथे NWH व्हिडिओ प्रदान करण्यास अक्षम आहे तिथे फोटो किंवा स्केच स्वीकारले जातात. h) आर्थोस्कोपिक उपचार / शस्त्रक्रिया करिता वीडीओ नसताना सरकारी रुग्णालयांसाठी फोटो स्वीकारल्या जातात. सरकारी रुग्णालयांसाठी, दावा नाकारण्याचे कारण प्रामुख्याने ओटी नोंद्रा, लॅब तपासणी किंवा प्रिऔथरायझेशन पूर्वी केलेल्या उपचार / शस्त्रक्रियेसाठी अनिवार्य दस्तऐवज न सबमिट केल्यामुळे होते. सरकारी रुग्णालयांना अनेक सवलत दिल्या असूनही ते दाव्यांच्या मंजुरीसाठी किमान आवश्यक कागदपत्रे सादर करण्यास अपयशी ठरले आहेत म्हणून खाजगी रुग्णालयांची नाकारलेल्या दाव्यांची टक्केवारी सरकारी रुग्णालयांची नाकारण्याची टक्केवारीच्या तुलनेत जास्त आहे. तसेच, आरोग्य सेवा संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालक आणि वैद्यकीय शिक्षणाचे डीन व संचालक, बीएमसी यांना नियमित अंतराने पत्र पाठवलेले आहेत, त्या पत्रात दाव्याचे नाकारणाऱ्या कारणांचा उल्लेख करून दाव्यांचे निराकरण करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे अपलोड करण्यासाठी काळजी घेतली असता ते दावे नाकारले जाणार नाहीत.(पत्रसोबत जोडलेले आहेत.) **दावे बंद करणे.** a) सांमजस्य करारनाम्यातील कलम २३.३ नुसार रुग्णालयांनी रुग्णाच्या डिस्चार्जच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत केलेल्या शस्त्रक्रिया / उपचारांसाठी सर्व दावे सादर करणे आवश्यक आहे.

	शासनाने सांगितले (नोव्हेंबर २०१७) की, टप्पा । आणि ॥ च्या सामंजस्य कराराच्या कलम २३.३ नुसार, रुग्णालयांनी एखादया पॉलिसी वर्षाच्या संबधित जी प्रकरणे सादर केली नव्हती किंवा अद्यावत केली नव्हती अशा प्रकरणांच्या नॅशनल इन्शुरन्स कंपनी आणि राज्य आरोग्य हमी संस्था (पूर्वाश्रमीची राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना) यांनी पॉलीसीचे वर्ष संपल्यापासून आणि रनऑफ कालावधी समाप्त झालेल्या प्रकरणांमध्ये विशिष्ट मुदत देऊन अशी प्रकरणे बंद करण्याचा संयुक्त निर्णय घेतला. योजने अंतर्गत निर्धारीत रुग्णालयांना प्रलंबित प्रकरणांविषयीचे सर्व सोपस्कार पूर्ण करुन दावे सादर करण्यास सांगण्यात आले,ज्यानंतर अशी प्रकरणे बंद करण्यात आली.	b) त्यानुसार, **विशिष्ट पॉलिसी वर्षामध्ये अंगीकृत** रुग्णालयाने दावे सादर केले नाही किंवा अद्ययावत केले नाही, अशा प्रकरणी पॉलिसी वर्ष व रन ऑफ पिरीयड समाप्तीनंतर देखील विशिष्ट कालावधी देऊन दावे बंद करण्याचा संयुक्त निर्णय नॅशनल इन्शुरन्स कंपनी आणि राज्य आरोग्य हमी सोसायटी (आधीची राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सोसायटी) यांनी घेतला. प्रलंबित दावे अदयायावत करणे व प्रकरणे बंद झाल्यानंतर दावे सादर करण्याबाबत रुग्णालयांना सुचना देण्यात आल्या होत्या. आरोग्य सेवा संचालक, मुंबई यांना त्याप्रमाणे पत्र निर्गमित करण्यात आले आहे.

३.१.९.२	**विमा हप्ता प्रदानातील अनियमितता** **i) अपात्र लाभार्थ्यांच्या विम्याच्या हप्त्यापोटी प्रदान** ज्या लाभार्थ्यांचे वार्षिक उत्पन्न रु.एक लाखांपेक्षा जास्त आहे त्यांना या योजनेचे लाभ देय नव्हते. असे आढळून आले की, संस्थेने रु.एक लाखापेक्षा अधिक वार्षिक उत्पन्न असलेल्या १,३७,४३७ लाभार्थ्यांच्या रु. ५.१४ कोटींच्या विमा हप्त्याचे प्रदान केले होते. परिणामी, तेवढी रक्कम अपात्र लाभार्थ्यांच्या विम्याच्या हप्त्यापोटी प्रदान केली गेली होती. या रु.५.१४ कोटीं पैकी, विमा कंपनीने रु. ३.७१ कोटी संस्थेला परत केले होते आणि उर्वरित रु.१.४३ कोटी, दावा करुनही विमा कंपनीने अद्यापही परत केले नव्हते (जून२०१७). शासनाने सांगितले (नोव्हेंबर २०१७)की, याआधी विमा कंपनीला प्रदान केलेल्या रु. १.४३कोटी अतिरिक्त विमा हप्त्याचे समायोजन करण्यासाठी या प्रकरणात न्यायालयीन करवाई सुरु आहे. अशा प्रकारे लाभार्थ्यांच्या पात्रतेची पडताळणी न करता विम्याच्या हप्त्याचे झालेले प्रदान, संस्थेच्या अंतर्गत चाचण्या/नियंत्रण कमकुवत असल्याचे निदर्शक होते; ज्यामुळे अंतिमत: विमा कंपनीला फायदा झाला. **i) अतिरिक्त हप्त्याची वसुली/समायोजन न करणे** टप्पा II च्या सामंजस्य कराराच्या कलम १४ च्या तरतुदी नुसार विम्याचा दावा केल्यावर पॉलिसी कालावधीच्या शेवटी जर विमा हप्त्याची (सेवा कर वगळून) अतिरिक्त राशि उरली तर विमा कंपनीच्या प्रशासकीय खर्चासाठी २० टक्के रक्कमेची तरतूद केल्यावर, शिल्लक रक्कमेतील ९० टक्के रक्कम एक महिन्याच्या रनऑफ अवधीनंतर ६० दिवसांच्या आत विमा कंपनीने संस्थेला परत करावी.	महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून वितरीत करण्यात येणाऱ्या शिधापत्रिकांच्या आधारे देण्यात येतो. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग हा शिधापत्रिकांच्या माहितीचा परिरक्षक (custodian) आहे. लाभार्थ्यांचे आरोग्य पत्र तयार करण्याकरिता, सोसायटीने अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या अखत्यारीतील स्वस्त धान्य दुकानातून B१ फॉर्म प्राप्त केले होते. लेखा परिक्षण अहवालात नमुद करण्यात आलेली रु.१.४३ कोटी रक्कम रु.१ लाखापेक्षा जास्त वार्षिक उत्पन्न असलेल्या शिधापत्रिकाधारक कुटुंबांकरिता विमा कंपनीस प्रदान करण्यात आलेली अतिरिक्त विमा हप्त्याची रक्कम असून सदर रकमेची विमा कंपनीकडून वसुली करावयाची आहे. आरोग्य पत्राची छपाई करताना सदर बाब सोसायटीच्या निदर्शनास आली होती. अन्न, नागरी पुरवठा विभागाकडून प्राप्त B१ फॉर्मनुसार, रु.१ लाखापेक्षा जास्त उत्पन्न असणाऱ्या शिधापत्रिकाधारकांची संख्या १,३७,४३७ इतकी होती. सदर शिधापत्रिकाधारकांच्या अतिरिक्त विमा रकमेची प्रतिपुर्ती करण्याकरिता विमा कंपनीस कळविण्यात आले आहे. यापूर्वी विमा कंपनीस प्रदान करण्यात आलेल्या विमा हप्त्याचे समायोजन करुन प्रत्यक्षात रु.१,४३,२६,०४१/- इतक्या रकमेची विमा कंपनीकडून प्रतिपुर्ती देय ठरत आहे. भारतीय विमा नियामक व विकास प्राधिकरणाच्या मार्गदर्शक तत्त्वातील कलम ६४ व्ही बी नुसार, लाभार्थ्यांच्या विमा संरक्षणाकरिता संपुर्ण विमा हप्ता आगाऊ प्रदान करण्यात येत असल्याने विमा हप्त्यातील कोणत्याही अतिरिक्त रकमेचे समायोजन सोसायटीस करता येत नाही. योजनेतील विमा हप्ता प्रदान रकमेपेक्षा जास्त रकमेचे दावे प्रदान झाल्यास विमा कंपनी नुकसानीची जोखीम स्विकारीत असते आणि विमा रकमेतील दाव्यांपोटी खर्च करावयाच्या

	लेखापरिक्षेत असे लक्षात आले की, जून, २०१५ ला विमा कंपनीकडे रु.८७.५०कोटी अतिरिक्त रक्कम पडून होती. त्यानुसार, विमा कंपनीने रु.७८.७५कोटी (रु. ८७.५०कोटींचे ९० टक्के) संस्थेतला परत करावयाचे होते. मात्र विमा कंपनीने फक्त रु. ३१.१२कोटी रक्कम परत/समायोजित केली होती आणि उर्वरित रु. ४७.६३कोटी रक्कम विमा कंपनीकडे पडून होती. पुढे असेही आढळून आले की, विमा कंपनीने तिला योजनेच्या प्रदान केलेल्या विमा हप्त्याची २० टक्के रक्कम आधीच प्रशासकीय खर्चासाठी समायोजित केली होती आणि म्हणून सामंजस्य करारात जरी अतिरिक्त रकमेतून दहा टक्के समायोजन करण्याचे नमूद केले होते तरी ते देय नव्हते. यामुळे विमा कंपनीला रु. ८.७५कोटींचा दुहेरी फायदा झाला होता. शासनाने सांगितले (नोव्हेंबर २०१७) की, विमा नियामक आणि विकास प्राधिकरण विनियमांच्या खंड ६४ V ब नुसार पॉलिसी अंतर्गत लाभ प्राप्त होण्यासाठी एकूण विमा हप्त्याचे आगावू प्रदान करणे आवश्यक असते, परिणामी, संस्थेला अतिरिक्त विम्याची रक्कम इतर कोणत्याही विमा हप्ता प्रदानातून समायोजित करता येऊ शकली नव्हती. तसेच जेव्हा योजनेखालील प्रदान केलेल्या विमा हप्त्यापेक्षा जास्त नुकसान भरपाई दिली जाते तेव्हा विमा कंपनीला हा तोटा सोसावा लागतो तसेच विमा कंपनीला झालेल्या नफ्यापैकी ९० टक्के नफा हा विभागला जातो आणि १० टक्के हा विमा कंपनी स्वत:कडे राखून ठेवते, जे सामंजस्य कराराच्या कलम १४ नुसार आहे. हे उत्तर स्विकारणीय नाही कारण भरणा केलेल्या एकूण विमा हप्त्यापैकी २० टक्के रक्कम ही योजनेच्या प्रशासकीय खर्चासाठी आधीच समायोजित करण्यात आली असल्याने सामंजस्य करारामध्ये जरी नमूद केलेले असले तरी, अतिरिक्त रक्कमेतून १० टक्के रक्कमेचे समायोजन हे अप्रस्तुत होते.	**रकमेतील शिल्लक रकमेच्या ९० टक्के** रक्कम **सोसायटीस** परत करण्यात येते व १० **टक्के** रक्कम विमा कंपनीकडे ठेवण्यात येते.

३.१.१.३	**मानकांनुसार विस्तृत प्रमाणावर करावयाच्या प्रसिद्धीचा अभाव**	
	योजनेच्या टप्पा । आणि ॥ च्या सामंजस्य कराराच्या कलम २६ नुसार, विमा कंपनीने सामान्य जनतेला योजनेची अधिक चांगली माहिती मिळण्यासाठी इलेक्ट्रॉनिक आणि छापील माध्यमे, लाभार्थ्यांना पत्रकांचे/वैयक्तिक छापील साहीत्याचे वाटप, घोषणापत्रके, प्रदर्शक फलक, मार्गदर्शक पुस्तिका , टोल फ्री दूरध्वनी क्रमांक, नेटवर्क प्रोव्हायडर्सची सूची,पॉलिसी आणि लाभांची माहिती फलक, चित्रपटगृहात दाखविल्या जाणा-या स्लाईडस्, केबल दूरचित्रवाणी स्क्रोल्स, प्राथमिक आरोग्य केंद्रावरील मदत केंद्रे आणि योजने अंतर्गत निर्धारित रुग्णालयांतील मदत केंद्रे इत्यादीद्वारे योग्य प्रसिध्दी देण्याची खात्री करावी. तसेच, विमा कंपनीने लाभार्थ्यांकडून मिळणा-या एकूण विमा हप्त्याच्या दोन टक्के रक्कम याकामी खर्च करावी. लेखापरीक्षा तपासणीत असे आढळून आले की, वर्ष २०११-१२ ते २०१६-१७ दरम्यान संस्थेने एकूण १,३४,९५,०२५ लाभार्थ्यांसाठी रु.२,७१०.८९कोटी रक्कम प्रदान केली होती. त्यानुसार, विमा कंपनीला योजनेच्या प्रसिध्दिवर रु.५४.२२कोटी (विमा कंपनीला प्राप्त झालेल्या एकूण विमा हप्त्याच्या दोन टक्के) खर्च करावयाचे होते. तथापि, असे लक्षात आले की, विमा कंपनीने योजनेच्या प्रसिध्दीसाठी फक्त रु.३७.१५कोटी खर्च केले होते. शासनाने सांगितले (नोव्हेंबर २०१७) की, माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालय यांनी दिलेला रु. १० कोटीचा प्रसिध्दी आराखडा	राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना हि महाराष्ट्र शासनाची अतिशय महत्वकांक्षी योजना असून, योजनेच्या प्रचार व प्रसिद्धीपोटी आतापर्यंत अनेक उपक्रम राबविण्यात आलेले आहेत . जसे कि, योजनेविषयी वर्तमान पत्रात जाहिरात देणे, लेख छापून आणणे, विविध मुलाखतींद्वारे योजनेची माहिती देणे, बस स्टँड/रेल्वेवरील ऑडीओ/व्हिडीओ जाहिराती, योजनेच्या संकेत स्थळावर लाभार्थ्यांचे मनोगत, संकेत स्थळावरील योजनेची माहिती देणारा व्हिडीओ, रेडीओ जिंगल्स, दूरदर्शनवरील व्हिडीओ जाहिराती, योजनेविषयी सोशल मिडियाद्वारे जागरुकता प्रसारित केली (फेसबुक पेज), पंढरीची वारी, लालबागचा राजा अशा देवतांच्या उत्साह सोहळ्यादरम्यान स्टॉल लावून देवदर्शनासाठी येणाऱ्या जनतेला योजनेविषयी माहिती दिली जाते .अंगीकृत रुग्णालयांकडून आरोग्य शिबिरे घेवून रुग्णांची तपासणी व योजनेविषयी व्यापक प्रसार, प्रसिद्धी केली जाते .योजना दुसऱ्या टप्प्यात दि.२१ नोव्हेंबर, २०१३ रोजी लागू होताना व त्यानंतरदेखील योजनेची प्रचार, प्रसिद्धी करण्यात आली होती. महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेच्या लाभार्थ्यांच्या विमा संरक्षणाकरिता नॅशनल इन्शुरन्स कंपनीला दि २ .जुलै, २०१२ ते दि .३० जून, २०१८ या कालावधीमध्ये विमा हप्त्याची एकूण रक्कम रुपये ४४७१,०१,०३,१०२) -/(कर रहित) अदा करण्यात आली आहे .राज्य आरोग्य हमी सोसायटी व नॅशनल इन्शुरन्स कंपनी यामधील सामंजस्य करारनाम्यातील कलम क्र .२६ नुसार अदा करण्यात आलेल्या विमा हप्ता रकमेच्या २ टक्के रक्कम सोसायटीच्या सल्ल्याने विमा कंपनीने योजनेच्या प्रचार व प्रसिद्धीवर खर्च करणे अपेक्षित होत. वास्तवात मात्र, प्रचार व प्रसिद्धीसाठीच्या २ टक्के रकमेपैकी अंशतः रक्कम नॅशनल इन्शुरन्स कंपनीने योजनेच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी खर्च केली असून उर्वरित रक्कम त्यांच्याकडे अखर्चित होती . दि .३०.०६.२०१८ अखेर नॅशनल इन्शुरन्स कंपनीने योजनेच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी

संस्थेने सार्वजनिक आरोग्य विभागास संमतीसाठी आता सादर केला आहे.

योजनेच्या कालावधी दरम्यान विमा कंपनीने योजनेच्या विस्तृत प्रसिध्दीची सुनिश्चिती न केल्यामुळे, जास्त् लाभार्थ्यांपर्यंत योजनेचे लाभ पोहोचण्यावर विपरीत परिणाम झाला होता, ही वस्तुस्थिती कायम राहते.,

खर्च केलेल्या व अखर्चित रकमेचा गोषवारा खालीलप्रमाणे:

दि.३० जून,२०१८ रोजीपर्यंत प्रदान करण्यात आलेला एकूण विमा हप्ता	रु.४४४१,०१,०३,१०२
प्रचार व प्रसिध्दीची २ टक्के रक्कम (अ)	रु.८९,४२,०२,०६२
नॅशनल इन्शुरन्स कंपनीकडून झालेला एकूण खर्च (ब)	रु.२५,६३,०४,४१०
दि.३० जून,२०१८ पर्यंत नॅशनल इन्श्युरन्स कंपनीकडे शिल्लक रक्कम	रु.६३,७८,९७,६५२

वरील तक्त्यावरून स्पष्ट होते कि, योजना सुरु झाल्यापासून ते दि.३०.०६.२०१८ पर्यंत रु.४४७१,०१,०३,१०२ -/इतकी विमा रक्कम नॅशनल इन्शुरन्स कंपनीला अदा करण्यात आली होती .या विमा रकमेच्या २% रक्कम रु.८९,४२,०२,०६२ -/इतकी योजनेच्या प्रचार व प्रसिद्धीवर खर्च होणे अपेक्षित होते परंतु प्रत्यक्षात रु.२५,६३,०४,४१० -/इतकीच रक्कम नॅशनल इन्शुरन्स कंपनीकडून योजनेच्या प्रचार व प्रसिद्धीकरिता खर्ची पडली आहे आणि उर्वरित रु .६३,७८,९७,६५२ -/इतकी रक्कम विमा कंपनीकडे अखर्चित पडून होती .

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेच्या व्यापक प्रसिद्धीकरिता माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांचेकडून रु .१० कोटी रकमेचा माध्यम आराखडा सादर करणे बाबत सूचना प्राप्त झाल्या. सदर माध्यम आराखड्यास व खर्चास मान्यता मिळण्याबाबत शासनाकडे सोसायटीचे पत्र दि.१४ जुलै, २०१७ अन्वये विनंती केली होती. त्यावर दि.१८ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या शासन पत्रान्वये सुधारित महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेस मंत्रीमंडळाची मान्यता प्राप्त होवून त्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर योजनेची प्रसिद्धी करणे उचित होईल असे कळविण्यात आले होते. तसेच दि.३० जुन, २०१८ रोजीच्या शासन पत्रान्वये, सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२१.०७.२०१७ व दि.०१.०६.२०१८ च्या शासन निर्णयामध्ये शासकीय जाहिरात वितरण धोरणाची कार्यपद्धती निश्चित केली आहे त्यानुसार विमा कंपनी आणि राज्य आरोग्य हमी सोसायटी यामध्ये झालेल्या सामंजस्य करारानुसार विद्यमान महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेच्या प्रसिद्ध माध्यम आराखड्या संदर्भात पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत कळविले आहे.

त्यास अनुसरून योजनेची प्रचार व प्रसिद्धी सोसायटी किंवा विमा कंपनीमार्फत करता येणार नसल्याने सदरची विमा कंपनीकडील प्रचार व प्रसिद्धीची दि .३०.०६.२०१८ अखेरची २ टक्के अखर्चित रक्कम रु .६३,७८,९७,६५२ -/आणि माहे जुलै, २०१८ ते माहे सप्टेंबर, २०१८ या तिसऱ्या तिमाहीच्या रु.३८४,५१,३०,०५३ -/इतक्या विमा हप्ता रकमेतील प्रचार व प्रसिद्धीपोटीची २ टक्के रक्कम रु.७,६९,०२,६०१ -/अशी एकूण रु .७१,४८,००,२५३ -/)रु.६३,७८,९७,६५२ +७,६९,०२,६०१ (इतकी रक्कम सोसायटीकडे प्रलंबित ठेवून उर्वरित रक्कम रु.३१३,०३,२९,८०० -/विमा कंपनीला अदा करण्यात आली आहे. तसेच, माहे ऑक्टोबर, २०१८ ते माहे डिसेंबर, २०१८ या चौथ्या तिमाहीच्या रु.३८४,५१,३०,०५३ -/मधील २% प्रचार व प्रसिद्धीची रक्कम रु.७,६९,०२,६०१ -/वगळून रु.३७६,८२,२७,४५२ -/इतकी रक्कम विमा कंपनीला अदा करण्यात आली आहे .म्हणजेच दि.३१.१२.२०१८ पर्यंत विमा कंपनीला एकूण रु.५११६०,८६,६०,३५४ -/इतकी रक्कम विमाहप्त्यापोटी प्रदान करण्यात आली आहे.

नॅशनल इन्शुरन्स कंपनीने त्यांच्या दिनांक १५ ऑक्टोबर, २०१८ रोजीच्या पत्रानुसार, विमा कंपनी तिसऱ्या व चौथ्या तिमाहीमध्ये सोसायटीने %२वगळलेल्या रक्कमेसाठी राजी असून इथून पुढे विमा हप्ता २% प्रचार व प्रसिद्धीची रक्कमने कमी करणार असून योजनेच्या प्रचार व प्रसिद्धीवर विमा कंपनीकडून कोणताही खर्च केला जाणार नसल्याचे सांगितले आहे . तसेच, दि.३०.०६.२०१८ अखेरची २ टक्के प्रचार व प्रसिद्धीसाठीची विमा कंपनीकडे अखर्चित असणारी रक्कम रु .६३,७८,९७,४५२ -/चार हप्त्यामध्ये अदा करत असल्याचे कळविले आहे व सोसायटीने तिसऱ्या विमा हप्त्यामधून प्रलंबित ठेवलेल्या रकमेतील दि.३०.०६.२०१८ पर्यंतची २% प्रचार व प्रसिद्धीची रक्कम रु.६३,७८,९७,६५२ -/विमा कंपनीस अदा करावी अशी विनंती केली आहे.

पहिला हप्ता	३१.१०.२०१८	रु.१५,००,००,०००/-
दुसरा हप्ता	१५.११.२०१८	रु.१५,००,००,०००/-
तिसरा हप्ता	३०.११.२०१८	रु.१५,००,००,०००/-
चौथा हप्ता	१५.१२.२०१८	रु.१८,७८,९७,६५२/-
एकूण		रु ६३,७८,९७,६५२/-

		उपरोक्त तक्यातील रक्कम रु.६३,७८,९७,६५२/- दि.१५.१२.२०१८ पर्यंत सोसायटीस **संपुर्णत: प्राप्त झाली आहे.** सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि. २०.१२.२०१८ मधील तरतुदीनुसार योजनेची प्रचार व प्रसिद्धी माहिती व जन संपर्क महासंचालनालय मार्फत करण्यात येईल. सध्या योजने अंतर्गत अंगीकृत रुग्णालयांद्वारे नियमितपणे आरोग्य शिबिरे आयोजित करुन योजनेचा प्रचार आणि प्रसिद्धी केली जात आहे.

३.१.९.४	**आरोग्य कार्डाची छपाई विमा कंपनीने खर्चाची प्रतिपुर्ती न करणे** टप्पा । आणि ॥ च्या सामंजस्य कराराच्या कलम २६ नुसार, लाभार्थ्यांना जारी करावयाच्या आरोग्य कार्डांच्या छपाईचा खर्च विमा कंपनीने करावयाचा होता. तथापि, असे आढळून आले की, वर्ष २०११-१२ ते २०१४-१५ दरम्यान संस्थेने १.२०कोटी आरोग्य कार्ड छापण्यासाठी (टप्पा । आणि ॥ चे कार्ड) रु. ९.६५कोटी खर्च केले होते. परंतू, विमा कंपनीने आजतागायज (जून २०१७) त्या खर्चाचा परतावाही केला नव्हता किंवा संस्थेनेही विमा कंपनीला अदा करावयाच्या रक्कमेतून सदर रक्कम समायोजित केली नव्हती. शासनाने सांगितले (नोव्हेंबर २०१७) की, आरोग्य कार्डांच्या छपाई आणि वितरणावर केलेल्या रु. ९.६५कोटी खर्चाचे, जे आयईसीचा एक भाग आहे, प्रतिपुर्ती करण्यासाठी संस्थेने ऑगस्ट २०१७ मध्ये स्मरणपत्र पाठविले आहे. विमा नियामक आणि विकास प्राधिकरण विनियमांच्या खंड ६४ V ब नुसार, पॉलिसी अंतर्गत लाभ प्राप्त होण्यासाठी एकूण विमा हप्ता अदा करणे आवश्यक असल्यामुळे संस्थेला वरील रक्कम विमा हप्त्यातून समायोजित करता येऊ शकली नव्हती.	विमा कंपनीसोबत झालेल्या पहिल्या व दुसऱ्या टप्प्यांच्या सांमजस्य करारातील कलम क्र.२६.१ नुसार आरोग्य पत्र छपाईवर झालेला खर्च विमा कंपनीने करणे आवश्यक आहे. मात्र, सन २०११-१२ ते २०१४-१५ पर्यंत आरोग्य पत्र छपाईकरिता सोसायटीने रु.९.६५ कोटी इतकी रक्कम खर्च केली होती (पहिला व दुसरा टप्प्यातील आरोग्य पत्र). तथापि विमा कंपनीने या खर्चाची प्रतिपुर्ती केली नव्हती किंवा विमा कंपनीस देणे असलेल्या कोणत्याही रकमेतून या रकमेचे समायोजन करण्यात आले नव्हते. सध्या, सोसायटीने विमा कंपनीकडे अखर्चित असणारी २% प्रचार व प्रसिद्धीची रक्कम रुपये ६३.७८ कोटी प्रतीपुर्तीने प्राप्त करून घेतली असून त्यामध्ये सोसायटीने आरोग्य पत्र छपाई व वितरणावर केलेला खर्च रुपये ९.६५ कोटीचा समावेश आहे .

३.१.९.५	**निर्धारीत नुकसानीची वसुली न करणे** टप्पा । आणि ॥ च्या सामंजस्य कराराच्या कलम १२ आणि १३ नुसार विमा कंपनीला करार, योजना आणि पॉलिसी संदर्भात तिची दायित्वे पूर्ण करण्यासाठी बहुविध कार्ये पार पाडावी लागतात. विमा	विमा कंपनीसोबत झालेल्या सांमजस्य करारातील विविध कामगिरी विहीत मुदतीत न केल्याप्रकरणी, लिक्वीडेटेड डॅमेजची रक्कम सोसायटीस अदा करण्याकरिता विमा कंपनीस वारंवार पत्र व नोटीसा पाठविण्यात आल्या आहेत मात्र विमा कंपनीने लिक्वीडेटेड डॅमेजची रक्कम अदा करण्यास स्पष्ट नकार दिला आहे. करारनाम्यातील वाद निवारणसबंधीच्या

कंपनीने नियत वेळेत जर यापैकी एखादे कार्य केले नाही तर योजनेच्या देय तारखेला अंमलबजावणी होण्यावर अडथळा येतो आणि प्रतिकूल परिणाम होतो आणि त्यामुळे विमेदाराला आणि लाभार्थ्यांना नुकसान होते. तसेच विमा कंपनीला, कराराच्या तारखेपासून विहीत कालावधीच्या आत करारात नमूद केलेली कार्ये पूर्ण करणे आवश्यक असते अन्यथा विमा कंपनीला एकूण विमा हप्त्याच्या राशिवर विशिष्ट टक्क्यांनी प्रति आठवडा/महिना निर्धारीत नुकसान भरपाईची रक्कम विलंब झालेल्या कालावधीसाठी संस्थेला प्रदान करावी लागते. योजनेच्या दुस-या टप्प्यांत निर्धारीत नुकसान भरपाईची कमाल मर्यादा रु. एक लाख होती.

लेखापरिक्षेला असे आढळून आले की, योजने अंतर्गत प्रत्येक जिल्हयात करावयाची कार्ये जसे, २४ तास कॉल सेंटर, पर्याप्त मुलभूत सुविधा, रोख रक्कम रहीत उपचार इत्यादी न केल्यामुळे, देय असलेली, टप्पा । ची रु. ९६.०८कोटी आणि टप्पा ॥ ची रु.तीन लाखाची निर्धारीत नुकसान भरपाई रक्कम अनुक्रमे चार वर्षे व तीन वर्षे वसूल केली नव्हती.

शासनाने सांगितले (नोव्हेंबर २०१७) की, टप्पा । आणि ॥ च्या सामंजस्य कराराच्या विवाद विभेदन कलमानुसार लवाद प्रक्रिया चालू होती.

तरतुदीनुसार, लिक्वीडेटेड डॅमेज रकमेची वसुली करण्याकरिता आर्बिस्टेशन प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

विमा कंपनीकडून खालील प्रकरणी लिक्वीडेटेड डॅमेजची रक्कम वसुल करावयाची आहे.

टप्पा	एकूण रककम (रु.)	कारणे
०२.०७.२०१२-०१.०७.२०१३	१३४,२८,३३,५७७/-	मेडीकल ऑडीट, कॉल सेंटरमध्ये मनुष्यबळाची कमतरता
०२.०७.२०१३-०१.०७.२०१४	३१,३९,१०,१५५/-	मेडीकल ऑडीट वेळीच न करणे व दावे विहीत मुदतीमध्ये प्रदान न करणे.
०२.०७.२०१४-०१.०७.२०१५	२०,०६,१५,४१७/-	मेडीकल ऑडीट वेळीच न करणे व दावे विहीत मुदतीमध्ये प्रदान न करणे.
०२.०७.२०१५-०१.०७.२०१६	११,१८,३४,६९६/-	मेडीकल ऑडीट वेळीच न करणे व दावे विहीत मुदतीमध्ये प्रदान न करणे.
२१.११.२०१३-२०.११.२०१४	१,००,०००/-	दावे विहीत मुदतीत प्रदान न करणे
२१.११.२०१४-२०.११.२०१५	१,००,०००/-	दावे विहीत मुदतीत प्रदान न करणे
२१.११.२०१५-२०.११.२०१६	१,००,०००/-	दावे विहीत मुदतीत प्रदान न करणे
एकूण	९६,९४,९६,३८५/-	

शासनाकडील दि.१० डिसेंबर,२०१८ रोजीच्या पत्रानुसार, नॅशनल इन्श्युरन्स कंपनी व राज्य आरोग्य हमी सोसायटीतील आर्बिस्टेशन प्रकरणे सोडविण्याकरिता दोन्ही पक्षकारांच्या सदस्यांची समिती गठीत करण्यात आली आहे.

३.१.९.६	**रुग्णालयांनी दाव्यांच्या अतिरिक्त रक्कमेचा शासकीय लेख्यात भरणा न करणे** महाराष्ट्र कोषागार नियम १९६८ च्या खंड I च्या नियम ८(१) नुसार, शासकीय महसुलापोटी प्राप्त् झालेल्या रक्कमेचा, रक्कम प्राप्त झाल्याच्या तारखेपासून दोन दिवसांच्या आत शासकीय कोषागारात भरणा करावा. असे आढळून आले की, महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाने शासनाच्या अंगीकृत रुग्णालयांना लाभार्थ्यांच्या उपचारासाठी उपयोगी (कन्ज्युमेबल) वस्तू आणि मानधन यापोटी, विमा कंपनीकडून रुग्णालयाला प्राप्त् झालेल्या दाव्यांच्या रक्कमेच्या ५० टक्के रक्कमे पर्यंत खर्च करण्याची परवानगी दिली होती (जून २०१३) आणि उर्वरीत रक्कम शासकीय खात्यात जमा करण्याबाबत कुठलेही निर्देश दिले नव्हते. लेखापरिक्षेच्या तपासणीत असे आढळून आले की, नॅशनल इन्शुरन्स कंपनीने १,२९,८२८ प्रकरणांत ६० रुग्णालयांना रु.२४९.३९कोटींच्या दाव्यांची प्रतिपुर्ती केली होती, परंतू, उर्वरीत रक्कम ही संबंधित रुग्णालयांच्या बँक खात्यात जमा होती आणि ती शासकीय काषागारात जमा केलेली नव्हती. निवड केलेल्या १० जिल्हयातील १५ शासकीय अंगीकृत रुग्णालयांची चाचणी तपासणीत असे आढळून आले की, रु. ५९.५२ कोटींचा निधी पडून होता परिणामी शासकीय निधी अनधिकृतपणे राखून ठेवला गेला होता. शासनाने रुग्णालयांना अतिरिक्त दाव्यांची रक्कम शासकीय खात्यात जमा करण्यासाठी त्वरीत सूचना द्याव्यात. शासनाने सांगितले (नोव्हेंबर २०१७) की, रुग्णालयांनी अतिरिक्त दाव्यांची शासकीय लेख्यांमध्ये जमा करण्याविषयीचे मार्गदर्शन संस्थेने मागितले आहे, जे विचाराधीन आहे.	**सार्वजनिक आरोग्य विभागाकडील दि.४ जून २०१३ रोजीच्या शासन निर्णयानुसार**, शासकीय रुग्णालयांनी प्राप्त केलेल्या दाव्यांची रक्कम पुढील गोष्टींसाठी वापरली पाहिजे: १. औषधे २. डिस्पोजेबल आणि कंझ्युमेबल ३. रुग्णांसाठी परतीचे प्रवास भाडे ४. रुग्ण आहार ५. डेटा एंट्री ऑपरेटर आणि इतर कर्मचाऱ्यांना कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्याकरिता ६. इंटरनेट कनेक्टिव्हिटी. (संदर्भासाठी जीआर संलग्न आहे.) २८ जून २०१२ च्या परिपत्रकानुसार सर्व अंगीकृत रुग्णालयांना स्वतंत्र बँक खाते उघडण्याची सूचना दिली जाते. (संदर्भासाठी परिपत्रक जोडले.) रुग्णालयांना प्रदान करण्यात आलेल्या दाव्याच्या रकमेचा विनियोगाचे संनियंत्रण खालील खालील संबंधित प्राधिकरणांद्वारे केला जातो १. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय २. संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय ३. संचालक ,वैद्यकीय शिक्षण आणि प्रमुख रुग्णालये, **बृहन्मुंबई** महानगरपालिका शासकीय रुग्णालयांनी दाव्यांमधून प्राप्त निधी शासकीय खात्यात भरणा करण्याची पुर्तता करण्याकरिता उपरोक्त संबंधित प्राधिकरणांच्या कळविले आहे. (संदर्भासाठी प्रत संलग्न). SHAS ने लेखापरीक्षणातील या आक्षेपाचे पालन करण्यास तसेच उत्तर देण्यास सांगितले आहे.

३.१.९.७	**मत्ता कमी दाखविणे** भारताचे नियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांचेकडे सूचीबध्द असलेल्या सनदी लेखापरिक्षकांकडून संस्थेच्या वार्षिक लेख्यांची लेखापरिक्षा केली जाते. वित्तीय वर्ष २०१५-१६ पर्यंत संस्थेच्या लेख्यांची लेखापरिक्षा करण्यात आली होती. वित्तीय वर्ष २०१२-१३ ते २०१५-१६ या कालावधीच्या वार्षिक लेख्यांची छाननी करता असे आढळून आले की, विविध प्रसंगी संस्थेने विमा कंपनीच्या वतीने केलेले खर्च आणि विमा कंपनीला अतिरिक्त प्रदान केलेला रु.६१कोटींचा विमा हप्ता, विमा कंपनीकडून वसूल करावयाची रक्कम म्हणून दाखविला नव्हता. याच्या परिणामी, मत्ता त्या प्रमाणात कमी दर्शविल्या गेल्या होत्या. शासनाने सांगितले (नोव्हेंबर २०१७) की, विमा कंपनीकडून प्राप्त करावयाची रक्कम वर्ष २०१६-१७ च्या वार्षिक लेख्यांमध्ये लेख्यांच्या टिप्पणीच्या स्वरुपात दर्शविली जाईल.	विमा कंपनीकडून प्राप्त करावयाची रक्कम वर्ष २०१६-१७ च्या वार्षिक लेख्यामध्ये टिपणीच्या स्वरुपात दर्शविण्यात आले आहे.

३.१.१०	**संनियंत्रण आणि अंतर्गत नियंत्रण**	
३.१.१०.१	**नियामक परिषदेच्या बैठकांची कमतरता** सार्वजनिक आरोग्य विभागाच्या जुलै २०११ च्या शासन निर्णयानुसार आणि राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना नियम आणि विनियम, २०१० नुसार, योजना सुरळीत चालण्यासाठी, नियामक परिषदेची तीन महिन्यांतून एकदा बैठक घ्यावयाची होती. लेखापरीक्षा तपासणीत असे आढळून आले की, मार्च २०१७ पर्यंत नियामक परिषदांच्या २३ बैठकांऐवजी फक्त चार बैठका झाल्या होत्या ज्यामुळे योजनेच्या संनियंत्रण आणि व्यवस्थापनावर परिणाम होत होता. शासनाने सांगितले (नोव्हेंबर २०१७) की, काही आकस्मिक परिस्थिती आणि प्रशासकीय कारणांमुळे नियामक परिषदेच्या बैठका घेण्यात आल्या नव्हत्या. सामंजस्य करारातील टप्पा । च्या मुदतवाढ/विस्तार यासारख्या महत्वपूर्ण बाबी आणि निर्णयांसाठी नियामक परिषदेंच्या सदस्यांकडे नस्ती पाठवून निर्णय घेण्यात आला होता. नियामक परिषदेच्या बैठकीचे नियोजन करण्यासाठी पत्रव्यवहार सुरु आह	**सार्वजनिक आरोग्य विभागाकडील दि.१६ जूलै,२०१० रोजीच्या** शासन निर्णयानुसार, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेच्या अंमलबजावणीची देखरेख व सनियंत्रण करण्याकरिता मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली नियामक परिषद गठीत करण्यात आली होती. दि.१३ जूलै,२०११ रोजीचा शासन निर्णय व सोसायटीच्या मेमोरंडम ऑफ असोसिएशनमधील कलम क्र.९ (i) याप्रमाणे नियामक परिषदेची तिन महिन्यातून किमान एक बैठक घेणे अपेक्षित होते. त्यानुसार, खालीलप्रमाणे नियामक परिषदेच्या बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या. १) दि.२६ ऑगस्ट,२०११ २) दि.१९ जानेवारी,२०१२ ३) दि.१३ मे,२०१३ ४) दि.१६ नोव्हेंबर,२०१३ काही आकस्मिक परिस्थिती आणि प्रशासकीय कारणांमुळे नियामक परिषदेच्या बैठका घेण्यात आल्या नव्हत्या. तथापि काही महत्त्वपूर्ण विषय व निर्णय जसे की, पहिल्या टप्प्याच्या सांमजस्य करारनाम्यात सुधारणा आणि पहिल्या टप्प्यास मुदतवाढ या सारखया विषयांवर मा. नियामक परिषदेच्या सदस्यांकडे नस्ती परिक्रमीत करुन निर्णय घेण्यात आला. नियामक परिषदेच्या बैठका वेळीच घेण्यासाठी मा. मुख्यमंत्री सचिवालयाकडे पत्रव्यवहार करण्यात आला होता. दिनांक २१.०९.२०१८ च्या शासन निर्णयान्वये नियामक परिषदेची पुनर्रचना करून प्रधान मंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेकरिता मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली नियामक परिषद गठीत करण्यात आली आहे.

३.१.१०.२	**प्रलंबित तक्रारी**	

३.१.१०.२ प्रलंबित तक्रारी

सामंजस्य कराराच्या कलम ४३ नुसार, योजनेच्या लाभार्थ्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा स्तरावर जिल्हा तक्रार निवारण समिती आणि राज्य स्तरावर, संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांच्या अध्यक्षतेखाली राज्य तक्रार निवारण समिती गठीत करावयाची होती. शिवाय, विमा कंपनीच्या कार्यकारी संचालकाच्या पर्यवेक्षणाखाली, कार्पोरेट कार्यालय स्तरावर लाभार्थ्यांच्या तक्रार निवारणासाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करावयाचा होता.

लेखापरिक्षेला असे आढळून आले की, २०१२-१३ ते २०१६-१७ दरम्यान प्राप्त झालेल्या ११,०१९ तक्रारींपैकी ३१ मार्च २०१७ पर्यंत ९,४८१ तक्रारींचे निवारण झाले होते आणि १,५३८ तक्रारींचे निवारण झाले नव्हते.

लाभार्थ्यांच्या निवारण न झालेल्या तक्रारींबाबत असे दिसून आले की, १,३११ तक्रारी या योजने अंतर्गत निर्धारीत रुग्णालयाकडून वसूल केल्या जाणा-या रक्कमे विषयी होत्या, ज्यांची संख्या एकूण तक्रार निवारण न झालेल्या तक्रारींच्या ८५ टक्के होती. पुढे असे ही आढळून आले की, खाजगी रुग्णालयात वसूल केल्या जाणा-या रक्कमेविषयी तक्रारी ८२२ (६३ टक्के) होत्या, त्याच्या तुलनेत शासकीय रुग्णालयातील तक्रारी ४८९ (३७ टक्के) होत्या.

शासनाने सांगितले (नोव्हेंबर२०१७) की, योजनेखाली करण्यात आलेल्या रु.१२.५३ लाख् शस्त्रक्रिया/उपचारासंबंधी फक्त ११,०१९ तक्रारी करण्यात आल्या होत्या ज्यांचे प्रमाण एकूण शस्त्रक्रिया/उपचार यांच्या केवळ ०.८८ टक्के येते. ज्या रुग्णालयांमध्ये रुग्णांकडून शुल्क गोळा करण्याची पध्दत बंद करण्यात आलेली नाही त्यांना योजनेतून

१) **जिल्हा पातळीवर जिल्हाधिकारी आणि** राज्य **पातळीवर** अध्यक्ष म्हणून तक्रार निवारण समिती सोसायटीच्या मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील राज्य तक्रार निवारण समिती योजनेच्या लाभार्थ्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी गठीत केली गेली आहे.

२) जिल्हाधिकारी नियमितपणे सार्वजनिक आणि खाजगी दोन्हीं रुग्णालयांच्या वैठका घेऊन त्यांच्या कामगिरीची तसेच तक्रारींचे अवलोकन करतात.

३) अंगीकृत रुग्णालयांकडून उपचारादरम्यान रुग्णांकडून अतिरिक्त पैसे घेतल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्यास सोसायटी अशा रुग्णालयांवर कठोर कारवाई करते. तसेच अशा प्रकारच्या तक्रारींची पुनरावृत्ती होत असेल तर अशा रुग्णालयांना Show Cause Notice दिली जातेतसेच रुग्णालयांच्या तक्रारींचे निराकरण न झाल्यास . अशा रुग्णालयांना निलंबित केले गेले आहे.

४) तात्काळ कारवाईसाठी ५ पेक्षा जास्त प्रलंबित तक्रारी असलेल्या संबंधित नेटवर्क रुग्णालयांना Show Cause Notice जरी करण्यात आल्या आहेत.

दि.२.०७.२०१२ ते दि.०२.१२.२०१२ रोजीपर्यंत प्राप्त् तक्रारींचा तक्ता

	पैसे मागणे	इतर	एकूण	%
प्राप्त् तक्रारी	१३५३१	३००८	१६५३९	
निराकरण केलेल्या तक्रारी	११५६९	२७८३	१४३५२	८६%
प्रलंबित तक्रारी	१९६२	२२५	२१८७	१४%

	निलंबित/योजने अंतर्गत रुग्णालयांच्या यादीमधून वगळण्याची कठोर कारवाई करण्यात येत आहे. शासकीय रुग्णालयांमध्ये लाभार्थ्यांकडून स्वत: केल्या जाणा-या खर्चाशी संबंधित तक्रारींचे निवारण करण्यासाठी संस्था एक कार्यतंत्र/कार्यचौकट तयार करत आहे. या योजनेखाली रोख रक्कम रहीत उपचार देणे अभिप्रेत असल्यामुळे लाभार्थ्यांना स्वत:च्या पदरचा खर्च करावा लागल्यामुळे ब-याच रुग्णांना झालेल्या गैरसोईमुळे योजनेखालील रोख रक्कम रहीत सुविधा पुरविण्याचे उद्दीष्ट साध्य झाले नाही आणि म्हणून त्यावर त्वरीत उपाययोजना करण्याची गरज आहे.	

३.१.१०.३	**संस्थेचा वार्षिक अहवाल आणि उपविधि तयार न करणे** राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना संस्था नियम आणि विनियम, २०१० मध्ये अशी तरतूद आहे की,संस्थेने वार्षिक अहवाल मंजूर, स्विकृत आणि तयार करावे, नियम आणि विनियम आणि संस्थेचे कार्य याच्याशी अनुरुप उपविधी तयार करावेत आणि राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना संस्थेने सर्व लाभार्थ्यांसाठी ठरविलेला विमा हप्ता आणि संस्थेच्या कर्मचा-यांचा प्रशासकीय खर्च, कार्यालयीन खर्च, वेतन, भत्ते, मुलभूत सुविधांसाठी मदत, मोटर परिवहन, पेट्रोल, तेल आणि वंगण इत्यादी (कॉर्पस/संस्थेचा निधी) नुसार शासनाने वार्षिक अर्थसंकल्पात तरतूद करावी. नियामक परिषदेने मंजूरी दिल्यास संस्था अधिकृत दात्यांकडून देणगीही स्विकारु शकते. लेखापरीक्षा तपासणीत असे आढळून आले की, संस्थेने वार्षिक अहवाल आणि उपविधी तयार केले नव्हते. तसेच योजनेच्या संनियंत्रण आणि व्यवस्थापनासाठी जो कॉर्पस/राखीव निधी आवश्यक असतो त्याचीही संस्थेने तरतूद केली नव्हती. शासनाने सांगितले (नोव्हेंबर २०१७) की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली वार्षिक अहवाल आणि उपविधी अंतिम करण्याकरीता संस्थेच्या समित्या गठीत करण्यात आल्या होत्या आणि याविषयी कारवाई करण्यात येत आहे.	उपविधी व वार्षिक अहवाल अंतिम करण्याकरिता दि.२९ जुलै,२०१७ रोजी अंतर्गत समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. उपविधी व वार्षिक अहवालाचे प्रारुप समित्यांची व नियामक परिषदेच्या मान्यतेस्तव तयार ठेवण्यात आले आहे.

३.१.११	**निष्कर्ष आणि शिफारसी** राज्यात अंमलबजावणी झालेल्या राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेच्या विषयाधारित लेखापरिक्षेत असे आढळून आले की, शासन/संस्थेने, एकूण शिधापत्रिकाधारकांची नावे आणि शिधापत्रिका क्रमांक याविषयीचा कोणताही तपशिल प्राप्त न करता एकूण शिधापत्रिकाधारकांची आकडेवारी प्राप्त केली होती. त्यामुळे या योजनेखालील लाभार्थ्यांच्या माहीतीची अचूकता/अधिकृतता लेखापरिक्षेला पडताळता आली नाही. लाभार्थी निश्चित करण्यासाठी तसेच योजनेच्या लाभांविषयी लाभार्थ्यांना सजग करण्यासाठी योजनेखाली अभिप्रेत असलेल्या आरोग्य कार्डांचे लाभार्थ्यांना वितरण करण्यात आले नव्हते. आरोग्य कार्डांवर केलेल्या छपाईचा खर्चही वाया गेला होता. आत्महत्या प्रवण १४ जिल्हयांच्या श्वेत शिधापत्रिकाधारक शेतक-यांपुरताच विमा हप्ता मर्यादित ठेवण्याऐवजी,सर्वच श्वेत शिधापत्रिकाधारकांचा विमा हप्ता भरल्यामुळे विमा हप्ता विमा कंपनीला ज्यादा प्रदान केला गेला. योजने अंतर्गत निर्धारीत सर्व रुग्णालयांमध्ये पर्याप्त संख्येत आरोग्य मित्र नियुक्त केले नव्हते तसेच ग्रामीण/प्राथमिक आरोग्य केंद्रे/उपजिल्हा/महिला शासकीय रुग्णालयात आरोग्यमित्रांची नियुक्तीच न केल्यामुळे, लाभार्थी आणि त्यांच्या कुंटुंबियांचे मार्गदर्शन करएयावर आणि रुग्णांना संदर्भित करण्यावर/उपचाराच्या सुविधेवर प्रतिकूल परिणाम झाला होता. मानकांत विहीत केल्यापेक्षा प्रसिध्दीवर	

	कमी खर्च केल्यामुळे योजनेच्या लाभांविषयी जागरुकता निर्माण करण्यावर परिणाम झाला होता. योजनेच्या व्यापक प्रसिध्दीचा अभाव, आरोग्य शिबिरे घेण्यातील कमतरता आणि प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्यमित्रांची नियुक्ती न करणे या कारणांमुळे नोव्हेंबर २०१६ पर्यंत या योजनेच्या ९.३५ कोटी लाभार्थ्यांसाठी विमा कंपनीला प्रदान केलेल्या विमा हप्त्याच्या रु. ३,००९.३१ कोटीच्या तुलनेत, ११.८९ लाख इतके अत्यल्प दावे समायोजनासाठी प्राप्त झाले होते. अशाप्रकारे, विमा कंपनीला प्रदान केलेल्या विमा हप्त्याच्या खर्चाच्या तुलनेत खूपच कमी प्रमाणात योजनेचे फायदे प्राप्त झाले होते. याशिवाय, अपात्र लाभार्थ्यांसाठी विमा कंपनीला अदा करण्यात आलेली रु. १.४३ कोटी इतकी रक्कम विमा कंपनीने परत केली नव्हती. विमा कंपनीकडे रु. ४७.६३ कोटी इतक्या मोठया प्रमाणात अतिरिक्त विमा हप्ता शिल्लक होता जो शासनाला देय होता. विमा कंपनीकडे पडून असलेल्या अतिरिक्त विमा हप्त्याच्या १० टक्के रक्कमेचे अतिरिक्त समायोजन केल्यामुळे विमा कंपनीला रु. ८.७५ कोटींचा दुहेरी लाभ झाला. योजने अंतर्गत निर्धारीत रुग्णालयांकडे प्राप्त झालेल्या दाव्याचा अतिरिक्त निधी रुग्णालयांकडे पडून होता कारण सदर निधी सरकारी खात्यात जमा केला जात असल्याची सुनिश्चिती संस्थेने केली नव्हती.	

शिफारस	शासनाचे अभिप्राय
नाव आणि रेशन कार्ड क्रमांकानुसार अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाकडून लाभार्थ्यांची माहिती प्राप्त करून लाभार्थ्यांचा संपूर्ण डेटाबेस तयार करणे.	अन्न व नागरी पुरवठा विभागाद्वारे रेशन कार्ड डेटाचे डिजिटायझेशन केले जात आहे. याबाबत सार्वजनिक आरोग्य विभागाकडून अन्न व नागरी पुरवठा विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. जेणेकरून विमा कंपनीस लाभार्थ्यांच्या एकूण संख्येनुसार विमाहप्ता न देता पात्र लाभार्थींच्या यादीनुसार प्रीमियम दिला जाऊ शकेल.
विमा कंपनीस लाभार्थ्यांच्या एकूण संख्येनुसार विमाहप्ता न देता पात्र लाभार्थींच्या यादीनुसार प्रीमियम दिला जाऊ शकेल.	
लाभार्थी सरकारी / अर्ध-सरकारी नोकर आणि आयकरदार आहेत का याकरिता अर्जदारांकडून घोषणापत्र मिळविण्यासाठी तरतूद केली जाईल आणि योजने अंतर्गत लाभार्थींना समाविष्ट करण्यापूर्वी सोसायटी हे तपासेल.	विमा कंपनीशी झालेल्या करारानुसार योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांची ओळख पटविण्याकरिता शिधापत्रिका आणि वैध ओळखपत्र ग्राह्य धरले जाते.
सोसायटी अशा अयोग्य लाभार्थ्यांना सर्व नोंदींद्वारे काढून टाकू शकते आणि संबंधित रुग्णालयांना सूचित करू शकते	दरमहा पात्र लाभार्थींची संख्या प्रत्येक जिल्ह्याचे जिल्हा पुरवठा अधिकारी यांचे कार्यालयाकडून प्राप्त करून घेतली जाते आणि त्या आकडेवारीनुसार तिमाही विमाहप्ता विमा कंपनीला दिला जातो.
योजनेचा लाभ घेण्यासाठी सर्व पात्र लाभार्थींना आरोग्य पत्र दिले जावे	आता आयुष्मान भारत – प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना अशी एकीकृत योजना सुरू करण्यात आली आहे. एमओयू नुसार योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांची ओळख पटविण्याकरिता शिधापत्रिका आणि वैध ओळखपत्र ग्राह्य धरले जाते.
पॉलीसी नूतनीकरणाच्या आधी १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांतील शुभ्र शेतकरी ओळखले जाऊ शकतात.	अन्न व नागरी पुरवठा विभागाकडे पाठपुरावा केला जात आहे.

(ता. मा. कोळेकर)
सहसचिव, महाराष्ट्र शासन

साक्ष :

परिच्छेद क्रमांक ३.१ राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना :

२.१ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक २४ जानेवारी व दिनांक ५ फेब्रुवारी, २०१९ रोजी सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव व विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली.

परिच्छेद क्रमांक ३.१.७ योजनेचे व्यवस्थापन :

साक्षीच्यावेळी राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेच्या व्यवस्थापनाबाबत माहिती देताना विभागाने असे सांगितले की, विमा कंपनीला ९ कोटी ३५ लक्ष लाभार्थ्यांच्या विमा हप्त्यापोटी ३००९. ३१ कोटी रुपये प्रदान केले आहेत. सदरहू ९ कोटी ३५ लक्ष लाभार्थी हे एका वर्षातील आहेत की, मागील पाच वर्षातील आहेत अशी विचारणा समितीने केली असता, दरवर्षी २ कोटी २२ लक्षच्या दरम्यान लाभार्थी असतात. तेव्हापासूनचे ते लाभार्थी आहेत. ते लाभार्थी युनिक बेनिफशरीज नाहीत. मागील लाभार्थीच पुढे पुन्हा नोंदविले जात असतात असे विभागीय सचिवांनी सांगितले.

याचा अर्थ मागील पाच वर्षांत योजनेखालील ९. ३५ लक्ष लाभार्थी आहेत असे मत समितीने व्यक्त केले असता, असे म्हणणे योग्य नाही. दरवर्षी २ कोटी २२ लक्ष कुटुंबांना या योजनेंतर्गत लाभ मिळतो. यासाठीचा योजना कालावधी (Policy period) हा एक वर्षाचा आहे. त्यामुळे सन २०११ पासूनची गोळा बेरीज करणे योग्य होणार नाही. दरवर्षी बेरीज करणे योग्य नाही असे विभागाचे मत आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

९ कोटी लाभार्थी ही एकूण पाच वर्षाची बेरीज आहे. यामध्ये ३ हजार ९ कोटी रुपये विमा कंपनीला देण्यात आलेले आहेत. परंतु यामध्ये लाभार्थ्यांची संख्या केवळ ११ लक्ष ८९ हजार आहे असे समितीने निदर्शनास आणले तसेच एकूण पाच वर्षांमध्ये ३ हजार कोटी रुपयांचा जो प्रिमियम देण्यात आला त्यामधून किती लाभार्थी आले आहेत? अशी विचारणा महालेखाकार यांनी समितीच्या माध्यमातून केली असता, ही योजना दिनांक २ जुलै, २०१२ पासून सुरू करण्यात आली. सुरूवातीला ही योजना आठ जिल्ह्यांमध्ये लागू केली होती. त्यानंतर दिनांक २१ नोव्हेंबर २०१३ पासून ही योजना सर्व जिल्ह्यांमध्ये लागू केली. ९७१ उपचार (Procedure) जवळपास ४८० स्पेशॅलिटी हॉस्पिटल्स या योजनेमध्ये अंतर्भूत करण्यात आलेले आहेत. आतापर्यंत त्या विमा कंपनीला शासनाकडून किती रुपये देण्यात आलेले आहेत, असा या निमित्ताने प्रश्न उपस्थित झाला आहे. डिसेंबर, २०१८ पर्यंत जवळपास ५ हजार ६० कोटी रुपये विमा कंपनीला देण्यात आलेले आहेत. सद्यःस्थितीमध्ये ४ हजार ३८० कोटी रुपयांचा क्लेम कंपनीने सेटल केलेला आहे. ही आकडेवारी डायनॅमिक आहे. कारण जरी पॉलिसी पिरिअड किंवा एखाद्या क्वॉर्टरचा कालावधी समाप्त झाला तरीही या क्वॉर्टरच्या दरम्यान जे प्री ऑथरायझेशन देण्यात आलेले आहेत त्यांना ३० दिवसांच्या आत सर्जिकल प्रोसेस करण्याची मूभा आहे. दुसरा एक मुद्दा असा आहे की, यामध्ये एक आयसीआर ची संकल्पना असते. त्यामध्ये किती क्लेम सेटल करण्यात आले किती क्लेम पेंडींग आहेत, भागिले शासनाने किती प्रिमियम भरणा केला आहे. सुरुवातीला ज्यावेळी ही योजना सुरू केली त्यावेळी लोकांमध्ये या योजनेची जागृती कमी प्रमाणात होती. त्यामुळे तो निधी रिफंड मिळालेला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

रिफंड कशामुळे मिळालेला आहे? अशी विचारणा समितीने केली असता, शासनाच्या एम. ओ. यु. मध्ये दोन क्लॉज आहेत. क्लेम देण्यात आलेल्या प्रिमियमपेक्षा ८० टक्क्यांपेक्षा कमी असतील तर राहिलेल्या रकमेच्या ९० टक्के रक्कम विमा कंपनी शासनाला पैसे परत करीत असते. जर तो प्रिमियम ११० टक्क्यांपेक्षा अधिक झाला असेल तर त्याच्या ५० टक्के शासन अतिरिक्त प्रिमियम देणार. मध्यंतरी आय. सी. आर. रेशिओ १३० ते १४० च्या दरम्यान गेला होता असे विभागीय सचिवांनी सांगितले.

११० टक्क्यांपर्यंत कंपनी त्याच प्रिमियमने कव्हर करेल असे मत समितीने व्यक्त केले असता, होय. तसेच दिलेल्या प्रिमियमपेक्षा अधिक क्लेम झाले तर जी अधिकची रक्कम आहे, त्याच्या ५० टक्के पेमेंट शासन अधिकचे देणार असे विभागीय सचिवांनी सांगितले.

अशा प्रकारे अधिकचे पेमेंट आतापर्यंत करण्यात आले आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, होय. परंतु तशा प्रकारचे पैसे दिलेले नाहीत. प्रिमियम हा सेंट्रली देण्यात येत असतो. ही योजना पोर्टेबल आहे. जसे की, गडचिरोलीचा एखादा लाभार्थी हा मुंबईमध्ये येऊनही उपचार घेऊ शकतो. पूर्ण राज्याचे पैसे सिंगल पॉईंटवरून देण्यात येत असतात. जेणेकरून लाभार्थी राज्यातील कोणत्याही ठिकाणाहून उपचार किंवा लाभ घेऊ शकतात. पहिल्या वर्षी हे क्लेम कमी होते. महालेखापाल कार्यालयाने यामध्ये असे मुद्दे मांडलेले आहेत की, त्यामध्ये आरोग्यमित्र कमी प्रमाणात होते, त्याची पेनल्टी लावण्यात आली. त्यामुळे कंपनीकडे काही दावे करण्यात आलेले आहेत. शासनाने यासाठी एक समिती स्थापन केली आहे. समितीचे त्या दाव्यासाठी निराकरण झाले तर ठीक होईल, अन्यथा विभागाला लवादाकडे (arbitration) प्रकरण पाठवावे लागेल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ही विमा कंपनी केंद्र शासनाची स्वतःची पब्लिक सेक्टर इंटरप्राईज कंपनी आहे. सन २०१७ पर्यंतचे दावे आणि प्रिमियमचा विचार केला तर सन २०१७ पर्यंत शासनाने कंपनीला जो प्रिमियम दिला आहे त्याच्या ९७ टक्के रक्कम कंपनीने हॉस्पिटल्सना परत केलेले आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

विभागाने समितीसमोर अशी माहिती दिली की, ५,२०० कोटी रुपयांमध्ये ४ हजार ३०० कोटी रुपयांचा क्लेम करण्यात आलेला आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, विभागाचे सचिवांनी त्यास सहमती दर्शविली व सुरूवातीला योजनेचा ३३३ रुपये प्रति कुटुंब प्रति वर्ष अशा प्रकारचा प्रिमियम होता. जुलै, २०१२ पासून ही योजना सुरू करण्यात आली होती. त्या योजनेचा कालावधी नोव्हेंबर, २०१६ मध्ये समाप्त झाला होता. त्यानंतर सप्टेंबर, २०१६ मध्ये टेंडर कोट करण्यात आले होते. परंतु त्या टेंडरमध्ये १,५०० रुपयांपेक्षा अधिकचे दर प्राप्त झाले होते. कारण त्या योजनेमध्ये काही नवीन हॉस्पिटल्स समाविष्ट करावयाचे होते, काही नवीन प्रोसिजर अंतर्भूत करावयाच्या होत्या, काही अटी बदलावयाच्या होत्या. त्यामुळे अधिकचा

प्रिमियम प्राप्त झाला होता. त्यामुळे मागील कंपनीसोबतच वाटाघाटी करून ५०१ रुपयांचा प्रिमियम ठरविण्यात आला. ज्यावेळी प्रिमियम वाढतो त्यावेळी आय. सी. आर. कमी प्रमाणात येत असतो. दिनांक १ ऑक्टोबर २०१७ पासून प्रिमियममध्ये वाढ करून तो ५४० रुपये करण्यात आला. कारण आय. सी. आर. दर हा १३० रुपयांपर्यंत जात होता. आय. सी. आर. म्हणजे इन्शुरन्स क्लेम रेशियो. त्यामध्ये किती क्लेम आहेत, किती क्लेम सेटल करण्यात आलेले आहेत, किती क्लेम पेंडिंग आहेत याची माहिती असते. सन २०१७ पर्यंत ९७ टक्के स्टेटमेंट बरोबर आहेत. सन २०१८ मध्ये त्यामध्ये रु. ६९० पर्यंत वाढ करण्यात आली. कारण विमा कंपनीने आयसीआर अधिक असल्याने तो ९७ टक्क्यांपर्यंत येतो त्यामुळे नुकसान होते. त्यामुळे रु. ५४० वरून रु. ६९० करण्यात आले. सन २०१७ मध्ये विमा प्रकरणी दुसऱ्या वेळी निविदा काढण्यात आली होती त्यावेळी दर रु. १, ८०० पर्यंत गेल्याने यश मिळू शकले नाही. मध्यंतरीच्या काळात मागील २-३ वर्षांपासून केंद्र शासनाकडून सांगण्यात येत होते की, नॅशनल हेल्थ प्रोटेक्शन स्कीम सुरू करण्यात येणार आहे. आयुष्यमान भारत योजनेचा लाभ केंद्र शासनाने दिला असून आता योजना सुरू झाली आहे. केंद्र व राज्य शासनाची योजना एकत्रित करावयाच्या असल्याने केंद्र शासनाशी व कंपनीशी वाटाघाटी करून विम्याचा दर रु. ५४० वरून रु. ६९० इतका वाढविण्यात आल्याने विम्याचा हप्ता वाढला त्यामुळे आयसीआर खाली आला. आज रोजी ५, ०६० कोटी रुपये विम्या पोटी अदा करण्यात आले व ४, ३८० कोटी रुपयांच्या दाव्यांची प्रतिपूर्ती झाली आहे. यासंदर्भात २०१७ पर्यंतचे स्टेटमेंट बरोबर आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

आयुष्यमान भारत योजनेमध्ये काही बचत आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, आयुष्यमान भारत योजना सुरू करण्याबाबत मंत्रिमंडळाने निर्णय घेतला असून उक्त योजना राज्यात सुरू करण्यात आली आहे. उक्त योजनेच्या माध्यमातून निश्चितपणे बचत होणार आहे. केंद्र शासनाने ठरवून दिल्यानुसार एसईसीसी डाटानुसार ८३ लक्ष लाभार्थी आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

उक्त योजनेचे लाभार्थी कोण असणार आहेत? अशी विचारणा समितीने केली असता, केंद्र शासनाने सोशल इकॉनॉमिक कास्ट सेन्सेक्सच्या सर्वेचा सन २०१२-१३ साली अभ्यास करून निकष ठरविलेले आहेत. उक्त निकष ग्रामीण व शहरी भागासाठी वेगवेगळे आहेत. ग्रामीण भागामधील अनुसूचित जाती व जमातीची कुटुंबे, प्रौढ पुरुष नसलेले कुटुंब प्रमुख, स्त्री कुटुंब प्रमुख, भूमिहीन मजूर अशा बऱ्याच लाभार्थींचा समावेश योजनेत करण्यात आला आहे. शहरी भागामध्ये पदपथावर राहणारे, कचरा जमा करणारे असे बरेच लाभार्थी असून त्यांचे निकष केंद्र शासनाने ठरवून दिलेले असून त्यांची यादी देण्यात आली आहे व त्यामध्ये बदल करण्याचा अधिकार राज्य शासनाला नाही. उक्त यादीनुसार एसईसीसी डाटाप्रमाणे आयुष्यमान भारत योजनेचे ८३ लाख कुटुंब लाभार्थी आहेत. राज्य शासनाच्या योजनेच्या माध्यमातून २. २२ कोटी कुटुंबांना लाभ देण्यात येत होता. केंद्र शासनाची योजना ८३ लाख कुटुंबांसाठी आहे. केंद्र शासनापेक्षा राज्य शासनाच्या योजनेचे लाभार्थी तीन पट अधिक आहेत. केंद्र शासनाच्या यादीतील निकषामध्ये बसणाऱ्या लाभार्थी कुटुंबांकरिता ६० टक्के निधी केंद्र शासन देणार आहे. आता उक्त विम्याचा प्रिमिअम ६९० रुपये इतका आहे. राज्य शासनाची योजना केंद्र शासनापेक्षा मोठी असल्याने ती ग्राह्य धरण्याची बाब केंद्र शासनाने मान्य केली आहे. राज्य शासनाच्या योजनेमध्ये केंद्र शासनाच्या योजनेतील कुटुंबांचा समावेश आहे. ६९०X ८३ लाख याच्या ६० टक्के रक्कम केंद्र शासन राज्य शासनाला देणार आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

राज्य शासनाची आरोग्य विमा मर्यादा १. ५ लक्ष रुपये आहे व केंद्र शासनाची आरोग्य विमा मर्यादा ५ लाख रुपये आहे. असे समितीने निदर्शनास आणले असता, एक बाब निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, विमा संरक्षण रक्कम अधिक असली व आरोग्य विमा मर्यादा १. ५ लक्ष रुपये असली तरी विमा दाव्याची सरासरी २६ हजार रुपये आहे. हा मागील ५-६ वर्षांतील अनुभव आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

२६ हजार रुपये हे एका लाभार्थीसाठीचे आहेत का? अशी विचारणा समितीने केली असता, आरोग्य विमा योजनेचा लाभ किती कुटुंबांनी घेतला, त्यांना किती आरोग्य विमा रक्कम अदा केली यांचा भागाकार करून काढलेली सरासरीची २६ हजार रुपये रक्कम आहे. विमा दावा २६ हजार रुपयांपेक्षा अधिक नाही. २१.८० लाख विमा दाव्यांची प्रक्रिया झाली असून त्यापैकी ९२ टक्के विमा दावे १ लाख रुपयांपेक्षा कमी होते व ८ टक्के दावे १ ते १.५ लाख रुपयांचे होते. तसेच केवळ ०.१ टक्के दावे १.५ लाख रुपयांपेक्षा अधिकचे होते. विमा संरक्षण रक्कम १. ५ लाख रुपये असली तरी त्यापेक्षा अधिक विमा दाव्याची मागणी प्राप्त होत नाही. केंद्र शासनाच्या विमा संरक्षण योजनेची मर्यादा ५ लक्ष रुपये असली तरी विभागाला खात्री आहे की, १. ५ लक्ष रुपयांपेक्षा जास्त विमा दाव्याची मागणी येणार नाही. ५ लाखांच्या मर्यादेत विमा दावा देण्याची परिस्थिती निर्माण झाली तर त्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे की, १.५ लक्ष रुपये व ५ लक्ष रुपये मधील फरकाची रक्कम राज्य शासनाकडून लाभार्थीस अदा करण्यात येईल. विमा कंपनीमार्फत १.५ लक्ष रुपये रक्कम लाभार्थीस अदा करण्यात येईल व त्यापेक्षा अधिक रक्कम ५ लाख रुपयांच्या मर्यादेत शासनाकडून अदा करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

२.२० कोटी विमा लाभार्थींच्या बाबतीत हा निर्णय आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, आयुष्यमान भारत योजनेच्या लाभार्थींसाठी उक्त निर्णय घेतला आहे. केंद्र शासनाच्या विमा योजनेची मर्यादा ५ लक्ष रुपये असून राज्य शासन १.५ लक्ष रुपये विमा संरक्षण देत आहे. राज्य शासनाचे मत आहे की, १.५ लक्ष रुपयांपेक्षा अधिक विम्याची मागणी कोणी करणार नाही जर ०.१ टक्का जरी मागणी आली तरी ५ लाखांच्या मर्यादेतील फरकाची रक्कम राज्य शासनाकडून अदा करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

किडनीच्या काही आजारांवरील उपचार १.५ लाख रुपये रक्कमेत होऊ शकत नाही असे समितीने निदर्शनास आणले असता, किडनीवरील उपचारासाठी २.५ लाख रुपये विमा संरक्षण आहे. इतर आजारांसाठी १.५ लाख रुपये विमा संरक्षण देण्यात येते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

राज्य शासनाने १.५ लाख रुपये विमा संरक्षण मंजूर करण्याचे कारण अधिक मोठया रकमेचे आरोग्य विमा संरक्षण घेतल्यास त्यासाठी विम्याचा हप्ता खूप मोठा येतो. ५ लाख रुपयांच्या विमा संरक्षणासाठी १. ५ लाख रुपयांपेक्षा दुप्पट विमा हप्ता अदा करावा लागतो. विभागाने केलेल्या सर्वेनुसार केवळ १ टक्के लोकांना १. ५ लाख रुपयांपेक्षा अधिक विमा संरक्षणाची आवश्यकता असते. उक्त विमा संरक्षण ५ लाख रुपये इतके ठेवले असते तर सुमारे ५०० ते ६०० कोटी रुपये अधिक विमा हप्ता भरावा लागला असता. आपण १. ५ लाख रुपये विमा संरक्षण मर्यादा निश्चित केल्यामुळे विम्यापोटी २० ते ३० कोटी रुपये हप्ता अदा करावा लागतो. त्यामुळे उक्त प्रकरणी आवश्यक विमा संरक्षण रकमेचा निर्णय घेण्यात आला आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

कोणती विमा योजना राबविण्यात येत आहे? अशी विचारणा समितीने केली असता, राज्य शासनाची व केंद्र शासनाची आरोग्य विमा योजना या दोन्ही योजना राबविण्यात येत आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

आपल्या राज्यात एकच योजना राबविण्यात येत आहे, अशी माहिती सचिव महोदयांनी दिली आहे. आयुष्यमान भारत योजनेकरिता केंद्र शासनाकडून ८० लाख लाभार्थींसाठी ६० टक्के रक्कम अदा करण्यात येत आहे. राज्य शासनाच्या विमा हप्त्यामध्ये उक्त निधीतून मदत झाली आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता, केंद्रशासनाच्या योजनेत अधिक उपचारांचा (Procedure) समावेश आहे. राज्य शासनाच्या योजनेत ९७१ उपचारांचा व केंद्र शासनाच्या योजनेत १, ३४९ उपचारांचा समावेश आहे. केंद्र शासनाने सांगितले की, राज्य शासन केंद्र शासनाच्या योजनेतील काही उपचार (Procedure) वगळू शकते. त्यामुळे राज्य शासनाने केंद्र शासनाच्या योजनेतील काही कॉस्मेटीक प्रोसिजर, डायरियाच्या ५-६ किरकोळ प्रोसिजर, सिझेरियन, नॉर्मल डिलिव्हरी, कॅटरॅक्ट या प्रोसिजर वगळल्या आहेत. सदरहू उपचार वगळून त्याची यादी तयार करून केंद्र शासनास सादर करण्यात आली आहे. ३४३ प्रोसिजर राज्य शासनाच्या प्रोसिजर पेक्षा वेगळ्या असून त्याचा लाभ लाभार्थींना देण्यात येत आहे. राज्यातील सर्व लाभार्थींसाठी ९७१ उपचारांचा व केंद्र शासनाच्या लाभार्थींसाठी आणखी ३४९ उपचारांचा लाभ देण्यात येतो. ३३९ उपचारांसाठी विमा कंपनीसोबत राज्य शासनाने सामंजस्य करार केलेला नसल्याने सदरहू विमा दावे राज्य शासनाकडून देण्यात येतील असे विभागीय सचिवांनी सांगितले.

९७१ व ३३९ अशा एकूण १,३१० उपचारांसाठी आयुष्यमान भारत योजनेच्या लाभार्थींना विमा संरक्षण देण्यात येणार आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता, ९७१ उपचारांसाठी विमा कंपनी विमा रक्कम अदा करणार व ३३९ उपचारांसाठी राज्य शासनाकडून विमा संरक्षण रक्कम अदा करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले. सदरहू उपचारांचे दर रुग्णालयांना ठरवून देण्यात आले आहेत काय ? अशी विचारणा समितीने केली असता, सदरील दर ठरवून देण्यात आले आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

परिच्छेद क्रमांक ३.१.७.१ लाभार्थ्यांना आरोग्य कार्डांचे वितरण :

मुंबईमध्ये ४२१५१९३ आरोग्य कार्ड तयार करण्यात आले होते त्यापैकी १८.५१ लक्ष आरोग्य कार्डांचे वाटप करण्यात आले नाही. तसेच ८ जिल्ह्यातील आरोग्यकार्डापैकी २३६३८८० म्हणजे ४४ टक्के आरोग्य कार्डांचे वाटप केले. आरोग्य कार्डांचे वितरण का करण्यात आले नाही, याचे कारण विभागाने लेखी उत्तरात नमूद केले आहे. परंतु सद्यःस्थिती काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, सद्यःस्थिती तशीच आहे. कारण मध्यंतरी शासनाने आरोग्य कार्ड वाटप न करण्याकरिता एक स्थगिती दिलेली आहे. सदरहू योजना माहे जुलै, २०१२ पासून सुरू झाली असली तरी त्याची तयारी एक वर्ष अगोदरपासून करण्यात येत होती. काही राज्यांनी आरोग्य कार्ड घरोघरी जाऊन अथवा इतर ठिकाणच्या डाटाच्या सहाय्याने तयार केले. महाराष्ट्र राज्याने आंध्र प्रदेशची आरोग्य योजना बेस म्हणून ग्राह्य धरली होती. उक्त राज्यामध्ये आरोग्य योजनेंतर्गत आरोग्य कार्ड वाटप करण्यात येत होते. आपल्या राज्यात योजनेचा टप्पा-१ सुरू झाल्यानंतर योजनेचे आरोग्य कार्ड देण्यास सुरूवात करावी, असा शासनाने विचार केला. त्यावेळी घरोघरी जाऊन माहिती जमा करण्याचा शासनाचा उद्देश नव्हता म्हणून अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून डाटा मागविण्यात आला. दरम्यानच्या काळामध्ये सन २००९-१० मध्ये अन्न व नागरी पुरवठा विभागाने एक योजना हाती घेतली होती. त्यावेळी त्यांनी प्रत्येक शिधापत्रिकाधारकाकडून बी-१ फॉर्म भरुन घेतला होता. शासनाने निर्णय घेतला की, बी-१ फॉर्म स्कॅन करून त्याची प्रिंट काढून ती प्रत्येक शिधा वाटप दुकानदार यांना वाटप करून त्यावर शिधापत्रिकाधारकाकडून त्याच्या कुटुंबाचा एकत्रित फोटो घेऊन तो त्या प्रिंटवर चिकटवून त्याची काऊंटर फाईल परत करण्यात येणार होती. त्याबाबत माहे फेब्रुवारी, २०१२ मध्ये शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता व दोन संस्था नियुक्त करून उक्त कामाचे दर त्यांना ठरवून देण्यात आले होते. त्यानुसार त्या संस्थांनी काम सुरू केले होते. ज्यावेळी सदरहू काम सुरू झाले त्यावेळी लक्षात आले की, शिधावाटप दुकानदार यांनी सदरहू प्रकरणी बहिष्कार टाकला त्यामुळे अंगणवाडी सेविका यांची मदत घेण्यात आली. त्यानंतर माननीय उच्च न्यायालयाने आदेश पारित केले की, शिधा वाटप दुकानामध्ये अंगणवाडी सेविका बसू शकत नाही. त्यामुळे काही स्वयंसेवी संस्थांची मदत घेण्याचा प्रयत्न करण्यात आला होता परंतु तो निष्फळ ठरला. दरम्यानच्या काळात शासनाने ठरविले की, योजनेचा फायदा लोकांना मिळाला पाहिजे. त्यामुळे आरोग्य योजनेच्या लाभासाठी रेशनकार्डच्या अनुज्ञेयता ठरविण्यात येऊन निवडणूक आयोगाने ठरविलेल्या पासपोर्ट, बँक पास बुक, किसान कार्ड अशा १४ कागदपत्रांच्या यादीनुसार ओळख पटविण्याचा पुरावा ग्राह्य धरण्यात आला. आता आरोग्य कार्डचा विषय थांबलेला आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

प्रती कार्ड ६९० रुपये रक्कम देण्यात येते. आरोग्य योजनेचे लाभार्थींची संख्या कशी ठरविण्यात येते ? योजनेचा विमा हप्ता तिमाही आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, जिल्हा पुरवठा अधिकारी यांचेकडून अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या माध्यमातून तिमाही माहिती घेण्यात येते. योजनेचा विमा हप्ता तिमाही आहे. त्यांना वर्षासाठी एक निश्चित संख्या गृहीत धरुन विमा हप्ता अदा करण्यात येतो. विमा कंपनीची मागणी आहे की, जिल्हा पुरवठा अधिकारी तिमाही माहिती देताना त्यामध्ये लाभार्थींची संख्या थोडी फार कमी किंवा अधिक करतात त्यानुसार विमा हप्त्याची रक्कम देण्यात यावी. याप्रकरणी विमा कंपनीला सांगण्यात आले आहे की, उक्त प्रकरणी अंतिम सेटलमेंटच्या वेळी विचार करण्यात येईल. सुरूवातीला जी

संख्या आहे त्यानुसार विमा हप्त्याची रक्कम अदा करण्यात येते. मध्यंतरीच्या काळामध्ये लाभार्थी संख्येत काही अधिक बदल झाला तर त्यावर विचार करण्यात येतो. मागील २-३ वर्षापासून नॅशनल फुड सिक्योरिटी ॲक्ट लागू झाला आहे. अन्न व नागरी पुरवठा विभागाने एक मोठी मोहीम हाती घेतलेली आहे. नॅशनल फुड सिक्योरिटी ॲक्टनुसार लाभार्थी यांची आधार सिडींग केली असून त्यांनी २ कॅटॅगिरीचे कार्ड तयार केले आहेत. अंत्योदय, अन्नपूर्णा कार्ड म्हणजे एएवाय व प्राधान्य कुटुंब म्हणजे पीएचएच कार्ड व तिसरी कॅटॅगिरी एपीएल आहे. त्यांनी सांगितले आहे की, डाटा तयार झाला असून आय. टी. ॲक्ट व आधार ॲक्टचे उल्लंघन होणार नाही. त्यासंदर्भात नवीन निविदा काढताना त्यांची मदत घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल. आतापर्यंत जिल्हा पुरवठा अधिकारी यांचेकडून लाभार्थींची संख्या घेण्यात येत होती व विम्याचा हप्ता अदा करण्यात येत होता असे विभागीय सचिवांनी सांगितले.

आरोग्य योजनेचा लाभ लाभार्थींना मिळत नाही, असे होते का? असे मत समितीने व्यक्त केले असता, एनआयसी कंपनीचे म्हणणे आहे की अनेक आरोग्य कार्ड बनावट आहेत. आधार सिडींग झाल्यानंतर काही आरोग्य कार्ड रद्द करण्यात आले, याची आपणास माहिती आहे. एखाद्याचे रेशनकार्ड फाटलेले असेल, त्याचे एखादे पृष्ठ नसेल तर त्याऐवजी कोणते कागदपत्रे देण्यात यावी याबाबतचा प्रोटोकॉल ठरवून देण्यात आला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

आधार कार्ड तयार करणे खूप सोपे झाले आहे. सदरहू योजना आधार कार्डला लिंक केली तर अवघड होईल. असे मत समितीने व्यक्त केले असता, आधार कार्ड लिंक करण्यात येत नाही परंतु कुटुंब प्रमुख यांस आधार कार्डच्या आधारे आयडेंटीफाय करू शकतो. The Scheme is family floater basis. It is not individual basis. योजना आधार कार्डशी लिंक करण्यासाठी कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीच्या आधार कार्डची आवश्यकता लागते. सुरूवातीला केंद्र शासनाने याबाबत सांगितले होते. परंतु मध्यंतरी आधार कार्ड घेऊ नये याबाबत माननीय सर्वोच्च न्यायालयाने एक निर्णय दिला आहे. केंद्र शासनाच्या आरोग्य विमा योजनेच्या लाभार्थींचे आधार कार्ड जमा करण्यात आले होते. माहे जून, २०१८ दरम्यान केंद्र शासनाने सांगितले होते की, ८३ लाख लाभार्थी कुटुंबाचे मोबाईल क्रमांक व आधार कार्डची माहिती घरोघरी जाऊन घ्यावी. त्याकरिता अशा कार्यकर्ता यांना माहिती जमा करण्यास सांगण्यात आले होते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

आरोग्य विमा कार्ड प्रत्येकाला वैयक्तिक देण्यात येते का? अशी विचारणा समितीने केली असता, आरोग्य विमा कार्डचा विषय महालेखाकार यांनी कुटुंबाच्या बाबतीत मांडला होता, तो वैयक्तिक कार्डचा नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

आता काही आरोग्य कार्ड वैयक्तिक वाटप करण्यात आले आहेत. असे समितीने निदर्शनास आणले असता, सदरहू आरोग्य कार्ड आयुष्यमान भारत योजनेचे कार्ड आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

ज्यांना आयुष्यमान भारत योजनेचे आरोग्य कार्ड प्राप्त झाले आहेत त्यांना राज्य शासनाच्या आरोग्य विमा योजनेचा फायदा घेता येणार नाही का? अशी विचारणा समितीने केली असता, त्यांना राज्य शासनाच्या आरोग्य विमा योजनेची आवश्यकता नाही कारण केंद्र शासनाच्या आरोग्य विमा योजनेतील उपचारांची संख्या अधिक, रक्कम देखील अधिक आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

त्यांचा विमा हप्ता कोण भरणार आहे? अशी विचारणा समितीने केली असता, केंद्र शासन ६० टक्के व राज्य शासन ४० टक्के विमा रक्कम अदा करणार आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

आयुष्यमान भारत योजनेची अंमलबजावणी तेच रुग्णालय करणार आहेत जे राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेची अंमलबजावणी करतात, हे बरोबर आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, उक्त दोन्ही योजनेची अंमलबजावणी तेच रुग्णालय सद्यःस्थितीत करीत आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. त्यांची वेगळी यंत्रणा आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, त्यांची वेगळी यंत्रणा नाही असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

परिच्छेद क्रमांक ३.१.७.२ आत्महत्याप्रवण जिल्ह्याच्या लाभार्थी शेतकऱ्यांची नेमकी संख्या ठरविण्यासाठीचे सर्वेक्षण :

शुभ्र शिधापत्रिकाधारक लाभार्थी संख्या पूर्वी १. ६५ लक्ष होती आता ९१, २८५ पर्यंत कमी झाली असून उक्त तफावत खूप मोठी आहे. सन २०१६ पासून उक्त योजना १६ जिल्ह्यांमध्ये लागू करण्यात आली असून लाभार्थी संख्येमध्ये खूप मोठी तफावत आहे. शासनाने १. ६५ लाख लाभार्थींचा विमा हप्ता दिला त्यानुसार त्याचा रिफंड घेण्यात आला आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, सन २०१५ मध्ये माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहामध्ये जाहीर केले होते की, शेतकऱ्यांना गंभीर आजार झाला तर त्यांना शाश्वत आरोग्य योजनाच्या माध्यमातून सेवा पुरविली पाहिजे. उक्त सेवा पुरविली नाही तर सदरहू आजारांच्या उपचाराकरिता ते कर्जबाजारी होतात व आत्महत्येकडे वळतात. त्यामुळे आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये एम्पॅनल्ड रुग्णालयांची संख्या, १०८ रुग्णवाहिकांची संख्या वाढविले पाहिजे व शुभ्र शिधापत्रिकाधारकांनाही योजनेचा फायदा मिळाला पाहिजे, याकरिता शासनाने काही निर्णय घेतले आहेत. शिधापत्रिकाधारकांची संख्या अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून घेण्यात येत होती. The food and civil supplies department did not have a system to shortlist white ration card holder who is a farmer. The department could give us only the total number of white ration card holder in a particular district. That total number was informed to us as 1, 64, 341. This was informed to us in the month of January, 2016. दिनांक २८ एप्रिल २०१६ रोजी शासन निर्णय निर्गमीत केला. त्यानुसार शुभ्र शिधापत्रिकाधारकांची संख्या अन्न व नागरी पुरवठा विभागाने दिली त्यावेळी लक्षात आले की, सदरहू संख्येमध्ये काही लोक शेतकरी नाहीत. सदरहू योजना केवळ शेतकऱ्यांसाठी होती. शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आले होते की, शासकीय व निम शासकीय संस्थेतील अधिकारी यांना उक्त योजनेचा फायदा देता येणार नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सामान्य लोकांचे काय ? सामान्य लोक म्हणजे if they are not farmers then what? अशी विचारणा समितीने केली असता, सामान्य लोकांना फायदा दिला जात आहे. The idea behind this was to give benefit to the farmers शेतकरी हा योजनेचा मुख्य उद्देश होता. यामध्ये शासकीय आणि निम शासकीय कर्मचारी होते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

It means that it will be applicable to all? अशी विचारणा समितीने केली असता, It will be applicable to all, except the Government and Semi-Government servants. अनेक वेळा चर्चा झालेल्या आहेत. तसेच मुख्य सचिवांसमवेत बैठका देखील झालेल्या आहेत. ऑक्टोबर, २०१६ मध्ये a joint letter was issued by the Revenue Secretary and Health Secretary. We started collecting from each District Collector the actual number of White Ration Card holders who are farmers. असे करीत तो नंबर ७६ हजार ८१ हजारच्या दरम्यान आलेला होता. त्यानुसार विभागाकडून त्या दराने पेमेंट अदा केले जात आहे. सुरूवातीला ४ कोटी ७३ लक्ष रुपयांचे जास्तीचे पेमेंट अदा करण्यात आले होते आणि ती रक्कम पुन्हा विभागाला देण्याबाबत संबंधितांना तशा सूचना दिलेल्या आहेत. सद्यःस्थितीत ८१ हजार ९२४ एवढा प्रिमियम दिला जात आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

या रकमेच्या अगेन्स विभागाने दुप्पट रक्कम अदा केलेली आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता, Only for some time. त्यानंतर ७६ हजार ९४८ रुपये या दरानुसार रक्कम अदा केलेली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले. हे रिव्हाईज केव्हा केलेले आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, १ वर्षापूर्वी रिव्हाईज केले. असे विभागीय सचिवांनी सांगितले. १ वर्षात १ लाख ६५ हजार रुपये एवढे पेमेंट अदा केलेले आहे. ७६ हजार ९४८ रुपये अदा करावयाचे आहेत असे मत समितीने व्यक्त केले असता, त्यामध्ये ४ कोटी ७३ लक्ष रुपयांचा फरक आहे. त्यांना जास्तीचे पेमेंट दिलेले असून, त्यामागची भावना समजून घेण्याची आवश्यकता आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ही बाब लक्षात आल्यानंतर तेवढी रक्कम नंतर वसूल केलेली आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, वसूल करण्याची प्रक्रिया सुरू केलेली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सद्यःस्थितीत वसुलीची रक्कम किती आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, सद्यःस्थितीत वसुलीची रक्कम ८१ हजार ९२४ रुपये आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले. सदरहू योजना आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांसाठी होती की सर्वांसाठी होती ? अशी विचारणा समितीने केली असता, सदरहू योजनेचे लाभार्थी अन्नपूर्णा, अंत्योदय, पिवळे आणि केशरी शिधापत्रिकाधारक आहेत. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाकडून माहिती दिली जात असताना असे म्हटले आहे की, ७ कोटी ६९ लक्ष रुपये परतावा मिळावा म्हणून कार्यवाही केली जात आहे. त्यामुळे आवश्यक ती दुरुस्ती उत्तरात करून घ्यावी. यामध्ये विमा हप्त्याचे ७ कोटी ६९ लक्ष रुपये अतिरिक्त रक्कम ही विमा कंपनीने तत्काळ भरण्याबाबत पत्रव्यवहार केला होता. सद्यःस्थितीत रक्कम परत केली नाही. सदरहू प्रकरण लवादाकडे पुढील कार्यवाहीसाठी सुपूर्द करण्यात आले आहे. विभागाची रक्कम ४ लाख ६९ हजार रुपये आहे की, ७ कोटी ६९ लक्ष रुपये आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, त्यात दुरुस्ती करण्यात येईल. त्यांच्याकडून शिधापत्रिकेप्रमाणे रिफंड घ्यावयाचा आहे. दोन्ही स्टेटमेंट बरोबर आहेत. शुभ्र शिधापत्रिकाधारकांकडून ४ कोटी ७३ लक्ष रुपये वसूल करावयाचे आहेत. सुरूवातीला जे शुभ्र शिधापत्रिका होते, त्यांचा देखील प्रिमियम गेलेला आहे. असे असले तरी चौकशी करून अचूक रक्कम किती आहे ते समितीला अवगत करण्यात येईल. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने ७ कोटी ६९ लक्ष रुपयांची मागणी केली असे उत्तर दिलेले आहे. आता ४ कोटी ७३ लक्ष रुपये वसूल करावयाचे आहेत, असे सांगितले जाते. यामधील अचुक रक्कम कोणती आहे ते पुढील बैठकीत समितीला माहिती द्यावी अशी सूचना समितीने केली व आत्महत्या प्रवण जिल्ह्यातील लाभार्थी शेतकऱ्यांची संख्या किती आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, ही योजना फक्त १४ जिल्ह्यांसाठी होती. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सन २०१५ च्या पावसाळी अधिवेशनात मा. मुख्यमंत्री महोदयांनी घोषणा केली होती. त्यानुसार विभागाने एप्रिल, २०१६ मध्ये शासन निर्णय निर्गमित केला होता. त्यानुसार १ लक्ष ६५ हजार शेतकऱ्यांची कर्जमाफी केली. ही योजना १४ जिल्ह्यांसाठी असेल तर त्यासंदर्भातील सर्व्हे हा यापूर्वीच व्हायला हवा होता. शुभ्र शिधापत्रिकाधारकांना या योजनेचा फायदा मिळालेला आहे. परंतु, सदरहू योजना आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या जिल्ह्यासाठी होती. म्हणजे ती योजना शेतकऱ्यांसाठीच होती. त्यामुळे कृषी विभागाकडून शुभ्र शिधापत्रिकाधारक कोण आहेत, हे तपासणी करून घेण्याची आवश्यकता होती. त्यामुळे जास्तीचे पैसे अदा झाले नसते. असे मत समितीने व्यक्त केले असता, निर्णय झाल्यानंतर विभागाने अंमलबजावणी केलेली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने कोणतीही शहानिशा न करता शुभ्र शिधापत्रिकाधारकांचा प्रिमियम भरुन टाकलेला आहे. अधिकचा प्रिमियम भरलेला असून, ते देणार आहेत काय ? अशी विचारणा समितीने केली असता, ते अधिकचा प्रिमियम देणार आहेत. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

परिच्छेद क्रमांक ३.१.७.३ योजनांतर्गत विहित केलेल्या सुविधांचा अभाव :

(१) आरोग्य मित्र :—

विमा कंपनीने आरोग्य मित्राची नेमणूक वेळीच न केल्यामुळे ३१ कोटी रुपयांची मागणी केलेली असून, त्यासंदर्भातील निर्णय झालेला आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, सद्यःस्थितीत रक्कम मिळालेली नाही. पहिल्या फेजमध्ये आरोग्य मित्र चोवीस तास उपस्थित राहिला पाहिजे, अशी अट होती. दुसऱ्या फेजमध्ये ७०० आरोग्य मित्र नियुक्त करण्यात आले. एवढे आरोग्य मित्र कार्यान्वित केले नाही तर तेवढी रक्कम

त्यांच्याकडून दंड स्वरुपात वसूल केली जाणार आहे. फेज दोनमध्ये काही शॉर्टफॉल आहेत. एक आरोग्य मित्र एकापेक्षा जास्त शिफ्टमध्ये असू शकतात. सिंगल स्पेशॅलिटीचे रुग्णालयात डायलेसिस करण्याचे सेंटर आहे. परंतु, हे २४ तास चालत नाही. त्यामुळे रात्रीच्या वेळेस आरोग्य मित्र नसावेत. असे विषय निर्माण झाल्यामुळे विभागाने आरोग्य मित्राची मागणी केलेली आहे. त्यानुसार विभागाने ३१. ८१ कोटी रुपयांची मागणी केलेली आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

आरोग्य मित्राची सद्यःस्थिती काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, सद्यःस्थितीत फेज-१ मध्ये ४६५ आरोग्य मित्र कार्यरत आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

नियमानुसार आरोग्य मित्र किती हवेत ? अशी विचारणा समितीने केली असता, नियमानुसार त्यावेळी ७३५ आरोग्य मित्र हवे होते. सामंजस्य करार करतेवेळी काही त्रुटी राहिलेल्या होत्या. चोवीस तास आरोग्य मित्र उपस्थित असायला हवेत असे आपण म्हणतो. परंतु, सिंगल स्पेशॅलिटीचे रुग्णालयात डायलेसिस करण्याचे सेंटर आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सचिवांचे म्हणणे बरोबर आहे. सिंगल स्पेशॅलिटीचे रुग्णालयात डायलेसिस करण्याचे सेंटर आणि ते चोवीस तास सुरू नसल्यामुळे त्या ठिकाणी आरोग्य मित्र नसतील तर काही हरकत नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागाने तशी सुधारणा सामंजस्य करारात केलेली नाही. जेव्हा वाटाघाटी होईल त्यावेळी हे सर्व विषय चर्चेला येतील. सेकंड फेजमध्ये ७13 आरोग्य मित्रांची अशी संख्या निश्चित करण्यासाठी सांगितले होते. त्याच्या उलट ७१९ आरोग्य मित्र कार्यरत आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

(२) वैद्यकीय समन्वयक :–

अमरावती आणि गडचिरोली येथील जिल्हा रुग्णालयांमध्ये वैद्यकीय समन्वय झाला नाही असे त्यावेळी सांगण्यात आले होते. असे समितीने निदर्शनास आणले असता, महालेखाकारांना वैद्यकीय समन्वयक नसल्याचे निदर्शनास आले होते. परंतु, आज रोजी वैद्यकीय समन्वयक कार्यरत आहेत. तेथील स्थानिक लोकांना आरोग्य उपचार मिळाले नाहीत, असा जो निष्कर्ष काढलेला आहे, तो उचित नाही, कारण ती पोर्टेबल योजना आहे. गडचिरोली जिल्ह्यात एकच रुग्णालय इम्पॅनल आहे. त्या ठिकाणी जास्त आरोग्य सुविधा उपलब्ध नसल्यामुळे तेथील लोक इतर जिल्ह्यात जाऊन उपचार करु शकतात आणि तशा प्रकारे ते उपचार करण्यासाठी जातात. असाच विषय अमरावती जिल्ह्याचा असून, तेथील लोक उपचार करण्यासाठी नागपूरला येतात. लोकांना वैद्यकीय समन्वयक नसल्यामुळे सुविधा मिळाली नाही असे म्हणणे उचित होणार नाही. त्यावेळी वैद्यकीय समन्वयक नव्हते. परंतु, आज रोजी ते कार्यरत आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

महालेखाकार कार्यालयाने सुविधा मिळाली नाही असे म्हटलेले नाही. " It caused hardships to the beneficiaries. " असे महालेखाकारांनी समितीच्या माध्यामातून निदर्शनास आणले असता, योजनेमध्ये कमीत कमी ३० बेड आणि आयसीयुची सुविधा असणे आवश्यक आहे, असे निकष आहेत. ज्यांनी अर्ज केला आणि ते निकषात बसत असेल तर त्यांना ते दिले जाणार आहे. गडचिरोली जिल्ह्यात एकच शासकीय रुग्णालय इम्पॅनल आहे. गडचिरोली जिल्ह्यात कमी सुविधा मिळत असल्यामुळे तेथील लोक उपचार करून घेण्यासाठी इतर जिल्ह्यात जाणार आहेत आणि ही वस्तुस्थिती आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले. म्हणून तर त्यासाठी वैद्यकीय समन्वयक असायला हवा, असे मत समितीने व्यक्त केले असता, सद्यःस्थितीत वैद्यकीय समन्वयक आहेत. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

अमरावतीला तर ते खूपच आवश्यक आहे. त्यावेळी ते नव्हते. असे मत समितीने व्यक्त केले असता, प्रत्येक हॉस्पिटलमध्ये ते असणे आवश्यक आहे. त्यावेळी सिव्हील हॉस्पिटलमध्ये वैद्यकीय समन्वयक नव्हते, सन २०१५ मध्ये ऑर्डर दिलेली आहे. तसेच आता सिव्हील सर्जनने कोणत्याही एका डॉक्टरला वैद्यकीय समन्वयक म्हणून नामनिर्देशित करण्यासाठी सूचना दिलेल्या आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

(३) वैद्यकीय शिबिर समन्वयकाची नियुक्ती न करणे :–

सदर मुद्यावर चर्चा झाली नाही.

परिच्छेद क्रमांक ३.१.७.४ आरोग्य शिबिरे घेण्यात कमतरता :—

आरोग्य शिबिराची परिस्थिती काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, सुरुवातीला टप्पा-१ मध्ये एका महिन्यात ४ आरोग्य शिबिरे योजनेअंतर्गत रुग्णालयांनी आयोजित करावे असे अपेक्षित होते. टप्पा-२ मध्ये एका महिन्यात २ आरोग्य शिबिरे योजनेअंतर्गत रुग्णालयांनी आयोजित करावे असे अपेक्षित होते. शासकीय रुग्णालयातून असे अपेक्षित नव्हते. एमसीजीएमचे रुग्णालय आहे त्यांनी वैद्यकीय शिबीर आयोजित करण्यासाठी नकार दिलेला होता. या योजनेला प्रसिद्धी मिळावी म्हणून आरोग्य शिबीर आयोजित केले जात होते. शिबीरामध्ये रुग्णावर उपचार करण्याची आवश्यकता असेल तर आपण त्यांना अमुक हॉस्पिटलमध्ये उपचार करावेत असे मार्गदर्शन करु शकतो. शासनाने या संदर्भात दोन ते तीन स्टेप्स उचलल्या आहेत. आरोग्य शिबीरांची संख्या २० हजारच्या पलिकडे गेलेली आहे. हे १७ डिसेंबरपर्यंत झालेले आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

आरोग्य शिबिरांची सचिवांनी सांगितलेली संख्या ही सन २०१२ पासूनची आहे. असे समितीने निदर्शनास आणले असता, ही संख्या सन २०१२ पासूनची असून सद्यःस्थितीत सदर शिबिरांची संख्या २० हजारच्या पलिकडे गेलेली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले. २१ महिन्यांमध्ये ८ हजार ७५० शिबीरांची आयोजित करण्यात आले होते. ६ वर्षांत १९ हजार ५०० शिबीर आयोजित केलेले आहेत. असे समितीने निदर्शनास आणले असता, शिबीर आयोजित करण्याची संख्या वाढत असल्याचे दिसून येत आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले. वैद्यकीय शिबीरांची संख्या हा खूप महत्वाचा पॅरामिटर नाही. एखाद्या लहान गावात दोन डॉक्टरांनी वैद्यकीय शिबिर आयोजित केले तर एक शिबीर होते. मागील वर्षामध्ये महाआरोग्य शिबिर आयोजित केले होते आता प्रत्येक जिल्ह्यात महाआरोग्य शिबिरे आयोजित केली जात आहेत, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

परिच्छेद क्रमांक ३.१.७.५ गडचिरोली जिल्ह्यात एकच योजनेअंतर्गत निर्धारित रुग्णालय :–

गडचिरोली जिल्ह्यात महाआरोग्य शिबिर आयोजित केले नाही. असे समितीने निदर्शनास आणले असता, महाआरोग्य शिबिर आयोजित करण्यासाठी वेळापत्रक निश्चित केलेले आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

यासाठी वैद्यकीय शिक्षण विभागाची देखील मदत लागते. असे मत विभागीय सचिवांनी व्यक्त केले असता, समितीकडून विभागाला हवी ती मदत दिली जाऊ शकते असे मत समितीने व्यक्त केले असता, सन २०१६-२०१७ मध्ये जळगाव आणि बीडमध्ये महाआरोग्य शिबीर आयोजित केले होते असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

गडचिरोली जिल्ह्याची मागणी असून देखील एकही शिबीर आयोजित केलेले नाही. असे समितीन निदर्शनास आणले असता, सन २०१७-२०१८ मध्ये शिबीर आयोजित केले होते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

महाआरोग्य शिबिर आयोजित करण्यासाठी मुंबईहून डॉक्टर्स येतात. परंतु, स्थानिक डॉक्टर्सला घेतले जात काय ? अशी विचारणा समितीने केली असता, योजनेनुसार ज्या ठिकाणी खाजगी किंवा शासनाची इम्पॅनल हॉस्पिटल आहेत, त्या ठिकाणी रिसोर्सेस पूल करण्यात येतात. अशा प्रकारे आरोग्य शिबिर आयोजित केले जाते असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

जिल्ह्यातील डॉक्टर्स पुरेसे नसतात काय ? अशी विचारणा समितीने केली असता, जिल्ह्यातील डॉक्टर्स पुरेसे नसतात. याचे कारण असे आहे की, नाशिक जिल्ह्यात शिबीर आयोजित केले होते. त्यावेळी २ लाख २५ हजार ८७५ इतक्या रुग्णांची तपासणी केली होती. जळगाव येथे १ लाख ८६ हजार ७५६ इतक्या रुग्णांची तपासणी केली होती. ही महात्मा फुले जन आरोग्य योजना इम्पॅनल हॉस्पिटलसाठी आहे. ४८० च्या आसपास योजनेअंतर्गत निर्धारित रुग्णालये आहेत. ज्यावेळी मोठ्या संख्येने रुग्णांची तपासणी केली जाते त्यावेळी २० हजार रुग्णांवर प्रोसिजरची गरज असल्याचे लक्षात आले होते. हे सर्व २० हजार रुग्ण आपल्या हॉस्पिटलमध्ये इम्पॅनल करावयाचे म्हटले तर त्यासाठी खूप कालावधी लागणार आहे. ही हॉस्पिटल इम्पॅनल नाहीत, अशा हॉस्पिटलमध्ये ते इम्पॅनल करून घेतले तर भरपाई मिळणार आहे. त्या ठिकाणी कॅशलेस प्रोसिजर होणार आहे. याकरिता मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या निदेशानुसार नॉन इम्पॅनल हॉस्पिटलमध्ये कॅम्प आयोजित केल्यानंतर दोन महिन्यासाठी प्रत्येक ठिकाणी ते ओपन करून दिले जाणार आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ब्लँकेट ऑर्डर आहे की, पूर्ण ऑर्डर घ्यावी लागते ? अशी विचारणा समितीने केली असता, यासंदर्भात विमा कंपन्यांना विनंती करावी लागते. तसेच यासंदर्भात मा. मुख्यमंत्री महोदयांनी पर्स्युएट करून घेतलेले आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ज्या ठिकाणी महाआरोग्य शिबिर आयोजित केले जाते आणि त्या ठिकाणी काही रुग्णांवर ऑपरेशन करावयाचे असल्यास तसे करता येईल काय ? अशी विचारणा समितीने केली असता, ही ब्लँकेट परमिशन आहे. ही एक प्रोसिजर आहे. स्थानिक वैद्यकीय महाविद्यालयामधील वैद्यकीय अधीक्षक यांचा लॉगीन आयडी वापरणार आहोत. ती हॉस्पिटल इम्पॅनल नाहीत. स्थानिक वैद्यकीय महाविद्यालयामधील वैद्यकीय अधीक्षकाने हॉस्पिटलबरोबर करार केला पाहिजे. यामध्ये कॉम्प्लिकेशन झाले किंवा कोणाचा मृत्यू झाला तर त्यासाठी जबाबदार कोण असा प्रश्न निर्माण होणार आहे. हे सर्व वैद्यकीय अधीक्षकाने तपासणी करणे आवश्यक आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ज्यावेळी रुग्णालय योजनेंतर्गत निर्धारित केले जाते त्यावेळी तपशिलवार लेखापरिक्षण होते. व्हिजीट होतात, पायाभूत संरचनेचे लेखापरिक्षण होते. आता ते इम्पॅनल नाही. मग अशा वेळी वैद्यकीय अधीक्षकाने जाऊन ते तपासून घेतले पाहिजे, अशी जबाबदारी त्यांच्यावर निश्चित केलेली आहे. हे सर्व सर्टिफाय केल्यानंतर त्यांच्याच खात्यामधून पैसे वितरीत होतात असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

परिच्छेद क्र. ३.१.७.६ योजनेंतर्गत निर्धारीत खाजगी अंगीकृत रुग्णालये :–

समितीने दिनांक ०५ फेब्रुवारी, २०१९ रोजी पुन्हा विभागीय सचिवांची साक्ष घेतली. यावर चर्चेदरम्यान श्री संत अच्युत महाराज हृदय रुग्णालय आणि संशोधन संस्था, अमरावती या रुग्णालयात योजनेंतर्गत रुग्णालयात स्त्री व पुरुष रुग्णांसाठी स्वतंत्र कक्षाची निर्मिती केली आहे, अशी माहिती विभागाने ज्ञापनात दिल्याचे समितीने नमूद केले.

परिच्छेद क्र. ३.१.८ माहिती विश्लेषणाचे निष्कर्ष :–

राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना, महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना किंवा आयुष्यमान भारत योजना यामध्ये नोटीफाय करण्याचे अधिकार कोणाचे आहेत ? ज्याप्रमाणे आता अच्युत महाराज हृदय रुग्णालय आणि संशोधन संस्था हे स्त्री व पुरुष रुग्णांसाठी स्वतंत्र कक्षांची निर्मिती करण्यासाठी निवडले आहे त्याप्रमाणे जर अमरावती जिल्ह्यातील एखादे रुग्णालय निवडायचे असेल तर त्याचे अंतिम प्रशासन कोण आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, राष्ट्रीय विमा कंपनी ही केंद्र शासनाची कंपनी असून त्या कंपनीला आपण विम्याचे कंत्राट दिलेले आहे. त्या कंपनीच्या रिजनल मॅनेजरच्या अध्यक्षतेखाली एक एम्पॅनलमेंट समिती आहे. त्या समितीचा मी सदस्य आहे. त्या समितीचे एक ऑनलाईन सॉफ्टवेअर आहे त्यावर ॲप्लीकेशन होतात. त्यानंतर आपण त्याची स्क्रुटीनी करून साईट ऑडीट होते आणि ऑडीट झाल्यावर त्याचे ग्रेडींग आणि स्कोअरिंग होते. त्यानंतर एम्पॅनल समिती निर्णय घेते की, कोणत्या जिल्ह्यात कोणते एम्पॅनल करण्यासाठी कोणत्या स्पेशालिटीची गरज आहे त्यानुसार एम्पॅनलमेंट दिले जाते असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

ज्या रुग्णालयांनी राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये गैरव्यवहार केला आहे तीच रुग्णालय महात्मा फुले जन आरोग्य योजनेमध्ये आहेत असे मत समितीने व्यक्त केले असता, योजना सुरू झाल्यापासून आतापर्यंत साधारणतः २५० रुग्णालयांना योजनेतून बाहेर काढले आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

काही रुग्णालयांनी या योजनांचा व्यवसाय सुरू केला आहे पण काही विश्वसनीय (genuine) रुग्णालय मागे पडतात. व्यावसायिक रुग्णालय हे ऑपरेशन झाले नाही तरी झाले असल्यासारखे दाखवतात. याचे निरीक्षण कोण करीत असते ? अशी विचारणा समितीने केली असता, ही सर्व प्राथमिक जबाबदारी विमा कंपनीची असते. कारण विभागाने विम्याचा हप्ता कंपनीला दिलेला आहे. त्यांचा खर्च किती कमी जास्त होईल हा त्यांचा लूकआऊट आहे. एका वर्षाचे कंत्राट त्यांच्याकडे आहे तर ६९० रुपये पण यावर्षी ६४० रुपये एवढा प्रिमियम देत असतो. प्रत्येक विभागात एक व्हिजीलन्स टीम, मेडिकल ऑडन्सि टीम आहे. तसेच विमा कंपन्यांचे थर्ड पार्टी ॲडमिनिस्ट्रेटर नियुक्त केलेले असतात. त्यांच्यामार्फत नियमितपणे तपासणी होते. या ठिकाणी रुजु झाल्यापासून म्हणजे ६ महिन्यापासून साधारणतः २५० रुग्णालयांना भेट दिलेली आहे. त्या भेटीमध्ये ८० रुग्णालयांना योजनेतून बाहेर काढले आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

परिच्छेद क्र. ३.१.९.१ विमा कंपनीने दावे फेटाळणे/बंद करणे :–

(१) दावे फेटाळणे

शासकीय रुग्णालयाचे ३९. ०७ कोटी रुपये आणि खाजगी रुग्णालयाचे ४२. २१ कोटी रुपयांचे दावे विमा कंपनीने फेटाळले आहेत. शासकीय रुग्णालयाला मोठया प्रमाणावर सूट आहे तरी एवढया मोठया प्रमाणात आपले सर्व दावे नाकारण्यात आले. त्यामुळे शासनाचे आणि खाजगी रुग्णालयाचे ८१. २९ कोटी रुपये बुडाले आहेत असे मत समितीने व्यक्त केले असता, योजनांच्या पॉलिसीचे दावे सेटलमेंट करण्याची एक प्रक्रिया आहे. दावा सादर झाल्यानंतर पहिल्यांदा डॉक्टरकडे त्याची छाननी होते. तिथून नाकारला गेल्यानंतर त्यांनी पहिला अर्ज करायचा असतो. या दाव्यांचा विचार करून सेंट्रल क्लेम कमिटी नेमलेली असते. ही कमिटी दाव्यांचा विचार करून अंतिम निर्णय देत असते. खाजगी आणि शासकीय रुग्णालयांची तुलना केली तर शासकीय रुग्णालयात मनुष्यबळ, पायाभूत सुविधा, तांत्रिक बॅकअप कमी आहे. त्यामुळे त्यांना बऱ्याच ठिकाणी सूट दिलेली आहे. परंतु ती सूट देऊनही बऱ्याच ठिकाणी कागदपत्रे उपलब्ध नाहीत. अशा प्रकारच्या काही त्रुटी होत्या त्यावरही वेगवेगळया समित्यांमध्ये निर्णय घेऊन हे दावे बऱ्यापैकी सोडवत आणलेले आहेत. ही योजना पूर्ण कॅशलेस आहे. शासकीय रुग्णालयामध्ये कधी कधी रुग्णांना औषध आणण्यासाठी किंवा बाहेरून एखादी वस्तु आणण्यासाठी चिठ्ठी दिली जाते मग त्याचा ग्रिव्हेन्स रेकॉर्ड होतो. तो रेकॉर्ड झाल्यानंतर दावा फ्लॅग होतो आणि मग तो दावा अदा केला जात नाही. त्यामुळे मागच्या १५ दिवसांपूर्वी असा निर्णय घेतला की, १०० किंवा २०० रुपयांची औषधे आणल्यामुळे १ किंवा २ लाख रुपयांची दावे अडकून ठेवलेली असतील तर तेवढी किंमत कट करून दावे देण्यात याव्यात. यातील बहुतांश दावे आता निकाली निघालेले आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

यातील दावे म्हणजे पुढचे दावे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, मागचे दावे निकाली निघालेले आहेत. याबाबत शासनाच्या रुग्णालयांना सवलत दिली आहे. खाजगी रुग्णालयांना विश्वसनीय केस असेल तर एखाद्या केसच्या बेसिसवर सवलत दिली जाते नाहीतर यामध्ये बरेच गैरव्यवहार होतात असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

(२) दावे बंद करणे

शासनाच्या रुग्णालयात एका बाजूला ४० कोटी रुपये बुडतात आणि विमा कंपनी ते पैसे देत नाही. कर्मचारी नसण्याचे एक कारण विभागाने सांगितले आहे. तसेच विभागाकडे मनुष्यबळ नाही. ज्याप्रमाणे खाजगी रुग्णालयात एक एक गोष्ट लक्ष घालून सर्व कागदपत्रे घेऊन मोठी कार्ययंत्रणा चालवली जाते. त्यामुळे खाजगी रुग्णालयात मोठया प्रमाणात ऑपरेशन होतात. त्या दृष्टीने त्यांचे खूप कमी दावे फेटाळण्यात येतात. एका बाजूला शासनाच्या रुग्णालयाकडून प्रिमियम भरला जातो आणि विमा कंपन्यांकडून पैसे मिळत नाहीत असे मत समितीने व्यक्त केले असता, अशा प्रकारच्या विशिष्ट कामासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने शासन निर्णय काढून डेटा एन्ट्री ऑपरेटर घेण्यासाठी परवानगी दिलेली आहे. त्यामुळे आता बरीच सुधारणा झालेली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

ही परिस्थिती मार्च, २०१७ ची आहे त्यानंतर काही सुधारणा झालेली आहे. आता जास्त दावे नाकारल्या जात नाहीत असे मत महालेखाकारांनी व्यक्त केले.

दावे नाकारण्याचे प्रमाण कमी झालेले आहे आणि प्रलंबित दावे विभागाने निकालात काढलेले आहेत. साधारणतः असा रेशो आहे की, Thumb rule is 60 per of disputed amount is paid back to the hospital. पूर्ण आणि विवादित दाव्यांचा विचार केला तर पूर्ण १०० रुपयांचे दावे केलेले असतील तर त्यातील ७ टक्के दावे आर्बिट्रेशनमध्ये जातात. त्यातील ६० टक्के म्हणजे प्रभावाने पूर्ण ३ टक्केच दावे फेटाळले जातात असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

परिच्छेद क्र. ३.१.९.२ विमा हप्ता प्रदानातील अनियमितता :–

विमा कंपनीच्या लाभार्थ्यांची यादी योग्य दिली नव्हती काय म्हणजे आपल्याला जास्त प्रिमियम द्यावा लागला आहे अशी विचारणा समितीने केली असता, विभागाकडे नावानिशी यादी नाही. ही योजना पूर्णपणे शिधापत्रिकेवर आधारित आहे. प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयातून डीएसओ शिधापत्रिकेचा जो नंबर देतील त्या नंबरवर लाभ दिला जातो असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

योजना सुरू केल्यानंतर सुरूवातीला सन २००९-१० च्या दरम्यान सन २०१२ साली हा प्रश्न उद्‌भवला आहे. यापूर्वीच्या साक्षीमध्ये सांगितले होते की, अन्न व नागरी पुरवठा विभागाने ते फॉर्म भरुन घेतले होते. ते जुने फॉर्म होते नंतर लक्षात आले यापैकी काही फॉर्म मध्ये १ लाख रुपयांपेक्षा जास्त इन्कम आहे. ज्या रेशनकार्डचा प्रिमियम आपण भरला आहे पण आपली उत्पन्न मर्यादा त्यापेक्षा जास्त आहे, त्याच्या प्रतिपूर्तीसाठी विभागाने दावा केलेला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

४७. ६३ कोटी रुपये विमा कंपनीकडे उरलेले आहेत तर त्यामध्ये ८० टक्के प्रशासकीय खर्च सुरूवातीलाच कट केला आहे. आणखी १० टक्के कट करण्यात येतील काय ? अशी विचारणा समितीने केली असता, नाही, ती निविदेची अट होती असे विभागीय सचिवांनी सांगितले.

परिच्छेद क्रमांक ३.१.९.३ मानकांनुसार विस्तृत प्रमाणावर करावयाच्या प्रसिद्धीचा अभावः

योजनेच्या प्रसिद्धीचे पैसे विभागाला परत मिळाले आहेत काय ? अशी विचारणा समितीने केली असता, होय आतापर्यंत ५ हजार कोटी रुपयांवर २ टक्के या दराने १०० कोटी रुपये प्रसिद्धीसाठी दिले होते. त्यातील २७ कोटी रुपये खर्च झाले होते. मागच्या सर्व वर्षातील राहिलेली रक्कम परत घेतली आहे. पहिल्यांदा ६३ कोटी रुपये परत घेतले आणि येथून पुढे २ टक्के प्रसिद्धीसाठी आपण पैसे देत नाही. विभाग स्वतःच ती प्रसिद्धी करतो असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभागाने सांगितले की, ६३. ७८ कोटी रुपये वसुली केली आहे त्यामध्ये आरोग्य पत्राच्या छपाईचे पैसे कसे काय आले आहेत अशी विचारणा समितीने केली असता, २७ कोटी रुपये हे वेगवेगळया शीर्षाखाली जाहीरात देऊन खर्च झाले आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

जाहिरातीचे ९ कोटी रुपये त्यामध्ये समाविष्ट आहेत. कारण परिच्छेद क्र. ३. १. ९. ४ मध्ये विभागाने तसे उत्तर दिलेले आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, विभागाने जेवढे पैसे दिले होते त्यातील जो प्रत्यक्ष खर्च झाला त्याव्यतिरिक्त रिफंड घेतले आहेत. विभागाच्या संमतीनेच तो खर्च झालेला आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. रेशनकार्ड धरुन २ टक्के खर्च आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, वेगवेगळ्या शीर्षाखाली तो खर्च झालेला आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभागाने जेव्हा टेंडर फ्लोट केले होते तेव्हा एमओयू मध्ये अशी अट होती की, विभाग विमा कंपनीला जे प्रिमियमचे पैसे देणार त्यापैकी २ टक्के प्रिमियम अमाऊंटमध्ये आयईसी ॲक्टिविटी विभागाने सांगितल्यानुसार केली पाहिजे. विभागाने त्यांना वेळोवेळी सांगितले आहे म्हणजे जसे स्वाईन फ्ल्युची साथ आली, पेपरमध्ये जाहिराती दिल्या किंवा रेडिओवर टीव्ही स्पॉट देऊन प्रत्यक्ष योजनेची प्रसिद्धी करण्यापेक्षा बाकीच्या आजारांचा खर्च त्यामध्ये समाविष्ट होता. एमओयुचा कालावधी मध्येच संपला आणि केंद्र शासनाकडून नॅशनल हेल्थ प्रोडक्शन स्कीम सुरू करण्याचा प्रस्ताव आला. त्यामुळे मधल्या काळात योजनेची प्रसिद्धी पण केली नाही. पण तरी प्रिमियम देत राहिलो. आणि २ टक्के खर्च झाले नाही असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

खर्च न करण्यात आलेला निधी वसूल करण्यात आलेला आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, खर्च न करण्यात आलेला सर्व निधी वसूल करण्यात आलेला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले. या दोन टक्के निधीमध्ये आरोग्य पत्राचे देखील पैसे होते असे मत समितीने व्यक्त केले असता, आरोग्य पत्र हे योजनेच्या प्रचाराचा भाग आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागामार्फत माहिती व जनसंपर्क संचालनालयाला देण्यात आलेले १० कोटी रुपये खर्च झालेले नाहीत असे समितीने निदर्शनास आणले असता, आराखडा मंजूर झाल्यानंतर सदर निधी खर्च करण्यात येणार आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभागाच्या योजनेचा बी. पी. एल. मधील लोकांना लाभ होत नाही. कारण या योजनेचा विभागामार्फत प्रचार व प्रसार करण्यात आलेला नाही. विमा कंपनीने देखील याबाबत चांगली कार्यवाही केलेली दिसून येत नाही. नवीन आराखडा तयार करण्यासाठी विभागाने मोठ्या प्रमाणावर वेळ घातलेला आहे. राजीव गांधी आरोग्यदायी जीवन योजनेचे नाव महात्मा ज्योतिबा फुले आरोग्य योजना असे करायचे असल्यामुळे याबाबतची सर्व कार्यवाही थांबवलेली होती. आता या योजनेचे नाव बदलले तरी विभाग पुढील कार्यवाही करण्यास गंभीर नाही. अन्य लोकांच्या दृष्टीने बी. पी. एल. धारकांची संख्या कमी आहे. त्यादृष्टीने प्रचार करणे अत्यंत आवश्यक आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, सदर योजनेचा मोठ्या प्रमाणावर प्रचार व प्रसार सुरू आहे. यापुढे यामध्ये आणखी वाढ करण्यात येईल, असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस आश्वासित केले.

परिच्छेद क्रमांक ३.१.९.४ आरोग्य कार्डाची छपाई विमा कंपनीने खर्चाची प्रतिपूर्ती न करणेः

या परिच्छेदावर चर्चा झाली नाही.

परिच्छेद क्र. ३.१.९.५ निर्धारीत नुकसानीची वसुली न करणे :

सदर तरतूद ही आर्बिट्रेशनसाठी करण्यात आलेली आहे. आर्बिट्रेशनमध्ये जाण्यापूर्वी शासनामार्फत एक समिती स्थापन करण्यात आलेली आहे. या समितीमध्ये विमा कंपनीचे प्रतिनिधी आहेत. तसेच राज्य आरोग्य हमी सोसायटीचे देखील प्रतिनिधी आहेत. विमा कंपनी ही शासनाकडून ३३८ कोटी रुपयांची मागणी करीत आहे आणि आपण त्यांच्याकडून ३९६ कोटी रुपयांची मागणी करीत आहोत. अशा प्रकारची चर्चा सुरू आहे. सदर बाबीचा या समितीमध्ये तोडगा निघाला नाही तर आर्बिट्रेशनमध्ये जाण्यात येणार आहे असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

विमा कंपनी विभागाकडे कशासाठी पैशाची मागणी करीत आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, एम. ओ. यू. मध्ये असे नमूद केले आहे की, विभागाने दिलेल्या प्रिमियमच्या ११० टक्के पेक्षा जास्त जर दावे प्रदान करण्यात येत असतील तर १०५ टक्क्यापासून ५०-५० टक्के निधी विभागाने द्यावयाचा आहे. यास प्रिमियम लोडींग असे म्हणतात. सदर विमा कंपनी या पैशांची मागणी करीत आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

पूर्वी रुपये ९६ कोटी रकमेची यादी समितीला सादर केली होती. आता तीच रक्कम ३९६ कोटी रुपये झालेली आहे. विमा कंपनी विभागाकडे ३३८ कोटी रुपयांची मागणी करीत आहे आणि विभाग त्यांच्याकडून ३९६ कोटी रुपयांची मागणी करीत आहे. याबाबतचा निर्णय केव्हा होणार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, या विषयाच्या संदर्भात याच आठवड्यामध्ये बैठक होणार आहे. सदर बैठकीमध्ये विमा कंपनी सदर कार्यवाही बाबत कागदपत्रे विभागाला देते विभाग पण सदर कार्यवाही बाबत कागदपत्रे देतो. यामध्ये वाटाघाटी झाली नाही तर लवादामध्ये जाऊन यावर अंतिम निर्णय घेऊ शकतो असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

परिच्छेद क्र. ३.१.९.६ रुग्णालयांनी दाव्यांच्या अतिरिक्त रकमेचा शासकीय लेख्यात भरणा न करणे :

समितीच्या माहितीप्रमाणे विमा कंपनीकडून शासकीय रुग्णालयांना प्राप्त झालेल्या दाव्यांच्या रकमेच्या ५० टक्के रक्कम खर्च करता येऊ शकते असे मत समितीने व्यक्त केले असता, संबंधित रुग्णालयांनी २५ टक्के रक्कम शासनाकडे जमा केली पाहिजे. उर्वरित २० टक्के रक्कम सदर रुग्णालयांतील कर्मचारी वर्गांना प्रोत्साहन म्हणून देता येते, ३ टक्के निधी हा प्रशासकीय बाबींवर खर्च करता येऊ शकतो आणि ५२ टक्के निधी हा इन्फ्रास्ट्रक्चरवर खर्च करता येऊ शकतो. याबाबत शासनाने एक समिती व पद्धत नेमून दिलेली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

इन्फ्रास्ट्रक्चवर खर्च केला जातो म्हणजे नेमके काय काम केले जाते ? अशी विचारणा समितीने केली असता, सदर रुग्णालयाच्या काचा फुटल्या असतील किंवा ड्रेनेजचे काम असेल तर या ५२ टक्के निधीतून केले जाते असे विभागीय सचिवांनी सांगितले. What about the consumable items which are not available in the hospital? अशी विचारणा समितीने केली असता, हे या ५२ टक्के निधीतून खरेदी करता येतात असे विभागीय सचिवांनी सांगितले.

हीप जॉईंट, स्टेंट इत्यादी या ५२ टक्के निधीतून खरेदी करता येऊ शकतात का ? अशी विचारणा समितीन केली असता, माहे जून, २०१३ आणि ऑगस्ट, २०१३ च्या शासन निर्णयामध्ये देखील याचा समावेश होता. रुग्णालयातील औषधाचा खर्च, प्रवास खर्च, भोजन खर्च, डेटा एंट्री ऑपरेटरचा खर्च व इंटरनेटचा खर्च या ५२ टक्के निधीमध्ये समाविष्ट आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले. सदर शासन निर्णयाची एक प्रत समितीला सादर करण्यात यावी असे समितीने सूचित केले असता, सदर निर्णयाची एक प्रत समितीला सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

परिच्छेद क्र. ३.१.९.७ मत्ता कमी दाखविणे :

सन २०१६-१७ च्या वार्षिक लेख्यामध्ये टिपणीच्या स्वरुपात मत्ता दर्शविलेली आहे. मत्ता म्हणजे काय? विभागाच्या योजनेची मालमत्ता कोणती आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, it is an accounting term. Here the term is used for receivables. The receivables are actually our assets. What we are to receive from the Insurance Companies is our asset. This is accounting observation which we have corrected in subsequent Annual Accounts असे विभागीय सचिवांनी स्पष्ट केले.

परिच्छेद क्रमांक ३.१.१०.१ नियामक परिषदेच्या बैठकांची कमतरता :

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या जुलै, २०११ च्या शासन निर्णयानुसार आणि राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना नियम आणि विनियम २०१० नुसार योजना सुरळीत चालण्यासाठी दर वर्षी नियामक परिषदेच्या ४ वेळा बैठका घेणे आवश्यक असताना देखील विभागाने ५ वर्षामध्ये फक्त चारच बैठका घेतलेल्या आहेत असे समितीने निदर्शनास आणले असता, एकाच वेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांचा वेळ मिळत नाही. वेळोवेळी विभागाची बैठक होते असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

जर नियमानुसार सदर बैठका घेणे शक्य होत नसेल तर सदर बैठकीबाबतचा नियम बदलण्यात यावा. गेल्या ६ वर्षामध्ये फक्त ५ बैठका झालेल्या आहेत. सन २०१८ मध्ये नवीन शासन निर्णय निर्गमित करून सदर बैठक ही मुख्य सचिवांच्या अध्यक्षेखाली घ्यायची असा निर्णय घेण्यात आला आहे. आता सदर बैठक ही ३ महिन्याला घेतली जात आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, डिसेंबर, २०१८ मध्ये अशा प्रकारचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यानंतर औपचारिक बैठक झालेली नाही. पण यासंदर्भात त्यांनी आढावा घेतलेला आहे. यापुढे दर तीन महिन्यांनी बैठक घेण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले. नियमांमध्ये बदल होऊन देखील जर बैठक होत नसेल तर ही गंभीर बाब आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, आता यापुढे दक्षता घेण्यात येईल असे विभागीय सचिवांनी आश्वासित केले.

परिच्छेद क्र. ३.१.१०.२ प्रलंबित तक्रारी :

विभागाने सदर परिच्छेदाचे निराकरण मोठ्या प्रमाणावर केले आहे. तरी देखील उर्वरित अनुशेष संपविण्यात यावा असे समितीने सूचित केले असता, ही प्रक्रिया सुरूच राहणारी आहे. नवीन तक्रारी प्राप्त होतात त्या तक्रारीचे निवारण केल्यानंतर दुसऱ्या तक्रारी प्राप्त होतात असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. सन २०१२ मध्ये तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. त्या तक्रारीचे अद्याप निवारण करण्यात आलेले नाही असे समितीने निदर्शनास आणले असता, रुग्णालयाने तक्रारीचे निवारण केले नाही तर त्या रुग्णालयाचा दावा रोखण्याची कार्यवाही करण्यात येते असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सन २०१२ मध्ये प्राप्त झालेल्या तक्रारीचे निवारण सन २०१८-१९ मध्ये देखील करण्यात आलेले नाही असे समितीने निदर्शनास आणले असता, शासकीय रुग्णालयामध्ये असे होते की, जर एक ते दीड लाखाची सर्जरी असेल आणि त्यासाठी लागणारी एखादी औषधी रुग्णालयामध्ये उपलब्ध नसेल तर ती बाहेरुन मागविण्यात येते. अशा प्रकारचे २० ते २५ रुपयांचे औषध विकत आणले तरी त्याचा क्लेम जातो. त्यानंतर तो ट्रेस करणे व तो पैसा रिफंड करणे थोडे अडचणीचे जाते असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. अशा प्रकारची कार्यवाही खासगी रुग्णालयांमध्ये देखील केली जात असेल ना? अशी विचारणा समितीने केली असता, मागील ६ महिन्यामध्ये खासगी रुग्णालयांनी संबंधित रुग्णांना ३ कोटी रुपये परत केलेले आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सद्यःस्थितीत म्हणजे दिनांक १ जानेवारी, २०१९ रोजी किती तक्रारी प्रलंबित आहेत? यासंदर्भातील सर्व आकडेवारी समितीला सादर करण्यात यावी. तसेच दिनांक १ जानेवारी, २०१९ रोजी प्राप्त असलेल्या सर्व तक्रारींचे निवारण ३१ मार्च, २०१९ पर्यंत करण्यात यावे असे समितीने सूचित केले

असता, दिनांक १ जानेवारी, २०१९ रोजी किती तक्रारी प्राप्त आहेत याची सर्व आकडेवारी समितीला सादर करण्यात येईल व या सर्व तक्रारीचे निवारण दिनांक ३१ मार्च, २०१९ च्या आत करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी आश्वासित केले.

आतापर्यंत विमा कंपनीने ३३३ रुपयांपासून ६९० रुपयांपर्यंत प्रिमियम वाढविलेला होता. पण विभागाने यामध्ये विशेष लक्ष घालून गैरव्यवहार कमी केलेला आहे. त्यामुळे तो प्रिमियम ६४० रुपयांपर्यंत कमी केलेला आहे. त्यामुळे शासनाचे ११० कोटी रुपयांची बचत झालेली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले. कोणत्या जिल्ह्यामध्ये सर्वात जास्त बनावट रुग्ण आढळून आलेले आहेत? असे समितीने विचारले असता, कोल्हापूर जिल्ह्यामध्ये सर्वात जास्त बनावट रुग्ण आढळून आलेले आहेत, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभाग मागील वर्षी निगोशिएशन करण्यामध्ये कमी पडला असे तर झाले नाही ना? गैरव्यवहार कमी झाल्यामुळे प्रिमियम कमी होईल, असे समितीला वाटत नाही. समितीचे मत असे आहे की, गेल्या वर्षी प्रिमियम मध्ये निगोशिएशन करण्यास कमी पडले यावर्षी चांगले निगोशिएशन केल्यामुळे प्रिमियम मध्ये ५० रुपये कमी झालेले आहेत. मागील वर्षी ५० रुपये प्रिमियम जास्त दिलेला आहे यास जबाबदार कोण आहे? किमान यापुढे तरी चांगल्या प्रकारे निगोशिएशन करण्यात यावे असे समितीने सूचित केले असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

अभिप्राय व शिफारशी :

परिच्छेद क्रमांक ३.१ “राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना ”

परिच्छेद क्रमांक ३.१.७ “योजनेचे व्यवस्थापन”

अभिप्राय :–

३.१ वर्ष २०११-१७ दरम्यान महाराष्ट्र शासनाने योजनेच्या अंमलबजावणीसाठी संस्थेला रु. ३४१६. ३६ कोटीचा / निधी मुक्त केला. ज्यापैकी नोव्हेंबर २०१६ पर्यंत संस्थेने विमा कंपनीला ९. ३५ कोटी लाभार्थ्यांच्या विमा हप्त्यापोटी रु. ३००९. ३१ कोटी प्रदान केले. परंतु त्या बदल्यात फक्त ११. ८९ लाख लाभार्थ्यांचे दावे प्रतिपूर्तीसाठी प्राप्त झाले होते. जे, आरोग्य कार्डाचे वाटप न झाल्यामुळे, प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्यमित्रांची नियुक्ती न केल्यामुळे, आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यातील तुटवडा आणि योजनेला पर्याप्त प्रसिद्धी न दिल्यामुळे घडले होते.

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने, दारिद्र्यरेषेखालील कुटुंब तसेच ज्या दारिद्र्यरेषेवरील कुटूंबियांचे (शासकीय /निम शासकीय कर्मचारी आणि आयकर भरणाऱ्या व्यक्ती वगळून) उत्पन्न रु. एक लाख आणि कमी आहे तसेच अंत्योदय आणि अन्नपूर्णा शिधापत्रिकाधारक कुटुंबातील व्यक्तींना त्यांच्या ज्याविशिष्ट आजारांवर रुग्णालयात शल्यचिकित्सा आणि उपचार किंवा सल्ल्याव्दारे उपचारांची आवश्यकता असते त्यासाठी आरोग्य सेवा पुरविणाऱ्या पूर्वनिश्चित संस्थांव्दारे विशिष्ट सेवा देण्यासाठी राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेला मान्यता (मे २०११) देण्यात आली. आरोग्य विमा क्षेत्रातील सेवादायी सार्वजनिक -खाजगी भागिदारीतील ही एक एकमेव योजना असून, गरीब रुग्णांच्या आरोग्य विषयक गरजा पूर्ण करण्यासाठी आणि शासकीय आणि खाजगी क्षेत्रातील आरोग्य संस्थांव्दारे विशिष्ट आजारांसाठी सुरूवातीपासून शेवटपर्यंत रोख रक्कमरहित सेवा देण्याच्या उद्देशाने ती सुरू करण्यात आली आहे.

या योजनेची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने, मा. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना संस्था (संस्था) प्रस्थापित केली (मे २०११). या संस्थेचे मुख्य उद्दिष्ट महाराष्ट्र शासनाने निश्चित केलेल्या लाभार्थ्यांना आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी तयार केलेल्या राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना (किंवा इतर कुठल्याही नावाने ओळखली जाणारी इतर योजना) या योजनेबाबत संकल्पना, अंमलबजावणी, स्थापना, तरतूद, प्रशासन, सुधारणा आणि थेट पर्यवेक्षण करणे हे होते. या योजनेची राज्यभरात टप्प्याटप्याने अंमलबजावणी केली गेली. या योजनेची अंमलबजावणी सुरूवातीला २ जुलै, २०१२ पासून आठ जिल्ह्यांमध्ये आणि २१ नोव्हेंबर, २०१३ पासून पुढे संपूर्ण राज्यात करण्यात आली. या योजनेअंतर्गत निश्चित केलेल्या ३० वैशिष्टपूर्ण प्रवर्गाखालील १२१ उपचारोत्तर सल्ल्यांसह ९७१ उपचारांचा (टप्पा I अंतर्गत ९७२) समावेश होता ज्यापैकी १३१ उपचार हे आवश्यक सुविधा आणि नियोजित उपचार पद्धतीच्या उपलब्धतेनुसार फक्त योजनेअंतर्गत निर्धारीत सार्वजनिक आणि खाजगी रुग्णालये / शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालये यामधून करावयाचे होते. लाभार्थी कुटूंबियांची ओळख ही महाराष्ट्र शासनाच्या अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाने जारी केलेल्या पिवळया आणि नारंगी शिधापत्रिका सोबतच फोटो ओळखपत्राच्या आधारावर करावयाची होती. या योजनेचा लाभ सामुहीक तत्वावर कुटुंबातील प्रत्येक व्यक्तिला प्राप्त होणार होता. सदर योजनेअंतर्गत लाभार्थ्यांला, कुठल्याही योजनेअंतर्गत निर्धारीत रुग्णालयातील उपचारासंबंधीच्या प्रति वर्ष प्रति कुटुंब रु. १. ५ लाखापर्यंतच्या सर्व खर्चाच्या समावेशाची तरतूद होती. मुत्रपिंड प्रत्यारोपणाच्या प्रकरणांत विम्याची रक्कम प्रति वर्षी प्रति कुटुंब रु. २. ५ लाख होती. २८ एप्रिल, २०१६ पासून राज्यातील आत्महत्याप्रवण १४ जिल्ह्यातील श्वेत शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांनाही या योजनेअंतर्गत लाभार्थी म्हणून समाविष्ट केले गेले.

ज्या आरोग्य सेवा संस्थांनी पायाभूत सुविधा, मनुष्यबळ, यंत्रसामुग्री, यासंबंधी विहित निकषांची पूर्ति केली असेल आणि सेवा गुणवत्ता मानकांचे पालन केले असेल अशा संस्था या योजनेत सुचीबध्द होण्यास पात्र होत्या. मार्च २०१७ पर्यंत ४८७ आरोग्य सेवा संस्था (ज्यांना अंगीकृत रुग्णालये असे संबोधले जाते) योजने अंतर्गत समाविष्ट झाल्या.

योजनेची अंमलबजावणी उद्देशानुरुप झाली आणि ती किती प्रमाणात साध्य झाली, योजनेचे वित्तीय व्यवस्थापन करारानुसार आणि शासनाच्या वित्तीय नियमांप्रमाणे होते आणि, संनियंत्रण यंत्रणा व अंतर्गत नियंत्रण प्रभावी होते याची पडताळणी करणे हे राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेच्या लेखापरीक्षेचे उद्दीष्ट होते.

सदरहू योजना सन २०१२ पासून सुरू करण्यात आली. जी पहिली केवळ ८ जिल्ह्यांकरिता लागू करण्यात आली होती. त्यानंतर दि. २१ नोव्हेंबर, २०१३ पासून ही योजना सर्व जिल्ह्यांमध्ये लागू झाली व ९७१ उपचारांसाठी जवळजवळ ४८० स्पेशॅलिटी रुग्णालये या योजनेमध्ये अंतर्भूत झाली. डिसेंबर, २०१८ पर्यंत जवळपास रु. ५,०६० कोटी विमा कंपनीला प्रिमियमपोटी देण्यात आले. सद्यःस्थितीत रु. ४,३८० कोटींचे दावे कंपनीने निकाली काढले आहेत. ही योजना सुरू होण्याच्या सुरूवातीला लोकांमध्ये या योजनेची जागृती कमी प्रमाणात असल्यामुळे MOU मधील तरतूदीनुसार निधी शासनाला परत मिळाला. परंतु नंतर मात्र हा खर्च अधिक झाल्यामुळे शासनाला विमा कंपनीस पैसे देय ठरतात. परंतु ते पैसे अद्याप देण्यात आलेले नाहीत. विमा कंपनी व शासनामध्ये अनेक मुद्यांसंदर्भात व शासनातर्फे आकारण्यात आलेल्या दंडासंदर्भात एकमेकांकडे दावे करण्यात आलेले आहेत. यासाठी शासनामार्फत एक समिती गठीत करण्यात आली असून त्यामध्ये प्रश्नांचे निराकरण करण्याचा प्रयत्न करण्यात येईल अन्यथा हे प्रकरण लवादाकडे (आर्बीट्रेशन) पाठविण्यात येईल असेही विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. या योजनेचा कालावधी नोव्हेंबर, २०१६ ला संपला. त्यानंतर सप्टेंबर २०१६ मध्ये नवीन निविदा काढण्यात आली ज्यात प्रिमियमचा दर हा १,५०० रुपयांपेक्षा अधिक होता. त्यानुसार या योजनेंतर्गत काही नवीन रुग्णालयांचा समावेश करणे, काही नवीन कार्यपद्धती अंतर्भूत करणे, काही अटी शर्ती बदलणे या सर्व मुद्यांसंदर्भात विमा कंपनीसोबत वाटाघाटी करून रु. ५०१ चा प्रिमियम ठरविण्यात आला. त्यानंतर दि. १ ऑक्टोबर, २०१७ पासून त्यामध्ये वाढ करून तो रु. ५४० इतका करण्यात आला. कारण इन्श्युरन्स क्लेम रेशिओ हा १३० पर्यंत जात होता. त्यानंतर सन २०१८ मध्ये प्रिमियमच्या रकमेत वाढ करून तो रु. ६९० इतका करण्यात आला. प्रिमियमचा दर रु. ५४० वरून रु. ६९० व त्यानंतर रु. १८०० पर्यंत गेल्याने यात यश मिळू शकले नाही. दरम्यानच्या काळात आयुष्यमान भारत योजनेचा लाभ केंद्र शासनाने दिलेला असून आणि केंद्र व राज्य शासनाची योजना एकत्रित करावयाची असल्याने केंद्र शासनाने विमा कंपनीशी वाटाघाटी करून विम्याचा दर रु. ६९० इतका वाढविण्यात आला. त्यानुसार आजतागायत रु. ५०६० कोटी विमा हप्त्यापोटी भरण्यात आले व रु. ४३८०

कोटीच्या दाव्यांची प्रतिपूर्ती करण्यात आली. त्यानंतर आयुष्यमान भारत योजनेची अंमलबजावणी राज्यात सुरू झाली. केंद्र शासनाने ठरवून दिल्यानुसार Social Economic Caste Sensex Survey डाटानुसार ८३ लक्ष लाभार्थी निश्चित झाले आहेत. सर्व्हेचा सन २०१२-१३ साली अभ्यास करून निकष ठरविण्यात आलेले आहेत. जे ग्रामीण व शहरी भागांसाठी वेगवेगळे आहेत. ज्यात ग्रामीण भागांसाठी अनुसूचित जाती-जमातींची कुटुंबे, प्रौढ पुरुष नसलेले कुटुंब प्रमुख, स्त्री कुटुंब प्रमुख, भूमीहीन मजूर अशा अनेक लाभार्थ्यांचा समावेश योजनेत करण्यात आला आहे. तर शहरी भागामध्ये पदपथावर राहणारे, कचरा जमा करणारे अनेक लाभार्थी असून केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे यादी देण्यात आलेली आहे व त्यात बदल करण्याचा अधिकार राज्य शासनाला नाही. त्याअनुषंगाने आयुष्यमान भारत योजनेचे ८३ लक्ष लाभार्थी आहेत. तर राज्य शासनाच्या योजनेतून २. २२ कोटी कुटुंबांना लाभ देण्यात येत आहे. केंद्र शासनापेक्षा राज्य शासनाच्या योजनेचे लाभार्थी तीन पट अधिक आहेत. केंद्र शासनाच्या यादीतील निकषांमध्ये बसणाऱ्या लाभार्थी कुटुंबाकरिता ६० टक्के निधी केंद्र शासन देणार आहे. राज्य शासनाच्या योजनेतील विम्याचा प्रिमियम रु. ६९० इतका आहे. राज्य शासनाची योजना केंद्र शासनाच्या योजनेपेक्षा मोठी असल्याने ती ग्राह्य धरण्याची बाब केंद्र शासनाने मान्य केली. त्यामुळे राज्य शासनाच्या योजनेमध्ये केंद्र शासनाच्या योजनेतील कुटुंबांचा देखील समावेश आहे. अतः ६० टक्के रक्कम केंद्र शासन राज्य शासनाला देणार आहे. मात्र राज्य शासनाची आरोग्य विमा मर्यादा ही रु. १. ५ लक्ष असून केंद्र शासनाची विमा मर्यादा रु. ५ लक्ष आहे. अशा परिस्थितीत विमा कंपनी केवळ रु. १. ५ लक्ष आणि किडनी तसेच अन्य गंभीर आजारावरील उपचारासाठी रु. २. ५ लक्ष रक्कम लाभार्थ्यास अदा करण्यात येईल व त्यापेक्षा अधिक रक्कम रु. ५ लक्षच्या मर्यादेत राज्य शासनाकडून अदा करण्यात येईल असेही विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. राज्य शासनाअंतर्गत ९७१ आणि केंद्र शासनाअंतर्गत १३४९ उपचारांचा समावेश असून केंद्र शासनाच्या योजनेत अधिक उपचारांचा समावेश आहे. यातील फरक हा ३७८ उपचारांसाठी विमा कंपनीसोबत राज्य शासनाने सामंज्यस्य करार केलेला नसल्याने सदरहू विमा दावे राज्य शासनाकडून देण्यात येतील असेही समितीसमोर स्पष्ट करण्यात आले. सदरहु उपचारांचे दर रुग्णालयांना ठरवून देण्यात आलेले असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

शिफारस

३.२ राज्यात अंमलबजावणी झालेल्या राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेच्या विषयाधारित लेखापरीक्षेत असे आढळून आले की, शासन/संस्थेने, एकूण शिधापत्रिकाधारकांची नावे आणि शिधापत्रिका क्रमांक याविषयीचा कोणताही तपशील प्राप्त न करता एकूण शिधापत्रिकाधारकांची आकडेवारी प्राप्त केली होती. त्यामुळे या योजनेखालील लाभार्थ्यांच्या माहितीची अचूकता/अधिकृतता लेखापरीक्षेला पडताळता आली नाही. लाभार्थी निश्चित करण्यासाठी तसेच योजनेच्या लाभांविषयी लाभार्थ्यांना सजग करण्यासाठी योजनेखाली अभिप्रेत असलेल्या आरोग्य कार्डांचे लाभार्थ्यांना वितरण करण्यात आले नव्हते. आरोग्य कार्डांवर केलेल्या छपाईचा खर्चही वाया गेला होता. आत्महत्याप्रवण १४ जिल्ह्यांच्या श्वेत शिधापत्रिकाधारक शेतक-यांपुरताच विमा हप्ता मर्यादित ठेवण्याऐवजी (या जिल्ह्यातील शासकीय व निमशासकीय शुभ्र शिधापत्रिकाधारक कर्मचाऱ्यांना ही योजना लागू नसताना) सर्वच श्वेत शिधापत्रिकाधारकांचा विमा हप्ता भरल्यामुळे विमा हप्ता विमा कंपनीला ज्यादा प्रदान केला गेला.

योजनेअंतर्गत निर्धारीत सर्व रुग्णालयांमध्ये पर्याप्त संख्येत आरोग्य मित्र नियुक्त केले नव्हते तसेच ग्रामीण/प्राथमिक आरोग्य केंद्रे/उपजिल्हा/महिला शासकीय रुग्णालयात आरोग्यमित्रांची नियुक्तीच न केल्यामुळे, लाभार्थी आणि त्यांच्या कुटुंबियांचे मार्गदर्शन करण्यावर आणि रुग्णांना संदर्भित करण्यावर/उपचाराच्या सुविधेवर प्रतिकूल परिणाम झाला होता. मानकांत विहीत केल्यापेक्षा प्रसिद्धीवर कमी खर्च केल्यामुळे योजनेच्या लाभांविषयी जागरुकता निर्माण करण्यावर परिणाम झाला होता.

योजनेच्या व्यापक प्रसिद्धीचा अभाव, आरोग्य शिबिरे घेण्यातील कमतरता आणि प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्यमित्रांची नियुक्ती न करणे या कारणांमुळे नोव्हेंबर २०१६ पर्यंत या योजनेच्या ९.३५ कोटी लाभार्थ्यांसाठी विमा कंपनीला प्रदान केलेल्या विमा हप्त्याच्या रु. ३००९.३१ कोटीच्या तुलनेत, ११.८९ लाख इतके अत्यल्प दावे समायोजनासाठी प्राप्त झाले होते. अशाप्रकारे, विमा कंपनीला प्रदान केलेल्या विमा हप्त्याच्या खर्चाच्या तुलनेत खूपच कमी प्रमाणात योजनेचे फायदे प्राप्त झाले होते. याशिवाय, अपात्र लाभार्थ्यांसाठी विमा कंपनीला अदा करण्यात आलेली रु. १.४३ कोटी इतकी रक्कम विमा कंपनीने परत केली नव्हती. विमा कंपनीकडे रु. ४७.६३ कोटी इतक्या मोठ्या प्रमाणात अतिरिक्त विमा हप्ता शिल्लक होता जो शासनाला देय होता. सामंजस्य करारातील अटी शर्तीनुसार विम्याचा दावा केल्यावर पॉलिसी कालावधीच्या शेवटी जर विमा हप्त्याची अतिरिक्त राशी उरली तर विमा कंपनीच्या प्रशासकीय खर्चासाठी २० टक्के तरतूद करून शिल्लक रक्कम विमा कंपनीने संस्थेला परत करणे बंधनकारक होते. विमा कंपनीने तिला योजनेच्या प्रदान केलेल्या विमा हप्त्याची २० टक्के रक्कम आधीच प्रशासकीय खर्चासाठी समायोजित केली होती. त्यामुळे जरी सामंजस्य करारात अतिरिक्त रकमेतून १० टक्के समायोजन करण्याचे नमूद केले होते तरी ते देय नव्हते. त्यामुळे विमा कंपनीकडे पडून असलेल्या अतिरिक्त विमा हप्त्याच्या १० टक्के रक्कमेचे अतिरिक्त समायोजन केल्यामुळे विमा कंपनीला रु. ८.७५ कोटींचा दुहेरी लाभ झाला. योजनेअंतर्गत निर्धारीत रुग्णालयांकडे प्राप्त झालेल्या दाव्याचा अतिरिक्त निधी रुग्णालयांकडे पडून होता कारण सदर निधी सरकारी खात्यात जमा केला जात असल्याची सुनिश्चिती संस्थेने केली नव्हती असे अनेक गंभीर आक्षेप महालेखाकारांनी नोंदविले आहेत. सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीने ही योजना अत्यंत महत्त्वाची असून त्याची अंमलबजावणी करताना प्रशासकीय स्तरावरून पुर्ण नियोजन करून व अधिक दक्षता घेऊन ती करणे अभिप्रेत व आवश्यक आहे. जेणेकरून या योजनेचे लाभ समाजातील शेवटच्या स्तरापर्यंत पोहोचणे शक्य होईल. परंतु त्यात निश्चितच कमतरता व कमकुवतपणा होता असे स्पष्टपणे दिसून येते. अतः अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाकडून नावे आणि शिधापत्रिका क्रमांकानुसार माहिती प्राप्त केली जावी आणि पात्र लाभार्थ्यांचा संपूर्ण माहिती संच संस्थेने तयार करावा. विमा कंपनीला विम्याचा हप्ता पात्र लाभार्थ्यांच्या सूचीबरोबर द्यावा आणि तो लाभार्थ्यांच्या संख्येवर देऊ नये व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ३.१.७.१ "लाभार्थ्यांना आरोग्य कार्डाचे वितरण"

अभिप्राय

३.३ महाराष्ट्र शासनाने योजनेच्या पहिल्या टप्प्यातील आठ जिल्ह्यांतील दारिद्र्य रेषेखालील आणि दारिद्र्य रेषेवरील शिधापत्रिकाधारक लाभार्थ्यांना आरोग्य कार्ड जारी करण्याचे ठरविले (मे, २०११) योजनेचा टप्पा I मधील संस्था आणि नॅशनल इन्शुरन्स कंपनी मधील सामंजस्य करारातील कलम ८ नुसार, ही आरोग्य कार्ड महाराष्ट्र शासनाच्या अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाकडे उपलब्ध असलेल्या पिवळ्या आणि नारंगी शिधापत्रिकाधारकांच्या माहितीचा उपयोग करून तयार करावयाची आहे. सामंजस्य करारानुसार, योजनेअंतर्गत लाभार्थी कुटुंबाची निवड करण्यासाठी शिधापत्रिका भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण, यांनी जारी केलेल्या आधारकार्ड क्रमांकाशी जोडावयाची होती. जर आरोग्य कार्डावर लाभार्थ्यांचा आधार क्रमांक नोंदविला नसेल तर, त्यांने रुग्णालय सोडण्यापूर्वी, रुग्णालयात असलेल्या यूआयडीएआय नोंदणी विभागात नोंदणी करावयाची होती. भविष्यात नागरिकांना विशिष्ट ओळख आणि अधिप्रमाणनासाठी आधार क्रमांक उपलब्ध होणार असल्याने योजनेच्या संगणक प्रणालित आधार क्रमांक नोंदविण्याची सुविधा असणे आवश्यक होते. मात्र मुंबईतील एका कंपनीबरोबर करार करून योजनेच्या टप्पा I अंतर्गत लाभार्थ्यांसाठी आरोग्य कार्डाची छपाई, आवेष्टीत आणि वितरण करण्याचे काम प्रति कार्ड रु. ३.६५ दरावर सोपविण्यात आले होते. योजनेच्या पहिल्या टप्प्याच्या आठ जिल्ह्यांमधील ४९.०३ लाख लाभार्थ्यांपैकी, ४२.१५ लाख लाभार्थ्यांची आरोग्य कार्ड छापली होती. ज्यापैकी २३. ६४ लाख आरोग्य कार्ड योजनेच्या लाभार्थ्यांना वितरीत करण्यात आली होती आणि १८.५१ लाख एप्रिल २०१५ पर्यंत वितरीत केली नव्हती. अशाप्रकारे, १८.५१ लाख कार्डांच्या छपाईवरील रु. ६८ लाख खर्च वाया गेला. त्यानंतर, सार्वजनिक आरोग्य विभागाने संस्थेला अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाकडून लाभार्थ्यांची वैधता प्राप्त डीजीटाईज माहिती घेण्याच्या सूचना दिल्या (मे, २०१५) आणि तो पर्यंत आरोग्य कार्डाची छपाई आणि वितरण तात्पुरते तहकुब करण्याचे सांगितले. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने शिधापत्रिकेच्या डीजीटाईज्ड माहितीच्या वैधतेचे काम प्रगतीपथावर असल्याचे कळविले (जुलै, २०१६). त्यामुळे संस्थेने लाभार्थ्यांना आरोग्य कार्ड वितरण करणे जून २०१७ पासून पुर्णपणे थांबविले.

तसेच शिधापत्रिका क्रमांक, ज्या व्यक्तींच्या नावे शिधापत्रिका जारी केली आहे त्याचे नाव व शिधापत्रिकाधारकाच्या कुटुंबातील एकूण व्यक्ती व व्यक्तीची नावे इत्यादी तपशील न देता, फक्त एकूण शिधापत्रिकाधारकाच्या संख्येनुसार विम्याचा हप्ता विमा कंपनीला अदा करण्यात आला, या तपशीलाच्या अभावामुळे विमा कंपनीला अदा केलेल्या विम्याच्या हप्त्याचा अचूकपणा निश्चित करता आला नाही. अशाप्रकारे, शिधापत्रिका/ आधार कार्डाच्या आधारावर लाभार्थी निश्चित न केल्यामुळे आणि आरोग्य कार्डाचे वाटप न झाल्यामुळे, लाभार्थ्यांमध्ये योजनेच्या लाभांची अंमलबजावणी परिणामकारकरित्या झाली नाही असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय दि. ३ मार्च, २०१२ नुसार राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना आरोग्य ओळखपत्र वितरणाबाबत आदेश देण्यात आले होते. त्यानुसार आरोग्य ओळखपत्र वितरणाची कार्यवाही अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या सहमतीने करण्यात आली. त्याअनुषंगाने विहित पद्धतीचा अवलंब करून आरोग्य ओळखपत्र छपाई करण्यात आली.

राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेच्या पहिल्या टप्प्यातील ८ जिल्ह्यांमधील पिवळे, अंत्योदय, अन्नपूर्णा अन्नयोजना व केशरी शिधापत्रिकाधारक कुटुंबांसाठी अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून दि. ३१-०५-२०१० अखेर ४९,०३,१४० इतकी लाभार्थी कुटुंब संख्या निश्चित करण्यात आली. त्यानुसार छपाई केलेली आरोग्य ओळखपत्र वितरणासाठी जिल्हास्तरावर आरोग्य ओळखपत्र वाटपाचे काम देण्यात आले. त्यातील ४२,१५,१९३ इतक्या छपाई झालेल्या आरोग्य ओळखपत्रांपैकी २३,६३,८८० आरोग्य ओळखपत्र वाटप झाली असून १८,५१,३१३ इतकी आरोग्य ओळखपत्र अवितरीत राहिली.

यामध्ये लाभार्थी कुटुंबातील सर्व सदस्यांचे एकत्रित फोटो मिळण्यामध्ये येणाऱ्या अडचणी, लाभार्थीचे उत्पन्न १ लाखाच्या मर्यादेच्या वर जाणे, संबंधित पत्त्यावर व्यक्ती न आढळणे, नावे चुकीची असणे, मुंबई शहरात झोपडपट्टी पुनर्विकास व इमारत पुनर्विकास यामुळे हजारो शिधापत्रिकाधारकांचे अन्यत्र स्थलांतरण होणे इत्यादी अनेक कारणांमुळे आरोग्यपत्र वितरण करता आले नाही. सदर योजनेंतर्गत आरोग्य कार्ड हे ओळखपत्र म्हणून ग्राह्य धरण्यात येते. लाभार्थ्यांना योजनेचा लाभ शिधापत्रिकेच्या आधारावर देण्यात येत असल्याने आरोग्य कार्ड वितरीत न झाल्यामुळे त्याचा योजनेवर काही परिणाम झाला नाही असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

शिफारस

३.४ **या योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना आरोग्य कार्डाचे वितरण करणे आवश्यक व अभिप्रेत असताना मोठ्या प्रमाणात आरोग्य कार्डाचे वितरण न केल्याचे आक्षेप महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात नमूद केले आहेत. मुंबईमध्येच ४२,१५,१९३ आरोग्य कार्डांपैकी १८.८१ लक्ष आरोग्य कार्डांचे वितरणच करण्यात आले नाही. तसेच अन्य जिल्ह्यांमधील जवळजवळ ४४ टक्के आरोग्य कार्डांचे वितरण झाले नाही. अशाप्रकारे आरोग्य कार्ड वितरण न करण्यामागील कारणमिमांसा समितीने विचारली असता सदरहू योजना जुलै, २०१२ पासून सुरू झाली. महाराष्ट्राने आंध्रप्रदेशमधील आरोग्य योजनेचा आधार घेवून महाराष्ट्रात ही योजना सुरू केली. राज्यात योजनेचा टप्पा १ सुरू झाल्यानंतर आरोग्य कार्ड तयार करण्यासाठी घरोघरी जावून माहिती घेणे, माहिती जमा करणे विभागाला शक्य नसल्यामुळे अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून ही माहिती घेण्यात आली व प्रत्येक शिधापत्रिकाधारकाकडून "बी" फॉर्म भरुन घेवून त्यावर शिधापत्रिकाधारकांच्या कुटुंबाचा एकत्रित फोटो घेवून ते शिधावाटप दुकानदाराकडे सादर करून या योजनेची अंमलबजावणी सुरू करण्याचे नियोजित होते. त्याअनुषंगाने शासन निर्णय निर्गमित करून दोन संस्थांची नियुक्ती करण्यात आली. ज्यावेळी सदरहू काम सुरू झाले त्यावेळी**

शिधावाटप दुकानदारांनी या कामावर बहिष्कार घातला. त्यामुळे अंगणवाडी सेविकांची मदत घेण्यात आली ज्यास उच्च न्यायालयाने नकार दिला. त्यानंतर काही स्वयंसेवी संस्थांची मदत घेण्याचा देखील प्रयत्न करण्यात आला परंतु तो देखील निष्फळ ठरला. मात्र दरम्यानच्या काळात या योजनेचा फायदा सर्वांना मिळण्याच्यादृष्टीने या योजनेच्या लाभासाठी रेशन कार्ड हीच अनुज्ञेयता ठरविण्यात आली व निवडणूक आयोगाने ठरविलेल्या १४ कागदपत्रांपैकी ओळख पटविण्यासाठी कोणत्याही कागदपत्रांचा पुरावा ग्राह्य धरण्यात आला. त्यामुळे आरोग्य कार्ड हे केवळ ओळख पटविण्यासाठीचे दस्तावेज असून योजनेच्या अंमलबजावणीत वा पात्र लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळणेसाठी या आरोग्य कार्डामुळे कोणताही अडथळा निर्माण झाला नसल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. आता अन्न व नागरी पुरवठा विभागाने एक मोठी मोहिम हाती घेतली असून नॅशनल फुड सिक्युरीटी ॲक्टनुसार लाभार्थ्यांची आधार जोडणी करून कार्ड तयार करण्याची कार्यवाही अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या स्तरावरून करण्यात येत आहे. त्यामुळे नवीन निविदा काढताना या माहितीची मदत घेवून पुढील कार्यवाही करण्यात येईल असेही विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

केंद्र व राज्य शासनाने राबविलेली सदरहू आरोग्य योजना ही रुग्णांसाठी अत्यंत हितकारक व उपयोगी योजना असून त्याचा लाभ जास्तीत जास्त पात्र लाभार्थ्यांना मिळण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेने अतिशय नियोजनबद्धरित्या काम केले पाहिजे. कोणत्याही प्रशासकीय, तांत्रिक व कार्यपद्धतीविषयक त्रुटी या योजनेच्या अंमलबजावणीत राहू नये याची पूर्ण दक्षता विभागाने घ्यावी व योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी ज्या ज्या बाबींची पुर्तता करणे बंधनकारक आहे त्या विनाविलंब करण्यात याव्यात. तसेच ज्या लाभार्थ्यांना आयुष्मान भारत योजनेंतर्गत आरोग्य कार्ड प्राप्त झालेले आहे त्यांना राज्य शासनाच्या आरोग्य विमा योजनेची आवश्यकता नाही. त्यामुळे योजनेचा दुहेरी लाभ मिळू नये अथवा शासनाकडून दुहेरी प्रिमियम विमा कंपन्यांना जावू नये याअनुषंगाने आवश्यक ती दक्षता व तपासणी विभागाने करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ३.१.७.२ "आत्महत्याप्रवण जिल्ह्यांच्या लाभार्थी शेतकऱ्यांची नेमकी संख्या ठरविण्यासाठीचे सर्वेक्षण"

अभिप्राय

३.५ महाराष्ट्र शासनाने राज्यातील १४ आत्महत्या प्रवण जिल्ह्यातील श्वेत शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांनादेखील या योजनेचा लाभ देण्याचे ठरविले (एप्रिल २०१६). या जिल्ह्यातील लाभार्थी या योजनेचा लाभ अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाकडून जारी केलेली श्वेत शिधापत्रिका किंवा महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाकडून जारी केलेला सातबाराचा उतारा यांच्या आधारावर प्राप्त करु शकत होते आणि जर हे दोन्ही दस्तावेज उपलब्ध नसल्यास सदर लाभासाठी संबंधित जिल्ह्याच्या महसूल अधिकाऱ्यांचे पत्र पुरेसे होते. त्यानुसार, या १४ आत्महत्याप्रवण जिल्ह्यांच्या लाभार्थ्यांचा या योजनेत समावेश करण्यासाठी संस्था आणि नॅशनल इन्शुरन्स कंपनी यामध्ये एक सुधारित करार करण्यात आला (जून, २०१६).

परंतु १४ जिल्ह्यातील एकूण १,६५,९१२ श्वेत शिधापत्रिकाधारकांसाठी विमा कंपनीला रु. ६.३५ कोटीचे प्रदान केले (मे २०१६) या योजनेचा लाभ आत्महत्याप्रवण जिल्ह्यांतील फक्त श्वेत शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांनाच देय असतांना, या जिल्ह्यातील सर्व श्वेत शिधापत्रिकाधारकांसाठी विम्याच्या हप्त्याचा भरणा केल्यामुळे विमा हप्त्याचे अतिरिक्त प्रदान झाले ज्याचे निश्चित प्रमाण लाभार्थ्यांच्या अधिकृत माहितीच्या अभावी मोजता आले नाही. तसेच योजनेच्या दुसऱ्या टप्प्याच्या सामंजस्य कराराच्या कलम १४ नुसार, सेवाकर आणि प्रशासकीय शुल्क यांचा परतावा ग्राह्य नसल्याने विमा कंपनीला विमा हप्त्याचा भाग म्हणून प्रदान केलेला सेवाकर आणि २० टक्के प्रशासकीय शुल्क निष्फळ ठरणार होते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

याचा अर्थ अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाकडून श्वेत शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांची अधिकृत यादी प्राप्त न करता किंवा कोणतेही सर्वेक्षण न करता सर्व श्वेत शिधापत्रिकाधारकांसाठी विमा हप्त्याचे प्रदान केले गेले होते. परिणामी, राजकोषावर अतिरिक्त आर्थिक भार तर पडलाच शिवाय विमा कंपनीला अदेय लाभ मिळाला असेही महालेखाकारांनी नमूद केले.

यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर स्पष्ट केले की, दिनांक २८ एप्रिल, २०१६ रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांतील शुभ्र शिधापत्रिकाधारक शेतकरी कुटुंबाना त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या शिधापत्रिका तसेच ७/१२ च्या उताऱ्यावर काही अटींच्या अधीन राहून लाभ अनुज्ञेय राहील. तसेच एकूण १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील "सर्वच" शुभ्र शिधापत्रिकाधारकांचा "अतिरिक्त विमा हप्ता" विमा कंपनीस अदा करण्यात येईल असेही त्यात स्पष्टपणे नमूद होते. त्याआधारेच एकूण १,६५,९१२ शुभ्र शिधापत्रिकाधारक कुटुंबांकरिता रुपये ६,३२,५९,७५७ इतक्या विमा हप्ता रकमेचा धनादेश नॅशनल इन्शुरन्स कंपनीला अदा करण्यात आला.

परंतु सदर शासन निर्णयात शासकीय व निमशासकीय शुभ्र शिधापत्रिकाधारक कर्मचाऱ्यांना ही योजना लागू नसल्याचेदेखील त्यात स्पष्टपणे नमूद केले होते. परंतु शेतकरी आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यांतील शासकीय व निमशासकीय शुभ्र शिधापत्रिकाधारक कुटुंबांच्या लाभार्थ्यांची निश्चित आकडेवारी उपलब्ध नसल्यामुळे व सर्वच जिल्ह्यांचा एकत्रित डाटा वेळेत उपलब्ध न झाल्यामुळे सरकारी आणि निमसरकारी कर्मचारी व अधिकारी वगळता उर्वरित सर्व शुभ्र शिधापत्रिकाधारक कुटुंबांचा प्रीमियम भरण्याबाबतचा निर्णय घेतला गेला असे समितीस सांगण्यात आले.

शिफारस

३.६ आत्महत्याप्रवण जिल्ह्यांच्या लाभार्थी शेतकऱ्यांची नेमकी संख्या ठरविण्यासाठीचे सर्वेक्षण यासंदर्भात महालेखाकारांनी आक्षेप नोंदविलेले असून याची गंभीर दखल विभागाने घेणे आवश्यक होते. राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्त्यांचे वाढते प्रमाण पाहता या योजनेची अंमलबजावणी व त्याअनुषंगाने प्राप्त होणारे लाभ अशा आत्महत्त्याप्रवण जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांना प्राप्त होणे आवश्यक होते. परंतु शासनाकडून या योजनेची अंमलबजावणी पात्र लाभार्थ्यांची निवड न करता सरसकट सर्वच श्वेत शिधापत्रिकाधारकांना करण्यात आली. राज्यात शेतकऱ्यांचा प्रश्न गंभीर असून त्यांना शाश्वत आरोग्य योजनांच्या माध्यमातून सेवा पुरविली जाण्याच्या उद्देशाने या योजनेत आत्महत्त्याग्रस्त जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा देखील समावेश करण्यात आला. सन २०१६ पासून ही योजना १४ जिल्ह्यांमध्ये लागू करण्यात आली. त्यासाठी शुभ्र शिधापत्रिकाधारकांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय करण्यात आला. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी दि. २८ एप्रिल, २०१६ रोजी शासन निर्णय निर्गमित करून अन्न व नागरी पुरवठा विभागाने दिलेल्या शुभ्र शिधापत्रिकाधारकांची संख्या ग्राह्य धरुन प्रिमियमचे प्रदान विमा कंपन्यांना करण्यात आले. मात्र शासन निर्णयामध्ये या योजनेचा लाभ शासकीय व निमशासकीय संस्थेतील अधिकाऱ्यांना देता येणार नाही असे स्पष्टपणे नमूद असताना सरसकट सर्व शुभ्र शिधापत्रिकाधारकांचे प्रिमियम भरण्यात आले. ही अतिशय गंभीर बाब असून योजनेची अंमलबजावणी कोणतीही शहानिशा न करता सरसकट करण्यात आली, त्यामुळे निश्चितच विमा कंपन्यांना मोठ्या प्रमाणात अनुचित लाभ झाल्याचे दिसून येते. याअनुषंगाने सुरूवातीला रु. ४.७३ कोटीचे अतिरिक्त प्रदान करण्यात आले. ही रक्कम विभागाला परत देण्यासंदर्भात विभागाच्या स्तरावरून पाठपुरावा सुरू असून वसुलीची प्रक्रिया सुरु करण्यात आल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. सद्यःस्थितीत केवळ रु. ८१,९२४ इतक्या रकमेची वसुली झाल्याचे समितीस सांगण्यात आले. विभागाने ही परताव्याची रक्कम रु. ७.६९ कोटी असल्याचे निदर्शनास आणले व ही रक्कम विमा कंपनीने तात्काळ भरण्याबाबत पत्रव्यवहार केला असून त्यांनी ही रक्कम परत केली नाही. त्यामुळे प्रकरण पुढील कार्यवाहीसाठी लवादाकडे सुपूर्द करण्यात आले असल्याचेदेखील समितीस सांगण्यात आले. सन २०१६ मध्ये आत्महत्त्याग्रस्त शेतकऱ्यांसाठी ही योजना जाहीर झाली असताना शुभ्र शिधापत्रिकाधारकांपैकी शेतकरी असलेल्या शिधापत्रिकाधारकांची तपासणी करण्याची जबाबदारी ही विभागाची होती. या योजनेंतर्गत पात्र ठरणाऱ्या शेतकऱ्यांची यादी विभागाला कृषि आणि महसूल विभागासोबत योग्य तो समन्वय साधून प्राप्त करून घेता आली असती, परंतु तसे प्रयत्नदेखील विभागाकडून झाले नाहीत. परिणामी पात्र लाभार्थ्यांची कोणतीही शहानिशा न करता सरसकट शुभ्र शिधापत्रिकाधारकांचा संपुर्ण प्रिमियम विभागाने भरुन टाकला ही अतिशय गंभीर बाब आहे. या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी व वसुलपात्र रक्कम विमा कंपन्यांकडून वसूल करण्यात यावी व या योजनेचा लाभ केवळ १४ जिल्ह्यातील श्वेत शिधापत्रिकाधारक पात्र शेतकऱ्यांना मिळण्याच्यादृष्टीने आवश्यक ती उपाययोजना व दक्षता शासनस्तरावरून घेण्यात यावी. तसेच लाभार्थी हा शासकीय/निमशासकीय कर्मचारी आणि आयकर दाता नसल्याचे घोषणापत्र आवेदकाकडून प्राप्त करण्याची तरतूद करावी आणि संस्थेने या योजनेखाली लाभार्थ्यांना लाभ देण्यापूर्वी याची खात्री करावी. संस्थेने अशा अपात्र लाभार्थ्यांना सर्व दस्तावेजांतून निरस्त करावे आणि संबंधित रुग्णालयांना तसे कळवावे. विमा कंपनीकडे पॉलिसीचे नुतनीकरण करण्यापूर्वी, आत्महत्त्याप्रवण १४ जिल्ह्यांतील श्वेत शिधापत्रिकाधारक शेतकरी निश्चित करावे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ३.१.७.३ "योजनांतर्गत विहित केलेल्या सुविधांचा अभाव"

(i) आरोग्यमित्र

अभिप्राय

३.७ टप्पा I च्या सामंजस्य कराराच्या कलम २३ मध्ये अशी तरतूद आहे की, विमा कंपनीने प्रत्येक निर्धारीत रुग्णालयात किमान तीन आरोग्यमित्रांची नियुक्ती करावी. तसेच, दुसऱ्या टप्प्याच्या सामंजस्य कराराच्या कलम २३ नुसार, रुग्णालयात दाखल, उपचार आणि रोख रक्कमरहित व्यवहारांसंबंधी प्रक्रीया सुलभ करण्यासाठी एकूण ७०० आरोग्यमित्रांची नियुक्ती करावी. निर्धारित लाभार्थ्यांमध्ये योजनेच्या लाभाविषयी सजगता निर्माण करण्यास देखील आरोग्यमित्र सहाय्य करतात.

अशाप्रकारे टप्पा I आणि टप्पा II अंतर्गत अनुक्रमे ६९ आणि ३७१ योजनेअंतर्गत निर्धारित रुग्णालयांमध्ये, २०७ आणि ७०० आरोग्यमित्रांची नेमणूक करावयाची होती. परंतु तृतीय पक्ष प्रशासकीय कंपन्यांनी १०९ आणि ६६० आरोग्यमित्र नियुक्त केले होते, ज्यामुळे अनुक्रमे ९८ आणि ४० आरोग्यमित्रांची कमतरता होती. तसेच, विमा कंपनीने संस्थेच्या सल्ल्याने सगळ्या ग्रामीण / प्राथमिक आरोग्य केंद्र / उप-जिल्हा / शासकीय महिला रुग्णालयात योजनेच्या प्रचारासाठी, आरोग्य शिबीरांसाठी लोकांना प्रोत्साहित करण्यासाठी, लाभार्थी कुटूबियांचे समुपदेशन करण्यासाठी, या रुग्णांना संदर्भित केलेल्या रुग्णालयात जाण्यासाठी / उपचारांना मदत करण्यासाठी आणि उपचारोत्तर प्रक्रियेसाठी आरोग्यमित्रांची नियुक्ती करावयाची होती. परंतु विमा कंपनीने ग्रामीण / प्राथमिक आरोग्य केंद्र, उपजिल्हा/शासकीय महिला रुग्णालयात आरोग्यमित्रांची नियुक्ती केली नव्हती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

पहिल्या टप्प्यामधील जिल्ह्यातील अंगीकृत रुग्णालयात विमा कंपनीद्वारे ३ आरोग्यमित्रांची नेमणूक पुर्णवेळ करण्यात आली होती. दुसऱ्या टप्प्यात ३७० रुग्णालयांसाठी एकूण ७०० आरोग्यमित्र नियुक्त करण्यात आले. पहिल्या टप्प्यात प्राथमिक उपचार केंद्रात ४०६ आरोग्यमित्रांची नियुक्ती

विमा कंपनीने केली होती. योजनेअंतर्गत सर्व उपजिल्हा रुग्णालये व महिला रुग्णालयांमध्ये आरोग्यमित्र नेमलेले आहेत. योजनेंतर्गत अंगीकृत रुग्णालयात २४ तास आरोग्यमित्र उपलब्ध असून आरोग्यमित्रामार्फत लाभार्थ्यांना योजनेविषयी मार्गदर्शन केले जाते. यामुळे योजनेच्या अंमलबजावणीवर विपरीत परिणाम झालेला नाही असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

शिफारस

३.८ आरोग्यमित्रांची नियुक्ती सामंजस्य करारात विहित प्रमाणात करण्यात आली नाही असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत. या योजनेसंदर्भातील सामजंस्य करारातील तरतूदीअन्वये टप्पा १ मध्ये प्रत्येक रुग्णालयामध्ये किमान ३ आरोग्यमित्रांची व टप्पा २ मध्ये एकूण ७०० आरोग्यमित्रांची नियुक्ती करण्याबाबतची तरतूद असताना पुरेशा प्रमाणात ही नियुक्ती न करण्यात आल्यामुळे रुग्णालयात दाखल, उपचार, रोख रक्कमरहित व्यवहारासंबंधी प्रक्रिया, योजनेच्या लाभांविषयी सजगता निर्माण करण्यात निश्चितच बाधा निर्माण झाली. इतकेच नव्हेतर आरोग्यमित्रांच्या नियुक्तीचे अधिकार शासनाला व योजनेला कार्यान्वित करणाऱ्या संस्थेला आहेत. कोणत्याही परिस्थितीत हे अधिकार रुग्णालयांना नाहीत, असे असताना शासनाने व विमा कंपनीने याच्या अंमलबजावणीकडे दुर्लक्ष केले ज्याचा गंभीर परिणाम या योजनेवर झाला व आरोग्यमित्रांची नियुक्ती पुरेशा प्रमाणात न झाल्यामुळे योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीत त्यांचा उपयोग होवू शकला नाही. ज्या रुग्णालयांनी पुरेशा प्रमाणात ह्या आरोग्यमित्रांची सुविधा पुरविली नाही त्याबाबत दंड स्वरूपात रु. ३१.८१ कोटीची मागणी संबंधित विमा कंपनी वा संस्थेकडून विभागाने केलेली आहे. सामजंस्य करार करतेवेळी आरोग्यमित्रांची संख्या ठरविताना काही त्रुटी राहिलेल्या असून त्यात २४ तास आरोग्यमित्र उपस्थित राहणेबाबत तरतूद आहे. परंतु काही रुग्णालये ही सिंगल स्पेशॅलिटी असून किंवा डायलेसिस सेंटर असून ते २४ तास सुरू नसल्यामुळे अशा रुग्णालयांमध्ये २४ तास आरोग्यमित्रांची नियुक्ती करणे अभिप्रेत नाही. मात्र तशी सुधारणा सामंजस्य करारात न केल्यामुळे असे आक्षेप नोंदविण्यात आल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. विभागाने या योजनेंतर्गत ग्रामीण/प्राथमिक आरोग्य केंद्रे/उप जिल्हा रुग्णालय/शासकीय महिला रुग्णालयांमध्ये पर्याप्त संख्येत आरोग्यमित्रांची नियुक्ती विनाविलंब करावी, जेणेकरून अधिक लाभार्थ्यांना योजनेचा लाभ घेता येईल आणि लाभ घेण्यासाठी त्यांना सदर रुग्णालयात मदत मिळेल. तसेच आरोग्यमित्र २४ तास नियुक्त करण्याबाबत काही रुग्णालयांमध्ये जर अडचणी येत असतील अथवा सामंजस्य करारामध्ये काही सुधारणा त्याअनुषंगाने करणे आवश्यक व अभिप्रेत असेल तर त्याबाबतची कार्यवाही विभागाने पार पाडावी. तसेच आरोग्यमित्रांची नियुक्ती करण्याची जबाबदारी ज्या यंत्रणेची/संस्थेची होती त्यांनी ती प्रभावीपणे पार न पाडल्यामुळे त्यांचेवर कारवाई करण्यात यावी. तसेच या प्रकरणी संबंधितांकडून आकारावयाच्या दंडाची रक्कम वसूल करण्यात यावी व अशा आक्षेपांची पुनरावृत्ती भविष्यात टाळावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(ii) वैद्यकीय समन्वयक

अभिप्राय

३.९ तृतीय पक्ष प्रशासकीय कंपन्या आणि योजनेअंतर्गत निर्धारीत रुग्णालये यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य करारातील कलम ११ नुसार योजना अंतर्गत रुग्णालयांनी योजनेमधील रुग्णांची पूर्व-अर्हता संबंधित समन्वयासाठी वैद्यकीय अधिकाऱ्यांची वैद्यकीय समन्वयक म्हणून नियुक्ती करण्याची आवश्यकता होती. परंतु अमरावती आणि गडचिरोली येथील ज्या जिल्हा रुग्णांलयामध्ये, अनुक्रमे ६०१ आणि १३४१ रुग्णांची अधिकृत नोंदणी केली होती, तिथे वैद्यकीय समन्वयक नियुक्त केला नव्हता. तसेच, अमरावतीमधील अंदाजे १३००६ आणि गडचिरोली मधील ३५७० रुग्णांनी या योजनेचा लाभ दुसऱ्या जिल्ह्यातील रुग्णालयातून घेतला होता, जे वैद्यकीय समन्वयकाची गरज असल्याचे स्पष्टपणे दर्शविते. अमरावती व गडचिरोली जिल्ह्यातील योजनेअंतर्गत निर्धारीत रुग्णालयांनी वैद्यकीस समन्वयकाची नियुक्ती न केल्यामुळे लाभार्थ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

जिल्हा रुग्णालय, अमरावती आणि जिल्हा रुग्णालय, गडचिरोली यांनी नोव्हेंबर, २०१७ मध्ये वैद्यकीय समन्वयक नेमले होते. तेव्हापासून गडचिरोली जिल्हा रुग्णालयात ४७७ व अमरावती जिल्हा रुग्णालयात ४९१ पूर्व-अर्हता मंजूर करण्यात आली. गडचिरोलीमध्ये फक्त एक रुग्णालय आहे आणि काही विशेष सेवांकरिता अमरावती जिल्ह्यात रुग्णालये उपलब्ध नाहीत. महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत बहुतेक उपचार हे तृतीय सेवेतील असून जिल्हा रुग्णालयांतील समन्वयकांनी तपासणीअंती निदान केलेले उपचार हे जवळपासच्या ज्या अंगीकृत रुग्णालयांत उपलब्ध आहेत अशा रुग्णालयांमध्ये त्या रुग्णांवरील उपचारांकरिता आरोग्यमित्रांकडून संदर्भित केले जाते असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

शिफारस

३.१० सदरहू परिच्छेदात अमरावती व गडचिरोली येथे वैद्यकीय समन्वयक नियुक्त न केल्याबाबत महालेखाकारांनी आक्षेप नोंदविलेले आहेत. महालेखाकारांनी आक्षेप नोंदवितेवेळी तेथे वैद्यकीय समन्वयक नसल्याचे निदर्शनास आले. परंतु आता तेथे समन्वयक कार्यरत असल्याचे व त्यांच्या माध्यमातून स्थानिक लोकांना आरोग्य उपचार व योग्य मार्गदर्शन मिळत असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. गडचिरोली येथील लोक इतर जिल्ह्यात जाऊन उपचार घेतात तर अमरावती येथील लोक नागपूर येथे येऊन उपचार घेतात. अशा परिस्थितीत केवळ वैद्यकीय समन्वयक नसल्यामुळे सुविधा मिळाली नाही असे म्हणणे उचित होणार नाही असे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले. मात्र विभागाच्या या भूमिकेशी समिती पुर्णपणे सहमत होऊ शकत नाही. ज्या जिल्ह्यात लोक

राहतात त्याच जिल्ह्यात त्यांना वैद्यकीय सुविधा मिळणे अभिप्रेत व अपेक्षित असताना अन्य जिल्ह्यामध्ये जाऊन त्यांना उपचार घ्यावे लागणे हीदेखील गैरसोयीचीच बाब असून योजनेचा पूर्ण लाभ घेण्यामध्ये अडथळा निर्माण करणारी आहे. गडचिरोली जिल्ह्यामध्ये या योजनेंतर्गत एकच रुग्णालय निर्धारीत असल्यामुळे देखील मोठ्या प्रमाणात रुग्णांची गैरसोय होते. अशा परिस्थितीत जास्तीत जास्त रुग्णालये योजनेंतर्गत समाविष्ट होण्यासाठी नक्षलग्रस्त व आदिवासी जिल्ह्यांमध्ये अशा रुग्णालयांसाठी विशेष बाब व अपवादात्मक परिस्थितीत काही प्रमाणात विहित निकष शिथिल करण्याबाबतचादेखील विचार करून आवश्यक ती उपाययोजना शासनस्तरावरून तातडीने करण्यात यावी व रुग्णालयांमध्ये वैद्यकीय समन्वयकांची नियुक्ती ही नियमितरित्या करण्यात यावी व अशा आक्षेपांची पुनरावृत्ती टाळावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(iii) वैद्यकीय शिबीर समन्वयकाची नियुक्ती न करणे

अभिप्राय

३.११ तृतीय पक्ष प्रशासकीय कंपन्या आणि योजनेअंतर्गत निर्धारीत रुग्णालयात झालेल्या सामंजस्य कराराच्या कलम १७. ११ नुसार, योजनेअंतर्गत निर्धारीत रुग्णालयांनी, आरोग्य शिबीरे आयोजित करण्यासाठी आरोग्यमित्रांव्दारे संस्था /विमा कंपनी / तृतीय पक्ष प्रशासकीय कंपन्यांशी समन्वय साधण्यासाठी वैद्यकीय शिबीर समन्वयकाची नियुक्ती करणे गरजेचे होते. मात्र वैद्यकीय शिबीर समन्वयकांच्या नियुक्त्या झाल्या नव्हत्या असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

शिफारस

३.१२ बृहन्मुंबई महानगरपालिका रुग्णालयांनी तृतीय पक्ष प्रशासकीय कंपन्यांबरोबर स्वतंत्र सामंजस्य करार केला आहे. ज्यामध्ये वैद्यकीय समन्वयकाच्या नियुक्ती विषयीचे कलम १०.१ वगळण्यात आले आहे. शासकीय रुग्णालयामध्ये वैद्यकीय समन्वयकाची नियुक्ती न झाल्याबद्दल मात्र शासनाने मौन बाळगले. वैद्यकीय शिबिर समन्वयकांची नियुक्ती केली नव्हती म्हणून संस्था / विमा कंपनी/ तृतीय पक्ष प्रशासकीय कंपनी यांच्यामधील समन्वयात अपयश आले आणि आरोग्य शिबिरांचे आयोजन केले जाऊ शकले नाही. बृहन्मुंबई महानगरपालिका रुग्णालयांनी आरोग्य शिबिरे न चालविण्याच्या अटीवर, करारनाम्यावर स्वाक्षरी केली आहे. वैद्यकीय समन्वयकाची नियुक्ती करण्यासंबंधी करारनाम्यातील तरतूद क्रमांक १०.१ बृहन्मुंबई महानगरपालिका रुग्णालये व विमा कंपनी/टीपीए यांनी स्वाक्षरी केलेल्या करारातून वगळण्यात आली आहे. इन्शुरन्स कंपनीबरोबर झालेल्या करारनाम्यातील कलम १९ (I) नुसार अंगीकृत रुग्णालयाने शिबीर समन्वयक नेमण्याबाबत उल्लेख आहे. त्यानुसार शासकीय रुग्णालयांना शिबीर समन्वयक नेमण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळे यांच्याकडून यावर्षी महाशिबीर घेण्यात आले, त्यात ८००० रुग्णांची तपासणी केली असून यातील रुग्णांचे उपचार ९७१ उपचारात (Procedure) असतील तर ते उपचार व शस्त्रक्रिया अंगीकृत रुग्णालयात करण्यात येत आहेत. तसेच दिनांक १४.०३.२०१८ रोजीच्या बैठकीमध्ये मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या निदेशानुसार २ महिन्यांसाठी खाजगी रुग्णालयांना अंगीकृत करून शस्त्रक्रिया करण्याची परवानगी देण्यात आली.

अशा प्रकारची शिबीरे जळगांव, नांदेड, औरंगाबाद, अहमदनगर व नागपुर जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयात घेण्यात येणार असून दोन महिन्यांसाठी खाजगी रुग्णालयांना अंगीकृत करून शस्त्रक्रिया करण्यास परवानगी देण्यात आली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

अतः विभागाने वेळोवेळी विहित वैद्यकीय शिबीर समन्वयकाची नियुक्ती करावी. ठिकठिकाणी शिबीरे आयोजित करून योजनेची व्याप्ती वाढविण्यात यावी व योजनेंतर्गत उपचाराचे लाभ जास्तीत जास्त रुग्णांना देण्यात यावे व अशा आक्षेपांची पुनरावृत्ती टाळण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ३.१.७.४ "आरोग्य शिबिरे घेण्यात कमतरता"

अभिप्राय

३.१३ टप्पा I आणि II च्या सामंजस्य करारानुसार (कलम १९) योजनेअंतर्गत निर्धारित रुग्णालयांनी गावांमध्ये, मोठया ग्रामपंचायतीत, तालुका मुख्यालयात आणि महापालिकेमध्ये आरोग्य शिबिरे घेणे आवश्यक आहे. टप्पा I अंतर्गत समाविष्ट आठ जिल्ह्यांमध्ये, एका पॉलिसी वर्षामध्ये प्रत्येक योजने अंतर्गत निर्धारीत रुग्णालयांनी एका आठवड्यात किमान एक आरोग्य शिबिर आणि टप्पा II मध्ये अंमलबजावणी करावयाच्या २७ जिल्ह्यांमध्ये प्रत्येक योजनेअंतर्गत निर्धारीत रुग्णालयाने प्रत्येक पंधरवड्यात किमान एक आरोग्य शिबिर घ्यावयाचे होते. संस्थेच्या डिसेंबर २०१३ च्या परिपत्रकानुसार, प्रत्येक शासकीय रुग्णालयाने, एका महिन्यात दोन आरोग्य शिबिरे घेण्याऐवजी एक महाआरोग्य शिबिर घेणे गरजेचे होते.

परंतु, जुलै, २०१२ ते मार्च, २०१७ या कालावधी दरम्यान विहीत ४९८८१ आरोग्य शिबिरांच्या तुलनेत, योजने अंतर्गत निर्धारीत रुग्णालयांनी फक्त १०४६६ (२१ टक्के) आरोग्य शिबिरे घेतली होती, म्हणजेच ३९४१५ (७९ टक्के) आरोग्य शिबिरे कमी आयोजित केली. परिणामी जिल्हा तसेच ग्रामीण भागात योजनेला मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी मिळाली नाही आणि त्या विषयी जागरुकता निर्माण झाली नाही असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

यासंदर्भात विभागाने नमूद केले की, दि. १६ मे २०१७ च्या बैठकीत मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत आरोग्य शिबिराचे आयोजनाबाबत संपूर्ण आढावा घेण्यात आला. तसेच आरोग्य शिबीर उपक्रमावर लक्ष केंद्रित करण्याचा आणि आरोग्य शिबीरे वाढविण्यासाठी सर्व प्रयत्न करण्याचा निर्णय घेण्यात आला. याचा परिणाम म्हणून आरोग्याच्या शिबिरासाठी सोसायटी पातळीवर आरोग्य शिबीर संनियंत्रण कक्षाची (HCMU) स्थापना करून, क्षेत्रीय कर्मचाऱ्यांच्या सोबत नियंत्रण, देखरेख आणि समन्वयन साधण्यात येत आहे. HCMU शिबिराची कार्यक्षमता सुधारण्यासाठी सक्रियपणे कार्यरत आहे. सोसायटी क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना आणि तृतीय पक्ष प्रशासकीय कंपनीला (टीपीए) सर्व आवश्यक सूचना करण्यात आल्या आहेत. आरोग्य शिबीर आयोजनाची संवेदनशीलता लक्षात घेऊन प्रत्येक जिल्ह्यात सोसायटीच्या क्षेत्रिय कर्मचारी आणि टीपीएने अंगीकृत रुग्णालयांची बैठक आयोजित केली. आरोग्य शिबीरांच्या आयोजनाचे रक्कम रु. ७०,८५,९९८ चे २२३१ दावे रुग्णालयांना प्रदान करण्यात आले आहेत आणि १९८३ दावे देयकांचे प्रदान करण्याची कार्यवाही सुरू असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

शिफारस

३.१४ आरोग्य शिबिरे घेण्यात कमतरता यासंदर्भात सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी आक्षेप नोंदविलेले आहेत. योजनेच्या टप्पा १ मध्ये एका महिन्यात चार व टप्पा २ मध्ये एका महिन्यात दोन आरोग्य शिबीरे योजनेंतर्गत निर्धारीत रुग्णालयांनी आयोजित करणे अपेक्षित होते. शासकीय/महानगरपालिका रुग्णालयांनी अशी शिबीरे आयोजित करणे अपेक्षित व नागरीकांच्या हिताचे आहे. तर मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांनी अशी शिबीरे आयोजित करण्यास नकार दिला. वास्तविक अशी आरोग्य शिबीरे आयोजित करण्याचा मुख्य उद्देश हा योजनेविषयी जनजागृती करणे व योजनेला प्रसिद्धी देणे असा असून शिबीरांमध्ये रुग्णांवर उपचार करण्याची आवश्यकता असल्यास त्यांना नजिकच्या रुग्णालयामध्ये जाणेबाबत मार्गदर्शन करणे असा होता. त्यामध्ये कमतरता राहिल्यामुळे निश्चितच या योजनेचा लाभ सर्वांना पुरेशा प्रमाणात घेता आला नाही. आता अशाप्रकारच्या शिबीरांची संख्या वाढली असल्याचेही विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. योजनेमध्ये आरोग्य शिबीरे घेण्याची तरतूद असताना त्या प्रमाणात ही शिबीरे न घेणे हे योजनेंतर्गत अटी शर्तीचे उल्लंघनच ठरते. या तरतुदीची अंमलबजावणी रुग्णालयांना सोयीनुसार करता येणार नाही. प्रत्येक पंधरवड्यात किंवा महिन्यात एक आरोग्य शिबीर घेणेदेखील आवश्यक होते. त्याचीदेखील अंमलबजावणी करण्यात आली नाही. अतः ज्या रुग्णालयांनी अशी शिबीरे आयोजित केली नाहीत त्यांचेवर कारवाई करण्यात यावी व नियमितरित्या अशी शिबीरे वेळोवेळी आयोजित करण्याबाबत योग्य ती दक्षता विभागाने घ्यावी. शासनाच्या डिसेंबर, २०१३ च्या परिपत्रकान्वये प्रत्येक शासकीय रुग्णालयाने एक महिन्यात दोन शिबीरे घेण्याऐवजी एक महाआरोग्य शिबीर घेणे गरजेचे आहे, त्याचीदेखील प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात यावी. त्याचप्रमाणे आरोग्य शिबीरे आयोजित करणेकरिता बऱ्याचदा मोठ्या शहरातील डॉक्टरांना बोलविण्यात येते. त्यासोबतच त्याच शहरातील खाजगी रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांचीदेखील त्यात मदत घेणे शक्य असल्यास त्यासाठीदेखील आवश्यक ते प्रयत्न करण्यात यावेत व अशा आक्षेपांची पुनरावृत्ती टाळावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ३.१.७.५ "गडचिरोली जिल्ह्यात एकच योजने अंतर्गत निर्धारीत रुग्णालय"

अभिप्राय

३.१५ या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना आरोग्य सेवा पुरविण्यासाठी गडचिरोलीमधील सामान्य रुग्णालयास, योजने अंतर्गत समाविष्ट केले होते. पुरेशा सुविधा उपलब्ध असलेली योजनेअंतर्गत निर्धारीत रुग्णालये गडचिरोली जिल्ह्यात कमी संख्येने उपलब्ध असल्याने गडचिरोली जिल्ह्यातील एकूण ४५६६ रुग्णापैकी ३५७० रुग्णांवर इतर जिल्ह्यात उपचार केले होते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

गडचिरोली जिल्ह्यातुन एकच रुग्णालय अंगीकृत असून २२ टक्के लाभार्थ्यांनी महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत जिल्हा रुग्णालय, गडचिरोली येथे उपचार घेतले असून ४५ टक्के लाभार्थ्यांनी नागपूर येथे तर २२ टक्के लाभार्थ्यांनी वर्धा येथे उपचार घेतले आहेत. यावरून असे दिसुन येते की, जवळपास ९० टक्के लाभार्थी रुग्णांनी नागपूर विभागामध्येच उपचार घेतले आहेत. तसेच सुरूवातीला २ रुग्णालये अंगीकृत करण्यात आली होती परंतु योजनेंतर्गत अकार्यरत असल्यामुळे एका रुग्णालयाचे अंगीकरण रद्द करण्यात आले आहे. आता ३ रुग्णालयांचे ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी २ रुग्णालयांमध्ये आयसीयु (अतिदक्षता विभाग) कार्यरत नाही त्यामुळे अंगीकरण करण्याची प्रक्रिया करण्यात आली नाही आणि महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेच्या प्रस्तावित आरएफपीमध्ये डोंगराळ व आदीवासी जिल्ह्यांकरिता योजनेंतर्गत रुग्णालय अंगीकृत करण्याचा निकष शिथिल करण्यात येणार असल्याचे समितीस सांगण्यात आले.

शिफारस

३.१६ गडचिरोली जिल्ह्यात एकच योजनेंतर्गत निर्धारीत एकच रुग्णालय असणे यासंदर्भात महालेखाकारांनी आक्षेप नोंदविलेले असून पुरेशी सुविधा उपलब्ध असलेली योजनेंतर्गत निर्धारीत रुग्णालय गडचिरोली जिल्ह्यात कमी संख्येने उपलब्ध असल्याने त्याठिकाणी तुलनेने अत्यंत कमी रुग्णांवर उपचार होऊ शकले. इतकेच नव्हेतर गडचिरोली जिल्ह्यात महाआरोग्य शिबीर देखील आयोजित करण्यात आले नाही. याबाबत समितीने विचारणा केली असता महाआरोग्य शिबीर आयोजित करण्याबद्दल आता वेळापत्रक निश्चित केल्याचे समितीस सांगण्यात आले. मुळात हा जिल्हा नक्षलग्रस्त, आदिवासी जिल्हा असतानाही व वैद्यकीय सेवा सुविधा त्याठिकाणी अधिकाधिक

प्रमाणात व प्राधान्याने देणे क्रमप्राप्त असताना तेथे योजनेंतर्गत निर्धारीत रुग्णालयांची संख्या तर कमी असणे आणि महाआरोग्य शिबीरे देखील त्याठिकाणी आयोजित न होणे ही बाब निश्चितच समर्थनीय नाही. ज्या जिल्ह्यामध्ये योजनेंतर्गत निर्धारीत रुग्णालयाची संख्या कमी असेल अशा परिस्थितीत स्थानिक शासकीय रुग्णालयांच्या मदतीने, सहकार्याने व समन्वयाने उपचाराचे कार्य पार पाडणे आवश्यक असताना तशाप्रकारचे नियोजन देखील विभागाने केले नाही. एखादे रुग्णालय योजनेंतर्गत निर्धारीत करण्याचे निकष व कार्यपद्धती ही निश्चितच सोपी नाही. त्या रुग्णालयातील पायाभूत संरचनेचे लेखापरिक्षण देखील करण्यात येते. अशा परिस्थितीत ही प्रक्रिया विनाविलंब पार पाडण्याच्या अनुषंगाने शासकीय रुग्णालयांनीदेखील काही प्रमाणात जबाबदारी घेणे आवश्यक आहे. जेणेकरून कालबध्द पद्धतीने ही प्रक्रिया पुर्ण होऊन अधिकाधिक रुग्णालये योजनेंतर्गत समाविष्ट होणे शक्य होईल. तसेच गडचिरोली जिल्ह्यात खाजगी रुग्णालयांना या योजनेंतर्गत अंगीकृत करण्याचे प्रमाण अतिशय नगण्य असल्याने रुग्णालये अंगीकृत करण्यासंदर्भातील नियम व निकष गडचिरोली वा अन्य नक्षलग्रस्त, आदिवासी व डोंगराळ जिल्ह्यासंदर्भात शिथिल करण्याचे शासनाच्या विचाराधीन असल्याचे समितीस सांगण्यात आले. त्याबाबतचा निर्णय तातडीने घेण्याकरिता विभागाने आवश्यक ती कार्यवाही व उपाययोजना करावी व अशा नक्षलग्रस्त, आदिवासी व डोंगराळ भागात जास्तीत जास्त प्रमाणात आरोग्य शिबीरे आयोजित करणेबाबतची कार्यवाही करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ३.१.७.६ "योजनेअंतर्गत निर्धारीत खाजगी अंगीकृत रुग्णालये"

अभिप्राय

३.१७ खाजगी अंगीकृत रुग्णालयांकडून निकषाचे केले जाणारे अनुपालन आणि या रुग्णालयांना योजने अंतर्गत समाविष्ट करण्यासाठी संस्थेने अनुसरलेल्या कार्यपद्धतीची पडताळणी करण्यासाठी नऊ जिल्ह्यांतील ३५ खाजगी अंगीकृत रुग्णालयांची लेखापरीक्षा चाचणी केली असता आढळून आले की, योजनेच्या टप्पा I आणि II अंतर्गत आणि तृतीय पक्ष प्रशासकीय कंपन्या आणि योजने अंतर्गत निर्धारीत रुग्णालयांमध्ये केलेल्या सामंजस्य कराराच्या कलम १०.५ आणि ९.५ मध्ये अशी तरतूद आहे की, योजनेअंतर्गत निर्धारीत खाजगी रुग्णालयांनी कोणत्याही विमा कंपनीकडून योजनेअंतर्गत निर्धारीत कालावधीपर्यंत क्षतिपूर्ती विमा पॉलीसी (इन्डेमनिटी पॉलीसी) प्राप्त करणे गरजेचे होते, जेणेकरून, कुठल्याही अपघात दुर्घटना इत्यादी प्रसंगी योजनांतर्गत रुग्णालय तसेच लाभार्थ्यांना नुकसान भरपाई मिळेल. मात्र अद्याप नऊ अंगीकृत रुग्णालयांनी क्षतिपूर्ती विमा पॉलीसी घेतली नव्हती (नोव्हेंबर, २०१७), परिणामी, क्षतिपूर्ती विमा पॉलिसीमध्ये योजनेमधील लाभार्थ्यांचा व रुग्णालयांचा समावेश झाला नाही.

तसेच योजनेच्या टप्पा I आणि II मधील प्रत्येक अंगीकृत रुग्णालयाने एका महिन्यात अनुक्रमे चार आणि दोन आरोग्य शिबिरे घ्यावयाची होती. परंतु ३१ अंगीकृत रुग्णालयांमध्ये आरोग्य शिबिरे दोन टक्के ते १०० टक्के इतकी कमी घेतली होती, ज्याचा परिणाम लाभार्थ्यांना योजनेविषयी जागरुक करण्यावर झाला होता. श्री संत अच्युत महाराज हृदय रुग्णालय आणि संशोधन संस्था, अमरावती, या योजनेंतर्गत निर्धारित रुग्णालयात, स्त्री आणि पुरुष रुग्णांसाठी वेगळे सामान्य कक्ष नव्हते, जे सामंजस्य करारानुसार आवश्यक होते. योजनेंतर्गत नंदीग्राम अंगीकृत रुग्णालय, नांदेडच्या प्रकरणांत, विहीत ५० खाटांच्या रुग्णालयाऐवजी, रुग्णालयात फक्त ३८ खाटा उपलब्ध होत्या असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

योजनेंतर्गत करारानुसार Indemnity policy राबविण्याबाबत दिनांक १८/०८/२०१७ रोजी सोसायटीने विमा कंपनीस पत्र सादर केले आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका रुग्णालये, एकच विशेष सेवा देणारी रुग्णालये आणि डायलेसीस सेंटर, रुग्णांच्या वाढत्या संख्येमुळे आरोग्य शिबीरे घेत नाहीत. श्री संत अच्युत महाराज हृदय रुग्णालय आणि संशोधन संस्था, अमरावती या रुग्णालयाने स्त्री व पुरुष रुग्णांसाठी स्वतंत्र कक्षाची निर्मिती केली आहे. तसेच योजनेच्या निकषानुसार योजनेमध्ये रुग्णालय अंगीकृत करण्यासाठी रुग्णालयामध्ये ५० खाटा असणे आवश्यक नसून रुग्णालयामध्ये ३० खाटा + ICU+ OT असणे आवश्यक आहे. त्यानुसार नंदीग्राम रुग्णालय, नांदेड या रुग्णालयामध्ये रुग्णालय अंगीकरणाचे निकषानुसार आवश्यक खाटा उपलब्ध आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

शिफारस

३.१८ योजनेंतर्गत निर्धारीत खाजगी अंगीकृत रुग्णालयांसंदर्भात हे आक्षेप नोंदविण्यात आले असून श्री संत अच्युत महाराज हृदय रुग्णालय आणि संशोधन संस्था, अमरावती या रुग्णालयात योजनेंतर्गत स्त्री व पुरुष रुग्णांसाठी स्वतंत्र कक्षाची निर्मिती केल्याचे समितीस सांगण्यात आले. त्याचप्रमाणे नंदीग्राम रुग्णालय, नांदेड येथे रुग्णालय अंगीकरणाचे निकषानुसार आवश्यक खाटा उपलब्ध असल्याचे समितीस सांगण्यात आले. परंतु सदरहू योजनेची व्याप्ती ही संपूर्ण राज्यभर असून गावागावातील अंतिम पात्र व्यक्तीपर्यंत विनाविलंब वैद्यकीय उपचार पोहोचणेसाठी विभागाने कायम प्रयत्नशील राहणे आवश्यक आहे. सदरहू आरोग्य योजना ही शासनाची अत्यंत महत्वाकांक्षी व वैद्यकीय उपचाराच्या अनुषंगाने अत्यंत महत्वाची योजना असून शासनाने या योजनेंतर्गत मोठ्या प्रमाणात विमा हप्ता भरलेला असतानाही योजनेची माहिती व प्रसिद्धीअभावी अनेक पात्र व्यक्तींना लाभापासून वंचित रहावे लागले, हीदेखील बाब गंभीर आहे. राज्यात या संपूर्ण योजनेची अंमलबजावणी करताना रुग्णालये अत्यंत महत्वाची भूमिका बजावित असून अनेक ठिकाणी लोकांना या रुग्णालयांचे अत्यंत वाईट अनुभव आलेले आहेत. अशा परिस्थितीत अशा रुग्णावर योग्य ते संनियंत्रण ठेवण्याची पूर्णतः जबाबदारी ही विभागाची आहे व त्याची प्रभावी अंमलबजावणी विभागाने करावी व कोणत्याही परिस्थितीत या रुग्णालयांमुळे कोणताही त्रास रुग्णांना होऊ नये यासाठी आवश्यक ती दक्षता विभागाने घ्यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ३. १. ८ 'माहिती विश्लेषणाचे निष्कर्ष'

अभिप्राय

३.१९ वेगवेगळ्या प्रकारच्या जिल्हा-निहाय शिधापत्रिकाधारक म्हणजेच लाभार्थ्यांच्या संस्थेने सादर केलेल्या, माहिती संचाचे आणि २०१२-१३ ते २०१६-१७ या कालावधीत ज्या १२,४९,४८० लाभार्थ्यांचे दावे प्राप्त झाले होते. त्यांच्या माहितीचे विश्लेषण "केएनआयएमइ" आणि "आयडीइए" या माहिती विश्लेषणात्मक संगणकीय तंत्राचा वापर करून केले गेले.

निवड केलेल्या जिल्ह्यात त्यांच्या परिणामांचे विश्लेषण केले असता दारिद्र्य रेषेखालील एक ते चार टक्के शिधापत्रिकाधारकांनी योजनेचा लाभ घेतला होता त्याचवेळी दारिद्र्य रेषेवरील चार ते १३ टक्के शिधापत्रिकाधारकांनी योजनेचा लाभ घेतला होता. अशाप्रकारे, दारिद्र्य रेषेवरील शिधापत्रिकाधारकांच्या तुलनेत दारिद्र्य रेषेखालील शिधापत्रिकाधारकांनी कमी संख्येत योजनेचा लाभ घेतला होता. यावरून दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यांमध्ये प्रसिद्धी झाली नव्हती असे दिसून येते. ठाणे, जळगाव, अहमदनगर, बीड, बुलढाणा आणि नांदेड जिल्ह्यातील मोठ्या संख्येतील रुग्णांनी या जिल्ह्यांमध्ये मुलभूत आणि योग्य वैद्यकीय सुविधेच्या अभावांमुळे मुंबई, नाशिक आणि औरंगाबाद जिल्ह्यातील योजनेंतर्गत निर्धारीत रुग्णालयातून उपचार घेतले होते.

शिफारस

३.२० सदरहू परिच्छेदात माहिती विश्लेषणाचे निष्कर्ष यासंदर्भात महालेखाकारांनी आक्षेप नोंदविलेले आहेत. राष्ट्रीय विमा कंपनी ही केंद्र शासनाची कंपनी असून त्या कंपनीला शासनाने विम्याचे कंत्राट दिलेले आहे. त्या कंपनीच्या प्रादेशिक व्यवस्थापकांच्या अध्यक्षतेखाली एक नामांकन समिती (Empanelment Committee) असून त्याची एक ऑनलाईन संगणकीय आज्ञावली आहे. त्याची तपासणी करून साईट ऑडीट होते व ऑडीट झाल्यावर त्याचा दर्जा व श्रेणी निश्चिती होते व त्यानंतर नामांकन समिती कोणते रुग्णालय नामांकीत करायचे याबाबतचा निर्णय घेते. ज्या रुग्णालयांनी राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये गैरव्यवहार केला आहे, तीच रुग्णालये महात्मा फुले जनआरोग्य योजनेमध्ये समाविष्ट कशी करण्यात आली, याबाबत समितीने विचारणा केली असता ही योजना सुरू झाल्यापासून आतापर्यंत साधारणतः २५० रुग्णालयांना योजनेतून बाहेर काढल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. वास्तविकतः या सर्व बाबी तपासण्याची जबाबदारी ही विमा कंपन्यांची असते. प्रत्येक विभागात व्हिजीलन्स टिम, मेडीकल ऑडीट टिम आहे. तसेच विमा कंपन्यांनी तृतीय पक्ष प्रशासकीय कंपनी (TPA) यांची नियुक्ती केलेली आहे. त्यांच्यामार्फत नियमितपणे तपासणी होत असून ६ महिन्यापासून सुमारे २५० रुग्णालयांना भेटी दिलेल्या असून त्यामध्ये ८० रुग्णालयांना योजनेबाहेरदेखील काढण्यात आले आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले. अधिक चांगले उपचार मिळण्यासाठी रुग्ण महानगरांमध्ये स्थलांतरीत होतात. तसेच, उपचार करावयाचे ठिकाण हे वैयक्तिकरीत्या ठरवले जाते तसेच ते लाभार्थ्यांच्या वर्तमान अधिवासावरदेखील अवलंबून असते. लाभ घेतलेल्या उपचार सुविधेचा विचार करून त्यानुसार आवश्यक मुलभूत वैदयकीय सुविधा पुरवाव्या जेणेकरून लाभार्थ्यांना त्यांच्या स्वतःच्या जिल्ह्यातच या सुविधांचा लाभ घेता येईल ज्यामुळे लाभार्थ्यांचे स्थलांतर कमी होण्यास मदत होईल. यासंदर्भात भविष्यात अशा आक्षेपांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना विभागाने करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ३. १. ९ "योजनेचे वित्तीय व्यवस्थापन"

परिच्छेद क्रमांक ३. १. ९. १ "विमा कंपनीचे दावे फेटाळणे/बंद करणे"

(अ) दावे फेटाळणे

अभिप्राय

३.२१ विमा कंपनीने रु. ८१. २९ कोटीचे (जून, २०१७) दावे फेटाळले होते. ज्यामध्ये शासकीय रुग्णालयांशी संबंधित रु. ३९. ०७ कोटींचे (४८ टक्के) आणि योजने अंतर्गत निर्धारीत खाजगी रुग्णालयांचे रु. ४२. २१ कोटींचे (५२ टक्के) दावे संम्मिलित होते. परंतु योजनेअंतर्गत निर्धारीत खाजगी रुग्णालय आणि शासकीय रुग्णालयांमध्ये केलेल्या शस्त्रक्रियेच्या एकूण खर्चाची तुलना करता, असे आढळून आले की, योजने अंतर्गत निर्धारीत खाजगी रुग्णालयांच्या दाव्यांपेक्षा शासकीय रुग्णालयातील दावे जास्त संख्येत फेटाळण्यात आले होते. जर मुख्य वैद्यकीय अधिकारी यांनी रुग्णालयाचे दावे फेटाळले तर एक शेवटची संधी देण्याच्या उद्देशाने संस्थेने "क्लेम अपील मोडयुल" सुद्धा तयार केले होते. तथापि, हे अपील मुख्य वैद्यकीय अधिका-यांनी दावा फेटाळल्याच्या तारखेपासून २० दिवसांच्या आत करावयाचे होते. शासकीय/ महानगरपालिकांच्या/नगरपरिषदांच्या रुग्णालयांची तपासणी केली असता अनिवार्य दस्तावेज, उपचारांचे व्हिडीओ, जखमेचे छायाचित्र इत्यादींच्या अनुपलब्धतेमुळे, रुग्णालयांनी विहीत २० दिवसांत अपील सादर केले नव्हते, परिणामी, ऑगस्ट, २०१३ ते मार्च, २०१७ या कालावधीतील सदर दाव्यांशी संबंधित रु. २५. ९० कोटींचे नुकसान झाले होते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

अनिवार्य दस्तावेज जसे, ओ. टी. टिप्पणी, प्रयोगशाळेतील तपासण्या किंवा पूर्व-अर्हता प्रक्रिया यांचे दस्तावेज सादर न केल्यामुळे विमा कंपनीने दावे फेटाळले होते. शासकीय रुग्णालयांना इतकी सूट देऊनही दाव्यांना मंजूरी मिळण्यासाठी किमान आवश्यक दस्तावेज सादर करण्यात शासकीय रुग्णालये अपयशी ठरल्यामुळे, शासकीय रुग्णालयांच्या फेटाळलेल्या दाव्यांची टक्केवारी खाजगी रुग्णालयांपेक्षा जास्त होती. तसेच दि. २१ ऑगस्ट,

२०१७ रोजी संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, संचालक, आरोग्य सेवा संचालनालय आणि बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याबरोबर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केलेल्या बैठकीमध्ये वरील समस्येवर चर्चा केली गेली आणि रुग्णालयांना विहित केलेल्या नियमांचे अनुपालन करण्याच्या सुचना देण्यात आल्या. योजनेअंतर्गत निर्धारीत रुग्णालये/महानगरपालिका/ नगरपरिषद रुग्णालये यांच्याकडून झालेल्या चुकांमुळे विमा कंपनीकडून दावे स्विकारले गेले नाहीत आणि त्यापोटी नुकसान झाले.

शिफारस

३.२२ विमा कंपनीने दावे फेटाळणेसंदर्भात सदरहू परिच्छेदात आक्षेप नोंदिवण्यात आले आहेत. विमा कंपन्यांनी शासकीय रुग्णालयांचे रु. ३९. ०७ कोटी आणि खाजगी रुग्णालयांचे रु. ४२. २१ कोटीचे दावे फेटाळले आहेत. शासकीय रुग्णालयाला इतक्या मोठ्या प्रमाणात सूट असतानाही नाकारलेल्या दाव्यांचे प्रमाण पाहता शासकीय व खाजगी रुग्णालयाचे जवळजवळ रु. ८१. २९ कोटी बुडालेले असल्याचे समितीने नमूद केले असता असे दावे निकाली काढणेसाठी एक विहित प्रक्रिया असून प्रथम डॉक्टरतर्फे दाव्यांची छाननी होते. तिथून दावा नाकारला गेल्यावर पहिला अर्ज केल्यास सेंट्रल क्लेम कमिटी या दाव्यासंदर्भात अंतिम निर्णय घेते. त्यातही शासकीय रुग्णालयात मनुष्यबळ, पायाभूत सुविधा, तांत्रिक सुविधा कमी असल्यामुळे बऱ्याच ठिकाणी यात शासकीय रुग्णालयांना सूट दिलेली आहे. असे असतानाही शासकीय रुग्णालयाकडून बऱ्याच ठिकाणी कागदपत्रे वा त्रुटींचे निराकरण वेळेत केले जात नाही. आता वेगवेगळ्या समित्यांमध्ये निर्णय घेवून हे दावे बऱ्यापैकी सोडविण्यात येत असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. फार छोट्या छोट्या रकमांसाठी हे लाखो रुपयांचे दावे प्रलंबित राहतात. त्यात आता विभागाने निर्णय घेतला आहे की, आक्षेपित कमी रकमेसाठी दावे प्रलंबित न ठेवता ती रक्कम वगळून उर्वरीत रकमेची प्रतिपूर्ती करून दावे निकाली काढण्यात यावेत. त्यामुळे बहुतांश दावे निकाली काढण्यात आलेले आहेत. खाजगी रुग्णालयांना मात्र वाजवी केस असेल तर गैरव्यवहार टाळण्यासाठी एखाद्या केसच्या आधारे सवलत दिली जाते. अतः विभागाने असे प्रलंबित दावे तात्काळ निकाली काढून भविष्यात असे दावे प्रलंबित राहू नयेत व फेटाळले जावू नयेत यासाठी आवश्यक ती उपाययोजना करावी. तसेच दाव्यांच्या प्रतिपूर्तीसाठी आवश्यक ती कागदोपत्री प्रक्रिया नियमानुसार राबवावी व त्यासाठी आवश्यक ती सर्व कागदपत्रे नियमानुसार व वेळेवर तयार करून ती उपलब्ध करून देण्यात यावीत व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(ब) दावे बंद करणे

अभिप्राय

३.२३ चाचणी तपासणी केलेल्या १९ शासकीय/ महानगरपालिका/परिषद रुग्णालयांचे रु. ३. ५८ कोटींचे दावे उशीरा सादर केल्यामुळे विमा कंपनीने शेवटी बंद केले. शासनाने सांगितले (नोव्हेंबर, २०१७) की, टप्पा I आणि II च्या सामंजस्य कराराच्या कलम २३. ३ नुसार, रुग्णालयांनी एखादया पॉलिसी वर्षाच्या संबधित जी प्रकरणे सादर केली नव्हती किंवा अद्ययावत केली नव्हती अशा प्रकरणांचा नॅशनल इन्शुरन्स कंपनी आणि राज्य आरोग्य हमी संस्था (पूर्वाश्रमीची राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना) यांनी पॉलीसीचे वर्ष संपल्यापासून आणि रनऑफ कालावधी समाप्त झालेल्या प्रकरणांमध्ये विशिष्ट मुदत देऊन अशी प्रकरणे बंद करण्याचा संयुक्त निर्णय घेतला. योजनेअंतर्गत निर्धारीत रुग्णालयांना प्रलंबित प्रकरणांविषयीचे सर्व सोपस्कार पूर्ण करून दावे सादर करण्यास सांगण्यात आले, ज्यानंतर अशी प्रकरणे बंद करण्यात आली असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

सामंजस्य करारनाम्यातील कलम २३. ३ नुसार रुग्णालयांनी रुग्णाच्या डिस्चार्जच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत केलेल्या शस्त्रक्रिया / उपचारांसाठी सर्व दावे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार, विशिष्ट पॉलिसी वर्षामध्ये अंगीकृत रुग्णालयाने दावे सादर केले नाही किंवा अद्ययावत केले नाही, अशा प्रकरणी पॉलिसी वर्ष व रन ऑफ पिरीयड समाप्तीनंतर देखील विशिष्ट कालावधी देऊन दावे बंद करण्याचा संयुक्त निर्णय नॅशनल इन्श्युरन्स कंपनी आणि राज्य आरोग्य हमी सोसायटी (आधीची राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सोसायटी) यांनी घेतला. प्रलंबित दावे अद्ययावत करणे व प्रकरणे बंद झाल्यानंतर दावे सादर करण्याबाबत रुग्णालयांना सुचना देण्यात आल्या होत्या असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

शिफारस

३.२४ सदरहू परिच्छेदाच्या अनुषंगाने समितीच्या निदर्शनास आले की, शासकीय/महानगरपालिका/जिल्हापरिषद रुग्णालयात दावे उशिरा सादर केल्यामुळे विमा कंपनीकडून कोट्यावधी रुपयांचे दावे बंद करण्यात येणे ही बाब निश्चितच गंभीर असून शासनाचे व लाभार्थ्यांचे नुकसान करणारी आहे. विमा कंपन्या अशा दाव्यांचे पैसे देत नाहीत. विभागाकडे अशा महत्वाच्या विषयाकडे बघण्याचा दृष्टीकोन, प्राधान्य व तातडी नसल्यामुळे तसेच त्यासाठी आवश्यक ते मनुष्यबळदेखील कमी असल्यामुळे या गोष्टीकडे दुर्लक्ष होते. खाजगी रुग्णालयात मात्र या सर्व बाबीकडे लक्ष देवून कार्ययंत्रणा चालविली जाते. त्यामुळे खाजगी रुग्णालयात अधिकाधिक उपचार होवून त्यांचे दावे फेटाळण्याचे प्रमाण देखील कमी असते. अशाप्रकारच्या विशिष्ट कामासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने आता शासन निर्णय काढून डेटाएन्ट्री ऑपरेटर घेण्यास परवानगी दिली असल्यामुळे कार्यपद्धतीत बरीच सुधारणा होण्याची शक्यता आहे व त्यामुळे दावे नाकारण्याचे प्रमाण देखील फारच कमी आहे व प्रलंबित दावे आता निकाली काढले आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. अतः यासंदर्भात प्रलंबित दावे कालबध्द पद्धतीने निकाली काढण्यात यावेत व भविष्यात अशा आक्षेपांची पुनरावृत्ती

टाळण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना व दक्षता घेण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ३.१.९.२ "विमा हप्ता प्रदानातील अनियमितता"

अपात्र लाभार्थ्यांच्या विम्याच्या हप्त्यापोटी प्रदान आणि अतिरिक्त हप्त्याची वसुली/समायोजन न करणे

अभिप्राय

३.२५ ज्या लाभार्थ्यांचे वार्षिक उत्पन्न रु. एक लाखांपेक्षा जास्त आहे त्यांना या योजनेचे लाभ देय नव्हते. असे आढळून आले की, संस्थेने रु. एक लाखापेक्षा अधिक वार्षिक उत्पन्न असलेल्या १, ३७, ४३७ लाभार्थ्यांच्या रु. ५. १४ कोटीच्या विमा हप्त्याचे प्रदान केले होते. परिणामी, तेवढी रक्कम अपात्र लाभार्थ्यांच्या विम्याच्या हप्त्यापोटी प्रदान केली गेली होती. या रु. ५. १४ कोटीपैकी, विमा कंपनीने रु. ३. ७१ कोटी संस्थेला परत केले होते आणि उर्वरित रु. १. ४३ कोटी, दावा करूनही विमा कंपनीने अद्यापही परत केले नव्हते (जून, २०१७). शासनाने सांगितले (नोव्हेंबर, २०१७)की, याआधी विमा कंपनीला प्रदान केलेल्या रु. १. ४३ कोटी अतिरिक्त विमा हप्त्याचे समायोजन करण्यासाठी या प्रकरणात न्यायालयीन कारवाई सुरू आहे. अशा प्रकारे लाभार्थ्यांच्या पात्रतेची पडताळणी न करता विम्याच्या हप्त्याचे झालेले प्रदान, संस्थेच्या अंतर्गत चाचण्या/नियंत्रण कमकुवत असल्याचे निदर्शक होते; ज्यामुळे अंतिमतः विमा कंपनीला फायदा झाला असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

त्याचप्रमाणे टप्पा II च्या सामंजस्य कराराच्या कलम १४ च्या तरतुदीनुसार विम्याचा दावा केल्यावर पॉलिसी कालावधीच्या शेवटी जर विमा हप्त्याची (सेवा कर वगळून) अतिरिक्त राशि उरली तर विमा कंपनीच्या प्रशासकीय खर्चासाठी २० टक्के रक्कमेची तरतूद केल्यावर, शिल्लक रक्कमेतील ९० टक्के रक्कम एक महिन्याच्या रन ऑफ अवधीनंतर ६० दिवसांच्या आत विमा कंपनीने संस्थेला परत करणे आवश्यक होते. परंतु जून, २०१५ ला विमा कंपनीकडे रु. ८७. ५० कोटी अतिरिक्त रक्कम पडून होती. त्यानुसार, विमा कंपनीने रु. ७८. ७५ कोटी (रु. ८७. ५० कोटींचे ९० टक्के) संस्थेला परत करावयाचे होते. मात्र विमा कंपनीने फक्त रु. ३१. १२ कोटी रक्कम परत/समायोजित केली होती आणि उर्वरित रु. ४७. ६३ कोटी रक्कम विमा कंपनीकडे पडून होती. तसेच विमा कंपनीने तिला योजनेच्या प्रदान केलेल्या विमा हप्त्याची २० टक्के रक्कम आधीच प्रशासकीय खर्चासाठी समायोजित केली होती आणि म्हणून सामंजस्य करारात जरी अतिरिक्त रकमेतून दहा टक्के समायोजन करण्याचे नमूद केले होते तरी ते देय नव्हते. यामुळे विमा कंपनीला रु. ८. ७५ कोटींचा दुहेरी फायदा झाला होता असेही आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

यासंदर्भात शासनाने सांगितले (नोव्हेंबर, २०१७) की, विमा नियामक आणि विकास प्राधिकरण विनियमांच्या खंड ६४ V ब नुसार पॉलिसी अंतर्गत लाभ प्राप्त होण्यासाठी एकूण विमा हप्त्याचे आगाऊ प्रदान करणे आवश्यक असते, परिणामी, संस्थेला अतिरिक्त विम्याची रक्कम इतर कोणत्याही विमा हप्ता प्रदानातून समायोजित करता येऊ शकली नव्हती. तसेच जेव्हा योजनेखालील प्रदान केलेल्या विमा हप्त्यापेक्षा जास्त नुकसान भरपाई दिली जाते तेव्हा विमा कंपनीला हा तोटा सोसावा लागतो तसेच विमा कंपनीला झालेल्या नफ्यापैकी ९० टक्के नफा हा विभागला जातो आणि १० टक्के हा विमा कंपनी स्वतःकडे राखून ठेवते, जे सामंजस्य कराराच्या कलम १४ नुसार आहे. मात्र हे उत्तर महालेखाकारांनी स्विकारले नाही व नमूद केले की, भरणा केलेल्या एकूण विमा हप्त्यापैकी २० टक्के रक्कम ही योजनेच्या प्रशासकीय खर्चासाठी आधीच समायोजित करण्यात आली असल्याने सामंजस्य करारामध्ये जरी नमूद केलेले असले तरी, अतिरिक्त रक्कमेतून १० टक्के रक्कमेचे समायोजन हे अप्रस्तुत होते.

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून वितरीत करण्यात येणाऱ्या शिधापत्रिकांच्या आधारे देण्यात येतो. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग हा शिधापत्रिकांच्या माहितीचा परिरक्षक (custodian) आहे. लेखा परिक्षण अहवालात नमुद करण्यात आलेली रु. १. ४३ कोटी रक्कम रु. १ लाखापेक्षा जास्त वार्षिक उत्पन्न असलेल्या शिधापत्रिकाधारक कुटुंबांकरिता विमा कंपनीस प्रदान करण्यात आलेली अतिरिक्त विमा हप्त्याची रक्कम असून सदर रकमेची विमा कंपनीकडून वसुली करावयाची आहे. आरोग्य पत्राची छपाई करताना सदर बाब सोसायटीच्या निदर्शनास आली होती. अन्न, नागरी पुरवठा विभागाकडून प्राप्त B१ फॉर्मनुसार, रु. १ लाखापेक्षा जास्त उत्पन्न असणाऱ्या शिधापत्रिकाधारकांची संख्या १, ३७, ४३७ इतकी होती. सदर शिधापत्रिकाधारकांच्या अतिरिक्त विमा रकमेची प्रतिपुर्ती करण्याकरिता विमा कंपनीस कळविण्यात आले आहे. यापूर्वी विमा कंपनीस प्रदान करण्यात आलेल्या विमा हप्त्याचे समायोजन करून प्रत्यक्षात रु. १, ४३, २६, ०४१ इतक्या रकमेची विमा कंपनीकडून प्रतिपुर्ती देय ठरत आहे.

भारतीय विमा नियामक व विकास प्राधिकरणाच्या मार्गदर्शक तत्त्वातील कलम ६४ व्ही बी नुसार, लाभार्थ्यांच्या विमा संरक्षणाकरिता संपुर्ण विमा हप्ता आगाऊ प्रदान करण्यात येत असल्याने विमा हप्त्यातील कोणत्याही अतिरिक्त रकमेचे समायोजन सोसायटीस करता येत नाही.

योजनेतील विमा हप्ता प्रदान रकमेपेक्षा जास्त रकमेचे दावे प्रदान झाल्यास विमा कंपनी नुकसानीची जोखीम स्विकारीत असते आणि विमा रकमेतील दाव्यांपोटी खर्च करावयाच्या रकमेतील शिल्लक रकमेच्या ९० टक्के रक्कम सोसायटीस परत करण्यात येते व १० टक्के रक्कम विमा कंपनीकडे ठेवण्यात येते असे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर विदीत केले.

शिफारस

३.२६ सदरहू परिच्छेदात विमा हप्ता प्रदानात झालेल्या अनियमिततेबाबत आक्षेप नोंदविण्यात आले असून यात विशेषतः अपात्र लाभार्थ्यांच्या विम्याच्या हप्त्यापोटी प्रदान व अतिरिक्त हप्त्याची वसुली/समायोजन न करणे याबाबत महालेखाकारांनी गंभीर आक्षेप नोंदविलेले आहेत. यासंदर्भात समितीने विभागीय प्रतिनिधींकडे विचारणा केली असता ही योजना पुर्णपणे शिधापत्रिकेवर आधारीत

आहे. प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयाकडे डी. एस. ओ. शिधापत्रिकेचा नंबर देतील त्यावर हा लाभ दिला जातो. ही योजना सन २००९-१० मध्ये सुरू झाल्यानंतर सन २०१२ मध्ये लक्षात आले की, भरुन दिलेल्या काही फॉर्ममध्ये रु. १ लाखपेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या लोकांचा समावेश जास्त असतानाही त्याचा प्रिमियम विभागाने भरलेला आहे व त्याच्या प्रतिपूर्तीसाठी विभागाने दावा केलेला आहे. त्यासाठीचे रु. ४७. ६३ कोटी विमा कंपनीकडे प्रलंबित असल्याचे समितीस सांगण्यात आले. परंतु ही बाब अत्यंत गंभीर असून विभागाचे या प्रकरणी झालेले दुर्लक्ष व निष्काळजीपणा पुर्णपणे कारणीभूत आहे. अतः ही संपुर्ण वसुली विभागाने तात्काळ करावी व अशा प्रदानासंदर्भात दोषी असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ३.१.९.३ "मानकांनुसार विस्तृत प्रमाणावर करावयाच्या प्रसिद्धीचा अभाव"

अभिप्राय

३.२७ योजनेच्या टप्पा I आणि I I च्या सामंजस्य कराराच्या कलम २६ नुसार, विमा कंपनीने सामान्य जनतेला योजनेची अधिक चांगली माहिती मिळण्यासाठी इलेक्ट्रॉनिक आणि छापील माध्यमे, लाभार्थ्यांना पत्रकांचे/वैयक्तिक छापील साहीत्याचे वाटप, घोषणापत्रके, प्रदर्शक फलक, मार्गदर्शक पुस्तिका, टोल फ्री दूरध्वनी क्रमांक, नेटवर्क प्रोव्हायडर्सची सूची, पॉलिसी आणि लाभांचे माहिती फलक, चित्रपटगृहात दाखविल्या जाणाऱ्या स्लाईडस्, केबल दूरचित्रवाणी स्क्रोल्स, प्राथमिक आरोग्य केंद्रावरील मदत केंद्रे आणि योजनेअंतर्गत निर्धारित रुग्णालयांतील मदत केंद्रे इत्यादीद्वारे योग्य प्रसिद्धी देण्याची खात्री करावी. तसेच, विमा कंपनीने लाभार्थ्यांकडून मिळणाऱ्या एकूण विमा हप्त्याच्या दोन टक्के रक्कम याकामी खर्च करावी. परंतु वर्ष २०११-१२ ते २०१६-१७ दरम्यान संस्थेने एकूण ९, ३४, ९५, ०२५ लाभार्थ्यांसाठी रु. २, ७१०. ८९ कोटी रक्कम प्रदान केली होती. त्यानुसार, विमा कंपनीला योजनेच्या प्रसिद्धीवर रु. ५४. २२ कोटी (विमा कंपनीला प्राप्त झालेल्या एकूण विमा हप्त्याच्या दोन टक्के) खर्च करावयाचे होते. तथापि, असे लक्षात आले की, विमा कंपनीने योजनेच्या प्रसिद्धीसाठी फक्त रु. ३७. १५ कोटी खर्च केले होते. माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालय यांनी दिलेला रु. १० कोटीचा प्रसिद्धी आराखडा संस्थेने संमतीसाठी सार्वजनिक आरोग्य विभागास आता सादर केला आहे. योजनेच्या कालावधी दरम्यान विमा कंपनीने योजनेच्या विस्तृत प्रसिद्धीची सुनिश्चिती न केल्यामुळे, जास्त लाभार्थ्यांपर्यंत योजनेचे लाभ पोहोचण्यावर विपरीत परिणाम झाला होता असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

यासंदर्भात विभागाने नमूद केले की, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना ही महाराष्ट्र शासनाची अतिशय महत्वाकांक्षी योजना असून, योजनेच्या प्रचार व प्रसिद्धीपोटी आतापर्यंत अनेक उपक्रम राबविण्यात आलेले आहेत. जसे की, योजनेविषयी वर्तमानपत्रात जाहिरात देणे, लेख छापून आणणे, विविध मुलाखतींद्वारे योजनेची माहिती देणे, बस स्टँड/रेल्वेवरील ऑडीओ/व्हिडीओ जाहिराती, योजनेच्या संकेत स्थळावर लाभार्थ्यांचे मनोगत, संकेत स्थळावरील योजनेची माहिती देणारा व्हिडीओ, रेडीओ जिंगल्स, दूरदर्शनवरील व्हिडीओ जाहिराती, योजनेविषयी सोशल मिडियाद्वारे जागरुकता प्रसारित केली (फेसबुक पेज), पंढरीची वारी, लालबागचा राजा अशा देवतांच्या उत्साह सोहळ्यादरम्यान स्टॉल लावून देवदर्शनासाठी येणाऱ्या जनतेला योजनेविषयी माहिती दिली जाते. अंगीकृत रुग्णालयांकडून आरोग्य शिबिरे घेवून रुग्णांची तपासणी व योजनेविषयी व्यापक प्रसार, प्रसिद्धी केली जाते. योजना दुसऱ्या टप्यात दि. २१ नोव्हेंबर, २०१३ रोजी लागू होताना व त्यानंतरदेखील योजनेचा प्रचार, प्रसिद्धी करण्यात आली होती.

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेच्या लाभार्थ्यांच्या विमा संरक्षणाकरिता नॅशनल इन्शुरन्स कंपनीला दि. २ जुलै, २०१२ ते दि. ३० जून, २०१८ या कालावधीमध्ये विमा हप्त्याची एकूण रक्कम रुपये ४४७१, ०१, ०३, १०२ (कर रहित) अदा करण्यात आली आहे. राज्य आरोग्य हमी सोसायटी व नॅशनल इन्शुरन्स कंपनी यामधील सामंजस्य करारनाम्यातील कलम क्र. २६ नुसार अदा करण्यात आलेल्या विमा हप्ता रकमेच्या २ टक्के रक्कम सोसायटीच्या सल्ल्याने विमा कंपनीने योजनेच्या प्रचार व प्रसिद्धीवर खर्च करणे अपेक्षित होते. त्यानुसार विमा रकमेच्या २% रक्कम रु. ८९, ४२, ०२, ०६२ इतकी योजनेच्या प्रचार व प्रसिद्धीवर खर्च होणे अपेक्षित होते. परंतु मात्र प्रत्यक्षात रु. २५, ६३, ०४, ४१० इतकीच रक्कम नॅशनल इन्शुरन्स कंपनीकडून योजनेच्या प्रचार व प्रसिद्धीकरिता खर्ची पडली आहे आणि उर्वरित रु. ६३, ७८, ९७, ६५२ इतकी रक्कम विमा कंपनीकडे अखर्चित पडून होती.

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेच्या व्यापक प्रसिद्धीकरिता माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांचेकडून रु. १० कोटी रकमेचा माध्यम आराखडा सादर करणेबाबत सूचना प्राप्त झाल्या. सदर माध्यम आराखड्यास व खर्चास मान्यता मिळण्याबाबत शासनाकडे सोसायटीचे पत्र दि. १४ जुलै, २०१७ अन्वये विनंती केली होती. त्यावर दि. १८ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या शासन पत्रान्वये सुधारित महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेस मंत्रीमंडळाची मान्यता प्राप्त होवून त्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर योजनेची प्रसिद्धी करणे उचित होईल असे कळविण्यात आले होते. तसेच दि. ३० जुन, २०१८ रोजीच्या शासन पत्रान्वये, सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २१.०७.२०१७ व दि. ०१.०६.२०१८ च्या शासन निर्णयामध्ये शासकीय जाहिरात वितरण धोरणाची कार्यपद्धती निश्चित केली आहे त्यानुसार विमा कंपनी आणि राज्य आरोग्य हमी सोसायटी यामध्ये झालेल्या सामंजस्य करारानुसार विद्यमान महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेच्या प्रसिद्धी माध्यम आराखड्यासंदर्भात पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत कळविले आहे. त्यास अनुसरून योजनेची प्रचार व प्रसिद्धी सोसायटी किंवा विमा कंपनीमार्फत करता येणार नसल्याने सदरची विमा कंपनीकडील प्रचार व प्रसिद्धीची दि. ३०.०६.२०१८ अखेरची २ टक्के अखर्चित रक्कम रु. ६३,७८,९७,६५२ आणि माहे जुलै, २०१८ ते माहे सप्टेंबर, २०१८ या तिसऱ्या तिमाहीच्या रु. ३८४,५१,३०,०५३ इतक्या विमा हप्ता रकमेतील प्रचार व प्रसिद्धीपोटीची २ टक्के रक्कम रु. ७,६९,०२,६०१ अशी एकूण रु. ७१,४८,००,२५३ (रु. ६३,७८,९७,६५२ + रु. ७,६९,०२,६०१) इतकी रक्कम सोसायटीकडे प्रलंबित ठेवून उर्वरित

रक्कम रु. ३१३,०३,२९,८०० विमा कंपनीला अदा करण्यात आली आहे. तसेच, माहे ऑक्टोबर, २०१८ ते माहे डिसेंबर, २०१८ या चौथ्या तिमाहीच्या रु. ३८४,५१,३०,०५३ मधील २% प्रचार व प्रसिद्धीची रक्कम रु. ७,६९,०२,६०१ वगळून रु. ३७६,८२,२७,४५२ इतकी रक्कम विमा कंपनीला अदा करण्यात आली आहे. म्हणजेच दि. ३१.१२.२०१८ पर्यंत विमा कंपनीला एकूण रु. ५१६०,८६,६०,३५४ इतकी रक्कम विमाहप्त्यापोटी प्रदान करण्यात आली आहे.

नॅशनल इन्शुरन्स कंपनीने त्यांच्या दिनांक १५ ऑक्टोबर, २०१८ रोजीच्या पत्रानुसार, विमा कंपनी तिसऱ्या व चौथ्या तिमाहीमध्ये सोसायटीने २ टक्के वगळलेल्या रक्कमेसाठी राजी असून इथून पुढे विमा हप्ता २% प्रचार व प्रसिद्धीची रक्कम कमी करणार असून योजनेच्या प्रचार व प्रसिद्धीवर विमा कंपनीकडून कोणताही खर्च केला जाणार नसल्याचे सांगितले आहे. तसेच, दि. ३०.०६.२०१८ अखेरची २ टक्के प्रचार व प्रसिद्धीसाठीची विमा कंपनीकडे अखर्चित असणारी रक्कम रु. ६३,७८,९७,४५२ चार हप्त्यामध्ये अदा करत असल्याचे कळविले आहे व सोसायटीने तिसऱ्या विमा हप्त्यामधून प्रलंबित ठेवलेल्या रकमेतील दि. ३०.०६.२०१८ पर्यंतची २% प्रचार व प्रसिद्धीची रक्कम रु. ६३,७८,९७,६५२ विमा कंपनीस अदा करावी अशी विनंती केली आहे. रक्कम रु. ६३,७८,९७,६५२ दि. १५.१२.२०१८ पर्यंत सोसायटीस संपुर्णतः प्राप्त झाली आहे. आता सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि. २०.१२.२०१८ मधील तरतुदीनुसार योजनेची प्रचार व प्रसिद्धी माहिती व जनसंपर्क महासंचालनालय मार्फत करण्यात येईल. सध्या योजने अंतर्गत अंगीकृत रुग्णालयांद्वारे नियमितपणे आरोग्य शिबिरे आयोजित करून योजनेचा प्रचार आणि प्रसिद्धी केली जात आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

शिफारस

३.२८ योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी त्याची पुरेशा प्रमाणात प्रसिद्धी करणे आवश्यक असताना मानकांनुसार विस्तृत प्रमाणावर करावयाच्या प्रसिद्धीचा अभाव या प्रकरणी झाल्याचे आक्षेप महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात नोंदविलेले आहेत. विमा कंपन्यांनी प्रसिद्धीसाठी घेतलेली रक्कम त्यासाठी वापरली नाही. याअनुषंगाने मागील सर्व वर्षातील अखर्चित राहिलेली रक्कम रु. ६३.७८ कोटी विमा कंपनीकडून परत घेण्यात आली आहे. तसेच येथून पुढे २ टक्के प्रसिद्धीसाठी विभाग विमा कंपनीला पैसे देत नसून विभाग माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत स्वतःच ती प्रसिद्धी करीत आहे. विमा कंपनीसोबत झालेल्या MOU मध्येच अशी अट होती की विभाग विमा कंपनीला जे प्रिमियम देणार त्यापैकी २ टक्के रक्कम IEC ॲक्टीव्हीटीमध्ये खर्च करावयाची होती. या MOU चा कालावधी मधेच संपला आणि केंद्र शासनाकडून नॅशनल हेल्थ प्रोडक्शन स्किम सुरू करण्याचा प्रस्ताव आला. त्यामुळे मधल्या काळात योजनेची प्रसिद्धी न करता कंपनीला प्रिमियम विभाग देत राहिले. तो खर्च न करण्यात आलेला निधी आता वसूल करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे विभागामार्फत माहिती व जनसंपर्क संचालनालयाला देण्यात आलेले रु. १० कोटीदेखील खर्च झालेले नाहीत. यासंदर्भात समितीने विचारणा केली असता आराखडा मंजूर झाल्यानंतर सदर निधी खर्च करण्यात येणार असल्याचे समितीस सांगण्यात आले. जीवनदायी आरोग्य योजना ही शासनाच्यावतीने राबविण्यात येणारी अत्यंत महत्वाकांक्षी योजना असून गोरगरीब जनतेला या योजनेंतर्गत मोठ्या प्रमाणात वैद्यकीय उपचार प्राप्त होत असताना योजनेचा प्रचार, प्रसार व प्रसिद्धी न केल्यामुळे विभागाच्या या अत्यंत महत्त्वाच्या व वैद्यकीयदृष्ट्या हिताच्या योजनेचा लाभ पुरेशा प्रमाणात लोकांना घेता आला नाही. विमा कंपनीनेदेखील निधी घेऊन याबाबत कोणतीही कार्यवाही गांभीर्याने व जबाबदारीने केली नाही. त्यातच नवीन आराखडा तयार करण्यासाठी विभागाला फार मोठा कालावधी लागला. त्यातही राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेचे नाव बदलून महात्मा ज्योतिबा फुले आरोग्य योजना असे करायचे असल्यामुळे ही सर्व कार्यवाही थांबलेली होती. विभागाने या योजनेचा मोठ्या प्रमाणात प्रचार व प्रसार करून जास्तीत जास्त लोकांना याचा लाभ मिळण्याच्यादृष्टीने आवश्यक ती उपाययोजना तातडीने करावी तसेच योजनेला विस्तृत प्रसिद्धी द्यावी आणि त्यासाठी राखून ठेवलेला निधी पुर्णपणे उपयोगात आणावा व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ३.१.९.४ "आरोग्य कार्डाची छपाई"

विमा कंपनीने खर्चाची प्रतिपुर्ती न करणे

अभिप्राय

३.२९ टप्पा I आणि II च्या सामंजस्य कराराच्या कलम २६ नुसार, लाभार्थ्यांना जारी करावयाच्या आरोग्य कार्डांच्या छपाईचा खर्च विमा कंपनीने करावयाचा होता. तथापि, वर्ष २०११-१२ ते २०१४-१५ दरम्यान संस्थेने १. २० कोटी आरोग्य कार्ड छापण्यासाठी (टप्पा I आणि II चे कार्ड) रु. ९.६५ कोटी खर्च केले होते. परंतु विमा कंपनीने आजतागायत (जून, २०१७) त्या खर्चाचा परतावाही केला नव्हता किंवा संस्थेनेही विमा कंपनीला अदा करावयाच्या रक्कमेतून सदर रक्कम समायोजित केली नव्हती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

यासंदर्भात विभागाने सांगितले (नोव्हेंबर, २०१७) की, आरोग्य कार्डांच्या छपाई आणि वितरणावर केलेल्या रु. ९.६५ कोटी खर्चाचे, जे आयईसीचा एक भाग आहे, प्रतिपुर्ती करण्यासाठी संस्थेने ऑगस्ट, २०१७ मध्ये स्मरणपत्र पाठविले आहे. विमा नियामक आणि विकास प्राधिकरण विनियमांच्या खंड ६४ V ब नुसार, पॉलिसीअंतर्गत लाभ प्राप्त होण्यासाठी एकूण विमा हप्ता अदा करणे आवश्यक असल्यामुळे संस्थेला वरील रक्कम विमा हप्त्यातून समायोजित करता येऊ शकली नव्हती.

विमा कंपनीसोबत झालेल्या पहिल्या व दुसऱ्या टप्प्यांच्या सामंजस्य करारातील कलम क्र. २६.१ नुसार आरोग्य पत्र छपाईवर झालेला खर्च विमा कंपनीने करणे आवश्यक आहे. मात्र, सन २०११-१२ ते २०१४-१५ पर्यंत आरोग्य पत्र छपाईकरिता सोसायटीने रु. ९. ६५ कोटी इतकी रक्कम खर्च केली होती (पहिला व दुसरा टप्प्यातील आरोग्य पत्र). तथापि विमा कंपनीने या खर्चाची प्रतिपुर्ती केली नव्हती किंवा विमा कंपनीस देणे असलेल्या कोणत्याही रकमेतून या रकमेचे समायोजन करण्यात आले नव्हते.

सध्या, सोसायटीने विमा कंपनीकडे अखर्चित असणारी २% प्रचार व प्रसिद्धीची रक्कम रुपये ६३.७८ कोटी प्रतीपुर्तीने प्राप्त करून घेतली असून त्यामध्ये सोसायटीने आरोग्य पत्र छपाई व वितरणावर केलेला खर्च रुपये ९. ६५ कोटीचा समावेश आहे असेही विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगतिले.

शिफारस

३.३० सदरहू परिच्छेदात आरोग्य कार्डाच्या छपाईसंदर्भात विमा कंपनीने खर्चाची प्रतिपूर्ती न करणे असे आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेले आहेत. लाभार्थ्यांना जारी करावयाच्या आरोग्य कार्डाच्या छपाईचा खर्च विमा कंपनीने करावयाचा होता. त्यासाठी संस्थेने रु. ९. ६५ कोटी खर्च केले होते. परंतु त्याचा परतावा विमा कंपनीने दिला नव्हता. ही रक्कम आता वसूल करण्यात आलेली आहे. याची पुनरावृत्ती विभागाने भविष्यात टाळावी व यास जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी व योजनेचा लाभ घेण्यासाठी सर्व पात्र लाभार्थ्यांना आरोग्य कार्ड जारी करावेत व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ३.१.९.५ "निर्धारीत नुकसानीची वसुली न करणे"

अभिप्राय

३.३१ टप्पा I आणि II च्या सामंजस्य कराराच्या कलम १२ आणि १३ नुसार विमा कंपनीला करार, योजना आणि पॉलिसी संदर्भात तिची दायित्वे पूर्ण करण्यासाठी बहुविध कार्ये पार पाडावी लागतात. विमा कंपनीने नियत वेळेत जर यापैकी एखादे कार्य केले नाही तर योजनेच्या देय तारखेला अंमलबजावणी होण्यावर अडथळा येतो आणि प्रतिकूल परिणाम होतो आणि त्यामुळे विमेदाराला आणि लाभार्थ्यांना नुकसान होते. तसेच विमा कंपनीला, कराराच्या तारखेपासून विहीत कालावधीच्या आत करारात नमूद केलेली कार्ये पूर्ण करणे आवश्यक असते अन्यथा विमा कंपनीला एकूण विमा हप्त्याच्या राशिवर विशिष्ट टक्क्यांनी प्रति आठवडा/महिना निर्धारीत नुकसानभरपाईची रक्कम विलंब झालेल्या कालावधीसाठी संस्थेला प्रदान करावी लागते. योजनेच्या दुसऱ्या टप्प्यांत निर्धारीत नुकसानभरपाईची कमाल मर्यादा रु. १ लाख होती.

परंतु योजनेअंतर्गत प्रत्येक जिल्ह्यात करावयाची कार्ये जसे, २४ तास कॉल सेंटर, पर्याप्त मुलभूत सुविधा, रोख रक्कमरहीत उपचार इत्यादी न केल्यामुळे, देय असलेली, टप्पा I ची रु. ९६. ०८ कोटी आणि टप्पा II ची रु. ३ लाखाची निर्धारीत नुकसानभरपाई रक्कम अनुक्रमे चार वर्षे व तीन वर्षे वसूल केली नव्हती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

विमा कंपनीसोबत झालेल्या सामंजस्य करारातील विविध कामगिरी विहीत मुदतीत न केल्याप्रकरणी, लिक्वीडेटेड डॅमेजची रक्कम सोसायटीस अदा करण्याकरिता विमा कंपनीस वारंवार पत्र व नोटीसा पाठविण्यात आल्या आहेत मात्र विमा कंपनीने लिक्वीडेटेड डॅमेजची रक्कम अदा करण्यास स्पष्ट नकार दिला आहे. करारनाम्यातील वाद निवारणसंबंधीच्या तरतुदीनुसार, लिक्वीडेटेड डॅमेज रकमेची वसुली करण्याकरिता लवाद (Arbitration) प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

विमा कंपनीकडून लिक्वीडेटेड डॅमेजची रक्कम वसूल करावयाची आहे. शासनाकडील दि. १० डिसेंबर, २०१८ रोजीच्या पत्रानुसार, नॅशनल इन्श्युरन्स कंपनी व राज्य आरोग्य हमी सोसायटीतील आर्बिस्ट्रेशन प्रकरणे सोडविण्याकरिता दोन्ही पक्षकारांच्या सदस्यांची समिती गठीत करण्यात आली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

शिफारस

३.३२ निर्धारीत नुकसानीची वसुली न करणे यासंदर्भात महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात आक्षेप नोंदविलेले असून यासंदर्भात आर्बीट्रेशनची तरतूद करण्यात आल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. आर्बीट्रेशनला जाण्यापूर्वी शासनामार्फत एक समिती गठीत करण्यात आली असून यामध्ये विमा कंपनीचे प्रतिनिधी, राज्य आरोग्य हमी सोसायटीचे प्रतिनिधी यांचा समावेश आहे. विमा कंपनी शासनाकडून रु. ३३८ कोटीची मागणी करीत असून शासनाने विमा कंपनीकडे रु. ३९६ कोटीची मागणी केली आहे. या समितीमध्ये जर सदरहू प्रकरणी तोडगा निघाला नाही तर आर्बीट्रेशनमध्ये हे प्रकरण जाणार आहे. MOU मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रिमीयमच्या ११० टक्केपेक्षा जास्त दावे जर प्रदान करण्यात येत असतील तर १०५ टक्क्यापासून ५०-५० टक्के निधी शासनाने द्यायचा आहे. त्याआधारे विमा कंपनी रकमेची मागणी करीत आहे. विभाग मात्र त्यांचेकडून रु. ३९६ कोटीची मागणी करीत आहे. या प्रकरणी सामोपचाराने वाटाघाटीद्वारे समितीस्तरावर निर्णय होत असेल तर त्यासाठी विभागाने आवश्यक ते प्रयत्न तातडीने करावेत व यात जर सामोपचाराने निर्णय झाला नाही तर हे प्रकरण लवादापुढे नेऊन त्यावर अंतिम निर्णय घेणे आवश्यक होईल. अतः विभागाने या प्रकरणी कालबद्ध पद्धतीने निर्णय घेवून हा विषय निकाली काढण्यात यावा व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ३.१.९.६ "रुग्णालयांनी दाव्यांच्या अतिरिक्त रक्कमेचा शासकीय लेख्यात भरणा न करणे"

अभिप्राय :

३.३३ महाराष्ट्र कोषागार नियम १९६८ च्या खंड क्ष च्या नियम ८(१) नुसार, शासकीय महसुलापोटी प्राप्त झालेल्या रक्कमेचा, रक्कम प्राप्त झाल्याच्या तारखेपासून दोन दिवसांच्या आत शासकीय कोषागारात भरणा करावा. परंतु सार्वजनिक आरोग्य विभागाने शासनाच्या अंगीकृत रुग्णालयांना लाभार्थ्यांच्या उपचारासाठी उपयोगी (कन्ज्युमेबल) वस्तू आणि मानधन यापोटी, विमा कंपनीकडून रुग्णालयाला प्राप्त झालेल्या दाव्यांच्या रक्कमेच्या ५० टक्के रक्कमेपर्यंत खर्च करण्याची परवानगी दिली होती (जून २०१३) आणि उर्वरीत रक्कम शासकीय खात्यात जमा करण्याबाबत कुठलेही निर्देश दिले नव्हते.

परंतु नॅशनल इन्शुरन्स कंपनीने १, २९, ८२८ प्रकरणांत ६० रुग्णालयांना रु. २४९. ३९ कोटींच्या दाव्यांची प्रतिपुर्ती केली होती, परंतु, उर्वरीत रक्कम ही संबंधित रुग्णालयांच्या बँक खात्यात जमा होती आणि ती शासकीय कोषागारात जमा केलेली नव्हती. निवड केलेल्या १० जिल्ह्यातील १५ शासकीय अंगीकृत रुग्णालयांची चाचणी तपासणीत असे आढळून आले की, रु. ५९. ५२ कोटींचा निधी पडून होता परिणामी शासकीय निधी अनधिकृतपणे राखून ठेवला गेला होता असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

शासकीय रुग्णालयांनी दाव्यांमधून प्राप्त निधी शासकीय खात्यात भरणा करण्याची पुर्तता करण्याकरिता उपरोक्त संबंधित प्राधिकरणांना कळविले असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

शिफारस

३.३४ सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी "रुग्णालयांनी दाव्यांच्या अतिरिक्त रक्कमेचा शासकीय लेख्यात भरणा न करणे" यासंदर्भात आक्षेप नोंदविलेले आहेत. यासंदर्भात विमा कंपनीकडून शासकीय रुग्णालयांना प्राप्त झालेल्या दाव्यांच्या रकमेच्या ५० टक्के रक्कम खर्च करता येवू शकते. संबंधित रुग्णालयांनी २५ टक्के रक्कम शासनाकडे जमा केली पाहिजे, उर्वरित २० टक्के रक्कम सदर रुग्णालयातील कर्मचारी वर्गांना प्रोत्साहन म्हणून देता येते, ३ टक्के निधी प्रशासकीय बाबींवर खर्च करता येवू शकतो आणि ५२ टक्के निधी हा इन्फ्रास्ट्रक्चरवर खर्च करता येवू शकतो. याबाबत शासनाने समिती व पद्धत नेमून दिली असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. लाभार्थ्यांच्या उपचारापोटी उपयोगी वस्तु (Consumable Items) ज्या रुग्णालयाकडून उपलब्ध होत नाहीत त्या या ५२ टक्के निधीतून खरेदी करता येतात. जून, २०१३ आणि ऑगस्ट, २०१३ च्या शासन निर्णयामध्ये देखील याचा समावेश होता. ज्यात रुग्णालयातील औषधाचा खर्च, प्रवास खर्च, भोजन खर्च, डेटाएन्ट्री ऑपरेटरचा खर्च व इंटरनेटचा खर्च या ५२ टक्के निधीमध्ये समाविष्ट आहे. याची तंतोतंत अंमलबजावणी विभागाने कालबद्ध पद्धतीने करावी व अशा आक्षेपांची भविष्यात पुनरावृत्ती टाळावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ३.१.९.७ 'मत्ता कमी दाखविणे'

अभिप्राय

३.३५ भारताचे नियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांचेकडे सूचीबद्ध असलेल्या सनदी लेखापरिक्षकांकडून संस्थेच्या वार्षिक लेख्यांची लेखापरिक्षा केली जाते. वित्तीय वर्ष २०१५-१६ पर्यंत संस्थेच्या लेख्यांची लेखापरिक्षा करण्यात आली होती.

वित्तीय वर्ष २०१२-१३ ते २०१५-१६ या कालावधीच्या वार्षिक लेख्यांची छाननी करता असे आढळून आले की, विविध प्रसंगी संस्थेने विमा कंपनीच्या वतीने केलेले खर्च आणि विमा कंपनीला अतिरिक्त प्रदान केलेला रु. ६१ कोटींचा विमा हप्ता, विमा कंपनीकडून वसूल करावयाची रक्कम म्हणून दाखविला नव्हता. याच्या परिणामी, मत्ता त्या प्रमाणात कमी दर्शविल्या गेल्या होत्या असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहे.

विभागीय प्रतिनिधींनी यासंदर्भात नमूद केले की, विमा कंपनीकडून प्राप्त करावयाची रक्कम वर्ष २०१६-१७ च्या वार्षिक लेख्यामध्ये टिपणीच्या स्वरुपात दर्शविण्यात आले आहे.

शिफारस

३.३६ "मत्ता कमी दर्शविणे" यासंदर्भात महालेखाकारांनी नोंदविलेले आक्षेप हे निश्चितच गंभीर आहेत. विमा कंपनीकडून प्राप्त करावयाची रक्कम सन २०१६-१७ च्या वार्षिक लेख्यामध्ये टिप्पणीच्या स्वरुपात दर्शविलेली असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. मत्ता दर्शविण्याचा मुळ उद्देश हा या योजनेंतर्गत विमा कंपन्यांकडून शासनाला प्राप्त होणाऱ्या बाबींचे विस्तृत विवरण आहे. याची निश्चिती अगोदरच होणे आवश्यक आहे. जेणेकरून विमा कंपनीच्यावतीने केलेले खर्च व कंपनीला झालेल्या रकमेचे प्रदान वा विमा कंपनीकडून वसूल करावयाची रक्कम याची निश्चिती विभागाला अचूकरित्या करणे शक्य होते. मत्ता न दर्शविल्यामुळे विभागास विमा कंपनीकडून घ्यावयाच्या रकमेबाबतची कार्यवाही विनाविलंब करणेस बाधा निर्माण होते. अशाप्रकारे मत्ता कमी दाखविण्यासंदर्भात दोषी अधिकाऱ्यांवर विभागाने कारवाई करावी. तसेच भविष्यात अशा बाबींची पुनरावृत्ती होवू नये यासाठी आवश्यक ती दक्षता विभागाने घेऊन विमा कंपनीने वेळोवेळी मत्ता दर्शवावी तसेच विभागाने देखील विमा कंपनीकडून येणे असलेली मत्ता स्वतःच्या लेख्यांमध्ये दर्शवावी

व सनदी लेखापरिक्षकांकडून संस्थेच्या वार्षिक लेख्यांची लेखापरिक्षा विनाविलंब करण्यात यावी व अशा आक्षेपांची पुनरावृत्ती टाळावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ३.१.१० "संनियंत्रण आणि अंतर्गत नियंत्रण"

परिच्छेद क्रमांक ३.१.१०.१ "नियामक परिषदेच्या बैठकांची कमतरता"

अभिप्राय

३.३७ सार्वजनिक आरोग्य विभागाच्या जुलै, २०११ च्या शासन निर्णयानुसार आणि राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना नियम आणि विनियम, २०१० नुसार, योजना सुरळीत चालण्यासाठी, नियामक परिषदेची तीन महिन्यांतून एकदा बैठक घ्यावयाची होती. परंतु मार्च, २०१७ पर्यंत नियामक परिषदांच्या २३ बैठकांऐवजी फक्त चार बैठका झाल्या होत्या ज्यामुळे योजनेच्या संनियंत्रण आणि व्यवस्थापनावर परिणाम होत होता असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

काही आकस्मिक परिस्थिती आणि प्रशासकीय कारणांमुळे नियामक परिषदेच्या बैठका घेण्यात आल्या नव्हत्या. सामंजस्य करारातील टप्पा I च्या मुदतवाढ/विस्तार यासारख्या महत्त्वपूर्ण बाबी आणि निर्णयांसाठी नियामक परिषदेच्या सदस्यांकडे नस्ती पाठवून निर्णय घेण्यात आला होता. नियामक परिषदेच्या बैठकीचे नियोजन करण्यासाठी पत्रव्यवहार सुरू असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

सार्वजनिक आरोग्य विभागाकडील दि. १६ जूलै, २०१० रोजीच्या शासन निर्णयानुसार, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेच्या अंमलबजावणीची देखरेख व संनियंत्रण करण्याकरिता मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली नियामक परिषद गठीत करण्यात आली होती. दि. १३ जूलै, २०११ रोजीचा शासन निर्णय व सोसायटीच्या मेमोरँडम ऑफ असोसिएशनमधील कलम क्र. ९ (i) याप्रमाणे नियामक परिषदेची तीन महिन्यातून किमान एक बैठक घेणे अपेक्षित होते. त्यानुसार नियामक परिषदेच्या ४ बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या. काही आकस्मिक परिस्थिती आणि प्रशासकीय कारणांमुळे नियामक परिषदेच्याा बैठका घेण्यात आल्या नव्हत्या. तथापि, काही महत्त्वपूर्ण विषय व निर्णय जसे की, पहिल्या टप्प्याच्या सामंजस्य करारनाम्यात सुधारणा आणि पहिल्या टप्प्यास मुदतवाढ या सारख्या विषयांवर नियामक परिषदेच्या सदस्यांकडे नस्ती परिक्रमीत करून निर्णय घेण्यात आला. नियामक परषिदेच्या बैठका वेळीच घेण्यासाठी मा. मुख्यमंत्री सचिवालयाकडे पत्रव्यवहार करण्यात आला होता. दिनांक २१. ०९. २०१८ च्या शासन निर्णयान्वये नियामक परिषदेची पुनर्रचना करून प्रधान मंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेकरिता मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली नियामक परिषद गठीत करण्यात आली असल्याचेही विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

शिफारस

३.३८ नियामक परिषदेच्या बैठकांची कमतरता यासंदर्भात महालेखाकारांनी सदरहू आक्षेप नोंदविलेले असून सार्वजनिक आरोग्य विभागाच्या जुलै, २०११ च्या शासन निर्णयानुसार आणि राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना नियम आणि विनियम, २०१० नुसार योजना सुरळीत चालण्यासाठी दरवर्षी नियामक परिषदेच्या ४ वेळा बैठका घेणे आवश्यक असतानाही विभागाने ५ वर्षामध्ये फक्त चारच बैठका घेतल्या आहेत ही बाब निश्चितच समर्थनीय नाही. एकाचवेळी सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांना बैठकीसाठी वेळ मिळत नाही हे विभागीय प्रतिनिधींनी दिलेले कारण समिती मान्य करू शकत नाही. बैठका घेण्यासंदर्भात ज्या तरतूदी नियमात आहेत त्याचे पालन करणे प्रशासकीय यंत्रणेवर बंधनकारकच आहे. त्यामुळे निश्चितच या बैठका वेळोवेळी घेण्याकडे दुर्लक्ष झालेले आहे. सन २०१८ मध्ये आता नवीन शासन निर्णय निर्गमित करून ही बैठक मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली घेण्याबाबत निर्णय झालेला आहे व यापुढे दर तीन महिन्यांनी ही बैठक घेण्यात येईल असेही विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर आश्वासित केले. अतः विभागाने या तरतूदीची अंमलबजावणी तंतोतंत करण्यासंदर्भात दक्षता घ्यावी व कोणत्याही परिस्थितीत या बैठकांमध्ये खंड पडू नये याची विभागाने काळजी घ्यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ३.१.१०.२ "प्रलंबित तक्रारी"

अभिप्राय

३.३९ सामंजस्य कराराच्या कलम ४३ नुसार, योजनेच्या लाभार्थ्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा स्तरावर जिल्हा तक्रार निवारण समिती आणि राज्य स्तरावर, संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांच्या अध्यक्षतेखाली राज्य तक्रार निवारण समिती गठीत करावयाची होती. शिवाय, विमा कंपनीच्या कार्यकारी संचालकाच्या पर्यवेक्षणाखाली, कार्पोरेट कार्यालय स्तरावर लाभार्थ्यांच्या तक्रार निवारणासाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करावयाचा होता. परंतु २०१२-१३ ते २०१६-१७ दरम्यान प्राप्त झालेल्या ११०१९ तक्रारींपैकी ३१ मार्च २०१७ पर्यंत ९४८१ तक्रारींचे निवारण झाले होते आणि १५३८ तक्रारींचे निवारण झाले नव्हते.

लाभार्थ्यांच्या निवारण न झालेल्या तक्रारींबाबत असे दिसून आले की, १३११ तक्रारी या योजनेअंतर्गत निर्धारीत रुग्णालयाकडून वसूल केल्या जाणा-या रकमे विषयी होत्या, ज्यांची संख्या एकूण तक्रार निवारण न झालेल्या तक्रारींच्या ८५ टक्के होती. तसेच खाजगी रुग्णालयात वसूल केल्या जाणा-या रकमेविषयी तक्रारी ८२२ (६३ टक्के) होत्या, त्याच्या तुलनेत शासकीय रुग्णालयातील तक्रारी ४८९ (३७ टक्के) होत्या असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

यासंदर्भात विभागाने नमूद केले की, योजनेखाली करण्यात आलेल्या रु. १२. ५३ लाख शस्त्रक्रिया/उपचारासंबंधी फक्त ११०१९ तक्रारी करण्यात आल्या होत्या ज्यांचे प्रमाण एकुण शस्त्रक्रिया/उपचार यांच्या केवळ ०. ८८ टक्के येते. ज्या रुग्णालयांमध्ये रुग्णांकडून शुल्क गोळा करण्याची पद्धत बंद करण्यात आलेली नाही त्यांना योजनेतून निलंबित/योजने अंतर्गत रुग्णालयांच्या यादीमधून वगळण्याची कठोर कारवाई करण्यात येत आहे. शासकीय रुग्णालयांमध्ये लाभार्थ्यांकडून स्वतः केल्या जाणा-या खर्चाशी संबंधित तक्रारींचे निवारण करण्यासाठी संस्था एक कार्यतंत्र/कार्यचौकट तयार करत आहे. या योजनेखाली रोख रक्कम रहीत उपचार देणे अभिप्रेत असल्यामुळे लाभार्थ्यांना स्वतः खर्च करावा लागल्यामुळे ब-याच रुग्णांना झालेल्या गैरसोईमुळे योजनेखालील रोख रक्कम रहीत सुविधा पुरविण्याचे उद्दीष्ट साध्य झाले नाही आणि म्हणून त्यावर त्वरित उपाययोजना करण्याची गरज आहे.

जिल्हा पातळीवर जिल्हाधिकारी आणि राज्य पातळीवर अध्यक्ष म्हणून तक्रार निवारण समिती सोसायटीच्या मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील राज्य तक्रार निवारण समिती योजनेच्या लाभार्थ्यांच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी गठीत केली गेली आहे. जिल्हाधिकारी नियमितपणे सार्वजनिक आणि खाजगी दोन्हीं रुग्णालयांच्या बैठका घेऊन त्यांच्या कामगिरीची तसेच तक्रारींचे अवलोकन करतात. अंगीकृत रुग्णालयांकडून उपचारादरम्यान रुग्णांकडून अतिरिक्त पैसे घेतल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्यास सोसायटी अशा रुग्णालयांवर कठोर कारवाई करते. तसेच अशा प्रकारच्या तक्रारींची पुनरावृत्ती होत असेल तर अशा रुग्णालयांना Show Cause Notice दिली जाते. तात्काळ कारवाईसाठी ५ पेक्षा जास्त प्रलंबित तक्रारी असलेल्या संबंधित योजनेत अंतर्भूत रुग्णालयांना Show Cause Notice जारी करण्यात आल्या असल्याचेही विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले

शिफारस

३.४० महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात नोंदविलेले आक्षेप हे या योजनेच्या अंमलबजावणीतील परिणामासंदर्भात अत्यंत महत्त्वाचे आहेत. ही योजना राबविताना अनेक तक्रारी प्राप्त झालेल्या होत्या. यासाठी विमा कंपनीच्या कार्यकारी संचालकाच्या पर्यवेक्षणाखाली, कॉर्पोरेट कार्यालय स्तरावर, लाभार्थ्यांच्या तक्रार निवारणासाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करणे आवश्यक होते. परंतु महालेखाकारांनी या तक्रारींची नोंदविलेली संख्या ही दुर्लक्षित करण्यासारखी नाही. त्यातील हजारो तक्रारींचे निवारण झालेले नव्हते. सन २०१२ मध्ये प्राप्त झालेल्या तक्रारींचे निवारण सन २०१८-१९ पर्यंतदेखील केलेले नव्हते. यासंदर्भात समितीने विचारणा केली असता आता जर रुग्णालयाने तक्रारींचे निवारण केले नाही तर त्या रुग्णालयाचा दावा रोखण्याची कार्यवाही करण्यात येते असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. या तक्रारींच्या स्वरूपाबाबत समितीने माहिती घेतली असता उपचारासाठी लागणारी औषधे रुग्णाच्या खर्चाने बाहेरून मागविण्यात येणे अथवा रक्त चाचण्यादेखील बाहेरुन करण्यास सांगणे अशा बाबींचा त्यात समावेश होता. अशाप्रकारच्या तक्रारी या निश्चितच गंभीर असून योजनेचा मुळ हेतूच नष्ट करणाऱ्या आहेत. याची गंभीर दखल विभागाने त्या-त्यावेळी घेणे अत्यावश्यक असताना वेळेत याची दखल न घेतल्यामुळे तक्रारींची संख्या वाढलीच परंतु विमा कंपन्यांवर कोणतेही निर्बंध विहित वेळेत येऊ शकले नाहीत. यासंदर्भात समितीने विभागीय प्रतिनिधींना विचारणा केली असता गत ६ महिन्यामध्ये खाजगी रुग्णालयांनी संबंधित रुग्णांना यासाठीचे रु. ३ कोटी परत केलेले आहेत. या तक्रारींचे स्वरुप पाहता योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीचे परिणाम वा त्रुटी दर्शविणारे असून या माध्यमातून योजनेची यशस्वीता ठरविण्याचे माध्यम होते. परंतु त्याची गंभीर दखल विभागाने वेळेत घेतली नाही. त्यामुळे या तक्रारींचे निराकरण विभागाला वेळेत करता आले नाही व योजना अधिक अद्ययावत व सुधारित पद्धतीने राबविण्यात अडथळा निर्माण झाला. त्याचप्रमाणे आता विमा कंपनीने रु. ३३३ वरून रु. ६९० इतका प्रिमियम वाढविला. परंतु विभागाने यामध्ये विशेष लक्ष घालून व त्यांचेशी वाटाघाटी करून प्रिमीयम रु. ६४० पर्यंत कमी केलेला आहे. त्यामुळे शासनाची रु. ११० कोटीची बचत झालेली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले असता, याचा अर्थ गतवर्षी या वाटाघाटी न केल्यामुळे विभागाला रु. ५० जास्त दराने प्रिमियम द्यावा लागला असे आक्षेप समितीने नोंदविले असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली व विभागाचे अधिकारी या प्रक्रियेमध्ये पुर्ण क्षमतेने गुणवत्तेनुसार काम करीत नाहीत हे स्पष्ट झाले. ज्याचा भूर्दंड प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या शासनावर व योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीवर पडला. या सर्व बाबी निश्चितच गंभीर असून या योजनेसंदर्भात प्रलंबित तक्रारींचे निराकरण कालबद्ध पद्धतीने करण्यात यावे, तक्रारींचे प्रमाण कमी करण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावी व योजनेची अंमलबजावणी पात्र लाभार्थ्यांच्या हिताची होण्याच्यादृष्टीने आवश्यक ते पुर्ण प्रयत्न विभागाच्या स्तरावरून करण्यात यावेत व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ३.१.१०.३ "संस्थेचा वार्षिक अहवाल आणि उपविधि तयार न करणे"

अभिप्राय

३.४१ राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना संस्था नियम आणि विनियम, २०१० मध्ये अशी तरतूद आहे की, संस्थेने वार्षिक अहवाल मंजूर, स्विकृत आणि तयार करावे, नियम आणि विनियम आणि संस्थेचे कार्य याच्याशी अनुरुप उपविधी तयार करावेत आणि राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना संस्थेने सर्व लाभार्थ्यांसाठी ठरविलेला विमा हप्ता आणि संस्थेच्या कर्मचा-यांचा प्रशासकीय खर्च, कार्यालयीन खर्च, वेतन, भत्ते, मुलभूत सुविधांसाठी मदत, मोटर परिवहन, पेट्रोल, तेल आणि वंगण इत्यादी (कॉर्पस/संस्थेचा निधी) नुसार शासनाने वार्षिक अर्थसंकल्पात तरतूद करावी.नियामक परिषदेने मंजूरी दिल्यास संस्था अधिकृत दात्यांकडून देणगीही स्विकारु शकते.परंतु संस्थेने वार्षिक अहवाल आणि उपविधी तयार केले नव्हते. तसेच योजनेच्या

संनियंत्रण आणि व्यवस्थापनासाठी जो कॉर्पस/राखीव निधी आवश्यक असतो त्याचीही संस्थेने तरतूद केली नव्हती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

शिफारस

३.४२ संस्थेचा वार्षिक अहवाल व उपविधी तयार न करणेसंदर्भात सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी आक्षेप नोंदविलेले आहेत. या बाबी करणे संस्थेवर बंधनकारक असताना त्याची अंमलबजावणी करण्यात आली नाही. ही निश्चितच गंभीर बाब आहे. आता उपविधी व वार्षिक अहवाल अंतिम करण्याकरिता दि. २९ जुलै, २०१७ रोजी अंतर्गत समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. उपविधी व वार्षिक अहवालाचे प्रारुप समित्यांची व नियामक परिषदेच्या मान्यतेस्तव तयार ठेवण्यात आले असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. याची अंमलबजावणी तातडीने व कालबद्ध पद्धतीने करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

४.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१६-१७ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.४ व ३.१३ यासंदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय व्यक्त केले :-

अहवालातील परिच्छेद क्र.	परिच्छेद	अनुपालन
३.४.४	**नियोजन**	
३.४.४.१	**नियोजनातील कमतरता** राष्ट्रीय धोरण आकृतीबंध यावर आधारीत प्रत्येक राज्याने राज्य विशिष्ट क्षेत्र धोरण आकृतीबंध बनविणे आवश्यक होते ज्याच्या आधारावर १२ व्या योजना कालावधीमध्ये (२०१२-१७) पाणी पुरवठा योजना होती घेण्यासाठी राज्य स्तरीय योना आखावयाच्या होत्या. एनआरडीडब्लूपी च्या मार्गदर्शक सूचनांनुसार, प्रत्येक ग्रामीण आणि स्वच्छता समिती यांनी ग्रामीण जल सुरक्षा आराखडा बनवावयाचा होता, ज्यात लोकसंख्या विषयक, भौतिक वैशिष्टये, जलस्रोत व गावातील इतर माहिती, उपलब्ध पाण्यासंबंधी पायाभूत घटक व अंतर, अस्तित्वातील पायाभूत सुविधांच्या व जलस्रोतांच्या विस्तारासाठी प्रस्तावित कामे आणि ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांसाठी लागणारा निधी ह्या बाबी अंतर्भूत असतील. राज्यातील सर्व ग्रामीण पाणी आणि स्वच्छता समितीवर आधारीत जिल्हा पाणी आणि स्वच्छता अभियान यांनी जिल्हा जलसुरक्षा आराखडा बनविणे आवश्यक होते. पंचवार्षिक सर्वसमावेशक जलसुरक्षा कृती आरखडा तसेच प्रत्येक वित्तीय वर्षात वार्षिक कृती आराखडा बनविणे राज्याला बंधनकारक होते.	राज्यामध्ये सन २००९-१० पासून राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार सदर कार्यक्रमांतर्गत जिल्हा जल सुरक्षा आराखडा आणि पंचवार्षिक सर्वसमावेशक सुरक्षा कृती आराखडा करणे अपेक्षित आहे. तथापि सदर कार्यक्रमाची व्याप्ती विचारात घेऊन केंद्र शासनाने निवडक तालुक्यांमध्ये पथदर्शी प्रकल्प राबविण्याचे निश्चित केले. यानुसार राज्यातील अमरावती जिल्हयामधील मोर्शी तालुका निवड करण्यात आला होता. यानसुार भू. स. वि. यंत्रणेमार्फत मोर्शी तालुक्यातील डोमक गावाचा जलसुरक्षितता आराखडा तयार करून केंद्र शासनास सादर करण्यात आला होता. त्यास केंद्र शासनाने मान्यता दिल्यानंतर त्याच धर्तीवर अमरावती जिल्हयातील वरुड तालुक्यातील ९६ गावांचा जलसुरक्षा आराखडा केंद्र शासनास सादर करण्यात आलेला होता. याचप्रमाणे राज्यातील सर्व ३४ जिल्हयातील प्रत्येकी एका गावाचा जलसुरक्षा आराखडा तयार करण्यात आलेला

	नियोजनामध्ये आढळलेल्या त्रुटी खाली चर्चिल्या आहेत. राज्याने १२ व्या योजना कालावधीत पाणी पुरवठा योजनांचे नियोजन करण्यासाठी राज्यासाठी विशिष्ट असे क्षेत्र धोरण आखले नव्हते. ग्रामीण जल सुरक्षा आराखडा, जिल्हा जल सुरक्षा आराखडा आणि पंचवार्षिक सर्वसमावेशक जल सुरक्षा कृती आराखडा राज्याने तयार केला नव्हता आराखडयांअभावी एनआरडीडब्लूपी अंतर्गत अपेक्षित असलेले नियोजन, रुपरेखांकन व ग्रामीण पेयजल पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीतील गावकऱ्यांच्या सहभागाची सुनिश्चिती झाली नव्हती. हाती घेतलेल्या योजनांमध्ये ग्रामीण पेयजल सुरक्षा संबंधिच्या मुद्द्यांना अधोरेखीत करण्यात एकात्मिक दृष्टीकोनाचा अभाव होता जे परिच्छेद ३.४.७.३ मध्ये चर्चिल्याप्रमाणे ग्रामपंचायतींकडून मागणी अभावी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी पूर्ण केलेल्या योजना कार्यरत होऊ शकल्या नाहीत किंवा ग्रामपंचायतींनी वैयक्तिक नळ पाणी पुरवठा योजना राबविल्यामुळे जिल्हा परिषदांनी योजना हस्तांतरीत करून घेतल्या नाहीत असे या वस्तुस्थितीवरून स्पष्ट होते.	आहे. सदर आराखडयाची अंमलबजावणी करण्यासाठी सर्व विभागांचा समन्वय, निधी आणि मनुष्यबळ या गोष्टी विचारात घेता जलसुरक्षा आराखडयाबाबत टप्या टप्याने कार्यवाही करण्यात येत आहे.
	अमरावती जिल्हयातील मोर्शी गटातील डोमक गावाकरीता ग्रामीण जलसुरक्षा आराखडा बनविण्यात आल्याचे आणि भारत सरकारने राष्ट्रीय पेयजल सुरक्षा पथदर्शी प्रकल्पांतर्गत त्याला मंजूरी दिल्याचे पाणी स्वच्छता व सहाय्य संघटनेने उत्तरादाखल सांगितले (सप्टेंबर २०१७) अमरावती जिल्हयातील वरूड गटामध्ये ९६ गावांकरीता ग्रामीण जलसुरक्षा आराखडा बनविण्यात आल्याचे आणि पथदर्शी प्रकल्पाच्या अंमलबजावणी दरम्यान मिळालेल्या अनुभवावर आधारित ग्रामीण जलसुरक्षा आराखडा बनविण्याचे काम राज्यातील इतर गावांमध्येही हाती घेण्यात येईल असेही सांगितले.	केंद्र शासनाने दिनांक २९ जुन, २०१५ च्या पत्रान्वये केवळ फ्लोराईडबाधित व संसद आदर्श ग्राम योजनेतील गावे/ वाडयांसाठी नविन योजना हाती घेण्यास अनुमती दिलेली होती. यामुळे सन २०१५-१६ या वर्षामध्ये प्रगतीनथावरील योजनांची संख्या विचारात घेऊन नवीन योजना कृती आराखडयात घेण्यात आलेल्या नाहीत. तथापि सन २०१६-१७ या वर्षाच्या कृती आराखडयामध्ये नवीन योजनांचा समावेश करण्यात आला होता. तसेच, सन २०१७-१८ च्या कृती आराखडयामध्ये फ्लोराईडबाधित व संसद आदर्श ग्राम योजनेतील गावे/ वाडया या २

	राज्यातील पाण्याची गरज पुरवविण्यासाठी सर्व समावेशक नियोजन करण्याऐवजी केवळ गरजेनुसार वार्षिक कृति आराखडयात राज्य बनवत असल्याबाबत हे उत्तर पुष्टी देते. भारत सरकारचे विनिर्देश (जून २०१५) जे सन २०१५-१६ पासून लागू आहेत त्यानुसार संसद आदर्श ग्राम योजना खाली निवड झालेल्या गावांव्यतिरिक्त, फ्लोराईड आणि अर्सेनिक बाधिक वस्त्यांव्यतिरिक्त (दुषित पाण्याने बाधित) नवीन कामे व नवीन योजनांपेक्षा अपूर्ण/ चालू कामे पर्ण करायला प्राधान्य देणे जरूरी होते. भारत सरकारने असेही निर्देश दिले (फेब्रुवारी २०१६) की सन २०१६-१७ च्या वार्षिक कृति आराखडयामध्ये ज्या गावांनी उघडयावर हागणदारीमुक्त दर्जा प्राप्त केला आहे त्या गावांच्या चालू व नवीन योजनांना प्राधान्य देण्यात यावे. विभागाने चालू असलेल्या योजनांच्या पूर्ततेला प्राधान्य दिले होते आणि तद्र अनुषंगाने, २०१५-१६ च्या वार्षिक कृति आराखडयात २,३२४ चालू योजना समाविष्ट केल्या गेल्या. २०१६-१७ च्या वार्षिक कृति आराखडयात १,६६० चालू योजना तसेच ४४ दुषित पाण्याने बाधीत वस्त्यांसाठी व ५९ संसद आदर्श ग्राम योजनेतील वस्त्यांसाठी नव्या योजना समाविष्ट केल्या.	वर्गवारीसह हागणदारीमुक्त असलेल्या गावे वाडयांसाठी देखील नवीन योजना घेण्यास केंद्र शासनाने सुचित केले होते. यानुसार अशा गावांची पेयजल स्थिती व गावाची मागणी विचारात घेऊन या वर्गवारीतील गावांचा वार्षिक कृती आराखडयामध्ये समावेश करण्यात आलेला आहे. यानुसार केंद्र शासनाच्या वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या सूचना विचारात घेऊन राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत प्रत्येक वर्षाचा कृती आराखडा तयार करून त्यानुसार अंमलबजावणी करण्यात आली आहे.

परिच्छेद क्र.	परिच्छेद	अनुपालन
३.४	राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाचे कार्यान्वयन	
३.४.५	वित्तीय व्यवस्थापन	
	भारत सरकार एनआरडीडब्ल्यूपी अंतर्गत निधीचे वाटप हे दरवर्षी वर्षाच्या सुरुवातीसच करते. जर राज्याने गेल्यावर्षीच्या दुस-या हप्त्याचे आहरण केले असेल तर भारत सरकार कार्यक्रम निधी अंतर्गत वाटपाच्या पहिल्या हप्याचे (५०टक्के) वितरण करते कार्यक्रमनिधी अंतर्गत दुसऱ्या हप्याचे वितरण हे राज्याकडुन विशिष्ट प्रस्ताव मागील वर्षाचे उपयोगिता प्रमाणपत्र मागील वर्षाच्या वास्तविक खर्चाचे प्रमाणपत्र इ.प्राप्त झाल्यावर केले जाते. आलेख २ मध्ये एनआरडीडब्लुपी अंतर्गत २०१४-१४ आणी २०१४-१७ दरम्यान निधीचा ओघ दर्शविण्यात आला आहे. तक्ता ३.४.१ मध्ये भारत सरकारने २०१२-१७ दरम्यान घटक -निहाय केलेले निधीचे वाटप आणी झालेला खर्च दर्शविला आहे. परिशिष्ट ३.४.१ मध्ये महाराष्ट्र शासन आणि भारत सरकार यांनी वर्ष निहाय आणी घटकनिहाय केलेले वाटप आणी खर्च दर्शविले आहेत.	जि.प., सांगली :- सांगली जिल्ह्यामध्ये भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांचेकडून प्राप्त निधीचे व्यवस्थापन सांगली जिल्हा परिषदेमार्फत योग्यरित्या करण्यात आले असून प्राप्त अनुदान पुर्ण खर्च होईल याबाबत दक्षता घेण्यात आलेली आहे. आवश्यक तेवढा निधी प्राप्त व खर्च झालेला आहे.

परिच्छेद स्तंभातील तक्ता:

घटकाचे नांव	२०१२-१७ दरम्यान निधी वाटप		२०१२-१७ दरम्यान एकूण वाटप	२०१२-१७ दरम्यान झालेला खर्च		एकूण खर्च
	केंद्र	राज्य		केंद्र	राज्य	
व्याप्ती आणी पाणी गुणवत्ता	२१३८.९८	२६९८.७२	४८३७.७०	२४३८.१४	२३७९.८४	४८१७.९७
कार्य आणी परीक्षा	४०९.३३	४०१.४०	८१०.७३	२७७.७०	३३१.९८	६०९.६८

अनुपालन स्तंभातील तक्ता:

घटकाचे नांव	२०१२-१७ दरम्यान निधी वाटप		२०१२-१७ दरम्यान एकूण वाटप	२०१२-१७ दरम्यान झालेला खर्च		एकूण खर्च
	केंद्र	राज्य		केंद्र	राज्य	
व्याप्ती आणी पाणी गुणवत्ता	९५.७८	११३.८९	२०९.६७	८३.४०	११२.९६	१९६.३६
कार्य आणी परीक्षा	०.००	०.००	०.००	०.००	०.००	०.००
टीकाऊपणा	०.००	०.००	०.००	०.००	०.००	०.००
सहाय्यक उपक्रम	०.००	०.००	०.००	०.००	०.००	०.००
पाण्याच्या गुणवत्तेचे	०.००	०.००	०.००	०.००	०.००	०.००

टीकाऊपणा	२७२.८९	-	२७२.८९	२१८.२८	-	२१८.२८
सहाय्यक उपक्रम	१४६.९३	-	१४६.९३	१४९.२०	-	१४९.२०
पाण्याच्या गुणवत्तेचे संनियंत्रण आणि संनिरीक्षण	७६.२६	-	७६.२६	८५.०२	-	८५.०२
एकूण	३०४४.३९	३१००.१२	६१४४.५१	३१६८.३४	२७११.८२	५८८०.१६

संनियंत्रण आणि संनिरीक्षण						
एकूण	९५.७८	११३.८९	२०९.६७	८३.४०	११२.९६	१९६.३६

अशाप्रकारे सन २०१२-१७ दरम्यान एकूण रु ६१४४.५१ कोटीच्या (भारत सरकार रु.३०४४.३९ कोटी महाराष्ट्र शासन रु.३१००.१३ कोटी) वाटपाच्या तुलनेत ₹५८८०.१० कोटी (भारत सरकार ₹३१६८.३४ कोटी महाराष्ट्र शासन ₹२७११.८२ कोटी) इतका खर्च करण्यात आला होता.

सन २०१२-१७ दरम्यान निधीची प्राप्ती आणी निधीची उपयोगिता यावरील लेखापरीक्षा निष्कर्ष यावर खाली चर्चा केली आहे.

३.४.५.१	भारत सरकारने लादलेली वित्तीय कपात	
	दुस-या हप्त्याच्या वितरणाचे प्रस्ताव सादर करण्यास विलंब झाल्यामुळे आणी मागिल वर्षीच्या वितरणांच्या १० टक्क्यापेक्षा अधिक निधीची आरंभी शिल्लक असल्यामुळे भारत सरकारने २०१२-१७ दरम्यान ₹१२९.५१ कोटीची कपात लादली होती. त्यानंतर भारत सरकारने जरी राज्याला ₹५८.४१ कोटी वितरीत केले होते तरी उर्वरीत रक्कम ₹७१.१० कोटी ₹१२९.५१-₹५८.४१ कोटी वितरीत केली नाही. अशाप्रकारे दुस-या हप्याच्या वितरणाचे प्रस्ताव सादर करण्यास विलंब केल्यामुळे आणी मागील वर्षीच्या वितरणापैकी १० टक्क्यापेक्षा अधिक निधी अखर्चित राहील्यामुळे विभागाल योजनेसाठी्च्या ₹७१.१०कोटीच्या केंद्रीय निधीपासुन वंचित राहावे लागले.संचालक पाणी स्वच्छता व सहाय्य संघटना यांनी दुस-या हप्त्याच्या वितरण प्रस्ताव सादरीकरणास झालेला विलंब आणी मागील वर्षीचा निधी अखर्चित राहण्याची कारणे स्पष्ट केली नाहीत (सप्टेंबर २०१७)	**सन २०१३-१४** केंद्र शासनाच्या कार्यक्रम निधीअंतर्गत (Program Fund) रु. ६८२. ४४ कोटी नियतव्ययापैकी केंद्र शासनाकडून रु. ६३०. ८९ कोटी राज्य शासनास वितरित करण्यात आले. अशा प्रकारे एकंदर रु.५१. ५४ कोटी निधी कपात करण्यात आली. वासो संस्थेच्या मार्च २०१२ मधील स्थापनेनंतर मजीप्राचे लेखे जुलै २०१२ मध्ये वासो कार्यालयास हस्तांतरित करण्यात आले . त्यामुळे मजीप्रा च्या लेख्यांशी ताळमेळ जुळवून व केंद्र हिश्श्याचा सन २०१२-१३ च्या उपयोगिता प्रमाण पत्राच्या आधारावर सन २०१३-१४ चा निधी मागणी प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आला . या प्रक्रियेमुळे निधी मागणी प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यास विलंब झाला. **सन २०१४-१५** केंद्र शासनाच्या कार्यक्रम निधीअंतर्गत (Program Fund) रु. ६८०. २५ कोटी नियतव्ययापैकी केंद्र शासनाकडून रु. ६६८. ११ कोटी राज्य शासनास वितरित करण्यात आले. अशा प्रकारे एकंदर रु. १२. १४ कोटी निधी कपात निधी मागणी प्रस्ताव सादर करण्यास झालेल्या विलंबामुळे करण्यात आली. सन २०१४-१५ चा दुसऱ्या हप्त्याचा निधी मागणी प्रस्ताव केंद्र शासनास जानेवारी २०१५ मध्ये सादर करण्यात आला. महालेखाकार कार्यालयाने सन २००८-०९ व सन २००९-१० च्या लेखा परीक्षणादरम्यान उपस्थित केलेल्या शेऱ्यांचा पूर्तता अहवाल प्रलंबित असल्याने केंद्र शासनाकडून निधी प्राप्त करून घेण्यास विलंब झाला याबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा करून मार्च २०१५ मध्ये दुसऱ्या हप्त्याचा निधी प्राप्त करून घेण्यात आला. अशा प्रकारे केंद्र शासनाकडून उपरोल्लिखित कारणांमुळे एकूण रु. ६३. ६८ कोटी (रु. ५१. ५४ कोटी + रु. १२. १४ कोटी) निधी कपात करण्यात आली. तसेच उपरोक्त कारणांमुळेच केंद्र हिस्याचा दुसऱ्या हप्त्याचा निधी आर्थिक वर्षाच्या शेवटी मार्च महिन्यात प्राप्त झाल्याने तो अखर्चित राहिला.

३.४.५.२ राज्य शासनाद्वारे अनुरुप हिश्श्याचे कमी वितरण

एनआरडीडब्लुपी च्या मार्गदर्शक सुचनानुसार व्याप्ती ,पाणी गुणवत्ता ,कार्य आणी परीक्षा अंतर्गत भारत सरकार आणी राज्य शासन याच्यात समान हिश्श्यामध्ये निधी वाटला जाणे आवश्यक होते. राज्य शासनाने २०१२-१७ दरम्यान उपलब्ध करुन देणे आवश्यक असलेल्या ₹ ३,२४६.६६ कोटी इतक्या अनुरुप हिश्श्याऐवजी महाराष्ट्र शासनाने ₹ २,६९८.७३ कोटी इतकाच निधी वितरीत केला. ज्यामुळे राज्य शासनाच्या हिश्श्याचे ₹ ५४७.९३ कोटी इतके कमी वितरण झाल्याचे लेखापरिक्षण छाननीमध्ये उघड झाले.

केंद्र शासनाच्या संकेत स्तळावरील नमुना D १ व D १३ नुसार सन २०१२-१७ दरम्यान केंद्र व राज्य हिश्यान्तर्गत व्याप्ती , पाणी गुणवत्ता व देखभाल दुरुस्ती या घटकांतर्गत निधी वितरणाचा तपशील खाली दर्शविला आहे.

हिस्सा/वर्ष	रू. कोटीत					
	२०१२-१३	२०१३-१४	२०१४-१५	२०१५-१६	२०१६-१७	Total
केंद्र हिस्सा	७०४.३२	५६७.८०	६०१.३०	२६८.२२	३१४.३५	२४५५.९९
राज्य हिस्सा	६२७.३३	६५४.९१	६८८.५६	५९७.३६	५३३.९९	३१०२.१५
कमी/जास्त प्रमाणात राज्याचा हिस्सा	(-) ७६.९९	(+) ८७.११	(+) ८७.२६	(+) ३२९.१४	(+) २१९.६४	(+) ६४६.१६

सन २०१२-१३ मध्ये केंद्र शासनाकडून राज्य शासनास रु. ११४.३० कोटी नियमित केंद्र नियतव्ययाव्यतिरिक्त प्रोत्साहन निधी म्हणून वितरित करण्यात आले. त्यामुळे त्याची राज्य शासन स्तरावरून वित्तीय तरतूद करणे शक्य झाले नाही .

तथापि असे निदर्शनास येते कि, सन २०१२-१७ या कालावधीत राज्य शासनाने सम प्रमाणात उपलब्ध करून द्यावयाच्या रु. २४५५.९९ कोटी निधी विचारात घेता राज्य शासन स्तरावरून रु. ३१०२. १५ कोटी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. अशा प्रकारे रु. ६४६. १६ कोटी निधी वाढीव स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आला आहे

३.४.५.३	**दुषीत पाण्याने बाधीत वस्त्यांसाठी राखून ठेवलेल्या निती आयोगाच्या निधीचे अनुपयोगीता.**	
	फ्लोराईड आणि अर्सेनिक बाधित वस्त्यांमधील पिण्याच्या पाण्याची समस्या सोडवण्यासाठी भारत सरकारने, निधी प्राप्तीनंतर १५ दिवसांमध्ये अंमलबजावणी करणा-या संस्थांकडे निधीचे हस्तांतरण करण्याच्या अटीवर ₹ २४.०८ कोटी इतक्या निधीचे एकाच वेळेचे सहाय्य म्हणून महाराष्ट्र शासनाला वितरण केले (मार्च २०१६). अटीचे उल्लंघन केल्यास अंमलबजावणी करणा-या संस्थेला निधीचे वितरण भारतीय रिजर्व बँकेच्या तत्कालन दराप्रमाणे व्याजासहीत करावे लागेल. महाराष्ट्र शासनाने पाणी स्वच्छता व सहाय्य संघटनेला निधीचे वितरण १८६ दिवसांच्या विलंबाने केल्याचे व त्यावर व्याजाचे प्रदान न केल्याचे, जे ₹ १.७२ कोटी इतके होते आणि हा निधी विनिर्दिष्ट कामांवर पाणी स्वच्छता व सहाय्य संघटनेने खर्चही केला नव्हता (ऑक्टोबर २०१७) असे अभिलेख्यांच्या तपासणीतून उघड झाले. महाराष्ट्र शासनाकडून निधी वितरणास झालेल्या विलंबाची कारणे अप्राप्त होती (ऑक्टोबर २०१७).	पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेमार्फत निधी खर्च करण्यास झालेल्या विलंबाची कारणे खालीलप्रमाणे: १. दि. ०४-१०-२०१६ रोजी वासो कार्यालयास शासनाकडून रु. २४.०८ कोटी निधी प्राप्त २. दि. २९-०६-२०१६ रोजी राज्यस्तरीय योजना मंजूरी समिती (SLSC) मध्ये योजनेस मान्यता. ३. दि. २८-०७-२०१६ रोजी राज्यातील १२ जिल्ह्यातील फ्लोराईड बाधीत गावे/वाडयात पाणी शुध्दीकरण यंत्रणा (DFU) कार्यान्वीत करण्याच्या कामाची ई -निविदा सुचना क्र. ०१/२०१६-१७ प्रसिध्द. ४. उपरोक्त ई-निविदा सादर करावयाचे दि. २२-०८-२०१६ ते दि. २०-०९-२०१६ पर्यंत चार वेळा निविदाकारांच्या विनंतीनुसार मुदतवाढ देण्यात आली. ५. दि. २२-०९-२०१६ रोजी तांत्रिक निविदा उघडण्यात आली. तांत्रिक छाननी प्रक्रियेत फक्त दोन निविदाकार पुर्ण अहरता झाल्याने सदर निविदा दि. २५-१०-२०१६ रोजी रद्द करण्यात आली. ६. दि. २८-१०-२०१६ रोजी मुळ निविदेत आवश्यक ते बदल करून ई-निविदा सुचना क्र. ०२/२०१६-१७ प्रसिध्द करण्यात आली. ७. उपरोक्त ई-निविदा सादर करावयाचे दि. २२-११-२०१६ ते दि. २७-१२-२०१६ पर्यंत पाच वेळा निविदाकारांच्या विनंतीनुसार मुदतवाढ देण्यात आली. ८. दि. २८-१२-२०१६ रोजी तांत्रिक निविदा उघडण्यात आली. ९. दि. १८-०१-२०१७ रोजी आर्थिक निविदा उघडण्यात आली. आर्थिक निविदे अंतर्गत प्राप्त झालेल्या दोन देयकारात तफावत जास्त असल्याने सदर कामाचे फेर ई-निविदा ०१/२०१७-१८ दि. ०७-०२-२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आले.

		१०. उपरोक्त ई-निविदा सादर करावयाचे दि. २१-०२-२०१७ ते दि. ०७-०३-२०१७ पर्यंत दोन वेळा निविदाकारांच्या विनंतीनुसार मुदतवाढ देण्यात आली. ११. दि. ०८-०३-२०१७ रोजी उपरोक्त ई-निविदाचे तांत्रिक निविदा उघडण्यात आल्या व सादर केलेले तीनही निविदाकार पुर्व आर्हता प्राप्त न केल्याने निविदा रद्द करण्यात आली. १२. दि. २३-०३-२०१७ रोजी फेर निविदा प्रसिध्द करण्यात आली. १३. उपरोक्त ई-निविदा सादर करावयाचे दि. ३१-०३-२०१७ ते दि. १५-०४-२०१७ पर्यंत एक वेळा निविदाकारांच्या विनंतीनुसार मुदतवाढ देण्यात आली. १४. दि. १७-०४-२०१७ रोजी तांत्रिक निविदा उघडण्यात आल्या. सदर प्रक्रियेत फक्त एक निविदाकार पुर्व आर्हता प्राप्त झाल्याने सदर निविदा रद्द करण्यात आल्या. १५. दि. २३-०५-२०१७ रोजी सदर कमाचे ई-निविदा क्र. ०२/२०१७-१८ प्रसिध्द करण्यात आले. १६. दि. १७-०६-२०१७ रोजी तांत्रिक निविदा उघडण्यात आल्या. सदर प्रक्रियेत तीन निविदाकार पुर्व आर्हता प्राप्त झाल्याने दि. ३०-०६-२०१७ रोजी आर्थिक निविदा उघडण्यात आल्या. १७. दि. १८-०८-२०१७ रोजी या कामाचे कार्यादेश देण्यात आले. १८. उपरोक्त कामाचे, विविध कारणाने चार वेळा निविदा प्रसिध्द केल्या व प्रत्येक वेळी निविदाकारास २५ दिवसाचा निविदा सादर करावयाचा कालावधी दयावा लागला. त्यामुळे सदर कामाचे कार्यादेश देण्यास उशिर झांला व त्यामुळे निती आयोगाकडून प्राप्त झालेले २४.०८ कोटी निधी विहित वेळेत खर्च करता आला नाही. १९. सदयस्थितीत रू.६.०७ कोटी निधी खर्च करण्यात आला असून ४३ संयंत्रे बसविण्यात आली आहेत व उर्वरित ७९ संयंत्रांची कामे प्रगतीपथावर आहेत.

३.४.५.४	इतर योजनांसोबत अभिसरणचा अभाव	अनुपालन
	एनआरडीडब्लूपी च्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे अतिशोषित गंभीर आणि निम-गंभीर गटांमध्ये आणि दुषित पाण्याने बाधीत वस्त्यांमध्ये टिकाऊ बांधकामे प्राधान्याने हाती घेण्यात यावीत आणि कोणत्याही पुनर्भरण व्यवस्थेची/ भूतलावरील पाणी अडवणारी बांधकामे या बाबतीत मंजुरीवरील खर्च महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना/एकत्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम निधीतून भागविण्यात यावा. चाचणी परिक्षा केलेल्या सहा जिल्ह्यांच्या (बुलढाणा, नागपूर, सांगली, औरंगाबाद, अहमदनगर आणि नाशिक) अभिलेख्यांच्या छाननी मध्ये असे उघड झाले की, २०१२-२०१७ दरम्यान ₹४१.५३ कोटी खर्च करुन १,६८९ टिकाऊ बांधकामे, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना/एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम अभिसरणाशिवाय करण्यात आली. इतर कार्यक्रमांशी अभिसरण करुन जर कामांची अंमलबजावणी केली गेली असती तर विभागाला बचत झालेला निधी टिकाऊपणा घटकांतर्गत इतर अधिक प्रकल्प व्यपित करता आले असते.	भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत बुलडाणा, नागपूर, सांगली, औरंगाबाद, अहमदनगर आणि नाशिक या जिल्ह्यांमध्ये राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (शाश्वतता) अंतर्गत सन २०१२-२०१७ या कालावधीत एकुण १६८९ स्त्रोत बळकटीकरण करण्याची कामे घेण्यात आली. १. एन.आर.डी.डब्लु.पी च्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे अतिशोषित, गंभीर आणि निमगंभीर गटांमध्ये आणि दुषित पाण्याने बाधित वस्त्यांमध्येच घेण्यात आलेली आहे. २. अस्तित्वातील पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत (Point Source) असणा-या विहिर, विंधन विहिर किंवा नळ पाणी पुरवठा विहिर (PWS Well) अशा ठिकाणी भूजल कमी उपलब्ध असल्याने अशा गावे/वाड्यांमध्ये सदर स्त्रोतांचे बळकटीकरण करण्यासाठी सिमेंट नाला बांध, भूमिगत बंधारा, चेक डॅम अशा उपाययोजना राबविण्यात आल्या आहेत. ३. वरील अस्तित्वातील पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत हे पुर्ण पाणलोट (माथा ते पायथा) व्यापत नसल्याने अस्तित्वातील उद्भव कोरडा असलेल्या ठिकाणी या उपाययोजनेद्वारे पुनर्भरण करण्यात आले. त्यामुळे सदर गाव /वाड्या या उन्हाळ्यामध्ये टँकरमुक्त झाले आहे. ४. उद्भव बळकटीकरणाच्या उपाययोजनाद्वारे पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोताला शाश्वत करण्यात आले व सदर उपाययोजना या भूजल पुनर्भरणाशी संबंधित आहे. ५. भूजल पुनर्भरणाद्वारे उपाययोजना राबवितांना मजुराद्वारे करण्यात येणा-या कामाचा खर्च अत्यल्प असून तसेच सदर कामे हे तांत्रिक स्वरुपाची व अस्तित्वातील स्त्रोताशी (Point Source) संबंधित असल्यामुळे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेन्तर्गत घेण्यात आलेली नाही.

परिच्छेद क्र.	परिच्छेद					अनुपालन
३.४.६	इतर वित्तीय अनियमितता					
	चाचणी परीक्षा केलेल्या जिल्ह्यांच्या अभिलेख्यांच्या छाननीमध्ये इतर विविध वित्तीय अनियमितता आढळल्या ज्या तक्ता ३.४.२ मध्ये चर्चिल्या आहेत.					
	तक्ता ३.४.२ : कामाच्या अंमलबजावणी मधील वित्तीय अनियमितता					
	अ. क्र.	लेखापरीक्षा निकष	कार्यान्वयीन यंत्रणा	लेखापरीक्षण आक्षेप	आर्थिक मूल्य (₹ कोटीमध्ये)	
	१	जिल्हा परिषद यांनी अंदाजपत्रके बनविताना वापरलेल्या दरपत्रकात विमाशुल्क समाविष्ट होते.महाराष्ट्र शासनाच्या ऑगस्ट १९९८ च्या निर्णयाप्रमाणे कामाच्या अंमलबजावणीपूर्वी विम्याचे विमापत्र सादर करणे कंत्राटदारास बंधनकारक आहे. अन्यथा निविदा किंमतीच्या एक टक्का एवढी वसुली जिल्हा परिषद यांनी करावयाची असते.	जिल्हा परिषद	जिल्हा परिषद, बुलढाणा आणि रायगड यांनी २०१२-१७ या कालावधीमध्ये ₹१७५.६९ कोटी खर्चून मंजूर केलेल्या ३७९ योजनांची अंमलबजावणी केली होती. परंतु कंत्राटदारांनी विमापत्र सादर केली नव्हती. लेखा- परिक्षणाने केलेल्या उलट तपासणीमध्ये विमापत्रे काढली नसल्याची विमा संचालकांनी पुष्टी दिली. अशाप्रकारे बांधकाम चालू असताना शासनाची मत्ता विमा कवचामध्ये असल्याची जिल्हा परिषद यांनी खात्री केली नव्हती. जे करणे आवश्यक होते. आणि कंत्राटदारांना प्रदाने वितरीत केली	१.७४	जिल्हा परिषद, बुलढाणा :- राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजना ही दिनांक ०१/०४/२००९ पासून अंमलात आली. बरीच अंदाजपत्रके या आर्थिक वर्षातील असल्यामुळे व विमानिधीचा समावेश दरसूचीमध्ये अंतर्भूत नसल्यामुळे ग्रामआरोग्य व पाणी, पुरवठा समितींनी विमा निधीची कपात केलेली नाही. शासनाचे धोरणानुसार राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत पाणी पुरवठा योजनेच्या अंमलबजावणीचे अधिकार हे समिती स्तरावर असल्यामुळे जिल्हा परिषदेकडून योजनेच्या भौतिक कामानुसार प्रथम हप्ता ३० टक्के, द्वितीय हप्ता ३० टक्के, तिसरा हप्ता ३० टक्के आणि योजनेचे काम पूर्ण झाल्यानंतर आणि एक वर्ष कंत्राटदाराकडून चालविल्यानंतर उर्वरित १० टक्के निधी देण्याबाबतचे धोरणानुसार जिल्हा परिषदेकडून ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीस निधी

				होती. त्यामुळे कंत्राटदारांना ₹१.७४ कोटीचा गैरवाजवी फायदा झाला.		देण्यात आलेला आहे. कामाच्या ई-निविदा प्रसिध्द करणे / समितीस्तरावर काम करणे, कार्यारंभ आदेश देणे ही सर्व कार्यवाही समिती स्तरावरुन झालेली आहे. समिती स्तरावर आयकर कपात, व्हॅट कपात सुध्दा करण्यात आली आहे. त्यामुळे उर्वरित सर्व कपाती समितीस्तरावरुन होणे अभिप्रेत होते. शासन निर्णय दिनांक ०९.०३.२०१८ नुसार आता अंमलबजावणीचे अधिकार जिल्हा परिषदेकडे आल्याने समितीस्तरावरील सध्या प्रगतीपथावरील असलेली २७ काम, पाणीपुरवठा सुरू परंतु भौतिकदृष्टया अपूर्ण १४ कामे, व भौतिकदृष्टया व आर्थिकदृष्टया अपुर्ण -६१ अशी एकूण १०२ अपुर्ण कामे या स्तरावरून पूर्ण करून कंत्राटदारांची देयके अदा करण्यात येत आहे ही देयके अदा करताना निविदा रक्कमेनुसार एक टक्का विमानिधीची कपात करण्यात येत आहे त्यानुसार आतापर्यंत रू.६,४४,२७७/- ची वसूली करण्यात आली आहे व पुन्हा ज्या अपूर्ण कामांची देयके प्राप्त होतील त्यांची सुध्दा पुर्ण वसूली निविदा रक्कमेनुसार करण्यात येईल.
						जिल्हा परिषद, रायगड:- राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम योजना ही दि.१/४/२००९ पासून अंमलात आलेली आहे. त्या वर्षात मोठया प्रमाणावर कामे मंजूर झाली आहेत. शासनाच्या दि.२००९-१० च्या दरसूचीमध्ये (CSR) विमा निधीचे दर अंतर्भूत नाहीत. तसेच अंदाजपत्रके त्या आर्थिक वर्षातील असल्याने व विमा निधीचा समावेश दरसूचीमध्ये अंतर्भूत नसल्यामुळे ग्राम आरोग्य व पाणी परवठा समिती

						यांनी विमा निधीची कपात केलेलें नाही. दि.१७/३/२०१० या शासनाच्या प्रचलित धोरणानुसार योजना ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती यांनी केलेल्या आहेत. तसेच सदर शासन निर्णयात अंतर्भूत केल्याप्रमाणे योजनेसाठी जिल्हा स्तरावरुन ३० टक्के, ३० टक्के, ३० टक्के असा निधी ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या खात्यात वर्ग करण्यात आलेला आहे व १० टक्के लोकसहभाग आहे. कोणत्याही स्वरुपाची निविदा प्रक्रिया करण्यात आलेली नाही. सबब निविदा प्रक्रियेच्या अटी व शर्तीनुसार देयकातून वजावटी केलेल्या नाहीत. वरील सर्व कामे ग्राम स्तरावर ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने केली असल्याने तसेच दैनंदिन २० पेक्षा कमी मजूर लागत असल्यामुळे कपात करण्यात आलेली नाही.
३.४.६	२	उद्योग, उर्जा आणि कामगार विभागाच्या शासन निर्णयानुसार (जून २०१०) कामगार कल्याण उपकर अधिनियम, १९९६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे बांधकाम किंमतीवर (जमिन मूल्य वगळून) एक टक्का दराने कामगार कल्याण उपकर लादायला हवा होता आणि कामाच्या नियोक्ताने जमा करायला हवा होता.	जिल्हा परिषद	**जिल्हा परिषद, बुलढाणा आणि रायगड** यांनी कामाच्या अंदाजपत्रकात कामगार उपकराचा समावेश केला नव्हता. आणि म्हणूनच २०१२-१७ दरम्यान अंमलबजावणी करण्यात आलेल्या ३७९ योजनांमध्ये रक्कम ₹१.७६ कोटींचा कामगार उपकराची वजावट कंत्राटदारांच्या देयकांतून केली गेली नव्हती. यापुढे अंदाजपत्रकांमध्ये कामगार कल्याण उपकर समाविष्ठ करण्यात येईल. आणि कंत्राटदारांच्या देयकातून	१.७६	**जि.प., बुलढाणा:-** अंदाजपत्रके हे त्या त्या वर्षाच्या शासन स्तरावरुन प्राप्त झालेल्या (सी.एस.आर.) मध्ये नमूद दरानुसार तयार करण्यात येतात. यामध्ये कामगार कल्याण उपकराची रक्कम समाविष्ट नाही. यापुढे ज्या नवीन योजनांचे अंदाजपत्रके तयार करण्यात येतील. त्यामध्ये शवटी कामगार कल्याण उपकराची रक्कम अंतभूर्त करण्यात येऊन त्याप्रमाणे कपात करण्यात येऊन भरणा करण्यात येईल. **जिल्हा परिषद, रायगड:-** राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम

				त्याची वजावट करण्यात येईल असे कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बुलढाणा आणि रायगड यांनी उत्तरादाखल सांगितले होते. (जुलै आणि ऑगस्ट २०१७) कामगार उपकराची वजावट न करणे हे कामगार कल्याण उपकर अधिनियम १९९६ याचे उल्लघंन करणारे असल्यामुळे उत्तर स्वीकारण्यायोग्य नाही आहे आणि उपकर जिल्हा परिषदांनी प्रचलित शासन निर्णयानुसार वसुल करावा.		अंतर्गत अंदाजपत्रके ही त्या त्या वर्षीच्या शासन स्तरावरुन प्राप्त झालेल्या दरसूची (सीएसआर) मध्ये नमूद दरानुसार करण्यात येतात. या दरामध्ये कामगार कल्याण उपकराची रक्कम समाविष्ठ नाही. सन २००९-१०, २०१०-११ च्या दरसूचीच्या प्रती अवलोकनार्थ जोडलेल्या आहेत. शासनाच्या प्रचलित धोरणानुसार योजना ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती यांनी केलेल्या आहेत. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या दि.१७/३/२०१० रोजीच्या शासन निर्णयातील तरुदीनुसार योजना ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती यांनी केलेल्या आहेत. तसेच सदर शासन निर्णयात अंतर्भूत केल्याप्रमाणे योजनेसाठी जिल्हा स्तरावरुन ३० टक्के, ३० टक्के, ३० टक्के असा निधी ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या खात्यात वर्ग करण्यात आलेला आहे व १० टक्के लोकसहभाग आहे. कोणत्याही स्वरुपाची निविदा प्रक्रिया करण्यात आलेली नाही. सबब निविदा प्रक्रियेच्या अटी व शर्तीनुसार देयकातून वजावट केलेली नाही. तसेच ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांच्या दि. १२ मे २०१६ च्या आदेशानुसार ग्रामपंचायत कार्यकंत्राट कामाकरीता आवश्यक असलेले साहित्य स्थानिक पुरवठा दाराकडून खरेदी करुन गावातील मजूरांकरवी स्वत:च काम पूर्ण करुन घेत असेल तर सदर व्यवहारामध्ये TDS ची तरतूद लागू होत नाही. यापुढे अंदाजपत्रकामध्ये तरतूद करुन कामगार कल्याण उपकराची रक्कम कपात करुन भरणा करण्याची दक्षता घेतली आहे.

			महाराष्ट्र जीवन प्राधिकरण	२०१२-१७ दरम्यान महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, रायगड आणि नागपूर जिल्हा यांनी सात योजनांमध्ये कामगार कल्याण व उपकराची वसुली ₹९०.२८ लाखांऐवजी ₹६५.४० लाख इतकीच केली होती. ज्यामुळे ₹२४.८८ लाख इतकी वसुली बाकी होती.	०.२५	**मजीप्रा, रायगड विभाग**:-२०१२-१७ या दरम्यान महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, माणगाव या विभागांतर्गत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत फक्त एकच योजना नागोठणे पाणी पुरवठा योजना, ता. रोहा मंजूर झाली. या योजनेचे अंदाजपत्रक दरसूची सन २००९-१० नुसार तयार करण्यात आले व निविदा मुल्यांकन सन २०१०-११ दरसूचीनुसार करुन ठेकेदार मे. एम. डी. इन्फ्रास्ट्रक्चर, लोणावळा यांना दिनांक १९.०३.२०११ अन्वये कार्यादेश देण्यात आले. वरील दोन्ही दरसूचीमध्ये १ % कामगार कल्याण उपकर ची तरतूद नसल्याने वरील योजनेच्या देयकातून कामगार कल्याण उपकराची वसुली करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. या कामापोटी सदर ठेकेदारास रक्कम ₹४,८७,९९,५००/- ची अदायगी करण्यात आली आहे.
						मजीप्रा, नागपूर विभाग :- नागपूर विभागांतर्गत प्रगतीपथावर असलेल्या ५ पाणी पुरवठा योजनांच्या कामाच्या देयकातून १% उपकराची रक्कम कपात करुन बँकेत नियमित भरणा करण्यात येत आहे. एकूण रु.१,१०,५१,२४३/- इतकी रक्कम आतापर्यंत वसुलकरण्यात आलेली आहे.

३.४.६	३	महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी कामाची अंदाजपत्रके बनविण्यासाठी बनविलेल्या दरपत्रकात (जिल्हा परिषद यांनीही स्वीकृत केलेले) कामगार घटकावरील १२.५ टक्के इतका कामगार भविष्य निधी (ईपीएफ) अंदाजपत्रकात समाविष्ट होता.	महाराष्ट्र जीवन प्राधिकरण	महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने अंमलबजावणी केलेल्या अहमदनगर, औरंगाबाद, पुणे, बुलढाणा, नागपूर, नाशिक, सांगली आणि ठाणे या आठ जिल्ह्यातील ३० कामांमध्ये कंत्राटदाराने ₹२३ कोटी इतका ईपीएफ जमा केल्याची खात्री न करताच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागांनी अयोग्यरित्या कंत्राटदारांना प्रदानाचे वितरण केले होते. कंत्राटदारांकडून वसुली करण्यात येईल असे कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अहमदनगर यांनी सांगितले (जुलै, २०१७) तर, कंत्राटदारांना ईपीएफ प्रदानाचे पुरावे सादर करण्याचे निर्देश दिले असल्याचे कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नागपूर यांनी सांगितले होते (जुलै, २०१७)	२३.००	**मजीप्रा, अहमदनगर विभाग**:- महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अहमदनगर अंतर्गत राष्ट्रील पेयजल कार्यक्रमांतर्गत सोनई करजगाव प्रादेशिक पाणी पुरवठा योजना, लोणी पाणी पुरवठा योजना, काष्टी पाणी पुरवठा योजना, हातगाव प्रादेशिक पाणी पुरवठा योजना व पुणतांबा पाणी पुरवठा या ५ योजनांचे लेखा परिक्षण करण्यात आले असून या योजनेच्या कंत्राटदारांकडून इ. पी. एफ. च्या रकमेचा भरणा करण्यात आला आहे. **मजीप्रा, औरंगाबाद विभाग**:- या कार्यालयाच्या अधिपत्याखाली बिडकीन पापुयो व लासूर स्टेशन व १३ गावे पापुयो या NRDWP च्या अंतर्गत राबविण्यात येत आहे. यातील लासूर स्टेशन व १३ गावे या कामाचे कंत्राटदार मे. एस. आर. चेचाणी, जालना यांच्या चालू देयकांमधुन (१ ते ४) मधून एकूण ₹८,४६,३२६/- इतकी रक्कम इपीएफ पोटी कपात करण्यात आली होती. त्यावर कंत्राटदारांनी त्यांचे पत्र दि.०७/०५/२०१४ अन्वये असे सादर केले आहे की, त्यांचे कडे २० पेक्षा कमी म्हणजेच एकुण १२ कामगार आहेत. त्यामुळे त्यांचेकडे २० पेक्षा कमी कामगार असल्याने त्यांच्या चालू देयकातून कपात करण्यात आलेली इपीएफची रक्कम परत करण्यात यावी. प्रतिज्ञापत्र घेऊन परत करण्यात आली. तथापि, पुढील कालावधीतील देयकांबाबत इपीएफ रकमेची वसुली अंतिम देयकात करण्यात आलेली आहे.

						त्याचप्रमाणे लासुर स्टेशन च्या उर्वरित कामासाठीची निविदा श्री.व्ही.आर.महाजन यांना वाटप करण्यात आलेली आहे. त्यांनी त्यांचे कडील कामगारांचे इपीएफ भरल्याबाबतचे पुरावे सादर करण्याबाबत त्यांना कळविण्यात आले आहे. त्यावर त्यांनी त्यांचे पत्र दि.०९/०१/२०१९ द्वारे असे कळविले आहे की, माझ्याकडे आतापर्यन्त २० पेक्षा जास्त कामगार कामावर नसल्यामुळे मला इपीएफचे रजिस्ट्रेशन करता येत नाही त्यामुळे मला इपीएफ लागू होत नाही.
						मजीप्रा, पुणे विभाग:- परिच्छेदामधील आक्षेपाप्रमाणे योजनांची कामे ज्या ठेकेदारांना देण्यात आलेली आहेत, त्यांच्याकडून ईपीएफ भरणा केल्याबाबतचे चलन प्राप्त करुन घेतले असून ₹३,३९,६९०/- तसेच ज्यांच्याकडून अशाप्रकारे भरणा करण्यात येत नाही. त्यांच्याकडून वसूली करण्यात येत आहे.
						बुलढाणा व नागपूर :- पाणी पुरवठा योजनांच्या कामाबाबत नमूद केल्यानुसार संबंधित कंत्राटदारांना आवश्यक ईपीएफचे पुरावे सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले होते. त्यानुसार काही कंत्राटदारांनी त्यांच्याकडे २० कामगारांपेक्षा कमी कामगार असल्यामुळे त्यांना सदर बाब लागू होत नसल्याचे कळविलेले आहे व उर्वरित कंत्राटदारांनी त्यांच्याकडील कामगारांचे ईपीएफ वेळोवेळी भरणा केले असल्याबाबत चलनांची माहिती सादर केलेली आहे. परिच्छेदांमधील आक्षेपाप्रमाणे ईपीएफची रक्कम संबंधित

						एजन्सीमार्फत भरणा करण्यात आली व त्याची माहिती संबंधित विभागास सादर करण्यात आली आहे. ज्या एजन्सी सदर रक्कम जमा केलेली नाही त्यांना सदर रक्कम भरणा करणेबाबत सुचनाकरण्यात आलेल्या आहेत. जळगांव जामोद येथील योजनेची कामगार कल्याणाची वसुली रु.७.७८ लाख इंडीयन हयूम पाईप कं. यांच्याकडून केली असून ती शासनास चलनाद्वारे भरणा केलेली आहे. **नागपूर विभागांतर्गत** प्रगतीपथावर असलेल्या ५ पाणी पुरवठा योजनांच्याकामाच्या देयकातून १२.५% कामगार कल्याण निधीची रक्कम रु.७१,७८,८६६/- संबंधित कंत्राटदार यांचेकडून भरणा करण्यात आली आहे. चलनाच्या प्रती प्राप्त करुन घेतल्या आहेत.
						मजीप्रा, नाशिक विभाग:- दि. ४.२.२०१८ रोजी महालेखाकार मुंबई यांचे लेखा परिक्षणादरम्यान उपस्थित अर्धसमास क्र. १४ अन्वये नशिक जिल्हयातील बारागांव पिंप्री प्रादेशिक पाणी पुरवठा योजना ता. सिन्नर पेगलवाडी पाणी पुरवठा योजनासंदर्भात कामगार मुल्यावर १२.५ % इतका ई.पी.एफ. जमा न करणे बाबत शेरा उपस्थ्ति करण्यात आलेला आहे. याच पार्श्वभूमीवर मा. संचालक (वित्त) म.जी.प्रा. मुंबई यांचे दि. १९.९.२०१८ चे कार्यालयीन पत्र क्र. लेशा/२३०२ दि. २३.१०.२०१८ अन्वये संबंधित सर्व ठेकेदारांना ई.पी.एफ. शासनास भरणा केलेली चलने सादर करण्याबाबत कळविले आहे. त्यानुसार खालील

						ठेकेदारांनी १) श्री.सचिन कचवे, मालेगाव, जि.नाशिक २) विजल कन्स्ट्रक्शन कंपनी, धुळे ३) स्पॅन हायड्रोटेक, पुणे या विभागास त्यांचे म्हणने सादर केले आहे. त्यानुसार वरील दोन ठेकेदारांनी सादर केल्याप्रमाणे त्यांनी कामासाठी २० पेक्षा जास्त कर्मचारी न नेमल्यामुळे ई.पी.एफ. भरणे त्यांना बंधनकारक नाही आणि Employees Provident Fund and mine Provisions act १९५२ मधील तरतूदींचे अवलोकन केले असता ज्या ठेकेदाराकडे २० पेक्षा जास्त व्यक्तीची कामगार म्हणून नियुक्ती केलेली आहे त्यांना ई.पी.एफ. भरणे बंधनकारक आहे असे नमूद केले आहे. आणि ठेकेदार स्पॅन होयड्रोटेक यांनी ई.पी.एफ. भरलेबाबतची चलने (सन २०१६-१७) दि. २७.१२.२०१८ रोजी सादर केली आहेत. तथापी मंजूर निविदेमध्ये मंजूर टकावर १२.५% इतका ई.पी.एफ. ची कपात करुन शासनास विभाग स्तरावर भरणेबाबत सर्व जबाबदारी ठेकेदाराची असल्याने विभाग स्तरावर ई.पी.एफ. ची रक्कम कपात करणेबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही.
						मजीप्रा, सांगली:- सांगली जिल्हयामध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमा अंतर्गत एकूण ५ योजना दि. ३१.३.२०१७ अखेर महालेखापरिक्षक कार्यालयाकडून निरिक्षण झाले आहेत. या योजनेच्या निविदे अंतर्गत काम करीत असलेल्या

						ठेकेदार यांना उपरोक्त निविदा कामासाठी कार्यरत कामगारांची संख्या आवश्यक त्या पुराव्यासह व इपीएफ भरणा केलेल्या चलनाच्या प्रति सादर करणेबाबत कळविले आहे तथापी अद्याप २० पेक्षा कमी कामगार असले बाबतची माहिती या कार्यालयास प्राप्त झाली नाही. सदर माहिती प्राप्त होताच लेखा परिक्षणास अवगत करण्यात येईल.
						मजीप्रा, ठाणे विभाग:- पाच योजनांच्या एकूण तीन कंत्राटदारांपैकी मे. आर. अे. घुले, पालघर (बडा पोखरण पा. पु. योजना, ता.जि. पालघर व मनोरा पाणी पुरवठा योजना, ता.जि.पालघर) तसेच मे. पी.अेल. आडके, नाशिक (वाढीव कसारा पाणी पुरवठा योजना, ता. शहापूर, जि. ठाणे व पुरक वांगणी पाणी पुरवठा योजना, ता. अंबरनाथ, जि. ठाणे) या दोन कंत्राटदारांकडून कामगार ईपीअेफजमा करण्यात येत आहे. तर मे. सेफ वॉटर इंडिया, मुंबई (दहिसर-गोठेघर पाणी पुरवठा योजना, ता. कल्याण, जि. ठाणे) यांना ईपीएफ कायद्यातील तरतूदी लागू नसल्याने ते ईपीएफ भरणा करत नसल्याचे त्यांनी कळविले आहे.
			जिल्हा परिषद	निवड केल्या गेलेल्या पुणे, रायगड आणि नागपूर जिल्ह्यामध्ये सन २०१२-१७ दरम्यान जिल्हा परिषदांनी ७७१ कामांची अंमलबजावणी केली होती. यामध्ये ₹ ७.२८ कोटी एवढा ईपीएफ समाविष्ठ करुन	७.२८	**जि.प., पुणे:-** सन २०१२-१७ तपासणी दरम्यान ७७१ कामापैकी पुणे जिल्ह्यामध्ये २३ कामांचा समावेश आहे व त्याची ईपीएफ ची अंदाजे ₹ ६६.६७ लक्ष होत असून सदरचे काम करण्याऱ्या नोंदणीकृत ठेकेदाराकडून ईपीएफ रल्याचे प्रमाणपत्र प्राप्ततेनुसार पुढील कार्यवाही प्रस्तावित करण्यात येत आहे. प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यास वसूलीची कार्यवाही प्रस्तावित करण्यात येत आहे.

				कंत्राटदारांना प्रदाने केली होती. आणि कंत्राटदारांनी ईपीएफ जमा केल्याची खात्री जिल्हा परिषदांनी केली नव्हती. जमेची खात्री न करताच ईपीएफ चे केलेले वितरण आयोग्य होते.		**जि.प., रायगड**:-राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत शासनाच्या प्रचलित धोरणानुसार बहूतांश योजना ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती यांनी केलेल्या आहेत. शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग दि.१७/३/२०१० नुसार सदर योजनांचे अंमलबजावणीचे अधिकार संबंधित ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितींना देण्यात आलेले आहेत. तसेच सदर शासन निर्णयात अंतर्भूत केल्या प्रमाणे योजनेसाठी जिल्हा स्तरावरुन ३० टक्के, ३० टक्के, ३० टक्के व अंतिमत: १० टक्के असा निधी ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या खात्यात वर्ग करण्यात आलेला आहे. कोणत्याही स्वरुपाची निविदा प्रक्रिया करण्यात आलेली नाही. सबब निविदा प्रक्रियेच्या अटी व शर्तीनुसार देयकातून वजावटी करण्याचा प्रश्न उद्भवला नाही. वरील सर्व कामे ग्राम स्तरावर ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने केली असल्याने कपात करण्यात आलेली नाही. सदर कामासाठी कोणताही कंत्राटदार नेमूण कामे केलेली नसल्याने गावातील ग्रामसभेने नियुक्त केलेल्या पाणी पुरवठा समितीने प्रत्यक्ष काम केलेले आहे. सबब कंत्राटदारास देयक अथवा अनुदान अदा केले नसल्याने कोणत्याही प्रकारचे अंतिरिक्त अनुदान वितरीत झालेले नाही.
						नागपूर :- नागपूर जिल्हापरिषदेअंतर्गत सन २०१२-१७ दरम्यान कामांमध्ये ईपीएफ समाविष्ट करुन कंत्राटदारास प्रदान केलेले नाही.

३.४.६	४	पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या शासन निर्णयानुसार (मार्च २०१०) योजनेखाली कंत्राटदारांना किंवा पुरवठादारांना अग्रिम प्रदाने करावयाची नव्हती.	जिल्हा परिषद	शासन निर्णयाचे उल्लंघन करुन जिल्हा परिषद, बीड मध्ये दोन योजनांतर्गत २०१२-१५ दरम्यान कंत्राटदारांना / पुरवठादारांना ₹१.५१ कोटीची अग्रिम प्रदाने करण्यात आली होती. जिल्हा परिषद रायगड मध्ये ३ योजनांतर्गत सन २०१३-१७ दरम्यान कंत्राटदारांना / पुरवठादारांना ₹४.१२ कोटीची अग्रीम प्रदाने करण्यात आली होती. ग्रामीण जल सुरक्षा समिती यांना योग्य कार्यवाही करण्यासाठी सूचना देण्यात येईल असे कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद बीड आणि रायगड यांनी सांगितले. (जुलै/ऑगस्ट २०१७)	५.६३	**जिल्हा परिषद, बीड:-** आक्षेपाच्या अनुषंगाने अनुपालन सादर करण्यात येते की, मुर्शदपूर (कासारी) या नळ योजनेच्या निविदेची जाहिरात जिल्हा पातळीवर व राज्यपातळी वरील अनुक्रमे साप्ताहिक आष्टी दर्शन व दै.सकाळ या नियतकालीकांमध्ये दि. २२.११.२०११ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. या जाहिरातीस प्रतिसाद मिळाला नाही. तदवतच इ-निविदा पध्दतीने निविदा होऊ शकली नाही. हा आक्षेप नोंदविण्यात आला आहे. ग्रामीण भागात इंटरनेट पुरेशा प्रमाणात त्या काळात सक्षम नसल्याने शासनाच्या दि.१९.११.२०१२ रोजीच्या पत्रान्वये इनिविदा करण्याच्या प्रक्रियेस सूट देण्यात आली होती. म्हणजेच शासनाची पुरेशी मान्यता घेऊनच पुढे निविदा विषयक कार्यवाही करण्यात आली आहे. १.० **मुर्शदपूर (कासारी)** हे सन २०१० नुसार ६५४० लोकसंख्येचे गाव आहे आणि २०१०,२०११,२०१२ या वर्षी दुष्काळाच्या छायेत होते. सन २०१२ या वर्षी ०४ टँकर लावावे लागले होते. त्यामुळे दि.०१.०१.२०१२ रोजी पासून पापु व स्वचछता समिती मार्फत पापुयोजनेचे काम करण्यात यावे असा ग्रामसभेच्या ठरावाच्या दि.०१.०१.२०१२ आधारे निर्णय घेण्यात आला. वरील सर्व बाबी विचारात घेता निविदा प्रक्रिया राबविताना शासनाच्या तरतुदीचे पालन करण्यात समितीकडून काही अनियमितता झाली आहे वाटत नाही व समिती मार्फत योजना राबविण्याचा हेतू या टप्प्यापर्यंत

						पुरेसा योग्य होता असे निदर्शनास येते. दुसरे असे की, दि.१७.०३.२०१० रोजीच्या परिच्छेद ०२ मधील शासन निर्णयानुसार समिती पुरवठादारांना कोणत्याही परिस्थितीत अग्रीम देणे योग्यं नसल्याचे नमूद आहे. याबाबत नमूद करण्यात येते की, जि.प.बीड यांनी शासन धोरणानुसार प्र. मा. मिळताचे दि.१२.०३.२०१४ रोजी योजनेच्या किंमतीच्या ३०% रक्कमेचा १ ला हप्ता ग्रामपंचायतीस वर्ग केला आणि ग्रामपंचायत मुर्शदपूर यांनी संबंधित पापु व स्वच्छता समितीने यांना वर्ग केला. समितीने पाईप पुरवठादारांना रु.३३.९२ लक्ष चा अग्रीम पाईप खरेदी करीत असताना दिल्याचे निदर्शनास येते. परंतु या कृतिमागे समितीचे कवेळ अज्ञान आहे असे वाटते. पुरवठादारांना अग्रीम स्वीकारुन न पाईपचा पुरवठा केला नसता तर नंतर कोर्टकचेऱ्या वाढल्या असत्या ही बाब समितीच्या लक्षात आले नाही. या कृतीबद्दल खात्याने समितीच्या पदाधिका-यांची स्पष्टीकरणे मागविली असता समितीच्या स्पष्टीकरणात अज्ञानामुळे अननुभवामुळे सदरची अनियमितता घडली हे त्यांनी मान्य केले आहे. २.० तसेच याही आक्षेपाच्या अनुषंगाने अनुपालन सादर करण्यात की, आष्टी या नळ योजनेच्या निविदेची जाहिरात राज्यपातळीवरील दै. दिव्य मराठी या दैनिकामध्ये दि.२८-०८-२०१२, ३.०९.२०१२ व ९.९.२०१२ अशा प्रकारे तीन वेळा प्रसिध्द करण्यात आली होती. (संबंधित वृत पत्राचे कात्रण जोडत आहे.) या जाहिरातीस प्रतिसाद मिळाला नाही. तदवतच इ-निविदा पध्दतीने निविदा होऊ शकली

						नाही. हा आक्षेप नोंदविण्यात आला अहे. ग्रामीण भागात इंटरनेट पुरेशा प्रमाणात त्या काळात सक्षम नसल्याने शासनाच्या दि.१९.११.२०१२ रोजीच्या पत्रान्वये इ निविदा करण्याच्या प्रक्रियेस सूट देण्यात आली होती. म्हणजेच शासनाची पुरेशी मान्यता घेऊनच पुढे निविदा विषयक कार्यवाही करण्यात आली आहे. **आष्टी** हे सन २०११ च्या जनगणनेनुसार ११९७२ मोठ्या लोकसंख्येचे गाव आहे. सन २०१०, २०११, २०१२ या वर्षी दुष्काळाच्या छायेत होते. सन २०१२ या वर्षी ०७ टँकर लावावे लागले होते. त्यामुळे दि.१७.०९.२०१२ रोजी पासून पापु व स्वच्छता समितीमार्फत पापु योजनेचे काम करण्यात यावे असा ग्रामसभेच्य ठरावाच्या दि.१७/०९/२०१२ च्या आधारे निर्णय घेण्यात आला . वरील सर्व बाबी विचारात घेता निविदा प्रक्रिया राबविताना शासनाच्या तरतुदीचे पालन करण्यात समितीकडून काही अनियमितता झाली आहे वाटत नाही व समितीमार्फत योजना राबविण्याचा हेतु या टप्प्यापर्यंत पुरेसा योग्य होता असे निदर्शनास येते. दुसरे असे की, दि.१७.०३.२०१० रोजीच्या परिच्छेद ०२ मधील शासन निर्णयानुसार समितीने पुरवठादारांना कोणत्याही परिस्थितीत अग्रीम देणे योग्य नसल्याचे नमूद आहे. याबाबत नमूद करण्यात येते की, जि.प.बीड यांनी शासन धोरणानुसार प्र. मा. मिळताच दि.१९.०३.२०१३ रोजी योजनेच्या किंमतीच्या ३०% रक्कमेचा १ ला हप्ता ग्रामपंचायतीस वर्ग केला आणि ग्रामपंचायत आष्टी यांनी

						संबंधित पापु व स्वच्छता समितीने यांना वर्ग केला. समितीने पाईप पुरवठादारांना रु.११६.८२ लक्षचा अग्रीम पाईप खरेदी करीत असताना दिल्याचे निदर्शनास येते. परंतु या कृतिमागे समितीचे केवळ अज्ञान (sheer ignorance) आहे असे वाटते. पुरवठादारांना अग्रीम स्वीकारुनन पाईपचा पुरवठा केला नसता तर नंतर कोर्टकचेऱ्या वाढल्या असत्या ही बाब समितीच्या लक्षात आले नाही. या कृतीबद्दल खात्याने समितीच्या पदाधिकाऱ्यांची स्पष्टीकरणे मागविली असता समितीच्या स्पष्टीकरणात अज्ञानामुळे, अननुभवामुळे सदरची अनियमितता घडली हे त्यांनी मान्य केले आहे. सदर दिलेला अग्रीम योजनेचे कामे करुन पूर्णपणे समायोजीत झाली असून योजना भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेली आहे. दि.२८.३.२०१८ रोजी कार्यान्वित करण्यात आलेली आहे.
						जिल्हा परिषद, रायगड:- रायगड जिल्हा परिषद अंतर्गत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या योजनांची अंमलबजावणी ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीमार्फत करण्यात आलेली आहे. शासनाच्या प्रचलित धोरणानुसार फक्त पाणी पुरवठा समित्यांना अग्रीम देण्यात आला आहे. कोणत्याही कंत्राटदारास जिल्हा परिषद रायगड स्तरावरुन योजनेसाठी अग्रीम देण्यात आलेले नाही. सबब शासन निकषात निर्देश दिल्याप्रमाणे फक्त ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांनाच जिल्हा परिषद स्तरावरुन अग्रीम देण्यात आलेले आहे. शासन निर्णयाचे उल्लंघन जिल्हा परिषद रायगड यांच्याकडून झालेले नाही.

३.४.६	५	महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या लेखासंहिता , १९६८ अन्वये कंत्राटदारांना किंवा पुरवठादारांना करावयाची प्रदाने ही रेखित धनादेशाद्वारे करण्यात यावीत.	जिल्हा परिषद	निवडलेल्या ग्राम पंचायतीच्या अभिलेख्यांच्या चाचणी तपासणीत असे आढळून आले की, ग्रामपंचायत, रेवस (जिल्हा परिषद, रायगड) यांनी रेवस पाणी पुरवठा योजनेसाठी २०१२-१५ दरम्यान केलेल्या रक्कम ₹३.८८ कोटी इतक्या खर्चापैकी ₹४७.०८ लाखांचे आहरण रोखीने किंवा सेल्फ चेकद्वारे ग्रामीण जल सुरक्षा समिती यांना केले तर ग्रामपंचायत तिनवीरा (जिल्हा परिषद रायगड) मध्ये २०१३-१५ दरम्यान तिनवीरा योजनेवरील ₹ तीन कोटी इतक्या खर्चापैकी ₹ ४० लाखाचे आहरण रोखीने किंवा सेल्फ चेकद्वारे ग्रामीण जल सुरक्षा समिती यांनी संहिता तरतूदीचे उल्लंघन करत केले. निधीच्या अनधिकृत आहरणाबद्दल ग्रामीण जल सुरक्षा समिती यांना सूचना जारी करण्यात येईल आणि त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल असे कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद, रायगड यांनी सांगितले. (ऑगस्ट २०१७)	०.८७	**१) रायगड** जिल्हयातील अलिबाग तालुक्यतील रेवस झोन क्र.२ प्रादेशीक नळ पाणी पुरवठा योजना सुधारणा योजनेच्या कामास ₹४,३३,१४,१८३/- इतक्या ढोबळ किंमतीस व ₹३,९७,३७,७८३/- निव्वळ किंमतीस दि.७/१२/२०११ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे व योजनेच्या कामाकरीता पहिला अग्रीम शिखर समिती रेवस क्र.२ यांना वितरीत करण्यात आलेला आहे. शासनाच्या तात्कालीन मार्गदर्शक तत्वानुसार योजनेचे काम शिखर समिती रेवस झोन क्र.२ ता.अलिबाग यांच्या मार्फत १० टक्के लोकसहभागातून हाती घेऊन दि.११/३/२०१४ रोजी पूर्ण करण्यात आलेली आहे. प्रत्यक्ष योजनेची अंमलबजावणी शिखर समिती रेवस झोन क्र.२ यांनी केलेले असून त्यांना प्रत्यक्ष कामाच्या आवश्यकतेप्रमाणे मजूरांची मजूरी देण्यासाठी व साहित्याचे देयक देणेसाठी समिती स्तरावरुन सेल्फ चेक काढून मजूरांची मजूरी देण्यात आलेली असल्याबाबत समितीमार्फत कळविणेत आलेले आहे. सद्य:स्थितीत योजना आर्थिक व भौतिकदृष्टया पूर्ण झालेली आहे व लेखे बंद करण्यात आले आहेत. सदर योजनेतून पाणी पुरवठा सुरु आहे. तसेच उप अभियंता अलिबाग यांनी योजनेच्या कामाची प्रत्यक्ष मोजमापे घेऊन अंतिम देयक तयार करुन विभागीय कार्यालयास सादर केलेले आहे. सद्य:स्थितीत योजनेचे काम पूर्ण असून योजनेतून पाणी पुरवठा सुरळीत सुरु आहे.

						पत्र, रोखीचे आहरण करु नये याबाबचे पत्र) **२) रायगड** जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील वाढीव तिनवीरा प्रादेशीक नळ पाणी पुरवठा योजना सुधारणा योजनेच्या कामास ₹३,४३,९५,५३८/- इतक्या ढोबळ किंमतीस व ₹३,१५,५५,५३९/- निव्वळ किंमतीस दि.२३/१०/२०१३ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. योजनेचा पहिला अग्रीम शिखर समिति वाढीव तीनवीरा यांना वितरीत करणेत आलेला आहे. शासनाच्या तात्कालीन मार्गदर्शक तत्वानूसार योजनेचे काम शिखर समिती वाढीव तीनवीरा ता.अलिबाग यांच्या मार्फत हाती घेऊन योजनेचे काम प्रगती पथावर आहे. प्रत्यक्ष योजनेची अंमलबजावणी शिखर समिती वाढीव तीनवीरा यांनी केलेले असून त्यांना प्रत्यक्ष कामाच्या आवश्यकतेप्रमाणे मजूरांची मजूरी देण्यासाठी व साहित्याचे देयक देण्यासाठी समिती स्तरावरुन सेल्फ चेक काढून मजूरांची मजूरी देण्यात आलेली असल्याबाबत समितीमार्फत कळविण्यात आलेले आहे. सद्यःस्थितीत योजनेसाठी शिखर समितीस ३ अग्रीमद्वारे ₹२५५.६० लक्ष निधी वर्ग केला आहे. उप अभियंता, अलीबाग यांच्या दिनांक ०८/०५/२०१८ च्या अहवालानुसार ₹२,६९,६८,२६४/- इतक्या रकमेचे काम केल्याचे मुल्यांकन मोजणी पुस्तक क्र.१३०७ मध्ये नोंदवून समितीने सादर केलेले आहे. योजनेचे काम फेब्रुवारी, २०१९ पूर्वी पूर्ण करण्याबाबत शिखर समिती, वाढीव तीनवीरा व उप अभियंता, पाणी पुरवठा, रायगड जिल्हा परिषद, उप

						विभाग, अलिबाग यांना सक्त सूचना देण्यात आलेल्या आहेत.

३.४.७	कार्यक्रमाची अंमलबजावणी	
३.४.७.१	व्याप्ती आणि पाणी गुणवत्ता	
	सेवा पुरविण्यात न आलेल्या सेवा अंशत: पुरविण्यात आलेल्या आणि निसटलेल्या वस्त्यांना सुरक्षित आणि पुरेसा पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी एनआरडीडब्लुपी च्या वार्षिक निधी वाटपा पैकी ४७ टक्के निधी वाटप केला जातो भारत सरकार आणि महाराष्ट्र शासनाने २०१२/२०१७ दरम्यान एनआरडीडब्लुपी अंतर्गत सेवा पुरविण्यात न आलेल्या सेवा अंशत: पुरविण्यात आलेल्या निसटलेल्या वस्त्यांना सुरक्षित आणि पुरेसा पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी ₹४८३७.७० कोटी एवढा निधी वितरीत केला होता त्यापैकी मार्च २०१७ अखेरीस ₹४८१७.९८ कोटी खर्च करण्यात आला होता. एनआरडीडब्लुपी च्या मार्गदर्शक सुचनांनुसार प्रत्येक वर्षी योजनांसाठी नियोजन करतांना ज्या वस्त्यां मध्ये कोणालाच किंवा ५० टक्क्यापेक्षा जास्त लोकसंख्येला पुरेसे आणि सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध होत नसेल त्या वस्त्यांना प्राधान्य देण्यात यावे सन २०१२/२०१७ दरम्यान व्याप्तिचे ध्येय आणि राज्यातील व्यापलेल्या वस्त्यां यांची स्थिती **परिशिष्ट ३.४.२ मध्ये** देण्यात आली आहे. परिशिष्ट ३.४.२ प्रमाणे राज्यातील ५० टक्क्यां पेक्षा कमी लोकसंख्या व्यापित बऱ्याच वस्त्या (१९७२) योजनेतंर्गत व्यापित झल्या नव्हत्या,यावरुन असे दिसते की अशा वस्त्यांना प्राधान्य दिले गेले नव्हते.५० टक्क्यापेक्षा कमी लोकसंख्या व्यापित असलेलया जास्तीत जास्त वस्त्यां अहमदनगर जिल्हया मध्ये होत्या ज्यात २३४ वस्त्यां ज्यांना पुरेशा पाणी व्याप्तीची आवश्यकता होती. अहमदनगर व्यतिरीक्त चाचणी परिक्षा केलेल्या रायगड, पुणे, बुलढाणा आणि बीड जिल्हया मध्ये अनुक्रमे २२९,१२७,११४ आणि १०५ वस्त्यां होत्या ज्यात ५० टक्क्या पेक्षा कमी लोकसंख्येला पुरेसे आणि सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध झाले नव्हते. ११ व्या पंचवार्षिक योजने नुसार (२००८ - २०१२) सर्व वस्त्यांना दरडोई दर दिवशी ४०	०%-२५% व २५%-५०% वर्गवारीतील गावे/वाडयांबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे. दि.०१/०४/२०१२ रोजीच्या गावे/वाडया - ४८८९ सन २०१२ ते सन २०१७ या कालवधीत हाताळलेल्या गावे/वाडया - ३८४३ (७८.६०%) शिल्लक गावे/वाडया -१०४६ दि.०१/०४/२०१७ रोजीच्या गावे/वाडया - १९७२ सन २०१२ ते २०१७ या कालावधीत दुबार हाताळलेली गावे/वाडया - ९२६ (१९७२-१०४६) उपरोक्त तपशिलानुसार ९२६ गावे/वाडया खालील कारणांमुळे दुबार हाताळलेल्या आहेत. उद्भव कोरडा/अपुरा असणे, देखभाल दुरुस्ती, योजनेचे आयुर्मान, पाणी गुणवत्ता बाधित, थकित विजदेयक इ. तथापि वरील मुद्दे व सन २०१२ ते २०१७ या कालावधीत ०%-२५% व २५%-५०% वर्गवारीतील हाताळलेल्या गावे/वाडयांचे प्रमाण विचारात घेता सदर गावे/वाडयांना प्राधान्य दिले असल्याचे दिसून येते. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस राज्यातील सर्व जिल्हयांतील ग्रामीण भागातील गावे वाडयांची पेयजल स्थिती केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर नोंदित करण्यात येते. यानुसार, राज्यातील पुर्णत: हाताळलेल्या, अंशत: हाताळलेल्या व पाणी गुणवत्ता बाधित गावे,

लिटर पाणी मार्च २०१२ अखेर पर्यंत उपलब्ध करुन दयायचे होते, तर १२ व्या पंचवार्षिक योजनेनुसार (२०१२ - २०१७) सर्व वस्त्यांना दरडोई दर दिवशी ५५ लीटर पाणी उपलब्ध करुन दयायचे होते परंतु दरडोई दर दिवशी ४० लीटर पाणी सर्व वस्त्यांना उपलब्ध करुन देण्यास प्रथम प्राधान्य देण्याचे आणि उदिष्ट गाठल्यानंतर सेवेचा स्तर उंचावुन वस्त्यांना दरडोई दर दिवशी ४० लीटर वरुन दरडोई दर दिवशी ५५ लीटर पाणी उपलब्ध करण्याबाबतचे निर्देश भारत सरकारने २३ जुलै २०१३ मध्ये राज्य शासनाला दिले होते.

लेखा परिक्षणास असे आढळुन आले आहे की ३१ मार्च २०१७ रोजी १२ व्या पंचवार्षिक योजनेच्या समाप्ति नंतर देखील राज्यातील ९९७३२ वस्त्यां पैकी (पाणी गुणवत्ता बाधीत वस्त्यांसकट) १२८१५ वस्त्यांना (१३ टक्के) दरडोई दर दिवशी ४० लीटर पेक्षा कमी पाणी उपलब्ध होते लेखा परिक्षणात केलेल्या विश्लेषणात असे उघड झाले की दरडोई दर दिवशी ४०लीटर पेक्षा कमी पाणी उपलब्धता असणा-या जास्तीत जास्त वस्त्यां (जिल्यातील एकूण वस्त्यांशी टक्केवारी) हया जळगांव जिल्हयात होत्या ज्या १५६२ वस्त्यां पैकी ७५१ एवढया होत्या (४८ टक्के).

चाचणी परिक्षा केलेल्या दहा जिल्ह्यामध्ये लेखा परिक्षणाच्या असे निदर्शनास आले की, १ एप्रिल २०१७ रोजी ४०५५२ वस्त्यांपैकी ५८०५ वस्त्यांना दरडोई दर दिवशी ४० लीटर पेक्षा कमी पाणी उपल्बध केले गेले होते.लेखा परिक्षणात केलेल्या विश्लेषणात असे स्पष्ट झाले की,अशा वस्त्यांचा आकडा बुलढाण जिल्हयात ३०९ वस्त्या (२३ टक्के) असा जास्तीत जास्त होता तर त्या खालोखाल सांगली जिल्यात ८९२ वस्त्यां (२० टक्के) असा होता.

नियोजन प्रक्रिये मध्ये हया जिल्हामध्ये कामे हाती घेतांना अशा वस्त्यांना प्राधान्य देण्याचा मुद्दा अधोरेशित केला गेला नव्हता हे हयावरुन स्पष्ट होते.

वाडया निश्चित करण्यात येतात. यानुसार सन २०१२-१३ ते २०१७-१८ या कालावधीतील पेयजल स्थिती खालीलप्रमाणे आहे.

वर्ष	एकूण गावे/वाडया	अंशत: हाताळलेल्या व गुणवत्ताबाधित गावे/वाडया	दुबार हाताळावयाची गावे/वाडया
२०१२-१३	१००६८३	१३२३५ (१३.१४%)	५ ९५ (५.७५%)
२०१३-१४	१००७१२	१४४३६ (१४.३३)	६३३९ (६.२९%)
२०१४-१५	१००४८८	१३१४९ (१३.०८%)	४१०४ (४.०८%)
२०१५-१६	१००६३९	१११८४ (११.११%)	३३४४ (३.३२%)
२०१६-१७	१०००६६	१२२५३ (१२.२४%)	५९२३ (५.९१%)
२०१७-१८	९९७३२	१२८१५ (१२.८४%)	५२१२ (५.२२%)

उपरोक्त दुबार हाताळावयाच्या गावे/वाडयांबाबतची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

उद्भव कोरडा/अपुरा असणे, देखभाल दुरुस्ती, योजनेचे आयुर्मान, पाणी गुणवत्ता बाधित, थकित विजदेयक इ.

याचप्रमाणे सन २०१५-१६ व २०१६-१७ या दोन वर्षांमध्ये विशिष्ट वर्गवारीच्या व्यतीरिक्त इतर वर्गवारीतील गावे/वाडयांसाठी नविन योजना घेण्यास निर्बंध असल्याने दुबार हाताळावयाच्या गावे/वाडयांमध्ये वाढ झालेली आहे.

३.४.७.२	**नळ पाणी पुरवठा पुरविण्यात तूट**	
	१२ व्या पंचवार्षिक योजनेप्रमाणे, २०१७ अखेरीस कमीत कमी ५० टक्के ग्रामीण घरांना पाणी पुरवठा करणे आवश्यक होते. त्याचप्रमाणे, कमीत कमी ३५ टक्के ग्रामीण घरांना घरगुती जोडणीसह नळाद्वारे पाणी पुरवठा होणे आवश्यक होते. लेखा परिक्षणास असे आढळून आहे की, १ एप्रिल, २०१७ रोजी राज्यातील एकूण ९९,७३२ वस्त्यांपैकी ६८,०७८ वस्त्यांना (६८ टक्के) नळाद्वारे पाणी पुरवठा करण्यात आला होता. (दरडोई दरदिवशी ४० लिटर). लेखा परिक्षणातील विश्लेषणात असे स्पष्ट झाले की सहा जिल्ह्यांमध्ये ५० टक्क्यांपेक्षा कमी वस्त्यांना नळ पाणी पुरवठा उपलब्ध केला होता. (औरंगाबाद:४८ टक्के, गडचिरोली:२० टक्के, नंदुरबार:२६ टक्के, पालघर:३७ टक्के, सोलापूर:४६ टक्के आणि यवतमाळ : ४६ टक्के). निवडलेल्या जिल्ह्यांमध्ये औरंगाबाद वगळून इतर सर्व जिल्ह्यांमध्ये ५० टक्के वस्त्यांना घरगुती जोडणीसह नळपाणी पुरवठा करण्यात आला होता. लेखा परिक्षणास असेही निदर्शनास आले की, १ एप्रिल २०१७ रोजी राज्यातील एकूण वस्त्यांच्या ३७ टक्के वस्त्यांना घरगुती जोडणीसह नळ पाणी पुरवठा करण्यात आला होता. परंतु, लेखापरिक्षा विश्लेषणात असेही स्पष्ट झाले की १९ जिल्ह्यांमध्ये घरगुती जोडणीसह नळ पाणी पुरवठा उपलब्ध करण्यात आलेल्या वस्त्या ३५ टक्क्यांपेक्षा कमी होत्या ज्या आठ टक्के (गडचिरोली) ते ३४ टक्के (वर्धा) या दरम्यान होत्या. निवड केलेल्या दहा जिल्ह्यांपैकी पाच जिल्ह्यांमध्ये ग्रामीण वस्त्यांना घरगुती जोडणीसह नळ पाणी पुरवठा उपलब्ध करुन देण्याची टक्केवारी ३५ टक्क्यांपेक्षा कमी होती जी ११ टक्के (अहमदनगर) ते ३३ टक्के (रायगड) या दरम्यान होती.	दिनांक ०१ एप्रिल, २०१७ रोजीचे राज्याचे नळ पाणी पुरवठा योजनांद्वारे हाताळलेल्या गावे/वाडयांचे प्रमाण ६८% इतके व घरगुती नळ कनेक्शनचे प्रमाण ३७ % इतके आहे. यानुसार नमुद केलेल्या नळ पाणी पुरवठा योजनांचे ५०% पेक्षा कमी प्रमाण असलेले ६ जिल्हे व घरगुती नळ कनेक्शनचे प्रमाणे ३५%पेक्षा कमी असलेले १९ जिल्हे हे डोंगराळ व दुर्गम भाग, नक्षलग्रस्त, आदिवासी व अति शोषित या वर्गवारीतील असल्याने या जिल्हयांमध्ये नळ पाणी पुरवठा योजनांचे व घरगुती नळ कनेक्शनचे प्रमाण कमी आहे. तथापि राज्य शासनाचे नळ पाणी पुरवठा योजनांव्दारे सर्वोच्च प्राधान्याने गावे/वाडया हाताळण्याचे धोरण असून सदर नळ पाणी पुरवठा योजनामार्फत १००% घरगुती नळजोडण्या देणे बंधनकारक केले आहे. जिल्हानिहाय माहिती खालीलप्रमाणे आहे :- **औरंगाबाद-:** जिल्हयात एकूण वसाहती पैकी ४७.९२ % वसाहती नळ पाणी पुरवठा योजनेव्दारे पाणी पुरवठा होत असला तरी एकूण ग्रामीण लोकसंख्येच्या ६९.६५% लोकसंख्येस नळ पाणी पुरवठा योजनेव्दारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे. ३०० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या वसाहतींची संख्या ६३३ एवढी असून त्या वसाहती हातपंपाद्वारे/विद्युत पंपाद्वारे पाणी पुरवठा करून साध्य करण्यात आली आहेत त्या गावांना नळ पाणी

		पुरवठा योजना घेण्याची गरज भासली नाही त्यामुळे नळ पाणी पुरवठा योजनेव्दारे पाणी पुरवठयाचे साध्य कमी दिसून येते तथापी ३०० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावांची संख्या १३३९ आहे व त्या पैकी ९४५ गावांना नळ योजनेव्दारे पाणी पुरवठा करण्यात येतो ते प्रमाण ७०.५८% आहे. ग्रामीण लोकसंख्येचा विचार करता ६९.६५ % लोकसंख्येस नळ पाणी पुरवठा योजनेद्वारे पाणी पुरवठा करणे साध्य झाले आहे.
		गडचिरोली:- गडचिरोली जिल्हयात एकूण ७०० गावे/वाडयां/वस्त्यांना नळाव्दारे पाणीपुरवठा करण्यात आलेला आहे. त्यानुसार १ एप्रिल, २०१७ ला नळाव्दारे पाणीपुरवठा होत असलेल्या गावांची टक्केवारी ३३.९१% एवढी आहे.
		नंदुरबार:-नंदुरबार जिल्हातील एकूण ग्रामिण लोकसख्येच्या अनुषंगाने ग्रामिण घंराची संख्या २,७४,६०७ असून एकूण घंराच्या संख्येच्या ९८% घरांना पाणी पुरवठा व्यवस्था हातपंप /पॉवरपंप /पिण्याच्या पाण्याची विहीर/ नळपाणी पुरवठा योजना द्वारे करण्यात आलेला आहे नंदुरबार जिल्हा आदिवासी क्षेत्र असल्याने सार्वजनिक नळ जोडणी (Group Connection) घेण्याची मानसिकता असल्याने वैयक्तिक नळ जोडणी ची टक्केवारी कमी प्रमाणात दिसते नव्याने कार्यान्वित होणाऱ्या नळ पाणी पुरवठा योजना अंतर्गत वैयक्तिक नळ कनेक्शन जोडण्याचे प्रस्तावित असल्याने येत्या १ ते २ वर्षाच्या कालावधीत वैयक्तिक नळ जोडणीचे टक्केवारी

		वाढ होणे अपेक्षित आहे.
		पालघर:-पालघर जिल्ह्यात एकूण ४४९२ वाड्या / वस्त्या असून त्यापैकी ३२२५ वाड्या / वस्त्यांना सद्य:स्थितीत पाणी पुरवठा योजना केलेल्या आहेत. म्हणजेच टक्केवारी ७१.७९ इतकी येते. सदर टक्कवारी ५० % पेक्षा जास्त असून उर्वरीत सर्व वाड्या / वस्त्यांना नळ पाणी पुरवठा योजना करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच ४४९२ पैकी ३२२५ वाड्या / वस्त्यांना नळाद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत असून ३८१४१ घरांना नळ जोडण्या देण्यात आल्या आहेत. नवीन सर्व योजना या १०० % घरगुती जोडण्यांवर आधारीत आहेत, त्यामुळे सदरील टक्केवारीत येत्या काळात वाढ होणार आहे.
		सोलापूर:-सोलापूर जिल्हयातील एकूण ग्रामिण लोकसंख्येच्या अनुषंगाने ग्रामीण घरांची संख्या ५९४५६३ असून एकूण् घरांच्या संख्याच्या ९८ % घरांना पाणी पुरवठा व्यवस्था हातपंप/पिण्याच्या पाण्याची विहिर/ नळपाणी पुरवठा योजना द्वारे करण्यात आलेली आहे. दि. ६.८.२०१८ रोजीच्या शासन निर्णयात दिलेल्या सूचनेनुसार ८० टक्के हमीपत्राची अट असल्याने नव्याने कार्यान्वित होणा-या नळ पाणी पुरवठा योजना अतर्गत वैयक्तिक नळ कनेक्शन जोडण्याचे प्रस्तावित असल्याने येत्या १ ते २ वर्षाच्या कालावधीत वैयेक्तिक नळ जोडणीची टक्केवारी वाढ होणार आहे. सोलापूर जिल्हयात एकूण ११ तालुके असून त्यातील ता. सांगोला व ता. पंढरपूर या तालुक्यातील

		लोकवस्ती ही विरळ असुन वाडया वस्त्यावर राहत असल्याने विखुलेली आहे.
		यवतमाळ:- यवतमाळ जिल्हयात २२७४ पैकी १४६१ वाडयांना नळ पाणीपुरवठा योजनांव्दारे ४० लीटर प्रति व्यक्ती/दिन पाणीपुरवठा करण्यात आला आहे. त्याचे प्रमाण ६४% इतके आहे.
		अहमदनगर:-राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमापुर्वी नळ पाणी पुरवठा योजना या स्टॅंडपोस्ट पाणी वितरण या संकल्पने आधारीत होत्या त्यामुळे पुर्वीच्या नळ पाणी पुरवठा योजनांवर घरगुती नळ कनेक्शन ची संख्या अत्यंत कमी होती. तसेच विखुरणाऱ्या लोकसंख्येमुळे देखील नळ कनेक्शन ची संख्या कमी होती. अहमदनगर जिल्हयात एकूण ७३८० हॅबीटेशन पैकी ३८३१ हॅबीटेशन्स पाईप लाईन व्दारे जोडण्यात आली आहेत. व ८३१४८ खाजगी नळजोड आहेत. आता नळयोजना घरगुती नळ योजनेव्दारे पाणी वितरण या धोरणानुसार राबविण्यात येत आहेत त्यामुळे नळ कनेक्शनची संख्या वाढत असून ऑनलाईन अपडेशन प्रगतीत आहे. नळ योजनांची देखभाल दुरुस्ती ग्रामपंचायतींनी पाणी पटटीच्या उत्पन्नातून करावयाची असल्याने ग्रामपंचायतीमार्फत नळ जोड संख्या वाढविणेत येत आहे. याबाबत विशेष अभियान राबवून वैयक्तीक खाजगी नळ जोडणी वाढविणेबाबत कार्यवाही चालू आहे.

हिंगोली-:

अ.क्र.	वर्ष	उद्दिष्ट	साध्य
१	१८-२०१७	०२	०२
२	१७-२०१६	१७	१५
३	१६-२०१५	२६	२७
४	१५-२०१४	३९	३६

सन २०१४-१५, २०११५-१६, २०१६-१७,२०१७-१८ करीता एकुण उद्दिष्ट ८४ असून त्यापैकी ८० साध्य झाले असून ते एकूण उद्दिष्टाच्या ९५.२३% आहे.

ठाणे:- सद्य:स्थितीत ठाणे जिल्ह्यातील १९७२ पाड्यांपैकी १३१५ पाड्यांना (६९ टक्के) नळाद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे. ठाणे जिल्ह्यातील नळ जोडणीची टक्केवारी २४ टक्के आहे. ठाणे जिल्ह्यातील बहुतांश भाग डोंगराळ व आदिवासी आहे. त्यामुळे लहान लहान वाड्या वस्त्या असून, सदर ठिकाणी स्टँडपोस्टद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत असल्याने घरगुती नळ जोडणींची संख्या कमी आहे. तथापि, सद्य:स्थितीत सर्व नवीन नळ पाणी पुरवठा योजनांसाठी १००% नळ जोडणी अनिवार्य करण्यात आली असून, अस्तित्वातील नळ योजनांना १००% नळ जोडणी देण्याबाबत सर्व उप विभागांना निर्देश देण्यात आले आहेत.

परभणी:-परभणी जिल्ह्यात एकूण ९ तालुके ७०४ ग्रामपंचात ८२७ महसुली गावे/वाड्यांसह १०८० हॅबीटेशन्स आहेत. त्यापैकी १०७१ गावे/वाड्या तांड्यांना पुरेसा पाणी पुरवठा उपलब्ध असून, त्याची टक्केवारी

		९९.१७ % एवढी आहे. केवळ ९ गावांना अद्याप पाणी पुरवठा सुरु करणे बाकी असून, माहे मार्च, २०१९ अखेर १००% उद्दिष्ठ साध्य करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. परभणी जिल्ह्यात केंद्र शासनाच्या संकेत स्थळावरील (IMIS) वरील नोंदीनुसार एकूण कुटुंबाची संख्या २,५३,७३८ एवढी आहे. एकूण ५८० नळ पाणी पुरवठा योजनांमधून वैयक्तीक नळ जोडणीद्वारे पाणी पुरवठा केला जात असून, त्याची टक्केवारी ३५ टक्केपेक्षा जास्त आहे. तथापि त्याची नोंद केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर (IMIS) घेऊन अद्ययावत करण्याची कार्यवाही सुरु आहे.
		रायगड:- रायगड जिल्ह्यामध्ये सद्य:स्थितीत ३५ टक्के पेक्षा जास्त वस्त्यांना घरगुती नळ जोडणीसह नळ पाणी पुरवठा योजना उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. (रायगड जिल्ह्यामध्ये ५०९० ग्रामीण वस्त्या आहेत. त्यापैकी २३४५ वस्त्यांना घरगुती नळ जोडणीसह नळाद्वारे पाणी पुरवठा करण्यात आला आहे.

३.४.७.३ दूषित पाण्याने बाधित वस्त्या

दुषित पाण्याने बाधित वस्त्यांना सामावुन घेणे हा एनआरडीडब्लुपी च्या मार्गदर्शक सुचनांनुसार १२ व्या पंचवार्षिक योजनेमध्ये हाताळयाचा एक गंभीर मुद्या होता तक्ता क्र.३.४.३ मध्ये राज्यातील दुषित पाण्याने बाधित वस्त्यांना २०१२ - २०१७ दरम्यान सामावून घेण्या संदर्भांत ठरविलेली उद्दिष्टे व त्याची पुर्तता देण्यात आली आहे.

तक्ता क्र.३.४.३ राज्यातील दुषित पाण्याने बाधित वस्त्या

वर्ष	१ एप्रिल रोजी गुणवत्ता बाधित वस्त्या	व्याप्तीसाठी उदिष्टे	साध्य	सामावुन घेण्यात बाकी असलेल्या वस्त्या
२०१२/१३	१६७१	८८७	५७९	१०९२
२०१३/१४	१२९४	७३८	३७०	९२४
२०१४/१५	९४९	४८७	३०५	६४४
२०१५/१६	६०९	१८७	१४४	४६५
२०१६/१७	३८४	१२५	८०	३०४

स्रोत : पाणी स्वच्छता व सहाय्य संघटनेकडून प्राप्त माहिती

तक्ता क्र.३.४.३ वरुन असे दिसते की,२०१२/२०१७ दरम्यान पाणी गुणवत्ता व बाधित सर्व वस्त्यांच्या समस्या हाताळण्या विषयी कोणतीही उदिष्टे ठरविली नव्हती आणि २०१२/१७ दरम्यान उदिष्टे साध्य करण्यात विभागाला अपयश आले होते.मार्च २०१७ अखेरीस ६.५६ लाख लोकसंख्या असलेलया ३०४ वस्त्यां अजुनही दुषित पाण्याने बाधित होत्या.

चाचणी परिक्षा करण्यात आलेल्या १० जिल्हयात जिल्हा परिषदांनी पुरविलेल्या माहितीनुसार २०१२/२०१७ दरम्यान १३८७ दुषित पाण्याने बाधित वस्त्यापैकी ४६५ दुषित

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार दि. ०१/०४/२०१२ रोजी गुणवत्ताबाधित असलेल्या गावे/वाडयांचा सन २०१२-१३ च्या कृती आराखडयामध्ये समावेश करण्यात आला होता. गुणवत्ता बाधित गावे/वाडयांसाठी पर्यायी सुरक्षित उद्भवाद्वारे नळ पाणी पुरवठा योजनेची अंमलबजावणी करण्यात येते. अशा योजना पूर्ण करण्यासाठी कमीत कमी २-३ वर्षाचा कालावधी लागत असल्याने पाणी पुरवठा योजनांची भौतिक प्रगती विचारात घेऊन सन २०१२-१७ या कालावधीत सदर योजनांतर्गत गावे/वाडयांचे वार्षिक उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. त्यामुळे पाणी गुणवता बाधीत सर्व वस्त्यांच्या समस्या हाताळण्याविषयी कोणतीही उद्दीष्टे ठरविली नव्हती, असा निष्कर्ष काढणे योग्य होणार नाही.

दरम्यानच्या कालावधीत केंद्र शासनाने दि.२९/०६/२०१५ रोजीच्या पत्रान्वये विशिष्ट वर्गवारीच्या (संसद आदर्श ग्राम व फ्लोराईडबाधित गावे/वाडया) व्यतिरिक्त इतर वर्गवारीतील गावे/वाडयांसाठी नवीन पाणी पुरवठा योजना घेण्यास निर्बंध घातले होते. यामुळे सन २०१५-१६ व सन २०१६-१७ या वर्षामध्ये पाणी गुणवत्ताबाधीत गावे/वाडया कमी प्रमाणात हाताळण्यात आल्या. असे असतानाही, दि.०१/०४/२०१२ रोजीच्या १६७१ पाणी गुणवत्ताबाधीत गावे/वाडया विचारात घेता दि. ०१/०४/२०१७ रोजी केवळ ३०४ पाणी गुणवत्ताबाधीत गावे/वाडया शिल्लक असल्याचे दिसून येते. यावरून राज्य शासनास पाणी गुणवत्ताबाधीत गावे/वाडया कमी करण्यास निश्चितपणे यश मिळाले असल्याचे निदर्शनास येते. तसेच नळ पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी करण्यास लागणारा कालावधी विचारात घेऊन गुणवत्ता बाधित गावे/वाडयांमध्ये तात्पुरत्या स्वरूपाची उपाययोजना म्हणून जलशुध्दिकरण संयंत्रे (RO Plant) अंकीत पाणी

	पाध्याने बाधित वस्त्यांच्या समस्या हाताळण्यात आल्या व ९२२ दुषित पाण्याने बाधित वस्त्यांच्या समस्या विचारात घेतल्या गेल्या नव्हत्या चाचणी परिक्षा केलेल्या १० जिल्यापैकी जास्तीत जास्त दुषित पाण्याने बाधित वस्त्या नाशिक आणि बुलढाणा जिल्हयात होत्या ज्यांची आकडेवारी अनुक्रमे ६५२ आणि ११४ अशी होती लेखापरिक्षणाच्या असे निदर्शनास आले की,१ एप्रिल २०१२ रोजी नाशिक आणि बुलढाणा जिल्हयात अनुक्रमे ७१४ आणि २३० दुषित पाध्याने बाधित वस्त्या होत्या ज्यांच्या साठी २०१२/२०१७ साठी पाणी गुणवत्ता समस्या हाताळणीची उदिष्टे अनुक्रमे ७४ आणि १६१ दुषित पाण्याने बाधीत वस्त्या अशी ठरविण्यात आली होती जरी भारत सरकारने पाणी गुणवत्तेसाठी अतिरीक्त वितरण अंतर्गत २०१२/१७ दरम्यान रु.३८.४२ कोटी आणि २०१५/१६ दरम्यान निती आयोग अंतर्गत रु.२४.०८ कोटी राज्यातील दुषित पाण्याने बाधीत वस्त्यांच्या समस्या हाताळण्यासाठी वितरीत केले होते. तरी त्यातील रु.३८.९६ कोटी अखर्चित राहीले होते. अशाप्रकारे, १२ व्या पंचवार्षिक योजना कालावधीमध्ये राज्यातील दुषित पाण्याने बाधित वस्त्यांच्या समस्या हाताळण्याबाबतच्या गंभीरबाबी मोठया प्रमाणात साध्य होऊ शकल्या नव्हत्या.	गुणवत्ता या घटकांतर्गत व फ्लोराईडबाधीत गावे/वाडयांसाठी जलशुध्दिकरण संयंत्रे (DFU))Defloridation Unit) निती आयोगाकडून प्राप्त झालेल्या निधीमधून बसविण्यात आले आहेत. याशिवाय १४ वा वित्त आयोग, जिल्हा परिषद, स्थानिक खासदार निधी इत्यादी निधीतूनही ही संयंत्रे बसविण्यात आलेली आहेत. केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर गाव/वाडयांतील सर्व स्त्रोतामधून उपलब्ध होणारे पाणी व त्यांची गुणवत्ता चाचणी विचारात घेऊन गुणवत्ता बाधित गावे/वाडया संकेतस्थळावर जिल्हयांकडून नोंदीत करण्यात येतात. तथापि चाचणी परिक्षा १० जिल्हयातील आकडेवारीचे अवलोकन केले असता असे दिसून येते कि, केवळ सदर गुणवत्ता बाधित गावे/वाडयांमधील सर्व पिण्याचे पाण्याच्या स्त्रोतांचे रासायनिक चाचणीच्या निष्कर्षानुसार अंतिम केले आहे . सन २०१७-१८ मध्ये १३१ दुषित पाण्याने बाधित वस्त्यांना शुध्द पाणी पुरवठा करण्यासाठी RO ची निविदा प्रसिध्द करण्यात आली. सदर कामाअंतर्गत ६५ RO संयंत्रे कार्यान्वित करुन ग्रामस्थांना शुध्द पाणी पुरवठा होत आहे. उर्वरित ६६ गावातील RO संयंत्राचे कामे प्रगतीपथावर आहेत. त्याचप्रमाणे सन २०१८-१९ मध्ये ३२५ RO संयंत्रेची निविदा प्रसिध्द करुन दि.११ डिसेंबर, २०१८ रोजी कार्यादेशनिर्गमित केले आहे. त्याचप्रमाणे १०७ फ्लोराईड बाधित गावांना शुध्द पाणी पुरवठा करण्यासाठी सन २०१७-१८ मध्ये १०७ DFU (Defloridation Unit) कार्यान्वित करण्याची निविदा प्रसिध्द करण्यात आली. सदर कामांतर्गत ६० DFU कार्यान्वित करुन ग्रामस्थांना शुध्द पाण्याचा पुरवठा होत आहे व उर्वरि ४७ DFU चे काम प्रगतीपथावर आहे.

३.४.७.४	**पाणी चाचणी प्रयोगशाळेची अधिस्विकृती नसणे.** ग्रामीण पेयजल क्षेत्रासाठी २०११ ते २०२२ या कालावधीसाठी भारत सरकारणे केलेल्या धोरणत्मक नियोजनानुसार राज्य आणि जिल्हास्तरीय सर्व पाणी गुणवत्ता चाचणी प्रयोगशाळांनी राष्ट्रीय प्रयोगशाळा प्रत्यायन मंडळ यांच्याकडून अधिस्विकृती प्राप्त करणे आवश्यक होते. त्याचप्रमाणे, जिल्हा आणि उपविभागीय प्रयोगशाळांनी पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतातील भौतीक, रासायनिक आणि सुक्ष्म जीवशास्त्रिय मानकांचे विश्लेषण भारतीय मानकांतर्गत विनिर्दीष्ट केल्याप्रमाणे करणे आवश्यक होते. लेखापरिक्षण छाननीत असे दिसून आले की जरी सर्व प्रयोगशाळा पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या प्रशासनिय नियंत्रणाखाली होत्या तरी राज्यस्तरीय प्रयोगशाळेची स्थापना केली गेली नव्हती. त्याचप्रमाणे ६ क्षेत्रीय प्रयोगशाळा आणि २८ जिल्हा प्रयोगशाळांची अधिस्वीकृती घेण्यात आली नव्हती. अर्सिनीक युक्त पाणी चाचणीसाठीची सोय जिल्हा आणि १३८ उपविभागीय प्रयोगशाळेत उपलब्ध नव्हती.	राज्यातील आरोग्य विभागाकडून भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेकडे १३८ उपविभागीय प्रयोगशाळा हस्तांतरीत झालेल्या आहेत. तसेच पुणे येथे राज्यस्तरीय प्रयोगशाळा प्रस्तावित असून ६ विभागीय, २८ जिल्हा व १३८ उपविभागीय अशा एकूण १७२ प्रयोगशाळा भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेकडे कार्यरत आहेत. जिल्हा व उपविभागीय प्रयोगशाळाचे भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेकडे हस्तांतरणामुळे पाणी गुणवत्ता पाणी नमुने तपासणीचे वाढलेले कामकाज सध्या कंत्राटी कर्मचाऱ्यामार्फत केले जात आहे. राज्यामध्ये भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेची राज्यस्तरीय प्रयोगशाळा कार्यरत नसल्याने सदयस्थिती विभागीय प्रयोगशाळाचे राष्ट्रीय अधिस्विकृतीकरण करण्याचे निश्चित करण्यात आले होते. त्यानुसार राष्ट्रीय अधिस्विकृतीकरण करण्यासाठी इमारत, उपकरणे, मनुष्यबळ या बाबींचा विचार करुन सहा विभागीय प्रयोगशाळा राष्ट्रीय अधिस्विकृतीकरण करण्याबाबत कार्यवाही करण्यात आली आहे. सहा विभागीय प्रयोगशाळा राष्ट्रीय अधिस्विकृतीकरण पूर्ण होऊन त्याबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. उर्वरित २८ जिल्हा प्रयोगशाळा स्थापन झाल्या असून पाणी नमुने पृथ:करणाचे काम चालू झाले आहे. सदर प्रयोगशाळांचे राष्ट्रीय अधिस्विकृतीकरण करणेकरिता आवश्यक असलेले ISO/IEC १७०२५ हे प्रशिक्षण वरीष्ठ भुवैज्ञानिक आणि कंत्राटी रसायनी यांना देण्यात आलेले आहे. राष्ट्रीय अधिस्विकृतीकरण करणेकरिता आवश्यकता पुढील कार्यवाही चालू आहे. राज्य प्रदुषण मंडळ व राज्य आरोग्य प्रयोगशाळेच्या अहवालानुसार महाराष्ट्र राज्यामध्ये आर्सेनिक नसल्यामुळे पृथकरण व्यवस्था करण्यात आली नाही याबाबत राज्य प्रयोगशाळेमध्ये आर्सेनिक घटकाचे पृथकरण व्यवस्था करण्यात येणार आहे.

३.४.८ कामाची अंमलबजावणी

३.४.८.१ अपूर्ण कामे- अंमलबजावणीतील विलंब

तक्ता ३.४.४ मध्ये वर्ष २०१२-१७ दरम्यान हाती घेतलेल्या योजना ४६ पूर्ण झालेल्या योजना आणि अपूर्ण योजना यांची स्थिती देण्यात आलेली आहे.

तक्ता ३.४.४: राज्यात २०१२-१७ दरम्यान हाती घेण्यात आलेल्या, पूर्ण झालेल्या आणि अपूर्ण योजना यांची संचित स्थिती

वर्ष	वर्षामध्ये हाती घेण्यात आलेल्या योजना	पूर्ण झालेल्या योजना	अपूर्ण राहिलेल्या योजना (टक्केवारी)
२०१२-१३	६५११	३५५६	२९५५
२०१३-१४	५१७०	३०२१	२१४९
२०१४-१५	५१२४	२८३६	२२८८
२०१५-१६	२८३६	१२१३	१६२३
२०१६-१७	१७४२	९२६	८१६

स्रोत:- पाणी स्वच्छता व सहाय्य संघटना यांनी पुरवलेली माहिती.

चाचणी तपासणी केलेल्या जिल्ह्यांमध्ये कालनिहाय विलंब तक्ता ३.४.५. मध्ये दर्शविले आहे.

तक्ता ३.४.५. चाचणी परीक्षा करण्यात आलेल्या जिल्ह्यांमधील योजना पूर्ण करण्यात झालेला विलंब

	पूर्णत्वातील विलंब					
जिल्ह्याचे नाव	एक वर्षापेक्षा कमी	एक ते तीन वर्ष	तीन ते पाच वर्ष	पाच वर्षापेक्षा अधिक	एका वर्षापेक्षा अधिक	एकूण
१	२	३	४	५	६	७
औरंगाबाद	१७	९	३	१८	३०	४७
नाशिक	०	२	५१	१०३	१५६	१५६
बीड	०	१८	२२	४०	८०	८०
अहमदनगर	१	१०	१	०	११	१२

नळ पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी करण्यास योजनेचा व्याप विचारात घेऊन साधारणत: ०२ ते ०३ वर्षाचा कालावधी लागतो. सदर बाब विचारात घेऊन योजनांच्या प्रगतीनुसार वार्षिक उद्दिष्ट निश्चित करण्यात येते. त्यामुळे सन २०१२ ते २०१७ या कालावधीत पूर्ण झालेल्या योजनांबाबत सदर कालावधीत हाती घेण्यात आलेल्या योजनांशी तुलना न करता निश्चित केलेल्या वार्षिक उद्दिष्टाशी तुलना करणे अपेक्षित आहे. याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

वर्ष	वर्षामध्ये हाती घेण्यात आलेल्या योजना	वार्षिक उद्दिष्ट	पूर्ण झालेल्या योजना
२०१२-१३	६५११	४२६१	३५५६ (८३.४५%)
२०१३-१४	५१७०	३७४८	३०२१ (८०.६०%)
२०१४-१५	५१२४	३३२६	२८३६ (६४.९१%)
२०१५-१६	२८३६	१२०२	१२१३ (१००.९१%)
२०१६-१७	१७४२	१४३५	९२६ (६४.५३%)

७३ व्या आणि ७४ व्या घटनादुरुस्ती अन्वये ग्रामीण पाणीपुरवठा योजनांचे नियोजन, अंमलबजावणी आणि देखभाल दुरुस्ती यांची जबाबदारी पूर्णपणे ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती यांच्यावर सोपवण्यात आली आहे. सदर समितीस जिल्हापरिषदेमार्फत अग्रीम स्वरूपात निधी उपलब्ध करून देण्यात येत होता. तथापि समितीमधील अंतर्गत वाद, ठेकेदाराकडून विलंब, तांत्रिक व लेखा विषयक परिपूर्ण माहिती नसल्याने निविदा प्रक्रियेत त्रुटी व विलंब यामुळेदेखील

बुलढाणा	६	१९	१०	७	३६	४२
नागपुर	६	२७	३	०	३०	३६
रायगड	३	११	०	०	११	१४
सांगली	१७	१	८	०	९	२६
पुणे	४७	११	४	०	१५	६२
ठाणे	४	१४	७	९	३०	३४
एकूण	१०१	१२२	१०९	१७७	४०८	५०९
किमत (रु. कोटीत)	२०३.०८	४१७.१७	३१७.१५	१८९.२३	९२३.५५	११२६.६३

स्रोत:- निवडलेल्या जिल्ह्यातील जिल्हा परिषदानी पुरवलेली माहिती.

चाचणी परीक्षा केलेल्या दहा जिल्ह्यातील छाननीत स्पष्ट झाले की:-

- विलंब झालेल्या ५०९ योजनापैकी १७७ योजनांमध्ये (३५ टक्के) विलंब पाच वर्षापेक्षा जास्त होता.
- मार्च २०१७ अखेरीस ४०८ चालू योजनांमध्ये ज्यांची मान्य किमत रु. ९२३.५ कोटी होती, विलंब हा एक वर्षापेक्षा जास्त होता.

निधीची कमतरता, न्यायिक विवाद, आटणारे स्त्रोत आणि जमिनीची अनुपल्बधता इ. ह्या कारणांमुळे योजनाच्या पूर्णत्वास पाच वर्षापेक्षा जास्त विलंब झाला होता. कामे पूर्ण होण्यास विलंब झाल्यास केवळ किमतच वाढत नसून लाभर्थ्यांनी वेळेवर मिळणाऱ्या योजनेच्या लाभापासून वंचित रहावे लागते.

योजनांची अंमलबजावणी करण्यास विलंब झालेला आहे. उपरोक्त बार्बीचा विचार करून दि.०९/०३/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये ग्राम पाणी पुरवठा समितीच्या अधिकारात बदल करण्यात आले असून अंमलबजावणीचे अधिकार जिल्हा परिषद व मजीप्रा यंत्रणेस देण्यात आले असून नियोजन व देखभाल दुरूस्तीचे अधिकार ग्राम पाणी पुरवठा समितीस देण्यात आलेले आहेत. या व्यतिरिक्त खालील तांत्रिक अडचणींमुळेदेखील ग्राम पाणी पुरवठा समिती/जिल्हा परिषद/मजीप्रा यंत्रणेमार्फत अंमलबजावणी करण्यात येत असलेल्या योजनांना विलंब झाला आहे.

योजनेचा उद्भव कोरडा/अपुरा असणे, विविध विभागांच्या परवानग्या , विद्युत जोडणी वेळेत न मिळणे, योजना सुधारीत मान्यता इ.इ.

जिल्हानिहाय माहिती खालीलप्रमाणे :-

नाशिक जिल्ह्यामध्ये विलंब झालेल्या १५६ योजनांपैकी १५२ योजना जिल्हा परिषदेच्या व ४ योजना या म.जी.प्र.च्या आहेत. सदर योजना भौतिकदृष्टया पुर्ण झालेल्या असून आर्थिकदृष्टया अंतिम करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. १५२ योजनांपैकी ६२ योजना अंतिम करण्याची कार्यवाही प्रगतीत असून ९० योजना मार्च २०१९ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.योजना पुर्ण न होण्याची कारणे १) उदभव कोरडा पडणे, २) कंत्राटदारामार्फत धिम्या गतीने काम करणे, ३) योजना सुधारित होणे, ४) इतर विभागाची परवानगी मुळे ५) विद्युत जोडणी अभावि विलंब, ६) पाणी पुरवठा व स्वछता सिमिती अंतर्गत वाद, ७) लेखा परिक्षणास झालेला विलंब, ८) गाव हागणदारी मुक्त न झाल्याने.

अहमदनगर :- मार्च २०१७ अखेरीस प्रगतीतील एक वर्षापेक्षा कालावधी

		झालेल्या ११ योजनांपैकी ९ योजना कार्यान्वीत करण्यात आलेल्या आहेत. उर्वरीत २ योजनांचे उद्धव कोरडे गेल्याने पुढील उपांगाची कामे करण्यात आलेली नाही. **बुलढाणा** विभागाचे लेखापरीक्षा दि.२५/०७/२०१७ रोजी देण्यात आलेल्या अर्धसमासाचे मूळ परिच्छेद हा योजनेची कामे सुधारित प्रशासकीय मान्यतेअभावी बंद असल्याचे नमूद करण्यात आले असुन सदर परिच्छेद अंतिम करताना योजनेची कामे भुसंपादन व रस्ता क्रॉसिंगमुळे दोन वर्षे सुरु न झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. याबाबतची पुर्तता पुढीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे :- योजनेच्या रु.११०९.२५ लक्ष किंमतीच्या अंदाजपत्रकास दि.०५/०८/२००९ रोजी प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून निविदा प्रक्रिया पूर्णकरुन कार्यारंभ आदेश दि.११/०३/२०१० रोजी देण्यात येवून त्यानुसार योजनेच्या प्रत्यक्ष कामास सुरवात करण्यात आली. योजनेच्या कामांमध्ये २ वर्षे विलंब झालेला नाही. योजनेवर जादा खर्च अपेक्षित असल्याने सुधारित प्रशासकीय मान्यता मिळण्याकरीता रु.२७.०५ लक्ष किंमतीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला. परंतु सुधारित प्रशासकीय मान्यता न मिळाल्याने योजनेची कामे स्थगित होती. आता सुधारित योजना रु.१९२०.८८ लक्ष इतक्या किंमतीस महाराष्ट्र शासनातर्फे शा.नि. क्र.सुप्रमा-२११३/प्र.क्र.१५२/पापु-१३, दि.१६/०७/२०१८ अन्वये मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे. संबंधित कंत्राटदाराने उर्वरीत कामास सुरुवात केली असून लवकरच योजना पुर्ण केली जाईल. त्यामुळे झालेला खर्च निश्चितच खोळंबून राहणार

		नाही. **नागपूर जिल्ह्यात** सद्य:स्थितीत ५ वर्षांपेक्षा जास्त कालावधीकरीता रखडलेली १ योजना आहे. सदर वेलतूर नळ पाणी पुरवठा योजनेच्या किंमतीत वाढ झाल्यामुळे सुधारित योजनेचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला आहे. सुधारित योजनेस मंजुरी प्राप्त होताच योजनेचे काम ६ महिन्यात पुर्ण करण्यात येईल. नागपूर जिल्ह्यात एक वर्षापेक्षा जास्त कालावधीकरीता रखडलेल्या १२ योजना आहेत. सर्व योजना पुर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. **रायगड :-** **एक वर्षापेक्षा कमी विलंब :-** उमटे योजनेचे ८०% काम पूर्ण झाले असून पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे. ठेकेदाराकडून योग्य प्रतिसाद मिळत नसल्याने तळशेत योजनेचे काम संथ गतीने सुरु आहे. त्यामुळे योजना पूर्ण होण्यास विलंब झाला आहे. बांधपाडा योजनेची पाणी पुरवठा समिती व ठेकेदार यांच्यामध्ये मतभेद झाल्याने योजना पूर्ण होण्यास विलंब झाला आहे. **एक ते तीन वर्षे विलंब :-** एकूण ७ (बोरज, गारपोली, डोंगरपाडा, वामणे, गोठे, रानवडी व वाकी) नळ पाणी पुरवृठा योजनांची निविदा प्रक्रिया ग्राम पाणी पुरवठा समिती स्तरावर करण्यास विलंब झाल्यामुळे योजनेस विलंब झाला आहे. शिरढोण योजनेची पाणी पुरवठा समिती व ठेकेदार यांच्यामध्ये मतभेद झाल्याने योजना पूर्ण होण्यास विलंब झाला आहे. ठेकेदाराकडून योग्य प्रतिसाद मिळत नसल्याने ममदापूर योजनेचे काम संथ गतीने सुरु आहे. त्यामुळे योजना पूर्ण होण्यास विलंब झाला आहे. निजामपूर योजनेची पाणी पुरवठा समिती व ठेकेदार यांच्यामध्ये मतभेद झाल्याने व जिल्हा परिषद

		स्तरावर योजनेची फेर निविदा प्रसिद्ध करुन नव्याने निविदा प्रक्रिया पूर्ण करावी लागल्याने योजना पूर्ण होण्यास विलंब झाला आहे. ठेकेदाराकडून योग्य प्रतिसाद मिळत नसल्याने गोरेगाव योजनेंचे काम संथ गतीने सुरु आहे. त्यामुळे योजना पूर्ण होण्यास विलंब झाला आहे. **सांगली जिल्ह्यात** सन २०१७-१८ मधील प्रगतीपथावील २६ योजना शिल्लक होत्या त्यापैकी पूर्ण ९ योजनांमधून पाणी पुरवठा सुरु झाला आहे. तदनंतर ४ योजनांना पुरेसा उदभव न मिळाल्याने त्या रद्द केल्या उर्वरित १३ योजना प्रकतीपथावर आहेत. मार्च २०१९ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. **पुणे :-** एनआरडीडब्युपी च्या मार्गदर्शक सूचनांनुसार २०१२-१७ ते या अहवाल वर्षात पुणे जिल्हा परिषदेअंतर्गत दुषित पाण्याने बाधीत वस्त्या गावे आढळून आलेली नाहीत. तसेच अहवाल वर्षात पुणे जिल्हा परिषदेकडे दुषित वाण्याने बाधीत वस्त्या/गावांची गुणवत्ता समस्या हाताळण्यासाठी त्याप्रकारचा निधी प्राप्त झालेला नाही. **ठाणे :-** **एक वर्षापेक्षा कमी विलंब :-** १ योजना मजीप्राशी संबंधित असून, रद्द करण्यात आली आहे. जि.प. संबंधित ३ योजनांपैकी १ योजना जागेअभावी रद्द करण्यात आली असून, २ योजना दि.४ सप्टेंबर २०१८ चे मुख्य अभियंता यांचे तांत्रिक समितीमार्फत मंजूर करण्यात आल्या असून, सद्य:स्थितीत निविदा स्तरावर आहेत. **एक ते तीन वर्षे विलंब:-** ३ योजना पूर्ण. अपूर्ण असलेल्या २ योजना मजीप्राशी संबंधित असून सद्य:स्थितीत प्रगतीपथावर आहेत. **तीन ते पाच वर्षे विलंब:-** ४ योजनांतून पाणीपुरवठा सुरु आहे. अपूर्ण असलेली १ योजना मजीप्राशी संबंधित असून रखडलेली आहे. २ योजना जिल्हा

<table>
<tr>
<td></td>
<td></td>
<td>परिषदेशी संबंधित असून त्यापैकी १ योजना समितीच्या उदासिनतेमुळे रखडलेली आहे व १ योजनेमध्ये अपहार असल्याने समिती सदस्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
पाच वर्षापेक्षा अधिक विलंब:- १ योजना पूर्ण झाली. ४ योजनांतून पाणी पुरवठा सुरु आहे. अपूर्ण ४ योजना जिल्हा परिषदेशी संबंधित असून सर्व योजना कामातील संथपणा, समितीची उदासिनता, अंतर्गत वाद इ. कारणांमुळे रखडलेल्या आहेत.
एक वर्षापेक्षा अधिक विलंब (स्तंभ ३ ते ५) :- ४ योजना पूर्ण झाल्या. १७ योजनांतून पाणी पुरवठा सुरु आहे. ९ योजना अपूर्ण आहेत (जि.प.-९ व मजीप्रा-३)
जिल्हा परिषदेकडील अपूर्ण ६ योजनांपैकी ५ योजना मार्च, २०१९ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.</td>
</tr>
<tr>
<td></td>
<td>तक्ता:- ३.४.६ मध्ये चाचणीपरिक्षा केलेल्या जिल्ह्यातील निदर्शनास आलेली काही महत्वाची प्रकरणे चर्चिली आहेत.
३.४.६. चाचणी परीक्षा केलेल्या जिल्ह्यांमधील अपूर्ण योजना व खोळंबलेल्या खर्चाची प्रकरणे
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>योजनेचा प्रकार, योजनेचे नाव आणि जिल्हा (कार्यान्वयीन संस्था)</th><th>लेखापरीक्षण निष्कर्ष</th></tr>
<tr><td>१</td><td>क्षेत्रीय ग्रामीण पाणी पुरवठा योजना देऊळघाट धाड (बुलढाणा तालुका), बुलढाणा जिल्ह्यातील योजना</td><td>मार्च २०१० मध्ये कामाचे वाटप होऊन देखील भूसंपादन न झाल्यामुळे रस्ता क्रोसिंगला परवानगी मिळण्यास विलंब झाल्यामुळे दोन वर्षापर्यंत काम सुरू होऊ शकले नव्हते. त्यानंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी नोव्हेंबर २०११ मध्ये शासनास पाठविलेल्या प्रस्तावास मान्यता मिळालेली</td></tr>
</table>
</td>
<td>१) बुलढाणा विभागाचे लेखा परिक्षण दि. २५.०७.२०१७ रोजी देण्यात आलेल्या अर्धसमासाचे मूळ परिच्छेद हा योजनेची कामे सुधारीत प्रशासकीय मान्यते अभावी बंद असल्याचे नमूद करण्यात आले असून सदर परिच्छेद अंतीम करताना योजनेची कामे भुसंपादन व रस्ता क्रॉसींगमुळे दोन वर्षे सुरु न झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. याबाबतची पुर्तता पुढील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.
योजनेच्या ₹११०९.२५ लक्ष किंमतीच्या अंदाजपत्रकास दि.०५.०८.२००९ रोजी प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून योजनेची निविदा प्रक्रीया पुर्ण करुन कार्यारंभ आदेश दि.११.०३.२०१० रोजी देण्यात येवून त्यानुसार योजनेच्या प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात आली असून योजनेची कामे २ वर्षे विलंबाने सुरु झालेली नाहीत. योजनेवर जादा खर्च अपेक्षीत असल्याने सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळण्या करीता ₹२७.०५ किंमतीचा सुधारीत प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला व सुधारीत</td>
</tr>
</table>

<table>
<tr>
<td></td>
<td>
<table>
<tr><td></td><td>(महाराष्ट्र जीवन प्राधिकरण)</td><td>नसल्यामुळे जॅकवेल, अप्रक्रियित पाण्याची जलवाहिनी, जल शुधिकरण सयंत्र ईएसआर वाटपाचे जाळे च्या बांधकामावर योजने अंतर्गत झालेल्या रु. १२.४३ कोटी इतका खर्च खोळंबून राहिला.</td></tr>
<tr><td>२</td><td>क्षेत्रीय ग्रामीण पाणी पुरवठा योजना, रायगड जिल्ह्यातील नागोठणे योजना (महाराष्ट्र जीवन प्राधिकरण)</td><td>मुंबई गोवा महामार्गाच्या रुंदीकरणामुळे मुंबई गोवा महामार्गाच्या दोन्ही बाजूस असणाऱ्या जलशुद्धीकरण सयंत्र आणि वितरण प्रणाली यांना जोडणाऱ्या नलिकेचे काम होऊ न शकल्यामुळे मार्च २०११ मध्ये दिले गेलेले काम अपूर्ण राहिले होते (मार्च २०१४) आरसीसी जॅकवेल, जल शुद्धीकरण सयंत्र, ईएसआर वाटपाचे जाळे इ. यांच्या बांधकामावर योजने अंतर्गत झालेला रु.४.६६ कोटी इतका खर्च खोळंबून राहिला (जानेवारी २०१७).</td></tr>
</table>
अशा प्रकारे क्षेत्रीय ग्रामीण पाणी पुरवठा योजना, ज्यावर रु. १७.०९ कोटी खर्च झाले होते. त्या, तक्ता ३.४.६ मध्ये नमूद केलेल्या कारणामुळे तीन ते सहा वर्षाच्या कलावधीसाठी कामे थांबल्यामुळे अपूर्ण राहिल्या होत्या.
</td>
<td>प्रशासकीय मान्यता न मिळाल्याने योजनेची कामे स्थगीत होती.
आता सुधारीत योजना ₹१९२०.८८ लक्ष इतक्या किंमतीस महाराष्ट्र शासनानेतर्फे जी. आर. क्रमांक सुप्रमा-२११३/प्र.क्र. १५२/पापू-१३ दि.१६.०७.२०१८ अन्वये मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे. संबंधीत कंत्राटदाराने उर्वरीत कामास सुरुवात केली असून लवकरच योजना पूर्ण केली जाईल. त्यामुळे निश्चितच झालेला खर्च खोळंबून रहाणार नाही.
२) मुंबई-गोवा महामार्गाच्या रुंदीकरणामुळे १३.३८ कि.मी. वितरण नलिकेपैकी ३ कि.मी. वितरण नलिकेचे काम करता आले नाही. तथापि, ग्रामपंचायत नागोठणे येथे दिनांक २१.०५.२०१८ पासून आहे त्या स्थितीत कार्यान्वित करण्यात आली आहे.</td>
</tr>
</table>

३.४.८.२ कंत्राट व्यवस्थापनातील त्रुटी

चाचणी तपासणी केलेल्या जिल्ह्यांतील कंत्राट व्यवस्थापनातल्या त्रुटी तक्ता ३.४.७ मध्ये चर्चिल्या आहेत.

तक्ता ३.४.७: चाचणी तपासणी केलेल्या जिल्ह्यांमध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने कार्यान्वयीत केलेल्या कंत्राटांमध्ये निदर्शनास आलेल्या त्रुटींची प्रकरणे

अ.क्र.	कामाचे नाव	लेखापरीक्षण आक्षेप	अनुपालन
१	**नागपूर** नागरी पेरी क्षेत्रीय ग्रामीण पाणी पुरवठा योजना	डक्टाईल आयर्न (डि आय) पाईपचा पुरवठा करणाऱ्या पुरवठादाराबरोबर केलेल्या कंत्राटात, राज्यात कोणत्याही ठिकाणी कामाच्या जागेवर करावयाच्या पुरवठयाचा वाहतूक खर्च अंतर्भूत होता तरी देखील नागपूर मधील महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाने नागपूर नागरी पेरी क्षेत्रीय ग्रामीण पाणी पुरवठा योजना या कामासाठी पुरवठादाराकडून खरेदी केलेल्या डी.आय पाईपच्या पुर्न:वाहतूकीवर ₹१.२८ कोटीच्या कंत्राटदाराला केलेल्या प्रदानावर टाळता येण्याजोगा खर्च केला होता. (मे-२०१७).	डक्टाईल आयर्न (डि आय) पाईपचा पुरवठा विभागामार्फत शेडयुल अे मध्ये पुरवठा करण्याचे प्रस्तावित आहे. त्यानुसार पुरवठादारास दिलेल्या आदेशानुसार त्यांना पुरवठा करावयाचे स्थान जलशुध्दीकरण केंद्र शंकरपूर निश्चित करण्यात आलेले होते. त्यानुसार पुरवठादाराने संपूर्ण पुरवठा त्या ठिकाणी केलेले होते. तसेच जागेचा अभाव व पाईप रस्त्याच्या किना-यावर ठेवणे म्हणजे रहदारीकरिता येणारी अडचण / दुर्घटना शक्यता नाकारता येत नाही तसेच नागपूर शहरालगत ग्रामीण भाग विकसित होत असून त्यात रोडची रुंदी वाढविणे त्यामुळे रस्त्यात खोदकामे इतर कामे प्रगतीपथावर होती. व अशा परिस्थितीत पाईप ठिकठिकाणी रस्त्याच्या कडेला ठेवणे शक्य नसल्यामुळे एकच ठिकाणी शंकरपूर जलशुध्दीकरण केंद्र येथे ठेवण्याबाबत निश्चीती करण्यात आली. सदर योजना ही प्रादेशिक असून त्यात एकूण १० गावांचा समावेश आहे. त्यामुळे सदर पाईप एक ठिकाण्याहून दुस-यास ठिकाणी नेण्याकरिता निविदापुर्व बैठकीत कंत्राटदाराकडून विचारणा करण्यात आली आहे. त्याबाबत विभागामार्फत कळविण्यात आलेले आहे की, वाहतूकीकरिता येणारा खर्च वेगळयाने देण्यात येईल.

				कारण, दरसूची सन २०१३- १४ पान क्र.४ अ.क्र.१७ मध्ये स्पष्ट नमुद करण्यात आले आहे की, Cost of Carting of pipes and valves from Departmental stores to site works is not considered in rate analysis त्यामुळे सदर बाब योजनेत व निविदेत विचारात घेवून समाविष्ट करण्यात आलेली आहे. याबाबत त्यावेळेस प्रत्येक गावाचे अंतर विचारात घेवून दर पृथःकरण करण्यात आलेले आहे.
	२	बुलढाणा जिल्हयातील बुलढाणा शहर आणि चार गांवे यांची क्षेत्रीय ग्रामीण पाणी पुरवठा योजना	बुलढाणा जिल्ह्यातील बुलढाणा शहर आणि चार गावांना पिण्यासाठी पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी मंजूर केलेल्या (जून-२०१३) क्षेत्रीय ग्रामीण पाणी पुरवठा योजनेंतर्गत खरगपूर्णा नदीतील जॅकवेलच्या बांधकामासाठीचे उत्खननाचे काम ८.५० मीटरच्या खोलीपर्यंत पूर्ण झाले होते (जून-२०१३). जॅकवेल बांधणीची जागा खरगपूर्णा नदीच्या पात्रात बुडत असल्यामुळे काम थांबविण्यात आले होते. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी नवीन जागा निवडली (मार्च-२०१४) आणि नवीन जागेवर जॅकवेल बांधणीचे काम जूलै-२०१४ मध्ये पूर्ण करण्यात आले. जरी कंत्राटदाराला जून्या जागी जॅकवेल बांधणीचे प्रदान करण्यात आले नव्हते. तरी देखील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणावर टाळता येण्याजोगे दायित्व आणि अंतिमत: ₹२६.९८ लाख इतका वायफळ खर्च लादण्यात आला होता. भरपूर पावसामुळे जॅकवेल बुडाल्याचे आणि स्थळ भेटीनंतर पाण्याची पातळी लक्षात घेऊन नवीन जागा निवडल्याचे कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, बुलढाणा यांनी उत्तरात म्हटले होते. (जुलै, २०१७) कामाचा प्रारंभ करण्यापूर्वी केलेली जागेची निवड अयोग्य	योजनेचे उद्भव असलेले खडकपुर्णा धरणावरुन बुलडाणा शहर व ४ गांवे पाणी पुरवठा योजनेस दि. ३१ मार्च २०१२ रोजी प्रशासकीय मान्यता प्राप्त असनू योजनेकरीता रु.८४.३० कोटी नागरी हिस्सा व दि. ०४ मे,२०१३ अन्वये रु. २९.०२ कोटी (ग्रामीण हिस्सा) या प्रमाणे योजना मंजूर झालेली आहे. ई-निविदा नुसार राज्यस्तरीय निविदा समितीने बुलढाणा शहर व ४ गांवे पाणी पुरवठा योजनेकरीता मे. दि. इंडीयन हयूम पाईप कं. लि.यांना स्विकृत निविदा किंमत रु.८१,३१,९४,५९३/- यांना नियुक्त केले असून दि. २३.०५.२०१३ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे. योजना पुर्ण करण्याचा कालावधी दि. २२.०५.२०१५ होता. योजने अंतर्गत जॅकवेलचे स्थळ निश्चित धरणाच्या सरासरी जमीन लेवल ५१४.५०मी. स्थिती ठिकाणी घेण्यात आला असनू पुढील कामाकरीता ले-आऊट दिले आहे. खडकपुर्णा प्रकल्पाची पाण्याची पातळी खालील

			असल्याचे हे उत्तर दर्शविते ज्यामुळे रु.२६.९८ लाखांचे टाळता येण्याजोगे दायित्व तयार झाले.	प्रमाणे १) धरणाची क्षमता -१८०.८० घनमीमी. २) मृत साठा -६७.२० घनमीमी. ३) जिवंत साठा -९३.४० घनमीमी. ४) H.F.L. - ५२३.७६ मी ५) FRL - ५२०.५० मी ६) MDDL - ५१८.१८ मी. ७) मृत साठा लेवल -५१६.४० मी. योजनेअंतर्गत जकॅवेलची सरासरी लेवल ५१४.५० मी. असून मृत साठा खाली आहे.त्यामळे जॅकवेलचे खोदकाम ५०६.०० मी. वर झाले आहे. धरणातील मृत साठ्यातील पाण्याचा उपसा करता यावा या करीता योजनेतील जकॅवेल ही ५१४.५० मी. या पातळीवर प्रस्तावीत होती आणि सदर विहीरीचे खोदकाम ५०६ मी. पर्यंत करण्यात आले. परंतू दि. १४.०६.२०१३ रोजी खडकपुर्णा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या अती पर्जन्यवृष्टीमुळे धरणातील पाणी पातळी ही महत्तम (Maximum) उपसा पातळी म्हणजेच ५१८.१८ मी. पर्यंत वाढली. त्यामुळे सदर विहीरीचे खोदकाम बंद पडले. खडकपूर्णा धरणाचे महत्तम पातळी ५१८.१८ मी.असल्याने आणि ती साधारणत: वर्षभरानंतर ती लेवल ५१४.५० मी. या पातळी पर्यंत आल्याने सदरहू काम दि. २२.०५.२०१५ पर्यंत पूर्ण करावयाचे असल्याने मा. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी सदरहु योजनेच्या क्षेत्रीय पाहणी दरम्यान काम पुर्ण करण्याच्या कालावधीचे

				अवलोकन करुन ५११ मी. पातळीवर नवीन जकॅवेल घेण्याकरीता प्रस्तावीत केले. त्यानुसार दि. १२.०६.२०१४ रोजी नवीन जागेवर कामास सुरुवात करण्यात येऊन दि. २०.०५.२०१५ पर्यंत विहीरीचे काम फ्लोअरलेव्हल पर्यंत पुर्ण करण्यात आले. त्यामळे प्राप्त परिस्थिती नुसार विहीरीची जागा बदलण्याचा निर्णय घेण्यात आला असून या पुर्वी करण्यात आलेली जागेची स्थळ निश्चिती योग्य असनु सदर करारनामा हा ठोक पध्दतीचा असल्याने तसेच निविदा पुर्व बैठकीतील शर्तीनुसार आधी झालेल्या खोदकामाचे देयक कंत्राटदाराला अदा करण्यात आले नसून भविष्यात सुध्दा भुगतान करण्याची आवश्यकता नाही.
	३	**अहमदनगर जिल्हयातील अकोले आणि ३२ गावे क्षेत्रीय ग्रामीण पाणी पुरवठा योजना.**	**अहमदनगर** जिल्हयामधील अकोले आणि ३२ गावांना सामावून घेणारी क्षेत्रीय ग्रामीण पाणी पुरवठा योजनेसाठी पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी ₹ ३०.०७ कोटीला प्रशासकी मान्यता दिली होती (जून २०१२). कंत्राटदाराला काम ₹ ३५.८२ कोटी इतक्या किंमतीत बहाल करण्यात आले (मे २०१२) जे २४ महिन्यात म्हणजेच मे २०१४ पर्यंत पूर्ण करावयाचे होते. छाननीमध्ये असे आढळून आले की, कंत्राटात नमूद केलेल्या ठराविक कालमर्यादेत कामाचे विविध टप्पे पुर्ण करण्यात कंत्राटदार अपयशी ठरला होता. कंत्राटातील अटींप्रमाणे १,५२२ दिवसांसाठीच्या विलंबाकरीता वसूल करावयाच्या ₹ १.४३ कोटी इतक्या दंडाऐवजी वेळापत्रक न पाळल्याबद्दल कंत्राटदाराकडून ३५० दिवसांच्या विलंबाकरीता महाराष्ट्र जीवन प्रधिकरण विभागाने ₹ ०.२६ कोटी इतका दंड वसूल केला होता (जून २०१६), ज्यामुळे ₹ १.१७ कोटी इतकी कमी वसुली झाली होती.	अकोला व इतर ३२ गांवे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना ता.अकोले जि.अहमदनगर चे काम स्विकृत निविदा क्र.ब-१/२ सन २०१२-१३ अन्वये, मे.मेघा इंजिनिअरींग ॲण्ड इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. हैद्राबाद यांना देण्यात आलेले आहे. निविदेची अंदाजीत किंमत रू. २५४०.५५ लक्ष स्वीकृत किंमत रू. ३५८२.१८ लक्ष एवढी आहे. सदर कामांसाठी कामाचे आदेश दि. २३/५/२०१२ रोजी देण्यात आले होते. काम पुर्ण करावयाचा कालावधी हा दि.२३/५/२०१२ ते दि.२२/५/२०१४ (बांधकामासाठी २ वर्ष) आणि दि.२३/५/२०१४ ते दि.२२/५/२०१५ (योजना चालविण्यासाठी १ वर्ष) असा एकूण ३ वर्ष होता. स्वीकृत निविदेनुसार योजनेचे काम हे दोन टप्प्यामध्ये पुर्ण करावयाचे होते.

				टप्पा १ - इनटेक वेल, कनेक्टींग मेन, जॅकवेल, पंप हाऊस आणि ॲप्रोच ब्रीज टप्पा २- रॉ ॲण्ड प्युअर वॉटर रायजिंग मेन, रॉ ॲण्ड प्युअर वॉटर पंपीग मशिनरी, जलशुद्धीकरण केंद्र, एमबीआर आणि शुद्ध पाण्याची गुरूत्व नलिका योजनेच्या हेडवर्क्सची कामे ही निळवंडे धरणामध्ये आहेत. कामाचे आदेश दिल्यानंतर कंत्राटदाराने मनुष्यबळ आणि मशिनरी प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावर उपलब्ध करून कामास सुरूवात केली. जॅकवेलचे काम हे धरणाच्या बुडीत क्षेत्रामध्ये येत आहे. निळवंडे भागात झालेल्या अतिवृष्टीमुळे पाण्याचा उपसा झाल्याशिवाय सदर काम करता येत नव्हते. त्यामुळे दि.२/१/२०१३ पर्यंत (सुमारे २२० दिवस) कंत्राटदारास हेडवर्क्सची कामे पुर्ण करता आली नाहीत. दि.२/१/२०१३ पासून ठेकेदाराने हेडवर्क्सच्या कामाची प्रत्यक्ष सुरूवात केलीव सदर काम दि. १०/६/२०१३ रोजी पुर्ण झाले. हेडवर्क्सचे आर.सी.सी काम सुरू करण्यात आले होते.मात्र निळवंडे भागात सन २०१३ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे दि.१/८/२०१३ ते दि.३०/१/२०१४ (सुमारे १८० दिवस) काम बंद होते. तद्नंतर इनटेकवेल व कनेक्टींग मेन चे काम दि.३०/७/२०१४ रोजी पुर्ण झाले. जॅकवेल आणि ॲप्रोच ब्रीजचे काम माहे डिसेंबर २०१५ मध्ये पुर्ण झाले. मधल्या काळात जलशुद्धीकरण केंद्र आणि एमबीआरचे आर.सी.सी. डिझाईनला मान्यता मिळाली. टप्पा-२ ची कामे सुरू करण्यास शासनाकडून दि.

१६/१/२०१४ रोजी मान्यता मिळाली. सदर मान्यता मिळाल्यानंतर शुद्ध पाणी गुरूत्व नलिका व इतर उपांगे यांच्या कामास सुरूवात करण्यात आली. शुद्ध पाणी गुरूत्वनलिकेच्या कामाची व्याप्ती सुमारे ८४ कि.मी. आहे. प्रत्यक्ष पाईपलाईनचे काम करत असताना खाजगी जागा धारक,शेतमालक पाईपलाईन जाणा-या जागेमध्ये पीके उभी असल्याने शेतक-यांनी काम पुर्ण करण्यास अडथळा निर्माण केला. त्यामुळे शुद्ध पाणी गुरूत्वनलिकेच्या कामास विलंब झाला. यामध्ये सदर झालेल्या विलंबास कंत्राटदार अंशत: जबाबदार नव्हता. दरम्यानच्या कालावधीमध्ये जलशुद्धीकरण केंद्र, अशुद्ध पाणी उर्ध्वनलिका आणि एम.बी.आर.ची कामे प्रगतीपथावर होती. कंत्राटदाराने स्वीकृत निविदेनुसार मूळ कालावधीमध्ये आणि वाढीव कालावधीमध्ये केलेल्या कामांचा तपशिल खालीलप्रमाणे.

अ. क्र	उपांगाचे नांव	मुळ कालावधी मध्ये पुर्ण झालेल्या कामाची टक्केवारी	वाढीव कालावधीमध्ये पुर्ण झालेल्या कामाची टक्केवारी
१	इनटेक वेल	१००%	----
२	कनेक्टींग मेन	१००%	----
३	जॅकवेल	७०%	३०%
४	पंपहाऊस	------	१००%
५	ॲप्रोच ब्रीज	६०%	४०%

६	अॅप्रोच रोड	३०%	४०%
७	अशुद्ध पाणी उर्ध्वनलिका	----	७०%
८	जलशुद्धीकरण केंद्र	६६%	२४%
९	एमबीआर	२०%	७०%
१०	शुद्ध पाणी उर्ध्वनलिका	----	----
११	गुरूत्वनलिका अ) डीआय ब) पीव्हीसी क) किरकोळ कामे	 ५०% --- ---	 ३५% --- ---

कार्यक्षेत्रावरील परिस्थितीचा विचार करता निविदा अटी व शर्तीनुसार योजनेच्या कामाचा वेग सुस्थितीमध्ये ठेवणे कंत्राटदारास शक्य नव्हते.

ठेकेदाराकडून कामाचा वेग मंदावला जाऊ नये या कारणास्तव मा.अधीक्षक अभियंता मजीप्रा मंडळ अहमदनगर यांचे पत्र क्र. लेखा/२११४ दि. २३/१२/२०१५ पासून रू. ५०००/- प्रतिदिन प्रमाणे आणि पत्र क्र. लेखा/१२४६ दि.२३/६/२०१६ अन्वये दि. १/६/२०१६ पासून रू. १०,०००/- प्रतिदिन प्रमाणे कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करण्यात आली. रू. ३२ लक्ष एवढी रक्कम कंत्राटदाराकडून दंडापोटी अद्यापपर्यंत वसूल करण्यात आलेली आहे. कंत्राटदाराने योजनेचे ८५% काम सद्यस्थितीमध्ये पुर्ण केलेले आहे.

				माहे ऑगस्ट २०१६ अखेर योजनेचा मंजूर निधी संपुष्टात आला. माहे सप्टेंबर २०१६ मध्ये सुधारीत योजना तयार करून सुधारीत प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास सादर करण्यात आली. योजनेवरील निधी संपुष्टात आलेला असल्याने ठेकेदाराने योजनेचे काम बंद ठेवलेले आहे. ठेकेदाराचे सुमारे रू. ४३५.९६ लक्ष एवढया रक्कमेची अदायगी करणे बाकी आहे. सुधारीत योजनेस अद्याप पावेतो मंजूरी मिळालेली नसल्याने सदर रक्कम ठेकेदारास अदा करता येत नाही. उपस्थित करण्यात आलेल्या परीच्छेदांनुसार योजनेचे काम २४ महिन्यांमध्ये पुर्ण होणे आवश्यक होते. सदर ठराविक कालमर्यादेमध्ये ठेकेदार काम पुर्ण करू शकला नाही. त्यानुसार निविदा अटी शर्तीप्रमाणे १५२२ दिवसांसाठी झालेल्या विलंबाकरीता रू.१.४३ कोटी इतक्या दंडाच्या रक्कमे ऐवजी वेळापत्रक न पाळल्याबद्दल कंत्राटदाराकडून मजीप्राने ३५० दिवसांच्या विलंबाकरीता रू.२६ लक्ष इतका दंड वसूल केला. त्यामुळे रू.१.१७ कोटी इतकी कमी वसूली झाली आहे. योजनेच्या मूळ कालावधीमध्ये काम पुर्ण झाले नसल्यामुळे मा.मुख्य अभियंता मजीप्रा प्रादे.विभाग नाशिक यांचे कार्यालयाचे पत्र क्र.लेखा/६८/१३७७ दि.१५/१२/२०१५ अन्वये दि.२३/५/२०१४ ते दि. ३०/३/२०१६ पर्यंत मुदतवाढ मंजूर केलेली आहे. मा.अधीक्षक अभियंता मजीप्रा मंडळ,अहमदनगर यांनी योजनेची कार्यक्षेत्र तपासणी करून १) योजनेचे काम

				८५% पुर्ण झालेले असल्याने २) योजनेच्या कामास मूळ कालावधीमध्ये निधी वेळेवर उपलब्ध न झाल्यामुळे कंत्राटदारास कामाची गती योग्य प्रकारे राखता आली नाही. ३) योजने अंतर्गत प्रथम टप्प्याच्या कामा बरोबर दुस-या टप्प्यांच्या कामा अंतर्गत कामे हाती घेण्याची परवानगी १ वर्ष ७ महिने इतक्या उशीरा मिळाल्याने त्याचाही कामावर परिणाम झाला. ४) केलेल्या दंडात्मक कार्यवाहीमुळे ठेकेदाराने कामाची गती वाढवली आणि दि. २७/४/२०१७ रोजी अकोले शहरांपर्यंत पाणी आणून चाचणी घेतली. या उपरोक्त कारणास्तव ठेकेदारास लावण्यात आलेला दंड दि. २३/१/२०१७ पासून मंडळ कार्यालयाचे पत्र क्र.लेखा/२१८५ दि.२७/९/२०१७ अन्वये माफ केलेला आहे. त्यांस अनुसरून रू.१.१७ कोटी इतकी दंडाची रक्कम वसूल करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. तरी उपरोक्त अनुपालन स्वीकारून परीच्छेद वगळण्यात यावा हि विनंती.
	४	**नाशिक** जिल्ह्यातील माळमाथा आणि २५ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना	ऑक्टोबर २०१२ मध्ये बहाल केलेल्या नाशिक जिल्ह्यातील माळमाथा आणि २५ गावांचे क्षेत्रीय ग्रामीण पाणी पुरवठा योजनेतील दोन उन्नत साठवण जलाशय, अतिरिक्त लांबीच्या जलवाहिन्या बसविणे आणि अतिरिक्त वितरण प्रणालीची अंमलबजावणी अशी **₹२.०१ कोटी** किंमतीची कामे मूळ निविदेत समाविष्ट केलेली नव्हती. परंतू वर उल्लेख केलेल्या कामांसाठी स्वतंत्र निविदा न काढता मुख्य अभियंता, प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी ही कामे मूळ कंत्राटदारालाच बहाल केली होती (जून २०१५) आणि पहिल्या चालू देयकापर्यंत (जुलै २०१६) कंत्राटदाराला या अतिरिक्त कामाच्या मोबदल्यात **₹१.३३ कोटी**	माळमाथा प्रादेशिक पा. पु. योजनेच्या अंदाजपत्रकांना शासन निर्णय क्र.ग्रा.पा.पु.२००९/ प्रक्र ११५/पापु ०९/ दि.२४/६/२०११ अन्वये **₹१८,४९,०८,०००/-** इतक्या ढोबळ किंमतीस प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे व मा.सदस्य सचिव मजीप्रा, मुंबई यांचे प्रपत्र नमुना क्र.४८ बाब क्र.२ दि.४/५/२०११ अन्वये **₹१६,९६,३९,७००/-** इतक्या निव्वळ किंमतीस तांत्रिक मान्यता प्राप्त झाली आहे. सदर योजनेतील १) धरणाची दुरुस्ती

			इतके प्रदान करण्यात आले होते. त्याच कंत्राटदाराला काम बहाल करणे अयोग्य होते. ग्रामपंचायतीच्या मागणीप्रमाणे अतिरिक्त कामे त्याच कंत्राटदाराला, ती जलदगतीने पूर्ण करण्याच्या हेतूने बहाल करण्यात आल्याचे कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, नाशिक यांनी उत्तरादाखल सांगितले (जून २०१७) उत्तर स्विकारण्यायोग्य नव्हते कारण कामाच्या अतिरिक्त बाबी बहाल करताना निविदेच्या प्रक्रिया पाळल्या जाणे आवश्यक होते आणि जलद गतीने कामे पूर्ण करण्याचा हेतू देखील साध्य झाला नव्हताच आणि कंत्राटदाराला डिसेंबर २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.	२) जलशुद्धीकरण केंद्र ३) शुद्ध पाणी पंपींग मशिनरी ४) कनेक्टींग मेन / गुरुत्ववाहिनी ५) जमिनीवरील जलकुंभ ६) उंच जलकुंभ ७) वितरण व्यवस्था ८) कर्मचारी निवासस्थानाची दुरुस्ती ९) किरकोळ कामे १०) योजना एक वर्ष कालावधीसाठी चालविणे या उपांगासाठी एकत्रित निविदा बोलाविण्यात आल्या होत्या. त्यामध्ये कमीत कमी दरांची श्री.आर.ए. घुले, कंत्राटदार पालघर यांची निविदा **६१.५० टक्के** जास्त दराने स्विकृत झाली. सदर कामाचे आदेश श्री. आर. ए. घुले, ठेकेदार पालघर यांना निविदा करार क्र.बी-१/१० सन २०१२-१३ अन्वये देण्यात आले. त्यानंतर ठेकेदाराने दि.१८/१०/२०१२ च्या कार्यादेशान्वये कामास सुरुवात केली. योजनेची निविदा जास्त दराने स्विकृत झाल्याने योजनेची किंमत वाढणार असल्याने १)जलशुद्धीकरण केंद्र २) कनेक्टींग मेन/ गुरुत्ववाहिनी ३) शुद्ध पाणी पंपींग मशिनरी ४) जमिनीवरील जलकुंभ ५) उंच जलकुंभ ही कामे प्रथम हाती घ्यावीत व दरम्यान योजनेची सुधारीत अंदाजपत्रके तयार करुन त्यास शासनाची मंजुरी प्राप्त झाल्यानंतर उर्वरीत कामे हाती घेण्यात यावीत असे आदेश शासनाने दि.१०/१०/२०१२ रोजी दिलेत. **निविदेतील परिमाणापेक्षा वाढलेल्या परिमाणांची (Clause ३८) कारणे खालीलप्रमाणे आहेत.** **उपांग - उंच जलकुंभ** -मुळ योजनेत अस्ताने नवीन व

				गाळणे या गावांसाठी नवीन जलकुंभ प्रस्तावित करण्यात आले नव्हते. या गावातील ग्रामस्थांनी जलकुंभाची मागणी केल्याने सुधारीत योजनेत वरील दोन्ही गावांसाठी **५०,००० लिटर** क्षमतेचे उंच जलकुंभ प्रस्तावीत करण्यात आले. जलकुंभासाठी मुळ निविदेत तरतूद नसल्याने वाढीव परिमाणांचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. **उपांग - गुरुत्ववाहिनी** १) उंच जलकुंभांच्या जागेत झालेला बदल, त्यामुळे नवीन जागेपर्यंत टाकाव्या लागणा-या गुरुत्ववाहिन्यांच्या लांबीत वाढ झाली. २) नवीन दोन जलकुंभ प्रस्तावीत केल्यामुळे त्यांना जोडणारी गुरुत्वाहिनी टाकावी लागली. त्यामुळे परिमाणांमध्ये वाढ झाली. **उपांग - वितरणव्यवस्था-** मुळ योजनेत विविध गावांमध्ये फक्त नवीन वाढ झालेल्या वस्तीत वितरण व्यवस्था प्रस्तावीत करण्यात आली होती. परंतु योजनेच्या कामांना सुरुवात करतांना प्रत्येक गावांतील ग्रामस्थांनी गावठाणातील वितरण व्यवस्था जुनी झाली असल्याने ब-याच ठिकाणी पाणी पुरवठा होत नसल्याने नवीन वितरण व्यवस्थेची मागणी केलेली होती त्यामुळे वितरण व्यवस्थेचे फेर सर्वेक्षण करण्यात आले व त्यानुसार लांबी प्रस्तावीत करण्यात आली. म्हणून परिमाणामध्ये वाढ झाली. वरील वाढीव उपांगाचा विचार करुन सुधारीत योजना तयार करण्यात आली. सुधारीत अंदाजपत्रकांना शासन निर्णय क्र. ग्रा.पा.पु.२०१३/

				प्रक्र१४५/पापु–०९, दि.२८/०१/२०१५ अन्वये **₹२७,८२,४०,०००/-** इतक्या ढोबळ किंमतीस शासनाने सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान केली. सुधारीत अंदाजपत्रकांस मा.मुख्य अभियंता मजीप्रा नाशिक यांनी प्रपत्र नमुना क्र.४८ अनु क्र.१ माहे मे २०१५ दि.१२/०५/२०१५ अन्वये **₹२६,२९,७१,८००/** निव्वळ इतक्या रकमेस तांत्रिक मान्यता प्रदान केली. सुधारीत योजनेस मंजुरी प्राप्त झाल्यानंतर कलम ३८ अंतर्गत समाविष्ट कामांची नवीन निविदा चालु दरसुचीप्रमाणे काढून, निविदा प्रसिद्ध केल्या असत्या तर वाढीव दर प्राप्त होण्याची शक्यता होती. त्यामुळे मुळ ठेकेदाराकडून कलम ३८ अंतर्गत कामे पुर्ण करुन घेण्यात आली. मुळ निविदेसाठी सन २०१०-११ ची दरसुची वापरण्यात आली आहे तसेच कलम ३८ मधील बाबींसाठी सन २०१४-१५ ची दरसुची वापरण्यात आली आहे. तसेच माळमाथा प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेचे कार्यान्वयानंतर एक वर्ष इतक्या कालावधीसाठी योजना संबंधीत मुळ ठेकेदाराने स्विकृत निविदेप्रमाणे चालवायची होती. या प्रादेशिक योजनेतील जवळजवळ ९० टक्के कामे मुळ ठेकेदाराकडून पुर्ण करुन घेण्यात आल्यामुळे सुधारीत योजनेत नव्याने मंजूर करण्यात आलेली वाढीव वितरण व्यवस्था, वाढीव गुरुत्ववाहिनी, जलकुंभ ही वाढीव कामे मुळ योजनेशी सलग्न असल्याने संपूर्ण निविदेची कामे एकाच ठेकेदाराकडून करुन घेऊन

				त्याची जबाबदारी सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने व योजनेचा ट्रायल रन हा एकाच ठेकेदाराकडून करुन घेणे सुद्धा संयुक्तीक असल्याने सुधारीत योजनेतील वाढीव कामांसाठी रु₹३१४.७८ लक्ष इतक्या किंमतीचा प्रस्ताव **कलम ३८** अंतर्गत प्रस्तावीत करुन कामांना मा.सदस्य सचिव, मुंबई यांनी दि.९/६/२०१५ रोजी मान्यता दिलेली आहे, आणि त्यास मा.मुख्य अभियंता, म.जी.प्रा. प्रादे. विभाग नाशिक यांनी पत्र क्र.लेखा/२९० दि.२९/६/२०१५ अन्वये तांत्रिक मान्यता प्रदान केली होती. ठेकेदाराची ६१.५०% जादा दराची निविदा त्यावेळी निविदा समिती मार्फत मंजूर करण्यात आलेली होती. कलम ३८ च्या प्रस्तावात स्विकृत निविदेतील परिमाणापेक्षा २५% पर्यंत वाढणा-या परिमाणासाठी स्विकृत निविदेचे दर निविदा किंमतीपेक्षा **६१.५०%** जादा दराने प्रस्तावित केलेले आहेत व कलम ३८ अंतर्गत वाढीव परिमाणांसाठी चालू दरसुची सन २०१४-१५ चे निव्वळ दर (स्विकृत निविदेप्रमाणे तत्कालिन चालू दरसूची सन २०११-१२ वर **१७.५६%** जादा दर विचारात न घेता) प्रस्तावित केलेले आहेत व सदरचे दर मान्य असल्याबाबत संबंधीत ठेकेदाराच्या प्रतिनिधींनी कलम ३८ च्या प्रस्तावावर स्वाक्षरी केलेली आहे. त्यामुळे चालू दरसुची पेक्षा जादा दर ठेकेदारास देण्यात आला नसल्याने **रु ₹३५,२१,९७२/-** एवढी रक्कम म.जी.प्रा.ची बचत होणार असल्याने शासनाचे आर्थिक नुकसान झालेले नाही.

				सद्यस्थितीत योजनेतील सर्व कामे पुर्ण झालेली असून योजनेत समाविष्ट गावांना दिनांक १५/१/२०१६ पासून पाणी पुरवठा सुरु करण्यात आलेला आहे. मुळ निविदेअंतर्गत जलशुद्धीकरण केंद्राचे पायाचे खोदकाम जमिनीखाली ४.५० ते ५.५० मी. करावे लागले तसेच काही गावांच्या ग्रामपंचायतींनी मुळ निविदेप्रमाणे निश्चीत केलेल्या उंच जलकुंभाच्या जागा उशिराने उपलब्ध करुन दिल्याने तसेच मुळ निविदेप्रमाणे वितरण व्यवस्था टाकून झाल्यानंतर मंजुर सुधारीत योजनेतील (शासननिर्णय दि.२८/१/२०१५)वाढीव वितरण व्यवस्था टाकणे. यासह योजनेच्या एक वर्ष Trial run पुर्ण करणे या कारणांमुळे मुळ निविदेस डिसेंबर २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. तसेच एकाच ठेकेदाराकडून मुळ निविदेअंतर्गत मुळ कामे आणि वाढीव कलम ३८ अंतर्गत कामे करुन घेण्यात आल्यामुळे कामात एकसुत्रिपणा आला व काम सुरळीत पुर्ण करुन घेण्यात आले. उपरोक्तप्रमाणे कलम ३८ मधील कामांसाठी मंजुरीच्या वेळेस सन २०१४-१५ ची दरसुचीचे निव्वळ दर विचारात घेण्यात आल्यामुळे रु ₹३५,२१,९७२/- ची बचत झाली आहे. त्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान झालेले नाही त्यामुळे सदर परिच्छेद काढण्यात यावा ही विनंती.

३.४.८.२	५	**पुणे जिल्ह्यातील हिंजवडी गाव क्षेत्रीय ग्रामीण पाणी पुरवठा योजना**	पुण्यातील हिंजवडी गावासाठीच्या पेयजल पुरवठा योजनेकरिता पाणी पुरवठा व स्वच्छता विभागांनी ₹१७.८६ कोटीची प्रशासकीय मान्यता दिली होती (सप्टेंबर २०१४) कंत्राटदाराला ₹१०.२० कोटी इतक्या किंमतीला काम दिले गेले होते (मार्च २०१५) व काम पूर्ण करण्यासठी ३६ महिन्याचा कालावधी होता. योजनेसाठी लागणारे पाणी हिंजवडी गावापासून १० कि.मी. अंतरावरील कासारसाई मध्यम पाटबंधारे प्रकल्पातून घेण्याचे ठरविले होते. ज्यासाठी जलसंपदा विभागाने जल आरक्षण मंजूर केले होते (ऑक्टोबर २०१३) कंत्राटदाराने जॅकवेल व जॅकवेल पर्यन्तचा पोहोच पूल यासाठी खोदकामास प्रारंभ केला ज्यासाठी ₹३२.०४ लाखाचे प्रदान ऑक्टोबर २०१५ मध्ये करण्यात आले होते. परंतु कासारसाई मध्यम पाटबंधारे प्रकल्पातून पाणी काढण्यास ग्रामस्थांनी विरोध केल्यामुळे पुढील काम होऊ शकले नव्हते. जरी ही योजना शासनाने मंजूर केली होती तरीही त्याबाबतच्या मुद्दयांवर तोडगा काढण्यांत त्यांना आलेल्या अपयशामुळे योजनेवर मार्च २०१७ पर्यन्त झालेला खर्च ₹३७.४१ लाख निष्फळ ठरला होता.	हिंजवडी पाणी पुरवठा योजना राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत प्रस्तावित (NRDWP) हिंजवडी ग्रामीण पाणी पुरवठा ता.मुळशी योजनेस शासन निर्णय, पाणी पुरवठा योजना व विभाग क्र.पापुयो-२०१४/ प्र.क्र.७१ /पापु./दिनांक १०.०९.२०१४ अन्वये ₹१७८६.५४ लक्ष रक्कमेस प्रशासकीय मान्यता मिळाली. तसेच शासन निर्णय दिनांक २२.१०.२०१३ अन्वये पाणी उचल परवानगी प्राप्त झालेली होती. सदरचे काम मे.जे.एन.सिंग, कोल्हापूर यांना दिनांक २३.३.२०१५ च्या आदेशान्वये कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे. सदर कामाचे कार्यादेश दिल्यानंतर उदभवाचे (जॅकवेलचे) कामाची खोदाई सुरु असताना लगतच्या ग्रामपंचायत कुसगांव (प.मा.), पाचरणे, चांदखेड, दारुंब्रे, सांगवडे ही सर्व मावळ तालुक्यातील व नेरे, कासारसाई ही दोन मुळशी तालुक्यातील गावांनी दिनांक १६.६.२०१५ रोजी श्री. व्ही. व्ही. नवले, माजी खासदार यांच्या मार्गदर्शनाखाली कासारसाई धरणांतून पाणी उचलण्यासाठी प्रखर विरोध केला व तसे लेखी कळविले. याबाबत दिनांक १७.६.२०१५ रोजी ग्रामपंचायत हिंजवडी मार्फत पोलीसठाणे मावळ येथे तक्रार देखील नोंदविण्यात आली. मजीप्रा अधिकारी व ग्रामपंचायत हिंजवडी यांनी दिनांक १७.६.२०१५ रोजी मा.विभागीय आयुक्त यांचे कार्यालयात भेट घेऊन याबाबत परिस्थिती समजावून सांगितल्यावर मा.जिल्हाधिकारी यांना अहवाल सादर करणेबाबत सूचना केल्या. त्यानुसार जिल्हाधिकारी यांना अहवाल सादर करण्यात आला. दिनांक २७.६.२०१५ च्या

				मा.जिल्हाधिकारी यांनी घेतलेल्या बैठकीमध्ये विरोध करणाऱ्या गावांकरिता लागणाऱ्या पाण्याचा आढावा सादर करणेच्या सूचना पाटबंधारे खात्यास देण्यात आल्या. दिनांक ४.७.२०१५ रोजी पाटबंधारे खात्याने अहवाल सादर करताना कासारसाई धरणातून हिंजवडी पा. पु. योजनेस पाणी घेण्याबाबत हरकत नसलेबाबत व विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांच्या हितास बाधा येत नसल्याबाबत सविस्तर पाणी उपलब्धतेचा अहवाल सादर करणेत आला. पाटबंधारे खात्याच्या या अहवालावर आक्षेपार्ह विधाने करुन पाणी पुरवठा योजनेचे काम सुरु करण्यांस श्री.नवले यांनी विरोध कायम ठेवला व पर्यायी उदभव घेणेबाबत सूचना दिल्या. वास्तविकरित्या मजीप्राच्या या योजनेची आखणी करताना जवळचा आणि शाश्वत उदभव व दरडोई खर्चाचा निकष, या बाबी लक्षात घेऊन कासारसाई धरण हा उदभव योग्य असल्यामुळे मजीप्रास पाटबंधारे खात्याने पाणी उचल परवानगी दिलेली आहे. असे असतानादेखील फक्त आजूबाजूच्या ग्रामस्थांच्या विरोधामुळे व हिंजवडी गावाची पाणीटंचाई लक्षात घेता ही योजना राबविणे आवश्यक असल्याने मजीप्राने पर्यायी उदभवाबाबत पाटबंधारे खात्याकडे विचारणा केली परंतु ९.१२.२०१५ च्या पत्रान्वये पवना नदीतून पाणी उपलब्ध नसलेबाबत पाटबंधारे खात्याकडून कळविणेत आले. (परि.३) तसेच दिनांक २१.१०.२०१६ रोजी मूळा नदीतून पाणी पुरवठा योजनेतून पाणी उपलब्ध नसलेबाबत ग्रामपंचायतीमार्फत कळविणेत आले. (परि.४)

				मा.जिल्हाधिकारी पुणे यांनी निर्देशित केल्याप्रमाणे मा.पालकमंत्री यांना या प्रकरणात लक्ष घालून काम सुरु करणेबाबत बैठक बोलविण्याकरिता दिनांक १९.११.२०१५ रोजी विनंती केली. तसेच याबाबतीत दिनांक २३.१२.२०१५ रोजी पोलीस संरक्षणामध्ये काम सुरु करणेबाबत मा.जिल्हाधिकारी यांना विनंती केली. दिनांक २८.१२.२०१५ च्या जिल्हा नियोजन विकास समितीच्या बैठकीमध्ये माजी उपमुख्यमंत्री यांनीदेखील हा विषय उपस्थित केला. परंतु याबाबत काहीही निर्णय होऊ शकला नाही. सदरील योजना ही मागणी आधारित तत्वावर आखण्यात आलेली आहे. तसा ग्रामपंचायतीने ठराव देखील दिलेला आहे. (परि.५) प्रचलित निविदेतील अटी व शर्तीनुसार कंत्राटदारास झालेल्या कामाचे देयक अदा करणे क्रमप्राप्त होते त्यानुसार ₹ ३७.४१ लक्ष देयक कंत्राटदारास अदा करणेत आले. सदरील देयक काम बंद करणेपूर्वी अदा करणेत आलेले आहे. भविष्यात वरिष्ठ पातळीवरुन व प्रशासकीय पातळीवरुन हाच उदभव घेऊन काम सुरु करण्यासाठीची शक्यता आहे. हिंजवडी गावातील पाणीटंचाईची परिस्थिती लक्षात घेऊन अदयापही काम करणेस मजीप्रा प्रयत्नशील आहे. त्याकरिता सदरील केलेला खर्च भविष्यात उपयोगी येणार असल्याने खर्च निष्फळ ठरत नाही.

३.४.८.३ अकार्यशील योजना

व्यक्तिगत योजना (नळ पाणी योजना आणि हातपंप/कूपनलिका / विधण विहीर योजना) ह्या जिल्हा परिषद कार्यान्वीत करतात तर क्षेत्रीय ग्रामीण पाणी पुरवठा योजन हया महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यान्वीत करते. योजनांच्या पुर्णत्वासाठी भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांनी भरीव गुंतवणुक केली असल्यामुळे योजन अकार्यशील झाल्यास केवळ लोक-साधनसंपत्ती वाया जात नाही तर लाभार्थीही त्यांना मिळणाऱ्या लाभापासून वंचित राहतात.

चाचणी परिक्षा केलेल्या दहा जिल्हयांमध्ये जिल्हा परिषदांनी कार्यान्वीत केलेल्या व अकार्यशील असलेल्या योजना तक्ता ३.४.८ मध्ये दिल्या आहेत.

तक्ता ३.४.८ : ३१ मार्च २०१७ रोजी चाचणी परिक्षा केलेल्या जिल्हयातील अकार्यशील योजना

जिल्हयांचे नाव	योजनांची एकूण संख्या	अकार्यशील योजनांची एकूण संख्या
औरंगाबाद	५९७३	१४३२
नाशिक	१२०५६	३९१
बीड	११९८६	२४११
अहमदनगर	११२७१	२४३१
बुलढाणा	१३०८	२६
नागपूर	१४७५	३
रायगड	४६५८	१४
सांगली	७२१४	३८४
पुणे	२७०३	४९
ठाणे	२५३०	४
एकूण्	६११७४	७१४५

स्रोत : चाचणी परिक्षा केलेल्या जिल्हयांमध्ये परिषदांनी उपलब्ध केलेली माहिती

सदर योजनांचा वर्गवारीनिहाय तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	तपशिल	एकूण योजना	बंद असलेल्या योजना
१	भूपृष्ठावरील स्रोतावर आधारीत नळ पाणी पुरवठा योजना	७१६	१२
२	भूपृष्ठाखालील स्रोतावर आधारीत नळ पाणी पुरवठा योजना	१४३५१	२९५
३	विंधणविहीरी	१००००	२२०८
४	हातपंप	३२७३६	४६१८
५	इतर	३३७१	१२
६	एकूण	६११७४	७१४५

उपरोक्त योजनांच्या वर्गवारीचे अवलोकन केले असता, सदर योजनांमध्ये ९५% (६८२६) योजना हया विंधण विहिरी व हातपंप या वर्गवारीतील असून उन्हाळयामध्ये भूजलाची पातळी कमी होत असल्याने या तात्पुरत्या स्वरूपात बंद असतात. तसेच इतर योजना आर्युमान संपल्याने, देखभाल दुरुस्तीचा अभाव, थकीत विजदेयक इ. कारणांमुळे बंद असल्याचे निदर्शनास येत आहे.

	तक्ता ३.४.८ वरून असे दिसून येते की • चाचणी परिक्षा केलेल्या दहा जिल्हयांमध्ये, एकूण ६१,१७४ योजनांपैकी ७,१४५ योजना ह्या ३१ मार्च २०१७ रोजी अकार्यशिल होत्या ज्यात ७०९ वस्त्यांना व्यापित करणाऱ्या ३०७ नळ पाणी पुरवठा योजना होत्या ज्या अकार्यशील होत्या. • अहमदनगर व बीड या दोन जिहयात जास्तीत जास्त योजना म्हणजेच ७,१४१ पैकी ४,८४२ योजना (६८ टक्के) हया अकार्यशील होत्या, आणि • कार्यान्वयीत केल्यानंतर पाच वर्षात १,४२२ योजना अकार्यशिल झाल्या होत्या. वीज-आकाराचे प्रदान न करणे, कोरडे पडणारे स्रोत, प्रलंबित दुरस्त्या, ग्रामपंचायतीकडून मागणी न येणे ही योजनांच्या अकार्यशिलतेची प्रमुख कारणे होती. अकार्यशिल योजनांवर झालेला प्रत्यक्ष खर्च सहजगत्या उपलब्ध नव्हता. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पुर्ण केलेल्या परंतु जिल्हा परिषदांना हस्तांतरीत न केलेल्या १३२ प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या बाबतीत ९२ क्षेत्रीय ग्रामीण पाणी पुरवठा योजना हया मार्च २०१७ रोजी अकार्यशील होत्या, ज्यांच्यावर रु. ४४३.८५ कोटी ४७ खर्च करण्यात आले होते. विदयुत देयकांचे प्रदान न करणे, स्रोत कोरडे पडणे, प्रलंबित दूरूस्त्या, जिल्हा परिषदांना योजना हाती न घेण, ग्राम पंचायती कडून मागणी प्राप्त न होणे ही योजना अकार्यरत राहण्याची मुख्य कारणे होती. त्यामुळे योजनेवरील खर्च निष्फळ ठरला. लेखापरिक्षणास, असेही आढळून आले की, कार्यान्वयन व देखभाल यांच्यासाठी उत्पन्न केलेला निधी स्वयंपूर्ण नव्हता ज्यामुळे योजना काही कालावधीतच अकार्यशील होण्याची जोखीम वाढत होती. २०१२-१७ या कालावधीत दोन जिल्हयांमध्ये (बुलढाणा आणि रायगड) जमा निधी फक्त रु. ९.०४ कोटी असताना केलेला खर्च रु ३८.९५ कोटी होता.	

परिच्छेद क्र.	आक्षेप	अनुपालन
३.४.९	**कार्यक्रमाचे संनियंत्रण आणि मूल्यमापन**	
	खालील गोष्टीमुळे कार्यक्रमाचे संनियंत्रणात कमतरता होती.	
	पाणी पुरवठा प्रकल्पांचे संनियंत्रण आणि व्यवस्थापन करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या राज्य जल आणि स्वच्छता अभियानांची एकही बैठक 2012-17 दरम्यान घेतली गेली नव्हती.	पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या शासन निर्णय क्र. ग्रापापु-1004/प्र. क्र. 45/पापु-07, दि. 02-04-2004 च्या शासन निर्णयान्वये राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनची राज्य शिखर समितीची बैठक दर सहा महिन्यांनी व आवश्यकतेनुसार घेण्यात यावी असे नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार सदर समितीची बैठक दि. 05 - 03 - 2014 रोजी प्रस्तावित करण्यात आली होती. तथापि, काही अपरिहार्य कारणामुळे सदर बैठक पुढे ढकलण्यात आली असल्याचे मा.मुख्य सचिव कार्यालयातून कळविण्यात आले. तसेच, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनमध्ये कृषी व जलसंपदा विभागाच्या सचिवांचा अंतर्भाव करण्यात आला नसल्यामुळे त्यांचा समावेश करण्यासाठी शासन निर्णय क्र.ग्रापाधो-2018/प्र.क्र.184 दिनांक 01/01/2019 अन्वये या सचिवांचा समावेश करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने यापुढे राज्य पाणी व स्वच्छता मिशनच्या बैठका यापुढे नियमितपणे घेण्यात येतील.

परिच्छेद	आक्षेप	अभिप्राय
३.४.९	"एनआरडीडब्ल्यूपी च्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्याच्या ग्रामीण वस्त्यांमध्ये पुरेशा प्रमाणात पिण्यायोग्य पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यासाठीच्या विद्यमान पाणीपुरवठा योजनांची कार्यशीलता निष्पा न यांचा आढाचा घेणे स्रोत शोधक समितीला बंधनकारक होते. लेखापरिक्षणास असे निदर्शनास आले की, राज्यात स्रोत शोधक समितीची रचनाच केली गेली नव्हती."	राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये स्रोत शोधक समितीची (source finding committee) कार्यकक्षा पुढीलप्रमाणे नमूद करण्यात आली आहे- "The Committee should invariably review the functioning/performance of existing water supply schemes for availability of potable drinking water in adequate quantity in the rural habitations of the State/UT." आर्थिक वर्ष सन २००९-१० पासून केंद्र शासनाने वर्धित वेग ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाचे रुपांतर "राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम" असे केले आहे. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार या विभागाच्या दिनांक १७ मार्च, २०१० च्या शासन निर्णयान्वये ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी सुधारित मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयातील धोरणातील तत्व व प्राधान्यक्रम याबाबत पुढीलप्रमाणे सूचना देण्यात आल्या आहेत- (१) गावात अस्तित्वात असलेल्या सर्व पिण्याच्या पाण्याच्या उपाययोजनांचा आढावा घेऊन त्यातील स्रोतांचे संवर्धन व बळकटीकरणे करणे, अस्तित्वात असलेल्या योजनांमध्ये सुधारणा करणे. (२) गुणवत्ताबाधीत गावांमध्येय सुरक्षित स्रोत विकसित करण्याकरिता उपाययोजना घेणे. (३) एका गावातील वाडया/वस्त्यांसाठी एकच योजना करण्यापेक्षा विकेंद्रीत उपाययोजना किफायतशीर असल्यास त्याला प्राधान्य देणे. योजना आखताना सर्व भूजल व भूपृष्ठावरील सार्वजनिक व खाजगी स्रोतांचा अभ्यास करुन नियोजन करणे. (४) ग्रामीण पाणी पुरवठा योजना राबविताना **"गाव कृती आराखडा** तयार करणे बंधनकारक राहील. या अंतर्गत लोकसहभागातून गावातील सर्व स्रोतांचा सर्वकष विचार करुन पाण्याचा ताळेबंद तयार करणे. उपरोक्त सूचनांच्या अनुषंगाने ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमांतर्गत प्राधान्य देण्यात येते तथा योजनेच्या आखणीदरम्यान स्रोत शोधक समितीच्या कार्यकक्षेबाबत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या मार्गदर्शक तत्वात नमूद केलेली बाब विचारात घेण्यात येते. त्यामुळे स्रोत शोधक समितीची स्थापना करण्याची प्रकर्षाने आवश्यकता भासली नाही

परिच्छेद	आक्षेप	अनुपालन
३.४.९	जिल्ह्यांतील योजनांच्या भौतिक आणि आर्थिक प्रगतीचे संनियंत्रण करण्यासाठी, प्रकल्प गावांचे स्थलमूल्यन करण्यासाठी भारत सरकारने संनियंत्रण आणि मूल्यमापन सल्लागार यांचे एक पद मंजूर केले होते. तरी २०१४-१७ दरम्यान संनियंत्रण आणि मूल्यमापन सल्लागाराची स्थानापन्नता करण्यात आली नव्हती.	पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र.ग्रापाधो-१११०/प्र.क्र.१७८/पापु-०७, दि.१/०३/२०१२ नुसार राज्य स्तरावरील पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेमध्ये निर्मित संनियंत्रण आणि मूल्यमापन सल्लागार हे पद कंत्राटी पध्दतीने भरण्यात आले असून दि.३०/११/२०१७ पासून कार्यरत आहे..
	एनआरडीडब्लूपीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार दक्षता आणि संनियंत्रण समितीची स्थापना करणे आवश्यक होते. लेखापरिक्षणांच्या निदर्शनास आले की, राज्यस्तरावर दक्षता आणि संनियंत्रण समिती स्थापित झाली नव्हती, तर चाचणी परिक्षा केलेल्या दहा पैकी सात जिल्हयात जिल्हा दक्षता आणि संनियंत्रण समिती २०१२-१७ दरम्यान ३३ ग्रामपंचायतींमध्ये स्थापित झाली नव्हती.	केंद्रपूरस्कृत योजनांसाठी राज्यातील ग्राम विकास विभागामार्फत दक्षता आणि संनियंत्रण समिती गठित करण्यात आली आहे. ज्या जिल्हयांमध्ये अशा समित्या स्थापन झालेल्या नाहीत त्यांना तात्काळ सूचना देण्यात येत आहेत.
	एनआरडीडब्लूपीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्य व जिल्हा स्तरावर गाऱ्हाणे निवारण संगणकीय प्रणाली स्थापित करणे आवश्यक होते. परंतु लेखापरिक्षणास असे निदर्शनास आले की राज्यस्तरावर स्थापना झालेली गाऱ्हाणे निवारण प्रणाली अकार्यशील होती.	जलस्वराज टप्पा-२ अंतर्गत तक्रार निवारण प्रणाली विकसीत करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
	एनआरडीडब्लूपीच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाचे संनियंत्रण व मूल्यमापन यांचा अभ्यास/ आढावा नावाजलेल्या संघटना/ संस्था यांच्याकडून वेळोवेळी करून घेणे आवश्यक होते. लेखा परिक्षणाच्या निदर्शनास आले की विभागाने असा संनियंत्रण व मूल्यमापन अभ्यास/ आढावा २०१२-१७ दरम्यान केला नव्हता.	२०१५ मध्ये TISS (Tata Institute of Social Sciences) यांनी राज्यातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे मुल्यमापन केले आहे.

३.४.१०	निष्कर्ष	अभिप्राय
	१२ व्या योजना कालावधी दरम्यान राज्यांनी पाणी पुरवठा योजनांच्या नियोजनासाठी राज्यातील विशिष्ट क्षेत्र धोरण आखले नसल्यामुळे राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम हा महाराष्ट्रात नियोजन आणि अंमलबजावणी मध्ये कमकुवत होता. ग्रामीण आणि जिल्हा जल सुरक्षा आराखडा आणि पंचावार्षिक सर्वसमावेशक सुरक्षा कृती आराखडा बनविण्यात आला नव्हता.	राज्यामध्ये सन २००९-१० पासून राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार सदर कार्यक्रमांतर्गत जिल्हा जल सुरक्षा आराखडा आणि पंचवार्षिक सर्वसमावेशक सुरक्षा कृती आराखडा करणे अपेक्षित आहे. तथापि सदर कार्यक्रमाची व्याप्ती विचारात घेऊन केंद्र शासनाने निवडक तालुक्यांमध्ये पथ्दर्शी प्रकल्प राबविण्याचे निश्चित केले. यानुसार राज्यातील अमरावती जिल्हयामधील मोर्शी तालुका निवड करण्यात आला होता. यानसुार भू. स. वि. यंत्रणेमार्फत मोर्शी तालुक्यातील डोमक गावाचा जलसुरक्षितता आराखडा तयार करून केंद्र शासनास सादर करण्यात आला होता. त्यास केंद्र शासनाने मान्यता दिल्यानंतर त्याच धर्तीवर अमरावती जिल्हयातील वरुड तालुक्यातील ९६ गावांचा जलसुरक्षा आराखडा केंद्र शासनास सादर करण्यात आलेला होता. याचप्रमाणे राज्यातील सर्व ३४ जिल्हयातील प्रत्येकी एका गावाचा जलसुरक्षा आराखडा तयार करण्यात आलेला आहे. सदर आराखडयाची अंमलबजावणी करण्यासाठी सर्व विभागांचा समन्वय, निधी आणि मनुष्यबळ या गोष्टी विचारात घेता जलसुरक्षा आराखडयाबाबत टप्पा टप्याने कार्यवाही करण्यात येत आहे. केंद्र शासनाने दिनांक २९ जुन, २०१५ च्या पत्रान्वये केवळ फ्लोराईडबाधित व संसद आदर्श ग्राम योजनेतील गावे/ वाडयांसाठी नविन योजना हाती घेण्यास अनुमती दिलेली होती. यामुळे सन २०१५-१६ या वर्षामध्ये प्रगतीनथावरील योजनांची संख्या विचारात घेऊन नवीन योजना कृती आराखड्यात घेण्यात आलेल्या नाहीत. तथापि सन २०१६-१७ या वर्षाच्या कृती आराखडयामध्ये नवीन योजनांचा समावेश करण्यात आला होता. तसेच, सन २०१७-

		१८ च्या कृती आराखडयामध्ये फ्लोराईडबाधित व संसद आदर्श ग्राम योजनेतील गावे/ वाडया या २ वर्गवारीसह हागणदारीमुक्त असलेल्या गावे वाडयांसाठी देखील नवीन योजना घेण्यास केंद्र शासनाने सुचित केले होते. यानुसार अशा गावांची पेयजल स्थिती व गावाची मागणी विचारात घेऊन या वर्गवारीतील गावांचा वार्षिक कृती आराखडयामध्ये समावेश करण्यात आलेला आहे. यानुसार केंद्र शासनाच्या वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या सूचना विचारात घेऊन राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत प्रत्येक वर्षाचा कृती आराखडा तयार करून त्यानुसार अंमलबजावणी करण्यात आली आहे.
	कार्यक्रमासाठी राज्याला ₹ ६,१४४.५१ कोटी इतका निधी प्राप्त झाला होता तर २०१२-१७ दरम्यान ₹ ५,८८०.१६ कोटी खर्च झाले होते. दुसऱ्या हप्त्याच्या वितरण मागणीच्या प्रस्ताव सादरीकरणात झालेला विलंब आणि मागील वर्षातील वितरणाच्या १० टक्क्यापेक्षा अधिक निधीची आरंभी शिल्लक असल्यामुळे केंद्र शासनाने निधी वितरणात ₹ ७१.१० कोटीची कपात केली होती. राज्य शासनाने २०१२-१७ या कालावधीमध्ये ₹ ५४७.९३ कोटीचा आपला अनुरुप हिस्सा दिला नव्हता. कंत्राटदारांकडून वैधानिक कामगार कल्याण उपकराची वसुली न करणे, कामगार भविष्यनिर्वाह निधी कंत्राटदाराने जमा न करणे ह्या गोष्टी कार्यक्रमांतर्गत दुबळया वित्तीय व्यवस्थापनाच्या द्योतक होत्या. कामे चालू असताना शासकीय मतांचा विमा उतरविण्याबाबतची सुनश्चिती कार्यान्वयीन संस्थांनी / अभिकरणांनी केली नव्हती.	**सन २०१३-१४** केंद्र शासनाच्या कार्यक्रम निधी अंतर्गत (Programme Fund) रु. ६८२. ४४ कोटी नियतव्ययापैकी केंद्र शासनाकडून रु. ६३०. ८९ कोटी राज्य शासनास वितरित करण्यात आले. अशा प्रकारे एकंदर रु.५१. ५४ कोटी निधी कपात करण्यात आली. वासो संस्थेच्या मार्च २०१२ मधील स्थापनेनंतर मजीप्राचे लेखे जुलै २०१२ मध्ये वासो कार्यालयास हस्तांतरित करण्यात आले . त्यामुळे मजीप्रा च्या लेख्यांशी ताळमेळ जुळवून व केंद्र हिश्श्याचा सन २०१२-१३ च्या उपयोगिता प्रमाण पत्राच्या आधारावर सन २०१३-१४ चा निधी मागणी प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आला . या प्रक्रियेमुळे निधी मागणी प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यास विलंब झाला. **सन २०१४-१५** केंद्र शासनाच्या कार्यक्रम निधी अंतर्गत (Programme Fund) रु. ६८०. २५ कोटी नियतव्ययापैकी केंद्र शासनाकडून रु. ६६८. ११ कोटी राज्य शासनास वितरित करण्यात आले. अशा प्रकारे एकंदर रु. १२. १४ कोटी निधी कपात निधी मागणी प्रस्ताव सादर करण्यास झालेल्या विलंबामुळे करण्यात आली. सन २०१४-१५ चा दुसऱ्या हप्त्याचा निधी मागणी प्रस्ताव केंद्र शासनास जानेवारी २०१५ मध्ये सादर करण्यात आला. महालेखाकार

कार्यालयाने सन २००८-०९ व सन २००९-१० च्या लेखा परीक्षणादरम्यान उपस्थित केलेल्या शे-यांचा पूर्तता अहवाल प्रलंबित असल्याने केंद्र शासनाकडून निधी प्राप्त करून घेण्यास विलंब झाला याबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा करून मार्च २०१५ मध्ये दुसऱ्या हप्त्याचा निधी प्राप्त करून घेण्यात आला.

अशा प्रकारे केंद्र शासनाकडून उपरोल्लिखित कारणांमुळे एकूण रु. ६३. ६८ कोटी (रु. ५१. ५४ कोटी + रु. १२. १४ कोटी) निधी कपात करण्यात आली.

तसेच उपरोक्त कारणांमुळेच केंद्र हिस्याचा दुसऱ्या हप्त्याचा निधी आर्थिक वर्षाच्या शेवटी मार्च महिन्यात प्राप्त झाल्याने तो अखर्चित राहिला.

११ व्या पंचवार्षिक योजनेनुसार, मार्च २०१२ अखेरपर्यंत सर्व वस्त्यांना जरी दरडोई दरदिवशी ४० लिटर पाणी उपलब्ध करुन द्यावयाचे होते तरी देखील राज्यातील १२,८१५ वस्त्यांना (१३ टक्के) दरडोई दरदिवशी ४० लिटर पेक्षा कमी पाणी उपलब्ध करुन दिले गेले होते. ग्रामीण वस्त्यांपैकी ५० टक्के वस्त्यांना १२ व्या योजने अखेर नळ पाणी पुरवठा करावयाचा होता तरी प्रत्यक्षात औरंगाबाद, गडचिरोली, नंदूरबार, पालघर, सोलापूर, यवतमाळ जिल्हयांमध्ये ५० टक्क्यांपेक्षा कमी वस्त्यांना नळ पाणी पुरवठा करण्यात आला होता. लेखापरिक्षणातील विश्लेषणात असे आढळून आले की घरगुती जोडणीसह नळ पाणी पुरवठा ३५ टक्के ग्रामीण वस्त्यांना करण्याच्या ध्येयासमोर १९ जिल्हयांमध्ये ग्रामीण वस्त्यांना घरगुती जोडणीसह नळ पाणी पुरवठा करण्यात आल्याची टक्केवारी ३५ टक्क्यापेक्षा कमी होती, जी आठ टक्के (गडचिरोली) ते ३४ टक्के (वर्धा) या दरम्यान होती. निवड केलेल्यापैकी पाच जिल्हयामध्ये ही टक्केवारी ११ टक्के (अहमदनगर) ते ३३ टक्के (रायगड) या दरम्यान होती. १२ व्या पंचावार्षिक योजना कालावधित राज्यातील दुषित पाण्याने बाधित वस्त्यांना हाताळण्यासारखे गंभीर मुद्दे साध्य

ग्रा.पा.पु., जि.प., अहमदनगर :- **अहमदनगर** जिल्हा परिषदेमध्ये राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत सन २०१२-१३ ते २०१६-१७ अखेर केंद्र सरकार व रारज्य सरकार यांचेकडून अनुक्रमे १४९६८.३७ लक्ष अनुदान प्राप्त असून खर्च रु.१४९२४.६९ लक्ष एवढा झालेला आहे.

पुणे जिल्हा:- पुणे जिल्ह्यातील अहवाल वर्षातील १२७ गांवे व वाडयाची ५०% कमी लोकसंख्या पुरेसे आणि सुरक्षित पिण्याचे पाणी पुरवठा सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र	लेखाशिर्ष	गावे वाड्यांची संख्या		
		पुर्ण	प्रस्तावित	एकूण
१	जलयुक्त शिवार	५	०	५
२	राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम	२७	६८	९५
३	जलस्वराज्य टप्पा २	५	२	७
४	पुणे महानगर पालिका हद्दी मध्ये समाविष्ठ	३	०	३
५	जिप / ग्रा प निधी	५	०	५
६	मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम	०	२	२
७	टंचाई अंतर्गत	१०	०	१०
	एकूण	५५	७२	१२७

	झाले नाहीत कारण ६.५६ लाख लोकसंख्या असलेल्या ३०४ वस्त्या दुषीत पाण्याने बाधित राहिल्या. दुषित पाण्याने बाधित वस्त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी निती आयोगाने दिलेला ₹१.७२ कोटींचा विशेष निधी विनावापर पडून होता. निधीची कमतरता, न्यायिक विवाद, कोरडे पडणारे पाण्याचे स्त्रोत आणि जमिनीची अनुपलब्धता इ.मुळे १७७ योजनांची पूर्तता होण्यासाठी पाच वर्षापेक्षा जास्त विलंब झाला होता. कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार कार्यक्रमाच संनियंत्रण व मुल्यमापन कमकुवत होते.	**ग्रापापु- सांगली:-** सांगली जिल्ह्यात पिण्याचे पाणी उपलब्ध होत नसल्यास वाडयांना राष्ट्रीय पेयजल कार्यक्रम अंतर्गत आराखडयात ४० लिटर पेक्षा कमी पाणी उपलब्ध होत असलेल्या ८९१गोव/वाड्या वस्त्यांचा समावेश करुन व १ गाव पाणी गुणवत्ता बाधीत असुन अशी एकूण ८९२ इतक्या वाड्या /वस्त्यांना पिण्याचे पाणी पुरविणेचे कामे हाती घेवुन विविध उपायायोजना द्वारे पाणी पुरवठा करणेची व्यवस्था करणेत आली आहे व त्यापैकी ६३८ वाडया / वस्त्यांना योजना कार्यन्वीत करुन पाणी पुरवठा सुरु केला गेला आहे. तसेच ज्या गांवाना वाड्या/वस्त्यांना ४० लिटर प्रमाणे पाणी पुरवठा होतो अशा गांवाना ५५ लिटर प्रमाणे गावांच्या मागणी नुसार योजना घेण्यात आलेली आहे.
	चाचणी परीक्षा केलेल्या जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात म्हणजेच ७,१४१ योजना ज्या जिल्हा परिषदांनी कार्यान्वयीत केल्या होत्या त्या अकार्यशील ठरल्या होत्या, तर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने कार्यान्वयीत केलेल्या राज्यातील ९२ प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजना अकार्यशील झाल्या होत्या. यापैकी ८९ योजनांवर ₹ ४४३.८२ कोटी खर्च करण्यात आले होते. विद्युत देयकांचे प्रदान न करणे, स्त्रोत कोरडे पडणे, प्रलंबीत दुरुस्त्या, जिल्हा परिषदांना योजना हाती न घेणे, ग्राम पंचायती कडून मागणी प्राप्त न होणे ही योजना अकार्यरत राहण्याची मुख्य कारणे होती, ज्यामुळे योजनेवरील खर्च निष्फळ ठरला. अशाप्रकारे, मोठ्या प्रमाणावर खर्च करुन देखील पिण्याचे पाणी, नळाद्वारे पाणी, दुषित पाण्यासंदर्भातील मुद्दे इ. साठी ठरविलेली उद्दिष्टे साध्य झाली नव्हती व म्हणूनच अधिक प्रभावी उपाययोजनांची गरज वाटते.	योजनांमध्ये ९५% (६८२६) योजना हया विंधण विहिरी व हातपंप या वर्गवारीतील असून उन्हाळयामध्ये भूजलाची पातळी कमी होत असल्याने या तात्पुरत्या स्वरूपात बंद असतात. तसेच इतर योजना आर्युमान संपल्याने, देखभाल दुरुस्तीचा अभाव, थकीत विजदेयक इ. कारणांमुळे बंद असल्याचे निदर्शनास येत आहे.

परिच्छेद क्र.	परिच्छेद	अनुपालन
३.१३	**अपूर्ण पाणी पुरवठा योजनेवर निधीची अडवणूक.** कोंकण क्षेत्रातील तिल्लारी धरणावर आधारलेल्या पाणीपुरवठा योजनेसाठी खाजगी कंपनीसोबत करण्यात आलेल्या चुकीच्या सामंजस्य करारामुळे आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला, महाराष्ट्र शासनाने निधी वितरीत न केल्यामुळे योजनेवर ₹५२.९५ कोटी इतक्या निधीची अडवणूक झाली व ₹११.६६ कोटीचे दायित्व झाले, त्याचप्रमाणे नियोजित लाभार्थी उद्देशित लाभांपासून वंचित राहीले.	दिनांक १ जून २०११ रोजीच्या शासन निर्णयानुसार मे. श्री. उत्तम स्टील ॲन्ड पॉवर लिमिटेड (SUSPL) हे त्यांच्या सहभागाचा निधी सुमारे २ वर्ष पाठपुरावा केल्यानंतरही जमा करण्यास असमर्थ ठरल्याने, योजनेच्या एकूण ११२.२०४ द.ल.लि. प्रतिदिन पाणी मागणीपैकी मे. श्री उत्तम स्टील ॲन्ड पॉवर लिमिटेड (SUSPL) यांची ८८.४२१ द.ल.लि. प्रतिदिन पाणी मागणी वगळून उर्वरित इतर लाभार्थीसाठी योजना राबविण्याच्या दृष्टीकोनातून विविध पर्यायांची चाचपणी करण्यात आली. त्या अनुषंगाने शासनाकडे सादरीकरण करण्यात आले. योजनेची आतापर्यंतची झालेली कामे उपयोगात आणण्याचे प्रस्तावित करून फेर वित्तीय आकृतिबंधाचा प्रस्ताव शासनास दिनांक १८ मार्च २०१८ रोजी सादर करण्यात आला. सदर प्रस्तावानुसार योजनेची किंमत (योजनेवर मार्च २०१८ पूर्वी झालेला ₹ ५२.९८ कोटी व उर्वरित योजना पूर्ण करण्याकरीता आवश्यक ₹ १५९.४० कोटी अशी) एकूण ₹ २१२.३८ कोटी इतकी येत आहे. तत्पूर्वी मा. मंत्री, वित्त व नियोजन यांनी सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पिय भाषणात सदर योजनेसाठी शासन ₹१००.०० कोटी एवढा निधी उपलब्ध करुन देईल अशी घोषणा केली होती. स २०१७-१८ च्या पुरवणी मागणीद्वारे ₹२०.०० कोटीची तरतू विधानमंडळाच्या सन २०१७ च्या पावसाळी अधिवेशनात मंजूर करुन घेण्यात आली होती. त्यानुषंगाने योजना कार्यान्वित करण्यासाठी स्वतंत्र अनुपालन लेखाशीर्ष उघडण्यास शासन मान्यता देत असल्याबाबत पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचा दिनांक ०५/०९/२०१७ रोजीचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला.
	महाराष्ट्र शासनाने सावंतवाडी, वेंगुर्ले, मालवण आणि समुद्रकिनाऱ्यावरील इतर गावांना पेयजल पुरवठ्यासाठी कोकण विकास पॅकेज २००९ अंतर्गत, तिल्लारी धरण हे पाण्याचा स्त्रोत धरुन पाणी पुरवठा योजनेला तत्वत: मान्यता दिली. ही संपूर्ण पॅकेज तीन वर्षांत म्हणजे मार्च २०१२ पर्यंत कार्यान्वित करावयाचा होता. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने ही योजना, एका खाजगी कंपनी बरोबर, नामे मे. श्री उत्तम स्टील अँण्ड पॉवर लिमिटेड कार्यान्वित करण्याचे ठरविले होते. (सप्टेंबर २०१०) एप्रिल २०११ मध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि मे. उत्तम स्टील अँण्ड पॉवर लिमिटेड यांच्यामध्ये एक सामजंस्य करार (एमओयू) करण्यात आला ज्यामध्ये प्रकल्पाचा संपूर्ण खर्च आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने आणि मे. श्री उत्तम स्टील ऑण्ड पॉवर लिमिटेड यांच्यामध्ये करावयाच्या प्रमाणशीर खर्चाच्या हिश्श्याचे प्रगणन संयुक्तपणे करणे मान्य केले गेले होते. सामंजस्य कराराच्या खंड ६ नुसार, कामाची प्रत्यक्ष प्रगती आणि अंदाजित वेळ आणि खर्चात प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याची सुनिश्चिती करण्यासाठी योजनेच्या अंमलबजावणीवर संनियंत्रण ठेवण्यासाठी गठीत केलेल्या संयुक्त समितीच्या शिफारशींच्या आधारावर, मे. श्री उत्तम स्टील अँण्ड पॉवर लिमिटेड त्यांच्या हिश्श्याची रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने मागणी केल्यावर प्रदान करणार होते.	
	सामंजस्य कराराच्या खंड ११ नुसार, जे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने आणि मे. श्री उत्तम स्टील अँण्ड पॉवर लिमिटेड ह्या दोघांच्याही उपयोगाचे होते. ते काम झाल्यावर जर मे. श्री उत्तम स्टील अँण्ड पॉवर लिमिटेडने काम मध्यावर सोडले तर, उर्वरित काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरण	

	पूर्ण करेल आणि मे. श्री. उत्तम स्टील अ‍ॅण्ड पॉवर लिमिटेड त्यांच्या कामाच्या हिश्श्याची रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला प्रदान करण्यासाठी जबाबदार असेल. परंतु मे.श्री उत्तम स्टील अँण्ड पॉवर लिमिटेड यांनी अंशदान देण्यास विलंब केल्यास/ अंशदान न दिल्यास सामंजस्य करारामध्ये दंड आकारण्याबाबत कलम समाविष्ट केले नव्हते. तद्अनुषंगाने पाणी पुरवठा आणि स्वच्छता विभागाने ₹२१६.३७ कोटीची, तिल्लारी धरणाच्या पाणी स्त्रोताच्या आधारावर १८ गावांना, वेंगुर्ला शहर तसेच त्या मार्गावरील पर्यटन केंद्रे आणि औद्योगिक आस्थापनांना पेय जल पुरवठा आणि मे. श्री उत्तम स्टील अँण्ड पॉवर लिमिटेडला कच्चे पाणी पुरवठा करण्यासाठी प्रशासकीय मान्यता (जून २०११) दिली. प्रशासकीय मान्यतेनुसार, अंदाजीत एकूण खर्च ₹२१६.३७ कोटी हा महाराष्ट्र शासन आणि मे. श्री उत्तम स्टील अँण्ड पॉवर लिमिटेड मध्ये अनुक्रमे ₹७५.१८ कोटी (३५ टक्के) आणि ₹१४१.१९ कोटी (६५ टक्के) असा विभागावयाचा होता. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने, नागरी आणि ग्रामीण योजना विभाग, कणकवली, सिंधुदुर्ग यांनी तिल्लारी पाणी पुरवठा योजना, तालुका दोडामार्ग, जिल्हा सिंधुदुर्गच्या सर्वेक्षण, आरेखन आणि बांधकाम, नमुना चाचणीसह कार्यान्वयन करण्यासाठी मे. इंडीयन ह्यूम पाईप कंपनी लिमीटेड मुंबई (कंत्राटदार) यांना ₹२१८.०६ कोटीला काम बहाल केले होते (ऑगस्ट २०१३). कार्यादेश जारी केल्याच्या दिनांकापासून तीन वर्षांमध्ये काम पूर्ण करावयाचे होते. मे. श्री उत्तम स्टील अँण्ड पॉवर लिमिटेडने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मागणीनुसार ₹१० कोटी एवढे सुरुवातीचे अंशदान जमा केले (ऑगस्ट २०१३) आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने आणखी ₹३० कोटीची मागणी केल्याच्या बदल्यात (सप्टेंबर २०१४) मे. श्री उत्तम स्टील अ‍ॅण्ड पॉवर लिमिटेडने फक्त ₹१० कोटी (जानेवारी २०१५) जमा केले होते.	तिलारी प्रकल्पावर आधारित पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करण्याकरीता योजनेवर झालेला खर्च वजा जाता येणारा उर्वरित ₹१५९.४० कोटी इतका खर्च, स्वतंत्रपणे निर्माण करण्यात आलेल्या नवीन लेखाशीर्षाखालील तरतुदीतून करण्यास शासन निर्णय क्रमांक ग्रापापु-१४१८/प्र.क्र.९४/पापु-०६ दिनांक २८ मार्च २०१८ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने लेखाशीर्ष सन २०१७-१८ या वर्षात पुरवणी मागणीद्वारे मंजूर करण्यात आलेल्या ₹२०.०० कोटी इतक्या निधीतून ₹१६.०० कोटी इतका निधी महाराष्ट्र जीवन प्राधीकारणास सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात मंजूर व मुक्त करण्यात आलेला आहे. या प्राप्त निधीतून कंत्राटदाराच्या ₹१०६२.८७ लक्ष इतक्या थकीत देयकांची अदायगी एप्रिल २०१८ अखेरीस करण्यात आली. तद्नंतर कंत्राटदारामार्फत मे २०१८ मध्ये योजनेची कामे पुन: हाती घेण्यात आली आहेत. माहे नोव्हेंबर २०१८ अखेरपर्यंत सासोली येथील पंपगृहाचे वीट बांधकाम तसेच आतील बाजूने गिलाव्याचे कामही पूर्ण करण्यात आलेले आहे. योजनेच्या यापूर्वी अंथरण्यात आलेल्या साखळी क्रमांक १३२०२.५० मी. ते १३८०२.५० मी. या ६०० मीटर लांबीच्या जलदाब चाचणीचे काम दिनांक ६/०६/२०१८ रोजी यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आलेले आहे. तसेच दाबनलिकेच्या ६५० मी. इतक्या लांबीची जलवाहिनी नव्याने अंथरण्यात आलेली आहे. योजनेवर माहे नोव्हेंबर २०१८ अखेरपर्यंत ₹६४००.८९ लक्ष इतका खर्च झालेला आहे. कंत्राटदारामार्फत मे २०१८ मध्ये योजनेची कामे पुन: हाती घेण्यात आल्यानंतर अंदाजे ₹२००.०० लक्ष इतक्या किंमतीची कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. ठेकेदाराने सादर केलेल्या बारचार्टनुसार योजनेची कामे
	संयुक्त समितीने मागणी केलेली रक्कम जमा करण्यात मे. श्री उत्तम स्टील अ‍ॅण्ड पॉवर लिमिटेडला अपयश आले आणि कामाच्या प्रगतीत अडथळा आला आणि शेवटी, ₹५२.९५ कोटी खर्चुन, दोन वर्षांनंतर १५ टक्केच काम करुन निधीच्या कमतरतेमुळे कंत्राटदाराने काम थांबविले (जुलै, २०१५).	

	म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने महाराष्ट्र शासनाला, शीर्ष कामे आणि अदत्त असलेल्या चालू देयकांचे प्रदान करण्यासाठी ₹१७.७८ कोटी एवढा निधी मुक्त करण्याची विनंती (एप्रिल २०१६) केली, पण शासनाने निधी मुक्त केला नाही. जर शीर्ष कामे पूर्ण झाली असती तर, नदीच्या पाण्याची पातळी वाढली असती आणि नदी किनाऱ्यावरील गावांकरीता योजना अंशत: कार्यान्वित करता आली असती. या योजनेवर एकूण ₹६४.६१ कोटी खर्च झाला होता, (₹५२.९५ कोटी आत्तापर्यंतचा खर्च आणि अदत्त चालू देयकांचे ₹११.६६ कोटींचे दायित्व), ज्यापैकी मे. श्री उत्तम स्टील अँण्ड पॉवर लिमिटेडने त्यांच्या ₹४१.६० कोटी आवश्यक हिश्श्यापैंकी, उपरोक्त नमूद केलेले फक्त ₹२०.०० कोटी दिले होते आणि शासनाच्या एकूण ₹७५.०० कोट हिश्श्यापैकी फक्त ₹३२.९५ कोटी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला प्राप्त झाले होते. उत्तरात, मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी सांगितले (जुलै २०१७) की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि पर्यटन विभागांबरोबर भांडवली मूल्य विभागण्यासंबंधीच्या प्रस्तावाचा अभ्यास करीत आहे. आणि महाराष्ट्र शासनाला सुधारित प्रस्ताव (डीपीआर) प्रशासकीय मान्यतेसाठी पाठविला जाईल. हे उत्तर समर्थनीय नाही कारण, महाराष्ट्र शासनाचे हीत जपण्यासाठी, महाराष्ट्र जीवन प्राधिरण / महाराष्ट्र शासनाने खाजगी पक्षाबरोबर सामंजस्य करार करण्याआधी ह्या विकल्पांचा विचार करायला हवा होता. यामुळे प्रकल्पाचे काम मध्यावरच थांबले आणि ₹५२.९५ कोटी निधीची अडवणूक झाली आणि ₹११.६६ कोटींचे दायित्व वाढले, शिवाय उद्देशित फायदा मिळणारे लाभार्थी लाभापासून वंचित राहीले.	जून २०२० पर्यंत पूर्ण करण्यात येऊन, ठेकेदारामार्फत जून २०२१ पर्यंत योजनेची चाचणीसह देखभाल-दुरुस्ती करण्यात येईल. योजना कार्यान्वित करण्याबाबतच्या दिनांक २८ मार्च २०१८ च्या शासन निर्णयात अट क्रमांक २ नुसार मे. श्री उत्तम स्टील अँण्ड पॉवर लिमिटेड यांच्यासमवेत करण्यात आलेला करारनामा कायम ठेवण्यात येणार असून, जर मे. श्री उत्तम स्टील अँण्ड पॉवर लिमिटेड कंपनी पुढे आल्यास, त्यानुसार योजनेची सुयोग्य रक्कम शासनाकडे अनामत ठेवण्यात येणार आहे. तसेच योजनेच्या कामास विलंब झाल्यामुळे त्यानुषंगाने आवश्यक रक्कम त्यांच्याकडून वसूल करण्यात यावी, असे निर्देश आहेत.

साक्ष :

परिच्छेद क्र. ३.४ - राष्ट्रीय ग्रामीण पेय जल कार्यक्रमाचे कार्यान्वयन

५.१ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक २९ जानेवारी २०१९ व दिनांक १२ व १४ फेब्रुवारी, २०१९ रोजी पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अपर मुख्य सचिव व विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली.

परिच्छेद क्र. ३. ४. ४ नियोजन

परिच्छेद क्र. ३. ४. ४. १ नियोजनातील कमतरता

नियोजन नियोजनातील कमतरता या परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे गावनिहाय जलसुरक्षा आराखडा तयार करावयाचा होता. त्याप्रमाणे संपूर्ण जिल्ह्यातील गावांचे आराखडे तयार करण्यात आले नाहीत, याबाबत माहिती देण्यात यावी अशी समितीने साक्षीच्या वेळी सूचना केली असता, काही गावांचे आराखडे तयार केले होते. प्रत्येक जिल्ह्यात एक खाजगी संस्था निवडून त्यांच्याकडून आराखडे तयार करून घेतले आहेत. सर्व गावांचे आराखडे तयार करायचे होते. एकेका गावाची पायलट प्रोजेक्टमध्ये निवड केली असून आराखडा तयार केला आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

आपल्या राष्ट्रीय धोरणानुसार संपूर्ण जिल्ह्याचा आराखडा तयार करणे बंधनकारक होते. केंद्र शासनाच्या सूचनेनुसार सर्व जिल्ह्यांमध्ये एकेका गावाचा आराखडा तयार केला आहे. वरुड तालुक्यात ९६ गावांचे आराखडे तयार केले. संपूर्ण ३४ जिल्ह्यांमधील प्रत्येक गावाचे आराखडे तयार करण्याऐवजी संपूर्ण जिल्ह्याचा आराखडा का तयार करण्यात आला ? असा प्रश्न समितीने केला असता, सर्व गावांचे आराखडे तयार केले नाहीत. काही गावांचे आराखडे तयार केले. त्याच्या आधारे इतर आराखडे तयार करायचे होते. भूजलासंबंधी नियम तयार केले जाणार आहेत. त्या संबंधी शासन पातळीवर बरीच चर्चा झाली असून लोकांच्या सूचना व हरकती मागवण्यात आल्या आहेत. दोन्ही सदनात चर्चा झाल्या नंतर हे नियम अंतिम होणार आहेत. प्रत्येक गावाचा पाणी आराखडा प्रस्तावित आहे. त्या नुसार प्रत्येक गावात किती पाणी आहे, शेतीला किती पाणी लागणार आहे व इतर कामासाठी किती लागणार आहे, याचा आढावा लोकांच्या सहभागाने घ्यावयाचा आहे. या संदर्भात आणखी लक्ष देण्यात येत आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

३६ हजार गावांमध्ये आराखडे तयार करण्याचे काम अतिशय मोठे आहे. हे काम आऊटसोर्स केले जाणार आहे काय ? असा प्रश्न समितीने केला असता, एकेका गावाचे ३४ आराखडे खाजगी संस्थेकडून तयार करून घेतले आहेत. त्याबाबत अभ्यास केला जात आहे. भूजल संबंधी जे नियम तयार करावयाचे आहेत त्याकरिता गावकऱ्यांचे सहकार्याची अपेक्षा आहे. या करिता एक समिती तयार केली असून या समितीने हे काम करावयाचे आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सध्या ड्राफ्ट मंजूर करण्याचे काम सुरू आहे. आराखडे कधी तयार होणार आहेत ? असा प्रश्न समितीने केला असता, राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमाच्या अनुषंगाने आराखडे तयार करण्याची कार्यवाही सुरू करण्यात येईल. नियमांच्या अनुषंगाने जवळपास ६ हजार हरकती प्राप्त झालेल्या आहेत. तोपर्यंत आराखडे तयार करण्याचे काम विभागाकडून करण्यात येईल. येणाऱ्या एका वर्षात बरीच प्रगती करण्याकरिता काम केले जाणार आहे. ४० हजार गावांचे आराखडे तयार करण्यासाठी वेळ लागेल. या करिता ५ वर्षांचे नियोजन करण्यात येईल. सध्या पुण्याच्या एजन्सी मार्फत आराखडे तयार केले आहेत. या कामामध्ये इतर एजन्सीचा देखील समावेश करावा लागणार आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सध्याच्या योजना सन २०१५-१६, २०१६-१७ व सन २०१७-१८ मध्ये सुरू असलेल्या योजनेसंबंधी माहिती द्यावी, अशी समितीने सूचना केली असता, या योजना सुरू आहेत. या संबंधीची आकडेवारी सध्या उपलब्ध नाही. ती उपलब्ध करून दिली जाईल. तसेच किती योजना वर्षभरापासून प्रलंबित आहेत याची अनेक कारणे असून त्या संबंधीची माहिती दिलेली आहे. या संदर्भात विभागाने एक स्पेशल ड्राईव्ह घेतलेला आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

वरुड तालुक्यातील ९६ गावांचे आराखडे तयार केले. डोमक गावाकरिता केलेल्या आराखड्या करिता साधारणपणे अंदाजे किती खर्च आला ? असा प्रश्न समितीने केला असता, साधारणपणे १५ ते २० हजार रुपये खर्च येतो. प्रत्येक गावाचा आराखडा तयार करणे हे मोठे काम आहे. या करिता निधी व वेळ बराच लागणार आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

या कामाकरिता केंद्र शासनाकडून निधी प्राप्त होणार आहे काय ? असा प्रश्न समितीने केला असता, एनआरडीडब्ल्यूपी (राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम) कडून निधी येणार आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

केंद्र शासनाच्या निवडक तालुक्यामध्ये प्रकल्प राबवण्याचे निश्चित केले आहे. अमरावती जिल्ह्यातील मोर्शी तालुक्याची निवड करण्यात आली. त्या करिता संपूर्ण खर्च केंद्र शासनाच्या माध्यमातून करण्यात आला असेल. त्याच धर्तीवर वरुड तालुक्यामध्ये नंतर आराखडे तयार करण्यात आले. डोमक गावामध्ये आराखड्याकरिता किती खर्च करण्यात आला ? असा प्रश्न समितीने केला असता, केंद्र शासनाकडे निधीची मागणी करावी लागेल. एनआरडीडब्ल्यूपी (राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम) कार्यशाळा सुरू आहे. दि. १ एप्रिल २०१९ पासून रिव्हॅम्पींग केले जाणार आहे. त्या संबंधी आज बैठक आहे. त्यामध्ये कोणकोणते कंपोनंट घेणार आहे या बाबत सूचना आता प्राप्त होतील, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

या योजनेमध्ये काही नॉर्म्स असून त्यामध्ये कंपोनंट्स आहेत. काही कंपोनंटला केंद्र शासन १०० टक्के फंडींग करते. काही कंपोनंटला ५०:५० टक्के फंडींग करते, असे प्रधान महालेखाकार यांनी समितीच्या निदर्शनास आणले.

हा खर्च एनआरडीडब्ल्यूपीमध्ये समाविष्ट करावा. केंद्र शासनाच्या हिस्सा काय राहणार आहे, त्याच्या निकषानुसार समायोजन करावे व त्यांच्याकडून ते मंजूर करून घ्यावे आता जवळजवळ ८-९ वर्षे झाली आहेत. मात्र अद्याप ते काम झालेले नाही. या करिता साधनसंपत्ती असली पाहिजे. त्याचे बजेट झाले पाहिजे. या बाबत जे काही शेअरींग असेल त्या नुसार नियोजन करावे व समितीला कळवावे. सुरू असलेल्या योजना व सन २०१५-१६, २०१६-१७ मधील नवीन योजनांची यादी समितीने द्यावी, असे समितीने निदेश दिले असता, विभागीय सचिवांनी माहिती देण्यात येईल असे आश्वासित केले.

केंद्र शासनाचा निधी कमी मिळाला काय ? असा प्रश्न समितीने केला असता, केंद्र शासनाचा निधी मार्च महिन्यात प्राप्त होतो. त्याचे रिव्हॅल्युएशन करण्यात बराच वेळ जातो. यामुळे निधी खर्च करण्यात विभागाला अडचणी आल्या होत्या. हा निधी वेळेवर प्राप्त होत नसल्यामुळे तो वेळेत खर्च होत नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

हा निधी फेब्रुवारी महिन्यात मिळाला असता तर तो खर्च झाला असता. ६०-७० कोटी रुपये कमी खर्च झालेला आहे. एका ठिकाणी ६१ कोटी रुपये तर दुसऱ्या ठिकाणी ६३ कोटी रुपये नमूद केले आहेत. केंद्र शासनाचा निधी लवकर आणण्याचा प्रयत्न केला तर तो पुढील वर्षी खर्च करता येईल. १० टक्के तूट शिल्लक राहिली आहे. यामुळे दुसरा हप्ता मिळत नाही, असे समितीने निदर्शनास आणले असता, निधी खर्च करण्यासंबंधी प्रोसीजर आहे. एमजेपीचा निधी वर्ग केला जातो. सन २०१२ ते २०१७ या कालावधीत समितीच्या माध्यमातून निधी दिला जात होता. अनेकदा असे दिसून आले की, समितीकडून वेळेवर माहिती मिळत नाही, वेळेत काम केले जात नाही. असे अनेकदा घडल्यामुळे समितीचा रोल संपवण्यात आला आहे. दि. ९ मार्च २०१८ रोजी जीआर काढण्यात आला. या संदर्भात कॅबिनेटमध्ये विषय मांडण्यात आला. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, ही समिती व्यवस्थित काम करीत नाही. गाव पातळीवर लोकांमध्ये वाद असतात, इतर अनेक गोष्टींमुळे कामे वेळेत होत नाही. आता जीआर काढल्यानंतर विभागाने अनेक कामे पूर्ण केली आहेत. खर्चाचा हिशोब झेडपी व एमजेपी यांच्याकडे असतो, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने ही दुरुस्ती केली आहे मात्र यापूर्वी विभाग योग्य प्रकारे करू शकला नाही. यामुळे विभागाचे ७० कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, हि बाब विभागीय सचिवांनी मान्य केली व विभागाचे ॲलोकेशन असते. प्रत्यक्ष फंड देताना काही प्रमाणात कमी देतात व काही वेळा जास्त देतात, जशी मागणी असते त्या नुसार निधी मिळतो, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने सुरूवातीला सांगितले की, मार्च महिन्याच्या शेवटी निधी आला. यामुळे निधी खर्च करता येत नाही. १० टक्क्याच्या वर निधी खर्च राहतो त्यामुळे कट लागतो. हा निधी लवकर प्राप्त करून घेण्यासाठी विभागाने प्रयत्न केले होते काय ? असा प्रश्न समितीने केला असता, विभागाने अनेक वेळा प्रयत्न केले तसेच दर महिन्याला बैठक घेऊन सर्वांशी चर्चा केली. राष्ट्रीय पेय जल योजनेचे लक्ष्य आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

माननीय मुख्यमंत्र्यांची व्हिडीओ कॉन्फरन्स झालेली आहे. त्यामध्ये प्रकर्षाने हा मुद्दा समोर आला होता की, एमजीपीला दिलेला निधी हा वेळेवर खर्च होत नाही. अमरावती जिल्ह्यातील अंडर ग्राउंड ड्रेनेज वॉटरचे काम सुरू आहे. त्या ठिकाणी १४४ कोटी रुपयांचे काम आहे. हे काम काही छोटे नाही. त्यामध्ये नगर विकास विभागाचे सिमेंट कॉन्क्रीटचे रोड पण सुरू आहेत. त्यातील ३ रस्त्यांवर अंडर ग्राउंड ड्रेनेज सिस्टिमचे काम झालेले नव्हते. कॉन्क्रीटच्या कामासाठी नगर विकास विभागाने ४ महिन्यापूर्वी पैसे दिले होते. ३ रस्त्यांमध्ये अंडर ग्राउंड ड्रेनेज सिस्टिमचे काम २ कोटी ९० लाख रुपयांचे होते. पण १४४ कोटी रुपयांचे कामाचे टेंडर दिले आहे. यामध्ये त्या रस्त्याचा अंतर्भाव होता म्हणून नगर विकास विभागाने पैसे दिले आहेत. त्यासाठी ४ महिने लागले आहेत. शेवटी मेंबर सेक्रेटरीने त्यामध्ये स्वतः सहभाग घेतला म्हणून ३ दिवसापूर्वी त्या कामाची वर्क ऑर्डर झाली. नगर विकास विभागाचे २० कोटी रुपये फक्त ३ रस्त्यांसाठी ४ महिन्यांत लागले आहेत आता तर आचारसंहिताच लागणार आहे. याचा अर्थ अकाऊँटनने काहीतरी त्रुटी काढली पण १४४ कोटी रुपयांच्या योजनेमध्ये २ कोटी ९० लाख रुपयांमध्ये कोणी घोटाळे करणार आहे काय? ४ महिने रस्ते खोदून ठेवल्यामुळे ते लोक आम्हाला ओरडू लागले. याची ग्राउंड रिॲलिटी दुसरी आहे. मेंबर सेक्रेटरीने यामध्ये स्वतः सहभाग घेऊन ती फाईल मागवून घेतली आणि ती मान्य करून घेतली. नगर विकास विभागाने कॉन्क्रीटसाठी २० कोटी रुपये देऊन ठेवले आहेत. १४४ कोटी रुपये योजनेच्या बाहेर फक्त २ कोटी ९० लाख रुपये खर्च करण्यासाठी ४ महिने परवानगी दिली नाही. निधी उपलब्ध असताना तो वापरण्यासाठी विभाग परवानगी देत नाही याचे जनप्रतिनिधींवर प्रेशर असते. काहीतरी तांत्रिक मुद्दा काढून अमरावतीला फाईल वापस पाठवून पुन्हा मुंबईला पाठवायची हे सर्व कामे झाली आहेत. या प्रकरणासाठी ४ महिने का लागले आहेत याचे परिक्षण विभागाने करावे त्यामुळे अशा प्रकारची प्रकरणे का घडतात हे विभागाच्या लक्षात येईल.

विभागाच्या सिस्टिममध्ये कुठेतरी सुसूत्रिकरण करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. जेणेकरून जो वेळखाऊ कार्यक्रम चालतात त्या प्रत्येक गोष्टीमध्ये मेंबर सेक्रेटरी किंवा चीफ इंजिनियर लक्ष घालू शकत नाहीत. पण ग्राउंड पातळीवर या सर्व अडचणी येऊ नयेत.

माननीय मुख्यमंत्र्यांनी स्वतः व्हिडिओ कॉन्फरन्सवर सांगितले की, विभागाचे प्लॅन आणि इस्टिमेट योग्य नसतात. त्यामुळे या सर्व अडचणी येतात. विभागाने सर्व प्लॅन इस्टिमेट व्यवस्थित करून द्यावे म्हणजे अडचणी येणार नाहीत, असे समितीने सूचित केले.

परिच्छेद क्र. ३. ४. ५ वित्तीय व्यवस्थापन :

परिच्छेद क्रमांक ३. ४. ५. १- भारत सरकारने लादलेली वित्तीय कपात :

या परिच्छेदामध्ये महालेखाकार यांनी ७१ कोटी रुपये कमी मिळाले असल्याचे आक्षेपात नमूद केले आहे. तथापि, विभागाचे म्हणणे आहे की, ६३ कोटी रुपये कमी मिळाले यामध्ये काय वस्तुस्थिती आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, At that point of time it was Rs. 71 crores,

विभागाकडून आम्हाला उत्तरे मिळालेली आहेत त्याचे पेपर्स पण महालेखापाल कार्यालयाकडे आहेत, असे प्रधान महालेखापाल यांनी निदर्शनास आणले असता, सर्व हिशोब लावून अंतिम आकडे सांगितले आहेत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

परिच्छेद क्र. ३. ४. ५. २ राज्य शासनाद्वारे अनुरुप हिश्याचे कमी वितरण

सदर परिच्छेदामध्ये विभागाने जास्तीचा निधी दिलेला आहे. असे ज्ञापनात नमूद केले आहे. महालेखाकारांनी लेखापरिक्षणांत कमी निधी दिला आहे. असे आक्षेप घेतले आहे. तथापि राज्य शासनाकडून २४५५ कोटी रुपयांचा आदेश असताना ३१०२ कोटी रुपये निधी दिला आहे, यासंदर्भात माहिती देण्यात यावी असे समितीने निदेश दिले असता, त्यावेळेला विभागाच्या लोकांनी स्वाक्षरी करून दिलेले पेपर्स महालेखाकार कार्यालयास मिळाले त्याप्रमाणे असे दिसत होते की, राज्याचा शेअर्स कमी आहे. कारण बहुतेक स्टेटमेंट आणि एमआयएस रिपोर्ट बरोबर झाले नसतील. आता शासनाचे विभाग वेगळे आकडे देत आहे तिथे व्यवस्थित लक्ष द्यायचे आहे, असे प्रधान महालेखाकार यांनी समितीच्या निदर्शनास आणून दिले.

हा परिच्छेद विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या आकड्यांच्या अनुषंगाने महालेखाकारांनी काढलेला आहे, काय असे प्रश्न समितीने केले असता, त्या फिगर्स व्हेरिफाय करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी आश्वासित केले.

परिच्छेद क्र. ३. ४. ५. ३ दूषित पाण्याने बाधित वस्त्यांसाठी राखून ठेवलेल्या निती आयोगाच्या निधीची अनुपयोगिता

या परिच्छेदामध्ये निती आयोगाने २४. ०८ कोटी निधी एकाच वेळीचे सहाय्य म्हणून महाराष्ट्र शासनाला दिले आहेत. शासनाने १८६ दिवसानंतर त्या पैशाचे वितरण केले. त्यावर व्याजाचे प्रदान न केल्याचे १. ७२ कोटी रुपये होते. विभागाकडे जमा झालेले पैसे विभागाने कामावर खर्च केले नाहीत. असा महालेखाकारांचा आक्षेप आहे, यासंदर्भात माहिती देण्यात यावी अशी सूचना समितीने केली असता, निती आयोगाने या योजनेसाठी सन २०१५ मध्ये २४. ०८ कोटी रुपये दिले होते. त्यातून ८० ठिकाणी डिफ्लोरिडेशन युनिट बसवायचे होते. यामध्ये ५ वे निविदा झाल्यानंतरच विभागाने अंतिम ऑर्डर दिली. ऑगस्ट, २०१७ मध्ये ती अंतिम ऑर्डर देण्यात आली. याचा अर्थ ५ वेळा निविदा काढून देखील विभाग एजन्सी निश्चित करू शकले नाही असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

१.५ वर्षानंतर किती काम झाले आहे ? विभागाकडे १२२ संयंत्राची ऑर्डर आहे किती संयंत्र बसले आहेत. ४३ एवढी विभागाची फिगर आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, ७६ ठिकाणी संयंत्र युनिट कार्यान्वित केले आहेत. ४६ संयंत्र युनिट प्रगतिपथावर आहेत. कारण त्यामध्ये निती आयोगाशिवाय जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत सुद्धा विभागाला काही निधी मिळाला होता. एकूण १२२ संयंत्र बसवायचे होते. १२२ संयंत्राची निविदा काढून ऑगस्ट, २०१७ मध्ये ऑर्डर देण्यात आली होती. काम लवकर होण्यासाठी ३ एजन्सीला विभागून ऑर्डर दिली होती. संयंत्र युनिट प्रत्यक्षपणे गावात बसवण्यासाठी गेल्यानंतर लक्षात आले की, तिथे पाहिजे तेवढे संयंत्राचे कंटेट नव्हते. म्हणजे प्रत्येक लिटरला १. ५ मिलीग्राम पाहिजे. कारण ३० लाख रुपयांचा प्रकल्प आहे. तो प्रकल्प राबविण्यासाठी आपण जेव्हा गावामध्ये एजन्सीला पाठवले तेव्हा पाण्याचा नमुना पुन्हा एकदा तपासण्यासाठी त्यांना सांगितले होते. त्यानंतर तिथे संयंत्राचे कंटेट १. ५ मिलीग्राम नव्हते त्यामुळे अनेक गावे बदलली गेली. कारण ती यादी खूप जुनी होती. नंतर पाण्याची क्वालिटी काही ठिकाणी सुधारली तर काही ठिकाणी खराब झाली. आता विभागाकडे अनेक गावांची मागणी आहे की, जिथे संयंत्र युनिट अजूनही बसवायचे आहेत त्यासाठी विभाग पुन्हा विनियोजन करीत आहे की, जलस्वराज्य योजना किंवा एनआरईडब्ल्यु मधून जास्तीचे युनिट बसवण्यासाठी विभाग निविदा काढत आहे. १२२ संयंत्र बसवायचे होते त्यापैकी ७६ पूर्ण केलेले आहेत, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

या सर्व गावांचा सर्व्हे कधी झाला होता ? फ्लोराईड युक्त गावांची यादी कधी आणि कोणी तयार केली होती ? असा प्रश्न समितीने केला असता, पाण्याचे नमुने तपासून घेण्याआसाठी टेस्टींग लॅब आहेत. यानुसार प्रत्येक गावाचे सर्व नमुने तपासले जातात. यातुन एकही गाव सुटले जात नाही. याचे पूर्ण ॲनॅलिसिस केले जाते. त्या नमुन्यामध्ये १. ५ मिलिग्राम पर लिटरपेक्षा जास्त फ्लोराईड आहे ते वेगळे काढले जातात. ही यादी प्रत्येक ६ महिन्यानंतर अपडेट होत राहते. सध्या दुष्काळग्रस्त परिस्थिती आहे तर पाण्याचे प्रमाण कमी झाल्यामुळे फ्लोराईडचे कंटेट जास्त दिसून येत आहे. अशा परिस्थितीमुळे ही यादी बदलत राहते. परंतु ज्या ठिकाणी सतत ३ वर्षे फ्लोराईड कंटेट जास्त दिसते, अशा गावांना डिफ्लोरिडेशन प्लान्ट साठी निवड केली जाते. डिफ्लोरिडेशन प्लान्ट हा ५ ते १० वर्षांसाठी एक तात्पुरता मेजर म्हणून सांगितला जातो. त्या गावामध्ये प्रॉपर सरफेस वॉटरच्या आधारे नळ पाणीपुरवठा योजना केली पाहिजे असे नियोजन असते. एकदा डिएफयु दिले म्हणजे काम संपले असे नाही. हे सुरू राहावे म्हणून विभागाने यावर्षी १० वर्षांच्या मेंटेन्स त्या एजन्सीला दिला होता. पण तो मेंटेनन्स घेण्यासाठी कोणी पुढे आले नाही. शेवटी ५ व्या टेंडर मध्ये कोणी पुढे आल्यानंतर ३ एजन्सीला अंतिम केले, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

यामध्ये व्याजाचा काय प्रश्न आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, व्याजासंदर्भात केंद्र शासनाचा असा नियम आहे की, केंद्र शासन जेव्हा पैसे रिलिज करते तेव्हा ते राज्य शासनाच्या तिजोरीमध्ये येतात. त्यामध्ये अशा सूचना असतात की, राज्य शासनाने १५ दिवसांत ते पैसे रिलिज केले पाहिजे. परंतु ते प्रत्यक्ष रिलिज होत नाहीत. काही ना काही कारणामुळे ते पैसे प्रलंबित असतात. या प्रकरणामध्ये सुद्धा १५० ते १७५ दिवसांचा विलंब झालेला आहे. या सर्व दिवसांवर राज्य शासनाने व्याज देऊन या निधीमध्ये व्याज टाकले पाहिजे. आपण राज्य शासनाकडून आधीच एवढा मोठा निधी घेतच आहोत तसेच मुख्यमंत्री पेयजल योजनेमध्ये सुद्धा राज्य शासनाचे २ हजार ५०० कोटी रुपये राज्य शासनाचे वापरले आहेत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

केंद्र शासनाला व्याज माफ करण्याबाबत विनंती करण्यात यावी. कारण व्याज दिले नसल्यामुळे हा विषय प्रलंबित राहणार आहे. विभागाचे म्हणणे योग्य आहे की, सरकारकडून व्याज घेऊन त्या योजनेवर खर्च करावे लागणार आहे. कारण त्यामध्ये शासनाचा सहभाग आहे. पण या नियमानुसार विभागाला व्याज द्यावे लागते, हा मुद्दा महालेखाकारांनी शोधून काढला आहे, असे समितीस निदर्शनास आणले.

परिच्छेद क्र. ३. ४. ५. ४ इतर योजनांसोबत अभिसरणचा अभाव :

या परिच्छेदामध्ये विभागाने कन्वर्जेंसचा उपयोग केला नाही असे महालेखाकारांचे म्हणणे आहे. स्त्रोत बळकटीकरण करण्यामध्ये कन्वर्जेंसचे पैसे वापरले असते तर विभागाला खूप काही जमा करून ठेवता आले असते, असे महालेखाकारांचे निरिक्षण आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, मनरेगा आणि राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेचा पैसा केंद्र शासनाचाच आहे. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेमध्ये जेवढे काही प्रकल्प मंजूर होतात त्याचे प्रकल्पनिहाय कंत्राट दिले जाते. एकदा कंत्राट दिल्यानंतर कन्वर्जेंस शक्य होत नाही. तरी आता समितीने सूचना केलेली आहे तर लेबर ओरिएंटेड जेवढे काही कंम्पोनंट आहेत त्याला बाजूला काढून उरलेले पाईपलाईन किंवा काही तांत्रिक काम असेल ते टेंडरमध्ये टाकायचे. मग लेबर ओरिएंटेड काम मनरेगामार्फत करायचे. परंतु ते खूप किचकट काम आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

तसे न करता विभागाने निविदेमध्येच अट टाकावी. तांत्रिक कामाशिवाय जी कामे करायची असतील ती मनरेगा योजनेच्या अंतर्गत तिकडे असणाऱ्या स्थानिक लोकांकडून ती करून घ्यावी, असे समितीने सूचित केले असता, विभाग कंत्राटदाराला मनरेगाची कामे करण्यास सांगू शकत नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

यासाठी काय करता येईल त्यासाठी विभागाने एखादे सर्क्युलर इश्यु करावे, असे समितीने सूचित केले असता, स्वच्छ भारत मिशनमध्ये वैयक्तिक शौचालयाचे बांधकाम करायचे होते केंद्र शासनाने विभागाला सांगितले होते की, जे विभाग शौचालय स्वच्छ भारत मिशन योजनेच्या अंतर्गत बांधकाम करू शकत नाही, ते विभागाने नरेगा योजनेमार्फत करावे. काही मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी (सी. ई. ओ) ती कामे मनरेगामार्फत केली. परंतु त्यांना असे वाटते की, फायरस प्रिपरवर जास्त आहे. त्यामध्ये जास्त वेळ जात असल्यामुळे ते करणे शक्य होत नाही. म्हणून त्यांनी प्रत्येक वेळेस सांगितले की, मनरेगामार्फत कामे घेणार नाही. शेवटी कोणतेही काम करायचे असेल तर त्यासाठी लागणाऱ्या लेबर कंपोनंटसाठी स्थानिक लेबर घेतलेच जातात. त्यामुळे लोकांना काम तर मिळणारच आहे. फक्त लेबरला कंत्राटदारामार्फत पेमेंट मिळाली का मनरेगा मार्फत मिळाली याला काही फरक पडत नाही, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

कन्वर्जेंसला केंद्र शासनाची गाईडलाईन आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, केंद्र शासनाच्या गाईडलाईन सजेस्टीव असतात. ते सर्व देशासाठी आदेश देतात. काही ठिकाणी त्या गाईडलाईन शक्य असतील पण या ठिकाणी शक्य असतील असे वाटत नाही. मनरेगा योजनेचे पैसे घेण्यात वेळ जातो आणि त्यांच्याकडे पैसेपण नसतात, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

परिच्छोद क्र. ३.४.६ इतर वित्तीय अनियमितता :

या परिच्छेदाबाबत माहिती देण्यात यावी अशी समितीने सूचना केली असता, विम्यासाठी १ टक्का कपात करायची होता, हा मुद्दा विभागाने एमजेपीचे डीएसआर सन २०१०-११ पासून सुरूवात केलेली आहे. ऑडिट झालेल्या बऱ्याच प्रकरणांमध्ये निविदेमध्ये हे प्रोव्हिजन नव्हते. टेंडरमध्ये आगाऊचे १ टक्के प्रोव्हिजन करून पैसे उपलब्ध करून द्यायचे होते तसे झालेले नाही. प्रोव्हिजन केले नाही म्हणून परत कपात करण्याचा मुद्दा बऱ्याच प्रकरणामध्ये उपस्थित झालेला नाही, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

कोणत्याच ठिकाणी प्रोव्हिजन केलेली नाही, असे समितीने निदर्शनास आणले असता, काही कंत्राटामध्ये विम्याचा कंपोनंट टाकला होता. त्या अनुषंगाने शासकीय मालमत्तेला नुकसान होऊ नये म्हणून कंत्राटदारांनी विमा करायला पाहिजे होता. परंतु त्यांनी तसे केले नाही. कंत्राटदारांनी विमा केला नसल्यामुळे त्यांना अवाजवी फायदा झालेला आहे. त्यासाठी त्या त्या कंत्राटदारांकडून १ टक्के वसुल करावे लागेल. याची आज नोंद घेऊन त्याप्रमाणे पुढील कारवाई करण्यात येते. काही ठिकाणी त्यांनी विमा काढलेला आहे. काही ठिकाणी त्यांना विम्याचे पैसेच दिले नाहीत म्हणजे इस्टिमेटमध्ये कंपोनंट टाकले नव्हते. त्याबाबत विभाग सर्व फिल्ड ऑफिसरला एक सविस्तर सूचना इश्यु करणार आहोत. त्यामध्ये सर्व उदाहरण देऊन कोणत्या पद्धतीने कारवाई करावे हे त्यांना सांगण्यात येईल. त्याची एक प्रत विभागाकडून समितीला देण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले, विम्याची काय गरज आहे ? असा प्रश्न समितीने केला असता, पाईपलाईन किंवा इतर बांधकाम अशा शासकीय मालमत्तेला कोणतेही नुकसान होऊ नये म्हणून विमा काढला पाहिजे, हे नुकसान नैसर्गिक नुकसान असु शकते, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने या विषयावर अनेक ग्रामीण पाणीपुरवठा समितीला पण पैसे दिले आहेत. त्या ठिकाणी विभागाने सांगितले की, समितीने स्वतः काम केले आहे म्हणून त्यांच्याकडून कपात करता आली नाही. Ultimately, when there is a provision of insurance, and we have given the amount of insurance, then that should be re-collected, if they are not making insurance, असे समितीने सूचित केले असता, समितीचा हिशोब वेगळा आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीचा किंवा कंत्राटदारांचा विषय असला तरी विभागाच्या आराखड्यात विम्याची एक टक्के रक्कम अंतर्भूत केली असेल तर, either they should take out the insurance or they should refund it. त्याबाबत विभाग समितीला असे सांगत आहे की, सदर बाबीची निविदा प्रक्रिया झालेली नाही असे विभागाचे उत्तर आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, काही ठिकाणी निविदा प्रक्रिया झालेली नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

निविदा प्रक्रिया झालेली नाही हे ठीक आहे, पण सदर बाबीचा विमा उतरविणे भाग होते संबंधित समितीला देखील विमा उतरविणे भाग होते. Insurance is for the safety of that project. विभागाने एक गोष्ट बरोबर सांगितली आहे, ती म्हणजे ज्या आराखड्यात विम्याची तरतूद

करण्यात आली नाही त्याबाबतीत वसुली कशी काय करता येऊ शकेल ? या बाबीशी समिती सहमत आहे. पण ज्या ठिकाणी तशा प्रकारची तरतूद करण्यात आली असेल त्याबाबतीत समिती असो किंवा विधान समिती असो वसुली करण्यात आली पाहिजे, असे समितीने सूचित केले. विम्याच्या रकमेची तरतूद कोणाकडून केली जाते ? विभागाने आराखड्यामध्ये सदरची तरतूद केली नाही, काय ? तशी तरतूद करण्यात आलेली आहे पण ज्या ठिकाणी अशी तरतूद करण्यात आलेली आहे त्या ठिकाणी वसुली करण्यात आलेली नाही, असे मत समितीने व्यक्त केले असता, सदर बाबी संदर्भात सूचना निर्गमित करण्यात येणार आहेत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ग्रामीण पाणीपुरवठा समितीला देखील सोडू नये ज्या ज्या ठिकाणी विभागाने आराखड्यात अशी तरतूद केली आहे, त्या सर्व लोकांनी, either they should make insurance or refund the amount to the Government. १ कोटी ७८ लाख रुपये वसूल करावयाचे होते त्यापैकी आपण फक्त ६ लाख रुपयांची वसुली केली आहे. १ कोटी ७८ लाख रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे म्हणून महालेखापाल यांच्याकडून १ कोटी ७८ लाख रुपयांचा आकडा दर्शविण्यात आलेला आहे, असे समितीने निदर्शनास आणले, ज्या ज्या प्रकरणांमध्ये विम्याची रक्कम आराखड्यात दिलेली आहे आणि संबंधिताने तशा प्रकारचा विमा उतरविला नसेल तर ती रक्कम संबंधितांकडून वसूल करण्यात यावी, अशा प्रकारच्या सूचना निर्गमित करण्यात येणार आहेत. सदर प्रकरणी सर्व माहिती संकलित करून समितीला सादर करण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

सन २०१२ ते २०१७ या कालावधीत विम्यासाठी विभागाने किती रकमेचे प्रावधान केले होते ? किती रक्कम अदा करण्यात आली होती? आणि सदर कालावधीत काही विम्याचे दावे आलेले आहेत काय ? असा प्रश्न समितीने केला असता, सदर बाबीची माहिती नाही. महालेखापाल कार्यालयाने जी माहिती काढलेली आहे त्यामध्ये त्यांनी काही आकडेवारी दिलेली आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सदर विषय वारंवार येतो आहे की, आपण विम्यासाठी पैसे भरतो आणि विम्याच्या दाव्यापोटी आपल्याला काय मिळाले आहे? विभागाने विमा उतरविला सदर कामी किती पैसे देण्यात आले, एखादी घटना घडली असेल तर त्याबाबतीत विमा कंपनीकडून विभागाला काही पैसे मिळाले आहेत काय ? विमा करण्याची अट कशाला टाकावयाची ज्या ज्या ठिकाणी विम्यासाठी रक्कम देण्यात आलेली आहे मात्र विमा उतरविण्यात आला नसेल अशा ठिकाणी देण्यात आलेली रक्कम परत घेण्यात यावी, हा मुद्दा वेगळा आहे.

सन २०१२ ते २०१७ दरम्यान विम्यासाठी विभागाने किती पैसा दिलेला आहे ? आणि या कालावधीत एकही घटना घडली नाही काय ? जेणेकरून शासनाच्या मक्त्याची काही नुकसान झाले असेल तर त्याबाबत विम्याचे काही रक्कम मिळाली आहे काय ? जर अशी काही रक्कम मिळत नसेल तर विमा कशासाठी उतरावयाचा. The risk which we need to cover should be covered, otherwise there is no use of insurance. सदर प्रकरणी कंत्राटदारांना १ कोटी ७४ लाख रुपयांचा गैरवाजवी फायदा झाला. याचा अर्थ किती रुपयांचा विमा उतरविला होता याबाबतची आकडेवारी विभागाकडे उपलब्ध असायला पाहिजे. ज्यावेळेस लेखापरीक्षण करण्यात आले असेल त्यावेळी याबाबत समोरासमोर बसून चर्चा झाली असेल. विम्यासाठी किती रक्कम भरण्यात आली होती? कंत्राटदारांना १ कोटी ७४ लाख रुपयांचा फायदा होत आहे असे महालेखापाल यांचे म्हणणे असेल तर किती रुपयांचा विमा उतरविण्यात आला होता याबाबतची आकडेवारी विभागाकडे असेल. विम्यासाठी किती रक्कम अदा करण्यात आली आहे आणि किती विमा दावे सादर करण्यात आले या दोन्ही आकडेवारी असायला पाहिजेत. सन २०१२ ते २०१७ या कालावधीची माहिती नाही दिली तरी चालेल पण सदर प्रकरण ज्या कालावधीतील आहे त्याबाबत माहिती देण्यात आली पाहिजे, अशी सूचना समितीने दिली असता, सदर प्रकरण सन २०१२ ते २०१७ या कालावधीचेच आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सदर प्रकरणी विभागाने विम्याचा दावा दाखल केला असेल तर रक्कम मिळेल. जर काही घटनाच घडली नाही तर याचा अर्थ असा नाही की विभागाने विमा उतरवू नये. सुरक्षिततेसाठी विमा उतरविण्यात आलाच पाहिजे पण त्याचा काही उपयोग झाला किंवा नाही, काही घटना घडली किंवा नाही. घटना घडली असेल तर विभागाने विम्याचा दावा दाखल केला की नाही ? विम्याचा दावा दाखल केला असेल तर त्याची फलश्रुती काय झाली, याबाबतची माहिती देण्यात यावी, तसेच विभागाने विमा उतरविण्यासाठी किती रुपये दिलेले आहेत, त्यातून किती रुपयांचा विमा उतरविण्यात आलेला आहे, किती रुपयांचा विमा उतरविण्यात आलेला नाही. विमा उतरविण्यासाठी वापरण्यात आलेली नाही अशी १ कोटी ७४ लाख रुपयांची रक्कम परत घेणे क्रमप्राप्त होते असे महालेखापाल यांनी आक्षेप नोंदविलेले आहेत. विभागाने असे सांगितले आहे की, रु. ६,४४,२७७ लाख रुपये वसूल करण्यात आलेले आहेत, इतर रकमेचे काय आहे ? इतर रकमेचा संबंधितांनी विमा उतरविला होता काय ? जर विमा उतरविण्यात आलेला नसेल तर संबंधितांकडून सदर रक्कम परत घेण्यात यावी, असे समितीने निदेश दिले असता विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजना विभाग राबवित असतो. ज्या गावामध्ये राष्ट्रीय पेयजल योजना असेल अशा ठिकाणी पाईपलाईन टाकण्याची गरजच नाही. ज्या गावांमध्ये सदर प्रकारची पाण्याची योजना नाही अशा गावांमध्ये आपण पाईपलाईन टाकण्याची सोय करीत असतो. सदर ठिकाणी नुकसान होण्याची काही शक्यता नाही कारण मातीकाम आणि पाईपलाईन टाकण्याचे काम आहे.

सदर कामासंदर्भात केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचना असतील की, सदर योजनेअंतर्गत कामाचा विमा उतरविण्यात यावा म्हणून त्यांना विमा उतरविण्याचे काम करावे लागते. सदर प्रकारची तरतूद आराखड्यात नमूद करण्यात आलेली आहे पण रक्कम देऊनही विमा उतरविण्यात आलेला नाही, असे समितीने मत व्यक्त केले असता, केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचना होत्या सदर तरतूद आपल्या आराखड्यात नमूद करण्यात आलेली आहे. विमा उतरविण्याची रक्कम आराखड्यात नमूद करून संबंधित कंत्राटदाराला देण्यात आली आहे पण त्यांनी विमा उतरविण्याचे काम केले नाही म्हणून सदर रक्कम संबंधितांकडून परत घ्यायला पाहिजे असा मुद्दा आहे. तसेच सदर तरतूद राज्य शासनाने केलेली आहे त्यासाठी केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचना नाहीत. आराखडा तयार करताना प्रत्येक घटकाची किंमत त्यात अंतर्भूत करण्यात येते. त्यात १ टक्का विमा उतरविण्याची रक्कम समाविष्ट करण्यात येत असते, असे विभागीय प्रतिनिधीने समितीस अवगत केले.

विमा उतरविण्यासाठी केंद्र सरकारच्या कोणत्याही मार्गदर्शक सूचना नाहीत. सदर आराखडा राज्यशासनाच्या स्तरावरच तयार करण्यात येतो. त्यामुळे सदर बाबतीत असे वाटत असेल की, विमा उतरविण्याची आवश्यकताच नाही कारण परत काही मिळत नाही. ज्यावेळी कामाचा आराखडा तयार करण्यात येतो त्यावेळी तो घटक ठेवला नाही त्यामुळे अंदाजित रक्कम कमी येईल.

समितीला अशी माहिती देण्यात आलेली आहे की, आराखड्यातील रकमेत १ टक्का रक्कम विमा उतरविण्यासाठी देण्यात आलेली आहे. सदर रक्कम मक्त्यासाठी देण्यात आलेली नाही. सदर रक्कम केवळ कामगारांच्या सुरक्षिततेसाठी आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, कामगार सुरक्षिततेचा मुद्दा हा वेगळा मुद्दा आहे. सदर विमा हा मालमत्तेसाठी जसे की, पाईपलाईन, इमारत किंवा मशिनरी वगैरे हे चोरीला जाऊ नये किंवा एखाद्या वेळी पूर आला आणि सामान वाहून गेले तर अशावेळी विमा कंपनीकडून नुकसानीची भरपाई करून घ्यायची. यादृष्टीने विमा उतरविण्याचा मुद्दा आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

कामासाठी लागणारे साहित्य साठवणे, पूर आला तर ते वाहून जाते वगैरे. पण काम पूर्ण झाल्यानंतर अंतिम देयक तयार झाल्यानंतर सदर घटक त्यामध्ये नमूद केला तो विमा उतरविण्याचे प्रमाणपत्र न घेताच नमूद करण्यात आलेला आहे. असे केले तर देयक कसे काय मिळणार आहे. असे असताना देयक कसे काय मंजूर करण्यात आलेले आहे ? सदर प्रकरणी दिसून येत असलेली विसंगती या चुका नसून फसवणूक आहे. विभागाने किती हप्ते भरले आहे आणि किती परतफेड झालेली आहे? सदर प्रकाराला विभाग केवळ चूक असे म्हणत आहे का? अशी विचारणा समितीने केली असता, ज्या ठिकाणी आपण विमा उतरविण्याचे पैसे कंत्राटदाराला दिले आणि त्यांनी विमा उतरविला नाही. सदर कंत्राटदाराला अंतिम देयकही अदा केले असेल तर ती चूक आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सदर प्रकार म्हणजे चूक नसून तो एक गुन्हा आहे, असे समितीने मत व्यक्त केले असता, सदर प्रकरणी सर्व प्रकारच्या सूचना निर्गमित करण्यात येणार आहेत आणि रक्कम वसूल केली जाणार आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सदर रक्कम तर वसूल करण्यात यावीच पण ज्यांनी पूर्ण चौकशी न करता देयके पारित केली आहेत त्यांची नावे समितीला सादर करण्यात यावीत, संबंधितांविरुद्ध योग्य ती कारवाई करण्यात यावी. सदर परिस्थिती ही कामगार कल्याण उपकराबाबत आहे. सदर प्रकरणी ज्या ठिकाणी २० लोकांपेक्षा कमी कामगार आहेत असे ज्यांनी म्हटले आहे त्यांना विभागाने सोडून दिले आहे. सदर प्रकरणी पूर्ण शहानिशा विभागाने केली आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, मुद्दा क्रमांक २० हा EPF शी संबंधित आहे. यामध्ये असे असते की, कोणत्याही कंपनीकडे २० पेक्षा जास्त कामगार असतील तर संबंधित कंपनीने संबंधित कामगारांचा १२.५ टक्के EPF भरला पाहिजे. पहिला मुद्दा हा कामगार कल्याण उपकराचा आहे. कामगार कल्याण उपकराची १ टक्के रक्कम कामगार कल्याण मंडळाकडे भरली गेली पाहिजे. अशा प्रकारची सर्व रक्कम जमा झाल्यानंतर कामगार कल्याणाच्या योजना सदर मंडळाकडून राबविण्यात येतात. काही ठिकाणी कामगार कल्याण उपकराची रक्कम कंत्राटदारांनी भरलेली नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सदर प्रकरणी विभाग काय कार्यवाही करणार आहे ? सन २०१२ ते २०१७ मधील रकमा वसूल करण्यात आलेल्या नाहीत, संबंधितांनी रकमा भरल्या नाहीत. रक्कम न भरणाऱ्यांविरुद्ध विभाग काय कारवाई करणार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, प्रशासकीय कारवाई आणि रकमेची वसुली अशा प्रकारची कार्यवाही करावी लागणार आहे आणि विभाग ती करणार आहे. सदर प्रकरणी योग्य त्या सूचना निर्गमित करण्यात येणार आहेत तसेच आढावाही घेण्यात येणार आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने असे म्हटले आहे की, "यापुढे ज्या नवीन योजनांचे अंदाजपत्रक तयार करण्यात येतील त्यामध्ये शेवटी कामगार कल्याण उपकराची रक्कम अंतर्भूत करण्यात येऊन त्याप्रमाणे कपात करण्यात येऊन भरणा करण्यात येईल." म्हणजे सदर रकमा भरणा करण्याची जबाबदारी विभागाचीच होती, असे समितीने निदर्शनास आणले असता, सदर रक्कम भरण्याची जबाबदारी कंत्राटदाराची होती. खरे पाहता सदर रक्कम कंत्राटदाराला देऊन त्याने सदर रक्कम भरली पाहिजे कारण कंत्राटदाराचे देयक अदा करतेवेळी सदर रक्कम त्यातून कपात केली पाहिजे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागानेच सदर रक्कम कपात केली पाहिजे आणि रक्कम भरणा करून घेतली पाहिजे. सदर काम कंत्राटदारांच्या भरवशावर सोडून दिले तर ते काही सदर रकमा भरत नाहीत, असे समितीने मत व्यक्त केले असता, समिती म्हणते तीच प्रक्रिया आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ज्या ज्या लोकांच्या सदर रकमांचा भरणा करण्यात आलेला नाही, अशा सर्व लोकांच्या रकमांची वसुली विभागामार्फत झाली पाहिजे. तसेच पुढील आणि मागील काळातील रकमांची वसुली करण्यात यावी, असे समितीने सूचित केले असता विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

EPF बाबत माहिती देण्यात यावी, अशी समितीने सूचना केली असता, EPF बाबत परिस्थिती अशी आहे की, ज्या कंत्राटदाराकडे २० पेक्षा जास्त कामगार आहेत. अशा कंत्राटदाराकडून इ.पी.एफ ची वसुली करण्यात येते विभागीय सचिवांनी सांगितले.

संबंधित कंत्राटदाराकडे २० पेक्षा जास्त कामगार आहेत की नाहीत याबाबीची शहानिशा विभागाने केली आहे काय ? असा प्रश्न समितीने केला असता, सर्वसाधारणपणे कार्यकारी अभियंता जेव्हा देयक अदा करतात तेव्हा ते संबंधित कंत्राटदारांकडून सदर बाबीची माहिती घेतात, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने एखाद्या कंत्राटदाराचे शपथपत्र घेतले, इतरांच्या बाबतीत असे सांगण्यात आलेले आहे की, त्यांच्याकडे २० पेक्षा कमी कामगार आहेत असे त्यांनी सांगितलेले आहे. एवढ्यावरच विषय संपला. ज्या कंत्राटदारांनी असे सांगितले की, त्यांच्याकडे २० पेक्षा कमी कामगार आहेत. अशा

कंत्राटदारांकडून कागदोपत्री पाठपुरावा करण्यात आला होता की नाही ? विभागाकडून यापूर्वी जी उत्तरे देण्यात आलेली आहेत त्यामध्ये असे सांगण्यात आलेले आहे की, त्यांनी सांगितले की त्यांच्याकडे २० पेक्षा कमी कामगार आहेत. त्याप्रमाणे काही कागदपत्रे सादर करण्यात आलेली आहेत काय ? अशी विचारणा समितीने केली असता, प्रत्येक विभागाचा हिशेब देण्यात आलेला आहे. सदर प्रकरणी कार्यकारी अभियंत्यांकडून त्यांचे म्हणणे लेखी स्वरुपात घेण्यात आलेले आहे, त्यांनी त्या त्या विभागाबाबत त्यांचे अभिप्राय नोंदविलेले आहेत. कार्यकारी अभियंता यांनी कागदपत्रे पाहूनच जबाबदारीने उत्तरे सादर केली असतील, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

त्यांनी त्यांच्या पत्राद्वारे असे कळविलेले आहे की, आतापर्यंत त्यांच्याकडे २० पेक्षा जास्त कामगार नसल्यामुळे मला EPF चा अभिलेख तयार करता येत नाही. असे औरंगाबाद येथील श्री. व्ही. आर. महाजन यांनी सांगितलेले आहे. बुलढाणा व नागपूरमध्ये देखील हीच परिस्थिती आहे. असेही विभागीय सचिवांनी अवगत केले.

संबंधित कंत्राटदारांकडे २० पेक्षा कमी कामगार आहेत याबाबत विभागाने शहानिशा केली आहे की नाही ? त्यांनी म्हटले आणि विभागाने मान्य केले असे झालेले आहे काय ? असा प्रश्न समितीने केला असता, आतापर्यंत कार्यकारी अभियंता यांनीच देयक अदा करावयाचे होते आणि ते त्यांचेच काम होते. त्यामुळे त्यांनी त्याचे म्हणणे सादर केलेले आहे.

मुख्यालय स्तरावर ज्या योजना आहेत, ज्या ज्या योजनांमध्ये EPF च्या रकमा अदा करण्यात आलेल्या आहेत त्या योजनांच्या बाबतीत पुन्हा ज्यावेळी आढावा घेण्यात येईल त्यावेळी तपासणी करण्यात येईल की, संबंधित कंत्राटदारांनी सदर प्रकरणी कोणत्या प्रकारचे प्रमाणपत्र सादर केलेले आहे किंवा केवळ साधे पत्र दिलेले आहे. याबाबत काही कमतरता असेल तर यंत्रणेत सुधारणा करून ती मजबूत करण्यात येईल. देयक अदा करताना तपासणी सूची असली पाहिजे आणि तपासणी सूचीप्रमाणे सर्व प्रकारच्या पूर्तता करण्यात येत असतील तरच देयक अदा केले पाहिजे, अशा प्रकारच्या सूचना एम.जे.पी. कडून दिल्या जातील, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

नाशिकमध्ये माननीय संचालक एम.जे.पी. यांनी १९/०९/२०१८ चे कार्यालयीन पत्र दिनांक २३/१०/२०१८ अन्वये सर्व ठेकेदारांकडून भरणा केलेली चलन सादर करण्याबाबत कळविलेले आहे. संचालक महोदयांनी सांगितले आहे की, त्यांच्याकडे २० पेक्षा कमी कामगार आहेत. एका कंत्राटदाराने चलन सादर केलेले आहे, मात्र इतरांनी असे सांगितले की आमच्याकडे अशी संख्या नाही. अशीच परिस्थिती सांगली व ठाणे या ठिकाणी आहे. ज्यावेळी अंदाजपत्रक तयार करण्यात येते त्यामध्ये किती मनुष्य दिवस लागतील ? ज्या ठिकाणी EPF ची आवश्यकता नाही अशा ठिकाणी आपल्याकडून EPF देण्यात येते काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाकडून देण्यात येत नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

EPF देण्यात येतो असे विभागाच्या अहवालात नमूद आहे. त्यामध्ये ७ कोटी २८ लक्ष एवढा EPF समाविष्ट करून कंत्राटदाराला प्रदाने केली होती असा महालेखापाल यांचा आक्षेप आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी कामांची अंदाजपत्रके बनविण्यासाठी बनविलेल्या दरपत्रकात जिल्हा परिषद यांनी स्वीकृत केलेले कामगार घटकावर ५ टक्के इतका भविष्य निधी अंदाजपत्रकात समाविष्ट केला होता, असे समितीने निदर्शनास आणले असता, अंदाजपत्रकात सर्व प्रकारच्या तरतुदी करण्यात येतात. अशा तरतुदी केल्यानंतर जेव्हा अंदाजपत्रकाप्रमाणे ज्यावेळी कंत्राट देण्यात येते, त्यावेळी कंत्राट घेणाऱ्या व्यक्तीकडे जर २० पेक्षा कमी कामगार असतील तर EPF चे पैसे वाचतात आणि कमी दरात अशा व्यक्ती कंत्राट घेतात कारण त्यांची १२.५ टक्क्याची बचत होणार असते. ज्यावेळी बोली लावून कंत्राट देण्यात येते तेव्हा त्यांचे पैसे वाचतात हे सर्व गृहित धरूनच बोली लावण्यात येते. ज्या मोठ्या कंपन्या आहेत, ज्यांच्याकडे कामगार लोक जास्त आहेत त्यांना १२. ५ टक्के रक्कम भरावयाची आहे असे लोक जास्त रकमेची बोली लावतात. अशा पद्धतीने सर्व प्रक्रिया पार पाडली जाते, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

कंत्राट घेतानाच पैसे कमी करून बोली लावली जाते. याचा अर्थ असा होतो की, ज्यांच्याकडे २० पेक्षा जास्त कामगार आहेत त्यांना १२.५ टक्के जास्त पैसे पाहिजे असतात आणि ज्यांच्याकडे २० पेक्षा कमी कामगार आहेत त्यांना अशी जास्तीची रक्कम नको आहे, असे समितीने मत व्यक्त केले असता, समिती म्हणत आहे तसे नाही कारण १२. ५ टक्के रक्कम जी कामगारांना द्यावयाची आहे, सदर रक्कम कंत्राटदाराने किंवा कंत्राटदार कंपनीने कामगार लोकांना द्यावयाची आहे. कामगारांचा जो दर आहे त्यामध्ये सदर १२. ५ टक्के रक्कम समाविष्ट करण्यात येते. १२. ५ टक्के EPF आणि उर्वरित रक्कम पगार म्हणून देण्यात येते. सदरचा सर्व हिशेब मागे आणि पुढे याप्रमाणे मोजण्यात येतो, त्यामध्ये सर्वसाधारणपणे काही फरक पडत नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

संबंधित कंत्राटदार EPF भरतात की नाहीत याची शहानिशा करण्यात येते की नाही ? असा प्रश्न समितीने केला असता, २० पेक्षा जास्त कामगार आहे किंवा नाहीत याबाबत संबंधित कंत्राटदारांकडून प्रमाणपत्र घेण्यात येते, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

EPF च्या कार्यालयाकडून EPF भरल्याबाबतची खात्री करून घेण्यात येते काय ? असा प्रश्न समितीने केला असता, EPF ची यंत्रणा ही केंद्र सरकारची असून कर्मचारी भविष्य निधी संघटना यांचे कार्यालय मुंबई तसेच दिल्ली येथे आहे. असे ठिकठिकाणी त्यांची कार्यालये आहेत. त्यांचे निरीक्षक आहेत, ते ठिकठिकाणी जाऊन तपासणी करत असतात. कंत्राटदारांना आपल्याच भागात नाही तर सदर बाब सगळीकडे लागू आहे. ज्या ठिकाणी मोठमोठी दुकाने आहेत अशा दुकानदाराला देखील सदर बाब लागू आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सदर बाब ऑनलाईन करण्यात आली पाहिजे कारण १२.५ टक्के रक्कम ही काही लहान असत नाही. बनावट कागदपत्र सादर करून १२.५ टक्के रक्कम ही कित्येक कंपन्यांनी हडप केलेली आहे. हडप करण्यात आलेली रक्कम ही अनेक हजार कोटी रुपयांपर्यंत असू शकेल. शासनाचे सर्व प्रकल्प हे २० पेक्षा कमी कामगार लागतील अशा स्वरूपाचेच नाहीत. शासनाचे कोणते काम असे आहे की ज्या ठिकाणी २० पेक्षा कमी कामगार लागणार आहेत.

सदर १२.५ टक्के रकमेसंदर्भात विभागाने ग्रामीण पाणीपुरवठा समितीबाबत वेगळेच उत्तर सादर केलेले आहे की, कामाची निविदाच काढण्यात आलेली नाही, त्यांनी स्वतःच काम केलेले आहे. विभागाने त्यांना १२.५ टक्के रक्कम दिलेली आहे हा समितीचा मुद्दा आहे. सदर रक्कम त्यांच्याकडून कोणालाही देण्यात आलेली नाही. १२. ५ टक्के रक्कम त्यांनी हडप करून टाकली आहे काय ? असे समितीने निदर्शनास आणले असता, समितीचे काम अॅटपार करण्यात आले आहे. अॅटपार म्हणजे ना कमी ना जास्त, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सदर प्रकरणी कमी जास्तचा मुद्दा नाही तर EPF ची रक्कम वेगळी आहे, असे समितीने मत व्यक्त केले असता, EPF ची रक्कम त्यामध्येच समाविष्ट आहे, असे समितीने मत व्यक्त केले असता, EPF ची रक्कम त्यांच्याकडून देण्यात आलेलीच नाही. EPF ची पूर्ण रक्कम हडप करून टाकली आहे. त्यांना १२.५ टक्के पेक्षा जास्त रक्कम सदर समितीला मिळालेली आहे. ज्या ठिकाणी समिती काम करीत असते अशा ठिकाणी EPF ची रक्कम देण्याचे काय कारण आहे ? राज्यात जेथे सुपर स्पेशालिटी रुग्णालय आहे त्या ठिकाणी रक्कम भरण्यात आलेली नाही. शासनाकडून EPF ची रक्कम मिळवून अकोला येथील EPF च्या कार्यालयात भरण्यात आलेली नाही. बनावट चालान भरण्यात आले, असे समितीने चलन निदर्शनास आणले असता, त्यासाठी ई.पी.एफ. ओ. चे इन्स्पेक्टर धाडी टाकून कारवाई करीत असतात, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ग्रामीण पाणीपुरवठा समितीकडे २० पेक्षा अधिक व्यक्ती नसतात. असे असताना १२.५ टक्के ई.पी.एफ. देण्यात येत आहे, असे समितीने विचारले असता, समितीला पैसे देण्यात येत असतात, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीला प्रोजेक्ट कॉस्टप्रमाणे पैसे देण्यात यावेत, असे समितीने सूचित केले असता विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

अंदाजपत्रकामध्ये हे पैसे दिले पाहिजेत. इन्शुरन्स, उपकर किंवा इतर सर्वांचे पैसे अंदाजपत्रकामध्ये गृहीत धरण्यात यावेत. परंतु पैसे देताना कंत्राटदाराकडून प्रतिज्ञापत्र घेण्यात यावे. जर कंत्राटदाराने सांगितले की, इन्शुरन्स देणार नाही तर एक टक्के पैसे कमी देण्यात यावेत. अशा प्रकारचे धोरण विभागाने ठरवावे. जेणेकरून अधिकचे पैसे द्यावे लागणार नाही, अशी सूचना समितीने केली असता, समितीच्याबाबत काही अडचणी होत्या, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सद्यःस्थितीत काही योजना समिती पूर्ण करीत आहे. सन २०१८ नंतर जिल्हा परिषद, एम. जे. पी. नवीन योजना घेत आहे. परंतु ज्या योजना पूर्वीपासून सुरू आहेत त्या सर्व योजना ही समितीच पूर्ण करेल, असे मत समितीने व्यक्त केले असता, कृती समिती जर सहा महिन्यामध्ये या योजना पूर्ण करीत असेल तर त्यांनी त्या योजना पूर्ण कराव्यात अन्यथा त्या अर्धवट स्वरुपात असल्यातरीही त्या योजनांचे हस्तांतरण करण्यात यावे, अशा प्रकारचे आदेश देण्यात आले आहेत, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

विभागाला ई.पी.एफ. कट करून भरता येणार नाही काय ? असा प्रश्न समितीने विचारले असता, विभागीय सचिवांनी नकारार्थी उत्तर दिले.

विभागाने कंपनीकडून पैसे भरण्याबाबतचे प्रतिज्ञापत्र घेतले पाहिजे. जर ई.पी.एफ. लागू होत नाही असे कंपनीने सांगितले तर १२. ५ टक्के ई.पी.एफ. ची रक्कम रद्द करण्यात यावी. त्याचप्रमाणे इन्शुरन्स केला नसेल तर एक टक्का रक्कम कमी करण्यात यावी. अशा प्रकारचे प्रतिज्ञापत्र घेऊन विभागाने अतिरिक्त पैसे दिले पाहिजे. परंतु विभाग याबाबतची कोणतीही चौकशी न करता पैसे देत असतो असे मत समितीने व्यक्त केले असता, याबाबतचा सखोल अभ्यास करण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने दिलेले पैसे कंत्राटदार किंवा या समितीकडे राहू नयेत. You should take care that the payment should be posted in proper place, अशी सूचना समितीने केली असता, विभागीय सचिवांनी सहमती दर्शविली तसेच सध्या या समितीमार्फत जे काही काम होत आहे त्यामध्ये १२. ५ टक्के प्रमाणे काय हिशेब राहणार आहे, याची माहिती घेण्यात येईल, असे समितीस अवगत केले.

बांधकाम विभागाने ज्याप्रमाणे नियम तयार केलेले आहेत की, एक इमारत तयार करण्यासाठी जेवढी रॉयल्टी लागते तशा प्रकारची तरतूद किंवा नियम तयार केले तर शासनाच्या तिजोरीमध्ये तेवढा निधी जमा होईल. शासन बिल तयार करीत असते. त्यानंतर तो कंत्राटदार बिल भरतो किंवा नाही, याची माहिती विभागाला होत नाही. असे असताना विभागाकडून ते बिल वसूल केले जाते. एखादे बांधकाम करीत असताना त्यासाठी वाळू, ब्रिक्स लागते याची माहिती घेऊन तेवढी रॉयल्टी सबमिट केली जाते. त्यानंतर बिल जमा निघते. दुसरे असे की एस्टीमेट तयार करीत असताना ते काम करण्यासाठी किती मनुष्य दिवस लागतील या अधारे एस्टीमेट तयार केले जाते. यासर्वामध्ये कंत्राटदाराचा अप्रत्यक्षरित्या फायदा होत असतो. रॉयल्टीप्रमाणे काम करण्यात यावे. जो पर्यंत रॉयल्टीची पावती मिळत नाही, तो पर्यंत कंत्राटदाराला पैसे मिळत नाहीत. काही वेळा रॉयल्टीचे पैसे विभागामार्फत कापण्यात येत असतात, असे समितीने निदर्शनास आणले असता, याबाबतची कार्यवाही करण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वास्त केले.

विभागाने दिलेल्या अॅडव्हान्स रकमेबाबतची माहिती देण्यात यावी, असे समितीने सूचित केले असता, काही ठिकाणी समितीने काम लवकर होण्याच्या दृष्टीने कंत्राटदाराला म्हणजेच कंत्राटदाराने त्याच कामासाठी पुन्हा दुसरा कंत्राटदार नियुक्त केला होता, त्यांना अॅडव्हान्स दिलेले आहेत. ज्यावेळी समितीला काम दिले जाते त्यावेळी समिती इतरांमार्फत काम करून घेत असते. त्यानंतर त्या कंत्राटदाराला अॅडव्हान्स दिला जात असतो. तरीही ज्या समितीने अॅडव्हान्स रकमा दिलेल्या आहेत त्याबाबत विशेष असे काही करता येणार नाही. परंतु जर कंत्राटदाराला विभागाच्या अधिकाऱ्यांनी अॅडव्हान्स रकमा दिलेल्या असतील तर तो अॅडव्हान्स का देण्यात आला याची माहिती घेण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

शासनाने असा नियम केलेला आहे की, अॅडव्हान्समध्ये पेमेंट करावयाचे नाही, असे प्रधान महालेखापाल यांनी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी सदर बाब मान्य केली.

कंत्राटदाराला अॅडव्हान्समध्ये पेमेंट मिळत नाही. समितीला पेमेंट दिले जात असते. यामध्ये समितीने अॅडव्हान्स पेमेंट दिलेले आहे, असा हा सर्व प्रकार आहे. विभागाने थेट कोणत्याही कंत्राटदाराला पैसे दिलेले नाहीत. परंतु ही बाब योग्य नाही, असे समितीने मत व्यक्त केले असता, यामुळेच समितीकडील काम परत घेण्यात आलेले आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

परंतु यामध्ये एक चांगली गोष्ट झाली आहे की, शेवटी सर्व वसुली करण्यात आलेली आहे. परंतु असे प्रकार होणे योग्य नाही. या सर्वांसाठी योग्य नियमावली तयार करण्यात यावी, अशी सूचना समितीने केली असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली तसेच ठीक आहे. सध्या ज्या समितीमार्फत अशा प्रकारचे काम सुरू आहे त्या समित्यांना सूचना देण्यात येतील, असे समितीने अवगत केले.

मजुरीसाठी विभागाने क्रॉस चेकद्वारे पेमेंट केलेले आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, या प्रकरणामध्ये रोख पैसे काढून ते मजुरांना देण्यात आलेले आहेत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

पैसे मजुरांच्या बँक खात्यामध्ये देण्याबाबत शासनाचे धोरण आहे. परंतु असे न करता रोखीने पैसे काढण्यात आलेले आहेत. रोखीने पैसे काढत असताना त्यामध्ये अपहार होण्याची शक्यता अधिक असते. रोजगार हमी योजनेचे पैसे देखील मजुरांच्या खात्यावर जमा केले जात असतात, असे समितीने मत व्यक्त केले असता, जनधन योजना सुरू झाल्यानंतर सर्वांच्या खात्यामध्ये पैसे टाकले जातात आणि आता डी. बी. टी. द्वारे पैसे देण्यात येत आहेत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

मजुरांना रोखीने पैसे कोणत्याही कंत्राटदाराने देऊ नये, अशा प्रकारचे नियम विभागाने तयार केले पाहिजेत. सर्वांना चेकद्वारे पेमेंट केले पाहिजे, अशी सूचना समितीने केली असता, कंत्राटदाराबाबत विभागाला काही करता येणार नाही. परंतु समितीबाबत अशा प्रकारचे आदेश देण्यात येतील, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

परिच्छेद क्रमांक ३.४.७ - कार्यक्रमाची अंमलबजावणी

परिच्छेद क्रमांक ३.४.७.११ व्याप्ती आणि पाणी गुणवत्ता

या परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे दर दिवशी ४० एल.पी.सी. डी. प्रमाणे मार्च, २०१२ पर्यंत पाणी मिळावयास हवे होते. त्यामुळे मार्च, २०१७ ची याबाबतची काय सद्यःस्थिती आहे. सर्व गावे ४० एल.पी.सी.डी. नुसार आलेले आहेत काय? अशी विचारणा समितीने केले असता, सन २०१८ च्या आकडेवारीनुसार ९० टक्के लोकांना ४० लिटरने पाणी देण्यात येत आहे. उर्वरित लोकांना अद्यापही ४० लिटर प्रति व्यक्तीप्रमाणे पाणी देणे शक्य झालेले नाही. याबाबत कार्यक्रम सुरू आहे. काही जिल्ह्यामध्ये पाईप वॉटरचे कव्हरेज ५० टक्के आहे. म्हणजेच ५० टक्के लोकसंख्येला पाईपद्वारे पाणीपुरवठा केला जातो. काही जिल्ह्यामध्ये हे ७५ टक्के पाईपद्वारे पाणीपुरवठा केला जातो. यामध्ये काही जिल्हे मागे राहिलेले आहेत. जे मागासलेले जिल्हे आहेत त्यांना जास्तीत जास्त पाईपद्वारे पाणीपुरवठा करण्याचे नियोजन करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

विभागाने दिलेल्या माहितीमध्ये ० टक्के ते २५ टक्के व २५ टक्के ते ५० टक्के ही जी माहिती दिली आहे, ती कशा संदर्भात आहे, अशी समितीने विचारणा केले असता, जो जिल्हा किंवा गाव २५ टक्क्यांपेक्षा कमी किंवा २५ टक्क्यांपर्यंत पाईपलाईनद्वारे पाणीपुरवठ्यासाठी कव्हर झालेला आहे, अशा गावांना प्राधान्याने पाईपलाईनद्वारे पाणीपुरवठा केला पाहिजे. त्या जिल्ह्यात अधिकाधिक योजना राबविल्या पाहिजेत. परंतु प्रत्यक्षात ज्यावेळी आराखडा तयार करण्यात येतो त्यावेळी अशा प्रकारचे मुद्दे बाजुला राहतात. टंचाईग्रस्त भागामध्ये लोकप्रतिधीकडून मागणी येत असते. परंतु त्या जिल्ह्यात जरी ९० टक्के पाईपवॉटरने पाणीपुरवठा होत असेल आणि त्या ठिकाणी जर टँकरद्वारे पाणीपुरवठा होत असेल तर अशा प्रकारे ते गाव नळ पाणीपुरवठा योजनेसाठी प्राधान्याने घेतले पाहिजे. ज्यावेळी याबाबत विभागाच्या स्तरावरून आढावा घेण्यात येतो त्यावेळी कोणत्या जिल्ह्यामध्ये किती योजना घ्यावयास पाहिजेत, याची माहिती घेतली जाते, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

६८ टक्के लोकांना ४० लिटर प्रति व्यक्ती प्रमाणे पाणीपुरवठा करण्यात येत असल्याचे विभागाने नमूद केलेले आहे. परंतु पुणे जिल्ह्यामध्ये ३२५ लिटर प्रति व्यक्ती याप्रमाणे पाणीपुरवठा केला जात आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, तसेच जळगाव जिल्ह्यामध्ये हे प्रमाण ४८ लिटर प्रति व्यक्ती असे आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, शहर आणि ग्रामीण भागासाठी स्वतंत्र नियम आहेत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

हे प्रमाण ४० लिटर प्रति व्यक्तीपासून ५५ लिटर प्रति व्यक्तीपर्यंत करण्यात यावे, अशा प्रकारचे धोरण ठरविण्यात आलले आहे. परंतु विभागाने ४० लिटर प्रति व्यक्तीचे उद्दिष्ट अद्यापपर्यंत गाठलेले नाही, असे समितीने निदर्शनास आणले असता, सध्या ५५ लिटर प्रति व्यक्तीप्रमाणे पाणीपुरवठा करण्यात येत नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ज्या ठिकाणी ४० लिटर प्रति व्यक्तीप्रमाणे पाणीपुरवठा होत असेल त्या ठिकाणी ५५ लिटर प्रति व्यक्तीप्रमाणे पाणीपुरवठा करण्यात यावा, अशा प्रकारचे केंद्र शासनाचे धोरण आहे काय ? असा प्रश्न समितीने केला असता, विभागीय सचिवांनी नाही असे उत्तर देत अजूनपर्यंत ४० लिटर प्रति व्यक्तीचे उद्दिष्ट गाठण्यात आलेले नाही. एखाद्या गावामध्ये ४० लिटर प्रति व्यक्ती पाणी देण्याची योजना राबविली आणि पुढील पाच वर्षानंतर त्याच गावामध्ये ५० लिटर प्रति व्यक्ती प्रमाणे पाणी द्यावयाचे असेल तर त्यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च येतो. त्यासाठी सर्व पाईपालाईन बदलाव्या लागतात. कारण अधिकचे पाणी द्यावे लागते. त्यामुळे ५५ लिटर प्रति व्यक्तीप्रमाणे पाणी देण्यासाठी सध्या विभागाने विचार केलेला नाही. केवळ शहरालगतच्या गावांना ७० लिटर प्रति व्यक्तीप्रमाणे पाणी देण्याचे निर्धारित केलेले आहे, असे समितीस अवगत केले.

संपूर्ण हेबिटेशनला ४० टक्केप्रमाणे पाणी देण्यासाठी कोणते नियोजन विभागाने केलेले आहे, असा प्रश्न समितीने केला असता, साधारणपणे दरवर्षी विभागाकडे २ हजार कोटी रुपये उपलब्ध असतात. केंद्र शासन, मागील शिल्लक, डी. पी. डी. सी. या सर्वांचा मिळून साधारणपणे १७०० ते १८०० कोटी रुपयांचा आराखडा होतो. त्यामधून या योजना करावयाच्या असतात. त्याचप्रमाणे विभागाच्या योजनांचे नियोजन तीन पटींमध्ये करावयाचे असते. त्यामुळे विभागाकडून ६ ते ७ हजार कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात येत असतो. केंद्र शासनाला सांगण्यात आले होते की, महाराष्ट्रात टंचाईचा भाग अधिक आहे. त्यामुळे पाण्याची मागणी अधिक असते. ज्या गावामध्ये ४० लिटर प्रति व्यक्ती पाणी दिलेले आहे परंतु तो भाग टंचाईग्रस्त असेल तर त्या भागामध्ये सरफेस वॉटरची योजना तयार केली पाहिजे. या योजना भुगर्भातील पाण्यावर आधारित आहेत. या योजना अयशस्वी ठरत

आहेत. अशा ठिकाणी प्रादेशिक पाणीपुरवठा योजना दिल्या पाहिजेत, अशा प्रकारचे नियोजन सध्या करण्यात येत आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

महाराष्ट्रामध्ये टंचाईग्रस्त गावे कोणती राहणार आहेत, हे जाहीर केलेले आहे काय ? टंचाईग्रस्त गावांच्या टंचाईमुक्तीसाठी विभागाने कायमस्वरुपी उपाय योजले पाहिजेत. एखाद्या जिल्ह्यातील काही टंचाईग्रस्त गावांच्या पाणीपुरवठा योजना विभागाने तयार केल्या आहेत काय ? महाराष्ट्र शासन काही नाविन्यपूर्ण योजना तयार करणार आहे काय ? ४० लिटर प्रति व्यक्ती पाणी दिले पाहिजे त्यानंतर पुन्हा ५०, ७० लिटर प्रति व्यक्ती अशा प्रकारे पाणी दिले पाहिजे, हे केंद्र शासनाने सांगितलेले आहे. परंतु एखाद्या तालुक्यांमधील जर दहा गावे टंचाईग्रस्त असतील त्या दहा गावांचा पाणीपुरवठा योजनेमध्ये समावेश झालेला आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, भुगर्भातील पाण्यावर आधारित ८५ टक्के योजना महाराष्ट्रात आहेत. भूगर्भातील पाण्याच्या गुणवत्तेबाबत ठिकठिकाणी समस्या निर्माण झाल्या आहेत. दुसरे असे की, अनेक ठिकाणी पाणी उपलब्ध होत नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

चंद्रपूर जिल्ह्यातील गावांची यादी विभागाकडे आहे. चंद्रपूर जिल्ह्यामधून मुख्यमंत्री महोदयांच्या व्हिडिओ कॉन्फरन्समध्ये उपस्थित केला होता. त्याबाबत मुख्यमंत्री महोदयांनी जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश दिले होते. त्या ठिकाणचे पाणी दूषित असल्याबाबतचा अहवाल विभागाकडे यापूर्वीच पाठविण्यात आलेला आहे. असे असतानाही त्या ठिकाणी कोणत्याही उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत व ज्या उपाययोजना केल्या असतील त्या परिणामकारक नाहीत. चंद्रपूर जिल्ह्यामध्ये ५२ गावांचा सर्वे करण्यात आला होता, असे समितीने निदर्शनास आणले असता, चंद्रपूर जिल्ह्यामध्ये १०९ आर. ओ. प्लँट मंजूर करण्यात आलेले आहेत, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

परंतु आर. ओ. प्लँटमध्ये दूषितच पाणी जाणार. त्या गावांच्या कायमस्वरुपी पाणीपुरवठा योजना विभागाकडून तयार करण्यात आल्या पाहिजेत. या सर्वांवर कायमस्वरुपी उपाय योजले पाहिजेत. व्हिडीओ कॉन्फरन्समध्ये मुख्यमंत्री महोदयांनी अंदाजपत्रकात आवश्यक तेवढा निधी दिल्यामुळे ४ वर्षापूर्वीच्या अपूर्ण असलेल्या पाणी पुरवठ्याच्या योजना पूर्ण झाल्या, अशी माहिती सचिवांनी दिली होती, असे समितीने निदर्शनास आणले असता, चंद्रपूर जिल्ह्यातील अनेक भागातील तसेच गावांमधील भूगर्भातील पाण्याचा स्रोत दूषित आहे. त्यामुळे चंद्रपूर जिल्ह्यात आरओ प्लॅन्ट आणि डीफयू प्लॅन्ट कार्यान्वित केलेले आहेत. ही तात्पुरती योजना आहे हे यापूर्वी देखील सांगितले होते. भूगर्भातील पाण्यावर अवलंबून न राहता सरफेस वॉटर आधारित रिजनल वॉटरच्या योजना कार्यान्वित करीत आहोत. सदरहू योजना केवळ चंद्रपूर जिल्ह्यात नव्हे तर मराठवाड्यातील अनेक भागात अशा प्रकारच्या योजना कार्यान्वित केलेल्या आहेत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

एप्रिल आणि मे महिन्यात सरफेस वॉटर त्या ठिकाणी असणार आहे काय ? असा प्रश्न समितीने केला असता, जिल्हाधिकाऱ्यांना पाण्याचे नियोजन करण्याबाबत आवश्यक त्या सूचना निर्गमित केलेल्या आहेत. सद्यःस्थितीत जिल्ह्यात पाणी शिल्लक राहणार नाही, बाहेरुन आणावे लागेल असे कोणीही सांगितलेले नाही. काल मी सर्व मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसमवेत यासंदर्भात चर्चा केलेली आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ज्या ठिकाणी दूषित पाणी आहे, अशा ठिकाणी सरफेस वॉटर योजना लवकरात लवकर कार्यान्वित केली पाहिजे, असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

एवढे वर्ष होऊनसुद्धा ग्राऊंड वॉटरवर ठेवले जाणार, सरफेस वॉटरपर्यंत आणणार नाही, तोपर्यंत हा विषय सुटणार नाही, असे मत समितीने व्यक्त केले असता, ज्या ठिकाणी १० ते २० कि. मी. च्या अंतरावर सरफेस वॉटर उपलब्ध आहे, त्या ठिकाणाहून ते आणण्यासाठी प्रयत्न केला जात आहे. रिजनल योजनेवर विभागाने लक्ष केंद्रीत केलेले आहे. आतापर्यंत रिजनल योजना बंद पडत होत्या, असा अनुभव होता. आता एमजीपींना सर्व रिजनल योजना सुरू ठेवण्यासाठी योग्य त्या सूचना दिलेल्या आहेत. त्या योजना सुरू ठेवण्यासाठी निधी कमी पडत असेल तर तो शासनाकडून दिला जाणार आहे. सद्यःस्थितीत कोणतीही अडचण नाही. विभागाने अनेक रिजनल योजना हाती घेतलेल्या असून, त्यासंदर्भातील यादी हवी असल्यास ती समितीला देण्यात येईल. मराठवाड्यातील १७० गावांसाठी योजना हाती घेतलेली आहे. तसेच मूल तालुक्यात २० गावांसाठी योजना हाती घेतलेली आहे. पाण्याचा साठा लांब असेल तर त्या योजना सुरू करणे परवडत नाही. त्या ठिकाणी रिजनल योजना हाती घ्यावी लागते, असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

परिच्छेद क्रमांक ३. ४. ७. २ नळ पाणीपुरवठा पुरविण्यात तूट

या परिच्छेदामध्ये विभागाने नळ पाणीपुरवठा योजना ही ६८ टक्के पूर्ण झालेली आहे, अशी माहिती दिलेली आहे. ६ जिल्ह्यांचा सर्व्हे झालेला असून, त्या ठिकाणी ५० टक्क्यांपेक्षा कमी वस्त्यांना नळ पाणीपुरवठा केला जातो, असे सांगण्यात आले आहे, यासंदर्भात माहिती देण्यात यावी अशी समितीने सूचना केली असता, भारताच्या तुलनेने महाराष्ट्रातील लोकांना पाईपलाईनद्वारे पाणीपुरवठा केला जातो. भारतामध्ये त्याची टक्केवारी खूपच कमी आहे. भारत देश खूप मोठा आणि प्रत्येक ठिकाणची टोपोग्राफी, जॉग्रफी वेगवेगळी आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

इतरांशी तुलना न करता विभागाने आपली तुलना करावी. विभागाने ५० टक्क्यांपेक्षा अधिक उद्दिष्ट साध्य केलेले नाही. प्रधान महालेखाकारांनी औरंगाबाद ४८ टक्के, गडचिरोली २० टक्के, नंदूरबार २० टक्के, पालघर ३७ टक्के, सोलापूर ४६ टक्के आणि यवतमाळ ४६ टक्के पाणीपुरवठा केला जातो असा आक्षेप नोंदविलेला आहे. हे सर्व मागासलले जिल्हे आहेत. या सर्व जिल्ह्यांमध्ये ५० टक्क्यांपेक्षा कमी पाणीपुरवठा केला जाता आहे. दुसरीकडे असे सांगितले जाते की, राज्यातील अनेक गावांमध्ये ६८ टक्के पाणीपुरवठा केला जातो. परंतु, उपरोक्त ६ जिल्ह्यांमध्ये ५० टक्क्यांपेक्षा कमी पाणीपुरवठा केला जात आहे. किती जिल्ह्यांमध्ये ५० टक्क्यांपेक्षा कमी पाणीपुरवठा केला जातो ? अशी विचारणा समितीने केली असता, उस्मानाबाद, नंदूरबार, गडचिरोली जिल्हे ॲस्प्रिशन म्हणून निवडले आहेत. केंद्र शासनाने या जिल्ह्यांसाठी स्वजल अशी एक वेगळी योजना कार्यान्वित करण्यासाठी

दिलेली आहे. ज्या जिल्ह्यांमध्ये ५० टक्क्यांपेक्षा कमी पाणीपुरवठा केला जातो अशा जिल्ह्यांना कव्हर करण्यासाठी विभागाने नियोजन आखलेले आहे. हे जिल्हे डोंगरी भागातील आहेत. त्या ठिकाणी वस्ती कमी आहे आणि त्या ठिकाणी योजना कार्यान्वित करावयाची म्हटले तर ती परवडणारी नसते. तसेच ती खर्चिक असते, विजेचा खर्च मोठ्या प्रमाणावर येतो, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

शासन म्हणून योजना परवडणारी नाही, असे उत्तर दिले जात असेल तर ते योग्य नाही. त्यामुळे पाण्याचे खाजगीकरण करावे असे विभागाला वाटत आहे काय ? लोकांना प्राधान्याने पाणी दिलेच पाहिजे. After all it is mandatory duty of the Government, असे मत समितीने व्यक्त केले असता, शासनाचा खर्च दरडोई २ हजार, ३ हजार रुपये, असे निकष निश्चित केलेले आहेत. निकषापेक्षा जास्त खर्च असलेल्या खर्चिक योजनांना मंजुरी दिलेली आहे. उच्चाधिकार समिती आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेतली जाते. गडचिरोली, पालघर आणि नंदूरबार येथील लहान वाड्या, वस्त्यांमध्ये हॅण्डपंप कार्यान्वित केलेले आहेत. त्या जिल्ह्यांमध्ये योजना कार्यान्वित करणे शक्य होत नाही. स्वजल योजनेबाबत माहिती दिलेली आहे. पाणी सर्वांना दिले जात आहे. १६ टक्के लोकसंख्या असलेला लोकांना नळाद्वारे पाणी दिले जात नाही. ८४ टक्के लोकसंख्या असलेल्या लोकांना नळाद्वारे पाणी दिले जाते, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

एखाद्या गावात बोअरवेलमध्ये मुबलक प्रमाणात पाणी असेल तर त्या ठिकाणी ट्युबवेल करून पाणीपुरवठा केला पाहिजे. पण असे होत नसल्यामुळे बोअरवेलवर अवंलबून राहतो. टयुबवेल केले तर निश्चितपणे नळाद्वारे पाणीपुरवठा केला जाऊ शकतो. घरगुती नळ कनेक्शनमध्ये नवीन योजना कंम्पलसरी केलेले आहे. जुन्या घरगुती नळ कनेक्शनला देखील प्रोत्साहन देण्याची गरज आहे. नवीन योजनेमध्ये सर्वांना कनेक्शन द्यावी लागणार अशी अट टाकलेली आहे. पण जुन्या योजनेचे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, यासंदर्भात राज्य किंवा केंद्र शासनाने कोणतीही सूचना केलेली नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

जोपर्यंत घरगुती नळ कनेक्शन दिली जाणार नाहीत तोपर्यंत ही योजना चालविता येणार नाही. जोपर्यंत घरगुती नळ कनेक्शन दिली जात नाही तोपर्यंत या योजनेला पुढे चालविता येणार नाही. जुन्या योजनांना देखील प्रोत्साहन दिले पाहिजे. नळ जोडणी आणि व्यक्तिगत कनेक्शन असा परिच्छेद आहे. नवीन योजनेला १०० टक्के बंधनकारक केलेले आहे असे विभागाने सांगितले आहे. जुन्या योजनांना देखील प्रोत्साहन दिले पाहिजे. त्यांना नळाचे कनेक्शन फ्रिमध्ये दिले पाहिजे. कनेक्शन घेण्यासाठी ५ ते ६ हजार रुपये घेतले जाते. यासंदर्भात प्रिपेड कार्ड कार्यान्वित करण्याची आवश्यकता आहे. सद्यःस्थितीत नळ कनेक्शनला कोणताही दर घेतला जात नाही. आज आपण लोकांना व्यक्तिगत पिण्याचे पाणी देऊ शकत नाही. हे मुंबई शहरात शक्य नाही. पायलट प्रोजेक्ट म्हणून एखादा एरिया घेण्याची आवश्यकता आहे. नवीन योजनेमध्ये व्यक्तिगत कनेक्शन दिले जाताना अट टाकली जाणार असे विभागाने सांगितले आहे. परिणामी नवीन व्यक्तिगत कनेक्शनची संख्या वाढणार आहे. जुन्या योजनांना देखील प्रोत्साहन दिले पाहिजे. असे केले तर त्या योजना चालतील. ग्रामपंचायत स्तरावर लोकांना पाणी मिळत असेल तर ते खूप चांगले आहे. पैशाची आवक नसल्यामुळे योजना पुढे सुरू राहत नाही. त्यामुळे लिमिटेड लोक कनेक्शन घेतात. ॲम्नेस्टी दाखल करण्याची आवश्यकता आहे. जुन्या योजनेचा शिल्लक निधी आहे. ॲम्नेस्टी तयार करण्याची गरज आहे. सर्व योजना नवीन योजनेमध्ये समाविष्ट करण्याची गरज आहे. व्यक्तिगत कनेक्शन देण्यासाठी आवश्यक ती मदत देण्याची आवश्यकता आहे. यासाठी ६ महिन्यांचा अवधी देण्याची गरज आहे. त्यानुसार सर्व योजना नवीन योजनेमध्ये समाविष्ट कराव्यात, अशी सूचना समितीने केली असता, लोकांची ॲम्नेस्टीबाबत मागणी असून, त्यासंदर्भात विचार केला जाणार आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

एक कनेक्शन देण्यासाठी ३ हजार रुपयांच्या आसपास खर्च येतो. आता ५० टक्के पैसे भरावेत आणि ५० टक्के पैसे शासनामार्फत दिले जाणार आहे, असे सचिवांनी समितीस अवगत केले.

विभागाने ५० टक्के पैसे शासनामार्फत दिले जातील असे सांगितले आहे. त्यानुसार हा विषय मंत्रिमंडळात उपस्थित करून त्यास मान्यता घेतली पाहिजे, अशी सूचना समितीने केली असता विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

परिच्छेद क्रमांक ३.४.७.३ - दूषित पाण्याने बाधित वस्त्या

या परिच्छेदाच्या अनुषंगाने सद्यःस्थिती सांगावी, अशी सूचना समितीने केली असता, याबाबतची सन २०१२-२०१३ पासून ते सन २०१६-२०१७ पर्यंतची माहिती विभागाने सादर केलेली आहे. प्रत्येक वर्षी दूषित पाण्याने बाधित असलेले बरेच गाव कव्हर करण्यात आलेले आहेत. तसेच, सध्याही अनेक गावांची माहिती वेळोवेळी प्राप्त होत आहे. महाराष्ट्रातील ८५ टक्के गावांतील पाणीपुरवठा योजना ही ग्राऊंड वॉटरवर आधारित आहे. ग्राऊंड वॉटरची क्वालिटी दिवसेंदिवस खराब होत चालली आहे. त्यामध्ये केमिकल कंटॅमिनेशन वाढत आहे. प्रामुख्याने क्षार व नायट्रेटचे प्रमाण वाढत आहे. काही ठिकाणी फ्लोराईडही आढळत आहे. ज्या ज्या ठिकाणी पाण्यामध्ये फ्लोराईड आढळते तेथे डि-फ्लोरिडेशन प्लांट दिले पाहिजेत. त्याकरिता नीती आयोगाने विभागाला २४ कोटी रुपयांचा निधी दिला होता. या कामाचे टेंडर काढून आदेश देण्यात आलेले आहेत. या आदेशाप्रमाणे बरेच काम झाले असून थोडे काम शिल्लक राहिलेले आहे. ज्या गावामध्ये हे काम करण्याकरिता जातो त्यावेळेस गावामध्ये त्याकरिता जागा व विजेची उपलब्धता असली पाहिजे. वीज उपलब्ध असली तरी ग्रामपंचायतीच्या वीज विभागाचे कोणतेही देणे नसले पाहिजे. कारण थकबाकी असेल तर विजेचे कनेक्शन मिळत नाही. त्यामुळे त्या ठिकाणी प्लांट बसविले जात नाहीत व गाव बदलावा लागतो, दुसरा गाव पहावा लागतो. अशा गोष्टींमुळे काही ठिकाणी थोडी अडचण आलेली आहे. परंतु, विभागाचे हे काम सुरू आहे.

त्याच प्रमाणे ठिकठिकाणी RO प्लांट देण्याचे विभागाचे नियोजन सुरू आहे. मागे विभागाने ३५० RO प्लांट बसविण्याचे टेंडर फायनल केले. त्या कामाचे आदेशही देण्यात आलेले आहेत. RO प्लांटचे ते तिसरे टेंडर होते. आता आम्ही काल चौथे टेंडर इश्यु केलेले आहे. त्यामध्ये या व्यतिरिक्त जे गाव येणार आहेत त्यामध्येही RO प्लांट बसविण्याचे विभागाचे नियोजन आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

सन २०१७ मध्ये ३०४ गाव प्रलंबित होते. याबाबतची सद्यःस्थिती सांगावी, अशी सूचना समितीने केली असता, हे ३०४ गाव तेच आहेत का, याबाबतची माहिती उपलब्ध नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

३०४ गाव सन २०१२-२०१३ पासून प्रलंबित आहेत. सन २०१२-२०१३ मध्ये जेवढे गाव होते त्यापैकी ३०४ गाव प्रलंबित आहेत. उर्वरित १३०६७ गावांचे टॅकलिंग केले. हे ३०४ गाव मागील २ वर्षांमध्ये कोठपर्यंत आले, सन २०१७-२०१८ व सन २०१८-२०१९ या कालावधीत या ३०४ गावांची परिस्थिती काय आहे? विभागाकडे पैसे उपलब्ध असतानाही सन २०१७ पर्यंत एकूण ३८ कोटी ९६ लक्ष रुपये अखर्चित राहिले आहेत. विभागाला निधी उपलब्ध झाला. तो केंद्र सरकारच्या अंतर्गत तसेच नीती आयोगामार्फतही मिळाला. विभागाला एकूण ६२ कोटी ५० लक्ष रुपये मिळाले. त्यापैकी ३८ कोटी ९६ लक्ष रुपये मार्च, २०१७ अखेर अखर्चित आहेत. ३०४ गाव ६० वर्षांपासून गुणवत्ताबाधित आहेत. कदाचित ही संख्या आजच्या तारखेला कमी झालेली असेल. ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. त्यामध्ये काही नवीन गावांचा समावेश होईल, काही जुन्या गावांचा समावेश होईल. आपण चर्चा करीत असताना ते गाव टॅकल झाले की नाही हा चिंतेचा विषय आहेच, असे मत समितीने व्यक्त केले असता, नीती आयोगाकडून २४ कोटी ८ लक्ष रुपयांचा निधी प्राप्त झाला होता. त्याबाबत समितीला माहिती दिली होती की, पाचवे टेंडर काढले तेव्हा विभागाला त्याचा प्रतिसाद मिळाला. पहिल्या चार टेंडरमध्ये प्रतिसाद मिळाला नाही. त्यामध्ये विभागाचे सव्वा वर्ष वाया गेले. पाचव्या टेंडरमध्ये सर्व अटी व शर्ती बदलल्यामुळे प्रतिसाद मिळाला व शेवटी ऑर्डर देण्यात आली. त्या प्रमाणे १२२ डि-फ्लोरिडेशन प्लांटची ऑर्डर देण्यात आली. त्यातील काही ठिकाणी शिल्लक राहिले आहे. मात्र बाकीच्या ठिकाणी ते कार्यान्वित केलेले आहेत, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

समितीला स्पेसिफिक उत्तर पाहिजे. ३०४ गावांची सद्यःस्थिती काय आहे, सन २०१७ मध्ये अखर्चित राहिलेल्या ३८ कोटी रुपयांची सद्यःस्थिती काय आहे? विभाग पुढील २ वर्षांमध्ये ते खर्च करू शकला नाही याचा अर्थ नियोजन योग्य नाही असे म्हणावे लागेल. कारण सन २०१७ मध्ये ३८ कोटी अखर्चित होते. समितीला याबाबतची आजच्या तारखेची सद्यःस्थिती पाहिजे की, ३०४ गावांपैकी किती गाव विभागाने टॅकल केले, तसेच केंद्र सरकार व नीती आयोगाकडून विभागाला जो निधी मिळाला त्यातील ३८ कोटी रुपये अखर्चित होते. त्यातील किती पैसे आता उरलेले आहेत ? विभागाने दिलेल्या माहितीमध्ये नमूद केले आहे की, १३० गाव झाले, त्यांना टॅकल करण्यात येईल. ६५ गावांमध्ये डि-फ्लोरिडेशन झालेले आहे. RO संयत्रे लावलेली आहेत. ३०४ पैकी किती गावांमध्ये आजच्या तारखेला सद्यःस्थितीमध्ये शुद्ध पाणीपुरवठा करण्याचे काम झाले आहे त्याची माहिती समिती द्यावी, अशी सूचना समितीने केली असता, ३०४ गावांपैकी ६५ गावांमध्ये यंत्रे कार्यान्वित करण्यात आलेले आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाच्या माहितीमध्ये असे नमूद केले आहे की, ६५ गावांमध्ये RO सयंत्र लावले आहे, ६६ गावांमध्ये ते काम प्रगतीपथावर आहे. फ्लोराईड बाधित गावांना शुद्ध पाणीपुरवठा करण्याकरिता १०७ D. F. U. ची ऑर्डर दिली आहे. ६० D. F. U. कार्यान्वित करून ग्रामस्थांना शुद्ध पाण्याचा पुरवठा होत आहे. उर्वरित ४७ D. F. U. चे काम सुरू आहे, असे जरी असले तरी यांची बेरीज ३०४ होत नाही. समितीला ३०४ गावांची पूर्ण माहिती द्यावी. या ३०४ पैकी किती गावे आतापर्यंत टॅकल झालेली आहेत, किती गावांमध्ये आजच्या तारखेला काम सुरू आहे आणि किती गाव अजूनही टॅकल करण्यात आलेले नाहीत, याची माहिती असलेला एक चार्ट समितीला तयार करून द्यावा. ३८ कोटी ९६ लक्ष रुपयांच्या अगेन्स्ट आतापर्यंत किती पैसे खर्च झाले, किती रुपयांची वर्क ऑर्डर दिलेली आहे आणि जर पैसे शिल्लक असतील तर त्याचे नियोजन काय आहे? अशाप्रकारे आर्थिक बाबतीतील तसेच वास्तविक बाबतीतील माहिती समितीला द्यावी, असे निदेश समितीने दिले असता यासंदर्भातील सर्व माहिती समितीला देण्यात येईल असे विभागीय सचिवांनी आश्वस्त केले.

परिच्छेद क्रमांक - ३.४.७.४ - पाणी चाचणी प्रयोगशाळेची अधिस्वीकृती नसणे

या परिच्छेदामध्ये नमूद केलेल्या प्रस्तावित राज्यस्तरीय प्रयोगशाळांबाबतच्या सद्यःस्थितीची समितीने विचारणा केली असता, राज्यस्तरीय प्रयोगशाळांचे नियोजन विभागाने केलेले आहे. त्याकरिता विभागाकडे आर्किटेक्ट नियुक्त केले आहे. त्यांनी सर्व आराखडा तयार करून दिलेला आहे. विभागाकडे त्याबाबतचे प्रेझेंटेशन दोनदा झालेले आहे. मध्यंतरी केंद्र शासनाने अशा सूचना दिल्या होत्या की, इतर ठिकाणी ज्या राज्यस्तरीय प्रयोगशाळा आहेत, त्यांची पाहणी करून त्यामध्ये दुरुस्ती करावी. ती दुरुस्ती करण्यासाठी विभागाची टिम गुजरात राज्याला भेट देणार आहे. त्यांनी आसाम राज्याला भेट देण्याचे नियोजन केले होते. परंतु, आसाम राज्यामध्ये जाण्यायेण्यामध्ये खूप वेळ जाणार होता. त्यामुळे विभागाने असा विचार केला की, गुजरातची राज्यस्तरीय प्रयोगशाळा जवळ आहे तेथे जाऊन पाहता येईल. तेथे विभागाची टिम १-२ दिवसांमध्ये जाणार आहे. आर्किटेक्टने जो आराखडा दिलेला आहे, त्यामध्ये जे काही किरकोळ बदल करायचे असतील ते किरकोळ बदल करून विभाग ते फायनल करणार आहे. विभागाने त्याची जागा वगैरे आयडेंटिफाय केलेली आहे, त्याचे नियोजन केलेले आहे. त्यासाठी पैशांची तरतुदही केलेली आहे. याची टेंडरिंग प्रोसेस लवकरात लवकर सुरू होणार आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

२८ जिल्हा प्रयोगशाळांचे अधिस्वीकृतीकरण करण्याकरिता आवश्यक ती पुढील कार्यवाही सुरू आहे, याबाबत माहिती द्यावी. विभागाने माहितीमध्ये असे नमूद केले आहे की, '२८ जिल्हा प्रयोगशाळा स्थापन झाल्या असून या प्रयोगशाळांचे राष्ट्रीय अधिस्वीकृतीकरण करण्याकरिता आवश्यक असलेले प्रशिक्षण वरिष्ठ भू वैज्ञानिक व कंत्राटी रसायनी यांना देण्यात आलेले आहे. त्यांचे राष्ट्रीय अधिस्वीकृतीकरण करण्याकरिता आवश्यक ती पुढील कारवाई सुरू आहे.' ६ विभागांची झालेली आहे. जिल्हास्तरावरील २८ प्रयोगशाळांच्या अधिस्वीकृतीची शासनाच्या विभागाची कारवाई अजूनही सुरू आहे. त्याबाबतची सद्यःस्थिती द्यावी, असे समितीने निदेश दिले असता, नॅशनल ॲक्रिडिशन बोर्ड यांच्यामार्फत या सर्व शाळांना एन. ए. बी. एल. सर्टिफिकेशन करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पैसा द्यावा लागतो. त्यामध्ये भरपूर खर्च आहे. विभागाने मागे एक बैठक घेतली. त्यामध्ये

विभागाने असा निर्णय घेतला की, ज्या ६ विभागीय प्रयोगशाळा ६ विभागाच्या ठिकाणी आहेत त्यांचे ऑलरेडी एन. ए. बी. एल. सर्टिफिकेशन केलेले आहे. जिल्हा प्रयोगशाळांचे एन. ए. बी. एल. सर्टिफिकेशन करण्यामध्ये एवढी घाई करण्याची आवश्यकता नाही. कारण आपल्याला त्याकरिता भरपूर पैसा खर्च करावा लागणार आहे व त्याची एवढी आवश्यकताही नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

शासनाची भूमिका काय आहे, ते करायचे की नाही करायचे? असा प्रश्न समितीने केला असता, प्रत्येक प्रयोगशाळेला एन. ए. बी. एल. ॲक्रिडेशन करावे, अशी सूचना होती ते करण्यासाठी विभागाने नियोजनही केले होते. परंतु, जेव्हा विभागाने निधीचा आढावा घेतला तेव्हा असे वाटले की, या प्रत्येक जिल्ह्याच्या प्रयोगशाळेला ॲक्रिडेशन करण्याची एवढी आवश्यकता नाही. जेव्हा आवश्यकता भासेल तेव्हा घेऊ. जे नमुने आपल्याला विभागीय प्रयोगशाळेत तपासता येतात त्यासाठी जिल्हा पातळीवरून ते नमुने विभागीय प्रयोगशाळेत नेता येतील. त्यामुळे तूर्त विभाग यासाठी एवढा खर्च करू इच्छित नाही. सर्व ३४ जिल्ह्यांमध्ये प्रयोगशाळा कार्यान्वित आहेत. तसेच, तेथे स्टाफही नेमलेला आहे, असे विभागीय सचिवांनी सांगीतले.

विभागाने दिलेल्या माहितीमध्ये असे नमूद केले आहे की, 'राज्य प्रदूषण मंडळ व राज्य आरोग्य प्रयोगशाळेच्या अहवालानुसार महाराष्ट्र राज्यामध्ये आर्सेनिक नसल्यामुळे पृथक्करण व्यवस्था करण्यात आली नाही'. विभागाने पुढे असे नमूद केले आहे की,'याबाबत राज्य प्रयोगशाळेमध्ये आर्सेनिक पृथक्करण करण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे.' हे काय आहे ? एका बाजूला विभागाकडून सांगण्यात येते की, आर्सेनिक सेपरेशनची गरज नाही. दुसऱ्या बाजूला सांगण्यात येते की, राज्य प्रयोगशाळेमध्ये आर्सेनिक पृथक्करण करण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे, मग यावरून समितीने काय समजावे ? असा प्रश्न समितीने केला असता, सध्या ज्या ३४ प्रयोगशाळा आहेत त्यामध्ये अजून आर्सेनिकच्या बाबतीत पृथक्करण केलेले नाही, त्यासाठी यंत्र बसवलेले नाही. आम्ही दरवर्षी लाखो नमुने तपासतो. त्यामध्ये कुठेही आर्सेनिक आढळलेले नाही. परंतु, राज्य पातळीवर विभाग जी प्रयोगशाळा सुरू करणार आहे त्यामध्ये आर्सेनिक पृथक्करणाचीही व्यवस्था करणार आहोत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभाग ही व्यवस्था राज्यस्तरीय प्रयोगशाळेमध्ये करणार आहे की, सर्व ६ विभागीय प्रयोगशाळांमध्येही करणार आहे ? असा प्रश्न समितीने केला असता, राज्य पातळीवर विभाग जी प्रयोगशाळा सुरू करणार आहे, त्यामध्ये ती व्यवस्था करणार आहोत. कारण राज्य पातळीवरील प्रयोगशाळेमध्ये निवडक नमुन्यांची तपासणी केली जाणार आहे. कुठे आर्सेनिक सापडले तर त्या प्रमाणे कारवाई करण्यात येईल. अदरवाईज ठिकठिकाणी आर्सेनिक पृथक्करणासाठी यंत्र लावण्याची आवश्यकता नाही, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

परिच्छेद क्र. ३.४.८ कामाची अंमलबजावणी

परिच्छेद क्र. ३.४.८.१ अपूर्ण कामे-अंमलबजावणीतील विलंब

उक्त परिच्छेदाच्या अनुषंगाने विभागाचे काय म्हणणे आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, नळ पाणीपुरवठा योजनेची जी कामे हाती घेतली होती त्यातील काही कामे पूर्ण केली असून काही कामे शिल्लक राहिलेली आहेत. या संदर्भातील तपशील माहिती पुस्तिकेमध्ये नमूद केलेला आहे. जी कामे हाती घेतली होती त्यातील काही कामे बऱ्याच वर्षांपासून प्रलंबित आहेत. सदरहू कामे प्रलंबित राहण्याची वेगवेगळी कारणे आहेत. उदाहरणार्थ ठेकेदाराकडून कामे करण्यात विलंब होणे, गावामध्ये आपसात वाद असणे, पाणीपुरवठा व स्वच्छता समितीमध्ये अंतर्गत वाद असणे किंवा योजनेसाठी जागा न मिळणे इत्यादी विविध कारणांमुळे कामे प्रलंबित राहिलेली आहेत, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

योजना पूर्णत्वास विलंब झालेल्या ५०९ योजनांची सद्यःस्थिती काय आहे ? या परिच्छेदाच्या अनुषंगाने योजना पूर्ण होण्यास कोणत्या कारणांमुळे विलंब झालेला आहे या बाबतची माहिती विभागाने माहिती पुस्तिकेत नमूद केलेली आहे. परंतु योजना पूर्ण न होण्यामागील एक कारण असे नमूद केले आहे की, गाव हगणदारीमुक्त न झाल्यामुळे विलंब झाला आहे. समिती जाणून घेऊ इच्छिते की, हे कसे शक्य आहे ? एकदा योजना मंजूर केल्यानंतर गाव हगणदारीमुक्त असावे, हा मुद्दाच कसा उपस्थित झाला ? वास्तविक पाहता योजनेचे काम सुरू करण्यापूर्वीच गाव हगणदारीमुक्त आहे की नाही, हे विभागाने बघावयास पाहिजे होते. गाव हगणदारीमुक्त झाल्यानंतरच योजना मंजूर करण्यात येईल असा जर विभागाचा नियम असेल तर विभाग अशा प्रकारचे कारण कसे देऊ शकतात. जर विभागाने अगोदर एखादी योजना मंजूर केली आणि त्या योजनेचे काम अर्धवट केल्यानंतर गाव हगणदारीमुक्त नाही म्हणून पूर्वी मंजूर केलेल्या योजनेचे काम विभाग थांबविणार काय ? ज्यावेळी योजना मंजूर झाली त्यावेळी अशा प्रकारचे नियम नव्हते. जर त्यावेळी नियम केलेले नव्हते तर ती योजना जुन्या नियमानुसार राबवावयास पाहिजे होती. पूर्वी मंजूर झालेल्या योजनांची कामे नवीन नियमांचा आधार देऊन कशासाठी थांबविली जात आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, या संदर्भात योग्य प्रकारची कार्यवाही झालेली नाही. योजना मंजूर करताना अटींच्या अधीन राहून ती मंजूर केली. उदाहरणार्थ योजनेचे काम दोन वर्षे सुरू राहील आणि या दोन वर्षांच्या कालावधीत गाव हगणदारीमुक्त होईल. योजनेच्या शेवटच्या टप्प्यातील १० टक्के निधी देताना हगणदारीमुक्त गावाची स्थिती पहावी, असे सांगितले होते, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

परंतु या एका अटीमुळे शासनाचे ९० टक्के पैसे योजनेत गुंतले आहेत ही बाब विभागाच्या निदर्शनास आली नाही काय ? जोपर्यंत गाव हगणदारीमुक्त होणार नाही तोपर्यंत या योजनांना मंजूर करण्यात येणार नाही असे जर विभागाने ठरविले असते तर गाव हगणदारीमुक्त झाले असते आणि योजना सुद्धा पूर्णत्वास गेली असती. परंतु विभागाने एका बाजूला अट टाकली आणि दुसऱ्या बाजूला योजना पूर्णत्वास आणली नाही. तसेच ९० टक्के खर्च करून कंत्राटदाराला एस्कलेशन कॉस्ट देणे हे धोरण चुकीचे आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, यामध्ये कंत्राटदाराला एस्कलेशन कॉस्ट दिलेली नाही. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

परंतु लोकांना त्या योजनेच्या लाभापासून वंचित ठेवले आहे. गाव हगणदारीमुक्त असावयास पाहिजे अशी अट टाकून विभागाने योजनेचा शेवटच्या टप्प्यातील १० टक्के निधी दिला नाही. परिणामी, सदरहू योजना पूर्णत्वास आली नाही. If the implementation of scheme is started

then how you can stop the payment by giving these reasons? अशी विचारणा समितीने केली असता, या प्रकरणी कार्यवाही योग्यप्रकारे झालेली नाही. मूळात जेव्हा योजना मंजूर केल्या तेव्हा अशा अटींच्या अधीन राहून त्या मंजूर करावयास नको होत्या, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

गाव हगणदारीमुक्त करण्याची जबाबदारी कोणाची होती ? असा प्रश्न समितीने केला असता, ती ग्रामपंचायतीची जबाबदारी होती, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

दुसरा मुद्दा असा की, २०१८ च्या शासन निर्णयानुसार सर्व योजना जिल्हा परिषदेला हस्तांतरित झाल्या आहेत काय, या शासन निर्णयानुसार राष्ट्रीय पेयजल योजना आणि मुख्यमंत्री पाणीपुरवठा योजना सुद्धा जिल्हा परिषद करणार आहेत काय ? असा प्रश्न समितीने केला असता, दिनांक ९ मार्च, २०१८ च्या शासन निर्णयानुसार ५ कोटी रुपयापर्यंतच्या योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण करते. या योजनांची अंमलबजावणी, बांधकाम हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत केले जाते. ५ कोटी रुपयांवरील योजना जिल्हा परिषद करते. परंतु ९ मार्च, २०१८ च्या शासन निर्णयापूर्वी सर्व कामे ही ग्रामपंचायतीच्या पाणीपुरवठा समितीमार्फत होत होती, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

परंतु आता विभागाने त्या समितीची कामे पूर्णपणे थांबविलेली आहेत. असे समितीने निदर्शनास आणले असता, आता कोणतेही काम त्या समितीकडे ठेवलेले नाही. योजनेच्या देखभाल व दुरुस्तीचे काम ग्रामपंचायतीने करावयाचे आहे. आता समितीचा रोल संपुष्टात आला आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

परंतु ज्या ऑन गोईंग स्कीम आहेत त्यांच्या बाबतीत काय धोरण स्वीकारले आहे ? असा प्रश्न समितीने केला असता, ऑन गोईंग स्कीमच्या बाबतीत जर त्यांनी योजना पूर्ण करण्याची इच्छा दर्शविली तर त्यांनी ती योजना पूर्ण करावी. यासाठी त्यांना सहा महिन्यांची मुदत दिली होती. ज्या समितीमार्फत काम सुरू आहे त्यांना विभागाने कामे पूर्ण करण्यास मान्यता दिली आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समिती विभागाच्या मताशी सहमत नाही. मूळात ७३ व्या आणि ७४ व्या घटना दुरुस्तीचे नाव घेऊन ग्रामीण पाणीपुरवठा समित्यांना काम देण्यात आले. परंतु जिल्हा परिषद आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला त्यावर नियंत्रण ठेवण्याचे अधिकारच देण्यात आलेले नाही. हे सरळसरळ भ्रष्टाचाराचे कुरण आहे. या निर्णयामुळे ग्रामीण भागाला जी सवय लागायला नको होती ती लागली आहे. अमरावती जिल्हा परिषदेच्या ७२ पाणीपुरवठा योजना २००६ पासून अपूर्ण होत्या. अमरावती जिल्ह्यातील पेठ रघुनाथपूर, ता. धामणगांव रेल्वे ही पाणीपुरवठा योजना २००६-०७ मध्ये मंजूर झालेली योजना आहे. परंतु तेव्हापासून ग्रामीण पाणीपुरवठा समितीला जी कामे देण्यात आली होती त्यातील ७२ कामे अजूनही अपूर्ण आहेत. या विषयी लोकप्रतिनिधींनी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांसोबत आढावा घेतला. परंतु आजच्या कागदपत्रांमध्ये अमरावती जिल्ह्याचा कुठेही उल्लेख नाही. कदाचित विभागाने चाचणीमध्ये अमरावती जिल्ह्याचा समावेश केला नसेल. शिवाय पैसे अग्रीम स्वरुपात उचलण्याची तरतूद असल्यामुळे ग्रामीण पाणीपुरवठा समितीने सर्व पैसे उचलून त्या निधीचा अपहार केला. यास जबाबदार असलेले अनेकजण कारागृहात सुद्धा जाऊन आले. असे असतानासुद्धा आजही ग्रामीण पाणीपुरवठा समित्यांमार्फतच कामे सुरू आहेत. पाण्याच्या टाकीची तरतूद अंदाजपत्रकात असताना ती न करता थेट पाईपलाईनने पाणीपुरवठा सुरू आहे. अजूनही टाक्यांची कामे अपूर्ण आहेत. अंदाजपत्रकामध्ये ज्या बाबी अंतर्भूत होत्या त्यानुसार गावामध्ये पाणीपुरवठा सुरू आहे काय, अंदाजपत्रकानुसार आवश्यक त्यु बाबी केल्या नसल्यामुळे संबंधित समित्यांवर फौजदारी गुन्हे दाखल केले आहेत काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाने फौजदारी गुन्हे दाखल केले आहेत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीच्या माहितीनुसार विभागाने कोणावरही फौजदारी गुन्हे दाखल केलेले नाहीत. अमरावती जिल्ह्यातील नांदगांव खंडेश्वर तालुक्यात मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी आदेश देऊनही गट विकास अधिकारी आपली जबाबदारी पाणीपुरवठा अधिकाऱ्यांवर ढकलतात आणि पाणीपुरवठा अधिकारी गट विकास अधिकाऱ्यांवर ढकलतात. या प्रकरणी अजूनही गुन्हे दाखल झालेले नाहीत. समितीला विशिष्ट समितीचे नाव घेऊन कोणावर दोषारोपण करावयाचे नाही. पाच वर्षानंतर या समित्या बदलल्या आहेत. पूर्वीच्या समित्यांनी नंतरच्या समित्यांना हिशेबच दिला नाही. धांदोरा गुरव हे मुख्य रस्त्यावरील गाव आहे. परंतु तेथे सुद्धा जुन्या समितीने नवीन समितीकडे हिशेबाची पत्रकेच दिली नाहीत. एवढेच नव्हे तर जो काही खर्च केला त्याचा लेखाजोखा दिला नाही. अशा प्रकारच्या अनेक अडचणी आजही आहेत. अशा परिस्थितीत विभागाने जिल्हा परिषद स्तरावर आढावा घेऊन योजना अंतिम केल्या आहेत काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाचे या अनुषंगाने जिल्हानिहाय नियोजन सुरू आहे. याबाबत विभागाने आढावा सुद्धा घेतला आहे. कार्यकारी अभियंता, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या जिल्हानिहाय बैठका घेऊन त्यांना सूचना केल्या असून त्यानुसार कार्यवाही सुद्धा झाली आहे. अनेक जिल्ह्यातील अधिकाऱ्यांवर एफआयआरसुद्धा दाखल केले आहेत. अनेक ठिकाणी रेव्हेन्यू रिकव्हरी सर्टीफिकेट इश्यू केले आहेत. ज्या समित्यांकडून हिशेब मिळत नाही त्या ठिकाणी योजनेसाठी दिलेले पैसे आणि प्रत्यक्षात त्यांनी जेवढे काम केले आहे त्या कामाचे मूल्यांकन करून तफावतीच्या रकमेच्या वसुलीसाठी प्रयत्न करावेत, असे सांगितलेले आहे. आवश्यकता पडल्यास आरआरसी इश्यू करण्याबाबत सूचना दिल्या असून त्या अनुषंगाने कार्यवाही झाली आहे. या संदर्भातील कार्यवाही मागील ८-१० वर्षांपासून रखडलेली होती. परंतु आता विभाग हळूहळू वसुली करीत आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीने ज्या विशिष्ट तालुक्याचा विषय निदर्शनास आणून दिला आहे त्याची सखोल चौकशी करावी. तसेच यामध्ये ज्या लोकांनी अफरातफर केली आहे आणि ज्यांनी अंदाजपत्रकानुसार काम केले नाही त्यांच्यावर एक महिन्याच्या आत कारवाई करून त्याबाबतचा अहवाल समितीला सादर करावा, असे समितीने निदेश दिले. तसेच अमरावती जिल्ह्यातील नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील १२ गावांमध्ये अद्याप सुद्धा कोणावरही एफआयआर दाखल झालेले नाहीत. समितीने आजच्या बैठकीच्या अनुषंगाने विभागास निदेश दिलेले आहेत. विभागाने कारवाई केल्यानंतर व समितीला अहवाल प्राप्त

झाल्यानंतर जर संबंधितांवर कारवाई केली नसेल तर समिती विभागास पुन्हा समितीसमोर बोलावून त्याबाबत विचारणा करेल, संबंधितांवर कारवाई करणे किंवा वसुली करणे या बाबी होत राहतील. परंतु ज्या योजना अपूर्ण आहेत त्या पूर्ण करण्याचे भविष्यात नियोजन काय आहे ? ज्या योजनांमध्ये अफरातफर झालेली आहे त्या योजना विभागाने हस्तांतरित करून तातडीने पूर्ण केल्या पाहिजेत, अशी सूचना समितीने केली असता या संदर्भात मागील दोन-तीन बैठकांमध्ये मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना सूचना दिलेल्या आहेत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने दिलेल्या सूचनांची मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून अंमलबजावणी होत नाही. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आयएएस दर्जाचे असून ते पाणीपुरवठा योजनांच्याबाबतीत गंभीर नाहीत. अमरावती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे तर पाणीपुरवठा योजनेच्या बाबतीत बिलकुल गंभीर नाहीत. जर १२-१२ वर्षे पाणीपुरवठा योजना रखडत असतील तर सातत्याने येणारे आयएएस दर्जाचे अधिकारी काय करतात, १२-१२ वर्षांपासून पाणीपुरवठा योजना रखडत असतील तर ते संबंधितांवर गुन्हे का दाखल करीत नाहीत ? असा प्रश्न समितीने केला असता, काही जिल्ह्यामध्ये आयएएस अधिकारी पाहिजेत अशी मागणी होते आणि काही जिल्ह्यामध्ये आयएएस अधिकारी नकोत, अशी मागणी होते. समितीने सांगितल्यानुसार एका महिन्यात विभाग या संदर्भातील अहवाल सादर करणार आहे. या अहवालासोबत दि. ९ मार्च २०१८ रोजीच्या शासन निर्णयानंतर मागील ७-८ महिन्यांत घेतलेल्या आढाव्यानुसार किती पाणीपुरवठा योजना पूर्ण केल्या किंवा पूर्ण करण्याच्या स्थितीत आहेत या बाबतची माहिती समितीला सादर करण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वस्त केले.

संबंधित उप अभियंता, कार्यकारी अभियंता अमरावती यांच्याकडे पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्यासाठी तगादा लावला, बैठका घेतल्या. अमरावती जिल्हा परिषदेमध्ये कार्यकारी अभियंताच दिलेले नाहीत. अमरावतीसारख्या मोठ्या जिल्हा परिषदेमध्ये उप अभियंत्यांकडे कार्यकारी अभियंत्यांचा अतिरिक्त कार्यभार आहे. दोन वर्षांपासून कार्यकारी अभियंता हे पद रिक्त आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, कार्यकारी अभियंत्यांची ४० टक्के पदे रिक्त आहेत. त्यामुळे कुठेना कुठे कनिष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्यांकडे कार्यकारी अभियंता पदाचा अतिरिक्त कार्यभार द्यावाच लागतो. आता विभाग सर्क्युलर पद्धतीने नेमणुका करीत आहे. ज्या ठिकाणी मागील दोन-तीन वर्षांपासून कार्यकारी अभियंता नाहीत तेथे कार्यकारी अभियंता देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. या संदर्भात आता विभाग पुन्हा आढावा घेणार आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांवर एफआयआर दाखल करण्याची जबाबदारी टाकावी. ते जोपर्यंत एफआयआर दाखल करण्याची धारणा पक्की करीत नाहीत तोपर्यंत काहीही होणार नाही. कारण गट विकास अधिकारी हे स्थानिक पदाधिकाऱ्यांना घाबरतात. स्थानिक पदाधिकाऱ्यांचा सहभाग असल्याशिवाय पाणीपुरवठा योजनेमध्ये भ्रष्टाचार होऊच शकत नाही. एका योजनेमध्ये पाण्याची टाकी बांधणे आवश्यक असताना टाकीच गायब करून टाकली . पाईप लाईनने खालच्या बाजूने पाणीपुरवठा सुरू आहे. पाण्याचे प्रेशर कमी पडत असल्यामुळे लोकांना पाणी मिळत नाही, असे समितीने निदर्शनास आणले असता, जर टाकीचे बांधकाम केले नसेल तर त्या बांधकामाचे पैसेच उचलले नसतील, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

टाकीचे पैसे उचललेले आहेत. विभागाने सांगितले की, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना सूचना दिलेल्या आहेत. परंतु बऱ्याच योजनांचे अंदाजपत्रक हेच मूळात चुकीचे झालेले आहे. याचाच अर्थ कनिष्ठ अभियंता, उप अभियंता हे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी सक्षम नाहीत. परिणामी या योजनाच पूर्ण होऊ शकत नाहीत. अनेक ठिकाणी या योजनांवर मोठ्या प्रमाणात खर्च झालेला आहे. अनेक पाणीपुरवठा योजनांच्या स्रोताला पाणीच नाही. अपूर्ण पाणीपुरवठा योजनांवर एवढा मोठा पैसा खर्च करूनही पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर राहिलेला आहे. अशा किती योजना आहेत की, त्या तांत्रिक अडचणींमुळे, चुकीची साईट निवडल्यामुळे किंवा चुकीच्या अंदाजपत्रकांमुळे पूर्ण होऊ शकत नाहीत ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागासमोर अशा प्रकारची माहिती आलेली नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले, चुकीचे अंदाजपत्रक तयार करणाऱ्या उप अभियंता, कार्यकारी अभियंता यांच्यावर कारवाई करून त्यांच्याकडून वसुली करावयास पाहिजे. अनेकदा आपण ग्रामपंचायतीला दंड करण्यात येतो, परंतु अधिकाऱ्यांवर कोणतीच कारवाई करीत नाही. पूर्वी टीएसपी होते. त्यांच्याच कार्यकाळात सर्व अंदाजपत्रके चुकीची झालेली आहेत आता ते आहेत की नाही ? अशी समितीने विचारणा केली असता, पूर्वी टेक्नीकल सपोर्ट पर्सन होते. परंतु आता टेक्नीकल सपोर्ट पर्सन घेणे बंद केले आहेत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

जिल्हा परिषदेने ४०-५० टेक्निकल सपोर्ट पर्सन स्पेसिफाई केले होते. त्याातून त्यांना निवडायचे होते. याचाच अर्थ जिल्हा परिषदेच्या किंवा पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावयास पाहिजे. विभाग हे मान्य करेल का, अशा काही योजना आहेत की त्या पूर्ण होऊ शकत नाही, असा प्रश्न समितीने केला असता, सर्व योजना पूर्ण होतील, असे विभागीय सचिवांनी सांगितले, तांत्रिक अडचणींमुळे कोणत्या योजना पूर्ण होऊ शकत नाहीत या बाबतची माहिती विभागाकडे नसेल तर ती माहिती घेऊन समितीला सादर करावी, असे समितीने निदेश दिले असता विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

समितीची मागणी एवढीच आहे की, ज्या योजना तांत्रिक अडचणींमुळे सुरू होणार नसतील आणि लोकांना पाणी मिळणार नसेल तर चुकीचे अंदाजपत्रक करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई केली पाहिजे, अशी सूचना समितीने केली असता, विभागासमोर आतापर्यंत चुकीच्या अंदाजपत्रकामुळे योजना पूर्ण होणार नाहीत अशी एकही योजना आलेली नाही. परंतु एकच मुद्दा नेहमी समोर येतो की, पाणीपुरवठा योजनेसाठी पाण्याचा जो स्रोत घेतला होता तो कोरडा गेला, असे विभागीय सचिवांनी सांगितले, स्रोत कोरडा गेल्यामुळे विभागाने योजना बंद केली या बाबतचा तपशील पुढे आहे. परंतु विभागाने त्या योजनेवर केलेला सर्व खर्च वाया गेला आहे, असे समितीने मत व्यक्त केले असता, त्या योजनेवर खर्च केलेला पैसा वाया जात नाही. त्या योजनेसाठी नवीन स्रोत घेऊन ती योजना पूर्ण करावी लागेल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने माहिती पुस्तिकेत नमूद केले की, उर्वरित दोन योजनांचे उद्‌भव कोरडे गेल्याने पुढील उपांगाची कामे करण्यात आलेली नाही. अशी असंख्य उदाहरणे आहेत. सर्व खर्च केल्यानंतर पाण्याचा उद्‌भव कोरडा पडतो, What is the fate of this scheme? विभागाने नवीन स्रोत शोधून योजना पूर्णत्वास न्यावी, अशी सूचना समितीने केली असता, आता हीच कार्यवाही करण्यात येत आहे. विभागाने चालू वर्षीचा आराखडा आणि पुढील वर्षीचा आराखडा तयार केला आहे. त्या आराखड्यामध्ये जवळपास १७ हजार गावांच्या योजना घेतल्या आहेत. ज्या ज्या गावांमध्ये पाण्याचा स्रोत फेल गेला, पुढील काम होऊ शकले नाही आणि ती योजना तशीच रॅपअप करावी लागली तर अशा योजनांसाठी नवीन योजना तयार केली आहे. ही योजना सरफेस वॉटरवर आधारित केली आहे. मध्यम किंवा मोठा प्रकल्प असेल तर त्या पाण्याचा स्रोत गृहीत धरुन प्रादेशिक पाणीपुरवठा योजना प्रस्तावित करीत आहोत. त्यानुसार पुढील कार्यवाही सुरू आहे. ठिकठिकाणी ग्राऊंड वॉटर फेल होत आहे, असे विभागीय सचिवांनी सांगीतले सरफेस वॉटरसाठी जलशुद्धीकरण यंत्रणा बसविणे विभागाला क्रमप्राप्त असल्यामुळे ती लावण्यात येणार काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी त्यात सहमती दर्शविली व वॉटर ट्रिटमेंट प्लांट असतो, असे सांगितले.

जिल्हा परिषद किंवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून योजना पूर्ण करण्यात येतात. परंतु ग्रामपंचायतीकडे तांत्रिक मनुष्यबळ नसते. जलशुद्धीकरण केंद्र चालविणे, त्याची स्वच्छता राखणे हे छोट्या नगरपरिषदांना शक्य नसताना, ग्रामपंचायतींना कसे शक्य होणार ? असा प्रश्न समितीने केला असता विभाग सरफेस वॉटर आधारित प्रादेशिक पाणीपुरवठा योजना तयार करीत आहे. पाणीपुरवठा योजनेपासून ३०-५० कि. मी. अंतरावर मध्यम किंवा मोठा प्रकल्प असेल तर तेवढ्या अंतरावरून एका गावासाठी पाईप लाईन टाकणे शक्य होत नाही. त्यामुळे १५-२० गावांसाठी ५० कि. मी. पाईप लाईन टाकण्यात येत आहे. आता अमरावतीला मोठमोठ्या योजना केल्या आहेत. याच धर्तीवर टेंभूर्णा योजना केली आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

परंतु त्या योजना फेल गेल्या आहेत. त्या योजना आता पुनरुज्जीवित होऊ शकत नाही, असे समितीने मत व्यक्त केले असता, प्रादेशिक पाणीपुरवठा योजना फेल होत नाही. कारण या योजना सरफेस वॉटरवर आधारित आहेत. आता सर्व प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेवरचा फोकस सरफेस वॉटर वरच आधारीत आहे. सरफेस वॉटर आधारित मोठी योजना घेतली तर त्याची किंमत १०० कोटी रुपये, २०० कोटी रुपये, ३०० कोटी रुपयापर्यंत जाते. त्या योजनेमध्ये वॉटर ट्रिटमेंट प्लांट घेतला जातो आणि प्रत्येक ग्रामपंचायतीला शुद्ध पाणी मिळते. प्रत्येक ग्रामपंचायतीला मीटर बसवून पाणी देत आहोत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

दर्यापूर तालुक्यात ग्रॅव्हीटीने शहानूर प्रकल्पातून पाणी घेतले गेले. ते पाणी ग्रॅव्हीटीने आल्यामुळे ती योजना यशस्वी झाली. आजही ती योजना १५ वर्षानंतर देखील सुरू आहे. पण मोर्शी आणि तिवसा यांच्या मध्ये सत्तर गाव पाणीपुरवठा योजना असून त्या ठिकाणी ग्रॅव्हीटीने पाणीपुरवठा होत नव्हता. त्या ठिकाणी विभागाने अपर वर्धाचे पाणी लिफ्ट करून आणल्यामुळे ती योजना अयशस्वी ठरली. पण विभागाने सांगितले की, ३०-५० कि. मी. अंतरावरून पाणी घेऊ शकतो, परंतु टाकीमध्ये पंपींग करावेच लागेल, असे समितीने निदर्शनास आणले असता, काही ठिकाणची भौगोलिक परिस्थिती अशी आहे की, तेथे पाणी पंपिंग केल्याशिवाय गावाला पाणीच पोहचू शकत नाही. ज्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेमध्ये विजेचा खर्च जास्त आहे त्यांना वेगळ्या माध्यमातून अनुदान देण्यात येत आहे. मुख्यमंत्री पेयजल योजनेंतर्गत या योजनांना विजेचा खर्च भागविण्यासाठी वेगळे पैसे देत आहोत. चालू वर्षी सुद्धा देखभाल व दुरुस्ती निधी अंतर्गत त्या त्या योजनांसाठी वेगळा निधी देण्यात येत आहे. तो निधी त्यांना प्राप्त झाल्यामुळे त्या बाबींवरील जादा खर्चाचा बोजा ग्रामस्थांवर पडणार नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

तीन ते पाच वर्षे आणि त्यापेक्षा अधिक वर्षे विलंब झालेल्या योजनांची संख्या २८६ आहे. एकूण ५०९ योजनांपैकी १०९ योजना तीन वर्षापेक्षा जास्त आणि १७७ योजना पाच वर्षापेक्षा जास्त कालावधीपेक्षा प्रलंबित आहेत. एकूण ५०० कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूक झालेली आहे. आता त्या योजनेची सद्यःस्थिती काय आहे ? बुलढाणा जिल्ह्यात पूर्वी योजनेची प्रशासकीय मान्यता ११ कोटी रुपये होती. त्या योजनेस २७ लक्ष रुपयांची परवानगी न दिल्यामुळे त्या प्रकल्पाची किंमत १९२० लक्ष रुपये झाली. २७ लक्ष रुपयांची सुधारित प्रशासकीय मान्यता न दिल्यामुळे सदर प्रकल्पास सन २०१८ मध्ये रु. १९२० लक्ष मान्यता द्यावी लागली, यास कोण जबाबदार आहे ? मार्च २०१० मध्ये कामास सुरूवात झाली असताना आतापर्यंत काम पूर्ण झालेले नाही. या संदर्भातील माहिती आता देता येत नसेल तर नंतर समितीला माहिती सादर करावी, असे समितीने निदेश दिले असता, सन २००९ मध्ये सदर योजनेस मान्यता मिळाली होती. सन २०१० मध्ये सदरची पाणीपुरवठा योजना मंजूर झाली. बुलढाणा जिल्ह्यात ४ योजनांची एकत्रित निविदा काढली होती आणि सी निविदा काढली होती. या चारही योजना मजीप्रामार्फत चालविण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्या योजनेमध्ये बरेच तांत्रिक बदल देखील करावे लागले होते त्या अनुषंगाने किमती वाढलेल्या आहेत आणि त्यास सुधारित मान्यता मिळाली आहे, असे विभागीय प्रतिनिधींने सांगितले.

विभागाने लेखी स्पष्टीकरणात नमूद केले आहे की, दिनांक ५. ८. २००९ रोजी रु. ११०९. २५ लक्ष किमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता दिली. सन २०१० मध्ये कार्यारंभ आदेश दिला. त्यानंतर २७ लाख रुपयांची अतिरिक्त प्रशासकीय मान्यता मागितली. ती अजूनपर्यंत मिळाली नाही. सन २०१८ मध्ये रु १९२०. ८ लक्ष इतक्या किमतीस सुधारित प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. समितीचा प्रश्न आहे की, रु. २७ लक्षची सुधारित प्रशासकीय मान्यता न दिल्यामुळे काम बंद पडले काय, सुधारित प्रशासकीय मान्यता न दिल्यामुळे रु. ११ कोटीचे काम १९ कोटी रुपयांवर गेले काय ? असा प्रश्न समितीने केला असता, ती रक्कम रु. २७ लक्ष नसून रु. २७ कोटी आहे. त्या अनुषंगाने १९ कोटी रुपयांस मान्यता दिलेली आहे. २७ लक्ष ही चुकीची आकडेवारी आहे. रु. २७ कोटी टाईप करण्याऐवजी रु. २७ लक्ष टाईप झालेले आहे, असे विभागीय प्रतिनिधीने समितीस अवगत केले.

सुधारित प्रशासकीय मान्यता देऊन सहा महिने झालेले आहेत. आता कामाची सद्यःस्थिती काय आहे ? विभागाकडे अपडेट माहिती असली पाहिजे. विभागाने जी माहिती दिलेली आहे त्याबद्दल समिताला अवगत करावे असे निदेश समितीने दिले असता, एकूण योजनेचे ६० टक्के काम पूर्ण झालेले आहे, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

सुधारित प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर किती काम प्रलंबित राहिलेले आहे ? असा प्रश्न समितीने केला असता, ४० टक्के काम प्रलंबित आहे. सुधारित प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर कामास सुरूवात झालेली आहे. योजनेवर ११ कोटी रुपये खर्च झाले. जोपर्यंत जादा खर्चास मान्यता मिळत नाही तोपर्यंत जादा खर्च केलेला नाही, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

रु. १९ कोटी पैकी रु. ११ कोटी खर्च झाले म्हणजे ६० टक्के रक्कम खर्च झालेली आहे. आजही ६० टक्के काम झालेले आहे. विभागाने ११ कोटी रुपये खर्च झाल्यानंतर काम थांबविले. विभागाने १९ कोटी रुपयांची सुधारित प्रशासकीय मान्यता घेतल्यानंतर काम झाले किंवा कसे ? आता त्या कामामध्ये प्रगती झाली आहे किंवा कसे ? असा प्रश्न समितीने केला असता, या संदर्भात माहिती घेऊन समितीला अवगत करण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

नागपूर जिल्ह्यात सद्यःस्थितीत ५ वर्षापेक्षा जास्त कालावधीकरिता रखडलेली एक योजना आहे. सदर वेलतूर नळ पाणीपुरवठा योजनेच्या किमतीमध्ये वाढ झाल्यामुळे सुधारित योजनेचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला आहे असे आपण लेखी निवेदनात नमूद केले आहे. याबाबतची नेमकी सद्यःस्थिती काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, सदर प्रस्ताव नियोजन व वित्त विभागाकडे पाठविलेला आहे. त्यास मान्यता मिळाल्यानंतर लगेच ती योजना पूर्ण करण्यात येईल. सद्यः या योजनेस सुधारित प्रशासकीय मान्यता मिळालेली नाही, ती प्रोसेसमध्ये आहे, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

सांगली जिल्ह्यात १३ योजना प्रगतीपथावर आहेत आणि त्या मार्च २०१९ अखेरपर्यंत पूर्ण होतील असे स्पष्टीकरणात नमूद केलेले आहे, या संदर्भात माहिती देण्यात यावी अशी सूचना समितीने केली असता, सन २०१७-२०१८ मध्ये २६ योजना प्रगतीपथावर होत्या त्यापैकी ९ योजनांमधून पाणीपुरवठा सुरू झालेला आहे, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

विभागाने स्पष्टीकरणात नमूद केले आहे की, १३ योजना प्रगतीपथावर असून त्या मार्च २०१९ मध्ये पूर्ण होतील. समितीने हे कमिटमेंट समजायचे काय ? असा प्रश्न समितीने केला असता, सांगली जिल्ह्यामध्ये १३ योजना चालू आहेत त्यापैकी ४ योजनांमध्ये पाणीपुरवठा सुरू केलेला आहे. या १३ योजनांची कामे मार्चमध्ये पूर्ण करण्यात येणार आहेत असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

ठाणे जिल्ह्यात तीन ते पाच वर्षे विलंब लागलेली योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाशी संबंधित असून ती रखडली आहे असे उत्तर दिलेले आहे. आता त्या योजनेची सद्यःस्थिती काय आहे ? २ योजना जिल्हा परिषदेशी संबंधित असून त्यापैकी एक योजना समितीच्या उदासीनतेमुळे रखडली आहे. तर एका योजनेमध्ये अपहार असल्याने समिती सदस्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे असे स्पष्टीकरणात नमूद केलेले आहे. या संदर्भात समितीचे असे म्हणणे आहे की, विभागाने पंचनामा करून कामास सुरूवात करावी. ज्या योजनांची कामे बंद आहेत ती मार्गी कशी लागतील हे पहावे. विभागाने संबंधितांवर गुन्हा दाखल करावा परंतु लोकांना पाणी कसे मिळेल हे देखील प्राधान्याने पहावे. तसेच महालेखाकार कार्यालयाकडून आलेल्या आक्षेपांना उत्तरे दिली पाहिजेत, अशी सूचना समितीने केली असता, समितीस अद्ययावत माहिती देण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

लेखी स्पष्टीकरणात नमूद केलेले आहे की, जिल्हा परिषदेकडील अपूर्ण ६ योजनांपैकी ५ योजना मार्च २०१९ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. उर्वरित एक योजना केव्हा पूर्ण करण्यात येणार आहेत ? तसेच पाच वर्षापासून अधिक विलंब लागलेल्या ४ योजना आहेत. त्या योजनांची सद्यःस्थिती काय आहे ? विभागाने त्या योजना हस्तांतरित कराव्यात. ४ अपूर्ण योजना जिल्हा परिषदेशी संबंधित असून सर्व योजना कामातील संथपणा, समितीची उदासीनता, अंतर्गत वाद इत्यादी कारणांमुळे रखडलेल्या आहेत. ग्रामपंचायतीची लोक काम करीत नसतील किंवा काम संथगतीने चालत असेल तर विभागाने त्यांना एक ठराविक वेळ द्यावा अन्यथा ती योजना जिल्हापरिषदेकडे हस्तांतरित करावी, अशी सूचना समितीने केली असता, ठाणे जिल्ह्यातील कामांबाबत विभागीय आयुक्तांमार्फत चौकशी करण्यात आली होती. एकूण ६२२ योजनांबद्दल कार्यवाही केलेली आहे. त्यातील ५२९ योजना पूर्ण झाल्या असून त्या योजनांमधून पाणीपुरवठा सुरू केलेला आहे. सद्यःस्थितीत ६१ योजना प्रगतिपथावर आहेत. अपहारित ३२ योजना असून त्याबाबत गुन्हा दाखल झालेला आहे. ज्या प्रकरणामध्ये अपहार झाला होता त्या प्रकरणी पैसे परत दिलेले आहेत आणि ती कामे पूर्ण झाली अशा १२ योजना आहेत. दोन्ही मिळून एकूण ४४ योजना आहेत. आम्ही जेव्हा आढावा घेतला त्यानुसार ३२ योजना प्रगतिपथावर आहेत. ६ अपहारित योजना आहेत. त्या योजनांमध्ये संबंधितांनी पैसे भरलेले आहेत आणि काम पूर्ण केलेल्या तीन योजना वगळल्या आहेत. तीन योजनांची कामे पूर्ण झालेली आहेत. २३ योजनांमध्ये समितीचे अध्यक्ष व सचिव यांच्या सात-बारा उताऱ्यावर बोजा चढविण्याचे काम जिल्हाधिकारी यांचेमार्फत करण्यात आलेले आहे, असे विभागीय प्रतिनिधीने समितीस अवगत केले.

ज्या प्रकरणी अपहार झालेला असेल त्याबाबत संबंधितांवर बोजा चढविण्याचे काम चालू ठेवावे. तसेच या सर्व योजनांच्या सद्यःस्थितीची माहिती घेऊन त्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे द्याव्यात की अन्य कोणाकडे द्याव्यात याचा आढावा घ्यावा. लोकांना पाणी मिळणे हा सर्वात महत्त्वाचा विषय आहे. पाणी मिळत नसेल तर योजनांमध्ये गुंतलेल्या पैशांचा काही उपयोग होणार नाही. विभागाने संबंधितावर बोजा चढविला म्हणजे विभागास पैसे परत मिळाले असे नाही. पैसे वसुलीसाठी खूप वेळ लागणार आहे, ती प्रक्रिया वेगळी आहे, अशी समितीने सूचना केली असता, आरआरसी करायचे असेल किंवा एफआयआर होत असेल तर कामाची सद्यःस्थिती विचारात घेऊन उर्वरित कामाचे वेगळे अंदाजपत्रक तयार करून त्याची वेगळी मंजुरी घ्यावी अशा सूचना दिलेल्या आहेत. विभाग तशी मंजुरी देण्यास तयार आहे आणि तशी मंजुरी दिलेली आहे. नवीन ठेकेदाराकडून काम करून घेण्याच्या सूचना दिलेल्या आहेत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

अपूर्ण असलेली एक योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाशी संबंधित असून ती रखडलेली आहे, त्या कामाची सद्यःस्थिती काय आहे ? अशी विचारणा समितीनी केली असता, एक योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाशी संबंधित असल्याचे स्पष्टीकरणात नमूद केलेले आहे. त्या योजनेची आता माहिती सध्या उपलब्ध नाही. पुढील बैठकीत ती माहिती सादर करण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

मुंबई-गोवा महामार्गाच्या रुंदीकरणामुळे १३. ३८ वितरण नलिकेपैकी ३ कि. मी. वितरण नलिकेचे काम करता आले नाही असे स्पष्टीकरणात नमूद केलेले आहे. या संदर्भात विभागाचे काय म्हणणे आहे ? असा प्रश्न समितीने केला असता, मुंबई-गोवा महामार्गाचे रुंदीकरण होत आहे तसेच त्या भागामध्ये अतिक्रमण आहे. सद्यःस्थितीत अतिक्रमण काढण्याची कार्यवाही सुरू आहे. जूनपर्यंत हे काम पूर्ण होईल, असे विभागीय प्रतिनिधीनी सांगितले.

सद्यःस्थिती तेथे पाईपलाईन न टाकल्यामुळे किती लोक पाण्यापासून वंचित राहिले आहेत ? असा प्रश्न समितीने केला असता, त्या भागात साधारणतः ९ हजार लोकसंख्या आहे. महामार्गाच्या पलीकडे जेथे ही लाईन जाणार होती तेथे दोन छोट्या वाड्या आहेत. त्या वाड्यांना एमआयडीसीकडील कच्चे पाणी मिळत आहे. या संदर्भात मंत्री महोदय व खासदार यांनी बैठक घेतलेली आहे. माननीय केंद्रीय मंत्री देखील पाठपुरावा करीत आहेत. विभागाने एकत्र बैठक घेऊन हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केलेला आहे. जूनपासून त्यांना शुद्ध पाणी मिळेल, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

परिच्छेद क्रमांक ३.४.८.२ : कंत्राट व्यवस्थापनातील त्रुटी

मुद्दा क्रमांक १ : नागपूर नागरी पेरी क्षेत्रीय ग्रामीण पाणीपुरवठा योजना.

या परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विभागाने कंत्राटदाराला डकस्टाईल पाईपबद्दल वाहतुकीचे पैसे वेगळे दिलेले आहेत. महालेखाकार यांचे असे म्हणणे आहे की, “They should supply on the site.” यासंदर्भात माहिती देण्यात यावी अशी समितीने सूचना केली असता, कंपनीकडून पाईपचा पुरवठा केला जातो तेव्हा आपले असे प्रयत्न काय असतात की, जेव्हा प्रत्यक्षात पाईप वापरायचे असतात तेव्हा जास्त वेळ नसेल तर प्रत्यक्ष जागेवर पोहोच करायला लावली जाते, जेणेकरून डबल कार्टिंग होणार नाही. परंतु नागपूर पेरी अर्बन ही मोठी योजना होती आणि सर्व पाईप्स वापरण्यास खूप वेळ लागणार होता. त्यामुळे असा विचार करण्यात आला की, सर्व पाईप्स एका ठिकाणी यार्डमध्ये ठेवावे. तसे करून पाईपच्या आवश्यकतेनुसार ते साईटवर आणायचे ठरले. पाईप्स आणण्यासाठी कार्टिंग डबल होणार आहे, हे अपेक्षित होते. अनेक ठिकाणी अशी माहिती समोर आलेली आहे की, जेव्हा आपण रस्त्याच्या कडेला पाईप टाकतो, तेव्हा लोकं तक्रार करतात. काही वेळेला हे पाईप्स खराब होतात व काही वेळेस त्यांची चोरी देखील होते, तसेच या पाईप्समुळे अपघातही होतात. नेहमीच लोकांच्या तक्रारी येत असतात की, पाईप वापरण्यात यावे किंवा ते यार्डमध्ये ठेवावे. त्यामुळे आपल्याला प्रत्येक योजनेच्या बांधकामाच्या नियोजनाप्रमाणे नियोजन करावे लागते. प्रत्येक वेळेस हे पाईप्स यार्डमध्येच ठेवावे की, रस्त्याच्या कडेला किंवा साईटवर ठेवावे, असा कोणताही नियम तयार केलेला नाही. ही योजना २०० ते २५० कोटी रूपयांची होती. आपण सर्व पाईप्सकरिता आदेश दिले आणि ते यार्डमध्ये आणून ठेवले व आवश्यकतेनुसार वापरण्यात आले. यामध्ये डबल कार्टिंग झालेली आहे, हे सत्य आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

विभागाने कंत्राटदाराला कोणत्या दराने पैसे दिले ? “the cost of carting the pipes and valves from department store to site works is not considered in rate analysis." What rate had you taken? विभागाने एक मुद्दा सांगितला की, विभागास प्रॅक्टीकली अडचण येत असल्यामुळे पाईप्स यार्डमध्ये ठेवावे लागले. We agree with this, at that time the rate was not finalised for transportation because it was supposed to be supplied at the site. But now had you taken a tender for the transportation and what was the rate? अशी विचारणा समितीने केली असता, डीएसआरमध्ये कार्टिंगचे रेट असतात, असे विभागीय प्रतिनिधीनी सांगितले.

विभागाने जागेची अडचण सांगितली व त्यामुळे डबल कार्टिंग करावी लागली. विभागाचे म्हणणे असे आहे की, पाईप्सची चोरी होऊ नये, रस्त्याच्या कडेला पाईप ठेवल्याने अपघात होऊ नये, तसेच लोकांच्या तक्रारी होत्या त्यामुळे विभागाच्या यार्डमध्ये पाईप्स ठेवण्यात आले व त्याकरिता पुन्हा पैसे खर्च करावे लागले, असे मत समितीने व्यक्त केले असता, सर्व पाईप्स यार्डमध्ये आणून ठेवावे, ही बाब निविदेमध्ये नमूद करण्यात आली होती व त्यानुसारच कंत्राटदाराला पैसे देण्यात आले. यार्डमधून पाईप्स साईटवर आणण्याचे वेगळे काम होते व हे काम अंदाजपत्रकात नव्हते. ही बाब अंदाजपत्रकात नमूद असती तर कंत्राटदाराने कार्टिंग केली असती किंवा यार्डमधून साईटपर्यंत पाईप्स नेले असते. परंतु हे काम अंदाजपत्रकात नसल्यामुळे या कार्टिंगचे वेगळे पैसे देण्यात आले, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

वर्क ऑर्डरमध्ये असे म्हटले होते की, “The inspection charges are inclusive of transportation charges upto the site of work anywhere in Maharashtra State as directed by the concerned engineer-in-charge, but excluding octroi duty. ” त्यामुळे ते तसे होते. असे प्रधान महालेखाकर यांनी निदर्शनास आणूल दिले असता त्यावर You are speaking regarding the work order of pipe supplier, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

महालेखाकारांनी त्यावेळी कराराची प्रत पाहिली असेल. त्यादृष्टीने हा परिच्छेद उपस्थित झाला असेल, असे वाटते. परंतु आता विभागाने व्यवहारिक अडचण असल्याचे स्पष्टीकरण दिलेले आहे व ते समितीला मान्य आहे, दुसरा प्रश्न वाहतुकीचे पैसे कोणत्या आधारावर दिले असा विचारला होता. विभागाने सांगितले की, डीएसआरचे दर फिक्स आहेत व त्यानुषंगाने हे शुल्क देण्यात आले. यावर समितीचे समाधान झालेले आहे, असे समितीने मत व्यक्त केले.

मुद्दा क्रमांक २ : बुलढाणा जिल्ह्यातील बुलढाणा शहर आणि चार गांवे यांची क्षेत्रीय ग्रामीण पाणीपुरवठा योजना.

यासंदर्भात विभागाने सांगितले की, येथील मृतसाठ्याची पातळी ५१६.४० मी. आहे. परंतु योजनेअंतर्गत जॅकवेलची सरासरी पातळी ५१४.५० मी. वर केलेली आहे, यासंदर्भात माहिती देण्यात यावी अशी समितीने सूचना केली असता, हा पातळी संदर्भातील मुद्दा आहे. जॅकवेल ५१४.५० मी. वर केलेले आहे, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

एमडीडीएलला ५१८.१८ मी. साठा आहे. परंतु मृतसाठ्याची पातळी ५१६ मी. आहे. मी विभागाने दिलेल्या लेखी उत्तरातील ही माहिती आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, एमडीडीएल ५१८.१८ आहे आणि आपण घेतलेली पातळी ५१४ मी. आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विहिरीचे बांधकाम ५०६ मी. वर केलेले आहे, असे समितीने सांगितले असता, खोदकाम अजून खाली केलेले आहे. त्यामुळे धरणामध्ये पाणी येऊ शकेल. ही जागा व जागेसंदर्भात मुद्दा निघालेला होता. त्यात असे म्हटले होते की, त्यांनी तशी लायबिलीटी घेतली व त्यांना जास्तीचे पैसे द्यावे लागले. वास्तविक या प्रकरणामध्ये तशी परिस्थिती नाही. ही निविदा मूळामध्ये सी निविदा झालेली आहे. सी निविदा म्हणजे एकत्रित मिळून ज्या बाबी होतील त्या अनुषंगाने ही निविदा झालेली आहे. त्यामुळे यामध्ये झालेल्या कोणतेही डेव्हीएशन कोणत्या कारणांमुळे झाले असेल तर त्याला जास्तीचे पैसे द्यावे लागले नाही व द्यावे लागणार नाही, असे विभागीय प्रतिनिधीने समितीस अवगत केले.

मुद्दा क्रमांक ३ : अहमदनगर जिल्ह्यातील अकोले आणि ३२ गावे क्षेत्रीय ग्रामीण पाणीपुरवठा योजना.

या योजनेसंदर्भात माहिती देण्यात यावी अशी समितीने सूचना केली असता, अहमदनगर मधील योजना ३२ गावांची प्रादेशिक पाणीपुरवठा योजना आहे. या योजनेमध्ये विलंब झालेला आहे. विलंब होण्याचे कारण असे आहे की, हे काम टप्याटप्याने करायचे होते, तसेच २०१३ मध्ये अतिवृष्टी झाली होती. या सारख्या अडचणीमुळे या कामाकरिता मोठा विलंब झालेला आहे. कंत्राटदाराकडून जेवढा विलंब झालेला आहे, त्याबाबत त्याच्याकडून दर दिवसाचे ५ हजार रूपये, १० हजार रूपये प्रमाणे दंड वसूल केलेला आहे. आपण कंत्राटदाराकडून एकूण जवळपास ३२ लाख रूपये वसूल केलेले आहेत. तसेच बराच विलंबाचा कालावधी प्रॅक्टीकल अडचणींमुळे झालेला आहे. हा विलंब कंत्राटदाराच्या चुकीमुळे झालेला नाही. परंतु कंत्राटदाराकडून जेवढा पैसा वसूल करायचा होता, तो वसूल केलेला आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

सदरहू योजना अजूनही पूर्ण झालेली नाही, असे समितीने निदर्शनास आणले असता, या योजनेचा सुधारित मान्यतेचा प्रश्न निर्माण झालेला आहे. आता योजनेवरील खर्च वाढलेला आहे. त्यामुळे योजना सुधारित करावयाची आहे. यासंदर्भातील नस्ती वित्त विभागाकडे पाठविलेली आहे. याकरिता १५ टक्क्यापेक्षा जास्त खर्च वाढणार आहे. विभाग याचा आढावा घेत आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

आतापर्यंत पाणीपुरवठा सुरू झालेला नाही, अशी समितीची माहिती आहे, असे समितीने सूचित केले असता, एका बाजूचा पाणीपुरवठा सुरू झालेला आहे. एक बाजू बाकी आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सुधारित प्रशासकीय मान्यतेची सद्यःस्थिती काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव वित्त विभागाला सादर करण्यात आलेला आहे. या प्रस्तावास पुढील आठवड्यात मान्यता मिळू शकेल, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

मुद्दा क्रमांक ४ : नाशिक जिल्ह्यातील माळमाथा आणि २५ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना.

नाशिक पाणीपुरवठा योजनेसंदर्भातील माहिती द्यावी, अशी सूचना समितीने केली असता, नाशिक येथे माळमाथा प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेचे काम होते. त्यामध्ये २ कोटी रूपयांचे अतिरिक्त काम करण्यात आले. मूळ योजनेच्या आराखड्याप्रमाणे काम करण्यात आले. प्रत्येक गावात असलेली विद्यमान वितरण व्यवस्था तशीच ठेवली होती. ही वितरण व्यवस्था असल्यामुळे या वितरण व्यवस्थेऐवजी नवीन वितरण व्यवस्था घेतली नव्हती. परंतु नंतर काम करीत असताना प्रत्येक गावातील ग्रामस्थांनी मागणी केली की, पूर्वीची वितरण व्यवस्था बदलून द्यावी, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने दिलेली निविदा २०१०-२०११ च्या सीएसआरवर ६१.५ टक्के दिली. परंतु आता २०१४-२०१५ च्या सीएसआरमध्ये काम सुरू केलेले आहे. २०१०-२०११ चा सीएसआर प्लस ६१ टक्के असून यामध्ये आणि २०१४-२०१५ च्या सीएसआरमध्ये किती फरक होता ? असा प्रश्न समितीने केला असता, यामध्ये १७ टक्के पेक्षा जास्त फरक होता. तसेच केलेले वाढीव काम खंड ३८ नुसार केलेले आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

खंड ३८ बाबत माहीत आहे. आवश्यकतेनुसार व ग्रामस्थांच्या मागणीनुसार तसे केल्याचे समितीला मान्य आहे. परंतु ३८ चा वापर करून आपण चालू सीएसआरचे पैसे देण्यात येतात. त्यावेळी चालू सीएसआर प्लस ६१.५ टक्के दिला होता. हा त्याला समतुल्य आहे की, २०१४-२०१५ चा सीएसआर त्यापेक्षा अधिक आहे ? विभागाने सांगितले की, हा सीएसआर १७ टक्के पेक्षा जास्त आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, ६१.५ टक्के जास्त दिला नाही. वाढीव काम त्या सीएसआरप्रमाणेच दिलेले आहे. त्यांनी २०१०-२०११ च्या सीएसआरवर ६१.५ टक्के प्रमाणे निविदा झाली आणि आता २०१४-२०१५ या वर्षाच्या सीएसआरप्रमाणे काम दिले. या दरामध्ये तफावत आहे. ही तफावत २०१०-२०११ च्या ६१.१ टक्के पेक्षा ७८ टक्के पेक्षा जास्त आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

कंत्राटदाराची ऑफर २०१०-२०११ च्या सीएसआरप्रमाणे काढलेल्या निविदेप्रमाणे होती. त्या निविदेवर ती ६१.५ हे बरोबर आहे, असे विभागीय प्रतिनिधीनी सांगितले.

मूळ निविदा ६१.५ टक्के वर दिलेली आहे काय ? असा प्रश्न समितीने केला असता, या किमतीचे मूल्यमापन केले असता, १७.५६ टक्के पेक्षा जास्त आहे. याची चालू सीएसआरशी तुलना केली तर १७.५ टक्के जास्त आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीचे तेच म्हणणे आहे. मूळ निविदा २०१०-२०११ च्या सीएसआर वर ६१.५ टक्के पेक्षा जास्त देण्यात आली. ३८ खंड लावत असताना ज्या वर्षीचे काम करतो त्या वर्षीचा करंट सीएसआर लावण्यात येतो. २०१०-२०११ चा सीएसआर अधिक ६१.५ पेक्षा २०१४-२०१५ चा सीएसआर किती जास्त आहे असा समितीचा प्रश्न होता. या उत्तरादाखल विभागाने असे लेखी उत्तर दिलेले आहे की, तो १७ टक्क्याने आणखी जास्त आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, तो १७ टक्क्याने कमी आहे. २०११-२०१२ च्या सीएसआरप्रमाणे १७ टक्के आहे आणि २०१४-२०१५ च्या सीएसआरप्रमाणे त्यांना पार्ट पेमेंट करण्यात आले. २०१४-२०१५ च्या सीएसआरप्रमाणे ६१.५ टक्केचे मूल्यमापन करून दिले असते तर ३५ लाख रूपये त्यांना जास्त द्यावे लागले असते. आपण त्यांना ३५ लाख रूपये दिलेले नाही. याचे कारण असे की, खंड ३८ मुळे आपली ३५ लाख रूपयांची बचत झालेली आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

मुद्दा क्रमांक ५ : पुणे जिल्ह्यातील हिंजवडी गाव क्षेत्रीय ग्रामीण पाणीपुरवठा योजना.

पुणे जिल्ह्यातील हिंजवडी येथील कामाची माहिती द्यावी, असे समितीने सूचित केले असता, हिंजवडीचे काम सुरू करण्यात आले होते. परंतु तेथील लोकांनी हे पाणी शेतीचे असून त्याचे पाणी घेऊ नये, अशी हरकत घेतली व त्यांनी काम करू दिले नाही. परंतु दरम्यानच्या काळात हे काम करीत असताना ३७.४१ लाख रूपयांचे काम झालेले आहे. या रकमेमध्ये विहिरीचे व इतर दोन, तीन कामे केलेली आहेत. पुढील काम लोकांनी करू न दिल्यामुळे केलेले नाही. याबाबत वरिष्ठ पातळीवर अनेक बैठका झाल्या, परंतु पाणी देणार नाही, असे लोकांचे म्हणणे आहे. अशा प्रकारे अनेक ठिकाणी घडलेले आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या ४००-५०० कोटी रूपयांचे काम तेथील लोकं करू देत नसल्यामुळे पूर्ण झालेले नाही. खर्च झालेले ३७ लाख रूपयांचा वेस्टफुल खर्च झाला असे म्हणता येईल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने लेखी उत्तरामध्ये वेगळे उत्तर दिलेले आहे. विभागाने आता सांगितलेले आकडे खरे आहेत. तसेच लेखी उत्तरात दिलेले आहे की, भविष्यात हे होईल, असे समितीने निदर्शनास आणले असता, लोकांनी सहकार्य केले तर हे सर्व काम होईल. . काही प्रमाणात झालेले काम तसेच पडून आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

याकरिता तेथील लोकांची मान्यता घ्यावी. पाण्याचे आरक्षण झाले, त्यानंतर हे काम सुरू केलेले आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, धरणांचे लाभार्थी अनेक गावे असतात. कोणत्या गावातील लोकं कधी अडथळा निर्माण करतील हे सांगता येत नाही व याबाबत सर्वांना विचारले तर कोणतेच काम होऊ शकणार नाही. तसेच ते असे म्हणू शकत नाही की हे त्यांचे पाणी आहे. अशा शेतकऱ्यांना शासन सिंचनासाठी पाणी देत असते व तसे शासनाचे धोरण आहे की, पिण्याच्या पाण्यासाठी योजना करायची असेल आणि रिझर्व्हेशन दिले असेल तर आता असा शासन निर्णय काढलेला आहे की, ग्रामीण भागातील कोणत्याही नळ पाणीपुरवठा योजनेसाठी सिंचन खात्याची परवानगी घेण्याची आवश्यकता राहिली नाही. विभागाने शासन निर्णय काढलेला आहे व तो मंत्रिमंडळासमोर ठेवला आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

त्यांच्याकडे असलेल्या पाण्याची योजना करून सिंचनासाठी कालवे तयार केले. विभाग तेथून पाणी काढणार आहे काय ? असा प्रश्न समितीने केला असता, ग्रामीण भागासाठी मोठ्या प्रमाणात पाणी लागत नाही. शहरी भागासाठी असेल तर ठीक आहे की, पाणी जास्त लागत असल्याने त्यांना परवानगी घ्यावी लागते. परंतु ग्रामीण भागासाठी थोडे पाणी लागते व धरण मोठे असते. त्या धरणातून पाणी घेण्यासाठी पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने ग्रामविकास विभागाच्या कॅबिनेट नोटला सहमती दिली आणि १७ ऑगस्ट २०१८ रोजी तसा शासन निर्णय काढलेला आहे. त्यांनी सांगितले की, ग्रामविकास विभागात कोणतीही नळ पाणीपुरवठा योजना करावी, त्याकरिता पूर्व परवानगीची आवश्यकता नाही. परंतु याबाबत नंतर कळवावे की, पाणीपुरवठा योजनेसाठी किती पाण्याचे नियोजन केलेले आहे व तेवढे पाणी कमी करून योजना पूर्ण होईल त्या वर्षापासून सिंचनाचे नियोजन करणार, असा शासन निर्णय काढलेला आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

ही बाब अतिशय चांगली झालेली आहे. अन्यथा याकरिता बरीच वर्षे लागत होती. परंतु हा पैसा प्रत्यक्षामध्ये कधी उपयोगात येत नाही. विभागाने लेखी उत्तरात सांगितले की, विभाग खूप आशावादी आहे व भविष्यात काहीतरी करणार, असे मत समितीने व्यक्त केले असता, त्या त्या गावांसाठी योजना करायचीच आहे व आज किंवा उद्या योजना करावीच लागणार आहे. त्या त्या गावामध्ये सध्या काही ना काही पाण्याचे स्रोत आहेत, त्यामुळे तेथील लोकं जास्त धावपळ करीत नाहीत. परंतु अशा गावांमध्ये योजना नसल्यामुळे भविष्यात योजना करावीच लागणार आहे किंवा अशा भागातील लोकतिनिधींकडून सांगितले जाईल तेव्हा योजना करावीच लागेल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

परिच्छेद क्रमांक ३.४.८.३ ३ अकार्यशील योजना

या परिच्छेदाच्या संदर्भातील सद्यःस्थितीबाबत समितीने विचारणा केली असता, या परिच्छेदाच्या अनुषंगाने स्पष्ट करण्यात येते की, योजना काही ना काही कारणाने बंद पडतात. विभागाने ती सर्व कारणे नमूद केलेली आहेत. यामध्ये विशेष करून हात पंप बंद पडतात. नंतर ते दुरुस्त केले जातात. हे काम सतत सुरू राहते, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सरफेस वॉटर वरील १२ व सरफेस वॉटर खालील २९५ योजना बंद आहेत. विंधण विहिरींचे, हात पंपांच्या योजनेचे समजणे शक्य आहे. परंतु या दोन योजना मोठ्या प्रमाणात बंद आहेत, त्याबाबत माहिती द्यावी, अशी सूचना समितीने केली असता, आता विभागाने अनेक योजना सुरू करण्याचे नियोजन केलेले आहे. मुख्यमंत्री पेय जल योजनेत बंद असलेल्या प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेचे पुनर्जीवन करण्याकरिता विभागाने योजना केलेली

आहे. जवळपास २६ योजनांचे २-३ कोटी रुपयांपासून ते ७-८ कोटी रुपयांपर्यंतचे आराखडे विभागाने मंजूर केलेले आहेत. जवळपास ८० कोटी रुपयांचे प्रकल्प विभागाने मंजूर केलेले आहेत. महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, ग्राम पंचायतीकडून जी वसुली करावयाची असते त्याचे पैसे त्या देत नाहीत, ही सर्वात मोठी अडचण आहे. त्यासाठी विभागाने आता एक कॅबिनेट नोट सादर केलेली आहे की, ग्रामपंचायती जर पैसे देत नसतील तर त्यांना देय असलेल्या पैशांतून जिल्हा परिषदेने सरसकट कपात करावी. जेणेकरून एम. जे. पी. किंवा जिल्हा परिषद म्हणजे प्रादेशिक योजना चालविणाऱ्या संस्थांना ते पैसे मिळत राहतील व योजना सुरू राहतील, असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

एकूण अकार्यशील ७१४१ योजनांपैकी अहमदनगर व बीड या २ जिल्ह्यांमध्ये मिळून ४८४२ म्हणजे ६८ टक्के योजना अकार्यशील आहेत, याबाबत माहिती देण्यास समितीने सूचित केले असता, त्या जास्तीत जास्त हात पंपच्या योजना आहेत. हात पंप बंद असतात. नंतर ते सुरू होतात. ते हात हंगामी असतात. ते उन्हाळ्यात बंद पडतात. त्यातून पाणी उपलब्ध होत नाही. या सर्वांमध्ये डायनॅमिक सिच्युएशन आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

जिल्हा परिषदांना हस्तांतरित न केलेल्या १३२ प्रादेशिक ग्रामीण पाणीपुरवठा योजनांच्या बाबतीत ९२ क्षेत्रीय ग्रामीण पाणीपुरवठा योजना मार्च, २०१७ मध्ये अकार्यशील होत्या त्यांच्यावर ४४३. ८५ कोटी रुपये खर्च झाले. त्या योजनाही बंद होत्या, याबाबत माहिती द्यावी अशी सूचना समितीने केली असता, प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेतून गावांना, ग्रामपंचायतींना, पाणी दिले जाते. परंतु, त्या अनुषंगाने त्यांनी एम. जे. पी. ला किंवा जिल्हा परिषदेला किंवा शिखर समितीला जेवढे पैसे दिले पाहिजेत तेवढे पैसे ते देत नाहीत. त्यामुळे मोठे नुकसान या संस्थांना होत आहे. चंद्रपूर, लातूर अशा अनेक जिल्हा परिषदेचे लोक आमच्याकडे पत्र पाठवितात. विभागाने आता त्यांना अर्थसहाय्य करण्याचेही नियोजन केलेले आहे की, आम्ही त्यांना शासनाचे पैसे बाहेरुन देण्यात येतील. परंतु, महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, ग्रामपंचायतीने वापरलेल्या पाण्याच्या अनुषंगाने जेवढे बिल आहे ते दिले पाहिजे. ते दिले जात नाही, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

परिच्छेद क्रमांक ३.४.९ : कार्यक्रमाचे संनियंत्रण आणि मूल्यमापन

या विषयाच्या अनुषंगाने विभागाने बैठकच घेतली नसल्याचे ज्ञापनामध्ये नमूद आहे. सन २०१२ ते सन २०१७ च्या दरम्यान एकही बैठक घेतली गेली नाही. सन २०१९ मध्ये विभागाने सदस्य वाढविले. तो वेगळा विषय आहे. ती सतत चालणारी प्रक्रिया आहे. परंतु, जी समिती नियुक्त करण्यात आलेली आहे, तिची नियमित बैठक झाली पाहिजे, जेणेकरून या सर्व पाणीपुरवठा प्रकल्पांचे सनियंत्रण व व्यवस्था करण्यासाठी आपल्याला योग्य त्या मार्गदर्शक सूचना त्यांच्याकडून मिळतील. मात्र ती बैठकच विभाग घेत नाही. त्याकडे विभागाचे पूर्ण दुर्लक्ष होत आहे असाही एक विषय परिच्छेद क्रमांक ३. ४. ९ मध्ये आहे, या संदर्भात माहिती देण्यात यावी अशी सूचना समितीने केली असता, हा मुद्दा एकदम बरोबर आहे की, मागची ४-५ वर्षे बैठक घेतली नाही. मागच्या दीड वर्षांपासून या विभागामध्ये एकही बैठक झालेली नाही. एक तर या बैठकीची अशी काही आवश्यकता दिसली नाही की, बैठक घेतल्याशिवाय काम पुढे जाणार नाही. कारण काही समस्या असतात त्यामध्ये विशेष करून वित्त विभागाशी संबंधित समस्या असतात. त्या सर्व समस्या आम्ही त्यांच्याशी चर्चा करून निकाली काढत असतो, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

जर विभागाला असे वाटत असेल तर तो शासन निर्णय रद्द करावा, असे मत समितीने व्यक्त केले असता, आता विभागाने ती बैठक घेण्याचे नियोजन केलेले आहे. सर्व अजेंडा वगैरे तयार केलेला आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

आवश्यकता नाही तर कशाला नियोजन करायचे, भत्ते कशाला वाढवायचे ? याबाबत केंद्र शासनाची गाईड लाईन आहे. राज्य शासनाचा निर्णय आहे. परंतु, एन. आर. डी. डब्ल्यू. पी. चा हा धोरणात्मक निर्णय आहे की, या प्रकारच्या राज्य पाणीपुरवठा व स्वच्छता मिशनच्या राज्य शिखर समितीची बैठक दर ६ महिन्यांमध्ये व आवश्यकतेनुसार आणखी १ अशा प्रकारे घेणे बंधनकारक आहे. परंतु, त्याचे पालन कोणी करीत नाही. आता विभाग सांगत आहे की, बैठक घेण्याची आवश्यकताच नाही. मग विभागाने केंद्र शासनाचा हा नियम बंद करण्याबाबत शिफारस केली, असे समितीने मत व्यक्त केले आहे. आता विभागाने बैठक घेण्याचा अजेंडा तयार केला असून ती समिती रि-कॉन्स्टिट्यूटही केलेली आहे व तिच्यामध्ये कृषी विभागाच्या सचिवांचाही समावेश केलेला आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सोर्स फायडिंग कमिटीचे ३-४ निकष आहेत, त्याबाबत माहिती द्यावी, असे निदेश समितीने दिले असता, एन. आर. डी. डब्ल्यू. पी. च्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे सोर्स फायडिंग कमिटी स्थापन केली पाहिजे. परंतु, महाराष्ट्रामध्ये विभागाने हे काम जी. एस. डी. ए. ला दिलेले आहे. जी. एस. डी. ए. चे लोक तपासणी करून सोर्स शोधून देतात. मागच्या १० वर्षांपासून त्यांनी जसे सोर्स पाहिजेत त्या प्रमाणे शोधून दिलेले आहेत. समिती स्थापन केली तर, समितीची बैठक घेणे, तसेच ३-३ लोकांनी सोर्स फायडिंगसाठी गेल्यास आणखी वेळ लागेल. कारण ते काम फक्त जी. एस. डी. ए. चे आहे व जी. एस. डी. ए. ते काम करीत असते, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

जिल्ह्यातील योजनांच्या भौतिक व आर्थिक प्रगतीचे संनियंत्रण करण्यासाठी प्रकल्प गावाचे स्थल मूल्यमापन करण्यासाठी भारत सरकारने संनियंत्रण आणि मूल्यमापन सल्लागार यांचे १ पद मंजूर केले होते. परंतु, सन २०१४ ते सन २०१७ दरम्यान विभागाने त्यांची नियुक्तीच केली नाही. आता ती केली आहे. याबाबत सांगावे, असे समितीने निदेश दिले असता, मॉनिटरिंग व इव्हॅल्युएशन करण्यासाठी मागे २ असिस्टंट नेमले होते. मुख्य पद विभागाने आता नोव्हेंबर, २०१७ मध्ये भरलेले आहे. कारण तेव्हा एवढी आवश्यकता भासली नव्हती. दोन लोक अगोदरच नेमले होते. आता सन २०१७ मध्ये तिसऱ्या माणसाची नियुक्ती केली आहे, असे समिती विभागीय सचिवांनी सांगितले.

ते दोन असिस्टंट केव्हापासून नेमले होते? असा प्रश्न समितीने केला असता, दोन असिस्टंट सन २०१४ पासून होते. विभागाने ते युनिसेफ कडून घेतलेले होते. मध्ये या संदर्भात प्रोसेसही केली होती. परंतु, प्रतिसाद न मिळाल्याने विभागाने ते पुन्हा घेतले, आता तिसऱ्या माणसाचीही नियुक्ती केलेली आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

काही जिल्ह्यांमध्ये केंद्र पुरस्कृत योजनांसाठी दक्षता व सनियंत्रण समिती स्थापन झालेली नाही, याबाबत माहिती द्यावी, असे समितीने निदेश दिले असता, ग्रामविकास विभागामार्फत दिनांक १२ मार्च, २०१० रोजी ही समिती कॉन्स्टिट्यूट केलेली आहे. तिचे कार्यवृत्त व अहवालही विभागाकडे आहे. तिच्या बैठकीमध्ये पाणीपुरवठा व स्वच्छतेबाबत चर्चा करणे अपेक्षित असते. त्याप्रमाणे ती चर्चाही झालेली आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले. ही समिती जिल्हास्तरावरील आहे की, राज्य पातळीवरील आहे? असा प्रश्न समितीने केला असता, ही राज्य पातळीवरील समिती आहे. ग्रामपंचायत पातळीवर सध्या असलेल्या ग्राम पाणीपुरवठा समितीकडे सर्व पाणी पुरवठ्याचे काम होते. त्यामुळे आम्ही वेगळी समिती केली नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

जिल्हास्तरिय समिती स्थापन करावी, असे मत समितीने व्यक्त केले असता जिल्हास्तरीय समितीदेखील असेल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने दिलेल्या माहितीमध्ये असे नमूद केले आहे की, 'ज्या जिल्ह्यांमध्ये अशा समित्या स्थापन झालेल्या नाहीत, त्यांना तत्काळ सूचना देण्यात येत आहेत.' याबाबत माहिती द्यावी असे समितीने निदेश दिले असता, जिल्हा समितीबाबत खात्री करून प्रत्येक जिल्ह्यामध्ये समिती झाली पाहिजे व तिचे मिनिट्स वगैरे घेण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

तक्रार निवारण प्रणाली विकसित करण्याचे काम प्रगतीपथावर आहे, याबाबत अवगत करावे असे समितीने सूचित केले असता, तक्रार निवारणाबाबत जी पद्धत आहे त्याबाबत सांगावयाचे झाले तर, आधी 'ई पाणी' नावाचे एक सॉफ्टवेअर विभागाने तयार केले होते. मागच्या ३ वर्षांपर्यंत त्या सॉफ्टवेअर मार्फत आम्ही तक्रार किंवा इतर गोष्टी पाहत होतो. नंतर जेव्हा राज्य शासनाने 'आपले सरकार' हे पोर्टल सुरू केले त्या मार्फत लोकांच्या तक्रारी आमच्याकडे येतात. आम्ही त्या सर्व तक्रारी पाहतो व त्यांना रिप्लाय देतो. त्या जिल्ह्यांना पाठविण्यात येतात. मागे विभागाने जलस्वराज्य प्रकल्प हाती घेतलेला आहे. त्या अंतर्गत टोल फ्री नंबर देण्याचे नियोजन विभागाने केलेले आहे. त्याची अंमलबजावणी आता सुरू होत आहे. लोकांच्या विविध तक्रारी अशा प्रकारे विभागापर्यंत येतात, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

एन. आर. डी. डब्ल्यू. पी. च्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमाचे संनियंत्रण व मूल्यमापन यांचा अभ्यास, आढावा सन २०१२ ते सन २०१७ दरम्यान करण्यात आला नाही असे महालेखापालांचे म्हणणे आहे. विभाग म्हणतो आहे की, सन २०१५ मध्ये नियुक्ती केली. विभागाने ते महालेखापालांना दाखविले नव्हते काय ? TISS चा रिपोर्ट ? सन २०१४ मध्ये आला व त्यांनी सन २०१५ मध्ये ॲनालिसिस केले ना ? सन २०१५ मध्ये नियुक्ती केली, तर सन २०१४ मध्ये रिपोर्ट कसा काय येणार ? असा प्रश्न समितीने केला असता, ही नियुक्ती राज्य मधून केली नव्हती. केंद्र शासनाने TISS ला कार्यक्रमाचे थर्ड पार्टी इव्हॅल्युएशन करण्यासाठी नेमले होते. त्यांनी राज्यातील ४८ ग्रामपंचायती नमूना म्हणून निवडल्या होत्या. त्यांचा नमूना सर्वेक्षण करून त्यांनी काही निष्कर्ष काढले. त्यांचा अहवाल विभागाकडे आला आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने दिलेल्या माहितीमध्ये नियुक्ती सन २०१५ मध्ये केल्याचे नमूद केले आहे. महालेखापालांना विभागाने त्याबाबतची कागदपत्रे दाखविली नाहीत. त्यामुळे महालेखापालांनी असे नमूद केले आहे की, सन २०१२ ते सन २०१७ पर्यंत मूल्यमापन व संनियंत्रणाची कोणतीही व्यवस्था नव्हती. विभागाचे उत्तर विवादास्पद आहे, याकरिता समिती विभागाला याबाबत विचारणा करीत आहे, असे समितीने सूचित केले असता, हे रिपोर्ट सादर करण्यात येईल. जेव्हा महालेखापालांनी पाहिले असेल तेव्हा विभागाकडे हे रिपोर्ट आले नसतील, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने ते रिपोर्ट महालेखापालांना सादर करावेत, असे समितीने निदेश दिले असता विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शवली.

परिच्छेद क्रमांक ३. ४. १० — निष्कर्ष

या परिच्छेदाच्या अनुषंगाने थोडक्यात माहिती द्यावी, असे समितीने निदेश दिले असता, जल सुरक्षा आराखडा या विषयावर आपण मागे चर्चा केलेली आहे, असे विभागीय सचिवांनी समितीला अवगत केले.

परिच्छेद क्रमांक ३. १३ — अपूर्ण पाणीपुरवठा योजनेवर निधीची अडवणूक

या परिच्छेदाबाबतच्या सद्यःस्थितीची माहिती द्यावी असे समितीने निदेश दिले असता, ही तिलारीची योजना आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये तिलारी हे मोठे गाव आहे. तेथे एक मोठी नळ पाणीपुरवठा योजना करायची आहे. त्याचे बांधकाम सध्या सुरू आहे. त्यामध्ये मे. उत्तम स्टील ॲंड पॉवर लिमिटेड नावाची एक मोठी कंपनी होती. त्या कंपनीला सोबत घेऊन ती योजना करायची होती. कारण त्या कंपनीला पाण्याची मोठी आवश्यकता होती. त्यामध्ये भांडवली सहाय्य म्हणून त्यांचाही सहभाग होता. त्यांच्याकडून काही पैसा घ्यायचा, काही शासनाचा द्यायचा असे ते होते. त्यांनी २० कोटी रुपये दिल्यानंतर योजनेचे बांधकाम सुरू करण्यात आले. हे करीत असताना मे. उत्तम स्टील ॲंड पॉवर लिमिटेड कंपनी दिवाळ्यामध्ये निघाली. त्यांनी पुढचे पैसे दिले नाहीत. त्यामुळे त्या योजनेचे बांधकाम बंद पडले. नंतर मागच्या वर्षी फेब्रुवारी महिन्यामध्ये मंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक झाली होती. त्यांनी सांगितले की, या गावांना पाणी द्यायचेच आहे त्यामुळे योजनेचे बांधकाम बंद करून कसे चालणार? त्यामुळे विभागाने त्यावर तोडगा काढला व असे नियोजन केले की, योजनेचे बांधकाम पूर्ण करायचे. कारण त्या भागामध्ये टूरिस्ट डेस्टिनेशन म्हणून काही हॉटेल्स वगैरेही येणार आहेत. त्यांनी पर्यावरण विभागाचे १०० कोटी रुपये देऊ केले. आता त्या योजनेचे बांधकाम सुरू करण्यात आलेले आहे. त्या जमिनीवर मे. उत्तम स्टील ॲंड पॉवर लिमिटेड कंपनीचा प्रकल्प येणार होता, यामध्ये आम्ही असे नियोजन केलेले आहे की, मे. उत्तम स्टील ॲंड पॉवर लिमिटेड कंपनी किंवा मे. उत्तम

स्टील अँड पॉवर लिमिटेड कंपनी विकल्यावर येणाऱ्या दुसऱ्या कंपनीला जे काही पाणी लागेल ते पाणी देताना हे सर्व पैसे विभाग त्यांच्याकडून वसूल करणार, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले. तिलारीची ही योजना खूप वर्षे रखडलेली आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दिली तसेच योजनेचे नियोजन सन २०११ पासूनचे आहे, असे सांगितले.

विभागाने मे. उत्तम स्टील अँड पॉवर लिमिटेड कंपनीच्या भरवशावर ही योजना सुरू केली. त्यांनी २० कोटी रुपये दिल्यावर विभागाने बाकीचे ४३ कोटी रुपये देऊन टाकले. त्याच्या अगोदर ५२ कोटी रुपये दिले. त्यामध्ये ३२. ५५ कोटी दिले नंतर ११. ५६ कोटी आणखी दिले. असे करून विभागाची फसवणूक झाली. त्यांना गृहित धरुन विभागाने योजनेचे काम सुरू केले. समितीला असे वाटते की, यामध्ये त्यांचा हिस्सा ७०:३० या प्रमाणे होता, असे समितीने मत व्यक्त केले. तसेच त्यावेळेस या योजनेची एकूण किंमत किती होती ? असा प्रश्न समितीने केला असता, त्यांच्याकडून ६५ टक्के घ्यायचे आहेत, त्यावेळेस या योजनेची एकूण किंमत रुपये २१२. ३८ कोटी एवढी होती, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

रुपये २१२. ३८ कोटी ही सन २०१८ ची किंमत आहे. सन २०११ मध्ये किती किंमत होती ? विभागाने दिलेल्या माहितीमध्ये असे नमूद केले आहे की, फेर वित्तीय आकृतीबंधांचा प्रस्ताव शासनास दिनांक १८ मार्च, २०१८ रोजी सादर करण्यात आला. सदर प्रस्तावानुसार योजनेची किंमत २१२. ३८ कोटी आहे. सन २०१८ च्या सु. प्र. मा. मध्ये २१२. ३८ कोटी नमूद केले आहे. पूर्वीची योजना किती रुपयांची होती? सन २०११ ला २१६ कोटीची प्रशासकीय मान्यता असल्याचे नमूद केले आहे. सन २०१८ मध्ये २१२. ३८ कोटी ही किंमत नमूद केली आहे, हे समितीला समजले नाही. याबाबत सांगावे, अशी सूचना समितीने केली असता, यामध्ये असे झालेले आहे की, सुरूवातीची योजना ही मे. उत्तम स्टील अँड पॉवर लिमिटेड कंपनीला घेऊन केलेली आहे. त्यांचा सहभाग ६५ टक्के व यांचा सहभाग ३५ टक्के असे होते. २१८ कोटींची ती योजना होती. नंतर या भागात पाणी कमी झाले व आलेल्या निविदेच्या अनुषंगाने ती योजना पुन्हा सुधारित केली, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

योजना सुधारित केली म्हणजे, पाईप लाईन कमी केली काय, किंवा कमी साईजचे केले काय ? असा प्रश्न समितीने केला असता, काही कमी केले नाही. आता सध्या जे बांधकाम करण्यात येत आहे, त्यामध्ये पाईपलाईनचा डायमीटर तोच आहे. कारण आधी पासून तसा पाईप विभागाने वापरलेला आहे. आता एकदम डायमीटर कमी करता येणार नाही. परंतु, जी पाईप लाईन मे. उत्तम स्टील अँड पॉवर लिमिटेड कंपनीकडे जाणार होती, तेवढेच काम आता आम्ही करीत नाही. त्यांच्याकडचा भाग आम्ही करीत नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने दिलेल्या माहितीमध्ये असे नमूद केले आहे की, योजना कार्यान्वित करण्याबाबतच्या दिनांक २८ मार्च २०१८ च्या शासन निर्णयात अट क्रमांक २ नुसार मे. श्री. उत्तम स्टील ॲण्ड पॉवर लिमिटेड यांच्यासमवेत करण्यात आलेला करारनामा कायम ठेवण्यात येणार असून, जर मे. श्री. उत्तम स्टील ॲण्ड पॉवर लिमिटेड कंपनी पुढे आल्यास, त्यानुसार योजनेची सुयोग्य रक्कम शासनाकडे अनामत ठेवण्यात येणार आहे. तसेच योजनेच्या कामास विलंब झाल्यामुळे त्यानुषंगाने आवश्यक रक्कम त्यांच्याकडून वसूल करण्यात यावी, असे निर्देश आहेत. याबाबत सांगावे, असे समितीने निदेश दिले असता, त्यांच्याकडून पैसे वसूल करावयाचे आहेत. कारण आपली बरीच भांडवली रक्कम खर्च होणार आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

Now the project is not for Uttam Steel and it will be utilised for water supply to nearbuy localities and tourism development. ती कंपनी जर दिवाळखोरीमध्ये गेली असेल तर, त्यांच्याकडून पैसे वसूलच होणारच नाहीत. कोणती तरी नवीन कंपनी आली तर त्यांच्या बरोबर तुम्हाला नवीन करार करावा लागेल. मागच्या कंपनीने जे २० कोटी रुपये जमा केले होते ते २० कोटी रुपये विभागाने राईटऑफ करावे व तो करार रद्द करा. नवीन करार जेव्हा होईल तेव्हा होईल. त्या भांडवली रकमेवर विभागाने काय वसूल करायचे ते वसूल करावे, अशी सूचना समितीने केली असता, विभागाने निर्णय तर तसाच केलेला आहे. यामध्ये १ मुद्दा असा आहे की, मे. उत्तम स्टील अँड पॉवर लिमिटेड कंपनीने अजूनही माघार घेतलेली नाही. ती कंपनी दिवाल्यामध्ये गेलेली आहे. आजच्या परिस्थितीमध्ये जो करार आहे त्या कराराप्रमाणे त्यांनी कुठेही माघार घेतलेली नाही की, आम्ही पाणी घेणार नाही, असे विभागीय प्रतिनिधीनी सांगितले.

विभागाने माघार घेतली नाही, पैसेही दिले नाहीत त्यामुळे तो फॉल्टमध्ये आहे. विभागाने त्यांना सांगावे की, त्यांनी त्यांचा हिस्सा द्यावा नाही तर करार रद्द करण्यात येईल व तुमचे पैसे फॉरफीट करण्यात येतील. नंतर विभागाची जी योजना असेल, नवीन कंपनीला द्यायचे आहे तो वेगळा मुद्दा आहे. मे. उत्तम स्टील अँड पॉवर लिमिटेड कंपनीने डिफॉल्ट केले, शासनाला फसविले व आता शासनालाच कामाला लावले आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागाने त्यांना नोटिस दिलेली आहे व त्याबद्दलची कारवाई करण्यात येत आहे, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

विभागाने दिलेल्या माहितीमध्ये असे नमूद केले आहे की, योजना कार्यान्वित करण्याबाबतच्या दिनांक २८ मार्च, २०१८ च्या शासन निर्णयात अट क्रमांक २ नुसार मे. श्री. उत्तम स्टील ॲण्ड पॉवर लिमिटेड यांच्यासमवेत करण्यात आलेला करारनामा कायम ठेवण्यात येणार असून, जर मे. श्री. उत्तम स्टील ॲण्ड पॉवर लिमिटेड कंपनी पुढे आल्यास, त्यानुसार योजनेची सुयोग्य रक्कम शासनाकडे अनामत ठेवण्यात येणार आहे. तसेच योजनेच्या कामास विलंब झाल्यामुळे त्यानुषंगाने आवश्यक रक्कम त्यांच्याकडून वसूल करण्यात यावी, असे निर्देश आहेत. यासंदर्भात माहिती देण्यात यावी असे समितीने निदेश दिले असता, ॲक्चुअली करार रद्द करण्याची कारवाई केली पाहिजे. करार रद्द करून त्या जागेवर जेव्हा कोणतीही कंपनी येईल कारण तेथे १६०० एकर जागा आहे. तेथे आज ना उद्या दुसरा कोणता तरी स्टील कारखाना येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

त्यांनी २० कोटी रुपये देऊन ब्रिच ऑफ कमिटमेंट केले आहे त्या २० कोटीमुळे विभागाने कामाला सुरूवात केली व फसवणूक झाली. आता लोकांच्या मागणीप्रमाणे विभाग त्या योजनेवर २१२ कोटी रुपये खर्च करीत आहेत. याचा अर्थ त्याने विभागाला १९२ कोटी रुपये गुंतवायला लावले. मूळात आपल्याला ३५ टक्क्यांपर्यंत पैसे वापरायचे होते. He has not completed. त्याला कायदेशीर नोटिस द्यावी, करार संपवा व २० कोटी रुपये जप्त करा. It is an easy way. नंतर पुढे जेव्हा कोणी मागणी करेल त्यावेळेस विभागाच्या उपलब्धते प्रमाणे व बाकीच्या लोकांच्या मागणी प्रमाणे

निर्णय घ्यावा. परंतु, विभागाने दिलेल्या माहितीमध्ये असे नमूद केले आहे की, त्यांच्या बरोबरचा करारनामा कायम ठेवण्यात येणार असून, मे. उत्तम स्टील अँड पॉवर लिमिटेड कंपनी पुढे आल्यास, त्यानुसार योजनेची सुयोग्य रक्कम शासनाकडे अनामत ठेवण्यात येणार आहे, काय, अशी विचारणा समितीने केली असता, पुन्हा त्यांना नोटिस देऊन बोलावून घेतो. त्यांना एकतर सर्व पैसे द्यायला सांगण्यात येईल व त्यांनी ते पैसे दिले नाहीत तर त्यांचे २० कोटी रुपये जप्त करून त्यांच्याशी केलेला करारनामा रद्द करण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

त्यांच्यावर अवलंबून राहिलो तर, ती योजना पूर्ण करू ते देखील होणार नाही. जोपर्यंत त्यांच्यासमवेतचा करार रद्द करीत नाही, मग शासन खर्च करेल, काय असा प्रश्न समितीने केला असता, विभागाने बांधकामास सुरूवात केलेली आहे. पर्यटन विभागाने त्यासाठी १०० कोटी रुपये दिले आहेत. पर्यावरण विभागाचे अनेक प्रकल्प तेथे येऊ घातले आहेत. जर पाणी उपलब्ध असेल तरच प्रकल्प येतील. त्यामुळे अगोदर पाणी आले पाहिजे. यामधून वेंगुर्ला शहर व इतर १७ गावांनाही पाणी द्यायचे आहे. ही पाईपलाईन मोठी असल्यामुळे त्यामधून जास्त पाणी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे हे पाणी मालवणपर्यंत नेण्याबाबत मंत्री महोदयांनी सुचविले आहे. त्या अनुषंगाने प्रकल्पाची आखणी करण्यात येत आहे. आपल्याकडे मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध असल्यामुळे कोणत्या ना कोणत्या गावाला ते देण्यात येईल. विभाग त्याचे नियोजन करीत आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले. योजना पूर्ण झाली पाहिजे. मग ती पर्यटन विभागाकडून पूर्ण करा किंवा आणखी कोणाकडून सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये हॉटेल्स नसण्याचे कारण म्हणजे तेथे पाणी नाही. पाऊस मोठ्या प्रमाणात पडतो परंतु सर्व पाणी समुद्रात वाहून जाते. पाण्याच्या साठवणुकीची व्यवस्था नसल्यामुळे पाण्याचे दुर्भिक्ष आहे. एप्रिल-मे महिन्यामध्ये तर पाणीच नसते. मालवण व वेंगुर्ल्याला आता पर्यटन विकास झाला आहे. पाण्याची उपलब्धता झाली तर आणखी पर्यटन वाढण्यास मदत होईल व त्यावर अवलंबून असणारे व्यवसाय व इतर बाबींमध्ये देखील वाढ होईल. सन २०११ मध्ये ही योजना सुरू झाली आहे व आता सन २०१९ सुरू झाले आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, दरम्यानच्या काळात काम बंद होते, परंतु आता काम सुरू आहे. मागील फेब्रुवारी महिन्यात करार होऊन काम प्रगतीपथावर आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

संपूर्ण योजना कधीपर्यंत पूर्ण होईल ? निधीची तरतूद केलेली आहे का ? उत्तम स्टीलकडून त्यांच्या हिश्श्याच्या पैशांची मागणी केली आहे का ? अशी विचारणा समितीने केला असता, निधीची तरतूद करण्यात आली असून जून, २०२० पर्यंत काम पूर्ण होईल, असे विभागीय सचिवांनी सांगितले. मागील काळात त्यांच्या हिश्श्याच्या पैशाची मागणी केली होती, परंतु दरम्यानच्या काळामध्ये याबाबत चर्चा झाली नाही. त्यांना एकदा अंतिम नोटीस देऊ किंवा करार रद्द करण्याची कारवाई करू असे विभागीय सचिवांनी सांगितले.

अभिप्राय व शिफारशी :

परिच्छेद क्रमांक ३. ४ 'राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाचे कार्यान्वयन'

परिच्छेद क्रमांक ३. ४. ४ 'नियोजन'

परिच्छेद क्रमांक ३. ४. ४. १ 'नियोजनातील कमतरता'

अभिप्राय

६.१ राष्ट्रीय धोरण आकृतीबंध यावर आधारीत प्रत्येक राज्याने राज्य विशिष्ट क्षेत्र धोरण आकृतीबंध बनविणे आवश्यक होते ज्याच्या आधारावर १२ व्या योजना कालावधीमध्ये (२०१२-१७) पाणीपुरवठा योजना हाती घेण्यासाठी राज्यस्तरीय योजना आखावयाच्या होत्या. एनआरडीडब्लूपीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, प्रत्येक ग्रामीण आणि स्वच्छता समिती यांनी ग्रामीण जल सुरक्षा आराखडा बनवावयाचा होता, ज्यात लोकसंख्या विषयक, भौतिक वैशिष्ट्ये, जलस्रोत व गावातील इतर माहिती, उपलब्ध पाण्यासंबंधी पायाभूत घटक व अंतर, अस्तित्वातील पायाभूत सुविधांच्या व जलस्रोतांच्या विस्तारासाठी प्रस्तावित कामे आणि ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमांसाठी लागणारा निधी ह्या बाबी अंतर्भूत असतील. राज्यातील सर्व ग्रामीण पाणी आणि स्वच्छता समितीवर आधारीत जिल्हा पाणी आणि स्वच्छता अभियान यांनी जिल्हा जलसुरक्षा आराखडा बनविणे आवश्यक होते. पंचवार्षिक सर्वसमावेशक जलसुरक्षा कृती आराखडा तसेच प्रत्येक वित्तीय वर्षात वार्षिक कृती आराखडा बनविणे राज्याला बंधनकारक होते. मात्र याच्या नियोजनामध्ये त्रुटी आढळलेल्या आहेत.

राज्याने १२ व्या योजना कालावधीत पाणीपुरवठा योजनांचे नियोजन करण्यासाठी राज्यासाठी विशिष्ट असे क्षेत्र धोरण आखले नव्हते. ग्रामीण जलसुरक्षा आराखडा, जिल्हा जलसुरक्षा आराखडा आणि पंचवार्षिक सर्वसमावेशक जलसुरक्षा कृती आराखडा राज्याने तयार केला नव्हता. आराखड्यांअभावी एनआरडीडब्ल्यूपी अंतर्गत अपेक्षित असलेले नियोजन, रुपरेखांकन व ग्रामीण पेयजल पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीतील गावकऱ्यांच्या सहभागाची सुनिश्चिती झाली नव्हती. हाती घेतलेल्या योजनांमध्ये ग्रामीण पेयजल सुरक्षासंबंधीच्या मुद्यांना अधोरेखित करण्यात एकात्मिक दृष्टीकोनाचा अभाव होता. ग्रामपंचायतींकडून मागणी अभावी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी पूर्ण केलेल्या योजना कार्यरत होऊ शकल्या नाहीत किंवा ग्रामपंचायतींनी वैयक्तिक नळ पाणीपुरवठा योजना राबविल्यामुळे जिल्हा परिषदांनी योजना हस्तांतरित करून घेतल्या नाहीत असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

राज्यामध्ये सन २००९-१० पासून राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सदर कार्यक्रमांतर्गत जिल्हा जलसुरक्षा आराखडा आणि पंचवार्षिक सर्वसमावेशक सुरक्षा कृती आराखडा करणे अपेक्षित होता. तथापि, सदर कार्यक्रमाची व्याप्ती विचारात घेऊन केंद्र शासनाने निवडक तालुक्यांमध्ये पथदर्शी प्रकल्प राबविण्याचे निश्चित केले. यानुसार राज्यातील अमरावती जिल्ह्यामधील मोर्शी तालुक्याची निवड करण्यात आली होती. यानुसार मोर्शी तालुक्यातील डोमक गावाचा जलसुरक्षितता आराखडा तयार करून केंद्र शासनास सादर करण्यात आला होता. त्यास केंद्र शासनाने मान्यता दिल्यानंतर त्याच धर्तीवर अमरावती जिल्ह्यातील वरुड तालुक्यातील ९६ गावांचा जलसुरक्षा आराखडा केंद्र शासनास सादर करण्यात आलेला होता. याचप्रमाणे राज्यातील सर्व ३४ जिल्ह्यांतील प्रत्येकी एका गावाचा जलसुरक्षा आराखडा तयार करण्यात आला. सदर आराखड्याची अंमलबजावणी करण्यासाठी सर्व विभागांचा समन्वय, निधी आणि मनुष्यबळ या गोष्टी विचारात घेता जलसुरक्षा आराखड्याबाबत टप्प्याटप्प्याने कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच केंद्र शासनाने दिनांक २९ जून २०१५ च्या पत्रान्वये केवळ फ्लोराईडबाधित व संसद आदर्श ग्राम योजनेतील गावे/ वाड्यांसाठी नवीन योजना हाती घेण्यास अनुमती दिलेली होती. यामुळे सन २०१५-१६ या वर्षामध्ये प्रगतीपथावरील योजनांची संख्या विचारात घेऊन नवीन योजना कृती आराखड्यात घेण्यात आलेल्या नाहीत. तथापि, सन २०१६-१७ या वर्षाच्या कृती आराखड्यामध्ये नवीन योजनांचा समावेश करण्यात आला होता. तसेच, सन २०१७-१८ च्या कृती आराखड्यामध्ये फ्लोराईडबाधित व संसद आदर्श ग्राम योजनेतील गावे/ वाड्या या २ वर्गवारीसह हगणदारीमुक्त असलेल्या गावे वाड्यांसाठी देखील नवीन योजना घेण्यास केंद्र शासनाने सुचित केले होते. यानुसार अशा गावांची पेयजल स्थिती व गावाची मागणी विचारात घेऊन या वर्गवारीतील गावांचा वार्षिक कृती आराखड्यामध्ये समावेश करण्यात आला. यानुसार केंद्र शासनाच्या वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या सूचना विचारात घेऊन राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत प्रत्येक वर्षाचा कृती आराखडा तयार करून त्यानुसार अंमलबजावणी करण्यात आली असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

विभागाने चालू असलेल्या योजनांच्या पूर्ततेला प्राधान्य दिले होते आणि तद्अनुषंगाने, २०१५-१६ च्या वार्षिक कृति आराखड्यात २३२४ चालू योजना समाविष्ट केल्या गेल्या. सन २०१६-१७ च्या वार्षिक कृति आराखड्यात १६६० चालू योजना तसेच ४४ दूषित पाण्याने बाधित वस्त्यांसाठी व ५९ संसद आदर्श ग्राम योजनेतील वस्त्यांसाठी नव्या योजना समाविष्ट केल्या.

शिफारस

६.२ भारत सरकारने पेयजल आणि स्वच्छता विभागामार्फत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (एनआरडीडब्ल्यूपी) एप्रिल, २००९ मध्ये अंमलात आणला. एनआरडीडब्ल्यूपी ही भारत सरकारची केंद्र पुरस्कृत योजना असून तिचा उद्देश देशातील ग्रामीण लोकसंख्येला पुरेसे

आणि सुरक्षित पिण्याचे पाणी पुरविणे हा होता. ग्रामीण माणसाला पिण्यासाठी, अन्न शिजविण्यासाठी आणि इतर घरगुती गरजांसाठी पुरेशा आणि सुरक्षित पाण्याचा अविरत पुरवठा करणे हे शासनाचे ध्येय होते. पाणी गुणवत्ता मानकांची पूर्तता करणे आणि ते कोणत्याही परिस्थितीत व केव्हाही सहजतेने उपलब्ध होणे या बाबी मूळ आवश्यकतांमध्ये अंतर्भूत होत्या. एनआरडीडब्ल्यूपीचे १) व्याप्ती, २) पाणी गुणवत्ता, ३) कार्य आणि परिरक्षा, ४) टीकाऊपणा, ५) आधारकार्ये, ६) पाण्याच्या गुणवत्तेचे संनियंत्रण आणि संनिरीक्षण हे घटक आहेत. व्याप्ती, पाणी गुणवत्ता आणि कार्य आणि परिरक्षा या घटकांसाठी निधी वितरणाचा आकृतिबंध हा भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांच्यामध्ये ५० : ५० असा होता तर, टिकाऊपणा, आधारकार्ये आणि पाणी गुणवत्ता संनियंत्रण आणि संनिरीक्षण या घटकांसाठी भारत सरकारकडून १०० टक्के निधी दिला जात होता. एप्रिल, २०१५ पासून निधी वितरणांच्या आकृतिबंधात सुधारणा करण्यात येऊन टीकाऊपणा, आधारकार्ये आणि पाणी गुणवत्ता संनियंत्रण आणि संनिरीक्षण या घटकांवर भारत सरकारचा हिस्सा ६० टक्के व राज्याचा ४० टक्के असा करण्यात आला. उर्वरीत घटकांमध्ये निधी वितरणाच्या आकृतिबंधात काहीही बदल केले नव्हते. असे असताना राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाचे कार्यान्वयन करताना नियोजनात कमतरता असल्याचे आक्षेप महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात नोंदविलेले आहेत. या योजनेंतर्गत सर्व गावांचे आराखडे तयार करणे बंधनकारक असताना काही ठराविक गावांची पायलट प्रोजेक्टसाठी निवड करून केवळ त्याच गावांचे आराखडे तयार करण्यात आले. तसेच संपूर्ण ३४ जिल्ह्यांमधील प्रत्येक गावांचे स्वतंत्र आराखडे न करता संपूर्ण जिल्ह्याचा एक आराखडा तयार करण्यात आला. त्याचदरम्यान भूजलासंबंधी नियम करण्याची कार्यवाही सुरू असून त्यावर विस्तृत चर्चा केल्यानंतर लोकांच्या हरकती व सूचना मागविण्यात आलेल्या आहेत व त्या विचारात घेऊन नियम अंतिम करण्याची कार्यवाही सुरू असून याआधारे प्रत्येक गावात किती पाणी आहे, शेतीला, पिण्यासाठी व इतर कामांना किती पाणी लागणार आहे यासंदर्भाचे नियोजन करूनच विभागाला हे आराखडे तयार करायचे होते. खाजगी संस्थेकडून ३४ जिल्ह्यांचे आराखडे तयार करून घेतले असून त्यासंदर्भात अभ्यास सुरू असून भूजलसंबंधी नियम करण्याची कार्यवाही समितीकडे सोपविण्यात आल्याचेही समितीस सांगण्यात आले. अशाप्रकारे ४०००० गावांचे आराखडे तयार करण्यासाठी पुढील ५ वर्षाचे नियोजन करण्यात येईल व खाजगी एजन्सीमार्फत हे काम करण्याचेही विभागीय सचिवांनी समितीस सांगितले. याचा अर्थ राज्यातील पाण्याची गरज पुरविण्यासाठी सर्व समावेशक नियोजन करण्याऐवजी विभाग केवळ गरजेनुसार वार्षिक कृती आराखडा बनवित असल्याचे दिसून येते. आता ज्या योजना अनेक वर्षापासून प्रलंबित आहेत त्यामागील कारणे शोधून त्यावर उपाययोजना करण्यासाठी विभागाने एक विशेष मोहिम हाती घेतलेली आहे. एका गावाचा आराखडा तयार करण्यासाठी साधारणतः १५ ते २० हजार खर्च येणार असून या कामाची व्याप्ती अत्यंत मोठी आहे. ज्यात निधी व वेळ अशा दोन्ही बाबी मोठ्या स्वरुपात लागणाऱ्या आहेत. या योजनेकरिता केंद्र शासनाकडून राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत निधी प्राप्त होतो. त्यातील काही योजनांना केंद्र शासन १०० टक्के तर काही योजनांचा ५०:५० टक्के निधी देते. परंतु या योजनेला ८ ते ९ वर्षे होऊन गेल्यानंतरही अद्यापही हे काम पूर्ण झालेले नाही. या कामांसाठी आर्थिक तरतूद केंद्र व राज्य शासनाच्या हिश्श्याच्या अनुषंगाने नियोजन विभागाने करण्याची नितांत आवश्यकता असून योजनेच्या निकषानुसार रकमेचे समायोजन करून अथवा अतिरिक्त निधी मंजूर करून काम पूर्ण करणे अत्यंत आवश्यक आहे. या योजनेंतर्गत निधीची कमतरता भासत असून केंद्र शासनाकडून येणारा निधी हा आर्थिक वर्ष संपण्या अखेरीस म्हणजे मार्च महिन्यात प्राप्त होतो. त्यामुळे तो विहित वेळेत खर्च होऊ शकत नाही. परिणामी रु. ६० ते ७० कोटी अखर्चित राहतात. यामुळे दुसरा हप्ता देखील प्राप्त होऊ शकत नाही. हा निधी जर लवकर प्राप्त झाला तर तो विहित कालावधीत खर्च करणे विभागाला नक्कीच शक्य होणारे आहे. केंद्र शासनाकडून हा निधी लवकरात लवकर आणण्याचा प्रयत्न विभागाने करावा, जेणेकरून निधी अखर्चित राहणार नाही. याअगोदर राज्य शासनाकडून निधीचे वितरण समितीमार्फत होत होते. मात्र समिती प्रभावीपणे काम करीत नसल्याचे तसेच समितीकडून वेळेत माहितीदेखील मिळत नसल्याचे विभागाच्या निदर्शनास आल्यानंतर सन २०१८ मध्ये या समित्या बरखास्त करण्यात आल्या, प्रलंबित कामे पूर्ण केली व खर्चाचा हिशोब जिल्हापरिषद व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडे देण्यात आला. आता विभागाने ही दुरुस्ती केली मात्र यापुर्वी अशाप्रकारची यंत्रणा कार्यान्वित न केल्यामुळे विभागाचे जवळजवळ रु. ७० कोटीचे नुकसान झाले. हा निधी लवकर प्राप्त करून घेण्यासाठी विभागाने किती वेळा प्रयत्न केले अशी समितीने विचारणा केली असता अनेक वेळा यासंदर्भात बैठका घेऊन चर्चा करण्यात आली. या सर्व बाबींचा आढावा घेता विभागांतर्गत नियोजन व सुसुत्रता आणण्याची नितांत आवश्यकता आहे. विभागाने तयार केलेले आराखडे व अंदाजपत्रकदेखील योग्य नसतात त्यामुळे देखील अशाप्रकारच्या अनेक अडचणी निर्माण होतात. अतः विभागाने हे सर्व आराखडे नियमानुसार व योग्य पद्धतीने तयार करावेत. त्यासाठी पुरेशी अंदाजपत्रकीय तरतूद करण्यात यावी व या योजनेची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे व सार्वजनिक हित समोर ठेवून करण्यात यावी. केंद्र व राज्याच्या हिश्श्याच्या निधीचे नियोजन करून योजनेच्या निकषानुसार रकमेचे समायोजन करून अथवा अतिरिक्त निधी मंजूर करून काम पूर्ण करणेसंदर्भात नियोजन करण्यात यावे. केंद्राच्या हिश्श्याचा निधी वर्ष संपण्याअगोदर विहित मुदतीत प्राप्त करून घेण्यासाठी पूर्ण प्रयत्न करण्यात यावे. तसेच प्राप्त निधी मुदतीत खर्च करणेसाठी कालबद्ध नियोजन करण्यात यावे व नियोजनातील कमतरता नष्ट करण्यात याव्यात व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ३.४.५ "वित्तीय व्यवस्थापन"

परिच्छेद क्रमांक ३.४.५.१ "भारत सरकारने लादलेली वित्तीय कपात"

अभिप्राय

६.३ दुसऱ्या हप्त्याच्या वितरणाचे प्रस्ताव सादर करण्यास विलंब झाल्यामुळे आणि मागील वर्षीच्या वितरणांच्या १० टक्क्यापेक्षा अधिक निधीची आरंभी शिल्लक असल्यामुळे भारत सरकारने २०१२-१७ दरम्यान रु. १२९.५१ कोटीची कपात लादली होती. त्यानंतर भारत सरकारने जरी राज्याला रु. ५८. ४१ कोटी वितरित केले होते तरी उर्वरित रक्कम रु. ७१.१० कोटी (रु. १२९.५१ - रु. ५८.४१ कोटी) वितरित केली नाही. अशाप्रकारे दुसऱ्या हप्त्याच्या वितरणाचे प्रस्ताव सादर करण्यास विलंब केल्यामुळे आणि मागील वर्षीच्या वितरणापैकी १० टक्क्यांपेक्षा अधिक निधी अखर्चित राहील्यामुळे विभागाला योजनेसाठीच्या रु. ७१.१० कोटीच्या केंद्रीय निधीपासून वंचित राहावे लागले असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

सन २०१३-१४ मध्ये केंद्र शासनाच्या कार्यक्रम निधीअंतर्गत (Program Fund) रु. ६८२.४४ कोटी नियतव्ययापैकी केंद्र शासनाकडून रु. ६३०. ८९ कोटी राज्य शासनास वितरित करण्यात आले. अशा प्रकारे एकंदर रु. ५१.५४ कोटी निधी कपात करण्यात आली. मजीप्राचे लेखे जुलै, २०१२ मध्ये वासो कार्यालयास हस्तांतरित करणे, मजीप्राच्या लेख्यांशी ताळमेळ जुळवून व केंद्र हिश्श्याचा सन २०१२-१३ च्या उपयोगिता प्रमाण पत्राच्या आधारावर सन २०१३-१४ चा निधी मागणी प्रस्ताव केंद्र शासनास सादर करणे या प्रक्रियेमुळे निधी मागणी प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यास विलंब झाला.

सन २०१४-१५ मध्ये केंद्र शासनाच्या कार्यक्रम निधीअंतर्गत (Program Fund) रु. ६८०.२५ कोटी नियतव्ययापैकी केंद्र शासनाकडून रु. ६६८.११ कोटी राज्य शासनास वितरित करण्यात आले. अशा प्रकारे एकंदर रु. १२.१४ कोटी निधी कपात निधी मागणी प्रस्ताव सादर करण्यास झालेल्या विलंबामुळे करण्यात आली. सन २०१४-१५ चा दुसऱ्या हप्त्याचा निधी मागणी प्रस्ताव केंद्र शासनास जानेवारी, २०१५ मध्ये सादर करण्यात आला. महालेखाकार कार्यालयाने सन २००८-०९ व सन २००९-१० च्या लेखा परीक्षणादरम्यान उपस्थित केलेल्या शेऱ्यांचा पूर्तता अहवाल प्रलंबित असल्याने केंद्र शासनाकडून निधी प्राप्त करून घेण्यास विलंब झाला याबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा करून मार्च, २०१५ मध्ये दुसऱ्या हप्त्याचा निधी प्राप्त करून घेण्यात आला. अशाप्रकारे केंद्र शासनाकडून उपरोल्लिखित कारणांमुळे एकूण रु. ६३.६८ कोटी (रु. ५१.५४ कोटी अ रु. १२.१४ कोटी) निधी कपात करण्यात आली. तसेच उपरोक्त कारणांमुळेच केंद्र हिस्याचा दुसऱ्या हप्त्याचा निधी आर्थिक वर्षाच्या शेवटी मार्च महिन्यात प्राप्त झाल्याने तो अखर्चित राहिला असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

शिफारस

६.४ भारत सरकार एनआरडीडब्ल्यूपी अंतर्गत निधीचे वाटप हे दरवर्षी वर्षाच्या सुरूवातीसच करते. जर राज्याने गेल्यावर्षीच्या दुसऱ्या हप्त्याचे आहरण केले असेल तर भारत सरकार कार्यक्रम निधी अंतर्गत वाटपाच्या पहिल्या हप्याचे (५० टक्के) वितरण करते कार्यक्रम निधी अंतर्गत दुसऱ्या हप्त्याचे वितरण हे राज्याकडून विशिष्ट प्रस्ताव मागील वर्षाचे उपयोगिता प्रमाणपत्र, मागील वर्षाच्या वास्तविक खर्चाचे प्रमाणपत्र इ. प्राप्त झाल्यावर केले जाते.

एनआरडीडब्लूपी अंतर्गत २०१२-१४ आणि २०१४-१७ दरम्यान निधीचा ओघ, भारत सरकारने २०१२-१७ दरम्यान घटक -निहाय केलेले निधीचे वाटप आणी झालेला खर्च तसेच महाराष्ट्र शासन आणि भारत सरकार यांनी वर्ष निहाय आणि घटकनिहाय केलेले वाटप आणि खर्च पाहता सन २०१२-१७ दरम्यान एकूण रु. ६१४४.५१ कोटीच्या (भारत सरकार रु. ३०४४.३९ कोटी व महाराष्ट्र शासन रु. ३१००.१३ कोटी) वाटपाच्या तुलनेत रु. ५८८०.१० कोटी (भारत सरकार रु. ३१६८.३४ कोटी व महाराष्ट्र शासन रु. २७११.८२ कोटी) इतका खर्च करण्यात आला होता. यासंदर्भात निधीची प्राप्ती व उपयोगिता यासंदर्भात सदरहू आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी भारत सरकारने लादलेली वित्तीय कपात यासंदर्भात आक्षेप नोंदविलेले असून महालेखाकारांनी केंद्राकडून रु. ७१ कोटी कमी मिळाले असल्याचे आक्षेपात नमूद केले असून विभागाने मात्र ही रक्कम रु. ७१ कोटी नसून रु. ६३ कोटी असल्याचे नमूद केले. यावर महालेखाकारांनी समितीसमोर स्पष्ट केले की, ज्यावेळी आक्षेप नोंदविण्यात आले होते त्यावेळी ही रक्कम रु. ७१ कोटी असून विभागाकडून नंतर आवश्यक ती कागदपत्रे महालेखापाल कार्यालयाकडे सादर करण्यात आल्यानंतर अंतिमतः हा हिशोब लावून आता ही रक्कम रू. ६३ कोटी असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले. जरी रकमेतील तफावत दूर झाली असली तरीही रु. ६३ कोटी एवढी भारत सरकारने लादलेली वित्तीय कपात ही देखील निश्चितच समर्थनीय नाही. वेगवेगळ्या योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून राज्य शासनाला निधी प्राप्त होत असतो. त्यासाठी केंद्र शासनाद्वारे काही अटी व शर्ती विहित असतात व त्याचे पालन केल्यास राज्य शासनाला हा निधी प्राप्त होत असतो. मात्र अटी शर्तींची पूर्तता न झाल्यास अथवा त्याचे उल्लंघन वा प्रशासकीय विलंब झाल्यास भारत सरकारद्वारे अशा निधीमध्ये कपात करण्यात येते. अशा परिस्थितीत राज्य शासनाने केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या आर्थिक सहाय्याबाबत वेळोवेळी सजग व जागरुक असले पाहिजे. आवश्यक ती पूर्तता करून जास्तीतजास्त निधी केंद्राकडून मिळविण्याचा राज्य शासनाने प्रयत्न केला पाहिजे. काही तांत्रिक त्रुटीमुळे वा पुर्ततेअभावी कोणत्याही प्रकारे निधीमध्ये कपात होऊ नये याची पूर्ण दक्षता घेण्याची जबाबदारी ही राज्य शासनाच्या अधिकाऱ्यांची असताना हे विषय प्रशासकीय स्तरावरून गांभीर्याने व कालबद्ध पद्धतीने हाताळले जात नाहीत, याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. प्रशासकीय त्रुटींमुळे अशाप्रकारे निधीमध्ये

झालेल्या कपातीमुळे राज्याला अनेक योजनांच्या अंमलबजावणीसाठी कमी निधी प्राप्त होतो व विहित उद्दिष्ट गाठण्यास अडथळा निर्माण होतो. अतः सदरहू प्रकरणी या आक्षेपित बाबीकरिता जबाबदार अधिकाऱ्यांवर विभागाने कारवाई करावी तसेच भविष्यात अशा आक्षेपांची पुनरावृत्ती टाळण्यात यावी व कोणत्याही योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या आर्थिक सहाय्यासंदर्भात आवश्यक ती पूर्तता विहित कालमर्यादेत करणेबाबत व कोणत्याही अटी शर्तींचे उल्लंघन टाळण्याबाबत व केंद्र शासनाकडून राज्यासाठी जास्तीत जास्त निधी प्राप्त करून घेणेसाठी प्रयत्नशील राहणेबाबत सर्व अधिकाऱ्यांना शासनस्तरावरून निदेशित करण्यात यावे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ३.४.५.२ "राज्य शासनाद्वारे अनुरुप हिश्श्याचे कमी वितरण"

अभिप्राय

६.५ एनआरडीडब्लुपी च्या मार्गदर्शक सूचनानुसार व्याप्ती, पाणी गुणवत्ता, कार्य आणि परीक्षाअंतर्गत भारत सरकार आणि राज्य शासन याच्यात समान हिश्श्यामध्ये निधी वाटला जाणे आवश्यक होते. राज्य शासनाने २०१२-१७ दरम्यान उपलब्ध करून देणे आवश्यक असलेल्या रु. ३२४६. ६६ कोटी इतक्या अनुरुप हिश्श्याऐवजी महाराष्ट्र शासनाने रु. २६९८. ७३ कोटी इतकाच निधी वितरित केला. ज्यामुळे राज्य शासनाच्या हिश्श्याचे रु. ५४७. ९३ कोटी इतके कमी वितरण झाल्याचे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

केंद्र शासनाच्या संकेत स्थळावर सन २०१२-१७ दरम्यान केंद्र व राज्य हिश्यांतर्गत व्याप्ती, पाणी गुणवत्ता व देखभाल दुरुस्ती या घटकांतर्गत निधी वितरणाचा तपशील दर्शविला आहे. सन २०१२-१३ मध्ये केंद्र शासनाकडून राज्य शासनास रु. ११४. ३० कोटी नियमित केंद्र नियतव्ययाव्यतिरिक्त प्रोत्साहन निधी म्हणून वितरित करण्यात आले. त्यामुळे त्याची राज्य शासन स्तरावरून वित्तीय तरतूद करणे शक्य झाले नाही. परंतु सन २०१२-१७ या कालावधीत राज्य शासनाने सम प्रमाणात उपलब्ध करून द्यावयाच्या रु. २४५५. ९९ कोटी निधी विचारात घेता राज्य शासन स्तरावरून रु. ३१०२. १५ कोटी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. अशा प्रकारे रु. ६४६. १६ कोटी निधी वाढीव स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आला असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

शिफारस

६.६ सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी राज्य शासनाद्वारे अनुरुप हिश्श्याचे कमी वितरण यासंदर्भात आक्षेप नोंदविलेले आहेत. केंद्र आणि राज्य शासन यांच्यात NRDWP अंतर्गत समान हिश्श्यामध्ये निधीचे वाटप होणे आवश्यक होते. परंतु तसे न झाल्याचे आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेले आहेत. मात्र विभागीय सचिवांनी यासंदर्भात स्पष्ट केले की, राज्य शासनाकडून द्यावयाची हिश्श्याची रक्कम ही रु. २४५५ कोटी इतकी असताना विभागाने मात्र रु. ३१०२ कोटी इतका निधी दिलेला आहे. या कागदपत्रांची माहिती विभागाच्या लोकांनी विहित वेळेत महालेखाकार कार्यालयास सादर न केल्यामुळे हे आक्षेप नोंदविले गेले, ज्यात राज्याच्या हिश्श्याची रक्कम कमी दर्शविण्यात आली. विभागाकडे प्रकरणासंबंधी उपलब्ध असलेली कागदपत्रे जर विहित मुदतीत महालेखाकारांकडे सादर झाली असती तर हे आक्षेप निश्चितच टाळता आले असते. तरीही महालेखाकारांनी नोंदविलेली आकडेवारी व शासनाने समितीसमोर सादर केलेली आकडेवारी यात तफावत असल्यामुळे विभागीय प्रतिनिधींनी महालेखाकारांसमवेत एकत्रित बसून या आकडेवारी तपासून व त्याबाबत अंतिम निष्कर्षाप्रत येऊन या आक्षेपाचे निराकरण करावे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ३.४.५.३ "दूषित पाण्याने बाधित वस्त्यांसाठी राखून ठेवलेल्या निती आयोगाच्या निधीचे अनुपयोगिता"

अभिप्राय

६.७ फ्लोराईड आणि अर्सेनिक बाधित वस्त्यांमधील पिण्याच्या पाण्याची समस्या सोडवण्यासाठी भारत सरकारने, निधी प्राप्तीनंतर १५ दिवसांमध्ये अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांकडे निधीचे हस्तांतरण करण्याच्या अटीवर रु. २४.०८ कोटी इतक्या निधीचे एकाच वेळेचे सहाय्य म्हणून महाराष्ट्र शासनाला वितरण केले. मात्र या अटीचे उल्लंघन केल्यास अंमलबजावणी करणाऱ्या संस्थेला निधीचे वितरण भारतीय रिझर्व्ह बँकेच्या तत्कालिन दराप्रमाणे व्याजासहीत करावे लागेल. महाराष्ट्र शासनाने पाणी स्वच्छता व सहाय्य संघटनेला निधीचे वितरण १८६ दिवसांच्या विलंबाने केल्याचे व त्यावर व्याजाचे प्रदान न केल्याचे, जे रु. १.७२ कोटी इतके होते आणि हा निधी विनिर्दिष्ट कामांवर पाणी स्वच्छता व सहाय्य संघटनेने खर्चही केला नव्हता असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

उपरोक्त कामाच्या निविदा विविध कारणाने चार वेळा प्रसिद्ध केल्या व प्रत्येक वेळी निविदाकारास निविदा सादर करावयाचा २५ दिवसांचा कालावधी द्यावा लागला. त्यामुळे सदर कामाचे कार्यादेश देण्यास उशिर झाला व त्यामुळे निती आयोगाकडून प्राप्त झालेला रु. २४. ०८ कोटी निधी विहित वेळेत खर्च करता आला नाही. सद्यःस्थितीत रू. ६. ०७ कोटी निधी खर्च करण्यात आला असून ४३ संयंत्रे बसविण्यात आली आहेत व उर्वरित ७९ संयंत्रांची कामे प्रगतिपथावर असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

शिफारस

६.८ सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी दूषित पाण्याने बाधित वस्त्यांसाठी राखून ठेवलेल्या निती आयोगाच्या निधीची अनुपयोगिता यासंदर्भात आक्षेप नोंदविलेले आहेत. या आक्षेपांतर्गत भारत सरकारकडून निधी प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसांमध्ये अंमलबजावणी

करणाऱ्या संस्थांकडे निधीचे हस्तांतरण करण्याच्या अटीवर निधीचे एकाच वेळेचे सहाय्य राज्य शासनाला वितरित केले. मात्र या अटीचे उल्लंघन झाल्यास अंमलबजावणी करणाऱ्या संस्थेला निधीचे वितरण भारतीय रिझर्व्ह बँकेच्या तत्कालिन दराप्रमाणे व्याजासहीत करण्यासंदर्भात अट घालण्यात आली होती. राज्य शासनाने या निधीचे वितरण संघटनेला १८६ दिवसाच्या विलंबाने केले मात्र व्याजाचे प्रदान त्यांना केले नाही. अशाप्रकारे रु. १. ७२ कोटी इतक्या कमी निधीचे वितरण करण्यात आले. निधी वाटपात झालेला विलंब व झालेल्या विलंबाच्या अनुषंगाने द्यावयाच्या व्याजाच्या रकमेचे प्रदान असे दोन मुद्दे प्रामुख्याने सदरहू परिच्छेदात दिसून येतात. समितीने यासंदर्भात विचारणा केली असता निती आयोगाने सन २०१५ मध्ये रु. २४.०८ कोटी दिले असून त्यातून ८० ठिकाणी डीफ्लोरीडेशनचे युनिट बसवायचे होते. परंतु ५ वेळा निविदा मागवूनदेखील एजन्सी निश्चित न झाल्यामुळे हा विलंब झालेला आहे. अंतिमतः सन २०१७ मध्ये ही निविदा देण्यात आली. या निधीशिवाय जलस्वराज्य प्रकल्पांतर्गतसुद्धा विभागाला काही निधी प्राप्त झाला. अशी एकूण १२२ संयंत्रे बसवायची होती. निविदा अंतिम झाल्यानंतर संयंत्र प्रत्यक्षपणे गावात बसविण्यासाठी गेल्यानंतर अनेक अडचणी समोर आल्या. उदा. संयंत्र चालण्यासाठी आवश्यक असलेले कन्टेंट तेथे उपलब्ध नव्हते. जसे प्रत्येक लिटरमागे १.५ मि. ग्रॅ. दूषित पाण्याचे प्रमाण असले पाहिजे त्यामुळे त्याठिकाणी संयंत्र बसविणे अनुज्ञेय नव्हते. तसेच ही गावांची यादी फार जुनी असल्यामुळे व कालानुरुप पाण्यामध्ये सुधारणा होऊन पाण्याचा दर्जा चांगला झाल्यामुळे ती गावे यातून वगळणेदेखील क्रमप्राप्त होते. अशाप्रकारे ७६ ठिकाणी संयंत्रे आतापर्यंत बसविण्यात आली आहेत व उर्वरित गावांचा फेरआढावा घेण्यात येणार असल्याबाबत विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. वास्तविक गावांमधील पाण्यांचे नमुने तपासताना सर्व गावांचे पाण्याचे नमुने तपासले जातात व १.५ मि.ग्रॅ. पेक्षा जास्त फ्लोराईडचे प्रमाण असलेली गावे वेगळी काढली जातात. परंतु योजनेसाठी गाव निवडीचे निकष जर हे असतील तर ही तयार केलेली गावांची यादी प्रत्येक ६ महिन्यानंतर अद्ययावत करणे अत्यावश्यक ठरते. हवामानावरदेखील हे प्रमाण अवलंबून असते. दुष्काळाच्यावेळी पाण्याचे प्रमाण कमी असल्यामुळे फ्लोराईडचे प्रमाण त्यात अधिक आढळते व नंतर मात्र हे प्रमाण कमी होते किंवा कित्येक गावांमध्ये पाण्याच्या दर्जामध्ये सुधारणा झाल्यानंतर ही गावे वगळणे आवश्यक ठरते. अशा निरनिराळ्या कारणास्तव जर ही गावांची यादी वेळोवेळी अद्ययावत केली नाही तर प्रत्यक्षात संयंत्रे बसविताना गरजू गावांची निवड पारदर्शकपणे होणार नाही. किंबहुना जास्त गरज असलेली गावे यातून वगळण्याची व गरज नसलेल्या गावांमध्ये संयंत्रे बसविण्याची शक्यता नाकारता येत नाही. सलग ३ वर्षे फ्लोराईडचे प्रमाण जास्त असलेल्या गावांची निवड डीफ्लोरीडेशन प्लॅन्टसाठी करण्यात येते. अशा परिस्थितीत गावांची निवड करताना ६ महिन्यांच्या अंतराने अद्ययावत केलेल्या यादीच्या आधारेच ही निवड करण्यात यावी. इतकेच नव्हेतर फ्लोराईडमुळे मानवी आरोग्यास असणारे धोके व दुष्परिणाम लक्षात घेता केवळ तांत्रिक पूर्ततेअभावी ज्या गावांची या प्लॅन्टसाठी निवड झाली नाही मात्र तेथे पाण्यात फ्लोराईडचे प्रमाण आढळून येते अशा ठिकाणी हे प्रमाण कमी वा नाहीसे करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना शासनस्तरावरून करण्यात यावी. डीफ्लोरीडेशन प्लॅन्ट हा एक तात्पुरता उपाय आहे. कायमस्वरुपी यातून मार्ग काढावयाचा असल्यास पाण्याचे वितरण नळ पाणीपुरवठा योजनेमार्फतच करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने आवश्यक ती उपाययोजना तातडीने शासनस्तरावरून करण्यात यावी. केंद्र शासनाकडून प्राप्त निधी विहित मुदतीत संस्थांना वितरित करण्यात यावा व तसे न केल्यास व्याजाच्या तरतुदीची अंमलबजावणी विभागाने करावी. राज्य शासनातर्फे हा व्याजाचा निधी देण्यात येत असून शासनाच्या सार्वजनिक हितांच्या योजनांवरच हा खर्च करण्यात येणार असल्यामुळे या निधीमध्ये व्याजाची रक्कम समाविष्ट करण्यास राज्य शासनाला कोणतीही अडचण असण्याची हरकत नाही. राज्य शासनाने मुख्यमंत्री पेयजल योजनेंतर्गतसुद्धा राज्य शासनाचे रु. २,५०० कोटी इतका निधी वापरलेला आहे. त्या तुलनेत राज्य शासनाने भरावयाची व्याजाची रक्कम ही फारच कमी आहे. तरीही अटी शर्तीचे उल्लंघन होऊ नये व व्याजाच्या निधीचा वापर सार्वजनिक हिताच्या योजनेंतर्गतच होणार असल्यामुळे हा निधी वितरित करण्याबाबत शासनस्तरावरून योग्य तो निर्णय घेण्यात यावा अन्यथा केंद्र शासनाला ही व्याजाची रक्कम माफ करण्याबाबत विनंती करण्यात यावी. परंतु कोणत्याही परिस्थितीत हा विषय कालबद्ध पद्धतीने निकाली काढण्यात यावा व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ३.४.५.४ " इतर योजनांसोबत अभिसरणाचा अभाव "

अभिप्राय

६.९ एनआरडीडब्लूपीच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे अतिशोषित गंभीर आणि निम-गंभीर गटांमध्ये आणि दूषित पाण्याने बाधित वस्त्यांमध्ये टिकाऊ बांधकामे प्राधान्याने हाती घेण्यात यावीत आणि कोणत्याही पुनर्भरण व्यवस्थेची/भूतलावरील पाणी अडवणारी बांधकामे याबाबतीत मंजुरीवरील खर्च महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना/एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम निधीतून भागविण्यात यावा.

परंतु सहा जिल्ह्यांच्या (बुलढाणा, नागपूर, सांगली, औरंगाबाद, अहमदनगर आणि नाशिक) अभिलेख्यांच्या छाननीत सन २०१२-१७ दरम्यान रु. ४१.५३ कोटी खर्च करून १,६८९ टिकाऊ बांधकामे, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना/एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम अभिसरणाशिवाय करण्यात आली. इतर कार्यक्रमांशी अभिसरण करून जर कामांची अंमलबजावणी केली गेली असती तर विभागाला बचत झालेला निधी टिकाऊपणा घटकांतर्गत इतर अधिक प्रकल्प व्यापित करता आले असते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत बुलढाणा, नागपूर, सांगली, औरंगाबाद, अहमदनगर आणि नाशिक या जिल्ह्यांमध्ये राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (शाश्वतता) अंतर्गत सन २०१२-२०१७ या कालावधीत एकूण १,६८९ स्रोत बळकटीकरण करण्याची कामे घेण्यात आली.

एन. आर. डी. डब्ल्यू. पी च्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे अतिशोषित, गंभीर आणि निमगंभीर गटांमध्ये आणि दूषित पाण्याने बाधित वस्त्यांमध्येच स्रोत बळकटीकरणाची कामे घेण्यात आलेली आहे. अस्तित्वातील पिण्याच्या पाण्याचा स्रोत (Point Source) असणाऱ्या विहिर, विंधन विहीर किंवा नळ पाणीपुरवठा विहीर (PWS Well) अशा ठिकाणी भूजल कमी उपलब्ध असल्याने अशा गावे/वाड्यांमध्ये सदर स्रोतांचे बळकटीकरण करण्यासाठी सिमेंट नाला बांध, भूमिगत बंधारा, चेक डॅम अशा उपाययोजना राबविण्यात आल्या आहेत. वरील अस्तित्वातील पिण्याच्या पाण्याचे स्रोत हे पूर्ण पाणलोट (माथा ते पायथा) व्यापत नसल्याने अस्तित्वातील उद्‌भव कोरडा असलेल्या ठिकाणी या उपाययोजनेद्वारे पुनर्भरण करण्यात आले. त्यामुळे सदर गाव/वाड्या या उन्हाळ्यामध्ये टँकरमुक्त झाल्या आहेत. उद्‌भव बळकटीकरणाच्या उपाययोजनाद्वारे पिण्याच्या पाण्याच्या स्रोताला शाश्वत करण्यात आले व सदर उपाययोजना या भूजल पुनर्भरणाशी संबंधित आहेत. भूजल पुनर्भरणाद्वारे उपाययोजना राबवितांना मजुराद्वारे करण्यात येणाऱ्या कामाचा खर्च अत्यल्प असून तसेच सदर कामे ही तांत्रिक स्वरूपाची व अस्तित्वातील स्रोताशी (Point Source) संबंधित असल्यामुळे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत घेण्यात आलेली नाहीत. असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

शिफारस

६.१० सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी इतर योजनांसोबत अभिसरणाचा अभाव यासंदर्भात आक्षेप नोंदविलेले आहेत. सदरहू परिच्छेदांतर्गत स्रोत बळकटीकरण करण्यासाठी कन्व्हर्जंसचे पैसे वापरले असते तर मोठ्या प्रमाणात निधीची बचत झाली असती. शासनाअंतर्गत योजनांची अंमलबजावणी करताना मजुरीवरील खर्च महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना/ एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम निधीतून भागविल्यास मोठ्या प्रमाणात निधीची बचत होणे शक्य असताना मजुरी संदर्भातील कामे ही मनरेगा मार्फत करून उरलेले काम बाजूला काढून केवळ त्याची निविदा मागविणे सदरहू परिच्छेदांतर्गत अपेक्षित आहे. मात्र हे काम अतिशय किचकट असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. तसेच विभागाने निविदा देताना ती एकत्रितपणे देणे आवश्यक ठरते. विभाग कंत्राटदाराला ही कामे मनरेगा अंतर्गत करण्यास बंधनकारक करू शकत नाही. यावर समितीने आक्षेप नोंदवित याची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्यादृष्टीने विभागाने नियोजन करणे आवश्यक आहे. मात्र या माध्यमातून निधीची बचत करणे जर शक्य असल्यास त्यासाठी विभागाने निश्चितच प्रयत्नशील राहणे आवश्यक असल्याचे समितीचे स्पष्ट मत आहे. केवळ तांत्रिक स्वरूपाची कामे निविदेमधून करून घेऊन मजुरी स्वरुपातील कामे मनरेगा वा अन्य योजनेंतर्गत करणे अशक्य नाही, तरीपण कामे तपासून घेण्याची पद्धत असावी. केंद्र शासनाने स्वच्छ भारत मिशन योजनेंतर्गतदेखील हीच कार्यपद्धती राबवून बांधकामासाठी लागणारे मजूर मनरेगा मार्फत घेऊन हे काम केले. शेवटी कंत्राटदारदेखील स्थानिक मजुरांना हाताशी घेऊन ही कामे करीत असतात. अशाप्रकारे कन्व्हर्जनबाबत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनादेखील आहेत. त्यामुळे जास्तीत जास्त ठिकाणी त्याची अंमलबजावणी निश्चितपणे करण्याचे प्रयत्न करावे व त्याअनुषंगाने विभागाने निरनिराळ्या योजनेंतर्गत कामे करण्यासंदर्भात आवश्यक ते नियोजन करून भविष्यात निधीची बचत करण्याचे प्रयत्न करावेत व आगामी काळात अशा आक्षेपांची शक्यतो पुनरावृत्ती टाळावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ३.४.६ इतर वित्तीय अनियमितता कामाच्या अंमलबजावणीमधील वित्तीय अनियमितता

अभिप्राय

६.११ (१) जिल्हा परिषद यांनी अंदाजपत्रके बनविताना वापरलेल्या दरपत्रकात विमाशुल्क समाविष्ट होते. महाराष्ट्र शासनाच्या ऑगस्ट १९९८ च्या निर्णयाप्रमाणे कामाच्या अंमलबजावणीपूर्वी विम्याचे विमापत्र सादर करणे कंत्राटदारास बंधनकारक आहे. अन्यथा निविदा किंमतीच्या एक टक्का एवढी वसुली जिल्हा परिषद यांनी करावयाची असते. जिल्हा परिषद, बुलढाणा आणि रायगड यांनी २०१२-१७ या कालावधीमध्ये रु. १७५. ६९ कोटी खर्चून मंजूर केलेल्या ३७९ योजनांची अंमलबजावणी केली होती. परंतु कंत्राटदारांनी विमापत्र सादर केली नव्हती. लेखापरीक्षणाने केलेल्या उलट तपासणीमध्ये विमापत्रे काढली नसल्याची विमा संचालकांनी पुष्टी दिली. अशाप्रकारे बांधकाम चालू असताना शासनाची मत्ता विमा कवचामध्ये असल्याची जिल्हा परिषद यांनी खात्री केली नव्हती. जे करणे आवश्यक होते आणि कंत्राटदारांना प्रदाने वितरित केली होती. त्यामुळे कंत्राटदारांना रु. १. ७४ कोटीचा गैरवाजवी फायदा झाला असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले.

जिल्हा परिषद, बुलढाणा संदर्भात नमूद करण्यात आले की, शासनाचे धोरणानुसार राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत पाणीपुरवठा योजनेच्या अंमलबजावणीचे अधिकार हे समिती स्तरावर असल्यामुळे जिल्हा परिषदेकडून योजनेच्या भौतिक कामानुसार ग्राम आरोग्य पोषण पाणीपुरवठा व स्वच्छता समितीस निधी देण्यात आलेला आहे. त्यामुळे उर्वरित सर्व कपाती समितीस्तरावरून होणे अभिप्रेत होते. शासन निर्णय दिनांक ०९.०३. २०१८ नुसार आता अंमलबजावणीचे अधिकार जिल्हा परिषदेकडे आल्याने समितीस्तरावरील सध्या प्रगतीपथावर असलेली २७ कामे, पाणीपुरवठा सुरू परंतु भौतिकदृष्ट्या अपूर्ण असलेली १४ कामे व भौतिकदृष्ट्या व आर्थिकदृष्ट्या अपूर्ण ६१ कामे अशी एकूण १०२ अपूर्ण कामे या स्तरावरून पूर्ण करून कंत्राटदारांची देयके अदा करण्यात येत आहेत. ही देयके अदा करताना निविदा रकमेनुसार एक टक्का विमानिधीची कपात करण्यात येत आहे त्यानुसार आतापर्यंत रु. ६,४४,२७७ ची वसुली करण्यात आली आहे व पुन्हा ज्या अपूर्ण कामांची देयके प्राप्त होतील त्यांची सुद्धा पूर्ण वसुली निविदा रकमेनुसार करण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

तसेच जिल्हा परिषद, रायगडबाबत शासनाच्या २००९-१० च्या दरसूचीमध्ये (CSR) विमा निधीचे दर अंतर्भूत नाहीत. तसेच अंदाजपत्रके त्या आर्थिक वर्षातील असल्याने व विमा निधीचा समावेश दरसूचीमध्ये अंतर्भूत नसल्यामुळे ग्राम आरोग्य व पाणीपुरवठा समिती यांनी विमा निधीची कपात केलेली नाही. यासंदर्भात कोणत्याही स्वरूपाची निविदा प्रक्रिया करण्यात आलेली नाही. सबब निविदा प्रक्रियेच्या अटी व शर्तीनुसार देयकातून वजावटी केलेल्या नाहीत. वरील सर्व कामे ग्रामस्तरावर ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने केली असल्याने तसेच या कामासाठी दैनंदिन २० पेक्षा कमी मजूर लागत असल्यामुळे कपात करण्यात आलेली नाही असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

शिफारस

६.१२ सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी इतर वित्तीय अनियमितता यासंदर्भात आक्षेप नोंदविलेले आहेत. जिल्हा परिषद यांनी अंदाजपत्रके बनविताना वापरलेल्या दरपत्रकात विमा शुल्क समाविष्ट असताना व कामाच्या अंमलबजावणीपूर्वी विम्याचे विमा पत्र सादर करणे कंत्राटदारास बंधनकारक आहे अन्यथा निविदा किंमतीच्या एक टक्का एवढी वसुली जिल्हापरिषद यांनी करणे आवश्यक असतानाही त्याची अंमलबजावणी झाली नाही. त्यामुळे कंत्राटदारांना रु. १.७४ कोटीचा अवाजवी फायदा झाला. यासंदर्भात समितीने विचारणा केली असता लेखापरीक्षण झालेल्या बऱ्याच प्रकरणांमध्ये निविदेमध्ये ही तरतूदच करण्यात आली नव्हती. त्यामुळे त्या तरतुदीच्या उल्लंघनापोटी एक टक्का एवढी वसुली करण्याचा मुद्दाच उपस्थित झालेला नाही. काही ठिकाणी कंत्राटदारांनी विमा काढलेला आहे तर काही ठिकाणी काढलेला नाही. शासकीय मालमत्तेला कोणत्याही प्रकारचे नुकसान होऊ नये म्हणून अंदाजपत्रकात अशाप्रकारे विमा काढण्याची तरतूद करण्यात आली. मात्र निविदा अटी शर्तीमध्ये त्याचा समावेश केलेला नसल्यामुळे ही वसुली झालेली नाही. परंतु जर अशाप्रकारे विम्याचे पैसे कंत्राटदारला प्रदान केले असल्यास कंत्राटदाराकडून एक टक्का रक्कम वसुल करणे आवश्यक ठरेल व त्याअनुषंगाने विभाग पुढील कार्यवाही करेल असेही समितीस आश्वासित करण्यात आले. वास्तविकतः प्रकल्पाच्या सुरक्षिततेसाठी अशाप्रकारे विमा उतरविणे आवश्यक होते व आराखड्यात तशी तरतूद असताना त्याची अंमलबजावणी होणे अत्यावश्यक होते. याअनुषंगाने एकतर कंत्राटदाराने स्वतः विमा काढणे वा एक टक्का रक्कम शासनाला देणे बंधनकारक होते. आता यातील रु. १.७४ कोटी इतक्या वसुलपात्र रकमेपैकी काही रकमा घेणे कंत्राटात नमूद नाही आणि उरलेल्यापैकी फक्त रु. ६,४४,२७७/- एवढीच वसुली करण्यात आली व मोठ्या प्रमाणात रक्कम वसूल करणे प्रलंबित आहे. ही निश्चितच गंभीर बाब असून समिती त्याबाबत तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. अतः ज्या ज्या प्रकरणांमध्ये विम्याची रक्कम आराखड्यात नमूद असताना कंत्राटदाराने जर विमा उतरविला नसेल तर अशी रक्कम कंत्राटदाराकडून वसुल करण्यात यावी व तशा सूचना स्थानिक पातळीवर निर्गमित करण्यात याव्यात. विभागीय प्रतिनिधींनी देखील साक्षीदरम्यान त्यास सहमती दर्शविली. अतः या प्रकरणी तातडीने वसुलीची कार्यवाही करण्यात यावी तसेच ज्या अधिकाऱ्यांनी पूर्ण चौकशी न करता देयके पारित केली आहेत, त्यांचेविरुद्धदेखील कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

अभिप्राय

६.१३ (२) उद्योग, ऊर्जा आणि कामगार विभागाच्या शासन निर्णयानुसार (जून २०१०) कामगार कल्याण उपकर अधिनियम, १९९६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे बांधकाम किंमतीवर (जमीन मूल्य वगळून) एक टक्का दराने कामगार कल्याण उपकर आकारणे आवश्यक होते आणि कामाच्या नियोक्ताने तो जमा करणे आवश्यक होते. मात्र जिल्हा परिषद, बुलढाणा आणि रायगड यांनी कामाच्या अंदाजपत्रकात कामगार उपकराचा समावेश केला नव्हता आणि म्हणूनच सन २०१२-१७ दरम्यान अंमलबजावणी करण्यात आलेल्या ३७९ योजनांमध्ये रक्कम रु. १.७६ कोटींची कामगार उपकराची वजावट कंत्राटदारांच्या देयकांतून केली गेली नव्हती. कामगार उपकराची वजावट न करणे हे कामगार कल्याण उपकर अधिनियम, १९९६ चे उल्लंघन करणारे असल्याचे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, रायगड व नागपूर यांनी सन २०१२-१७ दरम्यान महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, रायगड आणि नागपूर जिल्हा यांनी सात योजनांमध्ये कामगार कल्याण व उपकराची वसुली रु. ९०.२८ लाखांऐवजी रु. ६५.४० लाख इतकीच केली होती. ज्यामुळे रु. २४.८८ लाख इतकी वसुली बाकी होती असेही आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत अंदाजपत्रके हे त्या त्या वर्षाच्या शासनस्तरावरून प्राप्त झालेल्या सी. एस. आर. मध्ये नमूद दरानुसार तयार करण्यात येतात. यामध्ये कामगार कल्याण उपकराची रक्कम समाविष्ट नाही. यापुढे ज्या नवीन योजनांचे अंदाजपत्रके तयार करण्यात येतील. त्यामध्ये शेवटी कामगार कल्याण उपकराची रक्कम अंतर्भूत करण्यात येऊन त्याप्रमाणे कपात करण्यात येऊन भरणा करण्यात येईल. तसेच ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांच्या दि. १२ मे, २०१६ च्या आदेशानुसार ग्रामपंचायत कार्यकंत्राट कामाकरीता आवश्यक असलेले साहित्य स्थानिक पुरवठादाराकडून खरेदी करून गावातील मजुरांकरवी स्वतःच काम पूर्ण करून घेत असेल तर सदर व्यवहारामध्ये TDS ची तरतूद लागू होत नाही. यापुढे अंदाजपत्रकामध्ये तरतूद करून कामगार कल्याण उपकराची रक्कम कपात करून भरणा करण्याची दक्षता घेतली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, रायगड यासंदर्भात दोन्ही दरसूचीमध्ये १% कामगार कल्याण उपकराची तरतूद नसल्याने योजनेच्या देयकातून कामगार कल्याण उपकराची वसुली करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. या कामापोटी सदर ठेकेदारास रक्कम रु. ४, ८७, ९९, ५०० ची अदायगी करण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नागपूर विभागांतर्गत प्रगतीपथावर असलेल्या ५ पाणीपुरवठा योजनांच्या कामाच्या देयकातून

१% उपकराची रक्कम कपात करून बँकेत नियमित भरणा करण्यात येत आहे. एकूण रु. १,१०,५१,२४३ इतकी रक्कम आतापर्यंत वसुल करण्यात आलेली आहे असेही विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

शिफारस

६.१४ सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी विभागाच्या शासन निर्णयानुसार कामगार कल्याण उपकर अधिनियम, १९६६ मध्ये बांधकाम किंमतीवर एक टक्का दराने कल्याण उपकर लादणे आवश्यक असताना त्याची अंमलबजावणी झाली नाही असे आक्षेप नमूद केले आहेत. मात्र ज्यांनी ही रक्कम भरणा केली नाही तरीही त्या संबंधित कंत्राटदारावर प्रशासकीय कारवाई व रकमेची वसुली करावी लागणार असल्याचे व विभाग ती करणार असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले. त्यादृष्टीने संबंधित कंत्राटदाराकडून वसुली करण्यात यावी व जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी. तसेच भविष्यात नवीन योजनांचे अंदाजपत्रक करून त्यात शेवटी कामगार कल्याण उपकराची रक्कम अंतर्भूत करून त्याची कपात करून ही रक्कम शासनखाती जमा करण्याची दक्षता विभागाने घ्यावी. वास्तविक ही उपकराची रक्कम भरण्याची जबाबदारी कंत्राटदारावर टाकणे हेच अयोग्य आहे. अशा परिस्थितीत कंत्राटदाराकडून ही उपकराची रक्कम नेहमी जमा होण्याची शक्यता कमी असते. त्यामुळे ही जबाबदारी कंत्राटदाराच्या भरवश्यावर न सोडता विभागानेच या रकमेची कपात करून ती शासनखाती जमा करण्यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही करावी व भविष्यात अशा आक्षेपांची पुनरावृत्ती टाळावी अशी समितीची शिफारस आहे.

अभिप्राय

६.१५ (३) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी कामाची अंदाजपत्रके बनविण्यासाठी बनविलेल्या दरपत्रकात (जिल्हा परिषद यांनीही स्वीकृत केलेले) कामगार घटकावरील १२. ५ टक्के इतका कामगार भविष्य निधी (ईपीएफ) अंदाजपत्रकात समाविष्ट होता.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने अंमलबजावणी केलेल्या अहमदनगर, औरंगाबाद, पुणे, बुलढाणा, नागपूर, नाशिक, सांगली आणि ठाणे या आठ जिल्ह्यांतील ३० कामांमध्ये कंत्राटदाराने रु. २३ कोटी इतका ईपीएफ जमा केल्याची खात्री न करताच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागांनी अयोग्यरित्या कंत्राटदारांना प्रदानाचे वितरण केले होते. तसेच जिल्हापरिषद पुणे, रायगड, नागपूर यांनी सन २०१२-१७ दरम्यान जिल्हा परिषदांनी ७७१ कामांची अंमलबजावणी केली होती. यामध्ये रु. ७.२८ कोटी एवढा ईपीएफ समाविष्ट करून कंत्राटदारांना प्रदाने केली होती. आणि कंत्राटदारांनी ईपीएफ जमा केल्याची खात्री जिल्हा परिषदांनी केली नव्हती. जमेची खात्री न करताच ईपीएफचे केलेले वितरण अयोग्य होते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अहमदनगर यांचेकडून या योजनेच्या कंत्राटदारांकडून ई.पी.एफ. च्या रकमेचा भरणा करण्यात आला आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, औरंगाबाद विभागांतर्गत लासूर स्टेशन व १३ गावे या कामाची कंत्राटदाराकडून एकूण रु. ८, ४६, ३२६ इतकी रक्कम इपीएफ पोटी कपात करण्यात आली होती. त्यावर कंत्राटदारांनी त्यांचे पत्र दि. ०७. ०५. २०१४ अन्वये असे सादर केले आहे की, त्यांचेकडे २० पेक्षा कमी म्हणजेच एकूण १२ कामगार आहेत त्यामुळे त्यांच्या चालू देयकातून कपात करण्यात आलेली इपीएफची रक्कम परत करण्यात यावी व नंतर प्रतिज्ञापत्र घेऊन रक्कम परत करण्यात आली. तथापि, पुढील कालावधीतील देयकांबाबत इपीएफ रकमेची वसुली अंतिम देयकात करण्यात आलेली आहे. तसेच लासूर स्टेशनच्या उर्वरित कामासंदर्भात कंत्राटदाराने २० पेक्षा जास्त कामगार कामावर नसल्यामुळे इपीएफ लागू होत नसल्याचे कळविले.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे विभागांतर्गत ठेकेदारांकडून ईपीएफ भरणा केल्याबाबतचे चलन प्राप्त करून घेतले असून रु. ३, ३९, ६९० तसेच उर्वरितवसुली करण्यात येत असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बुलढाणा व नागपूर अंतर्गत काही कंत्राटदारांनी त्यांच्याकडे २० कामगारांपेक्षा कमी कामगार असल्यामुळे त्यांना सदर बाब लागू होत नसल्याचे कळविलेले आहे व उर्वरित कंत्राटदारांनी त्यांच्याकडील कामगारांचे ईपीएफ वेळोवेळी भरणा केले असल्याबाबत चलनांची माहिती सादर केलेली आहे.

परिच्छेदांमधील आक्षेपाप्रमाणे ईपीएफची रक्कम संबंधित एजन्सीमार्फत भरणा करण्यात आली व त्याची माहिती संबंधित विभागास सादर करण्यात आली आहे. ज्या एजन्सीने सदर रक्कम जमा केलेली नाही त्यांना सदर रक्कम भरणा करणेबाबत सूचना करण्यात आलेल्या आहेत. जळगांव जामोद येथील योजनेची कामगार कल्याणची वसुली रु. ७. ७८ लाख इंडीयन हयूम पाईप कं. यांच्याकडून केली आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नागपूर विभागांतर्गत प्रगतीपथावर असलेल्या ५ पाणीपुरवठा योजनांच्या कामाच्या देयकातून १२. ५% कामगार कल्याण निधीची रक्कम रु. ७१,७८,८६६ संबंधित कंत्राटदार यांचेकडून भरणा करण्यात आली आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नाशिक विभागांतर्गत दोन ठेकेदारांनी त्यांनी कामासाठी २० पेक्षा जास्त कर्मचारी न नेमल्यामुळे ई.पी.एफ. भरणे त्यांना बंधनकारक नाही असे कळविले असून ठेकेदार स्पॅन हायड्रोटेक यांनी ई.पी.एफ. भरल्याबाबतची चलने सादर केली आहेत. तथापि, मंजूर निविदेमध्ये मंजूर टक्क्यावर १२.५% इतक्या ई.पी.एफ. ची कपात करून शासनास विभागस्तरावर भरणेबाबत सर्व जबाबदारी ठेकेदाराची असल्याने विभाग स्तरावर ई.पी.एफ. ची रक्कम कपात करणेबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सांगलीबाबत निविदा कामासाठी कार्यरत कामगारांची संख्या आवश्यक त्या पुराव्यासह व इपीएफ भरणा केलेल्या चलनाच्या प्रती सादर करणेबाबत कळविले असता याबाबतची माहिती प्राप्त झाली नाही.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे विभाग येथे पाच योजनांच्या एकूण तीन कंत्राटदारांपैकी दोन कंत्राटदारांकडून कामगार ईपीएफ जमा करण्यात येत आहे. तर मे. सेफ वॉटर इंड्या, मुंबई (दहिसर-गोठेघर पाणीपुरवठा योजना, ता. कल्याण, जि. ठाणे) यांना ईपीएफ कायद्यातील तरतुदी लागू नसल्याने ते ईपीएफ भरणा करत नसल्याचे त्यांनी कळविले आहे.

जिल्हा परिषद, पुणे अंतर्गत सन २०१२-१७ दरम्यान तपासणी केलेल्या ७७१ कामांपैकी पुणे जिल्ह्यामध्ये २३ कामांचा समावेश आहे व त्याची ईपीएफची रक्कम अंदाजे रु. ६६. ६७ लक्ष होत असून ठेकेदाराकडून ईपीएफ भरल्याचे प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यास वसुलीची कार्यवाही प्रस्तावित करण्यात येत आहे.

जिल्हापरिषद, रायगड संदर्भात राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत शासनाच्या प्रचलित धोरणानुसार बहुतांश योजना ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती यांनी केलेल्या आहेत. कोणताही कंत्राटदार नेमणूक कामे केलेली नसल्याने कंत्राटदारास देयक अथवा अनुदान अदा केले नसल्याने कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त अनुदान वितरित झालेले नाही. तसेच नागपूर जिल्हापरिषदेअंतर्गत सन २०१२-१७ दरम्यान कामांमध्ये ईपीएफ समाविष्ट करून कंत्राटदारास प्रदान केलेले नाही असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

शिफारस

६.१६ महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी कामाचे अंदाजपत्रक बनविण्यासाठी बनविलेल्या दरपत्रकात कामगार घटकावरील १२.५ टक्के इतका कामगार भविष्य निर्वाह निधी अंदाजपत्रकात समाविष्ट होता. मात्र महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने ३० कामांमध्ये कंत्राटदाराने रु. २३ कोटी इतका ई.पी.एफ. जमा केल्याची खात्री न करता कंत्राटदाराला प्रदानाचे वितरण केले. त्याचप्रमाणे जिल्हापरिषदेने कंत्राटदाराने ई.पी.एफ. जमा केल्याची खात्री न करता रु. ७.२८ कोटी इतक्या ई.पी.एफ. निधीचे वितरण केले. यासंदर्भात समितीने विचारणा केली असता ज्या कंत्राटदाराकडे २० पेक्षा जास्त कामगार कार्यरत आहेत अशाच कंत्राटदाराकडून ई.पी.एफ. ची वसुली करण्यात येते. अशा परिस्थितीत कंत्राटदारास देयकाचे प्रदान करताना कार्यकारी अभियंता यांनी त्या योजनेत २० पेक्षा जास्त कर्मचारी कार्यरत होते किंवा कसे या बाबींची पूर्ण छाननी व शहानिशा करूनच कंत्राटदारास देयकाचे प्रदान करणे बंधनकारक असते. मात्र समितीच्या असे निदर्शनास आले की, केवळ कंत्राटदाराकडून २० पेक्षा कमी कामगार कार्यरत असल्याचे शपथपत्र घेऊन रकमेचे प्रदान करण्यात येते व ही कार्यपद्धतीच मूळात परिपूर्ण व विश्वसनीय नाही. ई.पी.एफ. च्या रकमेचा भरणा व आर्थिक जबाबदारी टाळण्याकरिता कोणतेही कंत्राटदार कामगारांची संख्या २० पेक्षा जास्त असल्याचे कधीही सांगणार नाही. त्यामुळे कामगार हिताच्या या तरतुदीचा मूळ उद्देशच बाधित होतो. समितीने यासंदर्भात प्रकरणांचा आढावा घेतला असता फारच नाममात्र योजनांमध्ये कंत्राटदारांनी कामगारांची संख्या २० पेक्षा जास्त दाखवून ई.पी.एफ. चा भरणा केलेला आहे. कामगारांच्या प्रत्यक्षात कार्यरत संख्येची पडताळणी करण्याची कोणतीही स्वतंत्र व्यवस्था विभागाकडे उपलब्ध नाही. जर कामगारांची संख्या २० पेक्षा कमी असल्याचे शपथपत्र कंत्राटदार देत असेल तर त्यांना त्यांच्या देयकात ई.पी.एफ. ची रक्कम देय ठरत नाही. परंतु महालेखाकारांच्या आक्षेपावरून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने रु. २३ कोटी व जिल्हापरिषदेने रु. ७.२८ कोटी इतक्या ई.पी.एफ. ची रक्कम समाविष्ट करून कंत्राटदाराला प्रदान केल्याचे दिसून येते. जे अत्यंत गंभीर व कंत्राटदारास अयोग्य लाभ देणारे ठरते. यामध्ये जर ई.पी.एफ. ची रक्कम कंत्राटदाराने भरली असेल तर समितीचे कोणतेही आक्षेप नाहीत. मात्र ती जर भरण्यात आली नसेल तर ही बाब निश्चितच दखलपात्र ठरते. या सर्व कार्यपद्धतीमध्ये अधिक गंभीर बाब म्हणजे २० पेक्षा जास्त कामगार कार्यरत असताना देखील ही संख्या कमी दर्शवून ई.पी.एफ. च्या प्रदानाची जबाबदारी टाळणे इतक्या पुरतीच ही बाब मर्यादित नसून शासनाने ज्या उदात्त हेतूने ही ई.पी.एफ. ची तरतूद विहित केली आहे त्याच्या कायदेशीर लाभांपासून कामगारांना वंचित ठेवणे ही देखील निश्चितच अयोग्य बाब आहे. शासनाच्या सर्व प्रकल्पांचे स्वरुप व व्याप्ती ही फार मोठी असतानाही व २० पेक्षा कमी कामगार संख्या तेथे कार्यरत असणे अशक्य असतानाही अशाप्रकारे कंत्राटदाराकडून शपथपत्राच्या आधारे हे विषय निकाली काढणे व स्वतःची जबाबदारी टाळणे योग्य होणार नाही. जर २० पेक्षा जास्त कामगार कार्यरत नव्हते असे कंत्राटदार सांगत असेल तर १२. ५ टक्के ई.पी.एफ. ची रक्कम त्या कंत्राटदारास देण्याची गरजच नव्हती. सदरहू प्रकरण अत्यंत गंभीर असून ज्या कंत्राटदारांनी ई.पी.एफ. ची रक्कम घेऊनही त्याचा भरणा केला नाही त्यांचेवर कडक कारवाई व रकमेची वसुली करण्यात यावी. ज्या अधिकाऱ्यांनी याची खात्री न करता रकमेचे प्रदान केले त्यांचेवरदेखील कडक कारवाई करण्यात यावी. तसेच या प्रकरणी सध्या अस्तित्वात असलेली यंत्रणा व कार्यपद्धती निश्चितच परिपूर्ण नाही. कोणत्याही योजनेत कार्यरत असलेल्या कामगारांच्या संख्येची छाननी, तपासणी व पडताळणी करण्याची शास्त्रशुद्ध व पारदर्शक व्यवस्था विभागाकडे उपलब्ध करण्यात यावी. कंत्राटदाराने ई.पी.एफ. चा भरणा केल्याशिवाय त्यांना ई.पी.एफ. ची रक्कम अदा करण्यात येऊ नये. ही प्रक्रिया ऑनलाईन व प्रत्यक्षआधारे (Actual basis) करण्यासंदर्भात धोरण निश्चिती करण्यात यावे. तसेच २० पेक्षा जास्त कामगार कार्यरत असताना ही संख्या कमी दर्शविल्यामुळे कामगारांना नियमानुसार देय ठरणाऱ्या या लाभापासून वंचित राहावे लागू नये याची दक्षता विभागाने घ्यावी व भविष्यात अशा आक्षेपांची पुनरावृत्ती टाळावी याअनुषंगाने परिपूर्ण योजना तयार करून त्याच्या अंमलबजावणीवर नियमित संनियंत्रण ठेवण्यात यावे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

अभिप्राय

(४) पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या शासन निर्णयानुसार (मार्च २०१०) योजनेखाली कंत्राटदारांना किंवा पुरवठादारांना अग्रिम प्रदाने करावयाची नव्हती. मात्र शासन निर्णयाचे उल्लंघन करून जिल्हा परिषद, बीड मध्ये दोन योजनांतर्गत २०१२-१५ दरम्यान कंत्राटदारांना/पुरवठादारांना रु. १. ५१ कोटीची अग्रिम प्रदाने करण्यात आली होती. जिल्हा परिषद रायगड मध्ये ३ योजनांतर्गत सन २०१३-१७ दरम्यान कंत्राटदारांना/ पुरवठादारांना रु. ४. १२ कोटीची अग्रीम प्रदाने करण्यात आली होती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

दि. १७.०३.२०१० रोजीच्या परिच्छेद ०२ मधील शासन निर्णयानुसार समितीद्वारे पुरवठादारांना कोणत्याही परिस्थितीत अग्रीम देणे योग्य नसल्याचे नमूद आहे. जिल्हा परिषद, बीड यांनी शासन धोरणानुसार प्रशासकीय मान्यता मिळताच दि. १२.०३.२०१४ रोजी योजनेच्या किंमतीच्या ३०% रकमेचा पहिला हप्ता ग्रामपंचायतीस वर्ग केला आणि ग्रामपंचायत मुर्शदपूर यांनी तो संबंधित पाणीपुरवाठा व स्वच्छता समिती यांना वर्ग केला. समितीने पाईप पुरवठादारांना रु. ३३.९२ लक्ष चा अग्रीम दिल्याचे निदर्शनास येते. परंतु या कृतिमागे समितीचे केवळ अज्ञान आहे असे वाटते. या कृतीबद्दल खात्याने समितीच्या पदाधिकाऱ्यांची स्पष्टीकरणे मागविली असता समितीच्या स्पष्टीकरणात अज्ञानामुळे व अनुभव नसल्यामुळे सदरची अनियमितता घडली हे त्यांनी मान्य केले असल्याचे समितीस सांगण्यात आले.

तसेच आष्टी नळ पाणीपुरवठा योजनेच्याबाबतीत पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने पाईप पुरवठादारांना रु. ११६.८२ लक्षचा अग्रीम पाईप खरेदी करून दिल्याचे निदर्शनास येते. या कृतीबद्दल खात्याने समितीच्या पदाधिकाऱ्यांची स्पष्टीकरणे मागविली असता समितीच्या स्पष्टीकरणात अज्ञानामुळे, अनुभव नसल्यामुळे सदरची अनियमितता घडली हे त्यांनी मान्य केले आहे. सदर दिलेला अग्रीम योजनेचे कामे करून पूर्णपणे समायोजित झाली असून योजना भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेली आहे. दि. २८.०३.२०१८ रोजी कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

तसेच जिल्हा परिषद, रायगड अंतर्गत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या योजनांची अंमलबजावणी ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीमार्फत करण्यात आलेली आहे. शासनाच्या प्रचलित धोरणानुसार फक्त पाणीपुरवठा समित्यांना अग्रीम देण्यात आला आहे. कोणत्याही कंत्राटदारास जिल्हा परिषद रायगड स्तरावरून योजनेसाठी अग्रीम देण्यात आलेले नाही. सबब शासन निकषात निर्देश दिल्याप्रमाणे फक्त ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समित्यांनाच जिल्हा परिषद स्तरावरून अग्रीम देण्यात आलेले आहे. शासन निर्णयाचे उल्लंघन जिल्हा परिषद, रायगड यांच्याकडून झालेले नाही असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

शिफारस

६.१७ सदरहू परिच्छेदाअंतर्गत शासन निर्णयानुसार कंत्राटदाराला किंवा पुरवठादारांना अग्रिम प्रदान करावयाचे नव्हते. मात्र जिल्हा परिषद, बीड येथे दोन योजनांमध्ये रु. १.५१ कोटीची व जिल्हापरिषद, रायगड येथे तीन योजनांमध्ये रु. ४.१२ कोटीची अग्रिमे प्रदान करण्यात आली असे आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. यासंदर्भात समितीने विचारणा केली असता पाणीपुरवठा समितीने काम लवकर होण्याच्यादृष्टीने कंत्राटदाराला अग्रिमाचे प्रदान केल्याचे सांगितले. तसेच विभाग थेट कोणत्याही कंत्राटदाराला पैसे देत नाही तर विभाग समितीला रकमेचे प्रदान करीत असतो. या समितीने कंत्राटदाराला अग्रिमाचे प्रदान केले आहे व ही बाब योग्य नसल्यामुळे समितीकडील ही कामे आता परत घेण्यात आलेली आहेत व अग्रिमाची वसुली देखील करण्यात आलेली असल्याचे समितीस सांगण्यात आले. परंतु ही बाब योग्य नसल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर मान्यच केले. अतः यासंदर्भात आवश्यक ती नियमावली तयार करण्यात यावी तसेच सद्यःस्थितीत ज्या समितींमार्फत ही कामे सुरू आहेत त्यांना आवश्यक त्या सूचना निर्गमित करण्यात याव्यात व भविष्यात अशा आक्षेपांची पुनरावृत्ती टाळावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

अभिप्राय

६.१८ (५) महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या लेखासंहिता, १९६८ अन्वये कंत्राटदारांना किंवा पुरवठादारांना करावयाची प्रदाने ही रेखित धनादेशाद्वारे करण्यात यावीत. मात्र ग्रामपंचायत, रेवस (जिल्हा परिषद, रायगड) यांनी रेवस पाणीपुरवठा योजनेसाठी २०१२-१५ दरम्यान केलेल्या रक्कम रु. ३. ८८ कोटी इतक्या खर्चापैकी रु. ४७. ०८ लाखांचे आहरण रोखीने किंवा सेल्फ चेकद्वारे ग्रामीण जल सुरक्षा समिती यांना केले तर ग्रामपंचायत तिनवीरा (जिल्हा परिषद, रायगड) मध्ये २०१३-१५ दरम्यान तिनवीरा योजनेवरील रु. ३ कोटी इतक्या खर्चापैकी रु. ४० लाखाचे आहरण रोखीने किंवा सेल्फ चेकद्वारे ग्रामीण जल सुरक्षा समिती यांनी संहिता तरतुदीचे उल्लंघन करत केले असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील रेवस झोन क्र. २ प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना सुधारणा योजनेच्या कामास रु. ४,३३,१४,१८३ इतक्या ढोबळ किंमतीस व रु. ३,९७,३७,७८३ निव्वळ किंमतीस दि. ०७.१२.२०११ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे व योजनेच्या कामाकरीता पहिला अग्रीम शिखर समिती रेवस क्र. २ यांना वितरित करण्यात आलेला आहे. प्रत्यक्ष योजनेची अंमलबजावणी शिखर समिती रेवस झोन क्र. २ यांनी केलेले असून त्यांना प्रत्यक्ष कामाच्या आवश्यकतेप्रमाणे मजुरांची मजुरी देण्यासाठी व साहित्याचे देयक देणेसाठी समिती स्तरावरून सेल्फ चेक काढून मजुरांची मजुरी देण्यात आलेली असल्याबाबत समितीमार्फत कळविण्यात आलेले आहे. सद्यःस्थितीत योजना आर्थिक व भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेली आहे व लेखे बंद करण्यात आले आहेत व अंतिम देयक कार्यालयास सादर केलेले आहे.

तसेच रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील वाढीव तिनवीरा प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना सुधारणा योजनेच्या कामास रु. ३,४३,९५,५३८ इतक्या ढोबळ किंमतीस व रु. ३,१५,५५,५३९ निव्वळ किंमतीस दि. २३.१०.२०१३ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. सद्यःस्थितीत योजनेसाठी शिखर समितीस ३ अग्रीमद्वारे रु. २५५.६० लक्ष निधी वर्ग केला आहे. उप अभियंता, अलिबाग यांच्या दिनांक ०८.०५.२०१८ च्या अहवालानुसार रु. २,६९,६८,२६४ इतक्या रकमेचे काम केल्याचे मूल्यांकन मोजणी पुस्तक क्र. १३०७ मध्ये नोंदवून समितीने सादर केलेले आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

शिफारस

६.१९ महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या लेखासंहिता, १९६८ अन्वये कंत्राटदारांना किंवा पुरवठादारांना करावयाची प्रदाने ही रेखीत धनादेशाद्वारे करण्यात यावीत असे सुस्पष्ट असताना ग्रामपंचायत, रेवस यांनी रु. ४७.०८ लाखाचे तसेच ग्रामपंचायत, तिनविरा (जिल्हा परिषद, रायगड) येथे रु. ४० लाखाचे आहरण रोखीने किंवा सेल्फ चेकद्वारे ग्रामीण जलसुरक्षा समिती यांना प्रदान केले. याबाबत समितीने विचारणा केली असता मजुरीसाठी विभागाने क्रॉस चेकद्वारे प्रदान केलेले आहे. मात्र या प्रकरणांमध्ये रोख पैसे काढून मजुरांना ते देण्यात आलेले आहेत. मजुरांना देखील त्यांच्या बँकखात्यामध्ये रक्कम जमा करण्याबाबत शासनाचे धोरण असताना अशापद्धतीने रोखीने पैशाचे व्यवहार करणे हे उल्लंघनच ठरते. अशा व्यवहारांमध्ये अपहार, गैरव्यवहार व अनियमितता होण्याची शक्यता अधिक असते. अशा परिस्थितीत कोणत्याही रकमेचे प्रदान हे रोखीने होऊ नये यासंदर्भात नियमात स्पष्टपणे तरतूद करण्यात यावी व त्याची तंतोतंत व प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी व भविष्यात रोखीने व्यवहार करण्याचे टाळण्यात यावे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ३.४.७ ' कार्यक्रमाची अंमलबजावणी '

परिच्छेद क्रमांक ३.४.७.१ ' व्याप्ती आणि पाणी गुणवत्ता '

अभिप्राय

६.२० सेवा पुरविण्यात न आलेल्या सेवा अंशतः पुरविण्यात आलेल्या आणि निसटलेल्या वस्त्यांना सुरक्षित आणि पुरेसा पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी एनआरडीडब्लुपीच्या वार्षिक निधी वाटपापैकी ४७ टक्के निधी वाटप केला जातो भारत सरकार आणि महाराष्ट्र शासनाने २०१२-१७ दरम्यान एनआरडीडब्लुपी अंतर्गत सेवा पुरविण्यात न आलेल्या सेवा अंशतः पुरविण्यात आलेल्या निसटलेल्या वस्त्यांना सुरक्षित आणि पुरेसा पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी रु. ४८३७.७० कोटी एवढा निधी वितरित केला होता त्यापैकी मार्च, २०१७ अखेरीस रु. ४८१७.९८ कोटी खर्च करण्यात आला होता.

एनआरडीडब्लुपीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रत्येक वर्षी योजनांसाठी नियोजन करताना ज्या वस्त्यांमध्ये कोणालाच किंवा ५० टक्क्यांपेक्षा जास्त लोकसंख्येला पुरेसे आणि सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध होत नसेल त्या वस्त्यांना प्राधान्य देण्यात यावे. सन २०१२-१७ दरम्यान व्याप्तिचे ध्येय आणि राज्यातील व्यापलेल्या वस्त्यांचा अभ्यास केला असता राज्यातील ५० टक्क्यांपेक्षा कमी लोकसंख्या व्यापित बऱ्याच वस्त्या (१९७२) योजनेंतर्गत व्यापित झाल्या नव्हत्या, अशा वस्त्यांना प्राधान्य दिले गेले नव्हते. ५० टक्क्यांपेक्षा कमी लोकसंख्या व्याप्ती असलेल्या जास्तीत जास्त वस्त्या अहमदनगर जिल्ह्यामध्ये होत्या ज्यात २३४ वस्त्या ज्यांना पुरेशा पाणी व्याप्तीची आवश्यकता होती. अहमदनगर व्यतिरीक्त चाचणी परीक्षा केलेल्या रायगड, पुणे, बुलढाणा आणि बीड जिल्ह्यांमध्ये अनुक्रमे २२९,१२७,११४ आणि १०५ वस्त्या होत्या ज्यात ५० टक्क्यांपेक्षा कमी लोकसंख्येला पुरेसे आणि सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध झाले नव्हते.

११ व्या पंचवार्षिक योजनेनुसार (२००८-१२) सर्व वस्त्यांना दरडोई दर दिवशी ४० लिटर पाणी मार्च २०१२ अखेर पर्यंत उपलब्ध करून द्यायचे होते, तर १२ व्या पंचवार्षिक योजनेनुसार (२०१२-१७) सर्व वस्त्यांना दरडोई दर दिवशी ५५ लीटर पाणी उपलब्ध करून द्यायचे होते परंतु दरडोई दर दिवशी ४० लीटर पाणी सर्व वस्त्यांना उपलब्ध करून देण्यास प्रथम प्राधान्य देण्याचे आणि उद्दिष्ट गाठल्यानंतर सेवेचा स्तर उंचावून वस्त्यांना दरडोई दर दिवशी ४० लीटर वरून दरडोई दर दिवशी ५५ लीटर पाणी उपलब्ध करण्याबाबतचे निर्देश भारत सरकारने दि. २३ जुलै, २०१३ मध्ये राज्य शासनाला दिले होते.

मात्र दि. ३१ मार्च, २०१७ रोजी १२ व्या पंचवार्षिक योजनेच्या समाप्तीनंतरदेखील राज्यातील ९९७३२ वस्त्यांपैकी (पाणी गुणवत्ता बाधित वस्त्यांसकट) १२८१५ वस्त्यांना (१३ टक्के) दरडोई दर दिवशी ४० लीटर पेक्षा कमी पाणी उपलब्ध होते. दरडोई दर दिवशी ४० लीटर पेक्षा कमी पाणी उपलब्धता असणाऱ्या जास्तीत जास्त वस्त्या (जिल्ह्यातील एकूण वस्त्यांशी टक्केवारी) ह्या जळगांव जिल्ह्यात होत्या ज्या १५६२ वस्त्यांपैकी ७५१ एवढया होत्या (४८ टक्के). तसेच दि. १ एप्रिल, २०१७ रोजी ४०५५२ वस्त्यांपैकी ५८०५ वस्त्यांना दरडोई दर दिवशी ४० लीटर पेक्षा कमी पाणी उपलब्ध केले गेले होते. अशा वस्त्यांचा आकडा बुलढाणा जिल्ह्यात ३०९ वस्त्या (२३ टक्के) असा जास्तीत जास्त होता तर त्या खालोखाल सांगली जिल्ह्यात ८९२ वस्त्या (२० टक्के) असा होता. नियोजन प्रक्रियेमध्ये ह्या जिल्ह्यांमध्ये कामे हाती घेताना अशा वस्त्यांना प्राधान्य देण्याचा मुद्दा अधोरेखित केला गेला नव्हता असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आर्थिक वर्षाच्या सुरूवातीस राज्यातील सर्व जिल्ह्यांतील ग्रामीण भागातील गावे वाड्यांची पेयजल स्थिती केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर नोंदित करण्यात येते. यानुसार, राज्यातील पूर्णतः हाताळलेल्या, अंशतः हाताळलेल्या व पाणी गुणवत्ता बाधित गावे,

वाड्या निश्चित करण्यात येतात. उद्भव कोरडा/अपुरा असणे, देखभाल दुरुस्ती, योजनेचे आयुर्मान, पाणी गुणवत्ता बाधित, थकित वीज देयक इ. कारणास्तव गावे/वाड्या दुबार हाताळलेल्या आहेत. याचप्रमाणे सन २०१५-१६ व २०१६-१७ या दोन वर्षांमध्ये विशिष्ट वर्गवारीच्या व्यतिरिक्त इतर वर्गवारीतील गावे/वाड्यांसाठी नवीन योजना घेण्यास निर्बंध असल्याने दुबार हाताळावयाच्या गावे/वाड्यांमध्ये वाढ झालेली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

शिफारस

६.२१ सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी कार्यक्रमाची अंमलबजावणी या शीर्षकाअंतर्गत व्याप्ती आणि पाणी गुणवत्ता यासंदर्भात आक्षेप नोंदविलेले आहेत. NRDWP च्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रत्येक वर्षी योजनांसाठी नियोजन करताना ज्या वस्त्यांमध्ये कोणालाच किंवा ५० टक्केपेक्षा जास्त लोकसंख्येला पुरेसे आणि सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध होत नसेल त्या वस्त्यांना प्राधान्य देण्यात यावे असे स्पष्ट नमूद असताना या निकषात बसणाऱ्या अनेक वस्त्या या योजनेंतर्गत व्यापित झाल्या नव्हत्या. त्याचप्रमाणे ११ व्या पंचवार्षिक योजनेनुसार सर्व वस्त्यांना दरडोई दरदिवशी ४० लिटर पाणी व १२ व्या पंचवार्षिक योजनेनुसार ५५ लिटर पाणी उपलब्ध करून द्यायचे होते. मात्र राज्यातील ९९,७३२ वस्त्यांपैकी १२,८१५ वस्त्यांना दरडोई दरदिवशी ४० लिटरपेक्षा कमी पाणी उपलब्ध होते. याचाच अर्थ नियोजन प्रक्रियेमध्ये ह्या जिल्ह्यामध्ये कामे हाती घेताना अशा वस्त्यांना प्राधान्य देण्यात आले नव्हते असे सदरहू आक्षेपावरून दिसून येते. यासंदर्भात समितीने विचारणा केली असता सन २०१८ च्या आकडेवारीनुसार ९० टक्के लोकांना ४० लिटरने पाणी देण्यात येत असून उर्वरित लोकांना मात्र अद्यापही ४० लिटर प्रतिव्यक्तीप्रमाणे पाणी देणे शक्य झालेले नाही. जे मागासलेले जिल्हे आहेत त्यांना जास्तीत जास्त पाईपद्वारे पाणीपुरवठा करण्याचे नियोजन करण्यात येईल असेही समितीसमोर सांगण्यात आले. वास्तविकतः जो जिल्हा किंवा गाव २५ टक्क्यापेक्षा कमी पाईपलाईनद्वारे कव्हर झालेला आहे अशा गावांना प्राधान्याने घेतले पाहिजे. मात्र प्रत्यक्षात आराखडा तयार करताना या प्राधान्यांमध्ये बदल होतो. एकीकडे विभागाने ४० लिटरवरून ५५ लिटरपर्यंत मर्यादा वाढविली असताना अनेक गावांमध्ये मूळ ४० लिटरची मर्यादेचीदेखील पूर्तता होत नाही. यासाठी विभागाने काय नियोजन केले यासंदर्भात समितीने विचारणा केली असता यासंदर्भात महाराष्ट्रात येणारी प्रामुख्याने अडचण म्हणजे येथील सर्व पाणीपुरवठा योजना या भूगर्भातील पाण्यावर आधारीत आहेत. त्यामुळे पाणी वितरणावर निश्चितच मर्यादा येते. तसेच अनेक ठिकाणी दूषित पाणी अथवा फ्लोराईडयुक्त पाण्याचा पुरवठा होत असताना या सर्व बाबींसंदर्भात निश्चित उपाययोजना विभागाद्वारे करण्यात आल्या नाहीत अथवा ज्या उपाययोजना करण्यात आल्या त्या परिणामकारक नाहीत. या सर्वांसाठी तात्पुरते नव्हेतर कायमस्वरुपी उपाययोजना करणे आवश्यक आहे. आता शासनाने आवश्यक तो निधी दिल्यामुळे ४ वर्षांपूर्वीच्या अपूर्ण असलेल्या योजना पूर्ण होऊ शकल्या. त्याअनुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांनी या पाण्याचे योग्य नियोजन करण्याबाबत आवश्यक त्या सूचना निर्गमित केलेल्या असल्याचे समितीस सांगण्यात आले. ज्याठिकाणी दूषित पाणीपुरवठा आहे तेथे लवकरात लवकर भूपातळी वरच्या पाण्याची (surface water) योजना कार्यान्वित करण्यात यावी अन्यथा हा विषय कधीही सुटू शकणार नाही. विभागाने अनेक प्रादेशिक योजना देखील हाती घेतल्या आहेत. पाण्याचा साठा लांब अंतरावर असल्यास त्याठिकाणी योजना सुरू करणे परवडत नाही. पाण्याचा साठा/स्त्रोत उपलब्ध असेल अशा ठिकाणी प्रादेशिक योजना घेणे बंधनकारक ठरते. याअनुषंगाने आवश्यक ती उपाययोजना विभागाने तातडीने करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ३.४.७.२ ' नळ पाणीपुरवठा पुरविण्यात तूट '

अभिप्राय

६.२२ १२ व्या पंचवार्षिक योजनेप्रमाणे, सन २०१७ अखेरीस कमीतकमी ५० टक्के ग्रामीण घरांना पाणीपुरवठा करणे आवश्यक होते. त्याचप्रमाणे, कमीत कमी ३५ टक्के ग्रामीण घरांना घरगुती जोडणीसह नळाद्वारे पाणीपुरवठा होणे आवश्यक होते. परंतु दि. १ एप्रिल, २०१७ रोजी राज्यातील एकूण ९९७३२ वस्त्यांपैकी ६८०७८ वस्त्यांना (६८ टक्के) नळाद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला होता. (दरडोई दरदिवशी ४० लिटर). तसेच सहा जिल्ह्यांमध्ये ५० टक्क्यांपेक्षा कमी वस्त्यांना नळ पाणीपुरवठा उपलब्ध केला होता. निवडलेल्या जिल्ह्यांमध्ये औरंगाबाद वगळून इतर सर्व जिल्ह्यांमध्ये ५० टक्के वस्त्यांना घरगुती जोडणीसह नळ पाणीपुरवठा करण्यात आला होता.

त्याचप्रमाणे दि. १ एप्रिल, २०१७ रोजी राज्यातील एकूण वस्त्यांच्या ३७ टक्के वस्त्यांना घरगुती जोडणीसह नळ पाणीपुरवठा करण्यात आला होता. परंतु १९ जिल्ह्यांमध्ये घरगुती जोडणीसह नळ पाणीपुरवठा उपलब्ध करण्यात आलेल्या वस्त्या ३५ टक्क्यांपेक्षा कमी होत्या ज्या आठ टक्के (गडचिरोली) ते ३४ टक्के (वर्धा) या दरम्यान होत्या. निवड केलेल्या दहा जिल्ह्यांपैकी पाच जिल्ह्यांमध्ये ग्रामीण वस्त्यांना घरगुती जोडणीसह नळ पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्याची टक्केवारी ३५ टक्क्यांपेक्षा कमी होती जी ११ टक्के (अहमदनगर) ते ३३ टक्के (रायगड) या दरम्यान होती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

दिनांक ०१ एप्रिल, २०१७ रोजीचे राज्याचे नळ पाणीपुरवठा योजनांद्वारे हाताळलेल्या गावे/वाड्यांचे प्रमाण ६८% इतके व घरगुती नळ कनेक्शनचे प्रमाण ३७% इतके आहे. यानुसार नमूद केलेल्या नळ पाणीपुरवठा योजनांचे ५०% पेक्षा कमी प्रमाण असलेले ६ जिल्हे व घरगुती नळ कनेक्शनचे प्रमाण ३५% पेक्षा कमी असलेले १९ जिल्हे हे डोंगराळ व दुर्गम भाग, नक्षलग्रस्त, आदिवासी व अतिशोषित या वर्गवारीतील असल्याने या जिल्ह्यांमध्ये नळ पाणीपुरवठा योजनांचे व घरगुती नळ कनेक्शनचे प्रमाण कमी आहे. तथापि राज्य शासनाचे नळ पाणीपुरवठा योजनांव्दारे सर्वोच्च

प्राधान्याने गावे/वाड्या हाताळण्याचे धोरण असून सदर नळ पाणीपुरवठा योजनामार्फत १००% घरगुती नळजोडण्या देणे बंधनकारक केले असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

शिफारस

६.२३ सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी नळ पाणीपुरवठा पुरविण्यात तूट यासंदर्भात आक्षेप नोंदविलेले आहेत. १२ व्या पंचवार्षिक योजनेंतर्गत जास्तीत जास्त घरांना घरगुती जोडणीसह नळाद्वारे पाणीपुरवठा होणे आवश्यक असताना त्याची अंमलबजावणी अतिशय कमी प्रमाणात झाल्याचे दिसून येते. भारताची भौगोलिक परिस्थिती ही समान नसून भूपृष्ठ भागामध्ये निरनिराळ्या ठिकाणी असलेली बदलती परिस्थिती यामुळे सर्वच ठिकाणी नळाद्वारे पाणीपुरवठा करणे भौगोलिक अडचणींमुळे शक्य होऊ शकत नाही. केवळ महाराष्ट्रापुरता विचार केला असता विभागाने ५० टक्क्यापेक्षा जास्त उद्दिष्ट साध्य केले नाही असे दिसून येते. त्यातील अनेक जिल्हे हे दुर्गम, आदिवासी, डोंगराळ व मागासलेले जिल्हे असताना या नळ पाणीपुरवठा योजना त्यांचेपर्यंत पोहोचल्या नाहीत. केंद्र शासनाने अशा जिल्ह्यांसाठी स्वजल योजनादेखील सुरू केली. ज्यामधून अशाप्रकारे ५० टक्क्यांपेक्षा कमी पाणीपुरवठा होत असलेल्या जिल्ह्यांना समाविष्ट करण्याचे विभागाचे नियोजन होते. अनेक छोट्या छोट्या गावांमध्ये लोकसंख्येचे कमी प्रमाण व त्याठिकाणची भौगोलिक परिस्थिती पाहता अशा योजना त्याठिकाणी कार्यान्वित करणे अडचणीचे ठरते. शिवाय लाभ घेणाऱ्या लोकांची संख्या अतिशय कमी असल्यामुळे योजना त्या ठिकाणी राबविणे अधिक खर्चिक ठरते. यातही अडचणीची बाब म्हणजे यासाठी विजेचा खर्च मोठ्या प्रमाणात येतो. त्यातही विजेची बिले थकीत असल्यास वीज जोडणी तोडण्यात येते अशा अनेक अडचणी निर्माण होतात. अशा परिस्थितीत ज्या जिल्ह्यामध्ये योजना कार्यान्वित करणे शक्य होत नाही अशा ठिकाणी हॅण्डपंप कार्यान्वित करण्यात आलेले आहेत. ज्या ठिकाणी बोअरवेलमध्ये मुबलक पाणी उपलब्ध असेल तर तेवढ्या पुरते मर्यादित न राहता त्याचा वापर ट्युबवेलमध्ये करून निश्चितपणे नळाद्वारे पाणीपुरवठा करणे विभागाला शक्य आहे. नवीन नळ योजनेंतर्गत सर्वच गावांना नळजोडण्या द्याव्या लागणार आहेत. मात्र जुन्या योजनेचे काय करणार, याबाबत राज्य किंवा केंद्र शासनाने कोणतीही सूचना दिली नाही. घरगुती नळ कनेक्शन दिल्याशिवाय ही योजना चालविता येणार नाही. अशा परिस्थितीत जुन्या योजनांनादेखील प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. जुन्या योजनेंतर्गत कनेक्शन घेण्यासाठी रु. ५ ते ६ हजार मोजावे लागतात. विभागाने यात सवलत देण्याची आवश्यकता आहे. इतकेच नव्हे तर प्रीपेड कार्ड कार्यान्वित करण्याची यात आवश्यकता आहे. निधीअभावी कित्येक योजना बंद पडतात व फार मर्यादित लोकांना योजनेचा लाभ मिळतो. अशा परिस्थितीत ग्रामपंचायत स्तरापर्यंत लोकांना पाणी उपलब्ध करून देणे ही निश्चितच विभागाची मुलभूत जबाबदारी आहे. अशा परिस्थितीत व्यक्तिगत कनेक्शन देण्यासाठी आवश्यक ती मदत, प्रोत्साहनात्मक कार्यक्रम व ६ महिन्यांचा कालावधी देण्याची आवश्यकता आहे. त्याअनुषंगाने सर्व जुन्या योजना नवीन योजनेमध्ये समाविष्ट करण्यात याव्यात व सदरहू प्रश्नी धोरणात्मक निर्णय शासनस्तरावरून घेण्यात येऊन त्याची अंमलबजावणी करण्यात यावी व यासदंर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ३.४.७.३ ' दूषित पाण्याने बाधित वस्त्या '

अभिप्राय :

६.२४ दूषित पाण्याने बाधित वस्त्यांना सामावुन घेणे हा एनआरडीडब्ल्युपी च्या मार्गदर्शक सूचनांनुसार १२ व्या पंचवार्षिक योजनेमध्ये हाताळायचा एक गंभीर मुद्दा होता. राज्यातील दूषित पाण्याने बाधित वस्त्यांना २०१२-१७ दरम्यान सामावून घेण्यासंदर्भात ठरविलेली उद्दिष्टे व त्याची पूर्तता यासंदर्भातील विवरणपत्र पाहता २०१२-१७ दरम्यान पाणी गुणवत्ता व बाधित सर्व वस्त्यांच्या समस्या हाताळण्याविषयी कोणतीही उद्दिष्टे ठरविली नव्हती आणि २०१२-१७ दरम्यान उद्दिष्टे साध्य करण्यात विभागाला अपयश आले होते. मार्च, २०१७ अखेरीस ६.५६ लाख लोकसंख्या असलेल्या ३०४ वस्त्या अजुनही दूषित पाण्याने बाधित होत्या.

१० जिल्ह्यात जिल्हा परिषदांनी पुरविलेल्या माहितीनुसार २०१२-१७ दरम्यान १३८७ दूषित पाण्याने बाधित वस्त्यापैकी ४६५ दूषित पाण्याने बाधित वस्त्यांच्या समस्या हाताळण्यात आल्या व ९२२ दूषित पाण्याने बाधित वस्त्यांच्या समस्या विचारात घेतल्या गेल्या नव्हत्या. १० जिल्ह्यांपैकी जास्तीत जास्त दूषित पाण्याने बाधित वस्त्या नाशिक आणि बुलढाणा जिल्ह्यात होत्या ज्यांची आकडेवारी अनुक्रमे ६५२ आणि ११४ अशी होती. दि. १ एप्रिल, २०१२ रोजी नाशिक आणि बुलढाणा जिल्ह्यात अनुक्रमे ७१४ आणि २३० दूषित पाण्याने बाधित वस्त्या होत्या ज्यांच्यासाठी २०१२-१७ साठी पाणी गुणवत्ता समस्या हाताळणीची उद्दिष्टे अनुक्रमे ७४ आणि १६१ दूषित पाण्याने बाधित वस्त्या अशी ठरविण्यात आली होती जरी भारत सरकारने पाणी गुणवत्तेसाठी अतिरिक्त वितरण अंतर्गत २०१२-१७ दरम्यान रु. ३८.४२ कोटी आणि २०१५-१६ दरम्यान निती आयोग अंतर्गत रु. २४.०८ कोटी राज्यातील दूषित पाण्याने बाधित वस्त्यांच्या समस्या हाताळण्यासाठी वितरित केले होते. तरी त्यातील रु. ३८.९६ कोटी अखर्चित राहिले होते. अशाप्रकारे १२ व्या पंचवार्षिक योजना कालावधीमध्ये राज्यातील दूषित पाण्याने बाधित वस्त्यांच्या समस्या हाताळण्याबाबतच्या गंभीर बाबी मोठ्या प्रमाणात साध्य होऊ शकल्या नव्हत्या असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी समितीस स्पष्ट केले की, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार दि. ०१.०४.२०१२ रोजी गुणवत्ताबाधित असलेल्या गावे/वाड्यांचा सन २०१२-१३ च्या कृती आराखड्यामध्ये समावेश करण्यात आला होता. गुणवत्ता बाधित गावे/वाड्यांसाठी पर्यायी सुरक्षित उद्‌भवाद्वारे नळ पाणीपुरवठा योजनेची अंमलबजावणी करण्यात येते. अशा योजना पूर्ण करण्यासाठी कमीत कमी २-३ वर्षाचा कालावधी लागत असल्याने पाणीपुरवठा योजनांची भौतिक प्रगती विचारात घेऊन सन २०१२-१७ या कालावधीत सदर योजनांतर्गत गावे/वाड्यांचे वार्षिक उद्दिष्ट

निश्चित करण्यात आले होते. त्यामुळे पाणी गुणवत्ता बाधित सर्व वस्त्यांच्या समस्या हाताळण्याविषयी कोणतीही उद्दिष्टे ठरविली नव्हती, असा निष्कर्ष काढणे योग्य होणार नाही.

दरम्यानच्या कालावधीत केंद्र शासनाने दि. २९.०६.२०१५ रोजीच्या पत्रान्वये विशिष्ट वर्गवारीच्या (संसद आदर्श ग्राम व फ्लोराईडबाधित गावे/वाड्या) व्यतिरिक्त इतर वर्गवारीतील गावे/वाड्यांसाठी नवीन पाणीपुरवठा योजना घेण्यास निर्बंध घातले होते. यामुळे सन २०१५-१६ व सन २०१६-१७ या वर्षामध्ये पाणी गुणवत्ताबाधित गावे/वाड्या कमी प्रमाणात हाताळण्यात आल्या. असे असतानाही, दि. ०१.०४.२०१२ रोजीच्या १६७१ पाणी गुणवत्ताबाधित गावे/वाड्या विचारात घेता दि. ०१.०४.२०१७ रोजी केवळ ३०४ पाणी गुणवत्ताबाधित गावे/वाड्या शिल्लक असल्याचे दिसून येते. यावरून राज्य शासनास पाणी गुणवत्ताबाधित गावे/वाड्या कमी करण्यास निश्चितपणे यश मिळाले असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर विदित केले. तसेच नळ पाणीपुरवठा योजनांची अंमलबजावणी करण्यास लागणारा कालावधी विचारात घेऊन गुणवत्ता बाधित गावे/वाड्यांमध्ये तात्पुरत्या स्वरूपाची उपाययोजना म्हणून जलशुद्धिकरण संयंत्रे (RO Plant) अंकीत पाणी गुणवत्ता या घटकांतर्गत व फ्लोराईडबाधित गावे/वाड्यांसाठी जलशुद्धिकरण संयंत्रे (Defloridation Unit) (DFU) निती आयोग, १४ वा वित्त आयोग, जिल्हा परिषद, स्थानिक खासदार निधी इत्यादी निधीतूनही बसविण्यात आलेली आहेत. केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर गाव/वाड्यांतील सर्व स्रोतामधून उपलब्ध होणारे पाणी व त्यांची गुणवत्ता चाचणी विचारात घेऊन गुणवत्ता बाधित गावे/वाड्या संकेतस्थळावर जिल्ह्यांकडून नोंदित करण्यात येतात. तथापि चाचणी परिक्षा १० जिल्ह्यातील आकडेवारीचे अवलोकन केले असता असे दिसून येते कि, केवळ सदर गुणवत्ता बाधित गावे/वाड्यांमधील सर्व पिण्याचे पाण्याच्या स्रोतांचे रासायनिक चाचणीच्या निष्कर्षानुसार अंतिम केले आहे असेही समितीस सांगण्यात आले.

शिफारस :

६.२५ सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी दूषित पाण्याने बाधित वस्त्या यासंदर्भात आक्षेप नोंदविलेले आहेत. सदरहू परिच्छेदात भारत सरकारने पाणी गुणवत्तेसाठी अतिरिक्त वितरण अंतर्गत सन २०१२-१७ दरम्यान रु. ३८.४२ कोटी आणि सन २०१५-१६ दरम्यान निती आयोगाअंतर्गत रु. २४.०८ कोटी राज्यातील दूषित पाण्याने बाधित वस्त्यांच्या समस्या हाताळण्यासाठी वितरित केले होते. तरी त्यातील रु. ३८.९६ कोटी अखर्चित राहिले, ही बाब निश्चितच गंभीर असून यामुळे दूषित पाण्याने बाधित वस्त्यांच्या समस्यांसाठी निधी असतानाही दूर होऊ शकल्या नाहीत. महाराष्ट्रातील ८५ टक्के गावांतील पाणीपुरवठा योजना ही भूपातळीवरील पाण्यावर (surface water) आधारित असून पाण्याची गुणवत्ता दिवसेंदिवस खराब होत आहे व जास्तीत जास्त वस्त्या यामुळे बाधित होत आहेत. विभागामार्फत यासाठी डीफ्लोरीडेशन प्लॅन्ट देण्याचे काम सुरू आहे. त्याचप्रमाणे उर्वरित गावांमध्ये आरओ प्लॅन्ट देखील देण्याचे विभागाचे नियोजन आहे. यातील ३०४ गावे सन २०१२-१३ पासून प्रलंबित आहेत. विभागाकडे निधी उपलब्ध असतानाही ही ३०४ गावे गुणवत्ता बाधित आहेत. यात अनेक जास्तीच्या गावांचा देखील समावेश होण्याची शक्यता आहे. या ३०४ गावांपैकी ६५ गावांमध्ये आरओ यंत्रे कार्यान्वित झालेली आहेत व ६६ गावांमध्ये काम प्रगतीपथावर आहे. ६० डीफ्लोरीडेशन यंत्रे कार्यान्वित करण्यात आली असून ४७ चे काम सुरू आहे व उर्वरित गावे अद्यापही प्रलंबित असल्याचे समितीस सांगण्यात आले. याबाबत समितीने नापसंती व्यक्त करीत इतक्या मोठ्या प्रमाणात केंद्र व राज्य शासनामार्फत या योजनेसाठी निधी प्राप्त होऊनही तो एकीकडे अखर्चित ठेवणे व दुसरीकडे अद्यापही दूषित पाण्याने वस्त्या बाधित असणे ही निश्चितच गंभीर बाब आहे. बाधित गावांची नावे जाहीर करणे व त्याअनुषंगाने तेथे प्लॅन्ट वा यंत्र बसविणे ही कामे प्रशासनिक कारणास्तव प्रलंबित राहिली जे निश्चितच समर्थनीय नाही. ही सर्व कामे कालबद्ध पद्धतीने पूर्ण करणे आवश्यक असताना त्याची पूर्तता विभागाने केली नाही. त्यामुळे या योजनेपासून अनेक गावे वंचित राहिली व दूषित पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास देखील धोका निर्माण झाला. अतः या प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी तसेच बाधित गावांची नावे अद्ययावत करून त्याठिकाणी शुद्ध पाणीपुरवठा करण्यासंदर्भात व उपलब्ध निधी या प्रयोजनार्थ कालबद्ध पद्धतीने खर्च करण्यासंदर्भात आवश्यक ती उपाययोजना विभागाने करावी. त्याचप्रमाणे प्रलंबित असलेल्या गावांचा पूर्ण आढावा घेऊन त्यातील किती कामे पूर्ण झाली, किती प्रलंबित राहिली, खर्च झालेला निधी व अखर्चित राहिलेला निधी (वर्षनिहाय) इ. संपूर्ण माहिती समितीस सादर करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ३.४.७.४ 'पाणी चाचणी प्रयोगशाळेची अधिस्विकृती नसणे'

अभिप्राय

६.२६ ग्रामीण पेयजल क्षेत्रासाठी २०११ ते २०२२ या कालावधीसाठी भारत सरकारने केलेल्या धोरणात्मक नियोजनानुसार राज्य आणि जिल्हास्तरीय सर्व पाणी गुणवत्ता चाचणी प्रयोगशाळांनी राष्ट्रीय प्रयोगशाळा प्रत्यायन मंडळ यांच्याकडून अधिस्विकृती प्राप्त करणे आवश्यक होते. त्याचप्रमाणे, जिल्हा आणि उपविभागीय प्रयोगशाळांनी पिण्याच्या पाण्याच्या स्रोतातील भौतिक, रासायनिक आणि सुक्ष्म जीवशास्त्रीय मानकांचे विश्लेषण भारतीय मानकांतर्गत विनिर्दीष्ट केल्याप्रमाणे करणे आवश्यक होते.

परंतु जरी सर्व प्रयोगशाळा पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या प्रशासनिक नियंत्रणाखाली होत्या तरी राज्यस्तरीय प्रयोगशाळेची स्थापना केली गेली नव्हती. त्याचप्रमाणे ६ क्षेत्रीय प्रयोगशाळा आणि २८ जिल्हा प्रयोगशाळांची अधिस्वीकृती घेण्यात आली नव्हती. आर्सेनिक युक्त पाणी चाचणीसाठीची सोय जिल्हा आणि १३८ उपविभागीय प्रयोगशाळेत उपलब्ध नव्हती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर स्पष्ट केले की, राज्यातील आरोग्य विभागाकडून भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेकडे १३८ उपविभागीय प्रयोगशाळा हस्तांतरीत झालेल्या आहेत. तसेच पुणे येथे राज्यस्तरीय प्रयोगशाळा प्रस्तावित असून ६ विभागीय, २८ जिल्हा व १३८ उपविभागीय अशा एकूण १७२ प्रयोगशाळा भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेकडे कार्यरत आहेत. जिल्हा व उपविभागीय प्रयोगशाळाचे भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेकडे हस्तांतरणामुळे पाणी गुणवत्ता, पाणी नमुने तपासणीचे वाढलेले कामकाज सध्या कंत्राटी कर्मचाऱ्यामार्फत केले जात आहे. राज्यामध्ये भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेची राज्यस्तरीय प्रयोगशाळा कार्यरत नसल्याने सद्यःस्थितीत विभागीय प्रयोगशाळाचे राष्ट्रीय अधिस्विकृतीकरण करण्याचे निश्चित करण्यात आले होते. त्यानुसार राष्ट्रीय अधिस्विकृतीकरण करण्यासाठी इमारत, उपकरणे, मनुष्यबळ या बाबींचा विचार करून सहा विभागीय प्रयोगशाळा राष्ट्रीय अधिस्विकृतीकरण करण्याबाबत कार्यवाही करण्यात आली आहे.

सहा विभागीय प्रयोगशाळा राष्ट्रीय अधिस्विकृतीकरण पूर्ण होऊन त्याबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. उर्वरित २८ जिल्हा प्रयोगशाळा स्थापन झाल्या असून पाणी नमुने पृथःकरणाचे काम चालू झाले आहे. सदर प्रयोगशाळांचे राष्ट्रीय अधिस्विकृतीकरण करणेकरिता आवश्यक असलेले ISO/ IEC १७०२५ हे प्रशिक्षण वरिष्ठ भूवैज्ञानिक आणि कंत्राटी रसायनी यांना देण्यात आलेले आहे. राष्ट्रीय अधिस्विकृतीकरण करणेकरिता आवश्यक ती पुढील कार्यवाही सुरू आहे. राज्य प्रदूषण मंडळ व राज्य आरोग्य प्रयोगशाळेच्या अहवालानुसार महाराष्ट्र राज्यामध्ये आर्सेनिक नसल्यामूळे पृथकरण व्यवस्था करण्यात आली नाही याबाबत राज्य प्रयोगशाळेमध्ये आर्सेनिक घटकाचे पृथकरण व्यवस्था करण्यात येणार आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

शिफारस :

६.२७ सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी पाणी चाचणी प्रयोगशाळेची अधिस्विकृती नसणे यासंदर्भात आक्षेप नोंदविलेले आहेत. राज्य आणि जिल्हास्तरीय सर्व पाणी गुणवत्ता चाचणी प्रयोगशाळांनी राष्ट्रीय प्रयोगशाळा प्रत्यायन मंडळ यांच्याकडून अधिस्विकृती प्राप्त करणे आवश्यक होते. त्याचप्रमाणे पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतातील भौतिक, रासायनिक आणि सुक्ष्मजीव शास्त्रीय मानकांचे विश्लेषण भारतीय मानकांतर्गत विनिर्दीष्ट केल्याप्रमाणे करणे आवश्यक असतानाही त्याची अंमलबजावणी करण्यात आली नाही व प्रयोगशाळांची अधिस्विकृती घेण्यात आली नव्हती. त्याचप्रमाणे राज्यस्तरीय प्रयोगशाळेची स्थापना केली गेली नव्हती. तसेच अर्सेनिकयुक्त पाणी चाचणीची सोय प्रयोगशाळेत उपलब्ध नव्हती. समितीने यासंदर्भात विचारणा केली असता राज्यस्तरीय प्रयोगशाळांचे नियोजन, आराखडा आता विभागाने केलेले आहे. ज्याठिकाणी राज्यस्तरीय प्रयोगशाळा अस्तित्वात आहेत त्यांची दुरुस्ती करावी लागणार असून यासाठी गुजरात, आसाम व अन्य राज्यांमध्ये जाऊन त्याचा अभ्यास करून मग ती आपल्या राज्यात सुरू करण्याबाबतचे नियोजन विभाग स्तरावर सुरू असून यासाठी निधीची तरतूद देखील करण्यात आलेली आहे व निविदा प्रक्रियापर्यंत हे प्रकरण आलेले आहे. एकूण २८ जिल्हा प्रयोगशाळांचे अधिस्विकृतीकरणासंदर्भात कार्यवाही सुरू असून त्यासाठी देण्यात येणारे प्रमाणपत्र यासाठी येणारा खर्च हा मोठ्या प्रमाणात आहे. प्रत्येक प्रयोगशाळेला एन. ए. बी. एल. ॲक्रीडेशन करण्याचे नियोजन होते, परंतु निधीअभावी तसे करता आले नाही. सध्या राज्यात ज्या ३४ प्रयोगशाळा कार्यरत आहेत तेथे आर्सेनिकच्या बाबतीत पृथःकरण करण्यात आलेले नाही. वास्तविक नागरिकांना शुद्ध पाणीपुरवठा करण्याची जबाबदारी ही विभागाची असताना जर या प्रयोगशाळांनाच मान्यता व अधिस्विकृती नसेल तर पाण्याच्या नमुन्यांची चाचणी गुणवत्तेनुसार करण्यात अनेक अडचणी निर्माण होऊ शकतात. तसेच या प्रयोगशाळांनी दिलेल्या अहवालाची वैधताच आक्षेपित ठरते. यासाठीची विहित प्रक्रिया व लागणारा निधी यामुळे हे काम प्रलंबित राहिले. मात्र विभागाने राज्यात कार्यरत असलेल्या प्रयोगशाळांच्या अधिस्विकृती, प्रमाणीकरणाबाबत आवश्यक ती कार्यवाही कालबद्ध पद्धतीने करावी. ज्याठिकाणी आर्सेनिक पृथःकरणासाठी यंत्र बसविण्याची आवश्यकता आहे तेथे ती तातडीने बसविण्यात यावीत वा त्यांची अधिस्विकृती प्राप्त करण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत अशा तांत्रिक पुर्ततेअभावी दूषित पाण्यांचे नमुने विहित मुदतीत तपासण्यास विलंब होणे वा अहवालाची वैधता आक्षेपित होणार नाही याची विभागाने पूर्ण दक्षता घ्यावी व यासंदर्भात आवश्यक ती उपाययोजना करून त्यामुळे स्थानिक नागरिकांना होणारी बाधा याबाबत काळजी घेण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ३.४.८ 'कामाची अंमलबजावणी'

परिच्छेद क्रमांक ३.४.८.१ 'अपूर्ण कामे - अंमलबजावणीतील विलंब'

अभिप्राय :

६.२८ चाचणी परीक्षा करण्यात आलेल्या जिल्ह्यांमधील योजना पूर्ण करण्यात झालेल्या विलंबाबाबतचे विवरणपत्र तपासले असता विलंब झालेल्या ५०९ योजनांपैकी १७७ योजनांमध्ये (३५ टक्के) विलंब पाच वर्षापेक्षा जास्त होता. मार्च, २०१७ अखेरीस ४०८ चालू योजनांमध्ये ज्यांची मान्य किंमत रु. ९२३.५ कोटी होती, विलंब हा एक वर्षापेक्षा जास्त होता. निधीची कमतरता, न्यायिक विवाद, आटणारे स्त्रोत आणि जमिनीची अनुलब्धता इ. ह्या कारणांमुळे योजनांच्या पूर्णत्वास पाच वर्षापेक्षा जास्त विलंब झाला होता. कामे पूर्ण होण्यास विलंब झाल्यास केवळ किंमतच वाढत नसून लाभार्थ्यांना वेळेवर मिळणाऱ्या योजनेच्या लाभापासून वंचित रहावे लागले असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

नळ पाणीपुरवठा योजनांची अंमलबजावणी करण्यास योजनेचा व्याप विचारात घेऊन साधारणतः ०२ ते ०३ वर्षांचा कालावधी लागतो. सदर बाब विचारात घेऊन योजनांच्या प्रगतीनुसार वार्षिक उद्दिष्ट निश्चित करण्यात येते. त्यामुळे सन २०१२ ते २०१७ या कालावधीत पूर्ण झालेल्या योजनांबाबत सदर कालावधीत हाती घेण्यात आलेल्या योजनांशी तुलना न करता निश्चित केलेल्या वार्षिक उद्दिष्टाशी तुलना करणे अपेक्षित आहे.

७३ व्या आणि ७४ व्या घटनादुरुस्ती अन्वये ग्रामीण पाणीपुरवठा योजनांचे नियोजन, अंमलबजावणी आणि देखभाल दुरुस्ती यांची जबाबदारी पूर्णपणे ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती यांच्यावर सोपवण्यात आली आहे. सदर समितीस जिल्हापरिषदेमार्फत अग्रीम स्वरूपात निधी उपलब्ध करून देण्यात येत होता. तथापि समितीमधील अंतर्गत वाद, ठेकेदाराकडून विलंब, तांत्रिक व लेखा विषयक परिपूर्ण माहिती नसल्याने निविदा प्रक्रियेत त्रुटी व विलंब यामुळेदेखील योजनांची अंमलबजावणी करण्यास विलंब झालेला आहे. उपरोक्त बाबींचा विचार करून दि. ०९.०३.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये ग्राम पाणीपुरवठा समितीच्या अधिकारात बदल करण्यात आले असून अंमलबजावणीचे अधिकार जिल्हा परिषद व मजीप्रा यंत्रणेस देण्यात आले असून नियोजन व देखभाल दुरूस्तीचे अधिकार ग्राम पाणीपुरवठा समितीस देण्यात आलेले आहेत. या व्यतिरिक्त योजनेचा उद्भव कोरडा/अपुरा असणे, विविध विभागांच्या परवानग्या, विद्युत जोडणी वेळेत न मिळणे, कंत्राटदारांकडून धिम्या गतीने काम करणे, पाणीपुरवठा व स्वच्छता समिती अंतर्गत वाद, लेखा परिक्षणास झालेला विलंब, तसेच गाव हागणदारीमुक्त न झाल्याने योजना सुधारित मान्यता इ. तांत्रिक अडचणींमुळेदेखील ग्राम पाणीपुरवठा समिती/जिल्हा परिषद/मजीप्रा यंत्रणेमार्फत अंमलबजावणी करण्यात येत असलेल्या योजनांना विलंब झाला असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. यासंदर्भात चाचणी परीक्षा केलेल्या जिल्ह्यांमधील अपूर्ण योजना व खोळंबलेल्या खर्चाची प्रकरणे तपासली असता, १) क्षेत्रीय ग्रामीण पाणीपुरवठा योजना देऊळघाट धाड (बुलढाणा तालुका), बुलढाणा जिल्ह्यातील योजना (महाराष्ट्र जीवन प्राधिकरण) मार्च, २०१० मध्ये कामाचे वाटप होऊन देखील भूसंपादन न झाल्यामुळे रस्ता क्रॉसिंगला परवानगी मिळण्यास विलंब झाल्यामुळे दोन वर्षापर्यंत काम सुरू होऊ शकले नव्हते. त्यानंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी नोव्हेंबर, २०११ मध्ये शासनास पाठविलेल्या प्रस्तावास मान्यता मिळालेली नसल्यामुळे जॅकवेल, अप्रक्रियित पाण्याची जलवाहिनी, जलशुद्धीकरण संयंत्र ईएसआर वाटपाचे जाळ्याच्या बांधकामावर योजनेअंतर्गत झालेला रु. १२.४३ कोटी इतका खर्च खोळंबून राहिला असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी स्पष्ट केले की, योजनेची कामे सुधारित प्रशासकीय मान्यतेअभावी बंद असल्याचे नमूद करण्यात आले असून सदर परिच्छेद अंतिम करताना योजनेची कामे भुसंपादन व रस्ता क्रॉसींगमुळे दोन वर्षे सुरू न झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. योजनेच्या रु. ११०९.२५ लक्ष किंमतीच्या अंदाजपत्रकास दि. ०५.०८.२००९ रोजी प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून योजनेची निविदा प्रक्रिया पूर्ण करून कार्यारंभ आदेश दि. ११.०३.२०१० रोजी देण्यात येऊन त्यानुसार योजनेच्या प्रत्यक्ष कामास सुरूवात करण्यात आली असून योजनेची कामे २ वर्षे विलंबाने सुरू झालेली नाहीत. योजनेवर जादा खर्च अपेक्षित असल्याने सुधारित प्रशासकीय मान्यता मिळण्याकरीता रु. २७.५ कोटी किमतीचा सुधारित प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला व सुधारित प्रशासकीय मान्यता न मिळाल्याने योजनेची कामे स्थगित होती. आता सुधारित योजना रु. १९२०.८८ लक्ष इतक्या किंमतीस मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे. संबंधित कंत्राटदाराने उर्वरितकामास सुरूवात केली असून लवकरच योजना पूर्ण केली जाईल असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

(२) क्षेत्रीय ग्रामीण पाणीपुरवठा योजना, रायगड जिल्ह्यातील नागोठणे योजना (महाराष्ट्र जीवन प्राधिकरण) - मुंबई गोवा महामार्गाच्या रुंदीकरणामुळे मुंबई गोवा महामार्गाच्या दोन्ही बाजूस असणार्‍या जलशुद्धीकरण संयंत्र आणि वितरण प्रणाली यांना जोडणाऱ्या नलिकेचे काम होऊ न शकल्यामुळे मार्च २०११ मध्ये दिले गेलेले काम अपूर्ण राहिले होते. आरसीसी जॅकवेल, जलशुद्धीकरण संयंत्र, ईएसआर वाटपाचे जाळे इ. यांच्या बांधकामावर योजनेअंतर्गत झालेला रु. ४.६६ कोटी इतका खर्च खोळंबून राहिला (जानेवारी, २०१७). अशाप्रकारे क्षेत्रीय ग्रामीण पाणीपुरवठा योजना, ज्यावर रु. १७. ०९ कोटी खर्च झाले होते. तीन ते सहा वर्षांच्या कालावधीसाठी कामे थांबल्यामुळे अपूर्ण राहिल्या होत्या असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

मुंबई-गोवा महामार्गाच्या रुंदीकरणामुळे १३. ३८ कि. मी. वितरण नलिकेपैकी ३ कि. मी. वितरण नलिकेचे काम करता आले नाही. तथापि, ग्रामपंचायत नागोठणे येथे दिनांक २१. ०५. २०१८ पासून आहे त्या स्थितीत कार्यान्वित करण्यात आली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

शिफारशी :

६.२९ (१) सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी कामाची अंमलबजावणी या शीर्षाअंतर्गत अपूर्ण कामे किंवा अंमलबजावणीत विलंब यासंदर्भात आक्षेप नोंदविलेले आहेत. परिणामी लाभार्थींना वेळेवर मिळणाऱ्या योजनेच्या लाभापासून वंचित राहावे लागले. याबद्दल समितीने विस्तृत माहिती घेतली असता विभागाने अनेक कामे हाती घेतली असून त्यातील काही कामे बऱ्याच वर्षांपासून प्रलंबित आहेत. हा विलंब होण्याची अनेक कारणे दिसून येतात, जसे ठेकेदाराकडून कामे करण्यात विलंब होणे, आपआपसात किंवा पाणीपुरवठा व स्वच्छता समितीमध्ये वाद, योजनेसाठी जागा न मिळणे अशी आहेत. समितीसमोर सादर केलेल्या विलंबाच्या कारणामधील योजना पूर्ण न होण्यामागील एक महत्वाचे कारण म्हणजे गाव हागणदारीमुक्त न झाल्यामुळे तेथे योजना सुरू करता आली नाही. यावर देखील समितीने नापसंती व्यक्त करीत योजनेसाठी गावाची निवड करते वेळीच गाव हागणदारीमुक्त आहे किंवा कसे याची खात्री करूनच त्याचा समावेश योजनेमध्ये करणे अभिप्रेत असताना प्रथम गावाची निवड योजनेसाठी करण्यात येणे व नंतर गाव हागणदारीमुक्त करण्यासंदर्भात कार्यवाही सुरू केल्यामुळे योजनेच्या कामास विलंब होतो. काम अर्धवट केल्यानंतर हागणदारीमुक्त गावाच्या अटीचा

वापर केल्यास निश्चितच त्याचा विपरीत परिणाम योजनांच्या कालबद्ध अंमलबजावणीवर पडतो व या एका अटीमुळे शासनाचे ९० टक्के पैसे योजनेत अडकून पडतात. ज्यावेळेस अशी अट योजनेसाठी टाकण्यात येते अशा परिस्थितीत कामाच्या कालबद्ध अंमलबजावणीची जबाबदारी देखील विभागाचीच होती. परंतु यामध्ये नियोजन, ताळमेळ व सुसुत्रता याचा अभाव असल्यामुळे हा विलंब झाल्याचे सुस्पष्टपणे दिसून येते. योजनेचे ९० टक्के काम झाल्यानंतर गाव हागणदारीमुक्त असण्याची अट टाकून शेवटच्या टप्प्यातील १० टक्के निधी विभागाने थांबविल्यामुळे योजना पूर्णत्वास नेण्यास अनेक अडचणी येतात. योजनेची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर व त्यावर इतक्या मोठ्या प्रमाणात निधी खर्च झाल्यानंतर योजनेच्या अंतिम टप्प्यात कोणत्याही अटीचा समावेश करून योजनेची अंमलबजावणी थांबविणे हे निश्चितच अयोग्य आहे. याउलट हागणदारी मुक्त गाव असल्याशिवाय योजना सुरू करू नये अशी अट असावी.

यातील दुसरा मुद्दा असा की, दि. ९ मार्च, २०१८ च्या शासन निर्णयानुसार रु. ५ कोटीपर्यंतच्या योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व रु. ५ कोटीवरील योजना जिल्हापरिषदेकडे सोपविण्यात आल्या. यापुर्वी ही सर्व कामे ग्रामपंचायतीच्या पाणीपुरवठा समितीमार्फत होत होती. मात्र आता ती कामे पूर्णपणे थांबविण्यात आली आहेत. केवळ योजनेच्या देखभाल व दुरुस्तीचे काम ग्रामपंचायतीने करायचे आहे. ज्या सुरू असलेल्या योजना आहेत व त्या पूर्ण करण्याची इच्छा समितीने दर्शविली तर ती योजना पूर्ण करावी व त्यासाठी ६ महिन्याची मुदत दिली होती व ती कामे समितीमार्फत सुरू आहेत. वास्तविकतः ७३ व ७४ व्या घटना दुरुस्तीच्या आधारे ग्रामीण पाणीपुरवठा समित्यांना काम देण्यात आले. मात्र जिल्हापरिषद आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना त्यावर नियंत्रण ठेवण्याचे अधिकारच देण्यात आले नाहीत त्यामुळे या अडचणी उद्‌भवल्या. त्यातही योजनेसाठी अग्रिम रक्कम दिल्यामुळे देखील गैरव्यवहारात वाढ झालेली आहे. तसेच ५ वर्षानंतर या समित्या बदलल्यामुळे पुर्वीच्या समित्यांनी हिशोबच दिला नाही. अशा अनेक अडचणी आजही अस्तित्वात आहेत. यासंदर्भात जिल्हानिहाय बैठका घेऊन संबंधितांना सूचना देवून त्यानुसार कार्यवाही सुद्धा झाली असून अनेक अधिकाऱ्यांवर एफआयआर तसेच अनेक ठिकाणी जमीन महसूली वसुली (**Revenue Recovery**) प्रस्तावित करण्यात आल्याचे समितीस सांगण्यात आले. वास्तविकतः योजनेसाठी देण्यात आलेला निधी व प्रत्यक्षात झालेल्या कामासाठी लागलेला निधी याचे मुल्यांकन करून तफावतीची रक्कम वसुल करणे आवश्यक आहे. गत ८ ते १० वर्षापासून ही कार्यवाही अशाच पद्धतीने सुरू आहेत. अशा गंभीर प्रकरणांमध्ये कालबद्ध पद्धतीने विभागाने कार्यवाही करणे अत्यावश्यक असून यासंदर्भात तात्काळ रकमेच्या वसुलीसंदर्भात कार्यवाही करण्यात यावी व आवश्यकता पडल्यास जमीन महसूली वसुली स्वरुपात ती करण्यात येऊन संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी. या सोबतच ज्या योजना अपूर्ण आहेत त्याचा आढावा घेऊन त्या कालबद्ध पद्धतीने पूर्ण कराव्यात अथवा तातडीने जिल्हापरिषद किंवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे किंमतीच्या आधारे हस्तांतरण करून त्या पूर्ण करण्यात याव्यात. त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणात रिक्त असलेल्या पदांमुळे देखील योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे होऊ शकत नाही. अतः रिक्त पदांचा आढावा घेऊन कार्यकारी अभियंता दर्जाची पदे तातडीने भरण्याबाबत विभागाने कार्यवाही करावी.

समितीच्या असेही निदर्शनास आले की, अनेक ठिकाणी योजनांचे अंदाजपत्रक व कार्यस्थळाची निवड हीच चुकीची करण्यात आल्यामुळे योजना पूर्ण होऊ शकत नाहीत. अनेक ठिकाणी योजनांवर मोठ्या प्रमाणात खर्च झाल्यावर योजनेच्या स्त्रोताला पाणीच उपलब्ध नाही असेही निदर्शनास येते. पाणीपुरवठा योजनांवर एवढ्या मोठ्या प्रमाणात निधी खर्च केलेला असताना त्या अपूर्ण राहिल्यास त्याचा काहीही उपयोग होत नाही. या सर्व दोषांमुळे मात्र ग्रामपंचायतीला दंड करण्यात येतो मात्र संबंधित अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई करण्यात येत नाही ही देखील बाब अयोग्य असून यामुळे अशाप्रकारे गैरव्यवहार करणाऱ्या अधिकाऱ्यांना संरक्षण व पाठबळ मिळते. अशा सर्व योजनांचा विभागाने आढावा घ्यावा व त्या अपूर्ण राहण्यामागे दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी. ज्या ठिकाणी पाण्याचा स्त्रोत नसल्यामुळे योजना बंद आहेत त्या ठिकाणी विभागाने नवीन स्त्रोत शोधून योजना पूर्ण कराव्यात. परंतु कोणत्याही परिस्थितीत योजनेवर खर्च केलेला निधी निष्फळ ठरणार नाही याची विभागाने दक्षता घ्यावी किंवा तेथे भूपातळीवरील पाण्याची (**surface water**) योजना राबवावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

६.३० (२) समितीच्या असेही निदर्शनास आले की, जिल्हापरिषद व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या माध्यमातून योजना पूर्ण करण्यात येतात, परंतु ग्रामपंचायतीकडे या योजनांची देखभाल करण्यासंदर्भात आवश्यक ते तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध नसते. अशा परिस्थितीत असे जलशुद्धीकरण केंद्र चालविणे व त्याची स्वच्छता राखणे अशा छोट्या नगरपरिषदांना शक्य नसते. त्यामुळे योजना बंद पडलेल्या असून आता त्या पुनरुज्जीवित देखील होऊ शकत नाहीत. त्यातही विजेचा खर्चाचा विषय हा अतिशय गंभीर आहे. सद्यःस्थितीत ३ ते ५ वर्षे विलंब झालेल्या योजनांची संख्या २८६ असून त्यात जवळजवळ रु. ५०० कोटीपेक्षा जास्त गुंतवणूक झालेली आहे. या विलंबामुळे योजनेच्या किंमतीत देखील मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. निरनिराळ्या योजनांची सद्यःस्थिती वेगवेगळी असून विलंबाची कारणे देखील निराळी आहेत. काही ठिकाणी निधीचा अपहार देखील झालेला असून त्यासंदर्भात समिती सदस्यांवर गुन्हे देखील दाखल करण्यात आले आहेत. अशा सगळ्या योजनांमध्ये शासनाने कालबद्ध पद्धतीने निर्णय घेऊन व संबंधितांवर कडक कारवाई करून या योजना तात्काळ पूर्ण करण्यासंदर्भात कार्यवाही करण्यात यावी. तसेच गुन्हे दाखल झालेल्या प्रकरणांमध्ये कायदेशीररित्या आवश्यक तो पाठपुरावा करून प्रकरण निर्णयाप्रत आणण्यात यावे. तसेच त्यामध्ये अपहारीत रकमेची वसुलीदेखील कालबद्ध पद्धतीने करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ३.४.८.२ 'कंत्राट व्यवस्थापनातील त्रुटी'

(१) नागपूर नागरी पेरी क्षेत्रीय ग्रामीण पाणीपुरवठा योजना

अभिप्राय

६.३१ डक्टाईल आयर्न (डि आय) पाईपचा पुरवठा करणाऱ्या पुरवठादाराबरोबर केलेल्या कंत्राटात, राज्यात कोणत्याही ठिकाणी कामाच्या जागेवर करावयाच्या पुरवठ्याचा वाहतूक खर्च अंतर्भूत होता तरी देखील नागपूर मधील महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाने नागपूर नागरी पेरी क्षेत्रीय ग्रामीण पाणीपुरवठा योजना या कामासाठी पुरवठादाराकडून खरेदी केलेल्या डी. आय पाईपच्या पूर्ण वाहतुकीवर रु. १. २८ कोटीच्या कंत्राटदाराला केलेल्या प्रदानावर टाळता येण्याजोगा खर्च केला होता असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

डक्टाईल आयर्न (डि आय) पाईपचा पुरवठा विभागामार्फत शेड्युल अे मध्ये पुरवठा करण्याचे प्रस्तावित आहे. त्यानुसार पुरवठादारास दिलेल्या आदेशानुसार त्यांना पुरवठा करावयाचे स्थान जलशुद्धीकरण केंद्र शंकरपूर निश्चित करण्यात आलेले होते. त्यानुसार पुरवठादाराने संपूर्ण पुरवठा त्या ठिकाणी केला. तसेच जागेचा अभाव व पाईप रस्त्याच्या किनाऱ्यावर ठेवणे म्हणजे रहदारीकरिता येणारी अडचण / दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही तसेच नागपूर शहरालगत ग्रामीण भाग विकसित होत असून त्यात रोडची रुंदी वाढविणे त्यामुळे रस्त्यात खोदकामे इतर कामे प्रगतीपथावर होती. अशा परिस्थितीत पाईप ठिकठिकाणी रस्त्याच्या कडेला ठेवणे शक्य नसल्यामुळे एकच ठिकाणी शंकरपूर जलशुद्धीकरण केंद्र येथे ठेवण्याबाबत निश्चिती करण्यात आली. सदर योजना ही प्रादेशिक असून त्यात एकूण १० गावांचा समावेश होता. यासाठीची दरसूची सन २०१३-१४ पान क्र. ४ अ. क्र. १७ मध्ये स्पष्ट नमूद करण्यात आले आहे की, Cost of Carting of pipes and valves from Departmental stores to site works is not considered in rate analysis त्यामुळे सदर बाब योजनेत व निविदेत विचारात घेऊन समाविष्ट करण्यात आलेली आहे. याबाबत त्यावेळेस प्रत्येक गावाचे अंतर विचारात घेऊन दर पृथःकरण करण्यात येऊन कंत्राटदारास काम देण्यात आले असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

शिफारस

६.३२ सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी कंत्राट व्यवस्थापनातील त्रुटी यासंदर्भात गंभीर आक्षेप नोंदविलेले आहेत. कंत्राटदाराला डक्टटाईल पाईपबद्दल वाहतुकीचे स्वतंत्र पैसे देण्यात येणे, सर्वसाधारणतः हे पाईप तात्काळ वापरायचे असतील तर हे पाईप कार्यस्थळी थेट पोहोच करण्यात येते. परंतु नागपूर पेरीअर्बन ही मोठी योजना असल्यामुळे व सर्व पाईप वापरण्यास खुप वेळ लागणार असल्यामुळे पाईप यार्डमध्ये ठेवून आवश्यकतेनुसार कार्यस्थळी नेण्याचे ठरले. असे पाईप्स रस्त्याच्या कडेला किंवा कार्यस्थळी किंवा यार्डमध्ये ठेवावेत याबाबत कोणतेही नियम नाहीत. या प्रकरणी ते यार्डमध्ये ठेवून आवश्यकतेनुसार वापरण्यात आले व ही बाब निविदेमध्ये नमूद करण्यात आली असून त्यानुसारच कंत्राटदाराला पैसे देण्यात आले. फक्त यार्डमधून पाईप कार्यस्थळी आणण्याचे काम दुसरे होते व ते अंदाजपत्रकात नमूद नव्हते. तसेच डीएसआरच्या ठरलेल्या दरानुसार हे वाहतूक शुल्क देण्यात आले असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर मान्य केले. यावर महालेखाकारांनी आक्षेप नोंदवित वर्कऑर्डरमध्ये पुढील प्रमाणे नमूद असल्याचे समितीच्या निदर्शनास आणले. "The inspection charges are inclusive of transportation charges upto the site of work anywhere in Maharashtra State as directed by the concerned engineer-in-charge, but excluding octroi duty. " महालेखाकारांनी उपरोक्त तरतुदीच्याआधारेच हे आक्षेप नोंदविलेले आहेत. परंतु चर्चेनंतर विभागाला येणारी व्यावहारीक अडचण पाहता तसेच साईटवर हे पाईप ठेवल्यास अपघात, चोरी अशा बाबी टाळण्यासाठी ते यार्डमध्ये ठेवण्याबाबत विभागाने घेतलेला निर्णय व त्याअनुषंगाने दिलेले स्पष्टीकरण ग्राह्य धरण्यास समितीला कोणतीही हरकत नसून विभागाचे स्पष्टीकरण समिती मान्य करीत आहे. तरी शासनाने भविष्यात निविदा अटी शर्ती निश्चित करताना प्रकल्पाची व्यवहार्यता व शासनाच्या निधीची बचत या बाबी ग्राह्य धरुनच अटी शर्ती अधिकाधिक सुस्पष्ट असाव्यात व त्याची काटेकोर अंमलबजावणी विभागाने करावी व शक्यतोवर अशा आक्षेपांची पुनरावृत्ती टाळावी अशी समितीची शिफारस आहे.

(२) बुलढाणा जिल्ह्यातील बुलढाणा शहर आणि चार गांवे यांची क्षेत्रीय ग्रामीण पाणीपुरवठा योजना

अभिप्राय

६.३३ बुलढाणा जिल्ह्यातील बुलढाणा शहर आणि चार गावांना पिण्यासाठी पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी मंजूर केलेल्या (जून, २०१३) क्षेत्रीय ग्रामीण पाणीपुरवठा योजनेंतर्गत खरगपूर्णा नदीतील जॅकवेलच्या बांधकामासाठीचे उत्खननाचे काम ८. ५० मीटरच्या खोलीपर्यंत पूर्ण झाले होते (जून, २०१३). जॅकवेल बांधणीची जागा खरगपूर्णा नदीच्या पात्रात बुडत असल्यामुळे काम थांबविण्यात आले होते. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी नवीन जागा निवडली (मार्च, २०१४) आणि नवीन जागेवर जॅकवेल बांधणीचे काम जूलै, २०१४ मध्ये पूर्ण करण्यात आले. जरी कंत्राटदाराला जून्या जागी जॅकवेल बांधणीचे प्रदान करण्यात आले नव्हते. तरी देखील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणावर टाळता येण्याजोगे दायित्व आणि अंतिमतः रु. २६. ९८ लाख इतका वायफळ खर्च लादण्यात आला होता. कामाचा प्रारंभ करण्यापूर्वी केलेली जागेची निवड अयोग्य असल्यामुळे रु. २६. ९८ लाखांचे टाळता येण्याजोगे दायित्व तयार झाले असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

योजनेचे उद्भव असलेले खडकपूर्णा धरणावरून बुलडाणा शहर व ४ गावे पाणीपुरवठा योजनेस दि. ३१ मार्च, २०१२ रोजी प्रशासकीय मान्यता प्राप्त असून योजनेकरीता रु. ८४. ३० कोटी नागरी हिस्सा व दि. ०४ मे, २०१३ अन्वये रु. २९. ०२ कोटी (ग्रामीण हिस्सा) याप्रमाणे योजना मंजूर झालेली आहे.

ई-निविदा नुसार राज्यस्तरीय निविदा समितीने बुलढाणा शहर व ४ गावे पाणीपुरवठा योजनेकरीता मे. दि. इंडीयन हयूम पाईप कं. लि. यांना स्विकृत निविदा किंमत रु. ८१,३१,९४,५९३ यांना नियुक्त केले असून दि. २३.०५.२०१३ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे. योजना पूर्ण करण्याचा कालावधी दि. २२.०५.२०१५ होता.

योजनेअंतर्गत जॅकवेलचे स्थळ निश्चित धरणाच्या सरासरी जमीन लेवल ५१४.५० मी. स्थिती ठिकाणी घेण्यात आला असून पुढील कामाकरीता ले-आऊट दिले आहे.

योजनेअंतर्गत जकॅवेलची सरासरी लेवल ५१४. ५० मी. असून मृत साठा खाली आहे. त्यामुळे जॅकवेलचे खोदकाम ५०६.०० मी. वर झाले आहे.

शिफारस

६.३४ धरणातील मृत साठ्यातील पाण्याचा उपसा करता यावा याकरीता योजनेतील जॅकवेल ही ५१४.५० मी. या पातळीवर प्रस्तावित होती आणि सदर विहीरीचे खोदकाम ५०६ मी. पर्यंत करण्यात आले. परंतु दि. १४.०६.२०१३ रोजी खडकपुर्णा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या अतीपर्जन्यवृष्टीमुळे धरणातील पाणी पातळी ही महत्तम (Maximum) उपसा पातळी म्हणजेच ५१८.१८ मी. पर्यंत वाढली. त्यामुळे सदर विहीरीचे खोदकाम बंद पडले. खडकपूर्णा धरणाची महत्तम पातळी ५१८.१८ मी. असल्याने आणि साधारणतः वर्षभरानंतर ती लेवल ५१४. ५० मी. या पातळी पर्यंत आल्याने सदरहू काम दि. २२.०५.२०१५ पर्यंत पूर्ण करावयाचे असल्याने मा. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी सदरहु योजनेच्या क्षेत्रीय पाहणी दरम्यान काम पूर्ण करण्याच्या कालावधीचे अवलोकन करून ५१९ मी. पातळीवर नवीन जॅकवेल घेण्याकरिता प्रस्तावित केले. त्यानुसार दि. १२.०६.२०१४ रोजी नवीन जागेवर कामास सुरूवात करण्यात येऊन दि. २०.०५.२०१५ पर्यंत विहीरीचे काम फ्लोअर लेव्हलपर्यंत पूर्ण करण्यात आले. त्यामुळे प्राप्त परिस्थितीनुसार विहीरीची जागा बदलण्याचा निर्णय घेण्यात आला असून यापूर्वी करण्यात आलेली जागेची स्थळ निश्चिती योग्य असून सदर करारनामा हा ठोक पद्धतीचा असल्याने तसेच निविदा पुर्व बैठकीतील शर्तीनुसार आधी झालेल्या खोदकामाचे देयक कंत्राटदाराला अदा करण्यात आले नसून भविष्यातसुद्धा भुगतान करण्याची आवश्यकता नाही असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. त्यामुळे सदरहू परिच्छेदात वाढीव दराने काम करण्यात आलेले नसल्यामुळे सदरहू आक्षेप समिती निकाली काढीत आहे.

(३) अहमदनगर जिल्ह्यातील अकोले आणि ३२ गावे क्षेत्रीय ग्रामीण पाणीपुरवठा योजना

अभिप्राय

६.३५ अहमदनगर जिल्ह्यामधील अकोले आणि ३२ गावांना सामावून घेणाऱ्या क्षेत्रीय ग्रामीण पाणीपुरवठा योजनेसाठी पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी रु. ३०. ०७ कोटीला प्रशासकीय मान्यता दिली होती (जून, २०१२). कंत्राटदाराला काम रु. ३५. ८२ कोटी इतक्या किंमतीत बहाल करण्यात आले (मे, २०१२) जे २४ महिन्यात म्हणजेच मे , २०१४ पर्यंत पूर्ण करावयाचे होते. परंतु कंत्राटात नमूद केलेल्या ठराविक कालमर्यादेत कामाचे विविध टप्पे पूर्ण करण्यात कंत्राटदार अपयशी ठरला होता. कंत्राटातील अटींप्रमाणे १५२२ दिवसांसाठीच्या विलंबाकरीता वसूल करावयाच्या रु. १. ४३ कोटी इतक्या दंडाऐवजी वेळापत्रक न पाळल्याबद्दल कंत्राटदाराकडून ३५० दिवसांच्या विलंबाकरिता महाराष्ट्र जीवन प्रधिकरण विभागाने रु. ०. २६ कोटी इतका दंड वसूल केला होता (जून, २०१६), ज्यामुळे रु. १. १७ कोटी इतकी कमी वसुली झाली होती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

अकोले व इतर ३२ गांवे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना ता. अकोले, जि. अहमदनगरचे काम मे. मेघा इंजिनिअरींग ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. हैद्राबाद यांना देण्यात आलेले असून निविदेची अंदाजित किंमत रू. २५४०.५५ लक्ष स्वीकृत किंमत रू. ३५८२.१८ लक्ष एवढी आहे. काम पूर्ण करावयाचा कालावधी हा दि. २३.०५.२०१२ ते दि. २२.०५.२०१४ (बांधकामासाठी २ वर्ष) आणि दि. २३.०५.२०१४ ते दि. २२.०५.२०१५ (योजना चालविण्यासाठी १ वर्ष) असा एकूण ३ वर्ष होता.

स्वीकृत निविदेनुसार योजनेचे काम हे दोन टप्प्यामध्ये पूर्ण करावयाचे होते. जॅकवेलचे काम हे धरणाच्या बुडीत क्षेत्रामध्ये येत आहे. निळवंडे भागात झालेल्या अतिवृष्टीमुळे पाण्याचा उपसा झाल्याशिवाय सदर काम करता येत नव्हते. त्यामुळे दि. ०२.०१.२०१३ पर्यंत (सुमारे २२० दिवस) कंत्राटदारास हेडवर्क्सची कामे पूर्ण करता आली नाहीत.

टप्पा-२ ची कामे सुरू करण्यास शासनाकडून दि. १६.०१.२०१४ रोजी मान्यता मिळाली. सदर मान्यता मिळाल्यानंतर शुद्ध पाणी गुरूत्व नलिका व इतर उपांगे यांच्या कामास सुरूवात करण्यात आली. शुद्ध पाणी गुरूत्वनलिकेच्या कामाची व्याप्ती सुमारे ८४ कि.मी. आहे. प्रत्यक्ष पाईपलाईनचे काम करत असताना खाजगी जागाधारक, शेतमालक पाईपलाईन जाणाऱ्या जागेमध्ये पीके उभी असल्याने शेतकऱ्यांनी काम पूर्ण करण्यास अडथळा निर्माण केला. त्यामुळे शुद्ध पाणी गुरूत्वनलिकेच्या कामास विलंब झाला. यामध्ये सदर झालेल्या विलंबास कंत्राटदार अंशतः जबाबदार नव्हता. दरम्यानच्या कालावधीमध्ये जलशुद्धीकरण केंद्र, अशुद्ध पाणी उर्ध्वनलिका आणि एम. बी. आर. ची कामे प्रगतीपथावर होती.

अशा परिस्थितीत कार्यक्षेत्रावरील परिस्थितीचा विचार करता निविदा अटी व शर्तीनुसार योजनेच्या कामाचा वेग सुस्थितीमध्ये ठेवणे कंत्राटदारास शक्य नव्हते. ठेकेदाराकडून कामाचा वेग मंदावला जाऊ नये या कारणास्तव दि. २३.१२.२०१५ पासून रू. ५००० प्रतिदिन प्रमाणे आणि दि. ०१.०६.२०१६ पासून रू. १०००० प्रतिदिन प्रमाणे कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करण्यात आली. रू. ३२ लक्ष एवढी रक्कम कंत्राटदाराकडून दंडापोटी अद्यापपर्यंत वसूल करण्यात आलेली आहे. कंत्राटदाराने योजनेचे ८५% काम सद्यःस्थितीमध्ये पूर्ण केलेले आहे.

माहे ऑगस्ट, २०१६ अखेर योजनेचा मंजूर निधी संपुष्टात आला. माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये सुधारित योजना तयार करून सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास सादर करण्यात आली. योजनेवरील निधी संपुष्टात आलेला असल्याने ठेकेदाराने योजनेचे काम बंद ठेवलेले आहे. ठेकेदाराचे सुमारे रू. ४३५. ९६ लक्ष एवढ्या रकमेची अदायगी करणे बाकी आहे. सुधारित योजनेस अद्यापपावेतो मंजुरी मिळालेली नसल्याने सदर रक्कम ठेकेदारास अदा करता येत नाही.

उपस्थित करण्यात आलेल्या परीच्छेदांनुसार योजनेचे काम २४ महिन्यांमध्ये पूर्ण होणे आवश्यक होते. सदर ठराविक कालमर्यादेमध्ये ठेकेदार काम पूर्ण करू शकला नाही. त्यानुसार निविदा अटी शर्तीप्रमाणे १५२२ दिवसांसाठी झालेल्या विलंबाकरिता रू. १.४३ कोटी इतक्या दंडाच्या रकमे ऐवजी वेळापत्रक न पाळल्याबद्दल कंत्राटदाराकडून मर्जीप्रमाणे ३५० दिवसांच्या विलंबाकरीता रू. २६ लक्ष इतका दंड वसूल केला. त्यामुळे रू. १. १७ कोटी इतकी कमी वसुली झाली आहे.

योजनेच्या मूळ कालावधीमध्ये काम पूर्ण झाले नसल्यामुळे दि. २३.०५.२०१४ ते दि. ३०.०३.२०१६ पर्यंत मुदतवाढ मंजूर केलेली आहे. (१) योजनेचे काम ८५% पूर्ण झालेले असल्याने, (२) योजनेच्या कामास मूळ कालावधीमध्ये निधी वेळेवर उपलब्ध न झाल्यामुळे कंत्राटदारास कामाची गती योग्य प्रकारे राखता आली नाही, (३) योजने अंतर्गत प्रथम टप्प्याच्या कामाबरोबर दुसऱ्या टप्प्यांच्या कामाअंतर्गत कामे हाती घेण्याची परवानगी १ वर्ष ७ महिने इतक्या उशीरा मिळाल्याने त्याचाही कामावर परिणाम झाला, (४) केलेल्या दंडात्मक कार्यवाहीमुळे ठेकेदाराने कामाची गती वाढवली आणि दि. २७.०४.२०१७ रोजी अकोले शहरांपर्यंत पाणी आणून चाचणी घेतली. या उपरोक्त कारणास्तव ठेकेदारास लावण्यात आलेला दंड दि. २३.०१.२०१७ पासून दि. २७.०९.२०१७ पर्यंत माफ केलेला आहे. त्यास अनुसरून रू. १.१७ कोटी इतकी दंडाची रक्कम वसूल करण्याचा प्रश्न उद्भवत नाही असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

शिफारस

६.३६ अहमदनगर येथील ३२ गावांची ही प्रादेशिक पाणीपुरवठा योजना असून यामध्ये मोठ्या प्रमाणात विलंब झालेला आहे. यामागील कारणमिमांसा समितीने विचारली असता हे काम टप्प्याटप्प्याने करावयाचे होते, तसेच सन २०१३ मध्ये अतिवृष्टी झाली होती. त्यामुळे हा विलंब झालेला आहे. या प्रकल्पातील बराचसा विलंब हा व्यावहारीक अडचणींमुळे झालेला असून कंत्राटदाराच्या चुकीमुळे झालेला नाही. परंतु तरीही कंत्राटदाराकडून विलंबाबाबत नियमानुसार वसुलपात्र ठरलेली एकूण रु. ३२ लक्ष इतकी रक्कम वसुल करण्यात आलेली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. प्रकल्पाची सद्यःस्थिती काय याबाबत समितीने विचारणा केली असता ही योजना अद्यापही पूर्ण झालेली नाही. योजनेवरील खर्चात वाढ झाल्यामुळे या योजनेच्या सुधारित मान्यतेसाठी वित्त विभागाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. लवकरच यास मान्यता मिळाल्यानंतर हे काम पूर्ण करण्यात येईल असेही समितीसमोर सांगण्यात आले. उपरोक्त वस्तुस्थिती पाहता विभागाने तातडीने प्रस्ताव वित्त विभागाकडून मान्य करून घेण्यासंदर्भात पाठपुरावा करावा व या योजनेचे प्रलंबित कामकाज तातडीने पूर्ण करून ही पाणीपुरवठा योजना पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(४) नाशिक जिल्ह्यातील माळमाथा आणि २५ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना

अभिप्राय

६.३७ ऑक्टोबर, २०१२ मध्ये बहाल केलेल्या नाशिक जिल्ह्यातील माळमाथा आणि २५ गावांचे क्षेत्रीय ग्रामीण पाणीपुरवठा योजनेतील दोन उन्नत साठवण जलाशय, अतिरिक्त लांबीच्या जलवाहिन्या बसविणे आणि अतिरिक्त वितरण प्रणालीची अंमलबजावणी अशी रु. २. ०१ कोटी किंमतीची कामे मूळ निविदेत समाविष्ट केलेली नव्हती. परंतु वर उल्लेख केलेल्या कामांसाठी स्वतंत्र निविदा न काढता मुख्य अभियंता, प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी ही कामे मूळ कंत्राटदारालाच बहाल केली होती (जून, २०१५) आणि पहिल्या चालू देयकापर्यंत (जुलै, २०१६) कंत्राटदाराला या अतिरिक्त कामाच्या मोबदल्यात रु. १.३३ कोटी इतके प्रदान करण्यात आले होते. त्याच कंत्राटदाराला काम बहाल करणे अयोग्य होते.

कामाच्या अतिरिक्त बाबी बहाल करताना निविदेच्या प्रक्रिया पाळल्या जाणे आवश्यक होते आणि जलद गतीने कामे पूर्ण करण्याचा हेतू देखील साध्य झाला नव्हताच आणि कंत्राटदाराला डिसेंबर, २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

माळमाथा प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या अंदाजपत्रकांना रु. १८, ४९, ०८, ००० इतक्या ढोबळ किंमतीस प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे व रु. १६, ९६, ३९, ७०० इतक्या निव्वळ किंमतीस तांत्रिक मान्यता प्राप्त झाली आहे.

सदर योजनेतील (१) धरणाची दुरुस्ती, (२) जलशुद्धीकरण केंद्र, (३) शुद्ध पाणी पंपिंग मशिनरी, (४) कनेक्टींग मेन/गुरुत्ववाहिनी, (५) जमिनीवरील जलकुंभ, (६) उंच जलकुंभ, (७) वितरण व्यवस्था, (८) कर्मचारी निवासस्थानाची दुरुस्ती, (९) किरकोळ कामे, (१०) योजना एक वर्ष कालावधीसाठी चालविणे या उपांगासाठी एकत्रित निविदा बोलाविण्यात आल्या होत्या. त्यामध्ये कमीत कमी दराची निविदा ६१. ५० टक्के जास्त दराने स्वीकृत झाली.

योजनेची निविदा जास्त दराने स्वीकृत झाल्याने योजनेची किंमत वाढणार असल्याने (१) जलशुद्धीकरण केंद्र, (२) कनेक्टींग मेन/ गुरुत्ववाहिनी, (३) शुद्ध पाणी पंपींग मशिनरी, (४) जमिनीवरील जलकुंभ, (५) उंच जलकुंभ ही कामे प्रथम हाती घ्यावीत व दरम्यान योजनेची सुधारित अंदाजपत्रके तयार करून त्यास शासनाची मंजुरी प्राप्त झाल्यानंतर उर्वरित कामे हाती घेण्यात यावीत असे आदेश शासनाने दि. १०. १०. २०१२ रोजी दिले व वाढीव उपांगाचा विचार करून सुधारित योजना तयार करण्यात आली. सुधारित अंदाजपत्रकांना रु. २७, ८२, ४०, ००० इतक्या ढोबळ किमतीस शासनाने सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान केली. सुधारित अंदाजपत्रकांस रु. २६, २९, ७१, ८०० निव्वळ इतक्या रकमेस तांत्रिक मान्यता प्रदान केली.

सुधारित योजनेस मंजुरी प्राप्त झाल्यानंतर कलम ३८ अंतर्गत समाविष्ट कामांची नवीन निविदा चालू दरसूचीप्रमाणे काढून, निविदा प्रसिद्ध केल्या असत्या तर वाढीव दर प्राप्त होण्याची शक्यता होती. त्यामुळे मूळ ठेकेदाराकडून कलम ३८ अंतर्गत कामे पूर्ण करून घेण्यात आली. मूळ निविदेसाठी सन २०१०-११ ची दरसूची वापरण्यात आली आहे तसेच कलम ३८ मधील बाबींसाठी सन २०१४-१५ ची दरसूची वापरण्यात आली आहे.

तसेच माळमाथा प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेचे कार्यान्वयानंतर एक वर्ष इतक्या कालावधीसाठी योजना संबंधित मूळ ठेकेदाराने स्वीकृत निविदेप्रमाणे चालवायची होती. या प्रादेशिक योजनेतील जवळजवळ ९० टक्के कामे मूळ ठेकेदाराकडून पूर्ण करून घेण्यात आल्यामुळे सुधारित योजनेत नव्याने मंजूर करण्यात आलेली वाढीव वितरण व्यवस्था, वाढीव गुरुत्ववाहिनी, जलकुंभ ही वाढीव कामे मूळ योजनेशी सलग्न असल्याने संपूर्ण निविदेची कामे एकाच ठेकेदाराकडून करून घेऊन त्याची जबाबदारी सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने व योजनेचा ट्रायल रन हा एकाच ठेकेदाराकडून करून घेणे सुद्धा संयुक्तिक असल्याने सुधारित योजनेतील वाढीव कामांसाठी रु. ३१४.७८ लक्ष इतक्या किमतीचा प्रस्ताव कलम ३८ अंतर्गत प्रस्तावित करून कामांना मान्यता दिलेली आहे.

चालू दरसूची पेक्षा जादा दर ठेकेदारास देण्यात आला नसल्याने रु. ३५,२१,९७२ एवढी रक्कम म. जी. प्रा. ची बचत होणार असल्याने शासनाचे आर्थिक नुकसान झालेले नाही. सद्यःस्थितीत योजनेतील सर्व कामे पूर्ण झालेली असून योजनेत समाविष्ट गावांना पाणीपुरवठा सुरू करण्यात आलेला आहे.

शिफारस

६.३८ नाशिक जिल्ह्यातील माळमाथा आणि २५ गावे क्षेत्रीय ग्रामीण पाणीपुरवठा योजना यासंदर्भात सदरहू परिच्छेदात आक्षेप नोंदविण्यात आलेले असून या योजनेवर रु. २ कोटीचे अतिरिक्त काम करण्यात आले. प्रत्येक गावात अगोदरच अस्तित्वात असलेली वितरण व्यवस्था तशीच ठेवून या योजनेचे नियोजन करण्यात आले. परंतु प्रत्यक्षात काम करताना प्रत्येक गावातील ग्रामस्थांनी पूर्वीची वितरण व्यवस्था बदलून ती नव्याने करण्याबाबत आग्रह धरला व त्याअनुषंगाने हे वाढीव काम करण्यात आहे. विभागाने निविदा सन २०१०-११ च्या सीएसआर (६१.५ टक्के) प्रमाणे दिली. परंतु नंतर सन २०१४-१५ च्या सीएसआरप्रमाणे (७८.५ टक्के) दिली. परिणामी ही तफावत १७ टक्क्यापेक्षा जास्त झाल्याचे समितीने निदर्शनास आणले. ग्रामस्थांच्या मागणीनुसार व आवश्यकतेनुसार वाढीव काम नियमानुसार करण्यास समितीला कोणतेही आक्षेप नाहीत. मात्र केवळ कोणत्या सीएसआरप्रमाणे वाढीव कामाचे पैसे देण्यात आले याबाबतचा प्रश्न शिल्लक राहतो. खंड ३८ प्रमाणे वाढीव काम करणे समितीला मान्य आहे परंतु ज्या वर्षीचे काम करतो त्या वर्षीचा चालू सीएसआर लावणे बंधनकारक आहे. असे असताना त्याचे पालन करण्यात आले नाही हा मूळ मुद्दा आहे. यावर विभागाने खुलासा केला की, अद्याप कंत्राटदाराला रकमेचे पूर्ण प्रदान करण्यात आले नाही. तसेच एकाच ठेकेदाराकडून मूळ निविदेअंतर्गत मूळ कामे व वाढीव कलम ३८ अंतर्गत कामे करून घेण्यात आल्यामुळे कामात एकसुत्रिपणा आला व ते पूर्ण करून घेण्यात आले. कलम ३८ मधील कामांसाठी मंजुरीच्या वेळेस सन २०१४-१५ चे दरसूचीचे निव्वळ दर विचारात घेण्यात आल्यामुळे रु. ३५,२१,९७२ ची बचत झाली असून शासनाचे आर्थिक नुकसान झालेले नाही असेही विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. जरी या प्रकरणी सीएसआर सन २०१४-१५ चा लावून देखील रकमेची बचत झाली असली तरीही विभागाने कोणत्याही नियमांची अंमलबजावणी करताना धोरण म्हणून हे केले पाहिजे व कोणत्याही परिस्थितीत त्याचे उल्लंघन होऊ नये याची देखील दक्षता घेतली पाहिजे. तसेच एका प्रकरणापुरता वेगळा निर्णय घेणे हा अन्य प्रकरणांसंदर्भात निश्चितच अन्यायकारक ठरु शकतो. वास्तविकतः कामाचे आराखडे व नियोजन करताना प्रत्यक्ष व तंतोतंत मोजमाप करून हे आराखडे निश्चित करणे आवश्यक आहे. मूळात कामाच्या व्याप्तीत नंतर वाढ होणे हे कमकुवत नियोजनाचे द्योतक आहे. त्यामुळे अनेक अडचणींमध्येदेखील वाढ होते. अतः हे आराखडे अधिकाधिक अचूकरित्या करण्याच्या अनुषंगाने विभागाने कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे अपवादात्मक परिस्थितीत जर कामाच्या व्याप्तीत काही वाढ झाल्यास त्याच कंत्राटदाराकडून चालू सीएसआरच्या दराने ही कामे करून घेतली जातात. अन्य कंत्राटदारांकडून ही कामे करून घेणे अडचणीचे ठरते. अशा परिस्थितीत कंत्राटदाराला अनियमित लाभ होतो व यात शासनाचे नुकसानही होते. प्रकल्पनिहाय विचार करता परिस्थितीनुसार त्याच कंत्राटदाराकडून ही कामे करून घेणे योग्यदेखील ठरते. परंतु सदरहू प्रकरणी मूळ निविदेपक्षा अंदाजे १७ टक्के जास्तीचे दर कंत्राटदाराला द्यावे लागले. अशा परिस्थितीत मूळ आराखडा तयार करताना शक्यतोवर संभाव्य कामाचा त्यात समावेश करूनच आराखडे तयार करण्यात यावेत. तसेच मंजूर आराखड्यापेक्षा कामात १० टक्क्याच्या मर्यादेत वाढ झाल्यास अशी कामे मंजूर दरात कंत्राटदारांनी करावीत अशी अट करारातच नमूद करण्याबाबतच्या पर्यायासंदर्भात शासनाने निर्णय घ्यावा. जेणेकरून भविष्यात अशा अडचणी उद्भवणार नाहीत याची दक्षता विभागाने घ्यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(५) 'पुणे जिल्ह्यातील हिंजवडी गाव क्षेत्रीय ग्रामीण पाणीपुरवठा योजना'

अभिप्राय

६.३९ पुण्यातील हिंजवडी गावासाठीच्या पेयजल पुरवठा योजनेकरिता पाणीपुरवठा व स्वच्छता विभागांनी रु. १७. ८६ कोटीची प्रशासकीय मान्यता दिली होती. कंत्राटदाराला रु. १०. २० कोटी इतक्या किमतीला काम दिले गेले होते व काम पूर्ण करण्यासाठी ३६ महिन्याचा कालावधी होता. योजनेसाठी लागणारे पाणी हिंजवडी गावापासून १० कि. मी. अंतरावरील कासारसाई मध्यम पाटबंधारे प्रकल्पातून घेण्याचे ठरविले होते. ज्यासाठी जलसंपदा विभागाने जल आरक्षण मंजूर केले होते. कंत्राटदाराने जॅकवेल व जॅकवेल पर्यन्तचा पोहोच पूल यासाठी खोदकामास प्रारंभ केला ज्यासाठी रु. ३२. ०४ लाखाचे प्रदान ऑक्टोबर, २०१५ मध्ये करण्यात आले होते. परंतु कासारसाई मध्यम पाटबंधारे प्रकल्पातून पाणी काढण्यास ग्रामस्थांनी विरोध केल्यामुळे पुढील काम होऊ शकले नव्हते. जरी ही योजना शासनाने मंजूर केली होती तरीही त्याबाबतच्या मुद्यांवर तोडगा काढण्यात त्यांना आलेल्या अपयशामुळे योजनेवर मार्च, २०१७ पर्यन्त झालेला खर्च रु. ३७. ४१ लाख निष्फळ ठरला होता असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

हिंजवडी पाणीपुरवठा योजना राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत प्रस्तावित (NRDWP) हिंजवडी ग्रामीण पाणीपुरवठा ता. मूळशी योजनेस रु. १७८६.५४ लक्ष रकमेस प्रशासकीय मान्यता मिळाली. तसेच शासन निर्णय दिनांक २२.१०.२०१३ अन्वये पाणी उचल परवानगी प्राप्त झालेली होती. सदर कामाचे कार्यादेश दिल्यानंतर उद्‌भवाचे (जॅकवेलचे) कामाची खोदाई सुरू असताना लगतच्या मावळ तालुक्यातील व नेरे, कासारसाई ही दोन मूळशी तालुक्यातील गावांनी कासारसाई धरणांतून पाणी उचलण्यासाठी प्रखर विरोध केला. याबाबत पोलीस ठाणे, मावळ येथे तक्रार देखील नोंदविण्यात आली. यासंदर्भात मा. जिल्हाधिकारी यांनी घेतलेल्या बैठकीमध्ये विरोध करणाऱ्या गावांकरिता लागणाऱ्या पाण्याचा आढावा सादर करणेच्या सूचना पाटबंधारे खात्यास देण्यात आल्या. पाटबंधारे खात्याने अहवाल सादर करताना कासारसाई धरणातून हिंजवडी पाणीपुरवठा योजनेस पाणी घेण्याबाबत हरकत नसलेबाबत व विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांच्या हितास बाधा येत नसल्याबाबत सविस्तर पाणी उपलब्धतेचा अहवाल सादर करणेत आला.

वास्तविकरित्या मजीप्राच्या या योजनेची आखणी करताना जवळचा आणि शाश्वत उदभव व दरडोई खर्चाचा निकष, या बाबी लक्षात घेऊन कासारसाई धरण हा उद्‌भव योग्य असल्यामुळे मजीप्रास पाटबंधारे खात्याने पाणी उचल करण्यास परवानगी दिलेली आहे. असे असतानादेखील फक्त आजूबाजूच्या ग्रामस्थांच्या विरोधामुळे व हिंजवडी गावाची पाणीटंचाई लक्षात घेता ही योजना राबविणे आवश्यक असल्याने मजीप्राने पर्यायी उदभवाबाबत पाटबंधारे खात्याकडे विचारणा केली परंतु दि. ९. १२. २०१५ च्या पत्रान्वये पवना तसेच मूळा नदीतून पाणी उपलब्ध नसलेबाबत पाटबंधारे खात्याकडून कळविणेत आले. परंतु याबाबत काहीही निर्णय होऊ शकला नाही.

सदरील योजना ही मागणी आधारित तत्वावर आखण्यात आलेली आहे. तसा ग्रामपंचायतीने ठराव देखील दिलेला आहे. प्रचलित निविदेतील अटी व शर्तीनुसार कंत्राटदारास झालेल्या कामाचे देयक अदा करणे क्रमप्राप्त होते त्यानुसार रु. ३७. ४१ लक्ष देयक कंत्राटदारास अदा करणेत आले. सदरील देयक काम बंद करणेपूर्वी अदा करणेत आलेले आहे. भविष्यात वरिष्ठ पातळीवरून व प्रशासकीय पातळीवरून हाच उद्‌भव घेऊन काम सुरू करण्यासाठीची शक्यता आहे. हिंजवडी गावातील पाणीटंचाईची परिस्थिती लक्षात घेऊन अद्यापही काम करणेस मजीप्रा प्रयत्नशील आहे. त्याकरिता सदरील केलेला खर्च भविष्यात उपयोगी येणार असल्याने खर्च निष्फळ ठरत नाही असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

शिफारस

६.४० पुणे जिल्ह्यातील हिंजवडी गाव क्षेत्रीय ग्रामीण पाणीपुरवठा योजनेसंदर्भात सदरहू परिच्छेदात आक्षेप नोंदविलेले असून हिंजवडीचे काम सुरू करण्यात आले होते. मात्र स्थानिक लोकांनी हे पाणी शेतीचे असून ते न घेण्याबाबत हरकत घेऊन काम देखील करू दिले नाही. यात रु. ३७. ४१ लाख इतका खर्च झालेला असून उर्वरित काम आता थांबलेले आहे व यासंदर्भात वरिष्ठ पातळीवर बैठकादेखील सुरू आहे. अशा बाबी राज्यात अनेक ठिकाणी घडत असतात. धरणाचे लाभार्थी अनेक गावे असतात. अशाप्रकारे लोकांनी अडथळा निर्माण करून कामे थांबविली तर कोणतेच काम पूर्ण होऊ शकणार नाही. शेतकऱ्यांना शासन सिंचनासाठी पाणी देते, मात्र पिण्याच्या पाण्यासाठी योजना करावयाची असेल तर ग्रामीण भागातील कोणत्याही नळ पाणीपुरवठा योजनेसाठी सिंचन खात्याची परवानगी घेण्याची आवश्यकता राहिलेली नसून यासंदर्भात विभागाने शासन निर्णय देखील काढलेला आहे. ग्रामीण भागासाठी लागणाऱ्या पिण्याच्या पाण्याचे प्रमाण हे अत्यल्प असून या नळ पाणीपुरवठा योजनांसाठी परवानगीची आवश्यकता नसल्याचे जलसंपदा विभागाने देखील सहमती दर्शविली असल्यामुळे आता त्याअनुषंगाने दि. १७.०८.२०१८ रोजी शासन निर्णय काढलेला आहे. फक्त पाणीपुरवठा योजनेसाठी लागणाऱ्या पाण्याचे नियोजन करून तसे जलसंपदा विभागाला कळविण्यासंदर्भात शासन निर्णयात नमूद आहे. शासनस्तरावरून झालेला हा निर्णय अतिशय सकारात्मक व योग्य आहे. मात्र त्याची अंमलबजवणी विभागाने आता करणे आवश्यक आहे. अनेक गावांमध्ये सद्य:स्थितीत काही ना काही पाण्याचे स्त्रोत उपलब्ध असल्यामुळे तेथील लोक तातडीने या योजनांना प्रतिसाद देत नाहीत. मात्र भविष्यात कधी ना कधी त्या गावात या योजना कराव्याच लागणार आहेत. त्याअनुषंगाने विभागाने संपूर्ण नियोजन करावे व या योजना कालबद्ध पद्धतीने पूर्ण करण्यासंदर्भात दक्षता घेऊन योग्य तो निर्णय घ्यावा व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ३.४.८.३ 'अकार्यशील योजना'

अभिप्राय

६.४१ व्यक्तिगत योजना (नळपाणी योजना आणि हातपंप/कूपनलिका/विंधण विहीर योजना) ह्या जिल्हा परिषद कार्यान्वित करतात तर क्षेत्रीय ग्रामीण पाणीपुरवठा योजना ह्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यान्वित करते. योजनांच्या पूर्णत्वासाठी भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांनी भरीव गुंतवणुक केली असल्यामुळे योजना अकार्यशील झाल्यास केवळ लोक-साधनसंपत्ती वाया जात नाही तर लाभार्थीही त्यांना मिळणाऱ्या लाभापासून वंचित राहतात.

जिल्हा परिषदांनी कार्यान्वित केलेल्या व अकार्यशील असलेल्या योजना पाहता चाचणी परिक्षा केलेल्या दहा जिल्ह्यांमध्ये एकूण ६११७४ योजनांपैकी ७१४५ योजना ह्या दि. ३१ मार्च, २०१७ रोजी अकार्यशिल होत्या ज्यात ७०९ वस्त्यांना व्यापित करणाऱ्या ३०७ नळ पाणीपुरवठा योजना होत्या ज्या अकार्यशील होत्या. तसेच अहमदनगर व बीड या दोन जिल्ह्यात जास्तीत जास्त योजना म्हणजेच ७१४१ पैकी ४८४२ योजना (६८ टक्के) हया अकार्यशील होत्या आणि त्याचप्रमाणे कार्यान्वयित केल्यानंतर पाच वर्षात १४२२ योजना अकार्यशिल झाल्या होत्या. वीज-आकाराचे प्रदान न करणे, कोरडे पडणारे स्त्रोत, प्रलंबित दुरुस्त्या, ग्रामपंचायतीकडून मागणी न येणे ही योजनांच्या अकार्यशिलतेची प्रमुख कारणे होती. अकार्यशिल योजनांवर झालेला प्रत्यक्ष खर्च सहजगत्या उपलब्ध नव्हता.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पूर्ण केलेल्या परंतु जिल्हा परिषदांना हस्तांतरीत न केलेल्या १३२ प्रादेशिक ग्रामीण पाणीपुरवठा योजनांच्या बाबतीत ९२ क्षेत्रीय ग्रामीण पाणीपुरवठा योजना हया मार्च, २०१७ रोजी अकार्यशील होत्या, ज्यांच्यावर रु. ४४३.८५ कोटी खर्च करण्यात आले होते. विद्युत देयकांचे प्रदान न करणे, स्त्रोत कोरडे पडणे, प्रलंबित दुरुस्त्या, जिल्हा परिषदांना योजना हाती न घेणे, ग्राम पंचायती कडून मागणी प्राप्त न होणे ही योजना अकार्यरत राहण्याची मुख्य कारणे होती. त्यामुळे योजनेवरील खर्च निष्फळ ठरला. तसेच कार्यान्वयन व देखभाल यांच्यासाठी उत्पन्न केलेला निधी स्वयंपूर्ण नव्हता ज्यामुळे योजना काही कालावधीतच अकार्यशील होण्याची जोखीम वाढत होती. सन २०१२-१७ या कालावधीत दोन जिल्ह्यांमध्ये (बुलढाणा आणि रायगड) जमा निधी फक्त रु. ९.०४ कोटी असताना केलेला खर्च रु. ३८.९५ कोटी होता असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

सदर योजनांमध्ये ९५% (६८२६) योजना ह्या विंधण विहिरी व हातपंप या वर्गवारीतील असून उन्हाळ्यामध्ये भूजलाची पातळी कमी होत असल्याने या तात्पुरत्या स्वरूपात बंद असतात. तसेच इतर योजना आयुर्मान संपल्याने, देखभाल दुरुस्तीचा अभाव, थकीत वीजदेयक इ. कारणांमुळे बंद असल्याचे निदर्शनास येत असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

शिफारस

६.४२ सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी अकार्यशील योजना यासंदर्भात आक्षेप नोंदविलेले आहेत. पूर्ण केलेल्या योजना काही ना काही कारणास्तव बंद पडतात. विशेषतः हातपंप नादुरुस्त वा बंद पडणे यामुळे अनेक अडचणी येतात. सद्यःस्थितीत भूपातळी पाण्यावरील १२ व भूपातळी पाण्याखालील २९५ योजना बंद आहे. आता विभागाने अनेक योजना सुरू करण्याचे नियोजन केले आहे. बंद असलेल्या प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेचे पुनर्जीवन करण्यासाठी विभागाने नियोजन केले असून जवळपास २६ योजनांचे सुधारित आराखडे व निधी विभागाने मंजूर केलेला आहे. मात्र यात प्रत्यक्षात येणारी अडचण ही अशा नळ पाणीपुरवठा योजना सुरू करण्यासाठी लागणारी वीज असून अनेक ग्रामपंचायतींनी विजेचे बील न भरल्यामुळे तेथील वीज जोडणी खंडीत करण्यात आली आहे. तसेच अनेक ग्रामपंचायतींकडून वीज बिलापोटीची मोठ्या प्रमाणात वसुली प्रलंबित आहे. अशा परिस्थितीत जोपर्यंत वीज बिलाची थकीत रक्कम भरुन नियमित वीज पुरवठा ग्रामपंचायतींना मिळत नाही तोपर्यत या योजना सुरू होऊ शकत नाहीत. यासंदर्भात शासनाने मंत्रिमंडळासमोर असा प्रस्ताव सादर केलेला आहे की, ग्रामपंचायती जर पैसे देत नसतील तर त्यांना देय असलेल्या पैशातून जिल्हापरिषदेने सरसकट कपात करावी व हा निधी एमजेपी किंवा प्रादेशिक योजना चालविणाऱ्या संस्थांना देण्यात यावा, जेणेकरून या योजना सुरळीतपणे सुरू राहतील. जिल्हापरिषदांना हस्तांतरीत न केलेल्या १३२ ग्रामीण पाणीपुरवठा योजनांपैकी ९२ योजना अकार्यशील असून त्यांच्यावर रु. ४४३.८५ कोटी इतका निधी खर्च झालेला आहे. योजना सुरळीत सुरू राहण्यासाठी एमजेपीला किंवा जिल्हापरिषदेला जो निधी मिळणे आवश्यक आहे तो न मिळाल्यामुळे या संस्थांचेदेखील मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. विभागाने त्यांना आता अर्थसहाय्य करण्याचे नियोजन केले आहे. अशा परिस्थितीत नळ पाणीपुरवठा योजना अखंड व सुरळीतपणे सुरू राहण्यासाठी ग्रामपंचायतीचे वीज बिले व पाणीपुरवठा करणाऱ्या संस्थांना त्यांची देयके नियमितरित्या मिळण्याच्यादृष्टीने व कोणत्याही कारणास्तव या योजना बंद पडू नयेत. यासाठी शासनाने योग्य ते नियोजन कालबद्ध पद्धतीने करावे व या बंद पडलेल्या योजनांचे पुनरुज्जीवन करून त्या सुरू कराव्यात व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ३.४.९ ' कार्यक्रमाचे संनियंत्रण आणि मूल्यमापन '

अभिप्राय

६.४३ पाणीपुरवठा प्रकल्पांचे संनियंत्रण आणि व्यवस्थापन करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या राज्य जल आणि स्वच्छता अभियानांची एकही बैठक २०१२-१७ दरम्यान घेतली गेली नव्हती. "एनआरडीडब्ल्यूपी च्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्याच्या ग्रामीण वस्त्यांमध्ये पुरेशा प्रमाणात पिण्यायोग्य पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठीच्या विद्यमान पाणीपुरवठा योजनांची कार्यशीलता निष्पादन यांचा आढावा घेणे स्त्रोत शोधक समितीला

बंधनकारक होते. परंतु राज्यात स्रोत शोधक समितीची रचनाच केली गेली नव्हती." जिल्ह्यांतील योजनांच्या भौतिक आणि आर्थिक प्रगतीचे संनियंत्रण करण्यासाठी, प्रकल्प गावांचे स्थलमूल्यन करण्यासाठी भारत सरकारने संनियंत्रण आणि मूल्यमापन सल्लागार यांचे एक पद मंजूर केले होते. तरी २०१४-१७ दरम्यान संनियंत्रण आणि मूल्यमापन सल्लागाराची स्थानापन्नता करण्यात आली नव्हती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या शासन निर्णयान्वये राज्य पाणीपुरवठा व स्वच्छता मिशनची राज्य शिखर समितीची बैठक दर सहा महिन्यांनी व आवश्यकतेनुसार घेण्यात यावी असे नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार सदर समितीची बैठक दि. ०५.०३.२०१४ रोजी प्रस्तावित करण्यात आली होती. तथापि, काही अपरिहार्य कारणामुळे सदर बैठक पुढे ढकलण्यात आली असल्याचे मा. मुख्य सचिव कार्यालयातून कळविण्यात आले. तसेच, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्य पाणीपुरवठा व स्वच्छता मिशनमध्ये कृषी व जलसंपदा विभागाच्या सचिवांचा अंतर्भाव करण्यात आला नसल्यामुळे त्यांचा समावेश करण्यासाठी शासन निर्णय दिनांक ०१. ०१. २०१९ अन्वये या सचिवांचा समावेश करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने यापुढे राज्य पाणी व स्वच्छता मिशनच्या बैठका यापुढे नियमितपणे घेण्यात येतील असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

आर्थिक वर्ष सन २००९-१० पासून केंद्र शासनाने वर्धित वेग ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमाचे रुपांतर राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम असे केले आहे. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार शासन निर्णयान्वये ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी सुधारित मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयातील धोरणातील तत्व व प्राधान्यक्रम याबाबत पुढीलप्रमाणे सूचना देण्यात आल्या आहेत :—

(१) गावात अस्तित्वात असलेल्या सर्व पिण्याच्या पाण्याच्या उपाययोजनांचा आढावा घेऊन त्यातील स्रोतांचे संवर्धन व बळकटीकरणे करणे, अस्तित्वात असलेल्या योजनांमध्ये सुधारणा करणे.

(२) गुणवत्ताबाधित गावांमध्ये सुरक्षित स्रोत विकसित करण्याकरिता उपाययोजना घेणे.

(३) एका गावातील वाड्या/वस्त्यांसाठी एकच योजना करण्यापेक्षा विकेंद्रीत उपाययोजना किफायतशीर असल्यास त्याला प्राधान्य देणे. योजना आखताना सर्व भूजल व भूपृष्ठावरील सार्वजनिक व खाजगी स्रोतांचा अभ्यास करून नियोजन करणे.

(४) ग्रामीण पाणीपुरवठा योजना राबविताना 'गाव कृती आराखडा' तयार करणे बंधनकारक राहील. या अंतर्गत लोकसहभागातून गावातील सर्व स्रोतांचा सर्वकष विचार करून पाण्याचा ताळेबंद तयार करणे.

उपरोक्त सूचनांच्या अनुषंगाने ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमांतर्गत प्राधान्य देण्यात येते तथा योजनेच्या आखणीदरम्यान स्रोत शोधक समितीच्या कार्यकक्षेबाबत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या मार्गदर्शक तत्त्वात नमूद केलेली बाब विचारात घेण्यात येते. त्यामुळे स्त्रोत शोधक समितीची स्थापना करण्याची प्रकर्षाने आवश्यकता भासली नाही असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

शिफारशी

६.४४ (१) सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी कार्यक्रमाचे संनियंत्रण आणि मूल्यमापन यासंदर्भात आक्षेप नोंदविलेले आहेत. याअंतर्गत पाणीपुरवठा प्रकल्पांचे संनियंत्रण आणि व्यवस्थापन करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या राज्य जल आणि स्वच्छता अभियानांच्या बैठका न घेणे, पिण्याच्या पाण्याचे स्रोत व उपलब्धता शोधणे आवश्यक असताना राज्यात स्रोत शोधक समितीची रचना न करणे, योजनांचे भौतिक व आर्थिक प्रगतीचे संनियंत्रण करण्यासाठी पद मंजूर असताना संनियंत्रण आणि मूल्यमापन सल्लागाराची नियुक्तीच करण्यात आली नव्हती. राज्यस्तरावर दक्षता आणि संनियंत्रण समिती स्थापित करण्यात आली नव्हती. तसेच गाऱ्हाणे निवारण प्रणाली अकार्यशील होती. अशाप्रकारे विभागाने संनियंत्रण व मूल्यमापन/आढावा घेतला नव्हता. सन २०१२ ते २०१७ दरम्यान एकही बैठक न घेतल्याबाबत समितीने विचारणा केली असता कार्यक्रमाचे संनियंत्रण आणि मुल्यमापन करण्यासाठी समितीची नियमित बैठक घेणे बंधनकारक असताना ती न घेतली गेल्यामुळे याकडे विभागाचे दुर्लक्ष झाले आहे. विभागाने गत ४ ते ५ वर्षे ही बैठक घेतली नसल्याचे मान्य केले. तसेच अशा बैठकी घेण्याची कोणती आवश्यकता वाटली नाही. कारण यात ज्या काही समस्या येतात त्या विभागाच्या स्तरावरच चर्चा करून निकाली काढण्यात येतात. यावर समितीने आक्षेप नोंदवित जर विभागाला या समित्यांची आवश्यकताच वाटत नसेल तर तो शासन निर्णय रद्द करावा, जर बैठकींशिवाय विभागाचे काम योग्यरितीने चालत आहे तर विभाग बैठकांचे नियोजन का करते असा प्रश्न समितीने उपस्थित केला. इतकेच नव्हेतर NRDWP च्या धोरणात्मक निर्णयानुसार आणि केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार राज्य पाणीपुरवठा व स्वच्छता मिशनच्या राज्य शिखर समितीची बैठक दर सहा महिन्यांमध्ये व आवश्यकतेनुसार आणखी अशापद्धतीने घेणे बंधनकारक असताना त्याचे पालन करण्यात येत नाही. जर विभागाला या नियमांची अंमलबजावणीच करावयाची नसेल तर ते शासन निर्णय रद्द करावेत. यावर विभागाने समितीसमोर सादर केले की, विभागाने या बैठका घेण्याचे आता नियोजन केले असून त्याचा अजेंडा तयार करून समितीचे पुनर्गठन देखील केलेले आहे. अतः समितीने विहित बैठका नियमितरित्या घेऊन कार्यक्रमाचे संनियंत्रण आणि मुल्यमापन प्रभावीरित्या करावे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

६.४५ (२) **NRDWP** च्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्याच्या ग्रामीण वस्त्यांमध्ये पुरेशा प्रमाणात पिण्यायोग्य पाणी उपलब्ध करून देण्यासाठी योजनांची कार्यशीलता/निष्पादन यांचा आढावा घेण्यासाठी स्त्रोत शोधक समिती बंधनकारक असतानाही अशा समितीची रचना करण्यात आली नाही. यासंदर्भात समितीने विचारणा केली असता महाराष्ट्रात विभागाने हे काम जीएसडीए कडे सोपविलेले असून ते पाण्याचा स्त्रोत तपासून शोधून काढतात. गत १० वर्षापासून त्यांनी हे काम केलेले आहे. समिती स्थापन केली तर त्याच्या बैठका, उपस्थिती यामध्ये फार वेळ जातो जे विभागाच्यावतीने जीएसडीए करते. पाण्याचे स्त्रोत शोधण्याचे काम नियमित व अचूकरित्या झाले पाहिजे हाच समितीचा निश्चित उद्देश व **NRDWP** ची मार्गदर्शक सूचना आहे. त्याची अंमलबजावणी योग्य व प्रभावीरित्या झाली पाहिजे अशी समितीची स्पष्ट भूमिका आहे. कोणत्या संस्थेकडून ते करण्यात येत आहे हे पाहण्यापेक्षा ते काम नियमितरित्या केले जात आहे हे पाहणे जास्त आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत यात खंड पडू नये याची विभागाने दक्षता घ्यावी अशी समितीची शिफारस आहे.

६.४६ (३) जिल्ह्यातील योजनांचा भौतिक व आर्थिक प्रगतीचे संनियंत्रण करण्यासाठी प्रकल्प गावांचे स्थलमुल्यांकन करण्यासाठी केंद्र शासनाने संनियंत्रण आणि मुल्यमापन सल्लागार यांचे पद मंजूर केलेले असताना त्यांची नियुक्ती करण्यात आली नाही. याबाबत समितीने विचारणा केली असता या कामासाठी विभागाने दोन सहाय्यक नेमले होते व मुख्य पद आता विभागाने नोव्हेंबर, २०१७ मध्ये भरले असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. विभागाने स्थलमुल्यमापनासाठी व योजनांची भौतिक व आर्थिक प्रगतीचे संनियंत्रण करण्यासाठी आवश्यक ती पदे विनाविलंब तातडीने भरावीत व कोणत्याही परिस्थितीत प्रशासकीय त्रुटीमुळे योजनेच्या अंमलबजावणीत बाधा येऊ नये याची दक्षता विभागाने घ्यावी अशी समितीची शिफारस आहे.

६.४७ (४) **NRDWP**च्या मार्गदर्शक सूचनांनुसार दक्षता आणि संनियंत्रण समिती स्थापन करणे आवश्यक असताना ती स्थापित करण्यात आली नाही. जिल्हास्तरावर जिल्हा दक्षता आणि संनियंत्रण समिती व ग्रामपंचायत स्तरावर ग्रामीणस्तरीय दक्षता व संनियंत्रण समिती स्थापित करण्यात आली नव्हती. याबाबत समितीने विचारणा केली असता ग्रामविकास विभागामार्फत दि. १२ मार्च, २०१० रोजी ही समिती गठीत करण्यात आली असून त्याचे कार्यवृत्त व अहवाल विभागाकडे असल्याचे समितीस सांगण्यात आले. ग्रामपंचायत पातळीवर सध्या कार्यरत असलेल्या ग्राम पाणीपुरवठा समितीकडे सर्व पाणी पुरवठ्याचे काम असल्यामुळे अशा समित्या गठीत करण्यात आल्या नाहीत. तसेच ज्या जिल्ह्यामध्ये अशा समित्या स्थापन झालेल्या नाहीत अशा सर्व ठिकाणची खात्री करून प्रत्येक जिल्ह्यात समिती गठीत झाली पाहिजे अशा सूचना तात्काळ देण्यात येतील असे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले. अतः त्याची अंमलबजावणी तातडीने करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

६.४८ (५) **NRDWP** च्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्य व जिल्हा स्तरावर योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात तक्रार निवारण प्रणाली विकसित करणे आवश्यक होते. अगोदर ई-पाणी नावाचे सॉफ्टवेअर विकसित करण्यात आले होते. त्यानंतर आपले सरकार या पोर्टलच्या माध्यमातून लोकांकडून तक्रारी येत होत्या. त्यानंतर विभागाने जलस्वराज्य प्रकल्प हाती घेतला. त्याअंतर्गत टोल फ्री नंबर देण्याचे नियोजन विभागाने केलेले असून त्याची अंमलबजावणीदेखील सुरू आहे. अतः विभागाने योजनेच्या यशस्वी अंमलबजावणी संदर्भात प्रभावी व अद्ययावत तक्रार निवारण यंत्रणा अखंडरित्या कार्यरत ठेवावी व प्राप्त तक्रारींचे निराकरण विहित मुदतीत करण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे.

६.४९ (६) **NRDWP** च्या मार्गदर्शक सूचनांनुसार ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमाचे संनियंत्रण व मुल्यमापन यांचा अभ्यास/आढावा नावाजलेल्या संघटना/संस्था यांच्याकडून वेळोवेळी करून घेणे आवश्यक असताना सन २०१२ ते २०१७ मध्ये त्याची अंमलबाजवणी झालेली नाही असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नोंदविलेले आहेत. याबाबत समितीने विचारणा केली असता असे सर्व्हेक्षण (ॲनालिसीस) केलेले असून **TISS** चा रिपोर्ट सन २०१५ मध्ये प्राप्त झालेला असल्याचे समितीच्या निदर्शनास आणण्यात आले. तसेच केंद्र शासनाने **TISS** ला कार्यक्रमाचे त्रयस्थ पक्षाकडून मुल्यमापन करण्यासाठी नेमले होते. त्यांनी राज्यातील ४८ ग्रामपंचायती नमुना म्हणून निवडल्या होत्या. त्यांचा नमूना सर्वेक्षण करून काही निष्कर्ष काढण्यात आले असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. केवळ महालेखाकारांना विभागाने ही कागदपत्रे आक्षेप अंतिम होण्याअगोदर दाखविली नाहीत त्यामुळे हे आक्षेप अंतिम झाले. याबाबतही समिती नापसंती व्यक्त करीत आहे. महालेखाकारांनी नोंदविलेले आक्षेप विभागाने गांभीर्याने व कालबद्ध पद्धतीने हाताळणे आवश्यक असून त्याची तातडीने दखल घेण्याबाबत सर्व संबंधितांना कळविण्यात यावे तसेच सदरहू प्रकरणी विभागाकडे उपलब्ध असलेली माहिती व अहवाल महालेखाकारांसमोर सादर करून त्याची छाननी करून घ्यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस ३ महिन्यात सादर करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

सर्वसाधारण शिफारस

६.५० १२ व्या पंचवार्षिक योजना कालावधी दरम्यान राज्यांनी पाणीपुरवठा योजनांच्या नियोजनासाठी राज्यातील विशिष्ट क्षेत्र धोरण आखले नसल्यामुळे राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम हा महाराष्ट्रात नियोजन आणि अंमलबजावणी मध्ये कमकुवत होता. ग्रामीण आणि जिल्हा जल सुरक्षा आराखडा आणि पंचावार्षिक सर्वसमावेशक सुरक्षा कृती आराखडा बनविण्यात आला नव्हता. तसेच कार्यक्रमासाठी राज्याला रु. ६१४४.५१ कोटी इतका निधी प्राप्त झाला होता तर २०१२-१७ दरम्यान रु. ५८८०.१६ कोटी खर्च झाले होते. दुसऱ्या

हप्त्याच्या वितरण मागणीच्या प्रस्ताव सादरीकरणात झालेला विलंब आणि मागील वर्षातील वितरणाच्या १० टक्क्यापेक्षा अधिक निधीची आरंभी शिल्लक असल्यामुळे केंद्र शासनाने निधी वितरणात रु. ७१.१० कोटीची कपात केली होती. राज्य शासनाने २०१२-१७ या कालावधीमध्ये रु. ५४७.९३ कोटीचा आपला अनुरुप हिस्सा दिला नव्हता. कंत्राटदारांकडून वैधानिक कामगार कल्याण उपकराची वसुली न करणे, कामगार भविष्य निर्वाहनिधी कंत्राटदाराने जमा न करणे ह्या गोष्टी कार्यक्रमांतर्गत दुबळ्या वित्तीय व्यवस्थापनाच्या द्योतक होत्या. कामे चालू असताना शासकीय मत्तांचा विमा उतरविण्याबाबतची सुनश्चिती कार्यान्वयीन संस्थांनी/अभिकरणांनी केली नव्हती.

११ व्या पंचवार्षिक योजनेनुसार, मार्च, २०१२ अखेरपर्यंत सर्व वस्त्यांना जरी दरडोई दरदिवशी ४० लिटर पाणी उपलब्ध करून द्यावयाचे होते तरी देखील राज्यातील १२८१५ वस्त्यांना (१३ टक्के) दरडोई दरदिवशी ४० लिटर पेक्षा कमी पाणी उपलब्ध करून दिले गेले होते. ग्रामीण वस्त्यांपैकी ५० टक्के वस्त्यांना १२ व्या योजने अखेर नळ पाणीपुरवठा करावयाचा होता तरी प्रत्यक्षात औरंगाबाद, गडचिरोली, नंदूरबार, पालघर, सोलापूर, यवतमाळ जिल्ह्यांमध्ये ५० टक्क्यांपेक्षा कमी वस्त्यांना नळ पाणीपुरवठा करण्यात आला होता. लेखापरिक्षणातील विश्लेषणात असे आढळून आले की घरगुती जोडणीसह नळ पाणीपुरवठा ३५ टक्के ग्रामीण वस्त्यांना करण्याच्या ध्येयासमोर १९ जिल्ह्यांमध्ये ग्रामीण वस्त्यांना घरगुती जोडणीसह नळ पाणीपुरवठा करण्यात आल्याची टक्केवारी ३५ टक्क्यापेक्षा कमी होती, जी आठ टक्के (गडचिरोली) ते ३४ टक्के (वर्धा) या दरम्यान होती. निवड केलेल्यापैकी पाच जिल्ह्यामध्ये ही टक्केवारी ११ टक्के (अहमदनगर) ते ३३ टक्के (रायगड) या दरम्यान होती. १२ व्या पंचावार्षिक योजना कालावधित राज्यातील दूषित पाण्याने बाधित वस्त्यांना हाताळण्यासारखे गंभीर मुद्दे साध्य झाले नाहीत कारण रु. ६.५६ लाख लोकसंख्या असलेल्या ३०४ वस्त्या दुषीत पाण्याने बाधित राहिल्या. दूषित पाण्याने बाधित वस्त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी निती आयोगाने दिलेला रु. १.७२ कोटींचा विशेष निधी विनावापर पडून होता. निधीची कमतरता, न्यायिक विवाद, कोरडे पडणारे पाण्याचे स्त्रोत आणि जमिनीची अनुपलब्धता इ. मुळे १७७ योजनांची पूर्तता होण्यासाठी पाच वर्षापेक्षा जास्त विलंब झाला होता. कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यक्रमाचे संनियंत्रण व मुल्यमापन कमकुवत होते.

तसेच चाचणी परीक्षा केलेल्या जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात म्हणजेच ७१४१ योजना ज्या जिल्हा परिषदांनी कार्यान्वयित केल्या होत्या त्या अकार्यशील ठरल्या होत्या, तर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने कार्यान्वयित केलेल्या राज्यातील ९२ प्रादेशिक ग्रामीण पाणीपुरवठा योजना अकार्यशील झाल्या होत्या. यापैकी ८९ योजनांवर रु. ४४३. ८२ कोटी खर्च करण्यात आले होते. विद्युत देयकांचे प्रदान न करणे, स्त्रोत कोरडे पडणे, प्रलंबित दुरुस्त्या, जिल्हा परिषदांना योजना हाती न घेणे, ग्राम पंचायती कडून मागणी प्राप्त न होणे ही योजना अकार्यरत राहण्याची मुख्य कारणे होती, ज्यामुळे योजनेवरील खर्च निष्फळ ठरला.

अशाप्रकारे, मोठ्या प्रमाणावर खर्च करून देखील पिण्याचे पाणी, नळाद्वारे पाणी, दूषित पाण्यासंदर्भातील मुद्दे इ. साठी ठरविलेली उद्दिष्टे साध्य झाली नव्हती व म्हणूनच अधिक प्रभावी उपाययोजनांची आवश्यकता आहे. प्रत्येक गावांसाठी व गावातील प्रत्येक व्यक्तींना शुद्ध व शाश्वत पाणीपुरवठा करण्याची शासनाची जबाबदारी आहे. राज्याची भौगोलिक रचना पाहता हे उद्दिष्ट गाठणे व नियमित पाणीपुरवठा देणे हे निश्चितच आव्हानात्मक आहे. त्यातच राज्यातील अनेक पाणीपुरवठा योजना या नैसर्गिक स्त्रोतावर अवलंबून असून स्त्रोत आटल्यामुळे देखील या योजना बंद पडल्या आहेत. त्यातच ग्रामपंचायतीची थकीत विजेची देयके यामुळे देखील योजना अखंडरित्या सुरू ठेवण्यासाठी अडचण निर्माण होते. अशाप्रकारे अनेक अडचणींवर मात करून शासनाने या पाणीपुरवठा योजना अखंडरित्या चालवाव्यात व त्यासाठी शाश्वत स्त्रोत निर्माण करावा व या सर्व परिच्छेदांमध्ये आक्षेपित बाबींची भविष्यात पुनरावृत्ती टाळावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ३.१३ “अपूर्ण पाणीपुरवठा योजनेवर निधीची अडवणूक”

अभिप्राय

६.५१ महाराष्ट्र शासनाने सावंतवाडी, वेंगुर्ले, मालवण आणि समुद्रकिनाऱ्यावरील इतर गावांना पेयजल पुरवठ्यासाठी कोकण विकास पॅकेज २००९ अंतर्गत, तिल्लारी धरण हे पाण्याचा स्त्रोत धरुन पाणीपुरवठा योजनेला तत्वतः मान्यता दिली. हे संपूर्ण पॅकेज तीन वर्षांत म्हणजे मार्च २०१२ पर्यंत कार्यान्वित करावयाचे होते. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने ही योजना मे. श्री उत्तम स्टील ॲण्ड पॉवर लिमिटेड या खाजगी कंपनी बरोबर कार्यान्वित करण्याचे ठरविले. (सप्टेंबर, २०१०) एप्रिल, २०११ मध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि मे. उत्तम स्टील ॲण्ड पॉवर लिमिटेड यांच्यामध्ये एक सामंजस्य करार (एमओयू) करण्यात आला ज्यामध्ये प्रकल्पाचा संपूर्ण खर्च आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने आणि मे. श्री उत्तम स्टील ॲण्ड पॉवर लिमिटेड यांच्यामध्ये करावयाच्या प्रमाणशीर खर्चाच्या हिश्श्याचे प्रगणन संयुक्तपणे करणे मान्य केले गेले होते. सामंजस्य कराराच्या खंड ६ नुसार, कामाची प्रत्यक्ष प्रगती आणि अंदाजित वेळ आणि खर्चात प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याची सुनिश्चिती करण्यासाठी योजनेच्या अंमलबजावणीवर संनियंत्रण ठेवण्यासाठी गठीत केलेल्या संयुक्त समितीच्या शिफारशींच्या आधारावर, मे. श्री उत्तम स्टील ॲण्ड पॉवर लिमिटेड त्यांच्या हिश्श्याची रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने मागणी केल्यावर प्रदान करणार होते.

सामंजस्य कराराच्या खंड ११ नुसार, जे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने आणि मे. श्री उत्तम स्टील ॲण्ड पॉवर लिमिटेड ह्या दोघांच्याही उपयोगाचे होते. ते काम झाल्यावर जर मे. श्री उत्तम स्टील ॲण्ड पॉवर लिमिटेडने काम मध्यावर सोडले तर, उर्वरित काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पूर्ण करेल आणि मे. श्री. उत्तम स्टील ॲण्ड पॉवर लिमिटेड त्यांच्या कामाच्या हिश्श्याची रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला प्रदान करण्यासाठी

जबाबदार असेल. परंतु मे. श्री उत्तम स्टील ॲण्ड पॉवर लिमिटेड यांनी अंशदान देण्यास विलंब केल्यास/ अंशदान न दिल्यास सामंजस्य करारामध्ये दंड आकारण्याबाबत कलम समाविष्ट केले नव्हते.

तद्अनुषंगाने पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभागाने रु. २१६.३७ कोटीची, तिल्लारी धरणाच्या पाणी स्रोताच्या आधारावर १८ गावांना, वेंगुर्ला शहर तसेच त्या मार्गांवरील पर्यटन केंद्रे आणि औद्योगिक आस्थापनांना पेय जल पुरवठा आणि मे. श्री उत्तम स्टील ॲण्ड पॉवर लिमिटेडला कच्चे पाणीपुरवठा करण्यासाठी प्रशासकीय मान्यता (जून, २०११) दिली. प्रशासकीय मान्यतेनुसार, अंदाजीत एकूण खर्च रु. २१६.३७ कोटी हा महाराष्ट्र शासन आणि मे. श्री उत्तम स्टील ॲण्ड पॉवर लिमिटेड मध्ये अनुक्रमे रु. ७५.१८ कोटी (३५ टक्के) आणि रु. १४१.१९ कोटी (६५ टक्के) असा विभागावयाचा होता.

कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने, नागरी आणि ग्रामीण योजना विभाग, कणकवली, सिंधुदुर्ग यांनी तिल्लारी पाणीपुरवठा योजना, तालुका दोडामार्ग, जिल्हा सिंधुदुर्गच्या सर्वेक्षण, आरेखन आणि बांधकाम, नमुना चाचणीसह कार्यान्वयन करण्यासाठी मे. इंडीयन ह्यूम पाईप कंपनी लिमीटेड मुंबई (कंत्राटदार) यांना रु. २१८.०६ कोटीला हे काम बहाल केले होते (ऑगस्ट, २०१३). कार्यादेश जारी केल्याच्या दिनांकापासून तीन वर्षांमध्ये काम पूर्ण करावयाचे होते. मे. श्री उत्तम स्टील ॲण्ड पॉवर लिमिटेडने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मागणीनुसार रु. १० कोटी एवढे सुरूवातीचे अंशदान जमा केले (ऑगस्ट, २०१३) आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने आणखी रु. ३० कोटीची मागणी केल्याच्या बदल्यात (सप्टेंबर २०१४) मे. श्री उत्तम स्टील ॲण्ड पॉवर लिमिटेडने फक्त रु. १० कोटी (जानेवारी, २०१५) जमा केले होते.

संयुक्त समितीने मागणी केलेली रक्कम जमा करण्यात मे. श्री उत्तम स्टील ॲण्ड पॉवर लिमिटेडला अपयश आले आणि कामाच्या प्रगतीत अडथळा आला आणि शेवटी रु. ५२.९५ कोटी खर्चून, दोन वर्षांनंतर १५ टक्केच काम करून निधीच्या कमतरतेमुळे कंत्राटदाराने काम थांबविले (जुलै, २०१५) म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने महाराष्ट्र शासनाला, शीर्ष कामे आणि अदत्त असलेल्या चालू देयकांचे प्रदान करण्यासाठी रु. १७.७८ कोटी एवढा निधी मुक्त करण्याची विनंती (एप्रिल २०१६) केली, पण शासनाने निधी मुक्त केला नाही. जर शीर्ष कामे पूर्ण झाली असती तर, नदीच्या पाण्याची पातळी वाढली असती आणि नदी किनाऱ्यावरील गावांकरिता योजना अंशतः कार्यान्वित करता आली असती.

या योजनेवर एकूण रु. ६४.६१ कोटी खर्च झाला होता, (रु. ५२.९५ कोटी आत्तापर्यंतचा खर्च आणि अदत्त चालू देयकांचे रु. ११.६६ कोटींचे दायित्व), ज्यापैकी मे. श्री उत्तम स्टील ॲण्ड पॉवर लिमिटेडने त्यांच्या रु. ४१.६० कोटी आवश्यक हिश्श्यापैकी, उपरोक्त नमूद केलेले फक्त रु. २०.०० कोटी दिले होते आणि शासनाच्या एकूण रु. ७५.०० कोटी हिश्श्यापैकी फक्त रु. ३२.९५ कोटी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला प्राप्त झाले होते. परिणामी प्रकल्पाचे काम मध्यावरच थांबले आणि रु. ५२.९५ कोटी निधीची अडवणूक झाली आणि रु. ११.६६ कोटींचे दायित्व वाढले, शिवाय उद्देशित फायदा मिळणारे लाभार्थी लाभापासून वंचित राहीले असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

या प्रकरणी विभागीय प्रतिनिधींनी नमूद केले की, दिनांक १ जून, २०११ रोजीच्या शासन निर्णयानुसार मे. श्री. उत्तम स्टील ॲन्ड पॉवर लिमिटेड (SUSPL) हे त्यांच्या सहभागाचा निधी सुमारे २ वर्ष पाठपुरावा केल्यानंतरही जमा करण्यास असमर्थ ठरल्याने, योजनेच्या एकूण ११२.२०४ द. ल. लि. प्रतिदिन पाणी मागणीपैकी मे. श्री उत्तम स्टील ॲन्ड पॉवर लिमिटेड (SUSPL) यांची ८८.४२१ द.ल.लि. प्रतिदिन पाणी मागणी वगळून उर्वरित इतर लाभार्थीसाठी योजना राबविण्याच्या दृष्टीकोनातून विविध पर्यायांची चाचपणी करण्यात आली. त्या अनुषंगाने शासनाकडे सादरीकरण करण्यात आले. योजनेची आतापर्यंतची झालेली कामे उपयोगात आणण्याचे प्रस्तावित करून फेर वित्तीय आकृतिबंधाचा प्रस्ताव शासनास दिनांक १८ मार्च, २०१८ रोजी सादर करण्यात आला. सदर प्रस्तावानुसार योजनेची किंमत (योजनेवर मार्च २०१८ पूर्वी झालेला रु. ५२.९८ कोटी व उर्वरित योजना पूर्ण करण्याकरीता आवश्यक रु. १५९.४० कोटी अशी) एकूण रु. २१२.३८ कोटी इतकी येत आहे.

तत्पूर्वी मा. मंत्री, वित्त व नियोजन यांनी सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पिय भाषणात सदर योजनेसाठी शासन रु. १००.०० कोटी एवढा निधी उपलब्ध करून देईल अशी घोषणा केली होती. सन २०१७-१८ च्या पुरवणी मागणीद्वारे रु. २०.०० कोटीची तरतूद विधानमंडळाच्या सन २०१७ च्या पावसाळी अधिवेशनात मंजूर करून घेण्यात आली होती. त्यानुषंगाने योजना कार्यान्वित करण्यासाठी स्वतंत्र अनुपालन लेखाशीर्ष उघडण्यास शासन मान्यता देत असल्याबाबत पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचा दिनांक ०५/०९/२०१७ रोजीचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. तिलारी प्रकल्पावर आधारित पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्याकरीता योजनेवर झालेला खर्च वजा जाता येणारा उर्वरित रु. १५९.४० कोटी इतका खर्च, स्वतंत्रपणे निर्माण करण्यात आलेल्या नवीन लेखाशीर्षाखालील तरतुदीतून करण्यास शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली. सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने लेखाशीर्ष सन २०१७-१८ या वर्षात पुरवणी मागणीद्वारे मंजूर करण्यात आलेल्या रु. २०.०० कोटी इतक्या निधीतून रु. १६.०० कोटी इतका निधी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात मंजूर व मुक्त करण्यात आलेला आहे. या प्राप्त निधीतून कंत्राटदाराच्या रु. १०६२.८७ लक्ष इतक्या थकीत देयकांची अदायगी एप्रिल, २०१८ अखेरीस करण्यात आली. तद्नंतर कंत्राटदारामार्फत मे, २०१८ मध्ये योजनेची कामे पुनः हाती घेण्यात आली. माहे नोव्हेंबर २०१८ अखेरपर्यंत सासोली येथील पंपगृहाचे वीट बांधकाम तसेच आतील बाजूने गिलाव्याचे कामही पूर्ण करण्यात आले. योजनेच्या यापूर्वी अंथरण्यात आलेल्या ६०० मीटर लांबीच्या जलदाब चाचणीचे काम दिनांक ६/०६/२०१८ रोजी यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आलेले आहे. तसेच दाबनलिकेच्या ६५० मी. इतक्या लांबीची जलवाहिनी नव्याने अंथरण्यात आलेली आहे. योजनेवर माहे नोव्हेबर, २०१८ अखेरपर्यंत रु. ६४००.८९ लक्ष इतका खर्च झाला. कंत्राटदारामार्फत मे, २०१८ मध्ये योजनेची कामे पुनः हाती घेण्यात आल्यानंतर अंदाजे रु. २००.०० लक्ष इतक्या किंमतीची कामे पूर्ण करण्यात आली.

ठेकेदाराने सादर केलेल्या बारचार्टनुसार योजनेची कामे जून, २०२० पर्यंत पूर्ण करण्यात येऊन, ठेकेदारामार्फत जून, २०२१ पर्यंत योजनेची चाचणीसह देखभाल-दुरुस्ती करण्यात येईल.

योजना कार्यान्वित करण्याबाबतच्या दिनांक २८ मार्च, २०१८ च्या शासन निर्णयात अट क्रमांक २ नुसार मे. श्री उत्तम स्टील ॲण्ड पॉवर लिमिटेड यांच्यासमवेत करण्यात आलेला करारनामा कायम ठेवण्यात येणार असून, जर मे. श्री उत्तम स्टील ॲण्ड पॉवर लिमिटेड कंपनी पुढे आल्यास, त्यानुसार योजनेची सुयोग्य रक्कम शासनाकडे अनामत ठेवण्यात येणार आहे. तसेच योजनेच्या कामास विलंब झाल्यामुळे त्यानुषंगाने आवश्यक रक्कम त्यांच्याकडून वसूल करण्यात यावी, असे निर्देश असल्याचे समितीस सांगण्यात आले.

शिफारस

६.५२ महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात अपूर्ण पाणीपुरवठा योजनेवर निधीची अडवणूक यासंदर्भात आक्षेप नोंदविलेले असून कोंकण क्षेत्रातील तिल्लारी धरणावर आधारलेल्या पाणीपुरवठा योजनेसाठी खाजगी कंपनीसोबत करण्यात आलेल्या चुकीच्या सामंजस्य करारामुळे आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला, महाराष्ट्र शासनाने निधी वितरित न केल्यामुळे योजनेवर रु. ५२.९५ कोटी इतक्या निधीची अडवणूक झाली व रु. ११.६६ कोटीचे दायित्व झाले, त्याचप्रमाणे नियोजित लाभार्थी उद्देशित लाभांपासून वंचित राहीले. मे. उत्तम स्टील ॲण्ड पॉवर लि. कंपनीसोबत कोकण क्षेत्रातील तिलारी धरणावर पाणीपुरवठा योजना आखण्यात आली होती. योजनेच्या भागभांडवलात उपरोक्त कंपनीचा मोठा सहभाग होता. मात्र कंपनीने केवळ रु. २० कोटी दिले व प्रकल्पाचे बांधकाम सुरू करण्यात आले. दरम्यानच्या कालावधीत ही कंपनी दिवाळखोरीत निघाल्यामुळे त्यांनी योजनेचे पुढील पैसे दिले नाहीत व बांधकाम बंद पडले. केवळ एका कंपनीने द्यावयाच्या हिश्श्याची रक्कम न दिल्यामुळे इतका मोठा प्रकल्प बंद पडणे योग्य नसून या प्रकल्पातून अन्य गावांनादेखील पाणी द्यायचे असल्यामुळे मा. मंत्री महोदयांच्या उपस्थितीत विभागाने यावर असा तोडगा काढला की, कोकणात अनेक गावांना पाण्याची आवश्यकता होती. कोकण विभागात पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष वा पाण्याची कमी उपलब्धता असल्यामुळे नैसर्गिक साधनसंपत्ती मोठ्या प्रमाणात असतानाही पर्यटन व पर्यावरणासंदर्भात अनेक प्रकल्प त्याठिकाणी सुरू होऊ शकले नाहीत. अशा परिस्थितीत योजनेचे बांधकाम शासनाने पूर्ण करण्याचा निर्णय घेण्यात आला. ज्यात रु. १०० कोटी शासनाने उपलब्ध करून देण्याचे निर्णय घेतले व रु. २० कोटी सन २०१८ च्या पुरवणी मागणीत दिले आणि बांधकाम सुरू करण्यात आले. उत्तम स्टील कंपनीच्या हिश्श्याची रक्कम गृहीत धरुन शासनाने ही पाणी पुरवठ्याची योजना सुरू केली. मात्र अनेक वर्षे ही योजना रखडलेली आहे. सन २०११ पासून योजनेचे नियोजन असून आजतागायत प्रकल्पाचे काम अपूर्णच आहे. सद्यःस्थितीत या प्रकल्पाची एकूण किंमत रु. २१२.३८ कोटी इतकी आहे. समितीच्या असेही निदर्शनास आले की, विभागाने दि. २८ मार्च, २०१८ च्या शासन निर्णयात अट क्र. २ मध्ये श्री उत्तम स्टील ॲण्ड पॉवर लि. यांचेसमवेत करण्यात आलेला करारनामा कायम ठेवण्यात आला असून ही कंपनी पुढे आल्यास योजनेची सुयोग्य रक्कम शासनाकडे अनामत ठेवण्यात येणार असून योजनेच्या कामास विलंब झाल्यामुळे त्याअनुषंगाने आवश्यक रक्कम त्यांचेकडून वसुल करून योजनेत या कंपनीचा समावेश करता येईल अशी तरतूद करण्यात आली. आजतागायत या कंपनीने करारनाम्यातून माघार घेतलेली नाही तसेच पैसे देखील भरलेले नाहीत. असे असताना शासन निर्णयांतर्गत उपरोक्त तरतूद शासनाने करून ठेवण्याची कोणतीही आवश्यकता नव्हती. ही कंपनी जर दिवाळखोरीत गेली असेल तर त्यांचेकडून पैसे वसुल होणे शक्य नाही किंवा या कंपनीच्या ठिकाणी जी नवीन कंपनी त्याठिकाणी येईल ती या जुन्या करारास निश्चितच बांधिल राहणार नाही व नवीन कंपनीसोबत शासनास नव्याने करार करणे क्रमप्राप्त ठरेल. अशा परिस्थतीत उत्तम स्टील कंपनीने कराराचा भंग केल्याप्रकरणी हा करार रद्द करून त्यांचे रु. २० कोटी जप्त करण्यात यावेत हाच एकमेव पर्याय या प्रकरणी शिल्लक राहतो व भविष्यात शासनाला कोणत्याही नवीन कंपनीसोबत नव्याने अटी शर्तीसह करारबद्ध होणे शक्य होईल असे समितीचे स्पष्ट मत आहे. समितीच्या या भूमिकेशी विभागीय सचिवांनी सहमती दर्शविली व पुन्हा एकदा नोटीस काढून सदर कंपनीला एकतर पूर्ण देय रक्कम भरावी अन्यथा रु. २० कोटी जप्त करून करारनामा रद्द करण्याबाबत कळविण्यात येईल व त्याअनुषंगाने या कंपनीने अंमलबजावणी न केल्यास हा करार रद्द करण्यात येईल असे समितीस विभागीय प्रतिनिधींनीद्वारे आश्वासित करण्यात आले. त्याअनुषंगाने पुढील कारवाई विभागाने तातडीने व कालबद्ध पद्धतीने करावी व कंपनीने तातडीने पैसे न भरल्यास करार रद्द करण्याची कार्यवाही करण्यात यावी. तसेच या प्रकल्पाला शासनाकडून आता निधी देण्यात आलेला असून प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. या प्रकल्पाचे काम तातडीने पूर्ण करण्यात यावे व कोकणातील जास्तीत जास्त भागात यातून पाणीपुरवठा करण्याच्यादृष्टीने आवश्यक ती कार्यवाही विभागाच्या माध्यमातून करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी.

परिशिष्ट-अ

गुरूवार, दिनांक २४ जानेवारी, २०१९

लोकलेखा समिती

समितीची बैठक गुरूवार, दिनांक २४ जानेवारी, २०१९ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.३० वाजता सुरू होऊन दुपारी २.५० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख :

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि. स. स. तथा समिती प्रमुख

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि. स. स.

(३) श्री. संजय सावकारे, वि. स. स.

(४) श्री. संजय केळकर, वि. स. स.

(५) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि. प. स.

(६) श्री. रविंद्र फाटक, वि. प. स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. अ. चां. कोल्हे, उ. स. तथा नि. अ.

(२) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

निमंत्रित :

महालेखाकार कार्यालय :

(१) श्री. यशवंत ठाकरे, प्रधान महालेखाकार, मुंबई

(२) श्रीमती हेमा मुनिवेंकटप्पा, महालेखाकार, नागपूर

वित्त विभाग :

श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले. व को.) विभाग

विभागीय प्रतिनिधी :

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग :

डॉ. प्रदीप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१६-२०१७ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्रमांक ३.१ यासंदर्भात प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग आणि इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक २९ जानेवारी, २०१९

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २९ जानेवारी, २०१९ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २.३० वाजता सुरू होऊन सायंकाळी ४.४० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख :

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि. स. स. तथा समिती प्रमुख

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि. स. स.

(३) श्री. नानाजी शामकुळे, वि. स. स.

(४) श्री. संजय सावकारे, वि. स. स.

(५) श्री. सुधाकर देशमुख, वि. स. स.

(६) श्री. राजेंद्र पाटणी, वि. स. स.

(७) श्री. योगेश सागर, वि. स. स.

(८) डॉ. सुनिल देशमुख, वि. स. स.

(९) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि. स. स.

(१०) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि. प. स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. अ. चां. कोल्हे, उ. स. तथा नि. अ.

(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

निमंत्रित :

महालेखाकार कार्यालय :

श्री. यशवंत ठाकरे, प्रधान महालेखाकार, मुंबई.

वित्त विभाग :

श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले. व को.) विभाग

विभागीय प्रतिनिधी :

पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग :

श्री. शामलाल गोयल, अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१६-२०१७ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्रमांक ३.४ यासंदर्भात अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग आणि इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक ५ फेब्रुवारी, २०१९

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक ५ फेब्रुवारी, २०१९ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २.३० वाजता सुरू होऊन सायंकाळी ४.४५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख :

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि. स. स. तथा समिती प्रमुख

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि. स. स.

(३) श्री. नानाजी शामकुळे, वि. स. स.

(४) श्री. सुधाकर देशमुख, वि. स. स.

(५) श्री. अतुल भातखळकर, वि. स. स.

(६) श्री. योगेश सागर, वि. स. स.

(७) डॉ. सुनिल देशमुख, वि. स. स.

(८) श्री. सुरेश धानोरकर, वि. स. स.

(९) प्रा. विरेंद्र जगताप, वि. स. स.

(१०) श्री. राजेश टोपे, वि. स. स.

(११) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि. प. स.

(१२) श्री. विक्रम काळे, वि. प. स.

(१३) श्री. जयंत पाटील, वि. प. स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. अ. चां. कोल्हे, उ. स. तथा नि. अ.

(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

निमंत्रित :

महालेखाकार कार्यालय :

(१) श्री. यशवंत ठाकरे, प्रधान महालेखाकार, मुंबई.

(२) श्रीमती हेमा मुनिवेंकटप्पा, महालेखाकार, नागपूर.

वित्त विभाग :

श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले. व को.) विभाग

विभागीय प्रतिनिधी :

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग :

डॉ. प्रदीप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१६-२०१७ या वर्षांच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्रमांक ३.१ यासंदर्भात प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग आणि इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली.

(शा.म.मु.) एचबी १५०७-२८ (४००—१०-२०१९)

मंगळवार, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.३० वाजता सुरू होऊन दुपारी ३. १५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख :

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि. स. स. तथा समिती प्रमुख

सदस्य :

(२) श्री. संजय सावकारे, वि. स. स.

(३) डॉ. सुनिल देशमुख, वि. स. स.

(४) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि. स. स.

(५) प्रा. विरेंद्र जगताप, वि. स. स.

(६) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि. प. स.

(७) श्री. जयंत पाटील, वि. प. स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. अ. चां. कोल्हे, उ. स. तथा नि. अ.

(२) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

निमंत्रित :

महालेखाकार कार्यालय :

श्री. यशवंत ठाकरे, प्रधान महालेखाकार, मुंबई

वित्त विभाग :

श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले. व को.) विभाग

विभागीय प्रतिनिधी :

पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग :

श्री. शामलाल गोयल, अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१६-२०१७ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्रमांक ३.४ यासंदर्भात अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग आणि इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली.

गुरूवार, दिनांक १४ फेब्रुवारी, २०१९

लोकलेखा समिती

समितीची बैठक गुरूवार, दिनांक १४ फेब्रुवारी, २०१९ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.३० वाजता सुरू होऊन दुपारी ३.२५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख :

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि. स. स. तथा समिती प्रमुख

सदस्य :

(२) श्री. संजय सावकारे, वि. स. स.

(३) श्री. अतुल भातखळकर, वि. स. स.

(४) श्री. योगेश सागर, वि. स. स.

(५) डॉ. सुनिल देशमुख, वि. स. स.

(६) श्री. राजेश टोपे, वि. स. स.

(७) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि. प. स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. अ. चां. कोल्हे, उ. स. तथा नि. अ.

(२) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

निमंत्रित :

महालेखाकार कार्यालय :

श्री. यशवंत ठाकरे, प्रधान महालेखाकार, मुंबई.

वित्त विभाग :

श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले. व को.) विभाग

विभागीय प्रतिनिधी :

पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग :

श्री. शामलाल गोयल, अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१६-२०१७ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्रमांक ३.४ व ३.१३ यासंदर्भात अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग आणि इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक २३ जुलै, २०१९

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २३ जुलै, २०१९ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी ३.०० वाजता सुरू होऊन सायंकाळी ५.०० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख :

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि. स. स. तथा समिती प्रमुख

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि. स. स.

(३) श्री. संजय सावकारे, वि. स. स.

(४) श्री. राजेंद्र पाटणी, वि. स. स.

(५) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि. स. स.

(६) प्रा. विरेंद्र जगताप, वि. स. स.

(७) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि. प. स.

(८) श्री. रविंद्र फाटक, वि. प. स.

(९) श्री. विक्रम काळे, वि. प. स.

(१०) श्री. जयंत पाटील, वि. प. स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

(३) श्री. विनोद राठोड, कक्ष अधिकारी

(४) श्री. रवींद्र म. मेस्त्री, कक्ष अधिकारी

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१६-२०१७ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील सार्वजनिक आरोग्य विभागासंदर्भात (परिच्छेद क्रमांक ३.१) समितीने तयार केलेला प्रारुप अहवाल विचारात घेऊन संमत करण्यात आला.

मंगळवार, दिनांक ६ ऑगस्ट, २०१९

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक ६ ऑगस्ट, २०१९ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी ३.०० वाजता सुरू होऊन सायंकाळी ४.३० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख :

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि. स. स. तथा समिती प्रमुख

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि. स. स.

(३) श्री. संजय केळकर, वि. स. स.

(४) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि. प. स.

(५) श्री. विक्रम काळे, वि. प. स.

(६) श्री. जयंत पाटील, वि. प. स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

(३) श्री. विनोद राठोड, कक्ष अधिकारी

(४) श्री. रवींद्र म. मेस्त्री, कक्ष अधिकारी

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१६-२०१७ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील पाणीपुरवठा व स्वच्छता विभागासंदर्भात (परिच्छेद क्रमांक ३.१३) समितीने तयार केलेला प्रारुप अहवाल विचारात घेऊन संमत करण्यात आला.

मंगळवार, दिनांक १३ ऑगस्ट, २०१९

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक १३ ऑगस्ट, २०१९ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरू होऊन दुपारी १. ०० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि. स. स. तथा समिती प्रमुख

सदस्य :

(२) श्री. संजय सावकारे, वि. स. स.

(३) श्री. सुधाकर देशमुख, वि. स. स.

(४) श्री. राजेंद्र पाटणी, वि. स. स.

(५) श्री. संजय केळकर, वि. स. स.

(६) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि. प. स.

(७) श्री. विक्रम काळे, वि. प. स.

(८) श्री. जयंत पाटील, वि. प. स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

(३) श्री. विनोद राठोड, कक्ष अधिकारी

(४) श्री. रवींद्र म. मेस्त्री, कक्ष अधिकारी.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१६-२०१७ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील पाणीपुरवठा व स्वच्छता विभागासंदर्भात (परिच्छेद क्रमांक ३.४) समितीने तयार केलेला प्रारुप अहवाल विचारात घेऊन संमत करण्यात आला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई